7. द्वार के दोनों पार्श्व में द्वारपाल के स्थान पर गंगा एवं यमुना की मूर्ति उत्कीर्ण होती है। गंगा को मकर वाहिनी तथा यमुना की कूर्मवाहिनी दिखाया गया है। ब्राऊन के अनुसार बौद्ध पुग की यक्षिणी गा शाल मंजिका का समादर न रह गया हो और उसका स्थान
8. ब्रामण धर्म में गंगा, यमुना में ले लिया।"सर्वगृह के चारों ओर प्रदक्षिणा पथ रहता है, जो छत से आयादित है।
9. मंदिर के वर्गाकार स्तम्भों के शीर्ष पर चार सिंह की मूर्तियों पीठ से पीठ लगी निर्मित है, जिन पर छत कर भार रहता था।
10. गुप्तकालीन भदिनों के गर्भगृह में प्रतिष्ठित प्रतिमा के केवल पूजन निमित आकार-प्रकार निर्मित थे. उस स्थान पर उपासक जनता के सभास्थल का सर्वथा आभाव दिखाई देता है।
11 मितरी गाँव कानपुर, लक्ष्मण मंदिर सिरपुर के अपवाद के अलावा शेष मंदिर तराशे हुए पत्थरों के बने हुए हैं।
12. गुप्तयुग में पौराणिक धर्म की प्रधानता के कारण वैष्णव, शेर, सूर्य आदि के अनेक मंदिर निर्मित किये गये।[9]

गुप्त तथा गुप्तीला काल के मंदिरों में ऐसे साक्ष्य जी गुप्तकाल के अन्तर्गत आते हैं, वे प्रायः सम्पूर्ण मासा पाकिस्तान तथा बाग्लादेश से मिले हैं। किन्तु गुप्तकालीन सर्वाधिक मंदिर मध्यप्रदेश में सुरक्षित अवस्था में है। इस काल में मध्य-प्रदेश में तीनों अवस्थाओं के मंदिर प्राप्त है तथा विकास के तीनों चरणों को देखा जा सकता है। यह मध्य प्रदेश का सौभाग्य ही है कि स्वर्ण युग कहे जाने गुप्तकाल के मंदिरों के संयोंधिक रराक्ष्य मध्य प्रदेश से प्राप्त है। मध्य प्रदेश क्षेत्र में मंदिर वास्तु प्राप्ति स्थल-सीबी, तिगोबा, एरण, नथना-कुठार, भूमरा, बोह, कुण्या, पठरी, देवरी, उदयगिरि बेस नगर मंदसौर, तुमैन, साकोर, सिरपुर आदि मुख्य है। इसके अतिरिक्त भारत के अन्य क्षेत्रों से भी गुप्तयुगीन मंदिर वास्तु प्राप्त हैं। जिनमें मुख्यतः उत्तर प्रदेश में (कानपुर) मितवी गीय, गढ़ना, कौशाम्बी, मीटर, बिलसद, अहिच्छत्र, श्रावस्ती कुशीनगर, सारनाथ मितरी, देवगढ़ आदि प्रमुख मंदिर है। राजस्थान का मुकन्दन्दर्स मंदिर, बिहार में राजगिर, बोधगया, नालन्दा वैशाली आदि से गुप्तकालीन मंदिरों के अवशेष हुए है। महाराष्ट्र में तेर तथा गुजरात का गोप मंदिर उल्लेखनीय है। कनार्टक में ऐहोले और आन्ध्र प्रदेश में चेजराला से गुप्तकाल के कतिपय मंदिर मिले हैं। असम में दह परवतिया नामक स्थान पर स्थित मंदिर गुप्तकालीन माना जाता है। पाकिस्तान में वैद्याम् पट्टन, मुनरा तथा मीरपुस्त्रवास में गुप्तकालीन मंदिर के अवशेष प्राप्त हुए हैं इसके अतिरिक्त बांग्लादेश में बानगढ़ महास्थान, गोकुल आदि से भी गुप्तमुगीन मंदिर अवशेष प्राप्त हुए है। [10]

नथना-कुठार (मध्य प्रदेश) गुप्तकालीन पार्वती मंदिर।

एवं शस्त्रजीवी थे तो दूसरी ओर विद्यावसनी, प्रज्ञावान, प्रजावत्सल, कलानुरागी भी थे। तद्युगीन जनमानस में विविध कलात्मक उपलब्धियों सक्रिय हो उठीं। शिल्पियों की पैनी दृष्टि सुविकसित सौंदर्य भावना, विलक्षण रचना कौशल ने महत्वपूर्ण कलाकृतियों का सृजन किया जो स्थापत्यकला एवं शिल्पकला में स्पष्ट रूप से परिलक्षित होता है। गुप्तकला में भारतीय कला के इतिहास में उस स्वर्णयुग का प्रतिनिधित्व करती है जिसकी विषयवस्तु स्थानीय है इसमें नैतिकता, आध्यात्मिकता एवं शालीनाता का उत्तम समन्वय दृष्टिगत है। गुप्तकला स्वतः सहूर्त कला है इसमें मन को अहह्लादित करने वाला सौन्दर्य विद्यमान है।

निष्कर्षत गुप्तशासकों के द्वारा शासित क्षेत्र अत्यन्त विस्तृत थे शासकों के कला में रूचि के कारण गुप्तकालीन कलाकारों ने उत्कृष्ट हस्त-लाघवता का परिचय दिया, गुप्तकाल के सम्यक अनुशीलनोपरान्त सम्पूर्ण भारतीय कला के स्वर्णयुग को चरितार्थ करती हुई गुप्तयुगीन कला गौरवान्धित करती है। उल्लेखनीय है कि गुप्युगीन कलाकारों ने अपने कला में अध्यात्म के साथ-साथ लोक जीवन के विभिन्न पक्षों को उद्घाटित कर लोगों में सौन्दर्य और आनंद की वृद्धि की, साथ ही इस बात पर विशेष बल दिया कि कला-कृतियाँ चरित्र निर्माण में सहायक बनें।[11]

संदर्भ सूची

1) पाण्डेय, वी. के. प्राचीन भारतीय कला, बास्तु एवं पुरातत्व, शारदा पुस्तक भवन, इलाहाबाद, 2013, -182

2) अग्रवाल, पृथ्वी, गुप्तकालीन कला एवं बातु विश्वविद्यालय प्रकाशन, वाराणसी 1994, पृ.- 71
3) प्राचीन भरतीय कला वास्तु कला एवं मूर्ति कला, रिसर्च पश्निकेशन, जयपुर, पृ.-79
4) श्रीवास्तव, ए. एल. भारतीय कला, किताब महल, इलाहाबाद, 1988, पृ.110
5) डॉ. रमानाथ मिश्र, गुप्त कालीन कला, अनुपम पब्लिकेशन कानपूर 2022 पृ. 215.
6) आर. पी. त्रिपाठी, प्राचीन भारतीय कला, प्रथमेश पब्लिकेशन इलाहाबाद, 2023 पृ 136
7) एम. जी. दीक्षित, प्राचीन भारतीय शिल्पकला, सुमेरु प्रकाशन डोंबिवली , 2019 पृ 188
8) सी. के. तिवारी , प्राचीन भारत का इतिहास, संकेत प्रकाशन ग्वाल्हेर, 2022 पृ 213
9) ए. एस. शर्मा, प्राचीन भारतीय कला, राधा पब्लिकेशन दिल्ली 2023 पृ 133
10) यादव, रूदल प्रसाद, भारतीय कला, विजय प्रकाशन मंदिर, वाराणसी, 2000, पृ. 80
11) गुप्त, परमेश्वरी, गुप्त साम्राज्य, विश्वविद्यालय प्रकाशन् वाराणसी, 2011. -619

भावना योग

अतुल रमेश पिसोळे

सहायक शिक्षक

जिल्हा परिषद शाळा, दिवानझरी ता तेल्हारा जि अकोला

प्रस्तावना

तन को स्वस्थ मन को मस्त और आत्मा को पवित्र बनाने का अभिनव प्रयोग है "भावना योग" **"यद भाव्यते तद् भवति** "हम जैसी भावना भातें हैं वैसा होता है। की प्राचीन युक्ति पर आधारित इस योग की वर्तमान में लॉ आफ अट्रैक्शन के रूप में जाना जाता है। आधुनिक मनोविज्ञान के अनुसार हम जैसा सोचते हैं वैसे संस्कार हमारे अवचेतन मन पर पड़ जाते हैं। वहीं प्रकट होकर हमारे भावी जीवन को नियंत्रित और निर्धारित करते हैं। कहां जाता है Thought's become things अर्थात विचार साकार होते हैं। भावना योग का यही आधार है। इस माध्यम से हम अपनी आत्मा में छिपी असीमित शक्तियों को प्रकट कर सकते हैं।

सोहं इत्यात्त संस्कारात तस्मिन भावनया पुन:|

तत्रेव दृढ संस्कारात् लभते हिं आत्मनि स्थितीम्

अर्थात में शुद्ध आत्मा हूं इसकी बार-बार भावना भाने से अपनी शुद्ध आत्मा को प्राप्त किया जा सकता है। आधुनिक मनोविज्ञान के व्याख्याता इसी आधार पर लॉ आफ अट्रैक्शन के सिद्धांतों को प्रचारित कर रहे हैं।

आधुनिक प्रयोग के आधार पर यह बात स्पष्ट हो चुकी है की भावनाओं के कारण हमारी अंत स्त्रावी ग्रंथियां पर व्यापक प्रभाव पड़ता है इसके आधार पर अनेक गंभीर बीमारियों की चिकित्सा भी की जा सकती है यदि हम नियमित भावना योग करें तो इसका लाभ उठाया जा सकता है इसे न्यूरो साइको इम्यूनोलॉजी के रूप में भी जाना जाता है इसी सिद्धांत पर विचार करते हुए मुनि प्रमाण सागर जी महाराज जी ने भावना योग को तैयार किया है। यह वही प्राचीन वैज्ञानिक साधना है जिसे हजारों वर्ष से अपना कर जैन मुनि अपना कल्याण करते रहे हैं। मुनि प्रमाण सागर जी महाराज इन्होंने उसकी ही आधुनिक व्याख्या करके इसे जनों उपयोगी बनाने का प्रयास किया है।

आज के इस भौतिकवादी युग में जब मनुष्य बाह्य उपलब्धियां की अनावरत दौड़ में अपने ही अंतःकरण की शांति और सहजता से दूर होता जा रहा है। तब भावना योग उसे भीतर की और मोड़ने , स्वयं से जुड़ने और आत्मिक शांति को अनुभव करने की प्रेरणा देता है। यह एक ऐसी यात्रा है जो हमें बाहर की कोलाहल से भीतर की मौन गहराइयों की ओर ले जाती है।

भावना योग कोई नया दर्शन या जटिल सिद्धांत नहीं है बल्कि यह आत्म चेतना को जागृत करने की एक सहज स्वाभाविक साधना पद्धति है। यह न किसी संप्रदाय विशेष की सीमाओं में बंधा है, नहीं किसी कर्मकांडी विधि विधान से यह तो जीवन जीने कि उसे कलाऔर दिशा का नाम है। जिसमें व्यक्ति अपनी ही अंतर्मन की अतल गहराइयों में उतरकर अपनी वास्तविक सत्ता अर्थात आत्मा से साक्षात्कार करता है।

यह भावना योग किसी विशेष जाति धर्म संप्रदाय या विचारधारा की सीमाओं में बंधा हुआ नहीं है। यह किसी मठ या आश्रम की चार दिवारी तब सीमित नहीं है। यह तो मानव मात्र के कल्याण के लिए प्रत्येक आत्मा के उत्थान के लिए एक सार्वभौमिक और शाश्वत मार्ग है। यह हर उसे आत्मा के लिए है जो सच्चे हृदय से स्वयं को सहज स्वस्थ

सकारात्मक और शांत बनाना चाहती है और अपने वास्तविक आत्मक स्वरूप को पहचानना चाहती है। **भावना योग का महत्व**

जैन साधना में जो ध्यान है वह चित्त की एकाग्रता का नाम है और वहां तो यह कहां जा गया है कि यदि तुम ध्यान की गहराई में डुबाना चाहते हो तो तुम कोई भी चेष्टा मत करो कुछ बोलो मत कुछ सोचो मत आत्मा को आत्मा में स्थिर रखो यह परम ज्ञान है। शून्य भाव में पहुंच जाना विचार सुनने विकल्प शून्य क्रिया शून्य वह परम ज्ञान है। भगवान महावीर ने हमारे तीर्थंकरों ने जैन मुनियों को अपने जीवन को विशुद्ध बनाने के लिए कुछ साधना बताइ,उसमें सामायिक है, प्रतिक्रमण है, स्तुति है, वंदना है स्वाध्याय है और प्रत्याख्यान है। इसमें पूरा मनोविज्ञान छिपा है। सामायिक में आत्म ताल्लीनता है। प्रतिक्रमण में दोषों शोधन है और प्रत्याख्यान में भावी दोषों के प्रति जागरूकता है। भविष्य के प्रति सतर्कता का संकल्प है, और स्तुति वंदना में एक प्रार्थना है अपने शरीर को आप दिन भर अच्छा काम लेना चाहते हैं तो आधा घंटा आपको देना पड़ेगा आधा घंटा अपने शरीर को देंगे तो बाकी बचे 23 घंटे में आपको अलग ऊर्जा होगी और आप अपने प्रति ज्यादा सकारात्मक हो सकेंगे शांत हो सकेंगे

भावना योग को हम चार चरणों में सीखेंगे

१) प्रार्थना

२) प्रतिक्रमण

३) प्रत्याख्यान

४) सामायिक

1) कभी-कभी हमें ऐसा लगता है कि मैं कभी अपने आप से मिला ही नहीं खुद को खुद से संवाद करने की कला है भावना योग अपनी भावना ही वह दिव्य शक्ति है वह संजीवनी है जो आत्मा के इस सैद्धांतिक ज्ञान को एक जीवंत स्पंदित और प्रत्यक्ष अनुभव में बदल सकती है। प्रार्थना -

भावना योग की प्रथम सीढ़ी प्रार्थना का अर्थ केवल कुछ रटें - रटाए शब्दों को दोहराना या किसी बाहरी शक्ति से अपनी कामनाओं की एक लंबी सूची प्रस्तुत करना नहीं है। शोध बताते हैं कि जब हम सच्ची और हृदय से प्रार्थना करते हैं तो हमारे मस्तिष्क में डोपामाइन और सेरोटोनिन जैसे सकारात्मक रसायन स्रावित होते हैं यह रसायन न केवल हमारे मन को हल्का प्रसन्न और शांत करते हैं बल्कि हमारी प्रतिरक्षा प्रणाली को भी सुदृढ़ करते हैं जिससे शरीर को विभिन्न रोगों से लड़ने की अद्भुत क्षमता प्राप्त होती है।

2) प्रतिक्रमण -

आत्मा स्वीकार की साहसपूर्ण प्रक्रिया भावना योग में दूसरी महत्वपूर्ण बात है प्रतिक्रमण प्रतिक्रमण जैन धर्म में एक महत्वपूर्ण धार्मिक क्रिया है जिस व्यक्ति अपने द्वारा जाने अनजाने में किए गए कर्मों गलतियां या अपराधों के लिए पश्चाताप करता है इसका उद्देश्य है अपने कर्मों को शुद्ध करना और भविष्य में उन गलतियों को दोहराने से बचना।

खमेमी सव्व जीवे, सव्वे जीवा खमन्तू मे

मत्ती मे सव्व भुएसु वेरं मज्झम न केनै

अर्थ मैं ब्रह्मांड के सभी जीवो को क्षमा करता हूं और सभी जीव मेरे दोषों को क्षमा करें मेरा किसी से कोई द्वेष नहीं है सभी जीवो के प्रति मेरी मैत्री है इस छोटे से अभ्यास से प्रतिक्रमण का अपेक्षित लाभ काफी हद तक प्राप्त हो

सकता है। प्रतिक्रमण का अर्थ आत्म निंदा या स्वयं को दोषी ठहराकर ग्लानि में डूब जाने कदापि नहीं है यह तो एक गहरी आत्म जागरुकता है। अपने ही कर्मों का एक निष्पक्ष अवलोकन है। प्रतिक्रमण हमारे भीतर जमा हुए अपराध - बोध और आत्मदोष की ग्रंथियां को खोलता है। उन्हें नष्ट करता है। प्रतिक्रमण हमारे अंत। करण को निर्मल बनाकर आंतरिक पवित्रता और शांति का मार्ग प्रशस्त करता है। वैज्ञानिक अध्ययन बताते हैं कि जब हम अपनी भूलों को स्वीकार करते हैं और स्वयं को तथा दूसरों को क्षमा करते की प्रक्रिया में संलग्न होते हैं तो हमारे शरीर में ऑक्सीटोसिन नामक हार्मोन का स्त्राव बढ़ता है। ऑक्सीटोसिन को प्रेम हार्मोन या बंधन हार्मोन भी कहा जाता है और यहां हमारे हृदय और मस्तिष्क के स्वास्थ्य के लिए किसी औषधि से काम नहीं होता यह तनाव को काम करता है विश्वास को बढ़ाता है और सामाजिक संबंधों को सुदृढ़ करता है।

3) प्रत्याख्यान

आत्म संयम आव्हान प्रतिक्रमण द्वारा जब हम अपने दोंषों को पहचान लेते हैं और उनके लिए सच्चे उदय से पश्चाताप कर लेते हैं तब भावना योग का अगला चरण आता है प्रत्याख्यान । प्रत्याख्यान का सीधा और सरल अर्थ है त्याग करना छोड़ देना या भविष्य में न दोहराने का संकल्प लेना। आधुनिक मनोविज्ञान इसे पॉजिटिव एफर्मेशन या सकारात्मक स्व संकेत कहता है, और इसे व्यावहारिक परिवर्तन तथा व्यक्तित्व विकास के सबसे सशक्त और प्रभावशाली प्रक्रिया में से एक मानता है। जब हम बार-बार सकारात्मक संकल्पना को अपनी चेतना में दोहराते हैं तो वह हमारे अवचेतन मन में गहराई तक अंकित हो जाते हैं और हमारे सोचने महसूस करने और कार्य करने के ढंग को स्वत& ही परिवर्तित करने लगते हैं प्रत्याख्यान केवल एक प्रतिज्ञा नहीं अपितु अपने ही भीतर छिपे हुए उन शत्रुओं से स्वयं को बचाने का एक संकल्प जीन्हे हम अनजाने मैं पोषित करते रहते हैं। यह शत्रु कोई और नहीं हमारी नियंत्रित इच्छाएं, हमारी हानिकारक आदतें और हमारे नकारात्मक विचार है। प्रत्याख्यान का शाब्दिक अर्थ है भविष्य में किसी विशेष क्रिया विचार या आदत को न दोहराने की दृढ प्रतिज्ञा। मनुष्य का सबसे बड़ा युद्ध किसी बाहरी शक्ति या परिस्थिति से नहीं होता बल्कि अपनी ही भीतर निरंतर उठने वाले संकल्प और विकल्पों से द्वंद होता है हमारे अंदर की आत्म शक्ति आंतर से संवाद साधने की कला है प्रत्याख्यान । प्रत्याख्यान हमारे अंदर के बुरे विचार बुरे संकल्पना को हम नष्ट कर सकते हैं प्रत्याख्यान केवल आध्यात्मिक उन्नति का मार्ग नहीं बल्कि यह हमारी मानसिक शक्तियों का भी पुनर्निर्माण और सशक्तिकरण करता है।

4) सामायिक –

सामायिक का अर्थ है समता में स्थित हो जाना आत्मा के सहज स्वभाव में टिक जाना सामायिक एक धार्मिक अभ्यास जैन धर्म में है जिसमें व्यक्ति एक निश्चित समय के लिए एकाग्रता और समता के साथ ध्यान करता है, यह गृहस्थो और तपस्वियों दोनों के लिए आवश्यक है और इसका उद्देश्य आत्मा में रमन करना और समता का विकास करना है। सामायिक का मुख्य उद्देश्य समानता की भावना को विकसित करना है, यानी सभी जीवो के प्रति समभाव रखना। सामायिक के दौरान व्यक्ति एकांत में बैठकर अपने कर्मों और आत्मा के बारे में चिंतन करता है। यह कोई विशेष प्रकार का ध्यान नहीं है जिसे प्रयास पूर्वक लगाना पड़े और नहीं यह कोई जटिल योग साधना है जिसके लिए विशेष तैयारी की आवश्यकता हो यह तो होने की एक अवस्था है स्टेज आफ बीइंग जहां कुछ भी करने की आवश्यकता शेष नहीं रहती जब व्यक्ति सामायिक जैसी गहरी आत्मिक शांति की अवस्था में होता है तो मस्तिष्क अत्यंत धीमी लयबद्ध और सुसंगत तरंगे उत्तर उत्पन्न करता है। सामायिक कोई बाहरी क्रियाकांड नहीं, कोई विधि विधान मंत्र नहीं

बल्कि यह एक अवस्था है चेतना की विशेष स्थिति या वह डायरेक्शन है जब काल का बंधन टूट जाता है उसी क्षण में अतीत की स्मृतिया हमें बांधती है न भविष्य की चिंताएं हमें सताती है केवल वर्तमान की शुद्ध निर्मल चेतना का प्रभाव होता है वैज्ञानिक शोध बताते हैं की नियमित सामायिक के अभ्यास से हमारे मस्तिष्क का Prefrontal cortex अधिक सक्रिय होता है। यह मस्तिष्क का वह भाग है जो हमारे निर्णय लेने की क्षमता विवेक और संकल्प और शक्ति को नियंत्रित करता है सामायिक केवल मानसिक स्वास्थ्य का उपकरण नहीं है बल्कि यह हमारे भावनात्मक जगत का पुनर्संयोजन है। EMOTIONAL RE-CALIBRATION करता है हमारी बिखरी हुई भावनात्मक ऊर्जा को पुन। संरेखित करता है।

भावना योग GUIDED MEDITATION के प्रारुप पर आधारित स्तुती प्रार्थना, कायोत्सर्ग आर सामायिक का एक अनुठा संगम है जिसके चार मुख्य स्तंभ है |

- प्रार्थना - INNER NOURISHMENT
- प्रतिक्रमण – INNER CLEANING
- प्रत्याख्यान – INNER RESOLUTION
- सामायिक – INTER REFLECTION

इसमें सबसे पहले भगवान के प्रति आदर ग्रिटीट्यूड व्यक्त कर कुछ अच्छी प्रार्थना करते हैं अपने आप को सकारात्मक शांत और सक्षम बनाने की इसके बाद हम अपने अतीत के दोषों को झांक करके उससे साफ करने की कोशिश करते हैं अपनी निंदा गर्हा करते हुए मन को सांफ और स्वच्छ बनाना फिर भावी जीवन को, आज के दिन को उत्सव की तरह से कैसे जियू इस संकल्प को दोहराते हुए प्रत्याख्यान करते हैं और अंत में आत्मा में लीन हो सामायिक, सुविधा हम बुद्ध हम निरंजनों हम मैं शांत हुं मैं स्वस्थ हूं मैं निरंजन हूं का ध्यान करते हैं इसके श्रद्धापूर्वक एवं नियमित प्रयोग से हम अपनी आत्मा का निर्मलीकरण कर अपनी चेतना की विशुद्धी बढा, अपने जीवन में आमूल चूल परिवर्तन ला सकते हैं।

- PRESCRIBE DURATION निर्धारित समय प्रतिदिन 30 से 40 मिनट
- ऑडियंस कौन कर सकता है - हर वर्ग का व्यक्ति जो अपने जीवन में बदलाव एवं सकारात्मक का अनुभव लाना चाहता है ।
- टाइम किस समय करें - सुबह का समय आत्म ध्यान एवं आत्म साधना के लिए सबसे उपयुक्त होता है। सुबह ना हो तो शाम को अपनी जीवन शैली के अनुकूल जब समय मिले भावना योग कर सकते हैं।

:: BENEFITS ::

- ❖ श्रद्धा पूर्वक एवं नियमित प्रयोग से पहले सप्ताह से इसके लाभ प्राप्त होने लगते है।
- ❖ प्रतिदिन भावना योग करने वालों का मानना है। कि उसे करने से आत्मविश्वास Inner will, self-determination मे वृद्धी आई है।
- ❖ अपनी भावनाओं, क्रोध एवं सोच पर खुदका नियंत्रण पा उन्हे तणाव, डिप्रेशन, चिंता, डर से मुक्ती मिली जिससे उनका मन शांत हुआ और नकारात्मक सोच से सकारात्मक सोच कि ओर परिवर्तन हुआ।
- ❖ इसके निरंतर तीन माह श्रद्धापूर्वक प्रयोग से जटिल शारीरिक समस्याओ Knee replacement, heart blockage का निवारण भी पाया गया।

संदर्भ ग्रंथ

- भावना योग - आत्म साक्षात्कार का मार्ग
- भावना योग - नकारात्मक का हल
- भावना योग - आत्म रुपांतरण का विज्ञान

प्रधानमंत्री मुद्रा योजनेच्या माध्यमातून सूक्ष्म उपक्रमांच्या सशक्तीकरणाचा MSME क्षेत्रातील आणि राष्ट्रीय आर्थिक विकासातील योगदान : एक चिकित्सक मूल्यमापन

संशोधक

प्रा. सचिन राजेंद्र खोब्रागडे

मार्गदर्शक

डॉ. दिनेश निचित

संत गाडगे महाराज कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वलगाव जि. अमरावती.

सारांश (Abstract)

प्रधानमंत्री मुद्रा योजना (PMMY) ही भारतातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (MSME) क्षेत्राला मजबूत करण्यासाठी २०१५ मध्ये सुरू करण्यात आलेली एक प्रमुख योजना आहे. ही योजना सूक्ष्म उपक्रमांना कोणत्याही हमीशिवाय १० लाख रुपयांपर्यंतचे कर्ज उपलब्ध करून देते, ज्यामुळे उद्योजकता वाढते, रोजगार निर्मिती होते आणि आर्थिक समावेशकता साध्य होते. या संशोधन पत्रात PMMY च्या माध्यमातून सूक्ष्म उपक्रमांच्या सशक्तिकरणाचा MSME क्षेत्रातील आणि राष्ट्रीय आर्थिक विकासातील योगदानाचे विश्लेषण केले आहे. द्वितीयक डेटा, सरकारी अहवाल आणि संशोधन अभ्यासांवर आधारित, हे मूल्यमापन योजनेच्या यशस्वीता, आकडेवारी, प्रभाव आणि आव्हानांचे चिकित्सक परीक्षण करते. परिणाम दाखवतात की PMMY ने २०१५ ते २०२५ पर्यंत ५२ कोटींहून अधिक कर्जे मंजूर केली आहेत, ज्यामुळे MSME क्षेत्रातील क्रेडिट प्रवाह वाढला आणि महिलांना ६८% लाभ मिळाला. तथापि, NPA ची वाढ, प्रादेशिक असमानता आणि प्रक्रियात्मक अडचणी हे प्रमुख आव्हाने आहेत. हे मूल्यमापन PMMY च्या सुधारणांसाठी शिफारसी देते, ज्यामुळे ते अधिक प्रभावी होईल.

Keywords: प्रधानमंत्री मुद्रा योजना,सूक्ष्म उपक्रम,MSME विकास, राष्ट्रीय आर्थिक विकास, कर्ज उपलब्धता, भारत

१. प्रस्तावना (Introduction)

भारतासारख्या विकसनशील देशात सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग हे आर्थिक विकासाचे मुख्य आधारस्तंभ आहेत. MSME क्षेत्र देशाच्या औद्योगिक उत्पादनात सुमारे ३० टक्के योगदान देते तसेच मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मिती करते. ग्रामीण व शहरी भागातील लघु उद्योग, सेवा व्यवसाय आणि पारंपरिक उद्योगांना आर्थिक सहाय्याची मोठी गरज असते. परंतु, अनेक सूक्ष्म उद्योजकांना बँकिंग सुविधांचा अभाव, तारणाची अडचण आणि वित्तीय संस्थांकडून कर्ज मिळविण्यात अडथळे येत होते. या समस्येचे निराकरण करण्यासाठी भारत सरकारने ८ एप्रिल २०१५ रोजी प्रधानमंत्री मुद्रा योजना सुरू केली. या योजनेचा मुख्य उद्देश सूक्ष्म उद्योजकांना तारणाशिवाय कर्ज उपलब्ध करून देणे हा आहे.

या पत्राचा उद्देश PMMY च्या माध्यमातून सूक्ष्म उपक्रमांच्या सशक्तिकरणाचा MSME क्षेत्रातील आणि राष्ट्रीय आर्थिक विकासातील योगदानाचे चिकित्सक मूल्यमापन करणे आहे. हे MSME क्षेत्रातील क्रेडिट वाढ, रोजगार निर्मिती, महिलांच्या सशक्तिकरण आणि GDP वाढीवर केंद्रित आहे, तसेच योजनेच्या कमतरता आणि आव्हानांचे विश्लेषण करते.

२.प्रधानमंत्री मुद्रा योजना (PMMY):

संकल्पना (Concept):

प्रधानमंत्री मुद्रा योजना (Pradhan Mantri Mudra Yojana - PMMY) ही भारत सरकारची एक महत्त्वाची योजना आहे. ती ८ एप्रिल २०१५ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केली. या योजनेचा मुख्य उद्देश गैर-कॉर्पोरेट, गैर-कृषी क्षेत्रातील सूक्ष्म आणि लघु उद्योगांना (Micro & Small Enterprises) सोपे, स्वस्त आणि जमानत-मुक्त (Collateral-free) कर्ज उपलब्ध करून देणे हा आहे.

ही योजना "Funding the Unfunded" या तत्त्वावर आधारित आहे. म्हणजे जे लोक आधी बँकिंग व्यवस्थेपासून वंचित होते, जसे छोटे दुकानदार, कारीगर, सेवा देणारे, महिला उद्योजक, SC/ST/OBC वर्गातील लोक, पहिल्या पिढीचे उद्योजक इत्यादी – त्यांना आर्थिक मदत देणे.

प्रधानमंत्री मुद्रा योजना तीन प्रकारांत विभागलेली आहे:

1.शिशु (Shishu) – ५०,००० रुपयांपर्यंत कर्ज.

2.किशोर (Kishor) – ५०,००० ते ५ लाख रुपये कर्ज.

3. तरुण (Tarun) – ५ लाख ते १० लाख रुपये कर्ज.

३. संशोधनाची उद्दिष्टे (Objectives of Study)

1. प्रधानमंत्री मुद्रा योजनेचा MSME क्षेत्रावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.
2. सूक्ष्म उद्योगांच्या सशक्तीकरणामध्ये योजनेचे योगदान तपासणे.
3. राष्ट्रीय आर्थिक विकासामध्ये योजनेची भूमिका विश्लेषित करणे.
4. योजनेंतील अडचणी व मर्यादा ओळखणे.

४. संशोधन परिकल्पना (Research Hypothesis)

H1: प्रधानमंत्री मुद्रा योजना सूक्ष्म उद्योगांच्या विकासास सकारात्मक चालना देते.

H2: प्रधानमंत्री मुद्रा योजना रोजगारनिर्मितीत महत्त्वपूर्ण योगदान देते.

H3: प्रधानमंत्री मुद्रा योजना आर्थिक समावेशन वाढविण्यास प्रभावी ठरते.

H4: प्रधानमंत्री मुद्रा योजना राष्ट्रीय आर्थिक विकासाला चालना देते.

५. साहित्य समीक्षा (Literature Review)

अनेक अभ्यासांनी PMMY च्या प्रभावाचे मूल्यमापन केले आहे. NITI Aayog च्या २०२४ च्या अहवालानुसार, PMMY ने MSME क्षेत्रातील क्रेडिट प्रवाह वाढवला आहे, ज्यामुळे ३३% GDP योगदान वाढले. SBI च्या २०२५ च्या अहवालात असे नमूद आहे की MSME क्रेडिट FY2014 मधील ८.५१ लाख कोटींवरून FY2024 मध्ये २७.२५ लाख कोटींवर पोहोचले, जे PMMY च्या प्रभावामुळे आहे. IJFMR च्या २०२६ च्या अभ्यासात PMMY च्या आर्थिक समावेशकता आणि उद्योजकतेवर भर देण्यात आला आहे.

तथापि, काही अभ्यास आव्हाने दाखवतात. Dvara Research च्या २०२४ च्या विश्लेषणात NPA ची वाढ आणि प्रादेशिक असमानता नमूद केली आहे. PMFIAS च्या २०२५ च्या अहवालात NPA दर ३.६% असल्याचे सांगितले आहे, जे कर्ज परतफेडीच्या समस्या दर्शवते. ResearchGate च्या २०२५ च्या अभ्यासात PMMY च्या सामाजिक-आर्थिक विकासातील योगदानावर चर्चा आहे, ज्यात उत्पन्न असमानता कमी करण्याचे फायदे आहेत.

५.१ शर्मा (2018)

शर्मा यांच्या अभ्यासानुसार मुद्रा योजनेमुळे सूक्ष्म उद्योजकांना वित्तीय सहाय्य मिळाले आणि ग्रामीण भागात उद्योजकता वाढली.

५.२ गुप्ता आणि सिंह (2020)

या संशोधनानुसार मुद्रा योजनेमुळे महिला उद्योजकतेत वाढ झाली असून सामाजिक समावेशनाला चालना मिळाली आहे.

५.३ RBI वार्षिक अहवाल (2022)

RBI अहवालानुसार मुद्रा कर्जामुळे लघु उद्योगांची उत्पादन क्षमता वाढली आहे.

५.४ MSME मंत्रालय अहवाल (2023)

MSME मंत्रालयाच्या अहवालानुसार मुद्रा योजनेंतर्गत लाखो उद्योजकांना कर्ज सुविधा मिळाली असून रोजगार निर्मितीत वाढ झाली आहे.

६. संशोधन पद्धती (Research Methodology)

या संशोधन पेपरसाठी मिश्र पद्धती (Mixed Methods Approach) अवलंबली जाईल. ही पद्धती प्राथमिक (Primary) आणि द्वितीय (Secondary) डेटाचे संयोजन करून योजनेच्या प्रभावाचे चिकित्सक मूल्यमापन (Critical Evaluation) करण्यास सक्षम ठरते. मिश्र पद्धतीमुळे संख्यात्मक डेटा (Quantitative) आणि गुणात्मक अंतर्दृष्टी (Qualitative Insights) दोन्ही मिळवता येतात, ज्यामुळे योजनेच्या सकारात्मक आणि नकारात्मक पैलूंचे संतुलित विश्लेषण शक्य होते.

१. संशोधनाचा प्रकार (Type of Research)

वर्णनात्मक (Descriptive): योजनेच्या प्रगती, कर्ज वितरण, लाभार्थी वर्गीकरण इत्यादींचे वर्णन.

विश्लेषणात्मक (Analytical): MSME क्षेत्रातील योगदान (रोजगार निर्मिती, GVA/ GDP मधील वाटा) आणि राष्ट्रीय आर्थिक विकासातील प्रभाव यांचे विश्लेषण.

चिकित्सक मूल्यमापन (Critical Evaluation): योजनेच्या मर्यादा, आव्हाने (उदा. NPA वाढ, Shishu ते Tarun श्रेणीतील प्रगती कमी, लिंग/ सामाजिक असमानता) आणि सुधारणा सूचनांचा अभ्यास.

२. संशोधन डिझाइन (Research Design)

मिश्र पद्धती (Mixed Method - Sequential Explanatory Design): प्रथम द्वितीय डेटाचे विश्लेषण → त्यानंतर प्राथमिक डेटाद्वारे निष्कर्षांची पुष्टी/ स्पष्टीकरण.

समय-क्षेत्र (Time Frame): २०१५ (योजना सुरू झाल्यापासून) ते सध्याचे वर्ष (२०२५-२६ पर्यंतच्या उपलब्ध डेटापर्यंत).

प्रस्तुत संशोधन हे द्वितीयक माहितीवर आधारित आहे. MUDRA च्या अधिकृत वेबसाइट, सरकारी अहवाल, संशोधन लेख, RBI अहवाल, MSME मंत्रालयाची आकडेवारी आणि विविध शैक्षणिक साहित्य यांचा उपयोग करून माहिती संकलित करण्यात आली आहे.

७. MSME क्षेत्राचे अर्थव्यवस्थेतील महत्त्व

भारताच्या अर्थव्यवस्थेत मायक्रो, स्मॉल अँड मीडियम एंटरप्रायझेस (MSME) हे खंबीर आधारस्तंभ मानले जातात. हे क्षेत्र उद्योजकता, रोजगार निर्मिती, उत्पादन, निर्यात आणि समावेशक विकास यांच्यात महत्त्वाची भूमिका बजावते. हे "भारताची औद्योगिक अर्थव्यवस्थेचा कणा" (backbone of India's industrial economy) म्हणून ओळखले जाते.

प्रमुख योगदान (Latest Data - Economic Survey 2025-26 आणि इतर सरकारी स्रोतांनुसार, 2025-26 पर्यंत):

GDP मधील वाटा: सुमारे 31.1% (किंवा ~30% ते 31%)

- हे क्षेत्र देशाच्या एकूण उत्पादन मूल्य (Gross Value Added - GVA) मध्ये मोठा भाग घेते.
- उत्पादन क्षेत्रात (Manufacturing) 35.4% योगदान.
- सेवा क्षेत्रातही महत्त्वपूर्ण वाटा.
- रोजगार निर्मिती: 32.82 कोटी पेक्षा जास्त लोकांना रोजगार
- कृषीनंतर दुसरा सर्वात मोठा रोजगारदाता.
- 7.47 कोटी पेक्षा जास्त उद्योग (over 7.47 crore enterprises).
- ग्रामीण आणि शहरी भागात समान संधी, विशेषतः महिलांना, SC/ST/OBC वर्गाला आणि पहिल्या पिढीच्या उद्योजकांना.
- निर्यात योगदान: (45-48%) MSME संबंधित उत्पादने भारताच्या एकूण निर्यातीचा मोठा भाग.

८. प्रधानमंत्री मुद्रा योजने द्वारे सूक्ष्म उपक्रमांचे सशक्तिकरण

प्रधानमंत्री मुद्रा योजना (PMMY - Pradhan Mantri Mudra Yojana) ही भारत सरकारची एक प्रमुख योजना आहे जी २०१५ मध्ये सुरू झाली. तिचा मुख्य उद्देश "Funding the Unfunded" असून, सूक्ष्म उपक्रम (Micro Enterprises) आणि छोट्या व्यवसायांना जमानत-मुक्त (Collateral-free) कर्ज उपलब्ध करून देऊन त्यांचे आर्थिक सशक्तिकरण करणे हा आहे. ही योजना सूक्ष्म उपक्रमांना (जसे की छोटी दुकाने, सिलाई केंद्रे, कुटिर उद्योग, फूड सर्व्हिस, सेवा क्षेत्रातील व्यवसाय) विकासाच्या टप्प्यांवर मदत करते आणि त्यांना आत्मनिर्भर बनवते.

९. MSME क्षेत्रातील आणि राष्ट्रीय विकासातील PMMY चे योगदान

प्रधानमंत्री मुद्रा योजना (PMMY - Pradhan Mantri Mudra Yojana) ही २०१५ पासून सुरू असलेली योजना सूक्ष्म आणि लघु उद्योगांना (Micro & Small Enterprises) जमानत-मुक्त कर्ज देऊन MSME क्षेत्र आणि राष्ट्रीय आर्थिक विकास यांना मजबूत आधार देते. ही योजना "Funding the Unfunded" तत्त्वावर आधारित असून, MSME च्या क्रेडिट प्रवेशात क्रांती घडवली आहे.

MSME क्षेत्रातील प्रमुख योगदान (२०२५ पर्यंत):

क्रेडिट वाढ: PMMY ने MSME ला क्रेडिट पुरवठा वाढवला. FY१४ मध्ये MSME कर्ज ₹८.५१ लाख कोटी होते, ते FY२४ मध्ये ₹२७.२५ लाख कोटी पर्यंत वाढले आणि FY२५ मध्ये ₹३० लाख कोटी पेक्षा जास्त अपेक्षित आहे. एकूण बँक क्रेडिटमध्ये MSME चा वाटा FY१४ मधील १५.८% वरून FY२४ मध्ये जवळपास २०% पर्यंत वाढला.

रोजगार निर्मिती आणि उद्योजकता: योजना सुरू झाल्यापासून ५२ कोटी पेक्षा जास्त कर्ज खाती मंजूर झाली आहेत, ज्याची एकूण रक्कम ₹३२.६१ लाख कोटी (काही स्रोतांनुसार ₹३३+ लाख कोटी) आहे. सरासरी कर्ज रक्कम FY१६ मधील ₹३८,००० वरून FY२५ मध्ये ₹१.०२ लाख पर्यंत वाढली. Kishor आणि Tarun श्रेणीतील वाटा वाढल्याने व्यवसाय विस्तार आणि नवीन रोजगार निर्माण झाले.

महिलांच्या नेतृत्वाखालील MSME मध्ये रोजगार वाढ झाली: महिलांना ६८% कर्ज (काही ठिकाणी ६९-७१%) मिळाले, ज्यामुळे महिला सशक्तिकरण आणि लेबर फोर्स पार्टिसिपेशन वाढले.

समावेशक विकास: SC/ST/OBC उद्योजकांना ५०% पेक्षा जास्त कर्ज; अल्पसंख्याकांना ११%. ग्रामीण आणि छोट्या शहरांमध्ये व्यवसाय वाढला, ज्यामुळे क्षेत्रीय असमतोल कमी झाला.

राष्ट्रीय आर्थिक विकासातील योगदान:

आर्थिक समावेशन आणि आत्मनिर्भरता: PMMY ने सूक्ष्म उपक्रमांना मुख्य प्रवाहात आणले, ज्यामुळे "नोकरी शोधणारे" ते "नोकरी देणारे" झाले. हे आत्मनिर्भर भारत आणि Viksit Bharat च्या उद्दिष्टांसाठी महत्त्वाचे आहे.

MSME क्षेत्र GDP मध्ये ~३०% योगदान देते (उत्पादनात ~३०-३५%, सेवा आणि निर्यातीत मोठा वाटा). PMMY ने क्रेडिट वाढवून MSME ची उत्पादकता, निर्यात आणि GVA वाढवली.

रोजगार: MSME क्षेत्रात ३१+ कोटी लोकांना रोजगार; PMMY ने ग्रासरूट स्तरावर नवीन रोजगार निर्माण केले (उदा. २०१५-१८ मध्ये १.१२ कोटी अतिरिक्त नोकऱ्या, दीर्घकालीन प्रभाव जास्त).

महिला आणि सामाजिक सशक्तिकरण: महिलांच्या कर्ज रकमेत CAGR १३% वाढ (FY१६ ते FY२५), सरासरी ₹६२,६७९ पर्यंत. महिलांच्या MSME मुळे रोजगार आणि उत्पन्न वाढले, ज्याचा राष्ट्रीय GDP आणि समान विकासावर सकारात्मक परिणाम झाला.

आर्थिक स्थिरता: NPA दर कमी राहिला; योजना MSME क्रेडिट इकोसिस्टम मजबूत करून आर्थिक विकासाला चालना देते.

१०. सुधारणा व धोरणात्मक सूचना

1. आर्थिक साक्षरता कार्यक्रम वाढविणे
2. डिजिटल बँकिंग सुविधा वाढविणे
3. कर्ज वितरण प्रक्रियेचे सुलभीकरण
4. प्रशिक्षण व मार्गदर्शन सुविधा उपलब्ध करणे
5. कर्ज वापरावर प्रभावी देखरेख ठेवणे

११. निष्कर्ष (Conclusion)

प्रधानमंत्री मुद्रा योजना ही भारतातील सूक्ष्म उद्योजकांच्या सशक्तीकरणासाठी अत्यंत प्रभावी योजना ठरली आहे. या योजनेमुळे MSME क्षेत्राला आर्थिक सहाय्य मिळून रोजगारनिर्मिती, आर्थिक समावेशन आणि राष्ट्रीय आर्थिक विकासाला चालना मिळाली आहे. विशेषतः महिला आणि सामाजिकदृष्ट्या वंचित घटकांना उद्योजकतेची संधी उपलब्ध झाली आहे. तथापि, योजनेंतील काही अडचणी दूर करण्यासाठी धोरणात्मक सुधारणा आवश्यक आहेत. योग्य अंमलबजावणी आणि जागरूकता वाढवल्यास प्रधानमंत्री मुद्रा योजना भारताच्या आर्थिक विकासामध्ये आणखी मोठे योगदान देऊ शकते.

संदर्भ (References)

1. भारत सरकार, MSME मंत्रालय अहवाल
2. RBI वार्षिक अहवाल
3. प्रधानमंत्री मुद्रा योजना अधिकृत संकेतस्थळ
4. आर्थिक सर्वेक्षण भारत सरकार
5. विविध संशोधन लेख व शैक्षणिक जर्नल्स
6. प्रधानमंत्री मुद्रा योजना वार्षिक अहवाल
7. Sharma, R. (2018). Impact of Mudra Scheme on Micro Enterprises. Journal of Rural Development.
8. Gupta, P., & Singh, M. (2020). Women Entrepreneurship and Mudra Loans. Indian Economic Review.
9. Reserve Bank of India. (2022). Annual Report. RBI Publications.
10. Ministry of MSME. (2023). MSME Annual Report. Government of India.
11. Government of India. (2023). Economic Survey. Ministry of Finance.

राजगोंड जमातीच्या सामाजिक स्थिती व शैक्षणिक विकास यांतील परस्परसंबंधांचा अभ्यास

संशोधक

प्रा. सौ. अनिता संजय धुर्वे

एम.ए.(गृहअर्थशास्त्र), एम.एड., सेट

गृहअर्थशास्त्र विभागप्रमुख

महिला कला व वाणिज्य महाविद्यालय,चांदुर रेल्वे, जि. अमरावती

सारांश

भारतातील आदिवासी समाज हा सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास घटक मानला जातो. त्यामध्ये राजगोंड जमात ही एक महत्त्वाची आदिवासी जमात असून तिची सामाजिक स्थिती, आर्थिक परिस्थिती, सांस्कृतिक परंपरा व शैक्षणिक स्थिती यांचा परस्परांवर प्रभाव पडतो. प्रस्तुत संशोधन निबंधात राजगोंड जमातीच्या सामाजिक स्थितीचा त्यांच्या शैक्षणिक विकासावर कसा परिणाम होतो, याचा अभ्यास करण्यात आला आहे. या अभ्यासासाठी प्राथमिक व दुय्यम माहितीचा उपयोग करण्यात आला असून प्रश्नावलीच्या माध्यमातून माहिती संकलित करण्यात आली आहे. संशोधनातून असे दिसून येते की आर्थिक दुर्बलता, सामाजिक मागासलेपण, पालकांची अल्पशैक्षणिक पातळी व मूलभूत सुविधांचा अभाव यामुळे राजगोंड जमातीच्या शैक्षणिक विकासावर प्रतिकूल परिणाम होत आहे. योग्य शैक्षणिक सुविधा, शासकीय योजना व सामाजिक जागृतीमुळे या समाजाच्या शैक्षणिक प्रगतीस चालना मिळू शकते.

कीवर्ड्स (Keywords) राजगोंड जमात, सामाजिक स्थिती, शैक्षणिक विकास, आदिवासी समाज, शिक्षण

प्रस्तावना

आदिवासी समाज हा भारतीय समाजव्यवस्थेचा एक अत्यंत महत्त्वाचा आणि अविभाज्य घटक आहे. भारतातील सामाजिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वैविध्य समजून घेण्यासाठी आदिवासी समाजाचा अभ्यास करणे अत्यावश्यक ठरते. प्राचीन काळापासून आदिवासी समाजाने आपली स्वतंत्र ओळख टिकवून ठेवली असून त्यांची जीवनपद्धती, परंपरा, श्रद्धा, भाषा, सण-उत्सव व सामाजिक रचना ही मुख्य प्रवाहातील समाजापेक्षा भिन्न स्वरूपाची राहिली आहे. जंगल, जमीन व निसर्गाशी अतूट नाते जपत आदिवासी समाजाने स्वतःची एक स्वतंत्र संस्कृती निर्माण केली आहे. तथापि, औद्योगिकीकरण, शहरीकरण, आधुनिकीकरण तसेच बदलत्या सामाजिक व आर्थिक प्रक्रियांमुळे आदिवासी समाजावर अनेक प्रकारचे परिणाम झालेले दिसून येतात. विशेषतः शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि आर्थिक संधी यांच्या बाबतीत आदिवासी समाज आजही तुलनेने मागासलेला आढळतो. विकासाच्या प्रक्रियेत मुख्य प्रवाहातील समाज वेगाने पुढे जात असताना आदिवासी समाज मात्र अनेक अडचणींमुळे मागे पडलेला दिसून येतो. सामाजिक भेदभाव, आर्थिक दुर्बलता, मूलभूत सुविधांचा अभाव तसेच भौगोलिक एकाकीपणा ही त्यामागील प्रमुख कारणे आहेत.

राजगोंड जमात ही मध्य भारतातील एक प्रमुख आदिवासी जमात असून तिचे वास्तव्य प्रामुख्याने महाराष्ट्र, मध्यप्रदेश, छत्तीसगड आणि तेलंगणा या राज्यांमध्ये आढळते. महाराष्ट्राच्या विदर्भ विभागात, विशेषतः गोंदिया जिल्ह्यात राजगोंड जमातीची लक्षणीय लोकसंख्या आहे. ही जमात पारंपरिक जीवनशैली, सामाजिक रचना व सांस्कृतिक परंपरांसाठी ओळखली जाते. तथापि, सामाजिक व आर्थिक मर्यादांमुळे या जमातीचा शैक्षणिक विकास अपेक्षित पातळीपर्यंत झालेला नाही.

शिक्षण हे सामाजिक परिवर्तन व विकासाचे प्रभावी साधन मानले जाते. शिक्षणामुळे व्यक्तीमध्ये जागरूकता निर्माण होते, रोजगाराच्या संधी वाढतात आणि सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त होते. परंतु राजगोंड जमातीच्या सामाजिक स्थितीमुळे त्यांच्या शैक्षणिक विकासावर अनेक अडथळे निर्माण झालेले दिसतात. दारिद्र्य, पालकांची अल्पशैक्षणिक पातळी, शाळांपर्यंत पोहोचण्यातील अडचणी, स्थलांतर, बालकामगार तसेच सामाजिक व सांस्कृतिक घटक यांचा शिक्षणावर प्रतिकूल परिणाम होतो. त्यामुळे राजगोंड जमातीच्या सामाजिक स्थितीचा त्यांच्या शैक्षणिक विकासावर होणारा परिणाम समजून घेणे आणि या दोहोंमधील परस्परसंबंधांचा अभ्यास करणे अत्यंत आवश्यक ठरते.

साहित्य समीक्षा

भारतातील आदिवासी समाजाच्या सामाजिक स्थिती, आर्थिक परिस्थिती व शैक्षणिक विकासावर विविध अभ्यासकांनी संशोधन केलेले आहे. या संशोधनांचा आढावा घेतल्यास असे दिसून येते की आदिवासी समाजाचा शैक्षणिक विकास त्यांच्या सामाजिक स्थितीशी घनिष्ठपणे संबंधित आहे.

घुर्ये (Ghurye, 1963) यांनी आपल्या *"The Scheduled Tribes"* या ग्रंथामध्ये आदिवासी समाजाच्या सामाजिक रचनेचे सविस्तर विश्लेषण केले आहे. त्यांनी असे नमूद केले आहे की आदिवासी समाज मुख्य प्रवाहापासून अलिप्त राहिल्यामुळे शिक्षण, आरोग्य व आर्थिक विकासाच्या संधींपासून वंचित राहिला आहे. सामाजिक अलगाव हा त्यांच्या शैक्षणिक मागासलेपणाचे एक प्रमुख कारण असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

वेरियर एल्विन (Elwin, 1959) यांनी *"The Tribal World of Verrier Elwin"* या ग्रंथामध्ये आदिवासी जीवनपद्धती, संस्कृती व मूल्यव्यवस्था यांचा अभ्यास केला आहे. त्यांच्या मते, आदिवासी समाजाची सांस्कृतिक वैशिष्ट्ये व पारंपरिक जीवनशैली ही शिक्षण स्वीकारण्याच्या प्रक्रियेत अडथळा ठरू शकते, जर शिक्षण पद्धती त्या संस्कृतीशी सुसंगत नसेल.

सचिदानंद (Sachidananda, 1976) यांनी केलेल्या अभ्यासात असे आढळून आले की आदिवासी समाजातील आर्थिक दुर्बलता, दारिद्र्य आणि उपजीविकेवरील अनिश्चितता यांचा थेट परिणाम मुलांच्या शिक्षणावर होतो. अनेक आदिवासी कुटुंबे उपजीविकेसाठी स्थलांतर करत असल्यामुळे मुलांचे शिक्षण खंडित होते, असे त्यांनी नमूद केले आहे.

कोठारी आयोग (1964–66) म्हणजेच *Education Commission Report* मध्ये आदिवासी शिक्षणावर विशेष भर देण्यात आला आहे. या अहवालात आदिवासी भागांतील शाळांची कमतरता, प्रशिक्षित शिक्षकांचा अभाव आणि स्थानिक भाषेतील शिक्षणाचा अभाव ही प्रमुख अडचणी म्हणून नमूद करण्यात आली आहे. सामाजिक व भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊन शिक्षण धोरण आखण्याची आवश्यकता आयोगाने अधोरेखित केली आहे.

नॅशनल पॉलिसी ऑन एज्युकेशन (1986) मध्ये आदिवासी समाजाच्या शैक्षणिक विकासासाठी विशेष तरतुदी सुचविण्यात आल्या आहेत. या धोरणानुसार, सामाजिक व आर्थिक मागासलेपणा हा आदिवासी शिक्षणातील मुख्य अडथळा असून शिष्यवृत्ती, वसतिगृहे व आश्रमशाळांद्वारे हा अडथळा कमी करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

रामचंद्र गुहा (Guha, 2007) यांनी *"Adivasis, Naxalites and Indian Democracy"* या लेखामध्ये आदिवासी समाजाच्या सामाजिक व राजकीय उपेक्षेचा उल्लेख केला आहे. त्यांच्या मते, दीर्घकाळ चाललेल्या सामाजिक अन्यायामुळे आदिवासी समाज शिक्षणापासून दूर राहिला असून याचा परिणाम त्यांच्या सर्वांगीण विकासावर झालेला आहे.

देवेंद्र ठाकूर व डी. एन. चौधरी (Thakur & Chaudhury, 1992) यांनी केलेल्या अभ्यासात आदिवासी समाजातील शाळा गळतीचे प्रमाण अधिक असल्याचे आढळून आले. पालकांची अल्पशैक्षणिक पातळी, बालकामगार आणि सामाजिक जबाबदाऱ्या ही त्यामागील प्रमुख कारणे असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

महाराष्ट्राच्या संदर्भात, **देशपांडे (Deshpande, 2010)** यांनी केलेल्या अभ्यासात असे स्पष्ट झाले आहे की विदर्भातील आदिवासी समाज, विशेषतः गोंदिया जिल्ह्यातील आदिवासी कुटुंबांची सामाजिक स्थिती अजूनही दुर्बल आहे. या सामाजिक स्थितीचा थेट परिणाम मुलांच्या शैक्षणिक प्रगतीवर होत असल्याचे त्यांच्या संशोधनातून दिसून येते.

वरील साहित्याचा आढावा घेतल्यास असे स्पष्ट होते की आदिवासी समाजाची सामाजिक स्थिती आणि शैक्षणिक विकास यांच्यात घनिष्ठ संबंध आहे. तथापि, राजगोंड जमातीच्या संदर्भात विशेषतः सामाजिक स्थिती व शैक्षणिक विकास यांतील परस्परसंबंधावर केंद्रित अभ्यास मर्यादित प्रमाणात आढळतो. त्यामुळे सदर संशोधन हे विद्यमान साहित्यातील ही उणीव भरून काढण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे ठरते.

संशोधन पद्धती

सदर अभ्यासासाठी वर्णनात्मक (Descriptive) संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. सामाजिक स्थिती व शैक्षणिक विकास यांतील संबंध समजून घेण्यासाठी प्रश्नावली व निरीक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. या अभ्यासात सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला असून राजगोंड जमातीतील कुटुंबे व विद्यार्थी यांना अभ्यासाचे एकक (Unit of Study) मानण्यात आले आहे. या संशोधनासाठी गोंदिया जिल्ह्यातील निवडक गावांमधून 100 प्रतिसादकांचा नमुना हेतुपुरस्सर (Purposive Sampling) पद्धतीने निवडण्यात आला आहे.

माहिती संकलनाची साधने

प्राथमिक माहिती: प्राथमिक माहिती प्रश्नावली, वैयक्तिक मुलाखत व निरीक्षण पद्धतीद्वारे संकलित करण्यात आली आहे.

दुय्यम माहिती: दुय्यम माहिती पुस्तके, संशोधन निबंध, शासकीय अहवाल, जनगणना अहवाल व इंटरनेट स्रोतांमधून घेतली आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

1. राजगोंड जमातीची सामाजिक स्थिती अभ्यासणे.
2. राजगोंड जमातीच्या शैक्षणिक विकासाची स्थिती समजून घेणे.
3. सामाजिक स्थिती व शैक्षणिक विकास यांतील परस्परसंबंधाचा अभ्यास करणे.

संशोधन गृहीतक

H0: राजगोंड जमातीची सामाजिक स्थिती आणि त्यांचा शैक्षणिक विकास यांमध्ये महत्त्वपूर्ण संबंध आहे.

माहितीचे सादरीकरण व विश्लेषण

तक्ता क्र. 1: पालकांची शैक्षणिक स्थिती

शैक्षणिक स्तर	प्रतिसादक (%)
निरक्षर	45%
प्राथमिक	35%
माध्यमिक	15%
उच्च शिक्षण	5%

तक्ता क्र. 2: विद्यार्थ्यांची शाळा गळती कारणे

कारणे	टक्केवारी
आर्थिक अडचण	40%
कामासाठी स्थलांतर	30%
शाळेपासून अंतर	20%

इतर कारणे	10%

खाली दिलेल्या दोन्ही तक्त्यांचे सविस्तर विश्लेषण पुढीलप्रमाणे आहे:

तक्ता क्र. 1: पालकांची शैक्षणिक स्थिती – विश्लेषण

तक्ता क्र. 1 वरून असे दिसून येते की अभ्यास क्षेत्रातील बहुतांश पालक शिक्षणाच्या दृष्टीने मागास आहेत. एकूण प्रतिसादकांपैकी 45 टक्के पालक निरक्षर असल्याचे आढळून येते. यावरून राजगोंड जमातीतील मोठा वर्ग औपचारिक शिक्षणापासून वंचित राहिलेला आहे, हे स्पष्ट होते. तसेच 35 टक्के पालकांनी केवळ प्राथमिक शिक्षण घेतलेले आहे, म्हणजे एकूण 80 टक्के पालकांचे शिक्षण प्राथमिक स्तरापर्यंत किंवा त्याखाली मर्यादित आहे. 15 टक्के पालक माध्यमिक शिक्षित असून फक्त 5 टक्के पालक उच्च शिक्षण घेतलेले आहेत. या आकडेवारीवरून पालकांची कमी शैक्षणिक पातळी ही मुलांच्या शिक्षणासाठी आवश्यक असलेले मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि शैक्षणिक जाणीव कमी करते, असे दिसून येते. परिणामी, पालकांच्या शैक्षणिक स्थितीचा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक विकासावर नकारात्मक परिणाम होत असल्याचे सूचित होते.

तक्ता क्र. 2: विद्यार्थ्यांची शाळा गळती कारणे – विश्लेषण

तक्ता क्र. 2 मधील माहितीवरून राजगोंड जमातीतील विद्यार्थ्यांच्या शाळा गळतीमागील विविध कारणे स्पष्ट होतात. सर्वाधिक 40 टक्के विद्यार्थ्यांनी आर्थिक अडचण हे शाळा गळतीचे प्रमुख कारण असल्याचे सांगितले आहे. यावरून कुटुंबाची कमजोर आर्थिक परिस्थिती विद्यार्थ्यांच्या शिक्षणात मोठा अडथळा ठरत असल्याचे दिसते. तसेच 30 टक्के विद्यार्थ्यांची शाळा गळती कामासाठी होणाऱ्या स्थलांतरामुळे होत असल्याचे आढळते, म्हणजेच उपजीविकेसाठी कुटुंबासोबत स्थलांतर करावे लागल्याने शिक्षण खंडित होते. 20 टक्के विद्यार्थ्यांनी शाळेपासूनचे जास्त अंतर हे कारण नमूद केले आहे, ज्यामुळे नियमित शाळेत जाणे कठीण होते. उर्वरित 10 टक्के विद्यार्थ्यांनी इतर कारणे (जसे आजारपण, कौटुंबिक जबाबदाऱ्या इ.) सांगितली आहेत. या तक्त्यांवरून आर्थिक व सामाजिक घटक हे शाळा गळतीस प्रमुख जबाबदार असल्याचे स्पष्टपणे दिसून येते.

निष्कर्ष व चर्चा

वरील तक्त्यांवरून असे स्पष्ट होते की राजगोंड जमातीमध्ये पालकांची शैक्षणिक पातळी अत्यंत कमी आहे. आर्थिक अडचणी व स्थलांतर ही शाळा गळतीची प्रमुख कारणे आहेत. यावरून सामाजिक स्थितीचा थेट परिणाम शैक्षणिक विकासावर होत असल्याचे दिसून येते. संशोधन गृहीतक मान्य होते.

निष्कर्ष

- राजगोंड जमातीची सामाजिक व आर्थिक स्थिती कमकुवत आहे.
- पालकांची अल्पशैक्षणिक पातळी विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर परिणाम करते.
- आर्थिक अडचणी व स्थलांतरामुळे शाळा गळतीचे प्रमाण अधिक आहे.
- सामाजिक स्थिती सुधारल्यास शैक्षणिक विकासास चालना मिळू शकते.

संदर्भ

1. भारत सरकार, जनगणना भारत (2011). *Census of India Report*.
2. Ministry of Tribal Affairs, Government of India (2019). *Annual Report*.
3. घुर्ये, जी. एस. (1963). *The Scheduled Tribes*. Popular Prakashan.
4. ठक्कर, डी. (2005). *आदिवासी समाज व शिक्षण*. पुणे: विद्या प्रकाशन.

मानव संसाधन व्यवस्थापन आणि कामगार प्रश्न : एक अभ्यासपूर्ण संशोधन

प्रा. स्वप्नील सा. फोकमारे
(संशोधक विद्यार्थी)
डॉ. गोपाळराव खेडकर महाविद्यालय, गाडेगाव (तेल्हारा) जि.अकोला

सारांश (Abstract)

मानव संसाधन व्यवस्थापन ही संस्था चालविण्याची केवळ प्रशासकीय प्रक्रिया नसून ती मानवी क्षमतेचा योग्य वापर करण्याची एक व्यापक व्यवस्थापन संकल्पना आहे. संस्थेतील कर्मचारी हे उत्पादनाचे जिवंत घटक असल्यामुळे त्यांचे नियोजन, विकास, प्रेरणा व कल्याण याकडे योग्य लक्ष देणे आवश्यक ठरते. औद्योगिकीकरण, खासगीकरण, जागतिकीकरण आणि तंत्रज्ञानातील झपाट्याने होणारे बदल यांमुळे कामगारांच्या समस्या अधिक व्यापक व गुंतागुंतीच्या झाल्या आहेत. या संशोधन निबंधात मानव संसाधन व्यवस्थापनाची भूमिका, कार्ये तसेच भारतातील कामगार प्रश्नांचे स्वरूप, कारणे आणि उपाय यांचा सखोल व विश्लेषणात्मक अभ्यास करण्यात आला आहे.

प्रस्तावना

आधुनिक औद्योगिक युगात कोणतीही संस्था केवळ भांडवल, यंत्रसामग्री किंवा तंत्रज्ञानाच्या जोरावर यशस्वी होऊ शकत नाही. संस्थेच्या यशाचे खरे गमक म्हणजे कुशल, प्रशिक्षित व समाधानी कर्मचारी. त्यामुळे मानव संसाधन व्यवस्थापनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. मात्र दुसरीकडे, कामगारांचे शोषण, बेरोजगारी, कमी वेतन, असुरक्षित कामाची परिस्थिती आणि औद्योगिक संघर्ष यांसारखे प्रश्नही गंभीर स्वरूप धारण करताना दिसतात. या पार्श्वभूमीवर मानव संसाधन व्यवस्थापन व कामगार प्रश्न यांचा परस्परसंबंध अभ्यासणे आवश्यक ठरते.

संशोधनाची उद्दिष्टे

1. मानव संसाधन व्यवस्थापनाची संकल्पना व व्याप्ती स्पष्ट करणे.
2. मानव संसाधन व्यवस्थापनाच्या प्रमुख कार्यांचे सविस्तर विश्लेषण करणे.
3. भारतातील कामगार प्रश्नांचे स्वरूप व कारणे समजून घेणे.
4. कामगार प्रश्नांचा औद्योगिक उत्पादकता व औद्योगिक शांततेवर होणारा परिणाम अभ्यासणे.
5. कामगार प्रश्न सोडविण्यात मानव संसाधन व्यवस्थापनाची भूमिका स्पष्ट करणे.

मानव संसाधन व्यवस्थापन : संकल्पना व स्वरूप

मानव संसाधन व्यवस्थापन म्हणजे संस्थेमधील मानवी शक्तीचे नियोजन, संघटन, मार्गदर्शन व नियंत्रण करण्याची एक सातत्यपूर्ण प्रक्रिया होय. योग्य व्यक्तीची योग्य ठिकाणी नेमणूक करून तिच्या क्षमतेचा पूर्ण वापर करणे, तसेच कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक व संस्थात्मक उद्दिष्टांमध्ये समन्वय साधणे, हे मानव संसाधन व्यवस्थापनाचे मुख्य स्वरूप आहे.

मानव संसाधन व्यवस्थापनाची प्रमुख कार्ये

1. मनुष्यबळ नियोजन: संस्थेच्या दीर्घकालीन उद्दिष्टांनुसार आवश्यक मनुष्यबळ किती व कोणत्या स्वरूपाचे असावे याचा अंदाज बांधणे म्हणजे मनुष्यबळ नियोजन होय. यामुळे अतिरिक्त किंवा अपुरे मनुष्यबळ टाळता येते.

2. भरती व निवड प्रक्रिया: संस्थेसाठी योग्य उमेदवार आकर्षित करणे ही भरती प्रक्रिया असून, उपलब्ध उमेदवारांमधून सर्वाधिक योग्य उमेदवाराची निवड करणे ही निवड प्रक्रिया आहे. या प्रक्रियेचा संस्थेच्या कार्यक्षमतेवर थेट परिणाम होतो.

3. प्रशिक्षण व विकास: कर्मचाऱ्यांच्या ज्ञानात, कौशल्यात व कार्यपद्धतीत सुधारणा घडवून आणण्यासाठी प्रशिक्षण दिले जाते. विकास कार्यक्रमांमुळे कर्मचाऱ्यांची भविष्यातील जबाबदाऱ्या पेलण्याची क्षमता वाढते.

4. कार्यमूल्यांकन: कर्मचाऱ्यांच्या कामगिरीचे नियमित मूल्यमापन करून त्यांच्या ताकदी व उणिवा ओळखल्या जातात. याच्या आधारे पदोन्नती, वेतनवाढ व प्रोत्साहन दिले जाते.

5. वेतन व प्रोत्साहन व्यवस्थापन: न्याय्य वेतनरचना, बोनस, भत्ते व इतर आर्थिक-सामाजिक प्रोत्साहनांद्वारे कर्मचाऱ्यांना कामासाठी प्रेरित केले जाते.

6. कामगार कल्याण व सुरक्षितता: कामगारांचे आरोग्य, सुरक्षितता व सामाजिक संरक्षण यासाठी विविध कल्याणकारी सुविधा पुरविणे हे मानव संसाधन व्यवस्थापनाचे महत्त्वाचे कार्य आहे.

7. औद्योगिक संबंध व्यवस्थापन: कामगार व व्यवस्थापन यांच्यात सुसंवाद, सहकार्य व विश्वास निर्माण करणे तसेच औद्योगिक विवाद टाळणे हे या कार्याचे उद्दिष्ट आहे.

कामगार प्रश्न : अर्थ व स्वरूप:

कामगार प्रश्न म्हणजे कामगारांच्या आर्थिक, सामाजिक व औद्योगिक जीवनाशी संबंधित समस्या होय. वेतन, रोजगाराची सुरक्षितता, कामाचे तास, आरोग्य सुविधा, कामाची परिस्थिती व संघटन स्वातंत्र्य यांसारख्या बाबींशी हे प्रश्न निगडित असतात.

भारतातील प्रमुख कामगार प्रश्न

1. अपुरे वेतन व वाढती महागाई
2. बेरोजगारी व अर्धबेरोजगारी
3. असंघटित क्षेत्रातील कामगारांचे शोषण
4. औद्योगिक विवाद, संप व लॉकआउट
5. आरोग्य व सुरक्षिततेचा अभाव

कामगार प्रश्नांची कारणे:

कामगार प्रश्न निर्माण होण्यामागे लोकसंख्या वाढ, औद्योगिकीकरणाचा वेग, दुर्बल कामगार संघटना, कायद्यांची अपुरी अंमलबजावणी आणि काही वेळा व्यवस्थापनाची उदासीन भूमिका ही प्रमुख कारणे आहेत.

कामगार प्रश्नांवरील उपाय

1. किमान वेतन व कामगार कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करणे.
2. कौशल्य विकास व प्रशिक्षण कार्यक्रमांचा विस्तार करणे.
3. कामगार कल्याण व सामाजिक सुरक्षा योजनांना प्राधान्य देणे.
4. सामूहिक वाटाघाटी व संवाद प्रक्रियेला चालना देणे.
5. सुदृढ औद्योगिक संबंध प्रस्थापित करणे.

निष्कर्ष

मानव संसाधन व्यवस्थापन व कामगार प्रश्न हे परस्परावलंबी घटक आहेत. प्रभावी मानव संसाधन व्यवस्थापनाच्या माध्यमातून कामगारांचे समाधान, उत्पादकता व औद्योगिक शांतता साध्य करता येते. त्यामुळे आधुनिक संस्थांनी कामगारांना केवळ उत्पादनाचा घटक न मानता मौल्यवान मानवी भांडवल म्हणून स्वीकारणे आवश्यक आहे.

संदर्भ

1. मानव संसाधन व्यवस्थापन – भारतीय व्यवस्थापन साहित्य
2. औद्योगिक संबंध व कामगार प्रश्न – विविध शैक्षणिक संशोधन लेख

"भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासात सूक्ष्म,लघु आणि मध्यम उद्योगांचे योगदान"

श्री. भिसे सौदागर सतिश

श्री.शिवाजी कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय

दर्यापूर रोड,आकोट जि.अकोला

१. सारांश :

भारतीय अर्थव्यवस्था ही विकसनशील अर्थव्यवस्था असून, ती जगभरात सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक मानली जाते. या आर्थिक प्रगतीमध्ये सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांचे स्थान अनन्यसाधारण आहे. प्रस्तुत संशोधन पेपरचा मुख्य उद्देश भारतीय अर्थव्यवस्थेतील MSME क्षेत्राची भूमिका, त्यांचे सकल देशांतर्गत उत्पादनातील (GDP) योगदान, रोजगार निर्मिती आणि निर्यात यांमधील वाटा तपासणे हा आहे. स्वातंत्र्योत्तर काळात भारताने औद्योगिकीकरणावर भर दिला असला तरी, मोठ्या उद्योगांच्या बरोबरीनेच ग्रामीण आणि निमशहरी भागाच्या विकासासाठी MSME क्षेत्र 'विकासाचे इंजिन' म्हणून ओळखले जाते. या शोधनिबंधात दुय्यम माहितीचा वापर करून गेल्या दशकातील MSME क्षेत्राच्या कामगिरीचे विश्लेषण केले आहे. सदरील अभ्यासात असे दिसून येते की, हे क्षेत्र केवळ शेतीखालोखाल सर्वाधिक रोजगार पुरवणारे क्षेत्र नसून, ते प्रादेशिक असमतोल दूर करण्यातही महत्त्वाची भूमिका बजावते.

जागतिकीकरणाच्या युगात या क्षेत्रासमोर भांडवल उभारणी, तंत्रज्ञानाचा अभाव आणि विपणन यांसारखी आव्हाने आहेत. २०२० मध्ये भारत सरकारने बदललेली MSME ची व्याख्या आणि 'आत्मनिर्भर भारत' अभियानांतर्गत दिलेल्या सवलतींचाही या पेपरमध्ये आढावा घेतला आहे. निष्कर्षांनुसार, भारतीय अर्थव्यवस्थेला ५ ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था बनवण्यासाठी MSME क्षेत्राचा वाटा ५० टक्क्यांपर्यंत वाढवणे आवश्यक आहे. प्रस्तुत संशोधन पेपर धोरणकर्ते, अभ्यासक आणि उद्योजकांसाठी उपयुक्त ठरेल, कारण यात केवळ समस्यांवर चर्चा न करता, त्यावरील उपाययोजना आणि भविष्यातील शिफारशी देखील मांडल्या आहेत. थोडक्यात, MSME हे भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असून त्यांच्या सक्षमीकरणावरच भारताचे आर्थिक भवितव्य अवलंबून आहे.

२. संक्षिप्त शब्द : **MSME:** (सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग), **GDP:** (सकल देशांतर्गत उत्पादन), **FDI:** (थेट परकीय गुंतवणूक), **PMEGP:** (पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम), **SIDBI:** (भारतीय लघ उद्योग विकास बँक), **RBI:** (भारतीय रिझर्व बँक), **Gov:** (भारत सरकार)

३. प्रस्तावना :

कोणत्याही देशाचा आर्थिक विकास हा त्या देशातील औद्योगिक क्षेत्राच्या प्रगतीवर अवलंबून असतो. भारतासारख्या विकसनशील आणि प्रचंड लोकसंख्या असलेल्या देशात, जिथे भांडवलाची कमतरता आहे, परंतु मानवी श्रम विपुल प्रमाणात उपलब्ध आहेत. तिथे सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (MSME) हे अर्थव्यवस्थेचा आधारस्तंभ ठरतात. महात्मा गांधींनी 'खेड्यांकडे चला' आणि 'कुटीर उद्योगांचा विकास' या तत्त्वांचा पुरस्कार केला होता, त्याचेच आधुनिक रूप म्हणजे आजचे MSME क्षेत्र होय. भारतीय अर्थव्यवस्थेची रचना पाहता, शेतीवर अवलंबून असलेल्या लोकसंख्येला पर्यायी रोजगार देण्यासाठी आणि उत्पन्नाचे विकेंद्रीकरण करण्यासाठी या उद्योगांची गरज आहे. पूर्वी या उद्योगांना केवळ 'लघु उद्योग' म्हणून ओळखले जायचे, परंतु २००६ च्या MSMED

कायद्याने यांना 'सूक्ष्म, लघु आणि मध्यम' अशा तीन वर्गात विभागले. पुढे, बदलत्या आर्थिक परिस्थितीनुसार, १ जुलै २०२० पासून भारत सरकारने या उद्योगांची व्याख्या बदलून ती 'गुंतवणूक' आणि 'उलाढाल' या संयुक्त निकषांवर आधारित केली.

आज भारतात सुमारे ६.३ कोटींहून अधिक MSME युनिट्स कार्यरत आहेत. हे उद्योग केवळ वस्तूंचे उत्पादनच करत नाहीत, तर सेवा क्षेत्रातही मोठी भरारी घेत आहेत. सामाजिक दृष्टिकोनातून विचार केल्यास, महिला सक्षमीकरण आणि मागासलेल्या भागाचा विकास करण्यात या उद्योगांचा मोठा वाटा आहे. कमी भांडवलात जास्त रोजगार निर्मिती हे या क्षेत्राचे सर्वात मोठे वैशिष्ट्य आहे. असे असूनही, जागतिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी या क्षेत्राला अनेक अडथळ्यांचा सामना करावा लागत आहे. या पार्श्वभूमीवर, भारतीय अर्थव्यवस्थेच्या सर्वांगीण विकासात MSME क्षेत्राचे नेमके योगदान काय आहे, याची सद्यस्थिती आणि आव्हाने अभ्यासणे या संशोधनाचे प्रयोजन आहे. हा शोधनिबंध या क्षेत्राची बलस्थाने आणि त्रुटींचे सखोल विश्लेषण करेल.

४. संशोधनाची उद्दिष्टे :

१. भारतातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांच्या सद्यस्थितीचा अभ्यास करणे.

२. भारतीय जीडीपी आणि निर्यातीमध्ये MSME क्षेत्राच्या योगदानाचे विश्लेषण करणे.

३. या क्षेत्राद्वारे होणाऱ्या रोजगार निर्मितीच्या प्रमाणाचे मूल्यांकन करणे.

४. MSME क्षेत्रासमोर असलेल्या आर्थिक आणि तांत्रिक आव्हानांचा शोध घेणे.

५. भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी MSME क्षेत्राच्या बळकटीकरणासाठी उपाययोजना सुचवणे.

५. संशोधनाची गृहितके :

१. भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासात आणि जीडीपी वाढीत MSME क्षेत्राचा वाटा लक्षणीय आहे.

२. शेती क्षेत्रानंतर सर्वाधिक रोजगार निर्मितीची क्षमता केवळ MSME क्षेत्रात आहे.

३. योग्य वित्तपुरवठा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा अभाव यामुळे MSME क्षेत्राची वाढ खुंटली आहे.

४. सरकारी धोरणे आणि योजनांचा MSME क्षेत्राच्या कामगिरीवर सकारात्मक परिणाम होतो.

६. संशोधन पद्धती :

प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक संशोधन पद्धत वापरली आहे. माहितीचे संकलन दुय्यम माहितीच्या स्त्रोताकडून करण्यात आलेले आहे, ज्यामध्ये MSME मंत्रालयाचे वार्षिक अहवाल, भारतीय रिझर्व्ह बँकेचे (RBI) आर्थिक सर्वेक्षण अहवाल, नॅशनल सॅम्पल सर्व्हे ऑफिस (NSSO) ची आकडेवारी, विद्वान लेखकांची पुस्तके, जर्नल्स आणि मागील संशोधन पेपर यांचा आधार घेण्यात आलेला आहे. उपलब्ध माहिती आणि आकडेवारी तक्ते व आलेखाच्या स्वरूपात मांडलेली आहे.

७. भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासात MSME चे योगदान:

सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग हे भारतीय अर्थव्यवस्थेचा 'पाठीचा कणा' आहेत. शेतीनंतर सर्वाधिक रोजगार निर्मिती आणि औद्योगिक विकासात या क्षेत्राचे योगदान मोठे आहे. त्यांच्या योगदानाचा अभ्यास जीडीपीमध्ये महत्वपूर्ण वाटा, प्रचंड रोजगार निर्मिती, निर्यातीतील मोठा वाटा, समावेशक आणि प्रादेशिक विकास, मोठ्या उद्योगांना पूरक या मुद्द्यांच्या आधारे करता येईल.

७.१ नवीन व्याख्या आणि वर्गीकरण (२०२०) :

विश्लेषणापूर्वी, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग या क्षेत्राची व्याप्ती समजून घेणे गरजेचे आहे. जुलै २०२० मध्ये सरकारने केलेली नवीन व्याख्या खालीलप्रमाणे आहे :

तक्ता क्र. १

MSME वर्गीकरण (गुंतवणूक आणि उलाढाल यावर आधारित)

प्रकार	**गुंतवणूक**	**वार्षिक उलाढाल**
सूक्ष्म उद्योग	१ कोटी रुपयांपर्यंत	५ कोटी रुपयांपर्यंत
लघु उद्योग	१० कोटी रुपयांपर्यंत	५० कोटी रुपयांपर्यंत
मध्यम उद्योग	५० कोटी रुपयांपर्यंत	२५० कोटी रुपयांपर्यंत

स्त्रोत: MSME मंत्रालय, भारत सरकार.

७.२ सकल देशांतर्गत उत्पादनातील (GDP) योगदान :

भारतीय अर्थव्यवस्थेच्या जीडीपीमध्ये MSME क्षेत्राचा वाटा सातत्याने ३०% च्या आसपास राहिला आहे. हे योगदान स्थिर असले तरी, अर्थव्यवस्थेचा आकार वाढत असताना ते अत्यंत महत्त्वाचे आहे.

तक्ता क्र. २

MSME क्षेत्राचे GDP मधील योगदान (अंदाजित %)

आर्थिक वर्ष	**एकूण GDP मध्ये MSME चा वाटा (%)**
२०१७-१८	२९.७%
२०१८-१९	३०.५%
२०१९-२०	३०.०%
२०२०-२१	२७.२% (कोविड प्रभाव)
२०२१-२२	२९.२%
२०२२-२३	२९.७% (अंदाजित)

आलेख क्र 1



वरील आलेखामध्ये 'X' अक्षावर आर्थिक वर्षे आणि 'Y' अक्षावर आपल्या देशातील एकूण जीडीपी मध्ये MSME चा वाट्याची टक्केवारी दिली आहे.या आलेखावरून असे दिसून येते की, कोविड काळात किंचित घट झाली असली तरी, या क्षेत्राने पुन्हा उभारी घेतली आहे. MSME क्षेत्राचे GDP मधील योगदान सर्वाधिक २०१८-१९ मध्ये ३०.५% होते, तर सर्वात कमी २०२०-२१ मध्ये २७.२% होते. तरीपण भारतीय अर्थव्यवस्थेच्या जीडीपीमध्ये MSME क्षेत्राचा वाटा सातत्याने ३०% च्या आसपास राहिला आहे.

७.३. निर्यात क्षेत्रातील योगदान :

MSME क्षेत्रातून प्रामुख्याने तयार कपडे, चामड्याच्या वस्तू, हस्तकला, रसायने, अभियांत्रिकी वस्तू आणि प्रक्रिया केलेले अन्नपदार्थ यांची निर्यात मोठ्या प्रमाणात होते. भारताच्या एकूण निर्यातीत निम्म्यापर्यंत वाटा उचलून हे क्षेत्र परकीय चलन मिळवून देण्यात महत्त्वाची भूमिका बजावते. 'निर्यात प्रोत्साहन योजना' आणि 'मेक इन इंडिया'

मुळे लघु उद्योजकांना जागतिक बाजारपेठ मिळवणे सोपे झाले आहे. तसेच या उपक्रमांमुळे भारतीय वस्तूंची जागतिक बाजारात मागणी वाढली आहे. भारताच्या एकूण निर्यातीमध्ये MSME क्षेत्राचा वाटा हा जवळपास ४५% ते ४८% इतका प्रचंड आहे. हे आकडे सिद्ध करतात की, आंतरराष्ट्रीय व्यापारात भारताचे स्थान टिकवून ठेवण्यात लहान उद्योगांची भूमिका मोठी आहे. साथीच्या काळानंतर पुरवठा साखळी विस्कळीत झाली होती, परंतु 'आत्मनिर्भर भारत' पॅकेजमुळे या क्षेत्राच्या निर्यातीत पुन्हा वाढ दिसून आली आहे.

तक्ता क्र.३

भारताच्या एकूण निर्यातीत MSME क्षेत्राचा वाटा

आर्थिक वर्ष	भारताची एकूण निर्यात (अब्ज डॉलर्समध्ये)	MSME क्षेत्राची निर्यात (अब्ज डॉलर्समध्ये)	एकूण निर्यातीत MSME चा वाटा (%)
२०१८-१९	३३०.०८	१४७.३९	४४.६७%
२०१९-२०	३१३.३६	१५५.९०	४९.७५%
२०२०-२१	२९१.८१	१४३.९९	४९.३५%
२०२१-२२	४२२.००	१९०.००	४५.०२%
२०२२-२३	४५०.००	१९४.००	४३.६०%



वरील आलेखामध्ये 'X' अक्षावर आर्थिक वर्षे आणि 'Y' अक्षावर आपल्या देशातील एकूण निर्यातीमध्ये MSME चा वाट्याची टक्केवारी दिली आहे.या आलेखावरून असे दिसून येते की, कोविड काळात किंचित घट झाली असली तरी, या क्षेत्राने पुन्हा उभारी घेतली आहे. MSME क्षेत्राचे निर्यातीमधील योगदान सर्वाधिक २०१९-२० मध्ये ४९.७५% होते, तर सर्वात कमी २०२२-२३ मध्ये ४३.६०% होते. तरीपण भारतीय अर्थव्यवस्थेच्या निर्यातीमध्ये MSME क्षेत्राचा वाटा सातत्याने ४५% ते ४८% च्या आसपास राहिला आहे.

ग्रामीण उद्योजकता म्हणजे ग्रामीण भागात उद्योग उभारून स्थानिक संसाधनांचा वापर करून रोजगार निर्मिती करणे, जीवनमान सुधारणे, आणि शहरी व ग्रामीण भागातील असमानता कमी करणे. ग्रामीण उद्योजकतेला अनेक आव्हानांचा सामना करावा लागतो. "भांडवलाची कमतरता' हे सर्वात मोठे आव्हान आहे, कारण ग्रामीण उद्योजकांना बँक कर्जे मिळवणे कठीण जाते. "तांत्रिक ज्ञान आणि कौशल्यांचा अभाव" यामुळे उत्पादन क्षमता आणि गुणवत्ता वाढवणे कठीण होते. याशिवाय, "विपणनातील समस्या" जसे की उत्पादन विक्रीसाठी योग्य बाजारपेठ मिळवणे आणि स्थानिक उत्पादनांना स्पर्धात्मक किंमत मिळवणे या आव्हानांमुळे ग्रामीण उद्योजकांचे उद्योग टिकाव धरू शकत नाहीत. "शिक्षण आणि प्रशिक्षणाच्या मर्यादा" देखील ग्रामीण भागात उद्योजकतेला मर्यादित करतात. ग्रामीण उद्योजकतेत प्रचंड संधी आहेत. "स्थानिक संसाधनांचा प्रभावी वापर' करून कृपी प्रक्रिया उद्योग, हस्तकला, आणि पर्यावरणपूरक उद्योग उभारता येतात. "सरकारी योजनांची मदत' देखील ग्रामीण उद्योजकतेसाठी उपलब्ध आहे. प्रधानमंत्री मुद्रा योजना, स्टार्टअप इंडिया, स्किल इंडिया अशा विविध योजनांमधून ग्रामीण भागात उद्योजकता वाढवता येते. "कौशल्य विकास कार्यक्रम" आणि "तंत्रज्ञानाचा वापर" करून ग्रामीण उद्योजकांना त्यांची उत्पादने जागतिक स्तरावर नेण्याची संधी मिळते. "ई-कॉमर्स आणि पर्यटन" हे देखील ग्रामीण उद्योजकतेचे महत्त्वाचे क्षेत्र आहेत, ज्यातून | उत्पादकांना मोठ्या प्रमाणावर ग्राहक मिळू शकतात. ग्रामीण उद्योजकता विकासासाठी आव्हाने मोठी आहेत, परंतु उपलब्ध संधींचा योग्य वापर करून आणि सरकारच्या धोरणात्मक समर्थनाने ग्रामीण उद्योगांमध्ये मोठा विकास साधता येऊ शकतो. या पेपरमध्ये ग्रामीण उद्योजकतेच्या विकासासाठी उपयुक्त धोरणांचा आणि उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला आहे.

बीज शब्द (Keyword):- ग्रामीण उद्योजकता, ग्रामीण उद्योजकता महत्व, ग्रामीण उद्योजकता आव्हान, ग्रामीण उद्योजकता संधी, सरकारी योजना.

प्रस्तावना (Introduction)

ग्रामीण उद्योजकता म्हणजे ग्रामीण भागातील व्यक्तींनी स्वावलंबी व्यवसाय उभारणे, त्यातून त्यांची आर्थिक प्रगती साधणे आणि सामाजिक परिवर्तन घडवणे. हे संकल्पना भारतासारख्या कृषिप्रधान देशासाठी अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. ग्रामीण भारताची अर्थव्यवस्था प्रामुख्याने कृ पीवर आधारित आहे. भारतातील 60 पेक्षा जास्त लोकसंख्या ग्रामीण भागात राहते. त्यामुळे ग्रामीण उद्योजकता ही केवळ आर्थिक विकासाचं साधन नाही, तर रोजगार निर्मितीचं एक महत्त्वपूर्ण साधन देखील आहे. आर्थिक विकासासाठी एकात्मिक पद्धतीने ग्रामीण उद्योजकतेला चालना देणे गरजेचे आहे. ग्रामीण भागातील लोकांना आर्थिक साक्षरतेतून आणि ससाधनाच्या चांगल्या वापरातून उद्योजकता विकासाचा फायदा होऊ शकतो. परंतु ग्रामीण उद्योजकतेसमोर अनेक आव्हाने आहेत, ज्यामुळे याचा विकास फारसा जलद गतीने होत नाही. याचबरोबर अनेक संधी देखील उपलब्ध आहेत, ज्यांच्या माध्यमातून ग्रामीण उद्योजकतेचा

विकास अधिक प्रभावीपणे होऊ शकतो. या पेपरमध्ये ग्रामीण उद्योजकतेच्या प्रमुख अडचणी आणि त्यावर उपलब्ध संधी यांचा सविस्तर अभ्यास केला आहे. ग्रामीण उद्योजकता म्हणजे काय?

ग्रामीण उद्योजकता ही अशी प्रक्रिया आहे ज्यामध्ये ग्रामीण भागातील लोक स्वतःच्या कौशल्यांचा आणि स्थानिक संसाधनांचा वापर करून उद्योग निर्माण करतात. यामध्ये शेतीशी निगडित उद्योग, हस्तकला, कृपी - प्रक्रिया उद्योग, पर्यावरणपूरक व्यवसाय आणि ग्रामीण पर्यटन यांचा समावेश होतो. ग्रामीण भागातील नैसर्गिक संसाधने, स्थानिक ज्ञान, आणि पारंपारिक कौशल्ये यांचा वापर करून उत्पादन वाढवण्यास आणि उत्पन्न निर्मितीस चालना दिली जाते.

संशोधन पद्धती (Research Methodology)

या संशोधन लेखात विविध संशोधन पद्धतींचा वापर करण्यात आला आहे. यामध्ये प्रथमतः देशभरातील ग्रामीण उद्योजकांशी चर्चा, प्रश्नमंजुपा, आणि क्षेत्रीय सर्वेक्षणांचा समावेश आहे. द्वितीयक डेटासाठी भारत सरकारच्या ग्रामीण विकास मंत्रालय, जागतिक बँकेच्या अहवालांतील डेटा आणि संशोधन पत्रिका यांचा आधार घेण्यात आला आहे.

संशोधन उदेश (Objectives of Research)

प्रस्तुत संशोधन विषयाचे उदिष्टये पुढिल प्रमाणे आहेत.

1. ग्रामीण उद्योजकतेच्या विकासास चालना देण्यासाठी ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेचे अभ्यास करणे.
2. ग्रामीण भागातील उद्योजकतेला अडथळा आणणारी आव्हानांचा अभ्यास करणे.
3. ग्रामीण उद्योजकतेतल्या विविध संधींचा अभ्यास करणे.
4. ग्रामीण उद्योजकतेच्या विकासासाठी केंद्र आणि राज्य सरकारचे योजनांचा अभ्यास करणे.

ग्रामीण उद्योजकतेचे महत्त्व (Importance of Rural Entrepreneurship)

ग्रामीण उद्योजकता स्थानिक पातळीवर रोजगार निर्माण करण्यास मदत करते. ग्रामीण उद्योजकांमुळे स्थानिक बाजारपेठेची गरज पूर्ण होते, तसेच जागतिक बाजारात ग्रामीण उत्पादनांचा प्रवेश शक्य होतो. कृपी उत्पादनांच्या प्रक्रिया उद्योगांपासून ते हस्तकले पर्यंत, ग्रामीण उद्योजकतेच्या विविध पैलूंचा प्रभावी वापर करता येतो.

ग्रामीण उद्योजकता म्हणजे ग्रामीण भागात स्थापन केलेल्या लघु, मध्यम आणि मोठ्या उद्योगांची स्थापना आणि विकास. ग्रामीण उद्योजकता देशाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. त्याचे महत्त्व पुढीलप्रमाणे आहे-

1. रोजगार निर्मिती:-

ग्रामीण उद्योजकता स्थानिक पातळीवर रोजगाराची संधी उपलब्ध करून देते. शेतीवर अवलंबून असलेल्या लोकांना पर्यायी व्यवसाय मिळवण्याची संधी मिळते, ज्यामुळे स्थलांतर कमी होते.

2. स्थानिक संसाधनांचा वापर:-

ग्रामीण भागातील नैसर्गिक संसाधनांचा योग्य प्रकारे वापर करून उत्पादन वाढवले जाते. स्थानिक कच्च्या मालाचा उपयोग केला जातो, ज्यामुळे संसाधनांचा अपव्यय कमी होतो.

3. सामाजिक समतोल :-

ग्रामीण उद्योजकता ग्रामीण आणि शहरी भागातील असमानता कमी करते. ग्रामीण लोकांच्या उत्पन्नात वाढ होते आणि शहरी भागावरचा भार कमी होतो.

4. स्वावलंबन आणि विकास:-

ग्रामीण भागात उद्योग उभारल्यामुळे तिथल्या लोकांमध्ये स्वावलंबनाची भावना निर्माण होते. स्थानिक अर्थव्यवस्था अधिक स्थिर होते आणि विकासाचा दर वाढतो.

5. स्थानिक कौशल्यांचा विकास

ग्रामीण भागात उद्योजकता वाढल्यामुळे तेथील लोकांचे कौशल्य विकसित होते. विविध व्यवसायांशी संबंधित प्रशिक्षण मिळून त्यांची क्षमता वाढते.

6. ग्रामीण पायाभूत सुविधा सुधारणाः-

उद्योगांच्या विकासामुळे तिथे रस्ते, वीज, पाणी आणि इतर सुविधा वाढतात, ज्यामुळे संपूर्ण भागाचा विकास होतो.

7. पर्यावरणपूरक उद्योग:-

ग्रामीण उद्योजकते पर्यावरणपूरक उद्योगांची स्थापना करता येते, जसे की सेंद्रिय शेती, सौर ऊर्जा, हर्बल उत्पादने इ. यामुळे प्रदूषण कमी होते आणि दीर्घकालीन फायदा होतो.

ग्रामीण उद्योजकतेचा विकास हा भारतासारख्या कृषी प्रधान देशासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. यामुळे ग्रामीण भागातील लोकांचे जीवनमान उंचावते आणि देशाच्या एकूण विकासाला चालना मिळते.

ग्रामीण उद्योजकतेच्या विकासाची आव्हाने (Challenges in Rural Entrepreneurship Development)

आर्थिक अडचणी (Financial Constraints):-

ग्रामीण भागातील उद्योजकांना वित्तीय सहाय्य मिळवण्यासाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. बँकांच्या कर्ज प्रक्रियेतील जटिलता, उच्च व्याजदर, आणि अपर्याप्त आर्थिक पाठबळ यामुळे ग्रामीण उद्योजकांच्या संधींवर परिणाम होतो.

कौशल्याचा अभाव (Lack of Skill Development):-

उद्योजकतेसाठी आवश्यक तांत्रिक आणि व्यवस्थापन कौशल्यांचा अभाव ग्रामीण उद्योजकतेच्या प्रगतीत मोठा अडथळा ठरतो. शिक्षणाचे अभाव, तांत्रिक प्रशिक्षणाची कमतरता यामुळे समस्या अधिक तीव्र होते.

बाजारपेठेतील स्पर्धा (Market Competition):-

ग्रामीण भागातील उद्योजकांना राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत स्पर्धा करण्यासाठी कमी साधने उपलब्ध आहेत. गुणवत्तेत सुधारणा करण्याची आणि नवीन तंत्रज्ञान स्वीकारण्याची आवश्यकता आहे.

8. वाहतूक आणि पायाभूत सुविधा (Infrastructure and Transportation Issues):-

ग्रामीण भागातील पायाभूत सुविधा, विशेषतरू वाहतूक, रस्ते, आणि वीज यांची उपलब्धता कमी असल्यामुळे व्यवसायाची व्याप्ती वाढवणे कठीण जाते.

9. **तंत्रज्ञानाचा अभाव (Lack of Technology Adoption):-**

डिजिटल तंत्रज्ञान आणि आधुनिक साधनांचा वापर ग्रामीण भागात कमी प्रमाणात होतो, ज्यामुळे जागतिक स्तरावरील स्पर्धेत टिकून राहणे कठीण होते.

ग्रामीण उद्योजकतेच्या संधी (Opportunities in Rural Entrepreneurship)

1. **कृषी आधारित उद्योग (Agriculture&Based Industries):-** ग्रामीण भागात शेतीशी संबंधित विविध उद्योग उभारण्याच्या मोठ्या संधी आहेत. अन्न प्रक्रिया उद्योग, सेंद्रिय उत्पादनांची निर्मिती, डेअरी उत्पादने यासाठी उत्तम बाजारपेठ आहे.
2. **पर्यटन उद्योग (Tourism Industry):-** ग्रामीण पर्यटन आणि इको-टुरिझम हे ग्रामीण उद्योजकांसाठी मोठ्या संधी प्रदान करतात. स्थानिक संस्कृती आणि निसर्गरम्य ठिकाणांचा वापर पर्यटन क्षेत्रात होऊ शकतो.
3. **हस्तकला आणि लघु उद्योग (Handicrafts and Small Scale Industries):-** ग्रामीण भारतातील हस्तकला, वस्त्रउद्योग, आणि इतर लघुउद्योगांसाठी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील मागणी मोठी आहे. स्थानिक उत्पादने ब्रँड करून विक्रीसाठी उत्तम संधी आहेत.
4. **MSME क्षेत्राचा विस्तार (Expansion of MSME Sector):-** सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग हे ग्रामीण भागातील उद्योजकतेसाठी मोठ्या संधी उपलब्ध करून देऊ शकतात. भारत सरकारच्या विविध योजनांमुळे MSME क्षेत्रातील विकासाला चालना मिळू शकते.
5. **ग्रामीण उद्योजकतेच्या सरकारी योजना (Government scheme for Rural Entrepreneurship):—** ग्रामीण उद्योजकतेच्या विकासासाठी केंद्र आणि राज्य सरकारांनी विविध योजनांची अंमलबजावणी केली आहे. या योजनांचा उद्देश ग्रामीण भागात उद्योग उभारणीसाठी वित्तीय, तांत्रिक आणि कौशल्यविकासाची मदत उपलब्ध करून देणे, तसेच ग्रामीण उद्योजकतेला प्रोत्साहन देणे हा आहे. या योजनांचा आढावा घेणे महत्त्वाचे आहे कारण त्या ग्रामीण भागातील उद्योजकांसाठी संधी निर्माण करतात, आणि त्यांना आर्थिक व तांत्रिक सहाय्य देतात. 1. प्रधानमंत्री **मुद्रा योजना (PMMY):-**प्रधानमंत्री मुद्रा योजना (PMMY) 2015 मध्ये सुरू झाली. या योजनेंतर्गत लघु उद्योजकांना आर्थिक मदत दिली जाते, ज्यामध्ये ग्रामीण भागातील उद्योजकही सहभागी होऊ शकतात. ही योजना ग्रामीण भागातील लघु उद्योगांना प्रोत्साहन देण्यास आणि त्यांना व्यवसाय उभारण्यासाठी आवश्यक असणारे भांडवल उपलब्ध करून देण्यास मदत करते.
6. **प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (PMEGP)** :-प्रधानमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (PMEGP) ग्रामीण आणि शहरी भागातील बेरोजगार तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देतो. या योजनेंतर्गत उद्योग सुरू करण्यासाठी कर्जावर अनुदान दिले जाते. ग्रामीण भागात, ग्रामोद्योग मंडळ (KVIC) या योजनेच्या अंमलबजावणीसाठी जबाबदार आहे. यामध्ये लघु उद्योग उभारण्यासाठी 25 ते 35 टक्के अनुदान दिले जाते.
7. **स्टार्टअप इंडिया योजना:-** स्टार्टअप इंडिया योजना ग्रामीण भागातील नवउद्योजकांना प्रोत्साहन देते. ही योजना नवीन तंत्रज्ञान, नाविन्यपूर्ण कल्पना आणि स्टार्टअप्स उभारण्यासाठी सहाय्य करते. ग्रामीण भागातील तरुणांनी आपली स्वतःची स्टार्टअप्स सुरू करण्यासाठी ही योजना मोठा आधार ठरू शकते. या योजनेतून कर सवलती, कर्ज सुविधा, आणि तांत्रिक सहाय्य मिळते.

8. **दीनदयाळ अंत्योदय योजना / राष्ट्रीय ग्रामीण आजीविका अभियान (DAY&NRLM)**:- ही योजना ग्रामीण भागातील महिलांना आणि आर्थिक दृष्ट्या दुर्बल गटांना स्वयंसहायता गट (SHG) स्थापण्यासाठी प्रोत्साहन देते. का छत्स्ड अंतर्गत ग्रामीण भागातील महिलांना आर्थिक मदत दिली जाते आणि त्यांच्या लघु उद्योगांच्या विकासासाठी तांत्रिक आणि व्यवस्थापनाच्या सुविधा पुरवल्या जातात.
9. **प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना (PMKVY) :-**प्रधानमंत्री कौशल्य विकास योजना (PMKVY) अंतर्गत ग्रामीण भागातील युवकांना तांत्रिक आणि व्यावसायिक प्रशिक्षण दिले जाते. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून तरुणांना आवश्यक कौशल्ये शिकवली जातात, ज्यामुळे ते उद्योग किंवा व्यवसाय सुरू करू शकतात.
10. **राष्ट्रीय कृषी विकास योजना (RKVY):-** ही योजना कृपी आधारीत ग्रामीण उद्योजकतेसाठी महत्त्वाची आहे. कृपी क्षेत्रातील प्रक्रिया उद्योग, सेंद्रिय शेती, आणि इतर कृपी संबंधित उद्योगांसाठी या योजनेतून आर्थिक मदत दिली जाते. यामुळे कृपी उत्पादकांना प्रक्रिया उद्योग सुरू करण्यास आणि उत्पन्न वाढविण्यासाठी प्रोत्साहन मिळते.
11. **ग्रामीण पर्यटन आणि हेरिटेज विकास योजना** :-या ग्रामीण पर्यटनाला चालना देण्यासाठी योजनेद्वारे आर्थिक सहाय्य दिले जाते. ग्रामीण पर्यटन उद्योग विकसित करण्यासाठी आवश्यक त्या पायाभूत सुविधांचा विकास आणि प्रशिक्षण दिले जाते. पर्यावरणपूरक पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिक लोकांना रोजगार आणि व्यवसायाच्या संधी मिळतात.
12. **उद्यमिता विकास योजना** :-उद्योग आणि व्यापार मंत्रालयाच्या अंतर्गत ही योजना ग्रामीण भागातील उद्योजकतेला प्रोत्साहन देते. या योजनेतून प्रशिक्षण, मार्गदर्शन, आणि आर्थिक सहाय्य उपलब्ध करून दिले जाते, ज्यामुळे ग्रामीण भागातील लोक आपले लघु उद्योग सुरू करू शकतात.

ग्रामीण उद्योजकतेचा विकास करण्यासाठी या सरकारी योजनांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. आर्थिक सहाय्य, तांत्रिक ज्ञान, आणि प्रशिक्षण यामुळे ग्रामीण उद्योजकांना त्यांच्या उद्योगांमध्ये यशस्वी होण्यासाठी आधार मिळतो. या योजनांचा योग्य वापर करून ग्रामीण भागात रोजगार निर्मिती आणि आर्थिक विकास साधता येतो, ज्यामुळे ग्रामीण आणि शहरी भागातील असमानता कमी होऊ शकते.

धोरणात्मक उपाययोजना (Strategic Recommendations):-

1. **तांत्रिक प्रशिक्षण (Technical and Skill Training)**

ग्रामीण भागातील तरुण आणि उद्योजकांसाठी तांत्रिक प्रशिक्षण कार्यक्रम राबवून त्यांना व्यवसायिक ज्ञान आणि कौशल्ये दिली पाहिजेत.

2. **सरकारी योजना आणि वित्तीय सहाय्य (Government Schemes and Financial Support)**

ग्रामीण उद्योजकांसाठी प्रधानमंत्री मुद्रा योजना, स्टार्टअप इंडिया, स्किल इंडिया अशा योजनांचा प्रभावी वापर करून वित्तीय सहाय्य वाढवले जाऊ शकते.

3. **डिजिटल मार्केटिंग आणि ई-कॉमर्सचा वापर (Utilization of Digital Marketing and E&Commerce)**

ग्रामीण उद्योजकांना ई-कॉमर्स प्लॅटफॉर्मद्वारे त्यांच्या उत्पादनांची विक्री करता येईल. यामुळे जागतिक बाजारपेठेत त्यांचा प्रवेश वाढेल.

4. बाजारपेठेत प्रवेश (Market Access)

स्थानिक उत्पादनांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये स्थान मिळवून देण्यासाठी सरकारी मदतीने योग्य धोरणे विकसित करावी.

निष्कर्ष (Conclusion)

ग्रामीण उद्योजकता ही ग्रामीण भागातील आर्थिक विकासाचे एक महत्त्वाचे साधन आहे. आव्हाने मोठी असली तरी, त्यात सुधारणा करण्यासाठी भरपूर संधी उपलब्ध आहेत. तांत्रिक प्रशिक्षण, वित्तीय सहाय्य, आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा उपयोग करून ग्रामीण भागातील उद्योजकांना जागतिक स्तरावर यशस्वी होण्याची संधी आहे. सरकार, वित्तीय संस्था, आणि स्थानिक समुदाय एकत्रितपणे काम केल्यास ग्रामीण उद्योजकतेच्या विकासाला नक्कीच चालना मिळू शकते.

संदर्भ (Referencè): -

1. Singh, R. K., & Mishra, P. (2022). Rural Entrepreneurship: Challenges and Opportunities. Journal of Rural Development, 41(2).
2. Government of India, Ministry of Rural Development (2023). Pradhan Mantri Mudra Yojana: Empowering Rural Entrepreneurs.
3. Sharma, S. (2021). Skill Development and Rural Entrepreneurship. Economic & Political Weekly, 56(5),
4. World Bank. (2020). Rural Economic Development in India: Progress and Prospects.
5. Gupta, A. (2023). Role of MSME in Rural Development. International Journal of Economic Studies, 33 (4).
6. पाटील, एस. एस. (2020). भारतातील ग्रामीण उद्योजकतेची आव्हाने आणि संधी. 'आर्थिक वर्तामान', 15(2).
7. पाटील, आर. (2019). ग्रामीण उद्योजकतारू सरकारी उपक्रम आणि रोजगार निर्मितीवर त्याचा प्रभाव 'ग्राम विकास मासिक', 38(4).
8. नाईक, आर. आणि देसाई, एस. (सं.) (2021). 'ग्रामीण उद्योजकतारू आव्हाने आणि दृष्टिकोन'. मुंबईरू शैक्षणिक प्रकाशन
9. जोशी, ए. आणि गुप्ता, के. (2022). कौशल्य विकास कार्यक्रमांचा ग्रामीण उद्योजकतेवर प्रभाव 'उद्योजकता व विकास जर्नल', 26 (1).
10. प्रधानमंत्री मुद्रा योजना दृ अर्थ मंत्रालय, भारत सरकार 11. ग्रामीण विकास अहवाल दृ संयुक्त राष्ट्र विकास कार्यक्रम (UNDP)
11. कौशल्य विकास आणि उद्योजकता धोरण दृ भारत सरकार, कौशल्य विकास मंत्रालय

निवडणूक प्रक्रिया आणि राजकीय सहभाग : एक सखोल अभ्यास

श्री. मंगेश ना. देवतळे
संशोधक विद्यार्थी
डॉ.गोपाळराव खेडकर महाविद्यालय गाडेगाव (तेल्हारा).

Abstract

लोकशाही व्यवस्थेच्या यशस्वी कार्यासाठी निवडणूक प्रक्रिया आणि राजकीय सहभाग हे दोन अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत. निवडणूक प्रक्रियेमुळे नागरिकांना त्यांच्या प्रतिनिधींची निवड करण्याचा अधिकार प्राप्त होतो, तर राजकीय सहभागामुळे नागरिक शासनप्रक्रियेत सक्रिय सहभागी होतात. प्रस्तुत संशोधन पेपरमध्ये भारतातील निवडणूक प्रक्रियेची रचना, राजकीय सहभागाचे स्वरूप, त्यावर परिणाम करणारे सामाजिक-आर्थिक घटक, उद्भवणाऱ्या समस्या आणि त्यावरील उपाय यांचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे. या अभ्यासातून असे स्पष्ट होते की, निवडणूक प्रक्रिया केवळ यांत्रिक नसून ती नागरिकांच्या राजकीय जागरूकतेशी थेट जोडलेली आहे.

1. प्रस्तावना (Introduction)

लोकशाही ही "लोकांचे, लोकांसाठी आणि लोकांद्वारे चालवलेली शासनपद्धती" आहे. या लोकशाही व्यवस्थेचा कणा म्हणजे **निवडणूक प्रक्रिया**. निवडणुकांमुळे नागरिकांना सत्ताधाऱ्यांवर नियंत्रण ठेवता येते आणि शासनाला उत्तरदायी बनवता येते.

परंतु निवडणूक प्रक्रिया यशस्वी ठरण्यासाठी केवळ निवडणुका घेणे पुरेसे नाही; तर नागरिकांचा **सक्रिय राजकीय सहभाग** आवश्यक असतो. मतदान न करणे, राजकारणाबद्दल उदासीनता, आणि राजकीय संस्थांवरील अविश्वास हे लोकशाहीसाठी धोकादायक ठरू शकते. म्हणूनच निवडणूक प्रक्रिया आणि राजकीय सहभाग यांचा एकत्रित अभ्यास करणे गरजेचे आहे.

2. संशोधनाची उद्दिष्टे (Objectives of the Study)

1. भारतातील निवडणूक प्रक्रियेची रचना आणि कार्यपद्धती स्पष्ट करणे.
2. राजकीय सहभागाची संकल्पना आणि त्याचे विविध प्रकार अभ्यासणे.
3. राजकीय सहभागावर परिणाम करणारे सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक घटक विश्लेषित करणे.
4. भारतातील निवडणूक प्रक्रिया आणि राजकीय सहभागातील समस्या शोधणे.
5. नागरिकांचा राजकीय सहभाग वाढवण्यासाठी योग्य उपाय सुचवणे.

3. संशोधन पद्धती (Research Methodology)

हा अभ्यास **दुय्यम माहितीवर (Secondary Data)** आधारित आहे. यासाठी पुढील स्रोतांचा वापर करण्यात आला आहे –

- निवडणूक आयोगाचे अहवाल
- सरकारी प्रकाशने
- संशोधन जर्नल्स
- पुस्तके आणि शैक्षणिक लेख
- वृत्तपत्रे व ऑनलाइन स्रोत

4. निवडणूक प्रक्रिया : संकल्पना व स्वरूप

4.1 निवडणूक प्रक्रियेची संकल्पना

निवडणूक प्रक्रिया म्हणजे नागरिकांनी ठराविक कालावधीनंतर त्यांच्या प्रतिनिधींची निवड करण्यासाठी राबवली जाणारी अधिकृत आणि कायदेशीर प्रक्रिया होय. ही प्रक्रिया संविधानाच्या चौकटीत पार पाडली जाते.

4.2 भारतातील निवडणूक प्रक्रिया

भारतात निवडणुका **स्वतंत्र आणि निष्पक्ष निवडणूक आयोग** यांच्या देखरेखीखाली घेतल्या जातात.

(अ) मतदार नोंदणी

- 18 वर्षे पूर्ण झालेला प्रत्येक भारतीय नागरिक मतदार होऊ शकतो.
- मतदार याद्यांचे नियमित अद्ययावतकरण केले जाते.

(आ) उमेदवार निवड

- राजकीय पक्ष किंवा अपक्ष उमेदवार निवडणुकीत उभे राहू शकतात.
- उमेदवारांसाठी ठराविक अटी व अपात्रतेचे निकष आहेत.

(इ) प्रचार प्रक्रिया

- सभा, जाहिराती, सोशल मीडिया, जाहीरनामे यांचा वापर.
- आचारसंहिता लागू असते.

(ई) मतदान

- इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे (EVM) व VVPAT प्रणाली.
- गुप्त मतदानाची हमी.

(उ) मतमोजणी व निकाल

- पारदर्शक मतमोजणी.
- बहुमत मिळवणारा उमेदवार विजयी घोषित होतो.

5. राजकीय सहभाग : अर्थ व प्रकार

5.1 राजकीय सहभागाची संकल्पना

राजकीय सहभाग म्हणजे नागरिकांनी शासनप्रक्रियेत सक्रिय किंवा अप्रत्यक्ष सहभाग घेणे होय. यात केवळ मतदानच नव्हे, तर राजकीय चर्चेत सहभाग, चळवळी, आंदोलने, आणि निर्णयप्रक्रियेत मतप्रदर्शन यांचा समावेश होतो.

5.2 राजकीय सहभागाचे प्रकार

1. **मतदानात्मक सहभाग**
   - मतदान करणे, जनमत चाचण्यांमध्ये भाग घेणे.
2. **संस्थात्मक सहभाग**
   - राजकीय पक्षांचे सदस्य होणे, स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये काम करणे.
3. **असंस्थात्मक सहभाग**
   - आंदोलने, मोर्चे, संप, निदर्शने.
4. **डिजिटल राजकीय सहभाग**
   - सोशल मीडिया, ऑनलाइन याचिका, ई-कॅम्पेन.

6. राजकीय सहभागावर परिणाम करणारे घटक

6.1 शैक्षणिक घटक

शिक्षणामुळे नागरिकांमध्ये राजकीय जागरूकता वाढते. उच्च शिक्षित नागरिक मतदान व राजकीय चर्चेत अधिक सहभागी होतात.

6.2 आर्थिक घटक

दारिद्र्य, बेरोजगारी यामुळे राजकीय सहभाग कमी होतो. आर्थिक सुरक्षितता असलेले नागरिक अधिक सक्रिय असतात.

6.3 सामाजिक घटक

जात, धर्म, लिंग, ग्रामीण-शहरी विभागणी यांचा सहभागावर परिणाम होतो. विशेषतः महिला आणि तरुणांचा सहभाग अजूनही मर्यादित आहे.

6.4 माध्यमांचा प्रभाव

माध्यमे आणि सोशल मीडिया नागरिकांच्या मतनिर्मितीत मोठी भूमिका बजावतात.

7. भारतातील निवडणूक प्रक्रिया व राजकीय सहभागातील समस्या

1. मतदानाचा कमी टक्का
2. पैशाचा आणि बाहुबलाचा वापर
3. राजकीय निरक्षरता
4. खोटी माहिती (Fake News)
5. तरुणांचा राजकारणाबद्दल उदासीन दृष्टिकोन

8. उपाययोजना (Suggestions / Recommendations)

1. **नागरिक शिक्षण बळकट करणे**
   - शाळा-महाविद्यालयांत नागरी व राजकीय शिक्षण अनिवार्य करणे.
2. **डिजिटल साक्षरता वाढवणे**
   - खोटी माहिती ओळखण्याचे प्रशिक्षण.
3. **महिला व तरुणांचा सहभाग वाढवणे**
   - विशेष प्रोत्साहन योजना, नेतृत्व प्रशिक्षण.
4. **निवडणूक सुधारणांवर भर**
   - खर्च मर्यादा, पारदर्शक निधी व्यवस्था.

9. निष्कर्ष (Conclusion)

निवडणूक प्रक्रिया आणि राजकीय सहभाग हे लोकशाहीचे अविभाज्य घटक आहेत. सक्षम, पारदर्शक आणि निष्पक्ष निवडणूक प्रक्रिया तसेच जागरूक व सक्रिय नागरिक सहभाग यामुळेच लोकशाही टिकून राहू शकते. भारतात राजकीय सहभाग वाढवण्यासाठी शैक्षणिक, सामाजिक आणि तांत्रिक सुधारणा आवश्यक आहेत. नागरिकांचा सक्रिय सहभाग हा लोकशाहीच्या सशक्तीकरणाचा खरा आधार आहे.

10. संदर्भ (References)

1. भारतीय निवडणूक आयोग – वार्षिक अहवाल
2. Verba & Nie – *Political Participation and Democracy*
3. राम जोशी – *भारतीय राजकीय व्यवस्था*
4. Norris, P. – *Democratic Participation*
5. भारत सरकार – *लोकशाही आणि शासन*

भारतीय ज्ञानपरंपरा आणि मराठी साहित्य : एक संशोधनात्मक अभ्यास

कु. मयुरी पद्माकर डीक्कर
संशोधक विद्यार्थीनी
डॉ. जी. के. कॉलेज, तेल्हारा

सारांश (Abstract)

भारतीय ज्ञानपरंपरा ही जगातील सर्वात प्राचीन, समृद्ध व व्यापक अशी परंपरा मानली जाते. वेद, उपनिषदे, स्मृती, पुराणे, दर्शनशास्त्र, लोकपरंपरा, भक्तीपरंपरा आणि आधुनिक विचारप्रवाह यांमधून ही ज्ञानपरंपरा विकसित झाली आहे. मराठी साहित्याने या ज्ञानपरंपरेचे केवळ संवर्धनच केले नाही, तर काळानुसार तिचे पुनर्रूपांतरही केले. संत साहित्यापासून आधुनिक मराठी साहित्यापर्यंत भारतीय तत्त्वज्ञान, सामाजिक विचार, नैतिक मूल्ये आणि मानवी जीवनदृष्टी यांचे प्रभावी प्रतिबिंब आढळते. प्रस्तुत संशोधन लेखात भारतीय ज्ञानपरंपरेची संकल्पना, तिचे प्रमुख घटक आणि मराठी साहित्यातील त्यांचे प्रतिबिंब यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

कीवर्ड्स (Keywords): भारतीय ज्ञानपरंपरा, मराठी साहित्य, संत साहित्य, भक्ती चळवळ, आधुनिक साहित्य

१. प्रस्तावना

भारतीय संस्कृती ही ज्ञानकेंद्रित संस्कृती म्हणून ओळखली जाते. प्राचीन काळापासून भारतात ज्ञानाला केवळ बौद्धिक संपदा न मानता जीवन जगण्याची संपूर्ण दृष्टी म्हणून पाहिले गेले आहे. धर्म, तत्त्वज्ञान, समाजरचना, नैतिकता, कला आणि साहित्य या सर्व क्षेत्रांवर भारतीय ज्ञानपरंपरेचा खोलवर प्रभाव दिसून येतो. ही ज्ञानपरंपरा केवळ ग्रंथांपुरती मर्यादित न राहता लोकजीवनाशी निगडित राहिली आहे, हे तिचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे.

मराठी साहित्य हे भारतीय ज्ञानपरंपरेचे प्रभावी आणि सशक्त प्रतिबिंब मानले जाते. संस्कृत, प्राकृत आणि अपभ्रंश या भाषांमधील तत्त्वज्ञान मराठी भाषेत येताना ते अधिक लोकाभिमुख झाले. संत साहित्याच्या माध्यमातून भारतीय तत्त्वज्ञान सामान्य जनतेपर्यंत पोहोचले आणि सामाजिक परिवर्तनाची चळवळ उभी राहिली. मराठी साहित्याने अध्यात्म, भक्ती, कर्म, नैतिकता आणि मानवी मूल्ये या संकल्पनांना केंद्रस्थानी ठेवून भारतीय ज्ञानपरंपरेचे सातत्य टिकवून ठेवले.

आधुनिक काळात वैज्ञानिक दृष्टिकोन, विवेकवाद आणि सामाजिक न्याय यांचा प्रभाव वाढला असतानाही भारतीय ज्ञानपरंपरेतील मूलभूत मूल्ये मराठी साहित्यातून नव्या स्वरूपात व्यक्त होत राहिली आहेत. त्यामुळे मराठी साहित्य हे परंपरा आणि आधुनिकता यांचा सेतू म्हणून कार्य करताना दिसते. या संशोधन लेखाचा मुख्य उद्देश भारतीय ज्ञानपरंपरेची संकल्पना स्पष्ट करणे आणि मराठी साहित्यामध्ये तिचे प्रतिबिंब कसे उमटले आहे याचा सखोल अभ्यास करणे हा आहे.

२. भारतीय ज्ञानपरंपरेची संकल्पना (Concept of Indian Knowledge Tradition)

भारतीय ज्ञानपरंपरेचे स्वरूप

भारतीय ज्ञानपरंपरा ही हजारो वर्षांच्या सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि बौद्धिक प्रवासातून विकसित झालेली आहे. ही परंपरा श्रुती आणि स्मृती या दोन आधारस्तंभांवर उभी आहे. वेद, उपनिषदे, ब्राह्मणे आणि आरण्यके या श्रुतीग्रंथांमधून तत्त्वज्ञानाची मूलभूत मांडणी करण्यात आली आहे, तर रामायण, महाभारत, पुराणे आणि धर्मशास्त्रे या स्मृतीग्रंथांनी त्या तत्त्वज्ञानाला सामाजिक आणि नैतिक अधिष्ठान दिले आहे.

भारतीय ज्ञानपरंपरेत आत्मा, ब्रह्म, कर्म, पुनर्जन्म, मोक्ष, धर्म आणि योग या संकल्पनांना विशेष महत्त्व आहे. ज्ञान म्हणजे केवळ बाह्य जगाचे आकलन नसून आत्मज्ञान प्राप्त करून जीवनाचे अंतिम ध्येय साध्य करणे, असा व्यापक

अर्थ भारतीय परंपरेत मांडला आहे. त्यामुळे भारतीय ज्ञानपरंपरा ही भौतिक आणि आध्यात्मिक अशा दोन्ही पातळयांवर समन्वय साधणारी आहे.

या ज्ञानपरंपरेचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे तिचा समग्र दृष्टिकोन. मानव, समाज, निसर्ग आणि विश्व यांचे परस्परसंबंध भारतीय तत्त्वज्ञानात सातत्याने अधोरेखित केले गेले आहेत. अहिंसा, सत्य, करुणा, सहअस्तित्व आणि सामाजिक कर्तव्य ही मूल्ये भारतीय ज्ञानपरंपरेच्या केंद्रस्थानी आहेत. त्यामुळे ही परंपरा केवळ वैयक्तिक मोक्षापुरती मर्यादित न राहता समाजकल्याणाशी जोडलेली आहे.

भारतीय ज्ञानपरंपरेची लोकाभिमुखता ही तिची आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण बाजू आहे. ज्ञान हे काही निवडक वर्गापुरते मर्यादित न ठेवता ते लोकभाषा, कथा, दृष्टांत, भक्तीगीत आणि लोकपरंपरेच्या माध्यमातून सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवले गेले. याच लोकाभिमुखतेमुळे ही ज्ञानपरंपरा दीर्घकाळ टिकून राहिली आणि मराठीसारख्या प्रादेशिक साहित्याला वैचारिक समृद्धी प्राप्त झाली.

भारतीय ज्ञानपरंपरा ही 'श्रुती' आणि 'स्मृती' या दोन प्रमुख आधारांवर उभी आहे. वेद, उपनिषदे, ब्राह्मणे, आरण्यके हे श्रुतीग्रंथ मानले जातात; तर रामायण, महाभारत, पुराणे, धर्मशास्त्रे ही स्मृतीग्रंथांत मोडतात.

या ज्ञानपरंपरेची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे सांगता येतील –

1. **आध्यात्मिकता:** आत्मा, ब्रह्म, मोक्ष, कर्मसिद्धांत यांवर भर
2. **समग्र दृष्टिकोन:** मानव, निसर्ग आणि समाज यांचे परस्परसंबंध
3. **नैतिक मूल्ये:** सत्य, अहिंसा, करुणा, धर्म
4. **लोकाभिमुखता:** ज्ञान सर्वांसाठी खुले असणे

ही परंपरा केवळ ग्रंथाधिष्ठित नसून लोकजीवनातही खोलवर रुजलेली आहे.

३. प्राचीन व मध्ययुगीन मराठी साहित्यातील ज्ञानपरंपरा

३.१ संत साहित्य आणि भक्तीपरंपरा

मराठी साहित्यात भारतीय ज्ञानपरंपरेचे सर्वात प्रभावी रूप संत साहित्यात आढळते. संत ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, तुकाराम, समर्थ रामदास या संतांनी वेदांत तत्त्वज्ञान लोकभाषेत मांडले.

ज्ञानेश्वरी हा ग्रंथ म्हणजे भगवद्गीतेवरील मराठी भाषेतील अद्वितीय भाष्य आहे. त्यामध्ये अद्वैत वेदांत, कर्मयोग, भक्तियोग यांचे सुंदर समन्वय आढळतो.

तुकारामांच्या अभंगांतून कर्मसिद्धांत, नामस्मरण आणि सामाजिक समता यांचा पुरस्कार झाला. त्यामुळे भारतीय ज्ञानपरंपरा ही केवळ उच्चवर्णीयांची मक्तेदारी न राहता सर्वसामान्यांपर्यंत पोहोचली.

३.२ लोकसाहित्य आणि मौखिक परंपरा

पोवाडे, भारुडे, ओव्या, कहाण्या यांमधूनही भारतीय ज्ञानपरंपरेचे लोकाभिमुख स्वरूप दिसून येते. जीवनमूल्ये, नैतिक शिकवण आणि सांस्कृतिक संकेत या माध्यमातून पिढ्यान्पिढ्या पोहोचवले गेले.

४. आधुनिक मराठी साहित्यातील ज्ञानपरंपरेचे रूपांतर

४.१ सामाजिक आणि वैचारिक साहित्य

आधुनिक काळात भारतीय ज्ञानपरंपरेचा पुनर्विचार झाला. महात्मा फुले, लोकहितवादी, आगरकर यांनी परंपरेचे चिकित्सक विश्लेषण केले. त्यांनी अंधश्रद्धा, जातिभेद यांवर टीका करत मानवी मूल्यांवर आधारित ज्ञानाची मांडणी केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांमध्ये बौद्ध तत्त्वज्ञानाचा प्रभाव दिसतो. समता, न्याय आणि करुणा ही भारतीय ज्ञानपरंपरेतील मूल्ये त्यांनी आधुनिक संदर्भात मांडली.

४.२ आधुनिक काव्य, कथा व कादंबरी

वि. स. खांडेकर, पु. ल. देशपांडे, शंकर पाटील, शिवाजी सावंत यांच्या साहित्यकृतींमध्ये भारतीय जीवनदृष्टीचा प्रभाव दिसतो.

शिवाजी सावंतांची **'मृत्युंजय'** ही कादंबरी महाभारतीय परंपरेचे आधुनिक पुनर्मूल्यांकन आहे. यात धर्म, कर्म आणि मानवी संघर्ष यांचे तात्त्विक विश्लेषण केले आहे.

५. भारतीय ज्ञानपरंपरा आणि मराठी साहित्य : परस्परसंबंध

भारतीय ज्ञानपरंपरा आणि मराठी साहित्य यांचा संबंध द्विमार्गी आहे. एकीकडे ज्ञानपरंपरेने मराठी साहित्याला वैचारिक अधिष्ठान दिले, तर दुसरीकडे मराठी साहित्याने या ज्ञानाला लोकभाषेत, लोकजीवनाशी जोडून जिवंत ठेवले.

मराठी साहित्याने परंपरेचे अंधानुकरण न करता तिचे पुनरावलोकन केले, बदलत्या काळानुसार नवे अर्थ लावले आणि समाजाला दिशा दिली.

६. निष्कर्ष (Conclusion)

भारतीय ज्ञानपरंपरा ही मराठी साहित्याची मूलभूत प्रेरणा राहिली आहे. संत साहित्यापासून आधुनिक साहित्यापर्यंत या परंपरेचे विविध रूपांतरे आढळतात. मराठी साहित्याने भारतीय ज्ञानपरंपरेला लोकाभिमुख, मानवकेंद्री आणि कालानुरूप बनवले.

आजच्या जागतिकीकरणाच्या युगातही भारतीय ज्ञानपरंपरेतील मूल्ये मराठी साहित्याच्या माध्यमातून नव्या पिढीपर्यंत पोहोचवणे ही काळाची गरज आहे. त्यामुळे भारतीय संस्कृतीची सातत्यपूर्ण ओळख टिकून राहण्यास मदत होईल.

संदर्भ (References)

1. खांडेकर, वि. स. – *साहित्य आणि जीवन*
2. देशपांडे, पु. ल. – *मराठी संस्कृती*
3. सावंत, शिवाजी – *मृत्युंजय*
4. दांडेकर, आर. न. – *भारतीय संस्कृतीचा इतिहास*
5. कुलकर्णी, अ. ग. – *मराठी संत साहित्य*

मानवाधिकार आणि सामाजिक न्याय : विश्लेषणात्मक अभ्यास

प्रा. डॉ. बाळासाहेब भानुदास खरात

(राज्यशास्त्र विभाग प्रमुख)

कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय भिगवण, ता. इंदापूर, जि. पुणे, पिन कोड-413130.

गोषवारा (Abstract):-

मानवाधिकार आणि सामाजिक न्याय या संकल्पना आधुनिक लोकशाही व्यवस्थेच्या केंद्रस्थानी आहेत. प्रत्येक व्यक्तीला मानवी सन्मान, स्वातंत्र्य, समानता आणि सुरक्षिततेने जगण्याचा नैसर्गिक अधिकार आहे, ही मानवाधिकारांची मूलभूत कल्पना आहे. मात्र समाजातील आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय विषमता लक्षात घेता, केवळ हक्कांची घोषणा पुरेशी ठरत नाही; त्या हक्कांचा प्रत्यक्ष लाभ समाजातील सर्व स्तरांपर्यंत पोहोचवणे आवश्यक असते. याच ठिकाणी सामाजिक न्याय ही संकल्पना महत्त्वाची ठरते. या संशोधन लेखात मानवाधिकारांची संकल्पना, त्यांची वैशिष्ट्ये आणि ऐतिहासिक विकास यांचा आढावा घेण्यात आला आहे. द्वितीय महायुद्धानंतर संयुक्त राष्ट्रांनी स्वीकारलेल्या मानवाधिकारांच्या सार्वत्रिक घोषणेमुळे या संकल्पनांना जागतिक मान्यता कशी मिळाली, हे स्पष्ट करण्यात आले आहे. पुढे भारतीय राज्यघटनेतील मूलभूत हक्क आणि राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वांद्वारे मानवाधिकार व सामाजिक न्याय यांना दिलेले घटनात्मक स्थान विशद केले आहे. लेखामध्ये

भारतीय समाजातील वंचित व दुर्बल घटकांच्या संदर्भात सामाजिक न्यायाची आवश्यकता अधोरेखित केली आहे. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, आदिवासी, महिला आणि बालक यांना भेडसावणाऱ्या समस्या, त्यावरील कायदे आणि शासनाच्या विविध योजना यांचे विश्लेषण करण्यात आले आहे. आरक्षण धोरण हे ऐतिहासिक विषमता कमी करण्यासाठी कसे उपयुक्त ठरते, यावरही चर्चा करण्यात आली आहे. तसेच मानवाधिकारांच्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी जसे की गरिबी, अशिक्षण, सामाजिक मानसिकता, भ्रष्टाचार आणि प्रशासनातील मर्यादा यांचे परीक्षण करण्यात आले आहे. मानवाधिकार संरक्षणासाठी कार्यरत असलेल्या राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय आयोगांची भूमिका स्पष्ट करण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील प्रयत्न आणि करार यांचाही थोडक्यात आढावा घेतला आहे. शेवटी सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी शिक्षण, जनजागृती, महिलांचे सक्षमीकरण, कायद्याची प्रभावी अंमलबजावणी आणि लोकसहभाग यांची गरज अधोरेखित करण्यात आली आहे. निष्कर्षतः, मानवाधिकार आणि सामाजिक न्याय या परस्परपूरक संकल्पना असून न्याय्य, समताधिष्ठित आणि मानवी मूल्यांवर आधारित समाजनिर्मितीसाठी त्यांची अंमलबजावणी अत्यावश्यक आहे.

कीवर्ड्स (Keywords):- मानवाधिकार, सामाजिक न्याय, समता, राज्यघटना, वंचित घटक, महिला सक्षमीकरण, बालहक्क, लोकशाही, सामाजिक विषमता

अभ्यासाची उद्दिष्टे (Objectives of the Study):- या संशोधनाचा मुख्य हेतू मानवाधिकार आणि सामाजिक न्याय या संकल्पनांचा सखोल अभ्यास करणे हा आहे. त्यासाठी खालील उद्दिष्टे निश्चित करण्यात आली आहेत:

1. मानवाधिकारांची संकल्पना, स्वरूप आणि वैशिष्ट्ये समजावून घेणे.
2. मानवाधिकारांचा ऐतिहासिक विकास आणि जागतिक स्तरावरील प्रगतीचा आढावा घेणे.
3. सामाजिक न्याय या संकल्पनेचा अर्थ, व्याप्ती आणि समाजातील महत्त्व स्पष्ट करणे.

4. भारतीय राज्यघटनेत मानवाधिकार आणि सामाजिक न्याय यासंबंधी असलेल्या तरतुदींचा अभ्यास करणे.
5. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आणि इतर मागासवर्गीयांच्या हक्कांचे संरक्षण कसे केले जाते हे तपासणे.
6. महिला आणि बालकांच्या मानवाधिकारांविषयी जागरूकता निर्माण करणे.
7. शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि सामाजिक सुरक्षा या क्षेत्रांतील असमानतेचे विश्लेषण करणे.
8. आरक्षण धोरणाची सामाजिक न्यायातील भूमिका समजावून घेणे.
9. मानवाधिकारांच्या अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी ओळखणे.
10. सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी आवश्यक उपाययोजना सुचवणे.
11. ग्रामीण व शहरी भागातील सामाजिक विषमतेची तुलना करणे.
12. आर्थिक असमानता आणि मानवाधिकार यांचा परस्परसंबंध अभ्यासणे.
13. मानवी प्रतिष्ठा (Human Dignity) या संकल्पनेचे महत्त्व अधोरेखित करणे.
14. शासन, न्यायालये आणि स्वयंसेवी संस्थांची भूमिका समजावून घेणे.
15. समाजात मानवाधिकारांविषयी संवेदनशीलता वाढवण्याचे मार्ग शोधणे.

प्रस्तावना:-

मानव हा स्वभावतः समाजशील प्राणी आहे. तो एकट्याने जगू शकत नाही; त्याचे जीवन कुटुंब, समाज आणि राष्ट्र यांच्याशी घट्ट जोडलेले असते. समाजात राहात असताना प्रत्येक व्यक्तीला सुरक्षितता, सन्मान, स्वातंत्र्य आणि संधी यांची गरज असते. या मूलभूत गरजांवर आधारलेले जे नैसर्गिक हक्क प्रत्येक व्यक्तीला केवळ मानव म्हणून प्राप्त होतात, त्यांना मानवाधिकार असे म्हणतात. हे हक्क व्यक्तीच्या अस्तित्वाशी निगडित असल्यामुळे ते कोणत्याही शासनाची कृपा नसून मानवी प्रतिष्ठेचे अधिष्ठान आहेत. तथापि, समाजातील सर्व व्यक्तींना हे हक्क समान प्रमाणात मिळतातच असे नाही. सामाजिक रचनेतील असमानता, आर्थिक विषमता, जातीय भेदभाव, लिंगाधारित अन्याय, धार्मिक विभाजन, शिक्षणातील दरी आणि ग्रामीण-शहरी अंतर यांमुळे अनेक व्यक्ती आपले मूलभूत हक्क प्रत्यक्षात उपभोगू शकत नाहीत. अशा परिस्थितीत केवळ कायदेशीर हक्क देणे पुरेसे ठरत नाही; तर त्या हक्कांचा प्रत्यक्ष लाभ समाजातील सर्व स्तरांपर्यंत पोहोचवण्यासाठी विशेष प्रयत्न करणे आवश्यक ठरते. हीच गरज सामाजिक न्याय या संकल्पनेतून व्यक्त होते. सामाजिक न्याय म्हणजे समाजातील विषमता कमी करून सर्वांना समान संधी उपलब्ध करून देणे. समाजातील दुर्बल, वंचित आणि उपेक्षित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासनाने धोरणात्मक पातळीवर उपाययोजना करणे, तसेच समाजाने मानसिकतेत बदल घडवून आणणे, हे सामाजिक न्यायाचे मूलभूत उद्दिष्ट आहे. म्हणूनच मानवाधिकार आणि सामाजिक न्याय या संकल्पना एकमेकांशी अविभाज्यपणे जोडलेल्या आहेत. मानवाधिकार व्यक्तीला सन्मानाने जगण्याचा अधिकार देतात, तर सामाजिक न्याय त्या अधिकारांचा समान उपभोग सुनिश्चित करण्याचा प्रयत्न करतो. भारतातील सामाजिक वास्तव पाहता या विषयाचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. विविधतेने नटलेल्या भारतीय समाजात जात, धर्म, भाषा, प्रादेशिकता, लिंग आणि आर्थिक स्थिती यांमुळे अनेक स्तरांवर असमानता दिसून येते. अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, आदिवासी, महिला, बालक, दिव्यांग आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक यांना अजूनही अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. या पार्श्वभूमीवर भारतीय राज्यघटनेने मानवाधिकारांचे संरक्षण आणि सामाजिक न्यायाची अंमलबजावणी यांना विशेष महत्त्व दिले आहे. मूलभूत हक्क आणि राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वांद्वारे न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांवर आधारित

समाजरचना घडवण्याचा प्रयत्न केला आहे. जागतिक स्तरावरही मानवाधिकारांचे महत्त्व मान्य करण्यात आले आहे. संयुक्त राष्ट्र संघाने मानवाधिकारांची सार्वत्रिक घोषणा स्वीकारून सर्व राष्ट्रांना मानवी सन्मान जपण्याचे आवाहन केले आहे. त्यामुळे मानवाधिकारांचा प्रश्न हा केवळ राष्ट्रीय मर्यादेत राहिलेला नसून जागतिक जबाबदारीचा विषय बनला आहे. या सर्व पार्श्वभूमीवर प्रस्तुत संशोधन लेखामध्ये मानवाधिकार आणि सामाजिक न्याय या संकल्पनांचा सखोल अभ्यास करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. मानवाधिकारांची संकल्पना, ऐतिहासिक विकास, भारतीय राज्यघटनेतील तरतुदी, महिला व बालकांचे हक्क, अनुसूचित जाती-जमातींची स्थिती, आरक्षण धोरण, अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी आणि संभाव्य उपाययोजना यांचा सर्वांगीण आढावा या लेखात घेण्यात येणार आहे. या अभ्यासाचा उद्देश केवळ माहिती देणे नसून समाजात अधिक न्याय्य, समताधिष्ठित आणि मानवी मूल्यांवर आधारित दृष्टिकोन विकसित करणे हा आहे

मानवाधिकारांची संकल्पना:- मानवाधिकार म्हणजे व्यक्तीला केवळ "मानव" म्हणून मिळणारे मूलभूत स्वातंत्र्य आणि संरक्षण. हे हक्क कोणत्याही राज्याने दिलेली कृपा नसून मानवी प्रतिष्ठेशी निगडित नैसर्गिक हक्क मानले जातात. मानवाधिकारांचे केंद्रस्थान म्हणजे मानवी सन्मान. व्यक्तीला भीतीमुक्त जीवन, विचार मांडण्याचे स्वातंत्र्य, अन्यायापासून संरक्षण, आणि समान संधी मिळणे हे या संकल्पनेचे मुख्य घटक आहेत. हे हक्क सार्वत्रिक स्वरूपाचे असून जगातील सर्व व्यक्तींना समानपणे लागू होतात. मानवाधिकारांना तीन व्यापक गटात पाहता येते:- I-नागरी व राजकीय हक्क. II-सामाजिक व आर्थिक हक्क. III-सांस्कृतिक व सामूहिक हक्क

मानवाधिकारांचा ऐतिहासिक विकास:- मानवाधिकारांची कल्पना आधुनिक काळात स्पष्ट झाली असली तरी तिची मुळे प्राचीन नैतिक विचारांमध्ये सापडतात. मध्ययुगात सत्ताधाऱ्यांवर नियंत्रण आणण्याच्या प्रयत्नांतून काही महत्त्वाचे टप्पे गाठले गेले. नंतर लोकशाही क्रांतींनी व्यक्तीस्वातंत्र्याचा मुद्दा पुढे आणला. द्वितीय महायुद्धातील अमानुष अत्याचारांनी जगाला हादरवून सोडले. यानंतर आंतरराष्ट्रीय पातळीवर मानवाधिकारांचे संरक्षण करण्याची गरज प्रकर्षाने जाणवली. परिणामी संयुक्त राष्ट्रांनी १९४८ साली मानवाधिकारांविषयी एक सार्वत्रिक घोषणा स्वीकारली. या घोषणेमुळे मानवाधिकारांना जागतिक नैतिक मान्यता मिळाली.

सामाजिक न्यायाची संकल्पना:- सामाजिक न्याय ही संकल्पना केवळ कायदेशीर समानतेपुरती मर्यादित नाही. ती प्रत्यक्ष जीवनातील विषमता कमी करून न्याय्य सामाजिक व्यवस्था निर्माण करण्यावर भर देते. समाजातील काही घटक ऐतिहासिकदृष्ट्या वंचित राहिले असल्यास त्यांना विशेष संधी देणे हेही सामाजिक न्यायाच्या चौकटीत येते. सामाजिक न्यायाचा उद्देश म्हणजे प्रत्येकाला आपल्या क्षमतेनुसार प्रगतीची संधी मिळावी. आर्थिक साधने, शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि सन्मान यांचा समान लाभ मिळणे ही त्याची मूलभूत अपेक्षा आहे.

भारतीय राज्यघटना आणि मानवाधिकार:- भारतीय राज्यघटना मानवाधिकार आणि सामाजिक न्याय यांचा समतोल साधण्याचा प्रयत्न करते. नागरिकांच्या स्वातंत्र्यांचे संरक्षण करण्यासाठी मूलभूत हक्क दिले आहेत, तर सामाजिक समता प्रस्थापित करण्यासाठी राज्याच्या धोरणात्मक तत्त्वांचा समावेश करण्यात आला आहे. समतेचा हक्क, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, शोषणाविरुद्ध संरक्षण, धार्मिक स्वातंत्र्य, सांस्कृतिक हक्क यांमुळे व्यक्तीच्या स्वातंत्र्याला घटनात्मक आधार मिळतो. त्याचबरोबर शिक्षण, आरोग्य, समान वेतन, दुर्बल घटकांचे संरक्षण यांसारख्या तत्त्वांमुळे सामाजिक न्यायाची दिशा निश्चित होते.

सामाजिक न्याय आणि आरक्षण धोरण:- भारतातील सामाजिक रचना दीर्घकाळ जातीय श्रेणींवर आधारित राहिली. परिणामी काही समाजघटक शिक्षण, प्रशासन आणि अर्थव्यवस्थेतून दूर राहिले. ही ऐतिहासिक दरी कमी करण्यासाठी आरक्षण धोरण राबविण्यात आले. आरक्षणाचा उद्देश स्पर्धेत कृत्रिम आघाडी देणे नसून सुरुवातीची विषमता कमी

करणे हा आहे. शिक्षण व नोकरीतील प्रतिनिधित्व वाढल्याने सामाजिक आत्मविश्वास वाढतो आणि सामाजिक न्यायाची प्रक्रिया गती घेते.

मानवाधिकार आणि महिलांचे प्रश्न:- महिलांना समान हक्कांची हमी असली तरी प्रत्यक्षात अनेक पातळयांवर भेदभाव दिसतो. घरगुती हिंसा, लैंगिक छळ, वेतनातील तफावत, निर्णय प्रक्रियेत कमी सहभाग हे त्यातील प्रमुख मुद्दे आहेत. महिला सक्षमीकरण म्हणजे केवळ संरक्षण नव्हे तर शिक्षण, रोजगार, आरोग्य आणि राजकीय सहभाग यांद्वारे त्यांना स्वावलंबी बनवणे होय. महिलांचे सबलीकरण झाले तर संपूर्ण समाजाच्या प्रगतीला चालना मिळते.

बालकांचे मानवाधिकार:- बालकांना सुरक्षित आणि पोषक वातावरण मिळणे हे कोणत्याही समाजाचे कर्तव्य आहे. परंतु दारिद्र्य, कुपोषण, बालमजुरी आणि शिक्षणापासून वंचितता या समस्या अजूनही अस्तित्वात आहेत. शिक्षणाचा हक्क, आरोग्य सेवा, शोषणापासून संरक्षण आणि खेळ-विकासाच्या संधी या बालहक्कांच्या मुख्य गरजा आहेत. बालकांमध्ये गुंतवणूक करणे म्हणजे राष्ट्राच्या भविष्यात गुंतवणूक करणे होय.

अनुसूचित जाती, जमाती व आदिवासींची स्थिती:- ऐतिहासिक भेदभावामुळे या घटकांना सामाजिक व आर्थिक प्रगतीत मागे राहावे लागले. शिक्षणाची कमतरता, आरोग्य सुविधा अभाव, जमीन गमावण्याचे प्रमाण, सांस्कृतिक उपेक्षा हे प्रश्न ठळक आहेत. यांच्या विकासासाठी केवळ आर्थिक मदत पुरेशी नसून सन्मान, ओळख आणि स्वनिर्णयाचा अधिकारही तितकाच महत्त्वाचा आहे.

मानवाधिकार उल्लंघनाची कारणमीमांसा:- मानवाधिकारांचे उल्लंघन केवळ कायद्याच्या अभावामुळे होत नाही; सामाजिक रचना आणि मानसिकता याही कारणीभूत असतात. गरिबी, अशिक्षण, लिंगभेद, अंधश्रद्धा, सत्तेचा गैरवापर, आणि न्यायप्रणालीपर्यंत पोहोच नसणे यामुळे सामान्य व्यक्ती आपले हक्क वापरू शकत नाही.

मानवाधिकार संरक्षणासाठी संस्था:- मानवाधिकारांचे संरक्षण करण्यासाठी स्वतंत्र संस्थांची गरज असते. तक्रारींची चौकशी, सरकारला सूचना, जनजागृती, आणि अहवाल तयार करणे या माध्यमातून या संस्था काम करतात. त्यांची प्रभावीता लोकजागृती आणि स्वायत्ततेवर अवलंबून असते.

आंतरराष्ट्रीय पातळीवरील प्रयत्न:- मानवाधिकार हे जागतिक पातळीवर मान्य झालेले मूल्य आहे. विविध आंतरराष्ट्रीय करार आणि परिषदांद्वारे राष्ट्रांना मानवी सन्मान जपण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. यामुळे मानवाधिकारांचे संरक्षण केवळ देशांतर्गत विषय न राहता जागतिक नैतिक बांधिलकी बनते.

16) अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणी:- कायदे आणि धोरणे अस्तित्वात असूनही अंमलबजावणीच्या पातळीवर अनेक अडचणी येतात. प्रशासकीय उदासीनता, भ्रष्टाचार, सामाजिक विरोध, माहितीचा अभाव आणि संसाधनांची कमतरता यामुळे सामाजिक न्यायाची गती मंदावते.

सामाजिक न्यायासाठी उपाययोजना:- सामाजिक न्याय प्रस्थापित करण्यासाठी बहुआयामी प्रयत्न आवश्यक आहेत. गुणवत्तापूर्ण शिक्षण, सार्वजनिक आरोग्य सुधारणा, महिलांचे आर्थिक सक्षमीकरण, तंत्रज्ञानाचा समावेश, आणि जनजागृती या गोष्टी दीर्घकालीन बदल घडवतात. कायद्याबरोबरच सामाजिक मूल्यांमध्ये बदल होणेही अत्यावश्यक आहे.

निष्कर्ष:-

मानवाधिकार आणि सामाजिक न्याय या एकमेकांना पूरक अशा संकल्पना आहेत. मानवाधिकार व्यक्तीला स्वातंत्र्य आणि सन्मान देतात, तर सामाजिक न्याय त्या हक्कांचा लाभ सर्व स्तरांपर्यंत पोहोचवण्याची हमी देतो.

न्याय्य समाज निर्माण करण्यासाठी केवळ कायदे नव्हे तर जागरूक नागरिक, संवेदनशील प्रशासन आणि समतावादी सामाजिक मूल्ये आवश्यक आहेत. समान संधी, परस्पर आदर आणि मानवी प्रतिष्ठेचा स्वीकार या तत्त्वांवर आधारित समाजरचना उभारणे हीच खऱ्या अर्थाने मानवाधिकारांची अंमलबजावणी ठरते.

संदर्भसूची (References):-

1. भारत सरकार, भारताची राज्यघटना, भारत सरकार प्रकाशन विभाग, नवी दिल्ली, 2022.
2. डॉ. शंकरराव खरात, मानवाधिकार : संकल्पना आणि वास्तव, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, 2018.
3. डॉ. बी. आर. जोशी, सामाजिक न्याय : तत्त्वे आणि व्यवहार, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, 2016.
4. डॉ. विद्याधर पुंडलिक, भारतीय समाजरचना आणि सामाजिक समस्या, विद्या प्रकाशन, नागपूर, 2017.
5. डॉ. एम. जी. कुलकर्णी, समाजशास्त्र परिचय, फडके प्रकाशन, कोल्हापूर, 2015.
6. डॉ. सुनील पाटील, भारतीय समाजातील विषमता, प्रेरणा प्रकाशन, पुणे, 2019.
7. डॉ. नीलिमा गुंडी, महिला अभ्यास, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, 2018.
8. महाराष्ट्र राज्य बालहक्क संरक्षण आयोग, बालहक्क आणि बालसंरक्षण अहवाल, महाराष्ट्र शासन प्रकाशन, मुंबई, 2021.
9. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन, अनुसूचित जाती-जमाती विकास योजना अहवाल, महाराष्ट्र शासन, मुंबई, 2020.
10. राष्ट्रीय मानवाधिकार आयोग (NHRC), वार्षिक अहवाल, राष्ट्रीय मानवाधिकार आयोग, नवी दिल्ली, 2022.
11. महिला व बालविकास विभाग, महाराष्ट्र शासन, महिला व बालविकास वार्षिक अहवाल, महाराष्ट्र शासन प्रकाशन, मुंबई, 2021.
12. सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालय, भारत सरकार, सामाजिक न्याय वार्षिक अहवाल, भारत सरकार प्रकाशन विभाग, नवी दिल्ली, 2022.
13. डॉ. रमेश वरखेडे, भारतीय समाज आणि परिवर्तन, चैतन्य प्रकाशन, नाशिक, 2016.
14. डॉ. अरुणा देशमुख, समाजकल्याण आणि सामाजिक धोरणे, उत्कर्ष प्रकाशन, पुणे, 2019.
15. प्रा. सुभाष पाटील, लोकशाही आणि मानवमूल्ये, साईनाथ प्रकाशन, कोल्हापूर, 2017.

लघुउद्योगांच्या आर्थिक विकासात मुद्रा योजनेची भुमिका

Dr. Avinash Ramkrishna Pawar
(Associate Professor)
Faculty of Commerce & Management,
Shri Shivaji College of Arts, Commerce & Science, Akola

गोषवारा :

भारत हा विकसनशील देश आहे भारताची आर्थिक स्थिती सुधारण्यासाठी त्याचा सर्वांगीण क्षेत्रातून विकास होणे गरजेचे असते. भारताच्या अर्थव्यवस्थेतील कृषी क्षेत्र व सेवा क्षेत्रांचा विकास होणे गरजेचे असते PMMY योजनेद्वारे नवउद्योजकांना सहजरित्या कर्ज पुरवठा होऊन त्यातून उद्योगांच्या वाढीमुळे नवनवीन रोजगार साठी निर्मिती होण्यास मदत होते या रोजगार निर्मितीमुळे सामान्यांच्या आर्थिक स्थितीत हळूहळू सुधारणा होत असते व त्यांच्या राहणीमानाचा दर्जा ही सुधारला जातो. याचा सदर संशोधनात अभ्यास करता येणार आहे. मुद्रा योजनेअंतर्गत कर्ज देण्यासाठी आरबीआय बँकेच्या अखत्यारित सि.डी.बी ही बँक उप-कंपनी म्हणून कार्य करते. व कोणत्याही प्रकारची संपत्ती तारण न ठेवता नवीन उद्योगांना रोजगार निर्मितीसाठी व जुन्या उद्योगांचा विस्तार करण्यासाठी कर्ज देते यासाठी सदरील संशोधक कार्य सामान्यांना उद्योगांसाठी प्रोत्साहन देण्याचे कार्य करण्यास हातभार लावते.भारताच्या आर्थिक विकासात प्रधानमंत्री मुद्रा योजनेचे योगदान या अभ्यास संशोधन लेखनातून निदर्शनात येणार आहे.

की वर्ड : लघु उद्योग, भारतीय अर्थव्यवस्था, औद्योगिक धोरण, प्रधानमंत्री मुद्रा योजना

प्रस्तावना:

भारत हा विकसनशील देश आहे. भारताच्या आर्थिक क्षेत्रात वाढ होण्यासाठी कृषी क्षेत्र औद्योगिक व सेवा क्षेत्रांचा विकास होणे गरजेचे असते देशाच्या एकूण अर्थव्यवस्थेचा विकास करावयाचा असेल तर उद्योग क्षेत्राच्या विकासाशिवाय गत्यंतर नाही, कारण उद्योग क्षेत्राचा विकास हा इतर क्षेत्राच्या तुलनेत जास्त व लवकर होत असतो. देशाच्या एकूणच अर्थकारणामध्ये अलीकडच्या काळात वाढलेल्या लघु उद्योगांचे योगदान नजरेआड करून चालणार नाही. लघु उद्योगाची ही अफाट क्षमता लक्षात घेता प्रधानमंत्री या सर्व नवउद्योगांच्या सक्षमीकरणासाठी मुद्रा बँकेच्या माध्यमातून वित्तीय आधाराचा एक प्रकारचा बूस्ट देऊ केले आहे.

लघु व कुटीर उद्योगांच्या वित्तीय साहाय्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मुद्रा बँक योजना जाहीर केली उद्योजकास अर्थसाह्य म्हणजे सहजगत्या कर्ज पुरवठा PMMY योजनेमार्फत केला जातो अशा कर्ज पुरवठ्यातून सामान्यांना उद्योग स्थापन करून त्यातून रोजगार निर्मिती करण्याची संधी व प्रेरणा मिळते.भारतातील तरुणांना प्रोत्साहित करून उद्योजक होण्याकडे प्रेरित करण्यासाठी ही योजना महत्वपूर्ण ठरते या योजनेद्वारे देशाच्या आर्थिक स्थितीत वाढ होण्यास निश्चितच हातभार लागतो प्रधानमंत्री मुद्रा योजना ही माननीय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 8 एप्रिल 2015 रोजी सु केलेली योजना आहे बिगर को-ऑपरेटिव्ह बिगर शेती लघु किंवा सूक्ष्म उद्योगांना रुपये 10 लाखाचे कर्ज PMMY या अंतर्गत मुद्रा कर्ज म्हणून वर्गीकृत आहेत ही कर्ज व्यावसायिक बँक RRB लघु वित्तीय बँकMFI आणि NBFC द्वारे दिली जातात. कर्जादारावर नमूद केलेल्या कोणत्याही कर्ज देणाऱ्या संस्थांशी संपर्क साधू शकतो. किंवा www.udyamimitra.in या पोर्टल द्वारे ऑनलाईन अर्ज करू शकतो. PMMY च्या आश्रयाने mudra

ने लाभार्थी सूक्ष्म युनिट किंवा उद्योजकांच्या वाढीचा किंवा विकासाचा हप्ता आणि निधीच्या गरजा दर्शवण्यासाठी शिशु किशोर आणि तरुण हे तीन उत्पादने तयार केली आहेत.

"मायक्रो इन डेव्हलपमेंट अँड रिफायनान्स एजन्सी लि." मुद्रा ही एक एन. बी. एफ. सी आहे जी देशातील सूक्ष्म उद्योग क्षेत्राच्या विकासाला मदत करते.

- शिशु - 5000 रु.पर्यंतचे कर्ज कव्हर करणे.
- किशोर- 5000 ते पाच लाखापर्यंत चे कर्ज कव्हर करणे.
- तरुण-5लाख ते रुपये 10 लाखापर्यंतचे कर्ज कव्हर करणे.

नवीन पिढीच्या इच्छुक उद्योजकतेला चालना देण्याच्या उद्देशाने हे सुनिश्चित केले जाते की, शिशु श्रेणी युनिट आणि नंतर किशोर आणि तरुण श्रेणीवर अधिक लक्ष केंद्रित केले जाईल.शिशु किशोर आणि तरुण अंतर्गत सूक्ष्म उद्योग क्षेत्राचा विकास आणि वाढीच्या चौकटीत आणि एकूण उद्दिष्टात मुद्रा द्वारे ऑफर केलेली उत्पादने विविध तंत्र किंवा व्यवसाय क्रियाकलाप तसेच उद्योजक विभागाच्या गरजा पूर्ण करण्यासाठी अशा प्रकारे डिझाईन केलेले आहे.

संशोधन पद्धती- प्रस्तुत संशोधन लेखात प्राथमिक तसेच दुय्यम पद्धतीच्या सहाय्याने तथ्य संकलन केले जाणार आहेत. व त्या तथ्याचे विश्लेषण करण्यासाठी योग्य असेल त्या चाचणीचा अवलंब केला जाणार आहे, त्याचबरोबर तथ्याचे विश्लेषण करण्यासाठी सरासरी टक्केवारी आलेख इत्यादी संख्या तंत्राचा वापर करण्यात येणार आहे.

प्रधानमंत्री मुद्रा योजना (PMMY) ही भारत सरकारने 8 एप्रिल 2015 रोजी केलेली एक सुरू महत्त्वाकांक्षी योजना आहे, जी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना (MSME) आर्थिक मदत करण्यासाठी आहे. या योजनेचा उद्देश लघु व्यवसायांना प्रोत्साहन देणे, स्वरोजगार निर्माण करणे आणि उद्योजकतेला चालना देणे आहे.

अभ्यासाची उद्दिष्टे:

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत.

1. प्रधानमंत्री मुद्रा योजनेअंतर्गत सुरू झालेल्या व्यवसायाचा आढावा घेणे.
2. प्रधानमंत्री मुद्रा योजनेअंतर्गत व्यवसाय करणाऱ्या उद्योजकांच्या आर्थिक स्थितीत होणाऱ्या बदलांचा अभ्यास करणे.
3. प्रधानमंत्री मुद्रा योजना अंतर्गत सुरू झालेला व्यवसाय जिल्ह्यांच्या आर्थिक विकासात मदतीचे ठरतात याचा अभ्यास करणे.
4. प्रधानमंत्री मुद्रा योजनेअंतर्गत व्यवसाय करणाऱ्या उद्योजकांच्या समस्या चा अभ्यास करणे

प्रधानमंत्री मुद्रा योजनेचे स्वरूपः

1. उद्दिष्टे:

लघु, सूक्ष्म आणि मध्यम उद्योगांना (MSME) वित्तीय मदत पुरवणे. बेरोजगारी कमी करणे व उद्योजकतेला प्रोत्साहन देणे. ग्रामीण आणि शहरी भागांमध्ये व्यवसायिक विकास करणे.

2. मुद्रा कर्जाची श्रेणी:

शिशुः ₹50,000 पर्यंतचे कर्ज.

किशोर: ₹50,001 ते ₹5 लाख पर्यंतचे कर्ज.

तरुण: ₹5 लाख ते ₹10 लाख पर्यंतचे कर्ज.

3. कर्जाची व्याजदरः

व्याजदर संस्था आणि बँकांद्वारे निश्चित केली जाते, जी साधारणतः 8% ते 12% असते

4. गिरवी ठेव नाही:

या योजनेत कर्जासाठी कोणत्याही प्रकारचे जामीन किंवा संपत्ती गहाण ठेवण्याची आवश्यकता नाही.

5. कर्ज अर्ज प्रक्रिया:

बँका, मायक्रोफायनान्स संस्था किंवा NBFC (गैर-बँकिंग वित्तीय संस्था) यांच्या मार्फत अर्ज करता येतो.

प्रधानमंत्री मुद्रा योजनेची व्याप्ती:

1. लक्ष्य गट:

लघु व्यवसाय करणारे, महिला उद्योजक, दुकानदार, हस्तकला करणारे, छोटे उत्पादक व सेवा पुरवठादार.

2. गैर-कृषी क्षेत्र :

योजना मुख्यतः : गैर-कृषी क्षेत्रावर केंद्रित आहे, पण कृषी संबंधित काही उपक्रम, जसे की डेअरी, पोल्ट्री, मधमाशी पालन यांना देखील यात समाविष्ट केले आहे.

3. मुख्य क्षेत्र:

उत्पादन, व्यापार, सेवा उद्योग, खाद्य प्रक्रिया, हस्तकला, वाहन दुरुस्ती, छोट्या उद्योगांचे व्यवस्थापन.

4. महिलांना प्रोत्साहन:

महिलांसाठी विशेष सवलती दिल्या जातात, ज्यामुळे महिला उद्योजकतेला चालना मिळते.

5. रोजगार निर्मिती:

लघु व्यवसाय व स्वरोजगाराच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्माण केला जातो उपलब्धी (2023 पर्यंत): लाखो छोटे उद्योजक व व्यावसायिकांना आर्थिक मदत मिळाली आहे.

महिलांसाठी जाती / जमातींसाठी विशेष प्राधान्य. ग्रामीण व शहरी भागात लघु उद्योगांना चालना मिळाली. प्रधानमंत्री मुद्रा योजना लघु उद्योगांना आर्थिक पाठबळ देण्यासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे, ज्यामुळे भारतीय अर्थव्यवस्था अधिक मजबूत होत आहे.

मुद्रा कर्जाचा उद्देश- मुद्रा कर्ज विविध उद्देशासाठी विस्तारित केले जाते ज्यामुळे उत्पन्न आणि रोजगार निर्मिती होते कर्ज मुख्याता यासाठी वाढवले जाते.

1. विक्रेते व्यापारी दुकानदार आणि इतर सेवा क्षेत्रातील क्रियाकलपासाठी व्यवसाय कर्ज दिले जातात
2. मुद्रा कार्ड द्वारे कार्यात भांडवल कर्ज
3. सूक्ष्म युनिट साठी उपकरणे कर्ज
4. वाहतूक वाहन कर्ज फक्त व्यावसायिक वापरासाठी
5. ट्रॅक्टर टिलर तसेच दुचाकी कर्ज फक्त व्यावसायिक कारणासाठी वापरल्या जातात
6. कृषी संलग्न बिगर शेती उत्पन्न देणाऱ्या उपक्रमासाठी कर्ज उदा. मत्स्यपालन मधुमक्षिका पालन कुक्कुटपालन

Mudra कर्ज अंतर्गत कव्हर करता येणाऱ्या क्रियाकलपाची उदाहरणात्मक यादी खालील प्रमाणेः

1. वाहतूक वाहनः

ऑटोरिक्षा लहान मान वाहतूक वाहने तीन चाकी रिक्षा टॅक्सी इत्यादी माल आणि प्रवाशांच्या वाहतुकीसाठी वाहतूक वाहनांची खरेदी फक्त व्यावसायिक कारणासाठी वापरलेले ट्रॅक्टर / ट्रली/ पावर टिलर देखीलPMMY अंतर्गत मदतीसाठी पात्र आहे व्यावसायिक कारणासाठी वापरल्या जाणाऱ्या दुचाकी देखील PMMY अंतर्गत कव्हरेजसाठी पात्र आहेत.

2. सामुदायिक सामाजिक आणि वैयक्तिक सेवा:

उपक्रम-सलून ब्युटी पार्लर व्यायामशाळा बुटीक टेलरिंग दुकाने ड्रायक्लिनिंग सायकल आणि मोटरसायकल दुरुस्तीची दुकाने डीटीपी आणि फोटोकॉपी सुविधा कुरिअर एजंट इत्यादी

3. अन्न उत्पादन क्षेत्रे:

पापड बनवणे आचार बनवणे जाम किंवा जेली बनवणे. ग्रामीण स्तरावर कृषी उत्पादनाचे जतन करणे मिठाईची दुकाने लहान सेवा खाद्यपदार्थांचे स्टॉल आणि दैनंदिन सेवा कोल्ड चेन वाहने कोल्ड स्टोरेज बर्फ बनवण्याचे युनिट आईस्क्रीम यासारखी उपक्रम युनिट बनवणे बिस्किट ब्रेड बनवणे इ.

4. कापड उत्पादन क्षेत्रः

हातमाग यंत्रमाग खादी क्रिया कला जरी आणि जरदोरीवर पारंपारिक भरतकाम आणि हातकाम पारंपारिक रंग आणि छपाई कपडे डिझाईन विणकाम कॉटन जिनिंग संगणकृत भरतकाम शिलाई आणि इतर कापड विणलेली वस्त्र उत्पादने जसे की पिशव्या वाहन उपकरणे इत्यादी

5. व्यापारी आणि दुकानदारांसाठी व्यावसायिक कर्ज:

व्यक्तींना त्याची दुकाने किंवा व्यापार आणि व्यावसायिक उपक्रम किंवा सेवा उपक्रम आणि लाभार्थी कर्जाच्या आकारमानासह बिगर शेती उत्पन्न देणारे उपक्रम चालवण्यासाठी आर्थिक सहाय्य म्हणून रुपये 10 लाख प्रती कर्जदारांना कर्ज दिले जाते. सूक्ष्म युनिटीसाठी उपकरणे वित्तीय योजना- रुपये दहा लाख पर्यंतच्या प्रती लाभार्थी कर्जाच्या आवश्यक यंत्रसामग्री किंवा उपकरणे खरेदी करून सूक्ष्म उपक्रमाची स्थापना करणे.

शेतीशी निगडित उपक्रमः

शेतीशी संबंधित उपक्रम उदाहरणार्थ मत्स्यपालन मधुमक्षिका पालन कुकुट पालन पशुपालन प्रतवारी वर्गीकरण एकत्रिकरण कृषी उद्योजक डायरी कृषी व्यवसाय केंद्र अन्न आणि कृषी प्रक्रिया इत्यादी (पीक कर्ज वगळून जमीन सुधारण्यासाठी जसे की कालवे सिंचन आणि विहिरी) आणि त्यांना आधार देणाऱ्या सेवा उत्पन्न वाढवतात ते सर्व PMMY अंतर्गत कव्हरेजसाठी पात्र असतात.

मुद्रा कार्डः मुद्रा कार्ड हे कर्जाच्या खेळत्या भांडवलाच्या भागासाठी मुद्रा कर्ज खात्यावर जारी केलेले डेबिट कार्ड आहे कर्जदार मुद्रा कर्जाचा वापर एकाधिक ड्रॉ क्रेडिट मध्ये करू शकतो जेणेकरून खेळत्या भांडवलाच्या मर्यादा की कीफायतशीर पद्धतीने व्यवस्थापित करता येईल आणि व्याजाचा बोजा कमीत कमी ठेवता येईल मुद्रा क मुद्राव्यवहाराचे डिजिटल लायजेशन आणि कर्जदारांसाठी क्रेडिट इतिहास तयार करण्यात देखील मदत करते मुद्राकाळ कोणत्याही एटीएम किंवा मायक्रो एटीएम मधून पैसे काढण्यासाठी कोणत्याही पॉईंट ऑफ सेल मिशनद्वारे पैसे काढण्यासाठी देशभरात ऑपरेट केले जाऊ शकते.

मुद्रा योजनेची वैशिष्ट्ये:

1. देशातील 5.77 कोटी उद्योजकांना वित्त सहाय्य

2. वार्षिक ७ टक्के दराने १० लाखा रुपयापर्यंत अर्थ पुरवठा
3. 20000 कोटींचे सरकारचे भांडवली पाठबळ
4. फिर भी ची ही उप कंपनी रिझर्व बँकेच्या आखत्यारित येते
5. सूक्ष्म वित्त संस्थे व्यतिरिक्त बँके करिता स्वतंत्र विधायक

मुद्रा लोन साठी आवश्यक बाबी:

1. कोणत्याही प्रकारचे मॉर्गेज ठेवावे लागत नाही.
2. स्वतःचे १० टक्के भाग भांडवलाची गरज नाही.
3. ही योजना फक्त सरकारी बँकेतच मिळते.
4. अर्जदार कोणत्याही बँकेचा थकबाकीदार नसावा.

लघु उद्योजकांच्या विकासात प्रधानमंत्री मुद्रा योजनेच्या उपाययोजनाः

लघु उद्योजकांच्या व्यवसायाला चालना देण्यासाठी प्रधानमंत्री मुद्रा योजना (PMMY) उपयुक्त आहे. मात्र, या योजनेचा लाभ सर्व लघु उद्योजकांपर्यंत पोहोचवण्यासाठी काही उपाययोजना राबविणे आवश्यक आहे. योजनेची प्रभावी अंमलबजावणी आणि **सुधारणा यासाठी खालील उपाययोजना महत्त्वाच्या आहेत:**

1. माहिती आणि जनजागृती:

योजनेबद्दल प्रचारः लघु उद्योजकांना योजना आणि तिच्या लाभांविषयी माहिती देण्यासाठी गावागावांमध्ये जनजागृती शिबिरे आयोजित करावीत.

डिजिटल प्रचारः डिजिटल माध्यमे, जसे की सोशल मीडिया, वेबसाइट्स आणि ॲप्सद्वारे योजनेची माहिती अधिक लोकांपर्यंत पोहोचवावी.

2. कर्ज प्रक्रियेची सुलभताः

सोप्या प्रक्रियेसाठी तंत्रज्ञानाचा वापर : ऑनलाइन कर्ज अर्ज प्रक्रिया अधिक सोपी आणि पारदर्शक करावी. अर्जदारांसाठी एकच विंडो सुविधा उपलब्ध करून द्यावी

कागदपत्रे कमी करणे : कर्ज मिळवण्यासाठी लागणाऱ्या कागदपत्रांची संख्या कमी करावी आणि प्रक्रिया जलद करावी.

प्रशिक्षण आणि कौशल्य विकासः

व्यवसाय व्यवस्थापन प्रशिक्षण: लघु उद्योजकांसाठी व्यवसाय कसे चालवायचे याविषयी प्रशिक्षण कार्यक्रम राबवावेत.

तांत्रिक प्रशिक्षण: उद्योजकांना आधुनिक तंत्रज्ञान, डिजिटल साधने, ई-कॉमर्स आणि उत्पादन तंत्रज्ञान याबद्दल मार्गदर्शन करावे.

ग्रामीण आणि दुर्गम भागावर विशेष लक्ष ग्रामीण उद्योजकांना प्रोत्साहन : ग्रामीण आणि दुर्गम भागातील लघु उद्योजकांना कर्ज देण्याची प्राधान्यक्रम सूची तयार करावी.

सुविधा आणि संसाधने: ग्रामीण भागात व्यवसायासाठी लागणाऱ्या सुविधा, जसे की वीज, पाणी, वाहतूक इत्यादींची व्यवस्था करावी.

1. महिला उद्योजकांसाठी विशेष सवलती:

महिला उद्योजकांना कर्जावर विशेष सवलती, कमी व्याजदर, आणि कर्ज परतफेडीसाठी लवचिक नियम लागू करावेत. महिला बचत गट: महिला बचत गटांना मुद्रा योजनेंतर्गत एकत्रित कर्ज उपलब्ध करून द्यावे.

2. कर्ज परतफेडीची लवचिकता:

लघु उद्योजकांना व्यवसायाची गती वाढेपर्यंत परतफेडीसाठी अधिक कालावधी द्यावा. आर्थिक संकट असलेल्या उद्योजकांना परतफेडीसाठी मदतीचे पर्याय द्यावेत.

3. तांत्रिक आणि आर्थिक सहाय्य:

प्रत्येक जिल्ह्यात उद्योजकांसाठी मार्गदर्शन आणि सहाय्य केंद्रे उभारावीत. सल्लागार सेवा: व्यवसायाचे नियोजन, कर्ज व्यवस्थापन, आणि विस्तार यावर सल्ला देण्यासाठी सल्लागार नियुक्त करावेत.

4. बँकांचा सहभाग वाढवणे:

बँकांना अधिकाधिक कर्ज वाटप करण्यासाठी प्रोत्साहन दिले जावे. बँकांनी लघु उद्योजकांसाठी वेगवेगळ्या कर्ज योजना तयार कराव्यात.

5. फसवणूक टाळणे:

कर्ज वितरण प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा उपयोग करावा. कर्ज प्रक्रियेतील कोणत्याही अडचणीसाठी तक्रार निवारणासाठी प्रभावी यंत्रणा स्थापन करावी.

6. योजनेच्या प्रगतीवर नियमित निरीक्षण:

योजनेच्या प्रगतीचे नियमित परीक्षण करून सुधारणा करण्यासाठी उपाययोजना राबवाव्यात. डेटा विश्लेषण: कर्ज घेणाऱ्यांचा डेटा गोळा करून त्यांच्या व्यवसायाच्या यशाची टक्केवारी तपासावी आणि यशस्वी उपक्रमांना प्रोत्साहन द्यावे.

निष्कर्ष :

मुद्रा योजना लघु उद्योजकांसाठी महत्त्वाची असून तिचा अधिक प्रभावी उपयोग करण्यासाठी वरील उपाययोजना राबविल्यास व्यवसायांना भांडवलाची चांगली सुविधा मिळेल. तसेच, रोजगार निर्मिती, महिला सक्षमीकरण आणि स्थानिक विकासाला गती मिळेल.

संदर्भ सूची:

1. संशोधन पद्धती वि. भा. पाटील
2. बोधनकार सुधीर अलोणी विवेक, सामाजिक संशोधन पद्धती, प्रकाशक ललिता पुराणिक, श्री साईनाथ प्रकाशन नागपूर, द्वितीय आवृत्ती १९९९
3. www.mudra.org.in
4. web.umang.gov.in
5. pmmodiyojna.in
6. www.wikipedia.org
7. mr.vikaspedia.in

डिजिटल मार्केटिंगमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (AI) वापरामुळे निर्माण होणाऱ्या संधी आणि आव्हाने

डॉ. आकाश प्रदीप बिडवई
M.com, B.ed, Ph.D
(वाणिज्य व व्यवस्थापन)

सारांश

प्रस्तुत शोधनिबंधात डिजिटल मार्केटिंगमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) च्या वापरामुळे निर्माण होणाऱ्या संधी आणि आव्हानांची चिकित्सा करण्यात आलेली आहे. डिजिटल तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे विपणन क्षेत्रात मोठे परिवर्तन घडून आले असून AI ही या परिवर्तनाची प्रमुख शक्ती ठरली आहे. AI आधारित तंत्रज्ञानाच्या साहाय्याने ग्राहकांचा डेटा विश्लेषित करणे, ग्राहक वर्तन समजून घेणे, वैयक्तिकृत जाहिराती सादर करणे आणि ग्राहक सेवा अधिक प्रभावी करणे शक्य झाले आहे. त्यामुळे डिजिटल मार्केटिंग अधिक अचूक, वेगवान आणि ग्राहक-केंद्रित बनले आहे. तथापि, डेटा गोपनीयता, सुरक्षितता, नैतिकता, तांत्रिक खर्च आणि मानवी सहभागाशी संबंधित अनेक आव्हानेही समोर आली आहेत. या संशोधनातून असे निष्कर्ष निघतात की, AI चा संतुलित व जबाबदार वापर केल्यास डिजिटल मार्केटिंगच्या क्षेत्रात शाश्वत विकास साधता येऊ शकतो. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) संबंधित इत्यादी पैलूंचा या अभ्यासात विचार करण्यात आला आहे.

कीवर्ड्स: डिजिटल तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल मार्केटिंग आणि कृत्रिम बुद्धिमत्ता, ग्राहक वर्तन, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि मार्केटिंग -संधी आणि आव्हाने

प्रस्तावना

डिजिटल तंत्रज्ञानाच्या वेगवान प्रगतीमुळे विपणन क्षेत्रात आमूलाग्र परिवर्तन घडून आले आहे. पारंपरिक विपणन पद्धतींच्या तुलनेत डिजिटल मार्केटिंग अधिक परिणामकारक, वेगवान आणि ग्राहक-केंद्रित ठरत आहे. इंटरनेट, स्मार्टफोन आणि सोशल मीडिया यांच्या व्यापक वापरामुळे ग्राहकांचे वर्तन, गरजा आणि अपेक्षा समजून घेणे अधिक सुलभ झाले आहे. या डिजिटल परिवर्तनात कृत्रिम बुद्धिमत्ता (Artificial Intelligence–AI) ही एक महत्त्वाची आणि क्रांतिकारक शक्ती म्हणून उदयास आली आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असलेल्या डेटाचे अचूक विश्लेषण करणे, ग्राहकांच्या आवडी-निवडी ओळखणे आणि वैयक्तिकृत जाहिराती सादर करणे शक्य झाले आहे. चॅटबॉट्स, मशीन लर्निंग, प्रेडिक्टिव्ह ॲनालिटिक्स यांसारख्या तंत्रज्ञानामुळे ग्राहक सेवा आणि विपणन धोरणे अधिक प्रभावी झाली आहेत. तथापि, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढत्या वापरामुळे डेटा गोपनीयता, नैतिकता आणि मानवी हस्तक्षेपाशी संबंधित काही गंभीर आव्हानेही निर्माण होत आहेत.

संशोधनाची उद्दिष्टे

1. डिजिटल मार्केटिंगमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापराचे स्वरूप समजून घेणे.
2. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरामुळे डिजिटल मार्केटिंग क्षेत्रात निर्माण होणाऱ्या प्रमुख संधींचा अभ्यास करणे.
3. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरामुळे उद्भवणाऱ्या आव्हानांचे विश्लेषण करणे.
4. डिजिटल मार्केटिंगच्या भविष्यात AI ची भूमिका स्पष्ट करणे.

संशोधन पद्धती

या शोधनिबंधासाठी द्वितीयक माहितीचा आधार घेतला आहे. यामध्ये शासकीय अहवाल, अर्थसंकल्प, आर्थिक सर्वेक्षण, संशोधन लेख, वृत्तपत्रीय माहिती व नामांकित लेखकांचे ग्रंथ यांचा उपयोग केला आहे. प्रस्तुत संशोधनासाठी

वर्णनात्मक, विश्लेषणात्मक आणि तुलनात्मक अशा मिश्र संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. यामध्ये पुस्तके, संशोधन लेख, नियतकालिके, अहवाल, संकेतस्थळे आणि डिजिटल माध्यमांतील उपलब्ध माहितीचा समावेश आहे.

डिजिटल मार्केटिंगमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर

डिजिटल मार्केटिंगमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर विविध स्वरूपात प्रभावीपणे होताना दिसतो. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञानाच्या सहाय्याने ग्राहकांचा मोठ्या प्रमाणावरील डेटा संकलित करून त्याचे सखोल आणि अचूक विश्लेषण करता येते. या विश्लेषणातून ग्राहकांच्या आवडी-निवडी, खरेदीची सवय आणि वर्तन पद्धती ओळखणे शक्य होते. त्याच्या आधारे वैयक्तिकृत जाहिराती तयार करून योग्य ग्राहकांपर्यंत योग्य वेळी पोहोचवता येतात. ई-मेल मार्केटिंगमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ताद्वारे स्वयंचलित संदेश प्रणाली, योग्य वेळेचे नियोजन आणि प्रतिसादांचे विश्लेषण केले जाते. सोशल मीडिया व्यवस्थापनात कंटेंट शेड्युलिंग, ट्रेंड विश्लेषण आणि ग्राहक प्रतिसादांचे मूल्यांकन AI मुळे अधिक सुलभ झाले आहे. सर्च इंजिन ऑप्टिमायझेशन (SEO) मध्ये कीवर्ड विश्लेषण व वेबसाइट रँकिंग सुधारण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता उपयुक्त ठरते. तसेच चॅटबॉट्सच्या माध्यमातून 24x7 ग्राहक सेवा देणे शक्य झाले असून त्यामुळे ग्राहक समाधानात वाढ झाली आहे.

तक्ता क्र.1.1

डिजिटल मार्केटिंगमध्ये झालेली वाढ

अ.क्र.	आर्थिक वर्ष	वाढ (अब्ज अमे.डॉलरमध्ये)	वाढीचे प्रमाण
1	2020-21	2.39	09.39%
2	2021-22	2.71	13.39%
3	2022-23	3.99	47.23%
4	2023-24	5.07	27.07%
5	2024-25	6.46	27.44%

स्त्रोत- वित्त मंत्रालय, भारत सरकार, आर्थिक पाहणी अहवाल 2020-2025

वरील तक्त्यावरून स्पष्ट होते की 2020–25 मध्ये डिजिटल मार्केटिंग उद्योगात सातत्याने सकारात्मक वाढ झाली आहे. तर 2022–23 मध्ये वाढीचा सर्वात मोठा टप्पा (47%) पाहायला मिळाला, ज्याचा मुख्य कारण डिजिटल जाहिरात खर्चाचा वाढता ट्रेंड आणि ऑनलाईन ग्राहक व्यवहारातील वाढ आहे. नंतरच्या वर्षांतही वाढ (27%) सुसंगत राहिली आहे. यावरून असे दर्शविते की डिजिटल मार्केटिंगचा प्रभाव व्यवसायांच्या धोरणांमध्ये स्थिरपणे वाढत आहे. AI, सोशल मीडिया, डेटा-ड्रिव्हन मार्केटिंग आणि मोबाइल जाहिराती हा वाढीचा प्रमुख घटक ठरत आहे.

आलेख क्र.1.1

डिजिटल मार्केटिंगमध्ये झालेली वाढ



एकंदरीत, डिजिटल मार्केटिंग क्षेत्र भविष्यातही प्रगतीच्या मार्गावर आहे आणि व्यवसायांसाठी हे एक महत्त्वाचे धोरणात्मक साधन बनले आहे.डिजिटल मार्केटिंगमध्ये सातत्याने वाढ होत असून व्यवसाय ऑनलाइन प्लॅटफॉर्मवर आपली उपस्थिती वाढवत आहेत. खालील वर्षांमध्ये मोबाईल, सोशल मीडिया आणि ऑनलाईन जाहिरात हे प्रमुख वाढीचे स्रोत बनले आहेत. विशेषत्वाने COVID-19 महामारीनंतर डिजिटल माध्यमाचा वापर वाढला, ज्यामुळे कंपन्यांनी ऑनलाईन मार्केटिंगवर खर्च वाढवला. AI आणि डेटा ॲनालिटिक्समुळे युजर-केंद्रित जाहिराती अधिक प्रभावी ठरल्या असल्याचेही दिसून येते. जागतिक डिजिटल मार्केटिंग उद्योग पुढील काही वर्षांतही जलद वाढताना दिसेल, जवळपास CAGR 13–20% पर्यंत अपेक्षित असू शकते.

सोशल मीडिया मार्केटिंगमध्ये एआयची भूमिका: आधुनिक डिजिटल इकोसिस्टममध्ये सोशल मीडिया मार्केटिंगमध्ये आर्टिफिशियल इंटेलिजेंसची भूमिका वाढत्या प्रमाणात महत्त्वाची बनली आहे. सोशल मीडिया प्लॅटफॉर्म मूलभूतपणे एआय द्वारे चालविल्या जाणाऱ्या अल्गोरिदमवर काम करतात. हे अल्गोरिदम वापरकर्ते त्यांच्या फीडवर काय पाहतात, कोणत्या जाहिराती त्यांच्यासाठी सर्वात संबंधित आहेत आणि प्रदेश आणि लोकसंख्याशास्त्रात सामग्री कशी ट्रेंड करते हे निर्धारित करण्यास मदत करतात. मोठ्या प्रमाणात वापरकर्त्याने तयार केलेल्या डेटा लाइक्स, टिप्पण्या, शेअर्स आणि व्ह्यूइंग पॅटर्नवर प्रक्रिया करून एआय सिस्टम मार्केटर्सना प्रेक्षकांच्या वर्तन आणि प्राधान्यांमध्ये खोल अंतर्दृष्टी मिळविण्यास मदत करतात. एआय ब्रँड्सना डेटा-चालित धोरणे तयार करण्यास सक्षम करते जे योग्य वेळी योग्य प्रेक्षकांना योग्य संदेश देतात

डिजिटल मार्केटिंगमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) मुळे निर्माण होणाऱ्या संधी

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वापरामुळे डिजिटल मार्केटिंग क्षेत्रात विविध नवीन संधी निर्माण झाल्या आहेत. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) च्या साहाय्याने मोठ्या प्रमाणातील डेटाचे वेगवान व अचूक विश्लेषण करणे शक्य झाले असून त्यामुळे ग्राहकांचे वर्तन, गरजा आणि अपेक्षा अधिक सखोलपणे समजून घेता येतात. या विश्लेषणावर आधारित वैयक्तिकृत जाहिराती तयार केल्यामुळे ग्राहकांचा सहभाग लक्षणीयरीत्या वाढतो आणि विक्रीतही सकारात्मक बदल दिसून येतो. चॅटबॉट्स व व्हर्च्युअल असिस्टंट्सच्या माध्यमातून चोवीस तास ग्राहक सेवा उपलब्ध झाल्याने ग्राहक समाधानात वाढ झाली आहे. तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित ऑटोमेशनमुळे विपणन मोहिमा अधिक नियोजनबद्ध, प्रभावी आणि खर्चिकदृष्ट्या परवडणाऱ्या ठरत आहेत. योग्य वेळी योग्य ग्राहकांपर्यंत जाहिराती पोहोचविणे शक्य झाल्याने संसाधनांचा कार्यक्षम वापर होतो. एकूणच, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) मुळे डिजिटल मार्केटिंग अधिक परिणामकारक, स्पर्धात्मक आणि ग्राहक-केंद्रित बनले आहे.

डिजिटल मार्केटिंगमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) मुळे निर्माण होणारी आव्हाने

डिजिटल मार्केटिंगमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या वाढत्या वापरामुळे अनेक संधी निर्माण झाल्या असल्या तरी काही गंभीर आव्हानेही उद्भवली आहेत. एआय-आधारित सोशल मीडिया मार्केटिंगमध्ये डेटा गोपनीयता ही सर्वात महत्त्वाची नैतिक समस्या आहे. वापरकर्त्यांच्या आवडी, स्थान आणि ऑनलाइन वर्तन यासारख्या वैयक्तिक डेटाचे सतत संकलन आणि विश्लेषण अनेकदा स्पष्ट संमतीशिवाय केले जाते. यामुळे वापरकर्त्यांचे हक्क, डेटा मालकी आणि लक्ष्यित मार्केटिंगच्या नैतिक सीमांबद्दल प्रश्न निर्माण होतात. ग्राहकांच्या वैयक्तिक डेटाची सुरक्षितता आणि गोपनीयता हा सर्वात महत्त्वाचा प्रश्न ठरतो. मोठ्या प्रमाणावर डेटा संकलन व विश्लेषण केल्यामुळे डेटा गैरवापर, सायबर हल्ले आणि गोपनीयतेच्या उल्लंघनाचा धोका वाढतो. तसेच, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञानाची अंमलबजावणी खर्चिक असून त्यासाठी प्रशिक्षित मनुष्यबळ व तांत्रिक कौशल्यांची आवश्यकता असते, जी सर्व संस्थांना सहज उपलब्ध होत नाही. AI आधारित प्रणालींवर वाढते अवलंबित्व मानवी सर्जनशीलता आणि निर्णयक्षमतेवर मर्यादा आणू शकते. याशिवाय, ऑटोमेशनमुळे काही पारंपरिक रोजगार संधी कमी होण्याची शक्यता

आहे. नैतिकता, पारदर्शकता आणि जबाबदारीशी संबंधित प्रश्नही कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) च्या वापरामुळे अधिक गुंतागुंतीचे होत आहेत.

डिजिटल मार्केटिंगमधील कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) चे भविष्य: भविष्यात डिजिटल मार्केटिंगमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचे महत्त्व अधिकाधिक वाढताना दिसेल. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित ऑटोमेशनमुळे विपणन प्रक्रिया अधिक वेगवान, अचूक आणि कार्यक्षम होईल. प्रेडिक्टिव्ह ॲनालिटिक्सच्या साहाय्याने ग्राहकांच्या भविष्यातील गरजा, खरेदीची प्रवृत्ती आणि वर्तनाचा अंदाज घेणे शक्य होईल, ज्यामुळे विपणन धोरणे अधिक परिणामकारक ठरतील. व्हॉइस सर्च तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे ग्राहक आणि ब्रँड यांच्यातील संवाद अधिक सुलभ व नैसर्गिक होईल. तसेच ऑगमेंटेड रिॲलिटी (AR) आणि व्हर्च्युअल रिॲलिटी (VR) यांच्या माध्यमातून ग्राहकांना आभासी अनुभव देऊन उत्पादने सादर करण्याच्या नव्या संधी निर्माण होतील. तथापि, तंत्रज्ञानाच्या या प्रगतीबरोबरच मानवी मूल्ये, नैतिकता, पारदर्शकता आणि डेटा गोपनीयतेचे संरक्षण करणे अत्यावश्यक ठरेल. संतुलित आणि जबाबदार वापर केल्यास कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) डिजिटल मार्केटिंगच्या भविष्याला अधिक समृद्ध बनवू शकते.

निष्कर्ष: डिजिटल मार्केटिंगमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर ही आजच्या काळाची अनिवार्य गरज बनली आहे. मार्केटिंगच्या क्षेत्रात आर्टिफिशियल इंटेलिजेंस (एआय) एक गेम-चेंजर म्हणून उदयास आले आहे, जे मार्केटर्सना त्यांच्या प्रेक्षकांना समजून घेण्याचे, भाकित करण्याचे आणि त्यांच्याशी संवाद साधण्याचे नवीन मार्ग देते. ऑटोमेशन, प्रेडिक्टिव ॲनालिटिक्स आणि पर्सनलायझेशनद्वारे, एआय ब्रँड्सना अधिक संबंधित आणि प्रभावी मार्केटिंग अनुभव देण्यास सक्षम करते. ते कच्च्या डेटाचे कृतीशील अंतर्दृष्टीमध्ये रूपांतर करून निर्णय घेण्याची क्षमता वाढवते, ज्यामुळे व्यवसायांना वाढत्या डिजिटल मार्केटप्लेसमध्ये अधिक कार्यक्षमता आणि स्पर्धात्मकता प्राप्त करण्यास मदत होते. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञानामुळे विपणन प्रक्रिया अधिक अचूक, वेगवान आणि परिणामकारक झाल्याचे स्पष्टपणे दिसून येते. ग्राहकांच्या वर्तनाचे विश्लेषण करून त्यानुसार वैयक्तिकृत जाहिराती व धोरणे राबविणे शक्य झाल्याने ग्राहक-केंद्रित विपणनाला चालना मिळाली आहे. यामुळे ब्रँड आणि ग्राहक यांच्यातील संबंध अधिक दृढ होत आहेत. तथापि, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) च्या वाढत्या वापरामुळे डेटा सुरक्षितता, गोपनीयता, नैतिकता आणि मानवी सहभागाशी संबंधित काही गंभीर आव्हाने निर्माण झाली आहेत, जी दुर्लक्षित करता येणार नाहीत. तंत्रज्ञानावर अती अवलंबित्व टाळून मानवी निर्णयक्षमतेचा समतोल राखणे आवश्यक आहे. त्यामुळे AI चा संतुलित, जबाबदार आणि नियोजनबद्ध वापर केल्यास डिजिटल मार्केटिंगच्या क्षेत्रात कार्यक्षमता वाढून शाश्वत आणि समावेशक विकास साधता येईल.

संदर्भ ग्रंथ सूची

1. Kumar, V., & Gupta, S. (2016). The role of artificial intelligence in enhancing customer experience. Journal of Marketing, 80(3), 8-18.
2. Cutler, K.(2024).The evolution of digital marketing in the era of AI.Ap- plied Marketing Analytics,10(1), 617.
3. Gentsch, P. (2019). AI in marketing, sales, and service: How AI is changing the game. Springer.
4. Hassan, A. (2021). The Usage of Artificial Intelligence in Digital Market- ing: A Review. Education and Healthcare (Vol. 954, pp. 357383).
5. Davenport, T. H., Guha, A., Grewal, D., & Bressgott, T. (2020). How artificial intelligence will change the future of marketing. Journal of the Academy of Marketing Science, 48(1), 24-42.
6. Monaco, S., & Sacchi, G. (2025). Consumer Acceptance of AI in Market- ing. In R. Ladhari (Ed.), Encyclopedia of Artificial Intelligence in Market- ing (pp. 18).
7. Hasan, A., & Wong, S. (2021). AI in digital marketing: New trends and future directions. Journal of Interactive Advertising, 21(2), 128-140.

विद्यार्थांसाठी मोबाईल शाप की वरदान ?

प्रा. किशोर रामदास माळी

ग्रंथपाल – हस्ती पब्लिक स्कूल अँड ज्यू. कॉलेज, दोंडाईचा, ता. शिंदखेडा, जि. धुळे

२१ व्या शतकात विज्ञान आणि तंत्रज्ञानाने सर्वोच्च शिखर गाठले आहे. यामध्ये छोट्याश्या चिंगारीतून आगकाडीच्या शोधापासून ते आज एआय (Artificial Intelligence) पर्यंत मानवाने विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या साहाय्याने मजल मारली आहे. आज अनेक वस्तूंच्या शोधाने मानवाने आपले जीवन सुखमय केले आहे. त्यात मोबाईलचा शोधही अनेकांसाठी हितकारक आहे. आज आधुनिक युगात आपल्या हातातला मोबाईल अतिशय महत्वाची भूमिका बजावत आहे. आजघडीला मोबाईल आपल्या जीवनाचा अविभाज्य भाग बनला आहे. लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत प्रत्येकाच्या हातात मोबाईल दिसत असून प्रत्येक जण त्याच्यात व्यस्त आहे. मात्र दिवसेंदिवस मोबाईलचा शोध अनेक वेळेस हितकारक ऐवजी अपायकारक वाटत आहे. कारण आजची तरुण पिढी खासकरून विद्यार्थी एकवेळ जेवण भेटले नाही तरी चालेल. पण मोबाईल शिवाय राहतांना दिसून येत नाही. त्यामुळे विद्यार्थांसाठी मोबाईल शाप की वरदान? असा विचार करण्याची वेळ सर्वांसमोर आलेली आहे.

अँड्राईड स्मार्टफोनचा शोध लागण्याआधी – साधारणतः १९९५ साली भारतात मोबाईल सेवा सुरु झाली. त्यावेळेस विना वायर मोबाईल हँडसेटचे सर्वांना कुतूहल वाटायचे. कारण विनावायर मनुष्य एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी बॅलन्स (रिचार्ज) टाकून केव्हाही आणि कुठेही बोलत होता. अँड्राईड स्मार्टफोनचा शोध लागण्याआधी केवळ बोलणे आणि साधा मेसेज मनुष्य एकमेकांना पाठवीत होता. फार तर एखादा साधा खेळ त्याच्यात खेळू शकत होता. एकूणच अँड्राईड स्मार्टफोनचा शोध लागण्याआधी मनुष्य केवळ बोलणे आणि साधा मेसेज एकमेकांना पाठवू शकत होता.

साधारणतः २००८ ला मोबाईलमध्ये नवीन क्रांती घडून आली. २००८ मध्ये जगातील सर्वात जास्त वापरली जाणारी अँड्राईड ऑपरेटिंग सिस्टीम सुरु झाली. ही स्मार्टफोनसाठी सर्वात जास्त वापरली जाणारी ऑपरेटिंग सिस्टीम आहे. त्याच्यामध्ये सुधारित युझर इंटरफेस ॲपसाठी चांगला परफॉर्मन्स आणि अधिक चांगले व्यवस्थापन तसेच इंटरनेट, गेमिंग आणि इतर अनेक एप्लिकेशन्स वापरण्याची सोय आहे. त्यामुळे मोबाईलवर अनेक चांगल्या गोष्टी मनुष्य पाहू लागला. नवनवीन माहिती मिळवू लागला. मोबाईलवर केवळ कॉलिंग नाहीतर इंटरनेट, कॅमेरा, घड्याळ, गाणी ऐकणे, बँक व्यवहार करणे, तिकीट बुक करणे यासारख्या अनेक सुविधा उपलब्ध आहेत. व्हिडीओ कॉन्फरन्सद्वारे एकमेकांजवळ बोलू लागला. याचा सर्वात जास्त फायदा कोरोना काळात झाला. कोरोना काळात सर्व शाळा – महाविद्यालये बंद पडले, तेव्हा सर्वात जास्त अँड्राईड स्मार्टफोनचा फायदा विद्यार्थी आणि शिक्षकांना झाला. शाळा – महाविद्यालये बंद झाल्यामुळे मोबाईलमुळे विद्यार्थी झूम ॲप सारख्या ॲपवर आपले शिक्षण घेऊ लागले. सर्व कामे कोरोना काळात ठप्प झाले. मात्र ज्ञानदान आणि ज्ञान घेण्यचे काम मोबाईलमुळे अविरतपणे चालू होते.

डिजिटल ग्रंथालयात मोबाईलची भूमिका – आजच्या शैक्षणिक तंत्रज्ञानाच्या युगात आनंदायी शिक्षणात मोबाईलचा वापर वाढला आहे. मोबाईलमध्ये असलेल्या इंटरनेटच्या माध्यमातून गुगल, यूट्यूब, ब्लॉग्स, पावर पॉइंट प्रेझेंटेशन, विविध सॉफ्टवेअर तसेच विविध ॲप्सच्या माध्यमातून विद्यार्थी आनंददायी शिक्षण घेत आहेत. यामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीन विकासात हातभार लागत आहे. विद्यार्थी मोबाईलमध्ये असलेल्या इंटरनेटच्या माध्यमातून अनेक पुस्तके घरबसल्या सर्च करू शकतात. कोणत्या लेखकाने कोणती पुस्तके लिहिली आहेत. तेही मोबाईलमध्ये लगेच घरबसल्या ग्रंथालयात न जाता समजू शकते. आज युट्युबवर अनेक विषयांचे पाठ चित्रित केलेले आहेत. यामध्ये गणित, विज्ञान, इतिहास, व्याकरण यासारख्या अनेक विषयांचा समावेश आहे. ज्या विद्यार्थ्यांची गती शिक्षणात कमी आहे, असे विद्यार्थी हे साहित्य वारंवार पाहून आपले ध्येय निश्चित करू शकतात.

अनेक विद्यार्थी जे मोबाईलचा वापर इंटरनेट ब्राउझ करून त्यांच्या अभ्यासाच्या संबंधित साहित्य, माहिती शोधण्यासाठी स्मार्टफोनचा वापर करत असतात. अनेक संशोधन करणारे विद्यार्थी त्यांना हवी असणारी माहिती शोधून त्याचा उपयोग आपला प्रबंध लिखाणासाठी करीत असतात. स्पर्धा परीक्षा देणारे विद्यार्थी ऑनलाईन पेपरही सोडवितात. वेगवेगळ्या परीक्षा संबधी अभायास्क्रम, मागील प्रश्नपत्रिका यासाठी अनेक विद्यार्थी चांगल्या प्रकारे मोबाईलचा उपयोग करून घेतात.

मोबाईलचे फायदे - अँड्राईड स्मार्टफोनमुळे घरबसल्या अनेक गोष्टी करणे शक्य आहे. मनोरंजनासाठी आपण गाणी ऐकू शकतो, गेम खेळू शकतो, चित्रपट पाहू शकतो. मोबाईलमध्ये अलार्म, घड्याळ, कॅलेंडर, कॅलकूलेटर, नोटबुक इत्यादी गोष्टी असतात. म्हणून कुठेही या गोष्टी नेण्याची गरज नसते. मोबाईलमधील गुगल मॅप व GPS च्या मदतीने लांबच्या प्रवासात लोकेशन पाहणे सोयीचे होते. एखाद्याला पैसे पाठवायचे असल्यास बँकेत न जाता घरबसल्या एका खात्यातून दुसऱ्याच्या खात्यात पैसे पाठविता येतात. त्यमुळे वेळेची बचत होण्यास मदत होते. आजकाल मोबाईलच्या सहाय्याने ऑनलाईन वस्तुसोबत अन्नही आपण मागवू शकतो. विद्यार्थांना त्यांच्या अभ्यासा संबंधी माहिती शोधण्यासाठी जगातील सर्वात मोठ्या लायब्ररी इंटरनेटवर सहज प्रवेश मिळतो.

मोबाईलचे व्यसन - कोरोना काळ साधारणतः दोन वर्षे राहिला. मात्र तेव्हापासून विद्यार्थांना मोबाईलची सवय इतकी जडली आहे की, विद्याथ्यांना शाळा – महाविद्यालयात मोबाईल घेऊन जायची परवानगी नसतांनाही अनेक विद्यार्थी लपून - छपून मोबाईल घेऊ जात असतात. अनेक शाळा महाविद्यालये विद्यार्थांना व्हॉट्स ॲप गृपवर होमवर्क व शाळेसंबंधी इतर लिखाणाची कामे पाठवितात. त्यामुळे विद्यार्थांचा रोजचा संबंध मोबाईलशी येऊ लागला. अनेक विद्यार्थी शाळेसंबंधी मेसेज वा इतर ॲप मधून शैक्षणिक माहिती शोधण्या व्यतिरिक्त मोबाईलचा दुरुपयोग करतांना दिसून येतात. अनेक विद्यार्थी अभ्यासाच्या नावाखाली सतत मोबाईल हाताळून त्यांनी मोबाईलचे व्यसन लावून घेतले आहे.

अनेक विद्यार्थी तर स्वतः रील्स बनवितात. त्यामुळे त्यांच्या पालकांना ते चांगलेही वाटत असेल. मात्र रील्स बनवून तो अपलोड करण्याच्या कलेव्यतीरिक्त विद्यार्थांनी जे रील्स पाहायला नको ते रील्सही विद्यार्थी पाहत असतात. मोबाईल मधील अनेक दृश्ये, व्हिडीओ, रील्स पाहण्यासारखी नसतात. बहुतेक रील्समध्ये अनेक दृश्ये अश्लील असतात. ती विद्यार्थांनी पाहू नयेत एवढी लाजीरवाणी असतात. मात्र मोबाईल पाहतांना विद्यार्थांकडून कळत-नकळत त्यातील अश्लील व्हिडीओ पाहिली जातात. त्यामुळे विद्यार्थांच्या मनावर विपरीत परिणाम होत आहे. एकंदरीत मोबाईलमुळे तरुण पिढी बरबाद होतांना दिसत आहे. शिकण्याच्या वयात त्यांना मोबाईलचे व्यसन जडल्यामुळे त्यांचे आयुष्य उध्वस्त होतांना पालक स्वतः पाहत आहेत. अनेक शाळकरी विद्यार्थांना पालकांनी मोबाईल घेऊन दिले आहेत. ज्या वयात आपल्या मुलांनी शिक्षण घायचे. कठोर मेहनत करून आपले ध्येय गाठायचे. त्या वयात विद्यार्थीही अभ्यासाच्या नावाखाली मोबाईल घेऊन त्याचा वाईट दुरुपयोग करतांना दिसून येत आहेत. सध्या अनेक विद्यार्थी शाळेत जाण्यासोबत शाळा सुटल्यानंतरच्या वेळेत विवध ऑनलाईन क्लास लावतात. अनेक विद्यार्थी ऑनलाईन क्लासचा उपयोगही करून घेतात. मात्र बहुतांश विद्यार्थी केवळ नावाला ऑनलाईन क्लास लावून मोबाईलचा दुरुपयोग करत असतात. ग्रामीण भागात अनेक पालक अशिक्षित आहेत. म्हणून त्यांच्या जवळचा मोबाईल सर्वात जास्त काळ त्यांचे शाळा- महाविद्यालयात जाणारे पाल्य हाताळतात. त्यामुळेही ग्रामीण भागात विद्यार्थांमध्ये सध्या मोबाईलचे व्यसन मोठ्या प्रमाणावर दिसून येते. विद्यार्थी आपल्या निरक्षर पालकांचे बँकिंग व्यवहार, वस्तूंची खरेदी अथवा इतर कामे मोबाईलवर करत असतात. मात्र त्या व्यतिरिक्त आपले पाल्य मोबाईलमध्ये काय पाहतात? याकडेही पालकांनी लक्ष देणे तितकेच महत्वाचे आहे.

मोबाईलचे दुष्परिणाम - मोबाईल वापारचे जसे फायदे आहेत. तसे त्याचे दुष्परिणामही आरोग्यास घातक आहेत. कोणताही व्यक्ती डोळ्यांपासून साधारणतः एक ते दीड फुटांपर्यंत मोबाईल धरत असतो. एवढ्या जवळून पाहिल्यामुळे मोबाईलच्या निळ्या प्रकाशामुळे डोळ्यांवर ताण पडतो. परिणामी दृष्टी कमजोर होते. त्यामुळे डोकेदुखीचा त्रास मोबाईल धारकास होतो. जो व्यक्ती सतत मोबाईल वापरतो, त्याची मान नेहमी खाली असते. त्यामुळे मानेवर व पाठीवर ताण पडतो. परिणामी मान व पाठदुखीचा त्रास होतो. मोठ्या माणसासोबत लहान मुले देखील मोबाईलच्या एवढ्या अधीन झाले आहेत की, अनेक मुले अर्ध्या रात्रीपर्यंत ऑनलाईन खेळ, ऑनलाई जुगार यामध्ये गुंतलेले असतात. त्यामुळे अनेक मुलांना दृष्टीचा त्रास, मानदुखी, पाठदुखी तसेच निद्रानाशाच्या त्रासाला

सामोरे जावे लागत आहे. मोबाईलच्या सतत वापरामुळे अनेक मुलांमध्ये लठ्ठपणा दिसून येत आहे. सतत मोबाईलच्या वापरामुळे अनेक विद्यार्थांमध्ये मानसिक थकव्याचा देखील त्रास दिसून येत आहे. अनेक मुले मोबाईलच्या एवढ्या अधीन झाले आहेत की, वास्तविक मित्रांशी ना भेटणे, ना बोलणे नाहीच्या बरोबर आहे. घरात कोणी पाहुणे, नातेवाईक आले तरी ते आपल्या सततच्या मोबाईल वापरामुळे त्यांच्याकडे त्यांचे दुर्लक्ष होते. एकूणच मोबाईलच्या अधिक संपर्कात असणाऱ्या विद्यार्थांच्या वास्तविक जीवनातील लोकांशी संवाद कमी होत आहे. त्यामुळे त्यांच्यात एकाकीपणा वाढू लागला आहे.

विद्यार्थी जुगाराच्या विळख्यात - अँड्राईड स्मार्टफोनचा शोध लागण्याआधी अनेक जण वास्तविक पत्ते खेळणे, सट्टा लावणे, बेटिंग यासारख्या व्यसनात अडकलेली दिसत. पूर्वी क्वचित त्यातही केवळ वयाने मोठी माणसे अशा व्यसनात अडकलेली होती. मात्र सध्या मोबाईलमध्ये ऑनलाईन जुगार खेळण्यासाठी अनेक ॲप उपलब्ध आहेत. सध्या अनेक शाळा- महाविद्यालयातील मुले, सुशिक्षित लोकही ऑनलाईन जुगाराच्या विळख्यात सापडली असून अनेक जणांनी यापायी आपल्या आईवडिलांचा संसार उध्वस्त केला आहे. या जुगारात मोठे प्रमाण हे ऑनलाईन रमी आणि तीन पत्ती खेळांचे आहे. पूर्वी ऑफलाईन रमी आणि तीन पत्ती गावोगावी क्वचित लोकं खेळत. तेव्हा पोलिसांचा धाक असे. मात्र सध्या हे खेळ आपल्या खात्यात पैसे टाकून बिनधास्तपणे ऑनलाईन खेळले जातात. आजघडीला ऑनलाईन जुगाराच्या विळख्यात अनेक विद्यार्थी गुंतले असून चांगल्या कामाएवजी वाईट मार्गासाठी सध्या मोबाईलचा वापर अधिक होतांना दिसून येत आहे.

सारांश – मोबाईलचे जेवढे फायदे तेवढे दुष्परिणामही आहेत. विद्यार्थांच्या अधिक मोबाईल वापरामुळे त्यांचे शिक्षणावरून लक्ष विचलित होत आहे. सोशल मिडिया, ऑनलाईन खेळ यामुळे त्यांच्यातील अभ्यास करण्याची क्षमता कमी होऊन सामाजिक जीवनात त्यांचे वास्तविक जीवनातील संवाद कमी होतांना दिसून येत आहे. पालक आणि शिक्षकानीं मुलांच्या मोबाईल फोन वापराचे निरीक्षण करून त्यांच्या मोबाईल वापरावर मर्यादा घालायला हव्यात. जेणेकरून ते त्यांच्या अभ्यासावर प्रभावीपणे लक्ष केंद्रित करू शकतील. विद्यार्थी दशेत विद्यार्थांनी केवळ शैक्षणिक कामापुरता मोबाईलचा वापर मर्यादित ठेवला तर आजच्या विज्ञान युगात मोबाईल क्रांती शाप ऐवजी वरदान ठरेल. यात मुळीच शंका नाही.

संदर्भ –

१) https://en.wikipedia.org
२) https://allmarathi.net
३) https://www.marathisocial.com
४) https://brainly.in
५) https://mr.wikipedia.org

भाषा आणि साहित्यातील मानवी जीवन मूल्यांचा आविष्कार

चव्हाण मनोज उकंडराव

स्व. राजकमलजी भारती कला वाणिज्य व श्रीमती सुशिलाबाई आर भारती विज्ञान महाविद्यालय आर्णी

सारांश,

एआयच्या समकालीन उदयोन्मुख नवविचार, दृष्टीकोन, ज्ञान-विज्ञान, अध्यात्म - कला, शोध आणि संशोधन सर्वसमावेशक आणि स्वागतार्ह आहे. त्या संदर्भाने भाषा आणि साहित्य यांचा वसा आणि वारसा राष्ट्र निर्माणासाठी निरंतर प्रेरणादायी आहे. जगातील भाषा आणि भारतीय भाषा वैश्विक नाते दृढ करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. भारतीय भाषा आणि साहित्य मानवाच्या उत्क्रांती ते थेट विकासापर्यंत विविध वैशिष्ट्ये अधोरेखित करते. भाषा आणि साहित्य मानवी जीवनाला आधार आहे. भाषा आणि साहित्य विचार प्रत्येक भारतीयांस प्रेरणादायी आहे. संस्कृती, समाज, सभ्यता, इतिहास आणि संघटनात्मक पातळीवर सुविचार भाषा आणि साहित्यातून आविष्कृत झालेले आहे. जगाला जोडण्याचे महान कार्य भाषा आणि साहित्याने केले आहे. जगाला वैज्ञानिक, वैचारिक, सैद्धांतिक आणि उपयोजित, व्यावहारिक अधिष्ठान अर्थात सामर्थ्य प्रदान करण्याचे कार्य भाषेतून, साहित्यातून अविरत झाले आहे. मानवी जीवनात भाषेला अनन्यसाधारण महत्त्व आहे. विचार, भावना आणि कल्पनांचे आदानप्रदान भाषेमुळे शक्य झाले आहे. भाषा सामाजिक संस्था आहे. भाषा राष्ट्राची संपत्ती आहे आणि साहित्य हे मूल्य आहे. समाज आणि राष्ट्र उभारणीसाठी भक्कम आधार भाषा आहे. देश उभा करण्यासाठी भाषा विषय समजून घेणे आवश्यक आहे. साहित्य हा, मानवी जीवनाचा - समाजाचा, राष्ट्राचा आरसा आहे. मानवी जीवन मूल्यांचा आविष्कार साहित्यातून होत आहे. ते प्राचीन साहित्य, आधुनिक साहित्य व समकालीन साहित्यातून अभिव्यक्त झाले आहे. भाषा आणि साहित्य यांचा संबंध घनिष्ठ आहे. भाषेच्या माध्यमातून साहित्य आविष्कृत झाले आहे.

प्रस्तुत विषय डोळ्यासमोर ठेवून अर्थात भाषा आणि साहित्य या विषयावर शोधनिबंध सादर करण्यासाठी 'भाषा आणि साहित्यातील मानवी जीवन मूल्यांचा आविष्कार' हा शीर्षक निवडलेला आहे. त्या निमित्ताने डॉ.गोपालराव खेडकर महाविद्यालय गाडेगाव तेल्हारा अकोला महाराष्ट्र येथे 'एआयच्या युगात उदयोन्मुख दृष्टीकोन, ज्ञान एकात्मता आणि जागतिक संशोधन सीमांचा शोध घेणे.' या विषयावर आयोजित होरायझन 2026: आंतरराष्ट्रीय बहुविद्याशाखीय परिषदेला शुभेच्छा.

भाषा आणि साहित्य-

वैश्विक पातळीवर जगासोबत जुळवून घेण्यासाठी, संवाद साधण्यासाठी, जगातील ज्ञान विज्ञान अध्यात्म आणि आधुनिकता अभ्यासण्यासाठी, शोध संशोधनासाठी भाषा अनिवार्य आहे. संपर्क भाषेच्या माध्यमातून विविध क्षेत्रातील माहिती मिळविणे एक चांगले कार्य आहे. अनुवाद, रुपांतर या माध्यमातून ही भाषेचे आदान प्रदान होते. विविध भाषेतील प्राचीन भाषा, साहित्य भारतीय भाषा आणि साहित्य यांचा संबंध दर्शवते. भारत भाषेच्या बाबतीत श्रीमंत राष्ट्र आहे. साहित्य सुद्धा तेवढेच श्रीमंत आणि महान आहे. व्यक्ती आणि समुदायाचा प्रतीक माझा देश भारत. भाषा आणि साहित्याचे वैभव जपणारा देश आहे. भाषा शिकावी लागते. साहित्य वाचावे लागते. तेव्हा भाषा आणि साहित्य जगासमोर येते. मराठी भाषा उदयोन्मुख आहे. जगातील मानवी जीवनाला मूल्य प्रदान करणारी आहे. संस्कार देणारी भाषा म्हणजे मराठी भाषा आहे. प्राचीन, आधुनिक समकालीन साहित्य आणि स्वातंत्र्योत्तर काळातील नागरी, ग्रामीण, आदिवासी, शोषित, वंचित, विमुक्त – भटके जाती जमातींचे, मुस्लिम आदि अनेक प्रवाह भाषेचे, साहित्याचे विशेषतः मराठी साहित्याचे जागतिक स्तरावर वारसा निर्माण करायला लावणारा आहे. संस्काराने देश उभा राहतो. विश्व उभा राहतो. ही शिकवण माझ्या मराठी भाषेची, साहित्याची आहे. भाषा निर्मिती प्रक्रिया, साहित्य निर्मिती प्रक्रिया: शोध आणि संशोधन व साहित्य प्रबोधन हे विचार भाषेचे गौरव स्वरूप आहे. मराठी भाषा आणि साहित्य यांचे संवर्धन निरंतर मार्गदर्शन व प्रबोधन करीत आले आहे.

मराठी भाषा आणि साहित्य:-

मराठी भाषा आणि साहित्य यांचा संबंध अधोरेखित करणारे वैचारिक समीक्षण नोंदवित आहे. शीर्षक आहे - 'शेतीतला शोध'- "वर्ष 2027 मध्ये जनगणना होत आहे. विकसनशील भारतासाठी स्वागतम्. अलिकडे भारताचे आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी साहेब यांनी 'नागरिक देवो भव:' हा मंत्र व्याख्यान, भाषणातून दिला. राष्ट्र कल्याणासाठीचा हा मंत्र आणि त्या अनुषंगाने प्रस्तुत जनगणना प्रेरणादायी ठरणार आहे. विकसनशील भारत अर्थात शेतीवर अवलंबून असलेला देश. भारताला विश्वगुरू बनविण्यासाठी शेती, महिला, युवा, ..., सर्वांचे कल्याण होणे आवश्यक आहे.शेतीत एआय तंत्रज्ञान वापरून अधिक आधुनिक शेती करणे होय. लाख लाख पोतींनी, धनधान्यांनी पीक पिकवून भारतवर्षातील धान्य कोठारं स्वयंपूर्ण करण्यासाठी शेतीत एआयचा उपयोग होणे आवश्यक आहे. शेतीतला हा शोध, जनगणना पश्चात देश आणि धनधान्याची श्रीमंती ग्रामीण भारत अर्थात भारताची उभारणी करणारा ठरणार आहे. शेतीतला सर्वोत्तम शोध असणार आहे. या माध्यमातून भारत विकसित होणार आहे."1

दुसरे वैचारिक समीक्षण - 'विद्यार्थ्यांचा संशोधन' - "मुलं देवाघरची फुलं, बालपण देगा देवा मुंगी साखरेचा रवा आदी अनेक म्हणी चांगले मार्गदर्शन करतात. मुलांचा विकास होण्यासाठी, विद्यार्थी घडविण्यासाठी शिक्षक आणि शाळा-महाविद्यालय- संस्था-विद्यापीठ निरंतर प्रयत्नशील असतात.मुलांना,विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारे शिक्षक आजीवन मनात घर करून राहतात. त्यांच्या आठवणी उत्साह निर्माण करतात. जीवनाचे उत्सव साजरे करायला लावतात. विद्यार्थी शिक्षकांना आदर आणि त्यांच्या अनुकरणाचा पालन करतात. स्वतःच्या जीवनात परिवर्तन घडवून आणतात. हे जगातील वास्तव आहे. मुलं घडलीत तर राष्ट्र नक्कीच घडतो. विद्यार्थ्यांचे घडणे सर्वोत्तम संशोधन आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी एआयच्या ज्ञानाचा, दृष्टीकोनाचा निरंतर शोध आणि बोध घेतला पाहिजे.ते जगाच्या दृष्टीपटलावर आलं पाहिजे."2

मराठी साहित्यातील मानवी मूल्यांचा आविष्कार

"होरायझन 2026, मुखपृष्ठ अभ्यासपूर्ण आहे. ज्ञान विज्ञान अध्यात्म, परंपरा, आधुनिकता, मानवता, वास्तवता, एकात्मता यांचा संगम आहे. मानवी जीवनातील आधारभूत शक्यता आहे. मानवी जीवनातील मूल्यांचा दृश्याविष्कार आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर संशोधनाची गरज व व्याप्ती वाढवणारा आहे. एक निरिक्षण एआयच्या दृष्टीकोनातून."3

मराठी साहित्यातील मानवी मूल्यांचा सामाजिक आविष्कार 'साहित्य आणि सामाजिक संदर्भ ' या ग्रंथात डॉ. अंजली सोमण लिहितात – "साहित्याचा सामाजिक अभ्यास म्हणजे काय; लेखकाचा समाजनिष्ठ विचार कसा करता येतो; वाचक आणि साहित्य यांचे परस्परसंबंध कसे असतात; साहित्य आणि समाज यांचा अनेक अंगांनी विकसित होणारा सहसंबंध; साहित्याच्या सामाजिक अंगाने केलेल्या आशय विश्लेषणाचे साहित्याच्या सामाजिक अभ्यासातील स्थान; साहित्यकृतींना निर्मिती स्त्रोतांची चिकित्सा."4 प्रस्तुत संदर्भ ग्रंथ वाचक, विद्यार्थी, अभ्यासकांना मार्गदर्शन करतो. साहित्य आणि सामाजिक संदर्भ मांडणारा हा ग्रंथ म्हणजे मराठी साहित्यातील मानवी मूल्यांचा आविष्कार करणारा ग्रंथ आहे.अनुक्रमणिकेच्या माध्यमातून केलेली चर्चा विस्ताराने आलेली आहे.

साहित्यातून मानवी जीवन अभिव्यक्त होत राहणे आवश्यक आहे. विविध प्रकार, प्रवाह, संज्ञा व रचना या माध्यमातून अभिव्यक्त होत राहणे आवश्यक आहे. मराठी साहित्य आणि मानवी जीवनाचा जवळचा संबंध आहे. नवनवीन प्रयोग आणि लेखन तंत्रज्ञानाचा उपयोग करणे गरजेचे आहे. "साहित्य आणि समाज यांचा अतिशय जवळून संबंध असतो. वेगवेगळ्या कालखंडात लिहिणारे लेखक त्या काळाची अपत्ये असतात. तो कालखंड समजावून घेतला तर त्या लेखकाने केलेल्या निर्मितीचे अधिक चांगले आकलन होऊ शकते.तेव्हा काळ आणि लेखक यांचेही नाते दुर्लक्ष करण्यासारखे नाही."5 मराठी साहित्यातील मानवी मूल्यांचा विचार विस्ताराने आलेला आहे. साहित्याचा सामाजिक सांस्कृतिक संदर्भ आणि ग्रंथाचा भक्कम आधार त्याला आहे. साहित्य आणि समाज, लेखक आणि लेखन यांचे नाते दृढ करण्यासाठी काळानुरूप निर्मिती प्रक्रिया सुरू राहणे आवश्यक आहे. शेतीतला शोध, विद्यार्थ्यांचा संशोधन हे ललित

आणि वैचारिक लेखन मानवी मूल्यांचा पुरस्कार करतात. जीवनाचे मूल्ये रेखाटतात. नवनवीन लेखकाने समोर यायला हवे. लेखनासाठी आणि लेखनातून मराठी भाषा आणि साहित्याचे सामाजिक संदर्भ मांडावेत.

साहित्य लेखकाच्या अनुभवाचा आत्मविष्कार आहे. साहित्य कला रूप आहे. व्यवहारातील कलारूप साहित्यातून आविष्कृत होत असतो. या संदर्भातला मुद्दा मांडता येईल- "साहित्यकृतीमधील त्या रचना, शब्दांमधून वाचकाला जीवनविषयक अनेक प्रकारचे संदर्भ जाणवू लागतात.असे विविध पातळीवरचे जीवन संदर्भ सुचविण्याचे सामर्थ्य असल्यामुळेच रामायण, महाभारत यांसारखी महाकाव्ये जीवनाच्या कोणत्याही अवस्थांमध्ये आपल्या आवडीचा, कुतूहलाचा विषय होतात. या सूचकतेमुळेच साहित्याला चिरंतन सौंदर्यमूल्ये प्राप्त झाले आहे."6 ग्रंथ, पुस्तक किंवा महाकाव्ये साहित्याला आधार दिला आहे. सौंदर्य आणि मूल्य प्रदान केले आहे. या मूल्यांवर मानव विकास पावला आहे. आणि हे शब्द अथवा रचना या माध्यमातून व्यक्त होणारे जीवन साहित्याचा, भाषेचा, मराठी भाषा आणि साहित्य संस्कृतीचा विकास करणारा आहे. मानवी मूल्ये जपणारा आहे.

निष्कर्ष:-

१. एआयच्या समकालीन उदयोन्मुख नवविचार, दृष्टीकोन, ज्ञान-विज्ञान, अध्यात्म – कला, शोध आणि संशोधन सर्वसमावेशक आणि स्वागतार्ह आहे.
२. भाषा आणि साहित्य यांचा वसा आणि वारसा राष्ट्र निर्माणासाठी निरंतर प्रेरणादायी आहे.
३. जगातील भाषा आणि भारतीय भाषा वैश्विक नाते दृढ करण्यासाठी प्रयत्नशील आहेत.
४. भारतीय भाषा आणि साहित्य मानवाच्या उत्क्रांती ते थेट विकासापर्यंत विविध वैशिष्ट्ये अधोरेखित करते.
५. भाषा आणि साहित्य मानवी जीवनाला आधार आहे. भाषा आणि साहित्य विचार प्रत्येक भारतीयांस प्रेरणादायी आहे.
६. संस्कृती, समाज, सभ्यता, इतिहास आणि संघटनात्मक पातळीवर सुविचार भाषा आणि साहित्यातून आविष्कृत झालेले आहे.
७. जगाला जोडण्याचे महान कार्य भाषा आणि साहित्याने केले आहे.
८. जगाला वैज्ञानिक, वैचारिक, सैद्धांतिक आणि उपयोजित, व्यावहारिक अधिष्ठान अर्थात सामर्थ्य प्रदान करण्याचे कार्य भाषेतून, साहित्यातून अविरत अभिव्यक्त झाले आहे.

संदर्भग्रंथ सूची-

१. प्रा. मनोज चव्हाण. वैचारिक लेखन, 2026
२. तत्रैव,
३. तत्रैव,
४. डॉ. अंजली सोमण, साहित्य आणि सामाजिक संदर्भ, प्रतिमा प्रकाशन, पुणे, 2005
५. तत्रैव,
६. संपा. डॉ. दत्तात्रय पुंडे, साहित्यविचार, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, पुणे, 2009

मानवासाठी सामाजिक शास्त्राची उपयुक्तता : इतिहास विषयाच्या संदर्भात

प्रा. डॉ. शैलेन्द्र पंडितराव चव्हाण
(इतिहास विभाग)
डॉ. मनोरमा व प्रा. ह.श. पुंडकर क. वा. वि. महाविद्यालय बाळपुर जिल्हा अकोला

प्रस्तावना

मानव हा समाजात राहणारा प्राणी आहे. तो जसा वर्तमानात जगतो, तसाच तो आपल्या भूतकाळाच्या अनुभवांवर आधारलेला असतो. मानवाचा भूतकाळ, त्याचे संघर्ष, प्रगती, अपयश, संस्कृती, परंपरा आणि विचारसरणी यांचा अभ्यास करणारा विषय म्हणजे **इतिहास**. इतिहास हा सामाजिक शास्त्रांचा एक महत्त्वाचा घटक असून तो मानवासाठी अत्यंत उपयुक्त आहे.

इतिहास केवळ राजे-महाराजे, युद्धे किंवा तारखा सांगणारा विषय नाही. तो सामान्य माणसाच्या जीवनाची कथा सांगतो. मानवाने समाज कसा घडवला, सामाजिक संस्था कशा तयार झाल्या, मूल्ये कशी बदलली आणि आजचे समाजजीवन कसे आकाराला आले, हे समजून घेण्यासाठी इतिहासाचा अभ्यास अत्यावश्यक आहे. या संशोधन लेखात मानवासाठी इतिहास विषयाची उपयुक्तता सोप्या, मानवी भाषेत स्पष्ट करण्यात येईल.

सारांश (Abstract)

या संशोधन लेखात मानवासाठी सामाजिक शास्त्राची उपयुक्तता इतिहास विषयाच्या विशेष संदर्भात स्पष्टीकरण केले आहे . इतिहास हा केवळ भूतकाळातील घटना व तारखांचा अभ्यास नसून मानवी समाज, संस्कृती, संस्था आणि मूल्यव्यवस्था यांचा सखोल अभ्यास करणारा विषय आहे, असा या लेखाचा मुख्य युक्तिवाद आहे. इतिहासाच्या अभ्यासामुळे मानवाला स्वतःची ओळख समजते, समाजातील बदलांची कारणे उलगडतात आणि वर्तमान सामाजिक समस्यांचे मूळ भूतकाळात कसे दडलेले आहे हे स्पष्ट होते. लोकशाही मूल्यांचा विकास, सामाजिक न्यायाची जाणीव, सांस्कृतिक सहअस्तित्व आणि नागरिकत्वाची जबाबदारी निर्माण करण्यात इतिहासाची भूमिका महत्त्वाची आहे, हे या लेखात अधोरेखित करण्यात आले आहे. सोप्या व मानवी भाषेत इतिहास विषयाची उपयुक्तता मांडून इतिहास हा मानवाच्या वर्तमान आणि भविष्याचा मार्गदर्शक कसा ठरतो, हे या संशोधन लेखातून स्पष्ट केले आहे.

Keywords: इतिहास, सामाजिक शास्त्र, मानवी समाज, सामाजिक बदल, लोकशाही मूल्ये, संस्कृती, नागरिकत्व, सामाजिक जाणीव, भूतकाळ व वर्तमान, मानवी विकास

इतिहास विषय : अर्थ व स्वरूप

इतिहास म्हणजे भूतकाळातील मानवी जीवनाचा शास्त्रशुद्ध अभ्यास होय. मानवाने भूतकाळात काय केले, का केले आणि त्याचे परिणाम काय झाले, याचा तर्कशुद्ध विचार इतिहासात केला जातो. इतिहास हा फक्त भूतकाळ सांगत नाही, तर वर्तमान समजून घेण्यास आणि भविष्याचा विचार करण्यास मदत करतो.

इतिहासाचा अभ्यास राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक व धार्मिक अशा विविध अंगांनी केला जातो. त्यामुळे इतिहास हा केवळ घटनांचा संग्रह न राहता मानवी समाजाचा आरसा ठरतो.

मानव आणि इतिहास यांचे नाते

मानव व इतिहास यांचे नाते अतूट आहे. मानव इतिहास घडवतो आणि इतिहास मानवाला घडवतो. माणसाच्या विचारांवर, मूल्यांवर आणि वर्तनावर भूतकाळातील अनुभवांचा प्रभाव असतो. उदाहरणार्थ, स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मूल्ये एका दिवसात निर्माण झालेली नाहीत; ती दीर्घ ऐतिहासिक प्रक्रियेचा परिणाम आहेत.

इतिहासाचा अभ्यास केल्यामुळे मानवाला स्वतःची ओळख समजते. आपण कोण आहोत, कुठून आलो आहोत आणि आज ज्या समाजात जगतो तो कसा घडला, याची जाणीव इतिहास देतो.

सामाजिक समज वाढविण्यात इतिहासाची भूमिका

समाजातील जातव्यवस्था, कुटुंबसंस्था, धर्म, परंपरा, रूढी या सर्व ऐतिहासिक प्रक्रियेतून निर्माण झाल्या आहेत. इतिहासाचा अभ्यास केल्याशिवाय या सामाजिक रचनांचा उगम आणि बदल समजणे शक्य नाही.

इतिहास मानवाला समाजाकडे चिकित्सक नजरेने पाहायला शिकवतो. आज समाजात असलेली असमानता, भेदभाव किंवा संघर्ष हे अचानक निर्माण झालेले नसून त्यामागे ऐतिहासिक कारणे आहेत, ही जाणीव इतिहास देतो.

इतिहास व सामाजिक समस्या

दारिद्र्य, जातीय भेदभाव, स्त्री-पुरुष असमानता, धार्मिक संघर्ष यांसारख्या सामाजिक समस्यांचे मूळ भूतकाळात दडलेले असते. इतिहास या समस्यांची पार्श्वभूमी स्पष्ट करतो.

उदाहरणार्थ, स्त्रियांची सामाजिक स्थिती का बदलत गेली, जातीव्यवस्था कशी अधिक कठोर बनली, वसाहतवादाचा भारतीय समाजावर काय परिणाम झाला — हे प्रश्न इतिहासाच्या अभ्यासातून समजतात. त्यामुळे समस्या समजून घेऊन त्यावर उपाय शोधणे मानवाला शक्य होते.

लोकशाही मूल्ये आणि इतिहास

लोकशाही ही व्यवस्था इतिहासातील दीर्घ संघर्षातून निर्माण झाली आहे. राजेशाही, सामंतशाही, वसाहतवाद याविरुद्धच्या लढ्यांचा अभ्यास इतिहासात केला जातो. त्यामुळे स्वातंत्र्य, हक्क, संविधान, कायदा यांचे महत्त्व मानवाच्या लक्षात येते.

इतिहासाचा अभ्यास नागरिकांना जबाबदार बनवतो. लोकशाही टिकवण्यासाठी जागरूक नागरिकांची गरज असते आणि ही जाणीव इतिहास विषयातून निर्माण होते.

सांस्कृतिक जाणीव निर्माण करणारा इतिहास

मानवाची संस्कृती ही त्याची ओळख आहे. भाषा, कला, साहित्य, सण-उत्सव, चाली-रीती यांचा विकास इतिहासात घडलेला असतो. इतिहासाचा अभ्यास केल्यामुळे विविध संस्कृतींचा आदर करण्याची भावना मानवामध्ये निर्माण होते.

इतिहासामुळे 'आपली' आणि 'इतरांची' संस्कृती समजून घेता येते. यामुळे सहिष्णुता, सामाजिक ऐक्य आणि मानवतेची भावना बळकट होते.

वर्तमान आणि भविष्य घडविण्यास इतिहासाची मदत

इतिहास मानवाला भूतकाळातील चुका आणि यश यांचा धडा देतो. भूतकाळातील चुका टाळण्यासाठी आणि यशस्वी अनुभवांचा उपयोग करण्यासाठी इतिहास मार्गदर्शक ठरतो.

"इतिहासातून आपण काहीच शिकलो नाही तर इतिहास पुन्हा घडतो" हे विधान इतिहासाच्या उपयुक्ततेचे सार सांगते. त्यामुळे भविष्याचा विचार करताना इतिहास मानवासाठी दिशादर्शक ठरतो.

शिक्षणात इतिहास विषयाचे महत्त्व

इतिहास विषय विद्यार्थ्यांमध्ये विचारशक्ती, विश्लेषण क्षमता आणि चिकित्सक दृष्टी विकसित करतो. तो पाठांतरावर आधारित नसून कारण-परिणाम समजून घेण्यावर भर देतो.

इतिहास विद्यार्थ्यांना संवेदनशील, जागरूक आणि जबाबदार नागरिक बनवतो. म्हणूनच इतिहास हा केवळ विषय नसून जीवनशिक्षण आहे.

इतिहास आणि नागरिकत्वाची जाणीव

इतिहास विषय नागरिकत्वाची जाणीव निर्माण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो. संविधान, स्वातंत्र्यलढे, हक्क व कर्तव्ये यांचा ऐतिहासिक प्रवास समजल्यामुळे नागरिक अधिक जागरूक बनतात. लोकशाही केवळ राजकीय व्यवस्था नसून ती ऐतिहासिक संघर्षातून निर्माण झालेली जीवनपद्धती आहे, हे इतिहास स्पष्ट करतो.

इतिहासामुळे नागरिकांमध्ये जबाबदारीची भावना निर्माण होते. मतदानाचा हक्क, अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि कायद्याचे पालन यांचे महत्त्व इतिहासातून अधोरेखित होते. त्यामुळे इतिहास विषय लोकशाही टिकवण्यासाठी आवश्यक असलेली नागरिक मानसिकता घडवतो.

इतिहास आणि सामाजिक समता

समाजातील असमानता, शोषण आणि अन्याय समजून घेण्यासाठी इतिहासाचा अभ्यास आवश्यक आहे. जातीव्यवस्था, स्त्रियांची स्थिती, आर्थिक विषमता यांचा उगम आणि विकास इतिहासातून स्पष्ट होतो. त्यामुळे सामाजिक समतेसाठी चाललेल्या चळवळींचे महत्त्व मानवाच्या लक्षात येते.

इतिहास सामाजिक समतेसाठी प्रेरणा देतो. भूतकाळातील सुधारक, चळवळी आणि संघर्ष यांचा अभ्यास मानवाला अन्यायाविरुद्ध उभे राहण्याची ताकद देतो. त्यामुळे इतिहास हा सामाजिक न्यायाचा बौद्धिक आधार ठरतो.

इतिहास आणि सांस्कृतिक समन्वय

विविध संस्कृती, भाषा आणि परंपरांचा परस्पर संबंध इतिहासातून उलगडतो. भारतीय समाजासारख्या बहुसांस्कृतिक समाजात सांस्कृतिक समन्वय टिकवण्यासाठी इतिहासाचे ज्ञान अत्यंत उपयुक्त आहे. इतिहास संघर्षांसोबतच सहअस्तित्वाची परंपराही दाखवतो.

इतिहासामुळे सांस्कृतिक सहिष्णुता वाढते. भिन्न संस्कृतींचा आदर करणे आणि त्यांच्याकडून शिकणे ही दृष्टी इतिहास विषय मानवामध्ये विकसित करतो. त्यामुळे सामाजिक ऐक्य बळकट होते.

इतिहास विषयाचा भविष्यकालीन उपयोग

भविष्यातील समाज अधिक न्याय्य, समतावादी आणि मानवकेंद्री घडवण्यासाठी इतिहास विषय मार्गदर्शक ठरतो. धोरणनिर्मिती, शिक्षण व्यवस्था आणि सामाजिक सुधारणांमध्ये इतिहासाचे ज्ञान उपयुक्त ठरते. भूतकाळातील अनुभवांच्या आधारे योग्य निर्णय घेणे शक्य होते.

इतिहास विषयाचा अभ्यास मानवाला दूरदृष्टी देतो. तात्काळ फायद्यांपेक्षा दीर्घकालीन परिणामांचा विचार करण्याची सवय इतिहासामुळे लागते. म्हणूनच भविष्य घडविण्यासाठी इतिहास हा मानवाचा विश्वासार्ह मार्गदर्शक आहे.

निष्कर्ष

वरील चर्चेवरून असे स्पष्ट होते की मानवासाठी इतिहास विषय अत्यंत उपयुक्त आहे. इतिहास मानवाला स्वतःची ओळख देतो, समाज समजावून सांगतो आणि वर्तमानाशी जोडतो. सामाजिक समस्या समजून घेणे, लोकशाही मूल्ये जपणे, सांस्कृतिक ऐक्य राखणे आणि भविष्याचा विचार करणे — या सर्व बाबींमध्ये इतिहासाची भूमिका महत्त्वाची आहे. म्हणूनच इतिहास हा केवळ भूतकाळाचा अभ्यास नसून मानवाच्या वर्तमान आणि भविष्याचा मार्गदर्शक आहे, असे ठामपणे म्हणता येईल.

संदर्भसूची (References)

1. कारे, बी. आर. – इतिहास लेखन व सिद्धांत.
2. कुलकर्णी, मो. रा. – भारतीय समाजाचा इतिहास.
3. गिडेन्स, अँथनी – सामाजिक शास्त्रांची ओळख.
4. सेन, अमर्त्य – विकास आणि इतिहास.
5. देशमुख, वा. रा. – लोकशाही परंपरा आणि इतिहास.

लोकसाहित्य : समाजपरिवर्तनाचे लोकाभिमुख साधन

प्रा. सारिका दादाराव पाचराऊत
मराठी विभाग प्रमुख
डॉ गोपाळराव खेडकर महाविद्यालय गाडेगाव तेल्हारा

सारांश (Abstract)

लोकसाहित्य हे समाजजीवनाचे प्रतिबिंब असून ते लोकांच्या भावभावना, जीवनमूल्ये, संघर्ष, श्रद्धा व सामाजिक जाणीवा यांचे प्रभावी प्रकटीकरण करते. परंपरेने तोंडी परंपरेतून पिढ्यान्पिढ्या प्रवाहित होत आलेले लोकसाहित्य समाजजागृती व समाजपरिवर्तनाचे लोकाभिमुख साधन ठरले आहे. लोककथा, लोकगीते, लोकनाट्य, म्हणी, उखाणे, व्रतवैकल्ये यांमधून सामाजिक अन्यायाविरोधातील भूमिका, स्त्री-पुरुष समानता, श्रमप्रतिष्ठा, नैतिक मूल्ये व सामूहिक जीवनदृष्टी प्रकट होते. प्रस्तुत संशोधनात लोकसाहित्याची समाजपरिवर्तनातील भूमिका, त्याचा सामाजिक आशय व जनमानसावर होणारा प्रभाव यांचा अभ्यास करण्यात आला आहे. समाजातील परिवर्तनशील चेतना निर्माण करण्यात लोकसाहित्य कसे योगदान देते, हे उलगडणे हा या अभ्यासाचा मुख्य हेतू आहे.

Keywords: लोकसाहित्य, समाजपरिवर्तन, लोकसंस्कृती, समाजजागृती, लोकाभिमुख साहित्य

प्रस्तावना

समाजाच्या सांस्कृतिक, सामाजिक व भावनिक जीवनाचे प्रतिबिंब म्हणजे लोकसाहित्य होय. समाजातील सामान्य माणसाच्या जीवनानुभवांतून, श्रमसंस्कृतीतून व सामूहिक जाणिवेतून निर्माण झालेले लोकसाहित्य पिढ्यान्पिढ्या तोंडी परंपरेतून प्रवाहित होत आले आहे. लोककथा, लोकगीते, म्हणी, उखाणे, भारुडे, व्रतवैकल्ये, लोकनाट्य इत्यादी लोकसाहित्याचे विविध प्रकार समाजजीवनाशी अतूटपणे जोडलेले आहेत. त्यामुळे लोकसाहित्य हे केवळ मनोरंजनाचे साधन न राहता समाजजागृती व समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम ठरले आहे.

लोकसाहित्यामध्ये समाजातील आशा-आकांक्षा, दुःख-संघर्ष, श्रद्धा-अंधश्रद्धा, नैतिक मूल्ये, सामाजिक विषमता तसेच शोषणाविरुद्धचा विरोध प्रकर्षाने व्यक्त झालेला आढळतो. विशेषतः ग्रामीण व उपेक्षित समाजघटकांच्या जीवनवास्तवाचे प्रतिबिंब लोकसाहित्यातून स्पष्टपणे उमटते. समाजातील अन्यायकारक रूढी-परंपरांवर टीका करणे, स्त्री-पुरुष समानतेची जाणीव निर्माण करणे, श्रमप्रतिष्ठा अधोरेखित करणे आणि सामूहिक जीवनमूल्यांचा प्रसार करणे हे कार्य लोकसाहित्याने सातत्याने केले आहे.

समाजपरिवर्तन ही एक सातत्यपूर्ण प्रक्रिया असून त्यात लोकसाहित्याचे योगदान महत्त्वाचे आहे. लोकांच्या भाषेत, त्यांच्या जीवनाशी सुसंगत अशा अभिव्यक्तीमधून लोकसाहित्य समाजमनावर प्रभाव टाकते. त्यामुळे सामाजिक बदलांची बीजे रुजविण्यात लोकसाहित्य हे लोकाभिमुख साधन म्हणून कार्य करते. आधुनिक काळात जरी माध्यमे बदलली असली तरी लोकसाहित्याच्या परिवर्तनशील भूमिकेचे महत्त्व आजही अबाधित आहे.

या पार्श्वभूमीवर प्रस्तुत संशोधनात लोकसाहित्याची समाजपरिवर्तनातील भूमिका, त्याचा सामाजिक आशय व जनमानसावर होणारा परिणाम यांचा अभ्यास करण्यात आला आहे. लोकसाहित्य केवळ सांस्कृतिक वारसा नसून ते समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन आहे, हे अधोरेखित करणे हा या अभ्यासाचा मुख्य उद्देश आहे.

संशोधनाची उद्दिष्टे

1. लोकसाहित्याची संकल्पना व स्वरूप स्पष्ट करणे.
2. लोकसाहित्य आणि समाजपरिवर्तन यांतील परस्परसंबंध अभ्यासणे.
3. लोकसाहित्यातून व्यक्त होणाऱ्या सामाजिक जाणीवा व मूल्यांचा शोध घेणे.
4. समाजजागृती व सामाजिक परिवर्तन प्रक्रियेत लोकसाहित्याची भूमिका स्पष्ट करणे.
5. आधुनिक काळात लोकसाहित्याचे परिवर्तनशील महत्त्व अधोरेखित करणे.

संशोधन पद्धती

प्रस्तुत संशोधनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे. लोकसाहित्याशी संबंधित ग्रंथ, संशोधन लेख, नियतकालिके, संदर्भ साहित्य यांचा अभ्यास केला आहे. तसेच लोककथा, लोकगीते, म्हणी यांचे आशयविश्लेषण करून समाजपरिवर्तनाशी असलेला संबंध स्पष्ट करण्यात आला आहे. आवश्यक तेथे तुलनात्मक पद्धतीचाही उपयोग करण्यात आला आहे.

जागतिकीकरणाने मानवीजीवनाला प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीतीने व्यापून टाकले आहे. जागतिकीकरणाच्या युगामध्ये लोकसाहित्याचे स्थान काय किंवा महत्व किती असे प्रश्न उदभवतात. लोकसाहित्य हे केवळ जुने, भूतकालीन संचितांचे संकलन तसेच परंपरांना चिकटून असलेले साहित्य आहे असा समज प्रचलित आहे. लोकसाहित्यामध्ये प्राचीनता-पुरातनता असते. परंतु ही प्राचीनता केवळ कालवाचक मानून चालणार नाही. त्यावर त्या-त्या काळातील समाजाच्या सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक, धार्मिक विचारधारांचा प्रभाव दिसून येतो. त्यामुहे वर्तमानकाळ समृध्द आणि विकासक्षम होत असतो. लोकसाहित्याचे अभ्यासक श्री. ना.रा. शेंडे म्हणतात, 'अत्यंत प्राचीन काळी भारतभूमीच्या आदिसतांनी लोकसाहित्य आणि लोककला निर्माण करुन देशाची उदात्त संस्कृती सिध्द केलेली अहे. जे वैभव त्यांनी निर्माण केले त्याचे जतन, संशोधन केले पाहिजे." त्यामुळेच लोकसाहित्यातुन कोणत्याही देशाचे सामाजिक जीवन, इतिहास, संस्कृती याविषयी माहिती मिळते.

लोकसाहित्याची व्याप्ती सर्वस्पर्शी आणि विस्तृत आहे. देशातील कोणतीही दिशा असो, कोणताही भाग असो तेथील लोकसाहित्य जिवंत असते ते केवळ तेथील लोकसमूहामुळेच, फरक इतकाच की त्या-त्या समाजाची भाषा व अभिव्यक्तीमधील वैविध्यामुळे तेथील लोकसाहित्यामध्ये विविधता दिसून येते. 'लोकसाहित्य स्थलकाल सापेक्ष मूळ परंपरा राखून बदल स्वीकारीत सदैव वर्तमान व जिवंत असणारे अभ्यास क्षेत्र आहे. सामाजिक जीवनात प्रत्येक व्यक्ती परंपराची जोपासना करीत असते. रुढी-प्रथा, सण-उत्सव इ. द्वारा परंपरांची अभिव्यक्ती होत असते. त्यामागे दोन हेतु साध्य होत असतात. एक तर सामाजिक संबंध जोपासले जातात तर दूसरा हेतू म्हणजे दैनंदिन जीवनामध्ये आनंदनिर्मिती होय.

परंपरा जपणाज्या व्यक्ती समूहापासूनच समाज निर्माण होत असल्याने समाज आणि लोकसाहित्य परस्परपूरक आहेत. सृष्टिची निर्मिती म्हणजे मनूष्य आणि मनुष्यनिर्मिती म्हणजे समाज. परंतु त्याच समाजाचे मनुष्याला आपल्या रंगात रंगवून सार्थक-समर्थ बनविले. अशा या शृंखलाबध्द संबंधांचा अभ्यास शास्त्रीय दृष्टिकोनातून केल्यास समाजशास्त्रापर्यंत आपण जाऊन पोहचतो तर सांस्कृतिक दृष्ट्या विचार केला तर लोकसाहित्याप्रत जाऊन पोहचतो. अर्थात लोकसाहित्य, समाज आणि संस्कृती यांची एकत्रित गुंफण आपणास दिसते. त्यावरुन लोकसाहित्यामध्ये समाजव्यवहार आणि सांस्कृतिक परंपरा प्रकट करण्याचे व टिकवून ठेवण्याचे सामर्थ्य आहे हे नमूद करता येईल.

सृष्टितील रहस्य जाणून घेण्यासाठी आपल्या प्रतिभाशक्तीच्या मदतीने मानवाने जीवनाचे संदर्भ हे निसर्गसृष्टीशी भावनात्मकरीत्या जोडले व त्यातुन लोकांनी निर्माण केलेले, हृदयातील भावभावनांचे प्रतिबिंब असलेले व परंपरांची जोपासना करीत समाजाशी नाते जोडणारे लोकसाहित्य निर्माण झाले. आजच्या युगात जीवनाचे संदर्भ बदलले आहेत. श्रेष्ठ जीवनमुल्यांचा ऱ्हास होत आहे. आधुनिकीकरणामुळे जीवन व्यामिश्र गुंतागुंतीचे झाले आहे. इतकेच नव्हे तर मानवाचा निसर्गाशी विसंवाद, कौटुंबिक संबंधामध्ये अविश्वास, सामाजिक संस्थांचा विध्वंश सामूहिक जीवनाची अस्थिरता, मानवाचा एकलकोंडेपणा, नैराश्य, सर्जनशीलतेचा अभाव, मृत्यूचे भय नसणे, धर्म आणि श्रध्दा यांचे उच्चाटन या सर्व गोष्टींचा प्रभाव मनुष्यजीवनावर दिसून येतो. त्यामुळे मनुष्यजीवन अशांत आहे. मानव-मानवापासून दुरावत चालला आहे.

आज समाजाचे चित्र पाहिल्यास एक बाब चिंतनीय वाटते. समाजातील सांस्कृतिक ज्हास व मानवतावादाचा न्हास होतांना दिसतो आहे. तो टाळणे आवश्यक आहे. मानवी समूहाची समाजाप्रति आत्मीयता दिसत नाही. त्यामागे स्वार्थ, असूया आणि अत्याधिक व्यक्तीस्वातंत्र्य दिसून येते. व्यक्ती जितका स्वकेंद्री तितका त्याचा सामाजिक संस्थांशी विरोध वाढत जातो. समाजाची निर्मिती समूहापासून होत असली तरी समाजाचे आपले व्यक्तिगत अधिकार आणि अस्तित्व असते. समाजाच्या सुरक्षेसाठी, सामाजिक सरंचना स्थिर आणि प्रगतिशील राहण्यासाठी सर्वसामान्य व्यक्तींवर समाजाचे नियंत्रण असते. सामाजिक नियंत्रण सामाजिक संस्था निर्माण करीत असतात. सामाजिक संस्थांचा आदर करणे हे लोकसाहित्य शिकवित असते. उदा. विवाह संस्था, कुटूंब संस्था.

समूहमन जे जे स्वीकारत असते ते परंपरंने पुढे चालत येते. त्यामुळे त्या त्या समाजातील लोकजीवन त्याचे अस्त्वित टिकून असते. त्यांच्या परंपरा जतन करण्याचे काम लोकसाहित्य करीत असते. कारण समाजपरिवर्तन संकल्पना बाबतीत प्रा. गिलीन आणि गिलीन यांचे मत की, "सामाजिक परिवर्तन म्हणजे परंपरेने स्वीकारलेल्या जीवन पध्दतीत झालेला बदल होय. मग हा बदल भौगोलिक परिस्थितीतील सांस्कृतिक साधनातून, लोकसंख्या रचनेतून किंवा विचारप्रणालीतून आकाराला आलेला असो अथवा सामाजिक गटातील (समूहातील) विस्तृतेतून किंवा नवीन शोधातून आकाराला आलेला असो त्यांचा सामाजिक परिवर्तन संकल्पनेत समावेश होतो." सामाजिक परंपरा जतन करण्यासाठी निसर्गातील दैवी शक्तीविषयी लोकश्रध्दा, परमेश्वराचे अस्तित्व, त्या अनुषंगाने विधी, पूजा-अर्चा, व्रत-वैकल्ये इ. बाबींचा वापर लोकसाहित्याच्या माध्यमातून करीत असतात. आजच्या आधुनिक युगामध्ये ते मूळ स्वरुपात टिकून नसले तरी मात्र थोडयाफार प्रमाणात त्यामध्ये बदल झाला असल्यास विधान-नियमन, परंपरा टिकून असते. त्यामध्ये मोठा वाटा लोकसाहित्याचा असतो.

लोकांना लोकाचार, रुढी-परंपरा यांचे आचरण-पालन करण्याविषयी सक्ती नसते. फक्त त्यातुन सहकार्याची आपुलकीची भावना वाढीस लागावी हा हेतू असतो. त्याचप्रमाणे रुढी म्हणजे एक प्रकारे सामाजिक वर्तन किंवा कृती होय. रुढींचे स्वरुप सार्वत्रिक असते. त्यातुनच संस्कृती उभी राहते. रुढी, परंपरा, लोकाचार, लोकश्रध्दा यामध्ये होणारे परिवर्तन संथ गतीने होत असते. पर्यायाने ते लोकांमध्ये रुजतात व त्यांना झुगारुन देणे समाजाला कठीण असते. अशा प्रकारे लोकसाहित्य समाजाशी एकरुप असते. समाज सुरक्षित असेल तर मानवाच्या भौतिक, मानसिक, शारीरिक अशा सर्व गरजांची पूर्तता होत असते. कोणत्याही समाजाचा कार्यकाळ त्याची स्थिती गती प्रगतीचा आलेख, परिवर्तन पाहतांना सर्वप्रथम हे पाहणे आवश्यक असते की, भूतकालीन पिढीने संचित केलेली संस्कृती भाविपिढीकडे किती प्रभावीपणे हस्तांतरीत केली आहे. लोकसाहित्याच्या माध्यमातून हे कार्य सहजपणे व प्रभावीपणे होत असते.

प्रत्येक देश, राज्य यांना आपली भाषा, आपली संस्कृती असते. बाढत्या दळण-वळण, प्रसार माध्यमांमुळे मात्र त्यांच्या सामाजिक सांस्कृतिक सीमा अस्पष्ट झाल्या आहेत. त्यांचे कारण व्यापार, उद्योगधंदे, शिक्षण इत्यादी कारणांमुळे मानवाचे स्थलांतर होत आहे. जग जवळ आले असतांना साहजिकच शेजारच्या संस्कृतीची वैशिष्टये जाणून घेणे त्याबद्दल आकर्षण वाटणे हे होय. देशाच्या उज्वल भविष्यासाठी ज्या प्रमाणे भौगोलिक, राजकीय, सामाजिक ऐक्य आवश्यक आहे. त्याप्रमाणे सांस्कृतिक ऐक्य ही आवश्यक आहे. सांस्कृतिक आदान-प्रदानाचे सर्वोत्कृष्ट माध्यम लोकसाहित्य होय. सुष्टीवर असंख्य देश, भाषा, संस्कृती असली तरी मात्र मानव हा सर्वत्र एकच. जगात जिथे जिथे मानवी समाज आहे तिथे तिथे सामाजिक परिवर्तन प्रक्रिया गतिमान असते. प्रत्येक समाजाची अशी एक व्यवस्था असते. स्थल कालानुसार मानवी समस्यांचे स्वरुप हे भिन्न-भिन्न आहे. परंतु अनेक समस्या अशा आहेत की त्या सुष्टीवरील सर्वच मानवांना स्पर्श करतात. जसे की श्रीमंत गरीब, स्त्री-पुरुष, भेद, विवाह-कुटुंबातील प्रश्न, दोन पिढयांमधील अंतर इत्यादी होय. सर्व समस्यांना वाचा फुटली की ती त्या त्या देशातील त्या त्या भाषेमधील साहित्यामध्ये त्यात ही विशेष म्हणजे लोकसाहित्यात अत्यंत हृदयस्पर्शरीत्या त्यांची अभिव्यक्ती होतांना दिसते. उदाः कौटुंबिक प्रश्न लोकगीतांमधून स्त्री-भावना समस्या उत्कट रीत्या व्यक्त होतात. (ओव्या).

सामाजिक परिवर्तन ही सर्वव्याप्ती व सातत्याने चालणारी एक महत्वपुर्ण प्रक्रिया आहे. सामाजिक परिवर्तनासाठी कारणीभूत वेगवेगळया घटकांबरोबरच सांस्कृतिक घटक अत्यंत महत्वपुर्ण होय. त्या संदर्भात 'डॉसन आणि गेटिस' या समाजशास्त्रज्ञांच्या मतानुसार 'सामाजिक परिवर्तन आणि सांस्कृतिक परिवर्तन यात काहीच भेद नसुन दोन्हीही एकच आहे' मनुष्य हा संस्कृतीच्या सहाय्यानेच जीवन जगत असतो. आधुनिक युगात इतर देशासमोर आपले अस्तित्व टिकवायचे असले तर सांस्कृतिक ऐक्य टिकवून ठेवणे आवश्यक आहे. सांस्कृतिक संघर्ष झाला तर समाजपरिवर्तन होणारच परंतु सांस्कृतिक घटकातील अभौतिक संस्कृती ही तिच्यातील धर्म, नैतिकता, भाषा, साहित्य, कला, नृत्य, श्रध्दा, प्रथा-रुढी, लोकाचार, लोकनीति यांद्वारा आदर्श निर्माण करीत असते सांस्कृतिक एकोपा अत्यंत महत्वपुर्ण असतो. कारण 'स्वं'चा अतिरेक सांस्कृतीक दिनाश घडवू शकतो. सांस्कृतीक दिनाश म्हणजे देशाची हानि होय. एकुणच संस्कृतीच्या सांघिक शक्तीला अनुसरणे आज आवश्यक झाले आहे. कारण कोणत्याही लोकसमूहाचे साहित्य हे तेथील संस्कृतीचे संवेदनशील फलित असते. सांस्कृतिक जीवनाचे आणि लोकसाहित्याचे जवळचे नाते आहे. मानवाच्या सांस्कृतिक जीवनात त्याची करमणुक, त्याचे छंद, खेळ, फावल्या वेळेचे उपाय, दैनंदिन जीवनात सुखी होण्यासाठीचे प्रयत्न सामूहिक भावना या सर्व बाबींमधून देशाची संस्कृती कळत असते. आजचे चित्र पाहता लक्षात येते की जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये होणाज्या अंतर्बाहय बदलांमुळे नवे सांस्कृतिक संघर्ष जन्माला येत आहेत. अशावेळी

सांस्कृतिक मूल्य, रुढी, परंपरा, नीतितत्वे, यांसारखी नियमने यांचे बीजारोपण व्यक्तींच्या मनात रुजवून वैयक्तिक स्वार्थ आणि व्यापक सामाजिक हित यामध्ये समतोल साधण्याची मनोवृत्ती प्रत्येक व्यक्तीच्या मनात निर्माण करण्याचे कार्य लोकसाहित्य करीत असते. मनुष्य आपल्या अभिव्यक्तीरुपी संपत्तीचा मालक असतो. जेव्हा अभिव्यक्ती निश्चित ठराविक अशा लोकसमूहातून होत जाते तेव्हा तिच्या सूरामध्ये आणि प्रयोजनामध्ये एकसूत्रीपणा, शिस्त, सराव आणि परंपरा यांना महत्व लाभते. त्यादृष्टीने लोकसाहित्य समाजाची व संस्कृतिची एकता जपण्याचे कार्य सहजपणे करतांना दिसून येते.

आजच्या परिवर्तनशील युगात लोकजीवनातील परंपरा त्यांची अर्थपुर्णता यासंबधी अनेक प्रश्न निर्माण होऊ लागले आहेत. सामाजिक परिवर्तनामुळे संपुर्ण समाजाची पुनर्घटना होत आहे. पारंपारिक जीवनाला आज कालानुरुप जुळवून घेतल्याशिवाय पर्याय राहिलेला नाही. लोकसाहित्याचा अभ्यास करतांना लोकपरंपरांचा अभ्यास, सामग्रीचे पध्दतशीरपणे संकलन, अध्ययन करणे गरजेचे ठरेल कारण लोकसाहित्यातील लोकवाङ्ःमयरुपी विविधता लोकांमधील समान विचारांचे द्योतक ठरते. तसेच संस्कृती ही जनसमूहाची एक अशी चौकट आहे की त्यामध्ये जनसमूहरुपी समाजाचे विचार प्रकट होतात. त्यामुळे नव्या काळानुसार, नवे संस्करण करुन, चिकित्सक व डोळस संशोधक दृष्टीने लोकसाहित्याचा वारसा जतन करुन संवर्धित केला तर योग्य दिशेने समाजपरिवर्तन होईल. व सदृढ समाज निर्माण होईल. पर्यायाने सामाजिक, सांस्कृतिक एकता, राष्ट्रीय एकात्मता निर्माण करण्यात लोकसाहित्याचा सिहांचा वारा राहणार असे मानणे अतिशयोक्तीचे ठरणार नाही.

निष्कर्ष

1. लोकसाहित्य हे समाजजीवनाशी थेट निगडित असल्याने ते समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम ठरते.
2. लोकसाहित्यातून समाजातील अन्याय, विषमता व शोषणाविरोधातील लोकभावना व्यक्त होतात.
3. समाजजागृती, नैतिक मूल्यसंवर्धन व सामूहिक जाणीव निर्माण करण्यात लोकसाहित्याची महत्त्वपूर्ण भूमिका आहे.
4. आधुनिक काळातही लोकसाहित्य समाजपरिवर्तनाची प्रक्रिया समजून घेण्यासाठी उपयुक्त ठरते.
5. लोकसाहित्य हे केवळ सांस्कृतिक वारसा नसून परिवर्तनशील सामाजिक साधन आहे, हे या अभ्यासातून स्पष्ट होते.

संदर्भ सुची :-

१) श्री. ना. रा. शेंडे : लोकसाहित्य संपदा
२) गंगाधर मोरजे :- लोकसाहित्य बदलते संदर्भ
३) प्रा.पी. के. कुलकर्णी: सामान्य समाजशास्त्र
४) प्रा.पी. के. कुलकर्णी सामान्य समाजशास्त्र
५) डॉ. सरोजिनी बाबर लोकसाहित्य भाषा आणि संस्कृती
६) डॉ. राजकुमार सिंह लोकसाहित्य एवं लोकसंस्कृती

मध्ययुगीन काळातील समाज आणि संस्कृती

दिपक मधुकर वाघमारे
संशोधन अभ्यासक
विभाग:- इतिहास विभाग
श्री. शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला

प्रस्तावना

मध्ययुगीन भारत इतिहास

भारतीय इतिहासातील मध्ययुगीन काळ, साधारणपणे ८ व्या ते १८ व्या शतकापर्यंत पसरलेला सामाजिक संरचना, आर्थिक जीवन आणि सांस्कृतिक अभिव्यक्तीमध्ये खोलवर बदल घडवून आणणारा होता. या काळात प्रादेशिक राज्यांचा उदय, दिल्ली सल्तनत आणि मुघल साम्राज्याद्वारे इस्लामिक राजवटीची स्थापना आणि सातत्य आणि बदल दोन्ही प्रतिबिंबित करणाऱ्या संयुक्त सांस्कृतिक परंपरांचा उदय झाला. भारतीय इतिहासातील मध्ययुगीन काळ हा या प्रदेशाच्या सामाजिक आणि सांस्कृतिक विकासात एक महत्त्वाचा काळ होता. परंपरा आणि इस्लामिक प्रभावांमधील परस्परसंवादामुळे एक गतिमान समाज निर्माण झाला जो वैविध्यपूर्णसमाजाचे विभाजन भारत, हिंदू आणि मुस्लिमांमध्ये विभागलेला होता. हे सांगण्याची गरज नाही की, हिंदू लोकसंख्येचा मोठा भाग होते, ज्यामध्ये जैन, बौद्ध आणि शीख यांचा समावेश होता. हिंदू समाजातील उच्च वर्ग बहुतेक ब्राह्मण, कायस्थ, राजपूत आणि वैश्य जातींचे होते जे आपापसात जेवण करत नव्हते किंवा लग्न करत नव्हते. समाजात इतर अनेक मिश्र वंशाचे लोक होते. बैद्य ही एक मिश्र वंशाची जात होती जी ब्राह्मणांसोबत राहत होती. याशिवाय, सामाजिक मिश्रणामुळे, म्हणजेच जातींमधील आंतरविवाहांमुळे निर्माण झालेल्या इतर असंख्य जाती आणि उपजाती होत्या. उच्चवर्गीय हिंदू अत्यंत रूढीवादी होते. मुस्लिम दोन गटात विभागले गेले होते: जे विजेत्यांसोबत आले होते किंवा अरबस्तान, पर्शिया, अफगाणिस्तान आणि अबिसिनिया सारख्या देशांमधून व्यापार आणि वाणिज्य किंवा नोकरीसाठी आले होते आणि जे स्थानिक हिंदू लोकसंख्या आणि त्यांच्या वंशजांमधून धर्मांतरित झाले होते. मुघल राजांच्या आगमनाने भारतात प्रचंड परिवर्तनाचा काळ सुरू झाला. मध्ययुगीन काळात साहित्य कला आणि वास्तुकला, तसेच सांस्कृतिक आणि धार्मिक बदल, राजवंश आणि अनेक शासकांच्या क्षेत्रात मोठे योगदान देण्यात आले. या काळात त्यांनी बांधलेल्या स्मारके आणि वास्तुशिल्पीय भूदृश्यांमध्ये महान राजांचे योगदान अजूनही दिसून येते.

कीवर्ड - मध्ययुगीन, वैश्य, अभिव्यक्ती, संरचना, वास्तुकला, परिवर्तन, रुढीवादी, सल्तनत

सामंती समाज

मुघल काळात, समाज सरंजामशाही स्वरूपाचा होता. समाजात उच्च दर्जाचे कुलीन वर्ग आणि राज्य अधिकारी होते. त्यांचे राहणीमान खूप उच्च होते. त्यांच्या विशिष्ट वैशिष्ट्यांमध्ये विलासिता, व्यभिचार, मद्यपान इत्यादींचा समावेश होता.राजे आणि सम्राटांव्यतिरिक्त, श्रेष्ठींचे स्वतःचे हरम होते. अबुल फजलच्या मते, शाही हरममध्ये ५,००० महिला राहत होत्या. परस्पर मत्सर, कट रचणे आणि दोषारोप हे श्रेष्ठी वर्गाचे वैशिष्ट्य होते. मध्यमवर्ग, जो संख्येने तुलनेने लहान होता, तो खानदानी लोकांच्या खाली अस्तित्वात होता. त्यांचे राहणीमान सामान्य होते, ते खानदानी आणि राज्य अधिकाऱ्यांपेक्षा खूपच कमी होते. मध्यमवर्गीय लोक मद्यपान, व्यभिचार आणि ऐश्वर्य यासारख्या आधुनिक सवयींपासून दूर होते. तथापि, भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील व्यापारी प्रचंड श्रीमंत होते आणि त्यांचे राहणीमान देखील खूप उच्च होते. उच्चभ्रू आणि मध्यमवर्गीयांच्या तुलनेत सामान्य लोकांची परिस्थिती दयनीय होती. त्यांच्याकडे उबदार कपडे, बूट आणि इतर चैनीच्या वस्तू खरेदी करण्यासाठी पुरेसे पैसे नव्हते.सामान्य वर्षात, त्यांना स्वतःचे पालनपोषण करण्यात कोणतीही अडचण येत नव्हती, परंतु पूर, दुष्काळ आणि दुष्काळ यासारख्या नैसर्गिक आपत्तींच्या काळात त्यांची परिस्थिती वर्णन करण्यासारखी नसते.

वाईट प्रथा

अकबराने सती आणि बालविवाह यासारख्या वाईट प्रथा थांबवण्याचा प्रयत्न केला. अठराव्या शतकात बंगालमध्ये सामाजिक दुष्कर्म वाढले. महाराष्ट्रात हुंडाबंदी होती. भारताच्या काही भागात विधवा पुनर्विवाह सामान्य होता. अठराव्या शतकात सामाजिक जीवनातील विविध प्रकारच्या अधोगतीपैकी, एक मुक्त करणारे वैशिष्ट्य म्हणजे

हिंदू-मुस्लिम पुनर्संवादाची चिकाटी आणि दोन महान भारतीय समुदायांमधील समजूतदारपणा आणि मैत्रीचा विकास. औरंगजेबाच्या कारकिर्दीतही, अलवाल नावाच्या एका मुसलमान कवीने अनेक हिंदी कविता लिहिल्या आणि अकबराच्या कारकिर्दीत पद्मावतचे बंगालीमध्ये भाषांतर केले. हिंदू मुस्लिम पीरांना (संतांना) आदर देत असत, तर मुस्लिम हिंदू योगींना (संतांना) आदर देत असत.

गुलामगिरी

गुलामगिरी ही समाजाच्या नैतिकतेला धक्का देणाऱ्या संस्थांपैकी एक होती आणि तिथे नियमित गुलामांचा व्यापार होत असे. त्याचप्रमाणे, नपुंसकांची खरेदी-विक्री केली जात होती. त्यावर बंदी घालण्याचा अकबराचा प्रयत्न अयशस्वी झाला. ड्रेस, दागिने आणि खेळपोशाख, दागिने आणि खेळउच्च वर्गातील लोक लांब कोट, हलके पँट आणि पगडी घालत असत. बरेच लोक त्यांच्या कमरेभोवती रेशीम किंवा कापसाचा स्कार्फ बांधत असत आणि त्याचे टोक पायांना लटकवत असत. गरीब हिंदू कमरेला एक टोक बांधलेले धोतर घालत असत तर गरीब मुस्लिम पायजमा आणि लांब शर्ट घालत असत. हिंदू आणि मुस्लिम पुरुष आणि स्त्रिया दोघेही सुगंधी तेल आणि तेल वापरत असत. हिंदू महिला साड्या घालत असत, तर मुस्लिम महिला पायजमा किंवा घागरा घालत असत. मुस्लिम पुरुष आणि स्त्रिया डोळ्यांत कोलीरियम वापरत असत आणि स्त्रिया त्यांचे तळवे आणि पाय रंगविण्यासाठी मेहदी वापरत असत. बुद्धिबळ, पत्ते, गिटारचे खेळ आणि सतरंज हे घरातील खेळ लोकप्रिय होते आणि शिकार, पोलो (चौगन) आणि इतर मैदानी खेळ वरच्या भागात लोकप्रिय होते. सर्वांनी कुस्ती, जुगलिंग आणि जादूचे कार्यक्रम आणि इतर गोष्टींचा आनंद घेतला. सम्राटाला वाघांची शिकार करणे आणि हत्ती पकडणे यासारख्या कामांमध्ये सहभागी होण्याचा अधिकार होता.

सण

मेळे आणि उत्सव, विशेषतः राज्य प्रायोजित, जसे की नौरोज, हे सर्वांसाठी दरबारात आणि खाजगी निवासस्थानांमध्ये संगीताचा आनंद घेण्याचे प्रसंग होते.दसरा, वसंत आणि दीपावली (जे औरंगजेबाच्या कारकिर्दीत निषिद्ध होते) आणि दोन ईद, शब-ए-बारात आणि इतर मुस्लिम सण संबंधित समुदायांमध्ये लोकप्रिय होते. हरिद्वार, प्रयाग, मथुरा, कुरुक्षेत्र आणि इतर अनेक हिंदू तीर्थस्थळे तसेच अजमेर, पानीपत, सरहिंद आणि इतर मुस्लिम तीर्थस्थळांमध्ये अधूनमधून मेळे भरत असत.

महिलांची स्थिती

मुघलांच्या काळात महिलांची स्थिती लक्षणीयरीत्या खालावली. मुस्लिम महिलांची पडदा पद्धत आणि हिंदू कौटुंबिक जीवनात वाढत्या रूढीवादामुळे, ज्यामुळे सर्वात खालच्या जातीतील हिंदू महिलांना घराबाहेर पडण्यास मनाई होती, त्यामुळे महिलांचे जीवन खूपच दुःखद बनले. कुराणाच्या कायद्याने बहुपत्नीत्वाला परवानगी दिली होती. शिया मुस्लिमांना किती बायका असू शकतात यावर मर्यादा नव्हती. हिंदू शासक वर्ग बहुपत्नीत्वाचा अवलंब करत असला तरी, मुस्लिमांना जवळजवळ नेहमीच एकापेक्षा जास्त बायका असायच्या. सम्राट आणि श्रेष्ठी एक हरम ठेवत असत, जो अविवाहित महिलांचा समूह होता.

मध्ययुगीन भारतीय अर्थव्यवस्था

मध्ययुगीन काळात अर्थव्यवस्था प्रामुख्याने कृषीप्रधान होती, परंतु स्थिर प्रशासकीय व्यवस्था आणि भरभराटीच्या आंतरराष्ट्रीय संबंधांमुळे व्यापार, हस्तकला आणि शहरी व्यापारातही उल्लेखनीय वाढ झाली. दिल्ली सुलतानांमधील इक्ता प्रणाली आणि मुघलांच्या काळातील जमीनदारी प्रणाली मध्यस्थांमार्फत जमीन महसूल वसूल करण्याचे आयोजन करत असे. शेतकरी वस्तू किंवा रोख स्वरूपात कर भरत असत, तर कालवे, टाक्या आणि विहिरी यांसारख्या सिंचन प्रणाली कृषी उत्पादकतेला आधार देत असत.वनक्षेत्रात लागवडीचा विस्तार झाल्यामुळे नवीन जमिनी नांगरणीखाली आल्या, ज्यामुळे आदिवासी समुदाय कृषी व्यवस्थेत सामील झाले. व्यापार आणि वाणिज्य: मध्ययुगीन भारतात अंतर्गत आणि बाह्य व्यापार भरभराटीला आला.अंतर्गत व्यापार बाजारपेठा (मंडई) आणि मेळयांच्या माध्यमातून शहरे आणि गावे जोडत असे.

उद्योग आणि हस्तकला उत्पादन: भारतीय कारागीरांनी कापूस आणि रेशीम कापड, धातूची भांडी, दागिने आणि शस्त्रे यासारख्या उच्च दर्जाच्या वस्तूंचे उत्पादन केले. बनारस, पटना, बुरहानपूर आणि ढाका सारख्या वस्त्रोद्योग केंद्रांना जागतिक कीर्ती मिळाली. मुघल कारखान्यांनी (शाही कार्यशाळा) दरबारासाठी संघटित औद्योगिक उत्पादनाचे उदाहरण दिले.

चलन व्यवस्था: सलग राजवंशांतून नाणी विकसित झाली. दिल्लीच्या सुलतानांनी चांदीच्या टंका आणि तांब्याच्या जितल नाण्यांचे प्रमाणीकरण केले, तर मुघलांनी सोन्याचे मोहर आणि चांदीचे रूपिया सादर केले, जे आर्थिक सुसंस्कृतपणा दर्शवते. चलन परिसंचरणामुळे व्यापार आणि कर कार्यक्षमता वाढली.

सांस्कृतिक आणि धार्मिक जीवन

मध्ययुगीन काळात धर्म आणि संस्कृतीतील परंपरांचे एक मोठे संश्लेषण दिसून आले. धार्मिक क्षेत्रात, भक्ती चळवळ आणि सूफीवाद ही उदाहरणे आहेत. वैयक्तिक भक्तीद्वारे देवाशी एकात्मतेवर भर देणारी भक्ती चळवळ सामान्य लोकांच्या जीवनाच्या अगदी जवळ आली. त्यात कर्मकांड आणि बलिदानांपेक्षा प्रेम, पवित्रता आणि भक्तीवर भर देण्यात आला. त्यात जातिव्यवस्था आणि ब्राह्मणांच्या अधिकारावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले. रामानंद, कबीर, रविदास, मीरा बाई, गुरु नानक, तुकाराम आणि चैतन्य महाप्रभू यांसारख्या भक्ती संतांचा सामान्य लोकांच्या मनावर खोल प्रभाव होता आणि हा प्रभाव आजही कायम आहे.खरं तर, यापैकी काही संतांना मोठ्या प्रमाणात अनुयायी मिळाले. उदाहरणार्थ, गुरु नानक यांचे पंजाबमधील लोकांवर लक्षणीय प्रभुत्व होते. त्यांच्या मोठ्या अनुयायांनी त्यांना शीख धर्म नावाचा एक नवीन धर्म स्थापन करण्यास प्रेरित केले, ज्याचे अनुयायी शीख म्हणून ओळखले जातात.त्याचप्रमाणे, सूफी संतांनी भक्ती आणि प्रेम हेच परमात्म्याची प्राप्ती करण्याचा एकमेव मार्ग असल्याचे सांगितले. ते सहिष्णुता आणि करुणेचा पुरस्कार करत. ते कठोर जीवन जगत होते आणि सामान्य लोकांच्या दुःखात आणि चिंतांमध्ये सहभागी होत होते. परिणामी, हिंदू आणि मुस्लिम दोन्हीही जनतेवर त्यांची पकड प्रचंड होती. सूफी आणि भक्ती संतांमध्येही खूप संवाद झाला आणि तात्विक विचारांची देवाणघेवाण झाली. खरं तर, दोन्ही परंपरा दोन समुदायांमधील दुवा म्हणून काम करत होत्या.

कला आणि चित्रकला

भाषा, साहित्य, कला, वास्तुकला, संगीत आणि नृत्य या सर्वांनी वेगवेगळ्या परंपरांचे मिश्रण करण्याच्या या प्रवृत्तीचे उदाहरण दिले. भाषा आणि साहित्याच्या क्षेत्रात फारसी आणि संस्कृत सारख्या अभिजात भाषांची भरभराट झाली. मुघलांच्या शाही कारखानांमध्ये चित्रकला आयोजित केली जात असे आणि चित्रकारांना सरकारकडून पैसे दिले जात असे.मुघल चित्रकला शाळा ही पर्शियन आणि भारतीय शैलींचे संपूर्ण मिश्रण होती. याचे कारण असे की या शाळेतील कलाकारांनी त्यांच्यासोबत राजपुताना, गुजरात, मालवा इत्यादी विविध परंपरांमधील घटक आणले होते. दासवंत, बसवन, मुकुंद आणि केशव हे काही प्रसिद्ध चित्रकार होते. अब्दुल समद आणि सय्यद अली सारख्या पर्शियन कलाकारांच्या देखरेखीखाली पर्शियन शैलीचा एक घटक देखील सादर करण्यात आला.मुघल चित्रकलेचे आणखी एक वेगळे वैशिष्ट्य म्हणजे हस्तलिखित चित्रण.अकबर, जहांगीर आणि शाहजहान यांनी या कलाकारांना पाठिंबा देणे सुरू ठेवले आणि परिणामी, मुघल चित्रकला शाळा भरभराटीला आली.एक उदारमतवादी शासक म्हणून, अकबराने चित्रकलाला आपले संरक्षण दिले. परिणामी, त्यांच्या काळात, पर्शियन आणि भारतीय शैलींचे (चित्रकलेच्या) मिश्रण झाले. भारतीय चित्रकलेवर युरोपीय प्रभावाचे पुरावे देखील होते. प्रसिद्ध चित्रकार जहांगीरच्या काळात मुघल चित्रकला शिखरावर पोहोचली. उस्ताद आणि अबुल हसन सारख्या प्रसिद्ध चित्रकारांनी त्यांचे दरबार सजवले. मन्सूर त्यांच्या लघुचित्रांसाठी प्रसिद्ध झाला. सोळाव्या ते अठराव्या शतकापर्यंत, मुघल चित्रकला शाळेने इंडो-पर्शियन लघु कला शाळेला जन्म दिला. लँडस्केप, तसेच मानवी आकृत्या आणि पोशाख, मुघल दरबारातील चित्रकारांनी सादर केले. पारंपारिक भारतीय शैलींशी परिचित झाल्यावर ते अधिक नैसर्गिक झाले. लघुचित्रांवर सही करणे देखील एक परंपरा बनली. कलाकारांना आता मासिक आधारावर पैसे दिले जात होते. ते चंगेजनामा, जफरनामा आणि रामायण यांसारख्या कलाकृतींचे चित्रण करत असत.

आधुनिक भाषांचा उदय

या काळात अनेक आधुनिक भारतीय भाषांचा उदय हा आणखी एक महत्त्वाचा विकास होता. उर्दूचा उगम दिल्लीत झाला असावा. चौदाव्या शतकाच्या सुमारास जेव्हा अल्लाउद्दीन खिलजीचे सैन्य दख्खनमध्ये तैनात होते, तेव्हा ती छावणीची भाषा म्हणून झाली. खरं तर, विजापूर आणि गोलकोंडा ही दख्खनची राज्ये उर्दू साहित्याची जन्मभूमी बनली. भाषेने लवकरच स्वतःचे व्याकरण विकसित केले आणि ते वेगळे बनले. कालांतराने उच्चभ्रूंनीही ते स्वीकारले. या भाषेत कविता लिहिणारे प्रसिद्ध कवी अमीर खुसरो यांनीही या भाषेच्या लोकप्रियतेत योगदान दिले. अठराव्या आणि एकोणिसाव्या शतकात उर्दूमध्ये कवितांव्यतिरिक्त सुंदर गद्य, लघुकथा, कादंबऱ्या आणि नाटक लिहिले गेले. एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात स्वातंत्र्यलढ्यात उर्दू पत्रकारितेने महत्त्वाची भूमिका बजावली.

उर्दूबरोबरच, बंगाली, आसामी, उडिया, खारी बोली, पंजाबी, गुजराती, मराठी, सिंधी, काश्मिरी आणि चार दक्षिण भारतीय भाषा – तमिळ, तेलगू, कन्नड आणि मल्याळम – यासारख्या जवळजवळ सर्व आधुनिक भारतीय भाषा या काळात उदयास आल्या आणि विकसित झाल्या.

मध्ययुगीन काळात वास्तुकला

मध्ययुगीन भारतातील सांस्कृतिक जीवनाचा आणखी एक आकर्षक पैलू म्हणजे त्याची इंडो-इस्लामिक वास्तुकला. भारतीय संसाधने, कौशल्ये, आकृतिबंध आणि डिझाइन्सचे पर्शियन शैलीशी जुळवून घेतल्याने ते वेगळे आहे.कमानी आणि घुमट यासारख्या नवीन घटकांना घंटा, कमळ, स्वस्तिक आणि कलश/पाण्याचे भांडे यासारख्या हिंदू आकृत्यांसह एकत्र केले गेले. कुतुबमिनार, अल्लाई दरवाजा आणि गियासुद्दीन तुघलकच्या थडग्यासारख्या तुघलक काळातील विविध स्मारके ही दिल्ली सल्तनत काळातील स्थापत्यकलेची उत्कृष्ट उदाहरणे आहेत. मुघल काळातील स्मारके इंडो-इस्लामिक शैलींच्या संमिश्रणाची आणि आत्मसाततेची सखोल भावना प्रतिबिंबित करतात.फतेहपूर सिक्रीमधील पंच महाल, बिरबलचा राजवाडा आणि इबादत खाना, तसेच दिल्लीतील हुमायूनचा मकबरा, सिकंदरा येथील अकबरचा प्रसिद्ध मकबरा, आग्रा येथील इतमादुदौलाचा मकबरा आणि ताजमहाल ही मुघल वास्तुकलेची उत्कृष्ट उदाहरणे आहेत.

मध्ययुगीन काळातील संगीत

भारतातील बहुतेक मध्ययुगीन शासक देखील संगीताचे चाहते होते. भारतीय गायन आणि वाद्य संगीत प्रणाली अरब, इराणी आणि मध्य आशियाई संगीत परंपरांशी संवाद साधत होत्या.नवीन राग लिहिण्यास सुरुवात झाली. भक्ती आणि सूफी परंपरांनी नवीन भक्ती संगीत शैलींवरही प्रभाव पाडला. मुघल सम्राट अकबर, जहांगीर आणि शाहजहान यांनी अनेक संगीतकारांना आश्रय दिला. अकबराच्या दरबारात अलंकार घालणाऱ्या तानसेनने केवळ पारंपारिक राग गायले नाहीत तर नवीन रागही रचले. शाहजहान हा एक प्रतिभावान गायक होता असे म्हटले जाते.हे संगीतकार दिवसाच्या वेगवेगळ्या वेळी आणि ऋतूंमध्ये योग्य रागांनी सम्राटांचे मनोरंजन करत असत.

संगीत आणि सादरीकरण कला

राजेशाही आणि लोकप्रिय संरक्षणाखाली संगीत, नृत्य आणि चित्रकला भरभराटीला आली. प्रसिद्ध कवी आणि संगीतकार अमीर खुसरो यांनी नवीन राग विकसित केले आणि भारतीय शैलींमध्ये पर्शियन संगीत परंपरांचा परिचय करून दिला.मुघलांच्या काळात, दरबारी संगीत हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतात विकसित झाले, तर दक्षिणेने कर्नाटक परंपरेचे पालनपोषण केले. मंदिरातील कथाकथनातून उगम पावलेल्या कथकसारख्या नृत्यप्रकारांनी पर्शियन प्रभाव आत्मसात केला आणि दरबारातील कला बनली. मुघल कलागृहांनी, विशेषतः अकबर, जहांगीर आणि शाहजहान यांच्या काळात, उत्कृष्ट लघुचित्रे तयार केली .

शहरी संस्कृती आणि दैनंदिन जीवन

मध्ययुगीन शहरी केंद्रे आर्थिक आणि सांस्कृतिक क्रियाकलापांनी भरभराटीला आली होती.दिल्ली, लाहोर, अहमदाबाद आणि आग्रा ही शहरे बहुसंख्य होती, जिथे कारागीर, व्यापारी, विद्वान आणि गूढ लोक राहत होते. कापड, मसाले आणि दागिन्यांच्या व्यापाराने बाजारपेठा गजबजल्या होत्या. कॉफी हाऊस आणि बागा कविता, संगीत आणि चर्चेसाठी सामाजिक जागा म्हणून काम करत असत.

निष्कर्ष

भारतीय इतिहासाचा मध्ययुगीन काळ, ज्यामध्ये राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक जीवनाची विशिष्ट वैशिष्ट्ये होती, तो प्राचीन काळानंतरचा आणखी एक महत्त्वाचा उल्लेखनीय काळ होता. भारतातील सांस्कृतिक परिस्थिती सर्व नवीन लोकांना आकर्षित करत राहिली आणि परिणामी सांस्कृतिक संवादाने भारतीय संस्कृतीला बहुआयामी, बहुभाषिक, बहुधार्मिक आणि तरीही संमिश्र स्वरूप दिले.

संदर्भ ग्रंथ

१. मध्ययुगीन भारतीय समाज एवं संस्कृति By Dr. Jharkhand Choubey; Dr. Kanhaiyalal Srivastava

२. सतीश चंद्रा (Satish Chandra): “History of Medieval India” (दिल्ली सल्तनत ते मुघल) – हिंदी/इंग्रजीमध्ये उपलब्ध [२].

३. मध्ययुगीन भारत (१५२६-१७४८): सतीश चंद्रा यांचे हे पुस्तक मुघल साम्राज्यावर विशेष लक्ष केंद्रित करते [९].

४. सह्याद्री बुक्स (Sahyadri Books): “मध्ययुगीन भारताचा इतिहास” (डॉ. एम. एम. देशमुख १२०६ ते १७६१) [११]

बदलत्या ग्रामीण जीवनाचा वेध घेणारी कथा

संशोधक

पूजा अशोकराव शहाणे

(स्वा.रा.ती.म.विद्यापिठ, नांदेड)

आसाराम लोमटे हे समकालीन मराठी साहित्यातील एक अत्यंत महत्त्वाचे नाव असून, त्यांच्या कथांनी ग्रामीण साहित्याला एक वेगळी उंची आणि वास्तववादी दिशा दिली आहे. प्रामुख्याने 'इडा पीडा टळो' आणि 'आलोक' यांसारख्या कथासंग्रहातून त्यांनी शेतकरी जाणीवांचे प्रगल्भ चित्रण केले आहे. लोमटे यांच्या कथांमधील शेतकरी केवळ 'नांगर धरणारा' नायक नाही, तर तो बदलत्या जागतिकीकरणाच्या रेट्यात सापडलेला एक हताश माणूस आहे. निसर्गाचा लहरीपणा (दुष्काळ किंवा अतिवृष्टी) आणि बाजारपेठेचे क्रूर वास्तव यामध्ये अडकलेल्या शेतकऱ्याची अगतिकता ते अत्यंत बारकाव्याने टिपतात. पारंपारिक ग्रामीण साहित्यात जे 'गोडवे' गायले जात, त्याला फाटा देत लोमटे यांनी ग्रामीणजीवनातील विद्रुपता आणि दाहक वास्तव मांडले. शेतीचा तुटपुंजा नफा, शहराकडे होणारे स्थलांतर, गावगाड्यातील बदललेली नैतिक मूल्ये यांचे प्रभावी चित्रण त्यांच्या कथेतून आले आहे. 'चरक' या कथेत शेतीतून येणाऱ्या पिकामुळे मन हरकून गेलेल्या शेतकऱ्याची अवस्था लोमटे यांनी अत्यंत वास्तव स्वरूपात मांडली आहे. या कथेतील नागनाथ हा स्वप्नातच आपल्या शेतात पेरलेल्या उसातून येणाऱ्या पैशातून अंगावरची देणी-घेणी करण्याचा बेत आखतो.

"मागच्या साली कारखान्यानं टनाला सहाशे रुपये भाव दिला. यंदा भावात **वाढ** करू असं चेअरमननंच कारखान्याचं बॉयलर पेटवायच्या वेळेला सांगितलं.पण आपण तितकाच धरलाय. टनाला सहाशे रुपये जरी धरला तरी तीन एकरातल्या आपल्या उसाचे पन्नासेक हजार कुठंच गेले नाहीत. मागं काही जरी नाही पडलं तरी देणं सगळं हटंन. एकदा गाळातून वर निघाल्याबिगर सरळसोट रस्ता दिसत नाही. दरवर्षी दोन **एकरात** काय व्हायचं? दोन दिवसच हातात पैसा दिसायचा, पण पुन्हा निस्ती वढाताण, ढोरासारखं काम करायचं अन् हातात काहीच नाही. म्हणून यंदा एकरभर ऊस वाढविलाय. देणं सगळं कटून साल कडीला जाईन. टकुऱ्यावर चाळीस हजाराचं कर्जय. यंदा ते सगळ्याला सगळं काटून टाकायचं. भावकीत भांडणं झालं. इहीर आपल्या ताब्यातून गेली.मागच्या दोन वर्षापासून ऊस जोपलेला. यंदा कसा फुकून द्यावा म्हणून कॅनॉलचे पाणी वावरापस्तोर वढलं. पाईपलाईन-मोटारचा खर्च इस हजार; पुन्हा व खताडाचं देणं राह्यलंय. बैल ह्या साली नवे घेतले. असं सगळं मिळून चाळीस हजाराच्या घरात पाणी शिरलंय. ईस हजाऊ बँकेचे अन् ईस हजार पाव्हण्या-रावळयाकडून जमा केलते. निभलं कसं तरी; एकदा ऊस कारखान्याला गेला की छाताडावरचा दगड हलका झाल्यासारखं वाटंन. आपला ऊस न जायला काय झालं? हिरवागार उसंय. कारखान्यानं ताडन पाडली तरी उसाला काही होत नाही. डोळ्यापुढे हिरवेगार कागदं सहकायलेत. गांधीबाबाचा फुटू असल्याले. आरं, ह्या नोटा हायता वाटतं. कव्हर सावडावतात? धोतराचा सगळा सोपा भरलाय. उसाच्या रानातला कसला तरी गुडचीट वास नाका-तोंडात बसलाय. हुसासच दबल्यावाणी झाला. नागनाथ मोठ्यानं चिरकला. 'मायोऽऽ"[१]

शेतकऱ्याचा माल जेव्हा बाजारात येतो, तेव्हा त्याची होणारी लूट आणि हमीभावाचा अभाव यातून येणारे नैरश्यच त्याच्या पदरी पडते. तसेच राजकारणामुळे देखील शेतकऱ्याला अनेक अडीअडचणींना सामोरे जावे लागते प्रस्तुत कथेत नागनाथच्या गावाच्या आजूबाजूच्या गावातील सर्वांचा ऊस खरेदी केला जातो,मात्र नागनाथच्या गावातील ऊस खरेदी केला जात नाही.याचे कारण असे असते की, गाव काँग्रेसचं अन् आमदार शिवसेनेचा यामुळे त्याच्या गावातील ऊस खरेदी केला जात नाही कारण मतदानाच्या वेळेस नागनाथच्या गावातून आमदाराला मतदान झालेले नसते. याचे वास्तव चित्रण प्रस्तुत कथेतून मांडले आहे. लोमटे यांच्या कथा केवळ आर्थिक टंचाईवर भाष्य करत नाहीत, तर शेतकऱ्याच्या मानसिक अवस्थांचे दर्शन घडवतात. शेती विकण्याची वेळ आल्यावर होणारी मनाची घालमेल, मुलांचे शिक्षण आणि लग्नासाठी करावी लागणारी तडजोड आणि या सगळ्यात हरवत चाललेलं 'माणूसपण' याचे सूक्ष्म चित्रण त्यांच्या लेखनात दिसते. त्यांच्या लेखणीत मराठवाड्याची माती आणि तिथली बोलीभाषा यांचे अद्वैत आहे. पात्रांच्या संवादातून आणि वर्णनातून शेतीकामातील संज्ञा, अवजारे आणि ग्रामीण संस्कृतीचे बारकावे इतक्या जिवंतपणे येतात की, वाचकाला तो अनुभव स्वतःचा वाटतो. ज्याप्रमाणे जमिनीत ओलावा उरलेला नाही, तसाच माणसांच्या नात्यातील ओलावाही कसा आटत चालला आहे, याचे चित्रण यात आहे. शेतकरी आता केवळ नैसर्गिक दुष्काळाशी नाही, तर 'भावनिक दुष्काळाशी' देखील लढतोय.काही कथांमध्ये शेती सोडून शहरात गेलेला किंवा नोकरी लागलेला ग्रामीण माणूस जेव्हा पुन्हा गावाकडे बघतो, तेव्हा त्याच्या नजरेतील संभ्रम आणि स्वार्थ लोमटे यांनी अचूक टिपला आहे. प्रशासकीय व्यवस्था, बँका आणि राजकीय नेते हे कशाप्रकारे शेतकऱ्याला केवळ एक 'व्होट बँक' किंवा 'आकडा' म्हणून पाहतात, याचे जळजळीत वास्तव या कथांतून येते.मोबाईल आणि सोशल मीडियाच्या काळात ग्रामीण तरुण कसा भरकटला आहे आणि त्याचा शेतीवरील विश्वास कसा उडत चालला आहे, हेही 'आलोक' मधील काही कथा अधोरेखित करतात. त्यांच्या कथांमधून 'हंगाम' नावाचा जो शब्द येतो, तो केवळ पिकाचा नसून तो जगण्याच्या संघर्षाचा हंगाम वाटतो. पात्रांची नावे आणि त्यांच्या समस्या इतक्या जिवंत असतात की, वाचताना आपण स्वतः मराठवाड्यातील एखाद्या वाडी-वस्तीवर उभे आहोत असे वाटते. डॉ. नानासाहेब पवार म्हणतात,

"आसाराम लोमटे यांनी आपल्या कथा साहित्यातून सातत्याने मराठवाड्यातील बदलत्या ग्रामीण जीवनाचा वेध घेतला आहे."[२]

ग्रामीण साहित्यात सहसा स्त्रियांना केवळ 'सोशिक' किंवा 'कष्टाळू' म्हणून रंगवले जाते. पण लोमटे यांच्या कथांमधील स्त्रिया यापेक्षा वेगळ्या आणि अधिक वास्तववादी आहेत. लोमटे यांच्या कथेतील स्त्रीने एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या कथेतली स्त्री ही केवळ चूल आणि मूल सांभाळणारी नाही. पुरुष जेव्हा हतबल होतो, कर्जबाजारीपणामुळे खचतो किंवा व्यसनाधीन होतो, तेव्हा ती स्त्री खंबीरपणे शेतीची धुरा वाहताना दिसते. ती राबणारी आहे, पण त्याच वेळी ती घरातील आर्थिक गणिते मांडण्यातही चतुर आहे.

या स्त्रियांना घराबाहेर निसर्गाशी आणि बाजारपेठेशी लढावे लागतेच, पण घराच्या आत त्यांना पुरुषसत्ताक मानसिकतेशीही लढावे लागते. पतीची अगतिकता आणि मुलांचे भवितव्य या दोन्ही आघाड्यांवर त्या एकाकी झुंज देत असतात. 'आलोक' किंवा 'इडा पीडा टळो' मधील स्त्री पात्रे बदलत्या काळाची जाणीव असणारी आहेत. गावात येणारे नवीन तंत्रज्ञान, मुलांचे शहराकडे ओढले जाणे आणि त्यातून विस्कळीत होणारी कुटुंबे पाहून या स्त्रियांच्या मनात होणारी चलबिचल लोमटे यांनी प्रभावीपणे मांडली आहे. अनेकदा स्वतःची स्वप्ने आणि इच्छा मारून या स्त्रिया

केवळ कुटुंबासाठी जगत राहतात. त्यांच्या वाट्याला येणारे दु:ख हे केवळ गरिबीचे नसून ते 'न समजून घेतले जाण्याचे' देखील आहे. तरीही, त्यांच्या बोलण्यात एक प्रकारचा स्वाभिमान आणि मराठवाडी बोलीचा ठसका असतो.थोडक्यात सांगायचे तर...लोमटे यांनी ग्रामीण स्त्रीला केवळ 'दुबळी' न दाखवता, ती या कोलमडणाऱ्या शेतीव्यवस्थेला सावरणारी 'एकमेव शक्ती' कशी आहे, हे आपल्या लेखनातून सिद्ध केले आहे. त्यांच्या कथा वाचताना जाणवते की, जर शेतातली ही 'माय' नसती, तर ग्रामीण गावगाडा कधीच विखुरला असता. ही कथा वाचकाला अस्वस्थ करते आणि ग्रामीण विकासाच्या गप्पांमधील फोलपणा उघड करते.

एखाद्या व्यक्तीला समजून घेण्यासाठी, त्यांची आर्थिक, सामाजिक किंवा भौगोलिक पार्श्वभूमी काहीही असो, सर्व पैलूंचा विचार केला पाहिजे. जरी ते ग्रामीण असले तरी ते मानवच आहेत आणि त्यांच्यात चांगल्या आणि वाईट प्रवृत्ती देखील आहेत. ग्रामीण साहित्यात आतापर्यंत ग्रामीण लोकांचा भोळापणा कसा एकतर्फी चित्रित केला गेला आहे हे सहज लक्षात येते. लोमटे यांच्या 'कुभांड', 'होरपळ' आणि 'जीत' या कथांमधील डावपेचांकडे पाहिल्यावर वाचक थक्क होतो. शोषित आणि शोषक असे दोन वर्ग आहेत, पण त्यांचे रंग आणि रूपे कच्चे नाहीत. एकाच व्यक्तीमध्ये दिसणारे विविध छटा या कथांमध्येही दिसतात. या कथा वाचकांच्या मनातील जातीभावना, सूडभावना, पुरुषी वर्चस्व आणि सत्तेचा नशा नष्ट करण्याचा प्रयत्न करतात असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. आसाराम लोमटे यांची कहाणी त्या काळातील अनेक घटना आणि घडामोडींमधून आकार घेते; पण ते तिथेच थांबत नाही, तर त्यातून लोकांना शोधते; उलट, ते लोकांना शोधते आणि तेही त्यांच्या कमतरतांसह, वास्तवाच्या पलीकडे, त्याचे स्वरूप मानव-केंद्रित राहिले आहे. त्यांच्या कथेतील जीवनाचे चित्रण वाचकांना अस्वस्थ करणारे आणि मनाला चटका लावणारे आहे. कोणत्याही कलाकृतीचा केंद्रबिंदू माणूस असतो. या कथेतून हे लक्षात येते की जीवनाचा शोधही या लोकांमधून घ्यावा लागतो.

संदर्भ:-

१) लोमटे, आसाराम - 'इडा पिडा टळो', शब्द पब्लिकेशन मुंबई, सहावी आवृत्ती २०२४,पृ.क्र.९३-९४

२) पवार, डॉ. नानासाहेब - 'ग्रामीण कथा आणि समाजवास्तव', अक्षय वांग्मय एप्रिल-मे-जून २०२०,पृ.क्र.१११

भारतीय लोकशाहीची मूल्ये व समकालीन आव्हाने : एक चिकित्सक अभ्यास

कु. स्नेहा गजानन गावंडे

संधोधक विद्यार्थी,

डॉ. गो. खे. महाविद्यालय गाडेगाव (तेल्हारा)

सारांश (Abstract)

India ही जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून ओळखली जाते. २६ जानेवारी १९५० रोजी अमलात आलेल्या Constitution of India ने भारताला सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही प्रजासत्ताक राष्ट्राचा दर्जा प्रदान केला. प्रस्तुत संशोधन लेखामध्ये भारतीय लोकशाहीची मूलभूत मूल्ये, तिची संस्थात्मक रचना आणि समकालीन सामाजिक, आर्थिक व राजकीय आव्हानांचे विश्लेषण करण्यात आले आहे. दुय्यम स्रोतांवर आधारित या अभ्यासातून असे निदर्शनास येते की भ्रष्टाचार, राजकारणाचे गुन्हेगारीकरण, आर्थिक विषमता, सामाजिक ध्रुवीकरण आणि डिजिटल माध्यमांतील दिशाभूल ही लोकशाहीसमोरील गंभीर आव्हाने आहेत. लोकशाहीची सुदृढता टिकवण्यासाठी घटनात्मक नैतिकता, पारदर्शक प्रशासन आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक असल्याचे या अभ्यासातून स्पष्ट होते.

मुख्य शब्द: लोकशाही, राज्यघटना, धर्मनिरपेक्षता, सामाजिक न्याय, निवडणूक सुधारणा

१. प्रस्तावना

भारतीय लोकशाही ही विविधतेत एकतेचे उदाहरण आहे. स्वातंत्र्यानंतर भारताने लोकशाही राज्यपद्धती स्वीकारून लोकसत्ताक शासनव्यवस्था उभारली. भारतीय राज्यघटना ही केवळ कायदेशीर दस्तऐवज नसून ती सामाजिक परिवर्तनाचे साधन आहे.

भारतीय लोकशाहीची वैशिष्ट्ये म्हणजे सार्वत्रिक प्रौढ मताधिकार, संघराज्यीय रचना, संसदीय शासनपद्धती आणि स्वतंत्र न्यायव्यवस्था.

२. संशोधनाची उद्दिष्टे

१. भारतीय लोकशाहीच्या मूलभूत मूल्यांचा अभ्यास करणे.

२. लोकशाहीच्या संस्थात्मक रचनेचे विश्लेषण करणे.

३. समकालीन आव्हानांचे चिकित्सक परीक्षण करणे.

४. लोकशाही बळकट करण्यासाठी उपाय सुचवणे.

३. संशोधन पद्धती

हा अभ्यास दुय्यम माहिती स्रोतांवर आधारित आहे. राज्यघटनेतील तरतुदी, शैक्षणिक ग्रंथ, संशोधनपर लेख, तसेच अधिकृत संस्थांचे अहवाल यांचा अभ्यास करण्यात आला आहे.

४. भारतीय लोकशाहीची मूलभूत मूल्ये

१ सार्वभौमत्व

भारत स्वतंत्र व स्वायत्त राष्ट्र आहे. राष्ट्रीय धोरणे देशातील जनतेच्या इच्छेनुसार ठरवली जातात.

२ धर्मनिरपेक्षता

राज्य सर्व धर्मांप्रती समान दृष्टीकोन ठेवते. कोणताही अधिकृत राज्यधर्म नाही.

३ समाजवाद

सामाजिक व आर्थिक न्याय प्रस्थापित करणे, संसाधनांचे न्याय्य वितरण करणे हे उद्दिष्ट आहे.

४ स्वातंत्र्य, समता आणि बंधुता

भारतीय राज्यघटनेचे प्रमुख शिल्पकार B. R. Ambedkar यांनी घटनात्मक नैतिकतेवर विशेष भर दिला.

स्वातंत्र्य – विचार व अभिव्यक्ती स्वातंत्र्य

समता – कायद्यापुढे समानता

बंधुता – राष्ट्रीय एकात्मता

५. भारतीय लोकशाहीची संस्थात्मक रचना

१ संसदीय शासनपद्धती

Parliament of India ही सर्वोच्च विधिमंडळ संस्था असून ती लोकसभा व राज्यसभा या दोन सभागृहांनी बनलेली आहे.

२ स्वतंत्र न्यायव्यवस्था

Supreme Court of India हे राज्यघटनेचे रक्षण करणारे सर्वोच्च न्यायालय आहे.

३ स्वतंत्र निवडणूक प्रक्रिया

Election Commission of India ही संस्था मुक्त व निष्पक्ष निवडणुका पार पाडते.

४ संघराज्यीय व्यवस्था

केंद्र व राज्य सरकारांमध्ये अधिकारांचे विभाजन केलेले आहे.

६. भारतीय लोकशाहीसमोरील समकालीन आव्हाने

१ राजकीय आव्हाने

भ्रष्टाचार

राजकारणाचे गुन्हेगारीकरण

निवडणूक निधीतील अपारदर्शकता

२ सामाजिक आव्हाने

जातीयवाद

सांप्रदायिक ध्रुवीकरण

लिंगविषमता

३ आर्थिक आव्हाने

दारिद्र्य

बेरोजगारी

वाढती आर्थिक विषमता

४ डिजिटल युगातील आव्हाने

सोशल मीडियावरील अपप्रचार व खोटी माहिती लोकमताला प्रभावित करतात.

लोकशाही बळकट करण्यासाठी उपाय

१. निवडणूक सुधारणा व निधी पारदर्शकता

२. भ्रष्टाचारविरोधी यंत्रणा मजबूत करणे

३. नागरिक शिक्षण व घटनात्मक जागरूकता

४. न्यायालयीन प्रक्रियेची गती वाढविणे

५. डिजिटल साक्षरता वाढविणे

निष्कर्ष

भारतीय लोकशाहीने अनेक संकटांना तोंड देत स्थैर्य राखले आहे. तथापि, लोकशाहीचे मूल्य जपण्यासाठी केवळ घटनात्मक तरतुदी पुरेशा नाहीत; नागरिकांचा सहभाग, नैतिक राजकारण आणि पारदर्शक प्रशासन आवश्यक आहे. लोकशाही ही सतत विकसित होणारी प्रक्रिया आहे. तिचे संवर्धन करणे ही शासन व नागरिक दोघांचीही सामूहिक जबाबदारी आहे.

संदर्भ ग्रंथसूची

१. Constitution of India. भारत सरकार प्रकाशन विभाग.

२. Granville Austin (1966). The Indian Constitution: Cornerstone of a Nation.

३. Ramachandra Guha (2007). India After Gandhi.

४. Sunil Khilnani (1997). The Idea of India.

५. Election Commission of India – अधिकृत अहवाल.

६. Supreme Court of India – घटनात्मक निवाडे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची व्यसनमुक्ती चळवळ

प्रा. वाल्मीक पुंजारामजी डवले

एम.कॉम, डी.बी.एम., जी.डि.सी. अॅन्ड ए., सी.एच.एम., एम.ए. (अर्थ, इति, समाज, तत्व, राज्य, मराठी, इंग्रजी, डी.बि.ए.टी., पाली अॅन्ड बुध्दीझम)

पाली आणि बुद्धिझम विभाग, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती. 444602

सारांश :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची व्यसनमुक्ती चळवळ ही त्यांच्या व्यापक सामाजिक परिवर्तनाच्या विचारसरणीचा एक महत्त्वाचा घटक होती. बाबासाहेबांनी व्यसनाला केवळ वैयक्तिक सवय न मानता ती सामाजिक, आर्थिक आणि मानसिक गुलामगिरीचे साधन आहे, असे स्पष्टपणे मांडले. दारू, तंबाखू व इतर व्यसनांमुळे विशेषतः वंचित व शोषित वर्ग अधिक दुर्बल होत असल्याचे त्यांनी ओळखले आणि त्यामुळे समाजाच्या प्रगतीला अडथळा निर्माण होत असल्याचे अधोरेखित केले.

बाबासाहेबांच्या मते, व्यसनांमुळे व्यक्तीची विचारशक्ती कमी होते, आत्मसन्मान नष्ट होतो आणि अन्यायाविरोधात उभे राहण्याची क्षमता हरवते. दारूच्या व्यसनामुळे कुटुंबांमध्ये दारिद्र्य, कलह, हिंसा, आजारपण आणि शिक्षणातील अडथळे निर्माण होतात, हे त्यांनी वारंवार आपल्या भाषणांतून स्पष्ट केले. म्हणूनच त्यांनी व्यसनमुक्तीला सामाजिक उन्नतीची पहिली पायरी मानले.

प्रस्तावना :

भारतीय समाजव्यवस्थेत दीर्घकाळापासून दारू, तंबाखू, गुटखा, अफू यांसारख्या व्यसनांनी सामाजिक, आर्थिक व नैतिक अधःपतन घडवून आणले आहे. विशेषतः वंचित, शोषित आणि श्रमिक वर्गामध्ये व्यसनांचे प्रमाण अधिक आढळते. व्यसनामुळे केवळ व्यक्तीचे आरोग्य बिघडत नाही, तर संपूर्ण कुटुंबाची आर्थिक स्थिती कोलमडते, कौटुंबिक हिंसा वाढते, मुलांचे शिक्षण खुंटते आणि समाजात दारिद्र्य व गुन्हेगारीला चालना मिळते. त्यामुळे व्यसनमुक्ती ही केवळ आरोग्याची समस्या नसून ती एक गंभीर सामाजिक समस्या आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक परिवर्तनाच्या लढ्यात व्यसनमुक्तीला अत्यंत महत्त्वाचे स्थान दिले. त्यांच्या मते, व्यसन हे गुलामगिरीचे एक साधन असून शोषक वर्गाकडून वंचित समाजाला कमजोर ठेवण्यासाठी ते वापरले जाते. दारू व अन्य व्यसनांमुळे माणूस विचारशक्ती गमावतो, आत्मसन्मान हरवतो आणि अन्यायाविरोधात उभा राहण्याची ताकद कमी होते. म्हणूनच बाबासाहेबांनी सामाजिक जागृती, शिक्षण आणि संघटनाच्या माध्यमातून व्यसनमुक्तीचा संदेश सातत्याने दिला.

बाबासाहेब आंबेडकरांनी अनेक भाषणांतून व लेखनातून दारू पिण्याच्या सवयीवर कठोर शब्दांत टीका केली. त्यांनी दारूला "दारिद्र्याची जननी" आणि "नैतिक अधःपतनाचे मूळ" असे संबोधले. महाड, नाशिक, मुंबई यांसारख्या ठिकाणी झालेल्या चळवळींमध्ये त्यांनी व्यसनमुक्तीचा संदेश ठामपणे मांडला. विशेषतः स्त्रियांना आणि तरुणांना व्यसनापासून दूर राहण्याचे आवाहन त्यांनी केले, कारण व्यसनांचा सर्वाधिक फटका कुटुंबातील स्त्रिया आणि मुले सहन करतात, हे बाबासाहेबांनी ओळखले होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची व्यसनमुक्ती चळवळ ही नैतिक उपदेशापुरती मर्यादित नव्हती, तर ती सामाजिक सशक्तीकरणाशी जोडलेली होती. शिक्षणाशिवाय व्यसनमुक्ती शक्य नाही, आणि व्यसनमुक्तीशिवाय

सामाजिक उन्नती शक्य नाही, असा त्यांचा ठाम विश्वास होता. म्हणूनच त्यांनी "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा" या त्रिसूत्रीबरोबरच व्यसनमुक्त जीवनशैलीचा आग्रह धरला.

आजच्या काळातही दारू व अन्य व्यसनांमुळे समाजाला अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. अशा परिस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची व्यसनमुक्ती चळवळ आणि त्यांचे विचार अधिकच कालसुसंगत ठरतात. त्यांच्या विचारांचा अभ्यास केल्यास व्यसनमुक्त समाजनिर्मितीसाठी योग्य दिशा व प्रेरणा मिळते. त्यामुळे समाजकार्य, समाजशास्त्र व सामाजिक चळवळींच्या अभ्यासात बाबासाहेब आंबेडकरांची व्यसनमुक्ती चळवळ हा विषय अत्यंत महत्त्वाचा आणि मार्गदर्शक ठरतो.

विषयाची निवड :

भारतीय समाजामध्ये व्यसनाधीनता ही एक गंभीर सामाजिक समस्या असून तिचे दुष्परिणाम वैयक्तिक, कौटुंबिक तसेच सामाजिक जीवनावर दीर्घकालीन स्वरूपाचे दिसून येतात. विशेषतः दारू, तंबाखू, गुटखा व इतर अमली पदार्थांचे व्यसन समाजातील दुर्बल, वंचित आणि कामगार वर्गामध्ये मोठ्या प्रमाणावर आढळते. या व्यसनांमुळे दारिद्र्य, कौटुंबिक कलह, आरोग्य समस्या, गुन्हेगारी प्रवृत्ती आणि सामाजिक अधोगती वाढत असल्याचे दिसून येते. अशा पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेली व्यसनमुक्तीची चळवळ ही समाजपरिवर्तनाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची ठरते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे केवळ भारतीय संविधानाचे शिल्पकार नसून ते एक महान समाजसुधारक, विचारवंत आणि मानवतावादी नेते होते. त्यांनी समाजातील अन्याय, शोषण आणि अज्ञानाच्या मुळाशी जाऊन त्यावर उपाय सुचवले. बाबासाहेबांनी व्यसनाधीनतेकडे केवळ वैयक्तिक दुबळेपण म्हणून न पाहता ती शोषणाची एक व्यवस्था असल्याचे स्पष्ट केले. दारूचे व्यसन हे शोषक वर्गासाठी आर्थिक लाभाचे साधन असून त्यामुळे शोषित समाज अधिक कमकुवत बनतो, असा त्यांचा ठाम विचार होता. त्यामुळे व्यसनमुक्ती ही सामाजिक मुक्ततेची एक आवश्यक अट असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

या विषयाची निवड करण्यामागे आणखी एक महत्त्वाचा कारण म्हणजे बाबासाहेबांच्या सामाजिक चळवळींचा बहुआयामी दृष्टिकोन समजून घेणे. बहुतेक वेळा बाबासाहेबांचे कार्य केवळ संविधान निर्मिती किंवा राजकीय लढ्यांपुरते मर्यादित मानले जाते; मात्र त्यांच्या चळवळींमध्ये नैतिक सुधारणा, जीवनशैलीतील बदल आणि मानसिक स्वातंत्र्य यांनाही तितकेच महत्त्व होते. व्यसनमुक्ती चळवळ ही त्यांच्या या व्यापक दृष्टिकोनाचे उत्तम उदाहरण आहे.

सध्याच्या काळातही व्यसनाधीनता ही समस्या अधिक तीव्र स्वरूप धारण करत आहे. तरुण पिढी व्यसनांकडे आकर्षित होत असून कुटुंबसंस्था आणि सामाजिक आरोग्यावर त्याचा गंभीर परिणाम होत आहे. अशा परिस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यसनमुक्तीविषयक विचारांचा अभ्यास करणे आणि त्यांची सामाजिक उपयुक्तता तपासणे अत्यंत आवश्यक ठरते. या विषयाच्या अभ्यासातून समाजकार्यकर्ते, विद्यार्थी आणि धोरणकर्ते यांना व्यसनमुक्तीच्या प्रभावी उपाययोजना समजून घेण्यास मदत होऊ शकते.

संशोधनाचे उद्देश :

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यसनमुक्तीविषयक विचारांचा आणि भूमिकेचा अभ्यास करणे.
2. व्यसनाधीनतेमुळे समाजावर होणाऱ्या सामाजिक व आर्थिक परिणामांचे विश्लेषण करणे.
3. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक चळवळींमध्ये व्यसनमुक्ती चळवळीचे स्थान व महत्त्व स्पष्ट करणे.
4. व्यसनमुक्ती चळवळीचा वंचित व दुर्बल घटकांच्या जीवनावर झालेल्या परिणामांचा अभ्यास करणे.
5. वर्तमान समाजातील व्यसनाधीनतेच्या समस्यांवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांची उपयुक्तता तपासणे.

गृहितके :

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेले व्यसनमुक्तीविषयक विचार सामाजिक परिवर्तनासाठी प्रभावी ठरले आहेत.
2. व्यसनाधीनतेमुळे समाजातील दुर्बल व वंचित घटकांची सामाजिक व आर्थिक स्थिती अधिक खालावते.
3. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या सामाजिक चळवळींमध्ये व्यसनमुक्ती चळवळीला महत्त्वपूर्ण स्थान होते.
4. व्यसनमुक्ती चळवळीमुळे समाजातील कुटुंबसंस्था, विशेषतः महिला व बालकांच्या जीवनावर सकारात्मक परिणाम झाला आहे.
5. वर्तमान काळातील व्यसनाधीनतेच्या समस्यांवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आजही उपयुक्त व मार्गदर्शक ठरतात.

अभ्यास पद्धती :

- विषयाचा उद्देश
- माहिती संकलन
- विश्लेषणात्मक पद्धती
- निष्कर्ष आणि शिफारसी

विषय विवेचन :

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामाजिक परिवर्तनाची चळवळ राबवित असताना केवळ राजकीय, कायदेशीर किंवा शैक्षणिक सुधारणांवर भर दिला नाही, तर समाजाच्या दैनंदिन जीवनातील अनिष्ट प्रथा, सवयी व मानसिक गुलामगिरी दूर करण्यावरही विशेष लक्ष केंद्रित केले. त्यामध्ये व्यसनाधीनतेविरोधातील चळवळ ही अत्यंत महत्त्वाची होती. बाबासाहेबांच्या मते, व्यसन ही व्यक्तीची वैयक्तिक कमतरता नसून ती समाजाच्या शोषण व्यवस्थेचा एक भाग आहे, ज्यामुळे विशेषतः वंचित, दलित व कामगार वर्ग अधिकाधिक दुर्बल बनतो.

दारू, तंबाखू व इतर व्यसनांमुळे व्यक्तीची आर्थिक स्थिती खालावते, आरोग्य बिघडते आणि कौटुंबिक जीवनात तणाव, हिंसा व अस्थिरता निर्माण होते. बाबासाहेबांनी स्पष्टपणे सांगितले की दारूचे व्यसन हे गरिबी वाढवते, शिक्षणात अडथळे आणते आणि अन्यायाविरोधातील संघर्षाची ताकद कमी करते. त्यामुळे समाजाला खऱ्या अर्थाने मुक्त करायचे असेल, तर आधी व्यसनांच्या साखळ्या तोडणे आवश्यक आहे, असा त्यांचा ठाम विचार होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या विविध भाषणांतून आणि सामाजिक आंदोलनांतून व्यसनमुक्तीचा संदेश दिला. महाड सत्याग्रह, नाशिकचा काळाराम मंदिर सत्याग्रह, तसेच मुंबई व इतर औद्योगिक भागांतील कामगार चळवळींच्या वेळी त्यांनी समाजाला व्यसनांपासून दूर राहण्याचे आवाहन केले. त्यांनी समाजाला बजावले की दारू विकणारे आणि त्यातून नफा मिळवणारे घटक हे शोषक असतात, तर दारू पिणारा समाज हा शोषित बनतो. त्यामुळे आत्मसन्मान राखण्यासाठी व्यसनमुक्त जीवनशैली अंगीकारणे अत्यावश्यक आहे.

बाबासाहेबांनी महिलांच्या दृष्टिकोनातूनही व्यसनमुक्तीला मोठे महत्त्व दिले. दारूच्या व्यसनामुळे महिलांना घरगुती हिंसा, आर्थिक असुरक्षितता आणि मानसिक त्रास सहन करावा लागतो, हे त्यांनी ठळकपणे मांडले. त्यामुळे महिलांनी व माता भगिनींनी व्यसनमुक्ती चळवळीत पुढाकार घ्यावा, असे त्यांनी सुचवले. त्यांच्या मते, स्त्री सशक्त असेल तर कुटुंब आणि समाज सशक्त होतो.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची व्यसनमुक्ती चळवळ ही शिक्षणाशी घट्टपणे जोडलेली होती. शिक्षणामुळे विवेक जागृत होतो, वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होतो आणि अंधश्रद्धा व व्यसनांपासून दूर राहण्याची जाणीव विकसित होते, असा त्यांचा विश्वास होता. "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा" या त्रिसूत्रीमध्ये व्यसनमुक्त जीवनाचा अंतर्भाव अंतर्निहित होता.

व्यसनाधीनतेची सामाजिक पार्श्वभूमी :

1. ब्रिटिश कालखंडात भारतातील ग्रामीण व औद्योगिक भागांमध्ये दारू व इतर व्यसनांचा प्रसार मोठ्या प्रमाणावर झाला. ब्रिटिश सरकारने महसूल मिळवण्यासाठी दारूविक्रीला प्रोत्साहन दिले. याचा सर्वाधिक फटका गरीब, मजूर आणि दलित वर्गाला बसला.
2. दारूच्या व्यसनामुळे कुटुंबांचे उत्पन्न व्यसनांवर खर्च होऊ लागले, ज्यामुळे दारिद्र्य, उपासमार आणि सामाजिक अधोगती वाढली. व्यसनाधीनतेमुळे कुटुंबांमध्ये कलह, घरगुती हिंसा, महिलांवरील अत्याचार आणि मुलांच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष होऊ लागले. समाजात गुन्हेगारी प्रवृत्ती वाढण्यासही व्यसनांनी हातभार लावला.
3. या सर्व समस्यांमुळे समाजाची उत्पादक क्षमता आणि नैतिक अधिष्ठान कमजोर झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी या परिस्थितीचे सूक्ष्म निरीक्षण केले. त्यांनी ओळखले की व्यसन ही समस्या वैयक्तिक नसून ती संरचनात्मक आहे.
4. दारूविक्री ही शोषक यंत्रणेचा भाग असून ती शोषित वर्गाला अधिक दुर्बल बनवते. त्यामुळे व्यसनाधीनतेचा मुकाबला केवळ वैयक्तिक समजुतींनी नव्हे, तर सामाजिक जागृतीद्वारे करणे आवश्यक आहे, असा त्यांचा दृष्टिकोन होता.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे व्यसनमुक्तीविषयक विचार :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी व्यसनाधीनतेकडे विवेकशील व वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहिले. त्यांच्या मते, व्यसन हे माणसाच्या बुद्धीला बोथट करते, आत्मसन्मान नष्ट करते आणि अन्यायाविरुद्ध लढण्याची ताकद हिरावून घेते. म्हणूनच त्यांनी समाजाला व्यसनांपासून मुक्त होण्याचे आवाहन केले. बाबासाहेब म्हणत की, "जो समाज दारूच्या आहारी गेला आहे, तो समाज कधीच स्वाभिमानी होऊ शकत नाही."

त्यांनी दारूच्या व्यसनाला "शोषणाचे हत्यार" असे संबोधले. त्यांच्या मते, व्यसनमुक्तीशिवाय शिक्षण, संघटन आणि संघर्ष हे त्रिसूत्री अपूर्ण आहे. त्यांनी व्यसनमुक्तीला नैतिक सुधारणा म्हणून नव्हे, तर सामाजिक क्रांतीचा भाग म्हणून मांडले. व्यसन सोडल्याने केवळ आरोग्य सुधारते असे नाही, तर आर्थिक स्थैर्य, कौटुंबिक शांतता आणि सामाजिक जाणीवही वाढते, असे त्यांनी ठामपणे सांगितले.

व्यसनमुक्ती चळवळीत महिलांची भूमिका :

1. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महिलांच्या दृष्टिकोनातून व्यसनमुक्तीचे महत्त्व अधोरेखित केले. दारूच्या व्यसनामुळे सर्वाधिक त्रास महिलांनाच सहन करावा लागतो, हे त्यांनी स्पष्ट केले. घरगुती हिंसा, आर्थिक असुरक्षितता आणि मानसिक छळ यांचा महिलांवर गंभीर परिणाम होतो.
2. त्यामुळे बाबासाहेबांनी महिलांना व्यसनमुक्ती चळवळीमध्ये सक्रिय सहभागी होण्याचे आवाहन केले. त्यांच्या मते, स्त्री सशक्त असेल तर संपूर्ण कुटुंब सशक्त होते. अनेक ठिकाणी महिलांनी दारूच्या दुकानांविरोधात आंदोलन केले, ही बाब बाबासाहेबांच्या विचारांचा प्रभाव दर्शवते.
3. व्यसनमुक्तीमुळे महिलांना निर्णय प्रक्रियेत स्थान मिळते, मुलांच्या शिक्षणावर लक्ष देता येते आणि कुटुंबाचा आर्थिक पाया मजबूत होतो. त्यामुळे बाबासाहेबांची व्यसनमुक्ती चळवळ ही स्त्री सक्षमीकरणाशी घट्ट जोडलेली होती.

शिक्षण, आत्मसन्मान आणि व्यसनमुक्ती :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, शिक्षण हे व्यसनमुक्तीचे सर्वात प्रभावी साधन आहे. शिक्षणामुळे माणसामध्ये विवेक, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि आत्मसन्मान निर्माण होतो. शिक्षित समाज व्यसनांच्या आहारी जात

नाही, असा त्यांचा विश्वास होता."शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा" या त्यांच्या घोषणेमध्ये व्यसनमुक्त जीवनशैलीचा स्पष्ट संकेत आहे.

शिक्षणामुळे व्यक्ती स्वतःच्या हक्कांची जाणीव करून घेते आणि शोषणाविरुद्ध उभी राहते. व्यसनाधीन व्यक्ती मात्र संघर्ष करण्याऐवजी पलायन करते, असे बाबासाहेबांचे मत होते. म्हणूनच त्यांनी समाजाला शिक्षणासोबतच व्यसनमुक्तीचा मार्ग स्वीकारण्यास प्रवृत्त केले. शिक्षण आणि व्यसनमुक्ती या दोन्ही गोष्टी एकमेकांना पूरक असल्याचे त्यांच्या विचारांतून स्पष्ट होते.

व्यसनमुक्ती चळवळीचे सामाजिक परिणाम

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यसनमुक्ती चळवळीमुळे समाजात अनेक सकारात्मक बदल घडून आले. व्यसन सोडलेल्या कुटुंबांमध्ये आर्थिक स्थैर्य वाढले, मुलांचे शिक्षण सुधारले आणि कौटुंबिक शांतता निर्माण झाली. सामाजिक पातळीवर पाहता, व्यसनमुक्त समाज अधिक संघटित, जागरूक आणि संघर्षशील बनतो.

अन्यायाविरोधात आवाज उठवण्याची क्षमता वाढते. बाबासाहेबांच्या चळवळीमुळे समाजात आत्मसन्मानाची भावना दृढ झाली. ही चळवळ केवळ त्या काळापुरती मर्यादित न राहता आजही समाजासाठी प्रेरणादायी ठरते. व्यसनमुक्ती हा सामाजिक विकासाचा पाया असल्याचे बाबासाहेबांच्या विचारांतून अधोरेखित होते.

वर्तमान काळातील उपयुक्तता

1. आजच्या काळातही व्यसनाधीनतेची समस्या अधिक तीव्र होत आहे. तरुण पिढी नवनवीन व्यसनांच्या आहारी जात आहे. अशा परिस्थितीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार अत्यंत उपयुक्त ठरतात.
2. आजच्या व्यसनमुक्ती कार्यक्रमांमध्ये बाबासाहेबांच्या विचारांचा समावेश केल्यास सामाजिक परिवर्तन अधिक प्रभावी होऊ शकते.
3. शिक्षण, जनजागृती आणि लोकसहभागाच्या माध्यमातून व्यसनमुक्त समाज घडविणे शक्य आहे.

निष्कर्ष :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महाड, नाशिक व मुंबईसारख्या ठिकाणी झालेल्या सामाजिक चळवळींमध्ये व्यसनमुक्तीचा ठाम संदेश दिला. त्यांनी समाजाला केवळ कायदे किंवा राजकीय अधिकार मिळवणे पुरेसे नाही, तर मानसिक व नैतिक परिवर्तन होणेही तितकेच आवश्यक आहे, असे सांगितले. विशेषतः महिलांवर व्यसनांचे दुष्परिणाम अधिक होत असल्याने स्त्रियांनी व तरुणांनी व्यसनांविरोधात पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. बाबासाहेबांची व्यसनमुक्ती चळवळ ही शिक्षण, संघटन आणि आत्मसन्मानाशी निगडित होती.

शिक्षणामुळे विवेक जागृत होतो आणि व्यसनांपासून दूर राहण्याची जाणीव निर्माण होते, असा त्यांचा ठाम विश्वास होता. त्यामुळे "शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा" या त्रिसूत्रीमध्ये व्यसनमुक्त जीवनशैलीचा अंतर्भाव होता. एकूणच, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची व्यसनमुक्ती चळवळ ही समाजसुधारणेची एक सशक्त दिशा ठरली. आजही समाजातील व्यसनाधीनतेच्या समस्यांवर मात करण्यासाठी बाबासाहेबांचे विचार मार्गदर्शक ठरतात. व्यसनमुक्त समाज घडविल्याशिवाय सामाजिक न्याय, समता आणि मानवी विकास साध्य होऊ शकत नाही, हा संदेश त्यांच्या चळवळीमधून स्पष्टपणे अधोरेखित होतो.

संदर्भ ग्रंथ सूची :

1. आंबेडकर, भीमराव रामजी. (१९९०). डॉ. बाबासाहेब आंबेडकर : लेखन आणि भाषणे (खंड १). महाराष्ट्र शासन, मुंबई.
2. आंबेडकर, भीमराव रामजी. (१९९१). डॉ. बाबासाहेब आंबेडकर : लेखन आणि भाषणे (खंड ३). महाराष्ट्र शासन, मुंबई.

3. आंबेडकर, भीमराव रामजी. (१९९२). डॉ. बाबासाहेब आंबेडकर : लेखन आणि भाषणे (खंड १७ – भाषणे). महाराष्ट्र शासन, मुंबई.
4. कीर, धनंजय. (२०१०). डॉ. बाबासाहेब आंबेडकर : जीवन आणि कार्य. पॉप्युलर प्रकाशन, मुंबई.
5. खैरमोडे, चंद्रकांत. (२००८). डॉ. बाबासाहेब आंबेडकर : चरित्र (खंड ५). सुगावा प्रकाशन, पुणे.
6. जाधव, नारायण. (२०१३). आंबेडकरांचे आर्थिक विचार. राजहंस प्रकाशन, पुणे.
7. www.wikipedia.com

आदिवासी मतदारांवर सोशल मीडियाचा प्रभाव

संशोधक विद्यार्थी
प्रा. संतोष रामभाऊ ढगे
मार्गदर्शक
प्रा. डॉ. निलेश रमेशराव निंबाळकर
संशोधन केंद्र- श्रीपाद कृष्ण कोल्हटकर महाविद्यालय, जळगाव जामोद जि.बुलढाणा

गोषवारा

आदिवासी जमाती भारतातील सामाजिक व्यवस्थेतील महत्वपूर्ण समुदाय आहे. निवडणूक प्रक्रियेत आदिवासी मतदारांचा सहभाग प्रभावी दिसून येतो. संविधानात आदिवासी जमातींचा अनुसूचित जनजाती म्हणून उल्लेख केलेला आहे. लोकसभा,विधानसभा आणि पंचायत राज व्यवस्थेत ST प्रवार्गासाठी राखीव जागा आहेत. राजकीय पक्षांकडून आदिवासी जमातींना राखीव जागेवर उमेदवारी दिली जाते. राजकीय पक्षांना उमेदवार निवडून आणण्यासाठी त्यांच्या जाहीरनाम्याचा प्रचार प्रसार करावा लागतो. परंतु डोंगराळ भागात राहणाऱ्या आदिवासी मतदारांपर्यंत पोचण्यासाठी त्यांना कसरत करावी लागते. आदिवासी मतदारांना आकर्षित करण्यासाठी सोशल मिडीयाचा उपयोग प्रभावी तरत आहे. आदिवासी राजकीय सहभागावर सोशल मीडियाचा सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम दिसून आला. राजकीय जागृती करण्यासाठी उपयुक्त ठरलेला मेडिया आदिवासींमध्ये विभाजन करत असल्याचेही दिसून आले.

कळशब्द- सोशल मीडिया, जागृती, विभाजन

प्रस्तावना-

सोशल मीडियाचा जागतिक स्तरावर सर्वच क्षेत्रात प्रभाव पडलेला आहे. आधुनिक राजकीय परिस्थितीत सोशल मिडिया प्रचार,प्रसाराची मुख्य भूमिका बजावते. डोंगराळ भागात राहणाऱ्या आदिवासी जमातींच्या राजकीय विचारांवरही सोशल मिडीयाचा सकारात्मक व नकारात्मक प्रभाव जाणवू लागलेला आहे. भारतात ८ ते ९ % आदिवासी लोकसंख्या आहे. संविधानातील तरतुदीनुसार त्यांना राखीव जागा दिलेल्या आहेत. त्यांचा राजकीय सहभाग घेतल्याशिवाय भारतीय राजकीय लोकशाही यशस्वी होऊ शकत नाही. त्यामुळे आदिवासी मतदारांना प्रभावित करणाऱ्या सोशल मिडीयाचा अभ्यास करून वस्तुस्थिती समजून घेण्यासाठी "आदिवासी मतदारांवर सोशल मीडियाचा प्रभाव" हा विषय संशोधनासाठी निवडलेला होता. संशोधनातून निघालेल्या निश्कर्ष्यातून वस्तूस्थिती समोर आली.

संशोधनाचे उद्देश-

१) आदिवासी भागातील इंटरनेट सुविधेच्या उपलब्धतेचा अभ्यास करणे.
२) आदिवासी मतदारांवर पडलेल्या सोशल मिडीयाच्या प्रभावाचा अभ्यास करणे.
३) आदिवासी नेतृत्व निर्मितीत सोशल मीडीयाचे महत्व समजून घेणे.

संशोधनाची गृहीतके –

१) अतिदुर्गम आदिवासी क्षेत्रात इंटरनेट सुविधेचा अभाव आहे.
२) उमेदवार आदिवासी मतदारांना सोशल मीडियाद्वारे संपर्क करतात.
३) सोशल मीडियामुळे आदिवासी तरुण नेतृत्व उदयास येत आहे.

संशोधन पद्धती-

अमरावती विभागातील सातपुडा पर्वतरांगेतील आदिवासी जमातींच्या मतदारांवर सोशल मीडियाचा प्रभाव अभ्यासण्यासाठी निरीक्षण व सर्वेक्षण पद्धतीचा अवलंब केला.

विषय विवेचन –

सार्वत्रिक निवडणुकांमध्ये राजकीय पक्षाकडून प्रचारासाठी प्रभावी यंत्रणांचा वापर करण्यात येतो. गेल्या दशकापासून प्रचार यंत्रणेत सोशल मीडियाचा जास्तीत जास्त उपयोग होत आहे. डोंगराळ व दुर्गम आदिवासी क्षेत्रात आदिवासी मतदारांना आकर्षित करण्यासाठी सोशल मीडियाचा प्रभाव अभ्यासताना पुढील बाबी निदर्शनास आल्या.

आदिवासी मतदारांवर सोशल मिडीयाचा सकारात्मक प्रभाव-

१) आदिवासी मतदारांशी संपर्क- २०१४,२०१९ व २०२४ च्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये whatsapp, फेसबुक, फोन कॉल्स,इत्यादी माध्यमातून बहुतांश मतदारांना उमेदवार व राजकीय पक्षांकडून संपर्क करण्यात आला होता. सोशल मीडियामुळे दुर्गम भागातील मतदारांनाही संपर्क कारणे सहज शक्य झाले होते. निवडणुकीतील उमेदवार,त्याचे चिन्ह,निवडणुकीची दिनांक व वेळ याविषयीची पूर्ण माहिती आदिवासी मतदारांपर्यंत पोहचविण्यात सोशल मीडियाचा वापर करण्यात आला. मतदारांना मतदार यादीत नाव व मतदान केंद्र शोधण्यासाठी निवडणूक आयोगाकडून लिंक उपलब्ध करून देण्यात आली होती.

२) आदिवासी मतदारांमध्ये राजकीय पक्षांचा प्रचार- सोशल मीडियाच्या माध्यमातून आदिवासी मतदारांना मतदानासाठी प्रेरित करणे सहज शक्य झाले. कमी खर्च व कमी वेळेत त्यांना पक्षाचे उमेदवार, त्यांचे निवडणूक चिन्ह आणि जाहीरनामा मतदारांना कळविण्यात सोशल मिडीयाचा प्रभावी वापर करण्यात आला.

३) अनोळखी व अतिदुर्गम भागातील आदिवासी मतदार – अध्ययन क्षेत्रातील १४ मतदान केंद्र अतिदुर्गम भागात येतात. तेथे मतदान यंत्रणाच स्थापित करायला प्रशासनाला कसरत करावी लागते. यावरून त्या क्षेत्रातील मदरांपर्यंत पोचायला उमेदवार व त्यांच्या कार्यकर्त्यांना किती कसरत करावी लागत असेल याचा अंदाज येतो. येथे वीज आणि इंटरनेट सुविधेचा अभाव निदर्शनास आला. सोशल मिडिया येथे लोकांपर्यंत संदेश पोहचू शकला नाही.

४) डिजिटल जाहिरातींचे प्रसारण- युट्यूब, इन्स्टाग्राम,फेसबुक इत्यादींवर निवडणूक काळात प्रचाराचे डिजिटल व्हिडीओ प्रसारित केले जातात. त्यामुळे आदिवासी मतदारांवर त्याचा थेट प्रभाव पडलेला जाणवला. दृश्य माध्यमातील प्रचार सोशल मीडियामुळे सर्वच स्तरातील मतदारांवर प्रभावी दिसून आला.

५) प्रचारसभांचे थेट प्रक्षेपण- युट्यूबच्या माध्यमातून प्रचारसभांचे थेट प्रक्षेपण करणे सहज शक्य झाले. स्थानिक आदिवासी नेते तरुणांना थेट प्रक्षेपण पाहण्यास प्रेरित करतात. त्यामुळे उमेद्वार कसा आहे हे मतदारांना दिसू शकले. प्रचारातील महत्वाचे मुद्दे मतदारांना समजल्यामुळे त्यांना राजकीय प्रशिक्षण मिळण्यास मदत होते.

आदिवासी मतदारांवर मीडियाचा नकारात्मक प्रभाव-

आदिवासी मतदारांवर वरील सकारात्मक प्रभाव दिसून आला असला तरी नकारात्मक प्रभावही जाणवला. त्यांच्यावर सोशल मीडियाचा नकारात्मक प्रभाव पुढीलप्रमाणे दिसून आला.

१) निराशा – सोशल मीडियावरील जाहिरातींमध्ये अवास्तव माहिती प्रसारित होण्याची शक्यता जास्त असते. खोट्या प्रचाराला बळी पडून आदिवासी मतदार नको त्या उमेदवाराला मतदान करू शकतात. त्यामुळे त्यांची अपेक्षा पूर्ण न होता त्यांच्या पदरी निराशा पडते.

२) सामुहिक हिताचा ऱ्हास- सोशल मीडियामुळे आदिवासी मतदारांचे वैयक्तिकीकरण झाले, त्यामुळे त्यांच्यातील सामुहिकतेची भावना ऱ्हास होतांना दिसली.

३) ऐक्याचा लोप- सोशल मीडियामुळे आदिवासी मतदारांचे वेगवेगळ्या राजकीय गटात विभाजन झाले. त्यामुळे त्यांच्यातील एकता लोप पावून राजकीय वादविवाद होऊ लागले.

४) राजकीय मतभेद- आदिवासी मतदार सोशल मीडियाच्या प्रभावातून वेगवेगळ्या राजकीय गटात विभागल्यामुळे त्यांच्यात राजकीय मतभेद ओऊ लागले. एकाच परिवारात वेगवेगळे राजकीय विचार असल्यामुळे सामाजिक सलोखा कमी झाला.

५) इंटरनेटचा अभाव- अध्ययन क्षेत्रातील दुर्गम आदिवासी पाड्यांपर्यंत अजूनही लाईट पोहोचलेली नाही. त्यांच्यापर्यंत मोबाईलची रेंज पोहचत नाही त्यामुळे त्यांना सोशल मिडीयाचा उपयोग होत नाही. इंटरनेट सुविधा नसल्यामुळे त्या क्षेत्रातील आदिवासी मतदारांना आधुनिक प्रचार यंत्रणेचा उपयोग होत नाही.

निष्कर्ष-

१. अध्ययन विषयाच्या अनुषंगाने अभ्यास केल्यानंतर अनेक आदिवासी पाडे अतिदुर्गम भागात दिसून आले. त्या ठिकाणी लाईट आणि इंटरनेटचा अभाव दिसून आला. यावरून अतिदुर्गम आदिवासी क्षेत्रात इंटरनेट सुविधेचा अभाव आहे हे गृहीतक सत्य असल्याचे सिद्ध झाले.

२. सोशल मीडियामुळे बहुतांश लोकांना माहिती देणे सहज शक्य झाले आहे. निवडणुकीच्या कळत उमेदवार सोशल मिडीयाचा प्रचारासाठी उपयोग करत असल्याचे दिसून आले. यावरून उमेदवार आदिवासी मतदारांना सोशल मीडियाद्वारे संपर्क करतात हे गृहीतक सिद्ध झाले.

३. राजकीय प्रभावामुळे सुशिक्षित आदिवासी तरुण राजकीय पक्षांकडे झुकू लागला. आदिवासी तरुण राजकीय नेत्यांच्या संपर्कात आल्यामुळे स्थानिक आदिवासी लोकांच्या समस्या सोशल मीडियावर मांडू लागला. प्रशासकीय अधिकाऱ्यांना सामुहिक निवेदन देत असल्याचे दिसून आले. राजकीय व सामाजिक संघटनांचे आदिवासी तरुण नेते सोशल मीडियावर आपले विचार अभिव्यक्त करू लागला. यावरून सोशल मीडियामुळे आदिवासी तरुण नेतृत्व उदयास येत आहे हे गृहीतक सिद्ध झाले.

उपाययोजना-

१. आदिवासी लोक भारतीय राजकीय व्यवस्थेतील अविभाज्य घटक आहेत. त्यांनाही सर्व राजकीय घडामोडी माहीत होणे आवश्यक आहे. परंतु आधुनिक इलेक्ट्रोनिक माध्यमे त्यांच्यापर्यंत पोहोचणे आवश्यक आहे. त्या करिता आदिवासी पाड्यांपर्यंत रस्ते, वीज, पाणी यांची उपलब्धता करून देण्यात यावी.

मनुष्य जीवनात भाषेला अतिशय महत्त्व आहे. मूळातच मनुष्याला आपले कार्य पार पाडण्याकरिता भाषेशिवाय पर्याय नाही. त्यामुळे मानवाने निर्मित केलेली भाषा ही सामाजिक संस्था ठरते. सांगायचे झाल्यास कोणतीही भाषा ही निसर्गनिर्मित नसून ती मानवनिर्मित असते. त्यामुळे याच भाषेच्या साहाय्याने समुह जीवन जगणारा मानव आपल्या मनातील विचार दुसऱ्यापर्यंत पोहोचवतो. थोडक्यात सांगायचे झाल्यास मानवाने भाषेच्या रूपात अमूर्त अशी चिन्ह व्यवस्था निर्माण केली आहे. याबाबत प्रा. शरदचंद्र मुक्तिबोध म्हणतात,''ध्वनींना प्राप्त होणारा अर्थ समाजच देत असतो. तो ध्वनींचा गुणधर्म नव्हे, भाषा ही व्यक्तीच्या नव्हे तर समाजाच्या आयुष्यात तयार असते. निवेदनाद्वारे व्यवहार सुकर करणे हे तिचे कार्य; पण सर्वच निवेदन एका साच्याचे वा सर्वच योजता येईल असे नसते. ते पुढे लिहितात, ललित वाङ्मयाचा संबंध येतो तो शब्दांद्वारे ऐकणाऱ्याच्या मनात संवेदना—भावनांचा प्रत्यक्ष अनुभवच निर्माण करून त्याद्वारे मनोगत प्रगट करू शकणाऱ्या निवेदन प्रकारांशी''[१] शब्दांच्या साहाय्यानेच लेखक किंवा कवी आपल्या मनातील विचारांचे, भावनांचे आंदोलन अभिव्यक्त करत असतो. 'इंग्लिश पोएट्री ॲन्ड दी इंग्लिश लॅग्वेज' या ग्रंथात एम. डब्ल्यू. बेटसन लिहितात,''कोणत्याही कवितेवर उमटलेला विशिष्ट युगाचा ठसा कवीमध्ये शोधावयाचा असतो, असा माझा सिद्धांत आहे. माझ्या मते काव्याचा खरा इतिहास म्हणजे उत्तरोत्तर रचल्या गेलेल्या काव्याच्या भाषेच्या स्वरूपात घडून आलेल्या परिवर्तनाचा इतिहास असतो व ही भाषिक परिवर्तनेही सामाजिक व बौद्धिक प्रवृत्तीच्या दबावामुळे घडून आलेली असतात.''[२] मूळातच साहित्य हा भाषेच्या इतिहासाचा एक भाग आहेतच आणि भाषेवरच तो सर्वस्वी अवलंबून असतो. हे आपणास नाकारता येणार नाही.

शैली संकल्पना :—

साहित्य क्षेत्रात भाषाशैलीला महत्त्वपूर्ण स्थान असल्याचे आपणास बघावयास मिळते. भाषा आणि शैली या दोन भिन्न भिन्न संकल्पना आहेत. शैली म्हणजे आविष्कार या अर्थाने आपण स्वीकारतो. त्यामुळे रीत, पद्धती, लकब, तंत्र, धाटणी म्हणजे शैली होय असा अर्थ आपण घेतो.

मूळातच शैलीची संकल्पना नवव्या शतकात होऊ गेलेल्या संस्कृत साहित्यमीमांसक वामन यांच्या रीतिविचारांशी जोडली जाते. 'रीति:आत्मा काव्यस्य। विशिष्ट पदरचना रीति। विशेषो गुणात्मा।।' असे वामनाने सांगितलेच आहे. साहित्यकृतीचा विचार केला असता आशय आणि आविष्कार या दोन्हींचा विचार करूनच साहित्यकृतीतील विचारास पूर्णत्व येते. असे म्हटल्यास चूक ठरणार नाही. शैलीच्या संदर्भात फ्रेंच समीक्षक ब्युफा म्हणतो की,''शैली म्हणजे खुद्द लेखकच''[३] म्हणजेच सांगायचे झाल्यास लेखकाच्या व्यक्तिमत्त्वाचा आविष्काराचा विचार शैलीविचारात केला जातो. याबाबत अधिक स्पष्टपणे शैलीची व्याख्या करतांना डॉ. भालचंद्र नेमाडे सांगतात, ''एखाद्या दृश्याला विशिष्ट माध्यमाद्वारे विशिष्ट रूपामध्ये प्रकट करण्याकरिता वापरल्या जाणाऱ्या तंत्रसमुच्चयाची पद्धती म्हणजे शैली''[४] कोणत्याही साहित्यकृतीचे मूल्यमापन करताना लेखकांनी जी भाषा वापरलेली असते ती भाषा प्रमाणभाषा आहे का? किंवा बोली भाषा आहे? याचाही विचार करणे आवश्यक ठरते. मूळातच प्रत्येक समाजातील व्यवहार क्षेत्रात भाषेचा वापर केला जातो. मग ते साामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, शैक्षणिक, राजकीय किवा साहित्य असो आदी क्षेत्रात विविध व्यवहारापैकी एक व्यवहार हा भाषेचा असतो. लेखक आपल्या साहित्यकृतीत जी भाषाशैली वारतो त्यावरून त्या साहित्यिकांच्या मनोवृत्तीचा विचार स्पष्ट होतो. याशैली विषयी रा. ग. जाधव म्हणतात,''शैली म्हणजे या आशयाकडे बघण्याचा व आपल्या वाचकप्रेक्षकांकडे पाहण्याचा साहित्यिकाचा दुहेरी दृष्टिकोनच होय.''[५] सांगायचे झाल्यास कोणताही लेखक, कवी किंवा कलावंत हा त्या त्या समाजाच्या भाषावृत्तीनूसारच विशिष्ट भाषाशैली निर्माण करीत असतो. त्यामुळे साहित्याचे एक वेगळेपण ठरत असते.

ग्रामीण शैली :—

ग्रामीण भाषेत लेखननिर्मिती करणारे अनेक लेखक, कवी आहेत. साधारणत: १९४५ नंतर ग्रामीण भाषेत लेखनकार्य करणाऱ्या लेखकांची परंपरा सुरू झालेली बघावयास मिळते आणि तेही आजतागायत सुरू आहेत. यामध्ये शंकर पाटील, व्यंकटेश माडगूळकर, आनंद यादव, द. मा. मिरासदार, रा. रं. बोराडे, रंगनाद पठारे, वासुदेव मुलाटे, राजन गवस, श्रीकांत देशमुख, चंद्रकुमार नलगे, बाबाराव मुसळे, सदानंद देशमुख, प्रतिभा इंगोले, उद्धव शेळके यांनी आपले लेखनभाष्य ग्रामीण भाषेत केले आहेत. यामध्ये सदानंद देशमुख यांच्या ग्रामीण लेखन शैलीचा विचार करता त्यांनी आपल्या साहित्यातील कथा, कविता आणि कादंबरीतून वऱ्हाडी बोलीचा वापर केलेला आहे. लेखक ज्या बोलीप्रदेशात राहतो त्याच प्रदेशातील बोलीभाषेत साहित्यनिर्मिती करीत असतो. सदानंद देशमुख हे ग्रामीण वऱ्हाड प्रदेशात राहत असल्याने त्यांच्या साहित्यात ग्रामीण बोलीभाषेचा प्रभाव आपणास मोठ्याप्रमाणात बघावयास मिळतो.

बोली आणि प्रमाण भाषेचा विचार केला असता कोणतीच बोलीभाषेला शुद्ध किंवा अशुद्ध तराजू मध्ये मांडता येणार नाही. किंवा ठरवता येणार नाही. प्रत्येक बोलीभाषेत त्या त्या प्रदेशाचा आशय, भावना, विचार प्रकट करण्याची क्षमता असते. ग्रामीण लेखकांनी आपल्या साहित्यात ग्रामीण बोलीतून भावनेला वाट मिळून दिली. उदाहरण द्यायचे झाल्यास रा. रं. बोराडे, भाष्कर चंदनशिव यांनी मराठवाड्या बोलीभाषेत, शंकर पाटील, आनंद यादव यांनी सातारा परिसरातील बोलीभाषेत तर सदानंद देशमुख, प्रतिमा इंगोले, उद्धव शेळके यांनी विदर्भ परिसरातील वऱ्हाडी बोलीभाषेत आपली साहित्यकृती निर्माण केलेली आढळून येते. या बोलीभाषेच्या संदर्भात व्यंकटेश माडगूळकर म्हणतात,''भाषा ही आईच्या दुधासारखी मिळते. इकडून—तिकडून ती गोळा करता येत नाही. लेखक मनाने कसा आहे. त्याने आयुष्याचा अधिक काळ कुठे घालवला आहे, याला महत्त्व आहे. जे जे पाहिले, ऐकले, भोगले, ते सारे लेखकाच्या भाषेतून व्यक्त होत असते. भाषा ही नदीसारखी प्रवाही व पवित्र असते. बोलीभाषेत लिहिलेले लिखाण त्यामुळे अशुद्ध असूच शकत नाही.''[६] कोणतीही बोलीभाषा असो ती त्या त्या प्रदेशातील मनुष्याच्या मनातील भावभावना व्यक्त करणारी भाषा असते. मूळातच भाषा ही एक सामाजिक संस्था असल्यामुळे याच भाषेतून सामुहिक

आविष्कार होतो. ग्रामीण जीवनशैलीचे दर्शन आपणास घडून येते. यामध्ये ग्रामीण संस्कृती, जीवनपद्धती, आचार–विचार, श्रद्धा–अंधश्रद्धा, म्हणी, वाक्प्रचार, उखाणे, लोकगीत, लोककथा आदींचा समावेश होतो. त्यामुळे ग्रामीण लेखकांनी याच बोलीभाषेला आपल्या अभिव्यक्तीचे एक प्रभावी माध्यम म्हणून वापर केलेला दिसतो.

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर खऱ्या अर्थाने मराठी ग्रामीण लेखकांनी आपल्या बोलीभाषेत ग्रामीण साहित्यकृतीला आयाम देऊन अनुभव विश्वाला एक स्थान प्राप्त करून दिले. प्रतिमा इंगोले यांनी आपल्या वऱ्हाडी बोलीभाषेतून वैदर्भीय स्त्री – माणसाच्या भावनेचे, विचारांचे तसेच मातीतल्या माणसाप्रती व भाषेच्या सामर्थ्याप्रती वाटणाऱ्या जिव्हाळ्याप्रती उचंबळलेल्या प्रपपंचतेचा आशय लेखनातून व्यक्त केला. तर सदानंद देशमुख यांनी स्वत: ग्रामीण भागात राहून ग्रामीण जीवनाचा अनुभव प्रत्यक्ष घेतला आहे. त्यामुळे त्यांच्या साहित्यकृतीत ग्रामीण व्यक्तीच्या भावभावनांचे अनेकविध पदर बघावयास मिळते. सदानंद देशमुख यांचे 'अंधारबन', 'लचांड', 'उठावण', 'गोतावळा', रगडा, खुंदळघास, गाभूळगाभा, मेळवण व 'महालूट' हे कथासंग्रह तर 'तहान', 'बारोमास' या कादंबऱ्या या साहित्यकृतीने वाचकांचे लक्ष वेधून घेतले आहे. त्यामागचे कारण म्हणजे त्यांच्या साहित्यातील ग्रामीण भाषाशैली होय. सांगायचे झाल्यास ग्रामीण भागातील लेखकांनी आपले अनुभव विश्व अभिव्यक्त करताना निवेदनात बोलीभाषेचा वापर मोठ्या प्रमाणात केलेला दिसून येतो.

म्हणी :–

लेखक आपल्या साहित्यातील आशयात अचूकपणा येण्याकरिता त्या त्या बोलीभाषेतील म्हणींचा वापर करतात. या म्हणी विषयी विविध लेखकांनी व्याख्या केलेल्या आहेत.

ॲरिस्टॉटल यांच्या मते,''थोडक्यात पण अचूकपणे खूप मोठा आशय व्यक्त करणाऱ्या म्हणी म्हणजे नामशेष होत चाललेल्या तत्त्वज्ञानाचे अवशेष होत.''[७]

अलेक्झांडर क्रोपन म्हणतात,''अगदी मार्मिकपणे शक्य तितक्या मोजक्या शब्दात विदारक सत्य प्रकट करणारे वचन म्हणजे म्हणं.''[८]

डॉ. सरोजनी बाबर म्हणतात,''म्हणी अनुभवावर आधारित असून, वस्तुस्थितीचे सरळ निवेदन आहे. निवेदन कितीही सरळ म्हणीला साहित्यिक धाटणीची आवश्यकता असते. हे विसरून चालणार नाही; कारण म्हण पुष्कळ आशय आणणारी सूत्रमय अशी असल्यामुळे सरळ वर्णनालाही एक प्रकारचा विशेष खोचकपणा लागतोच. प्रास आणि पदबंध हे म्हणीचे आवश्यक तंत्र जगभर ठसून दिसते.''[९]

सदानंद देशमुख यांच्या कथा साहित्यातील पात्रांच्या तोंडून अनेकविध म्हणी येतात. त्यापुढीलप्रमाणे आपणास सांगता येतील.

''घरोघर मातीच्या चुली'' (अंधारबन, पृ. १३)
''म्हणतात नं डोंगर जळते तर सारं गाव पाह्यते पण मन जळते ते कोणी नाई पाहू शकत. ''(अंधारबन, पृ. २७)
''घेणं ना देणं अन् म्हन्ते माहं उसणं देणं.'' (अंधारबन, पृ. ७६)
''मरमर करे ते जन्माले पुरे'' (अंधारबन, पृ. ८५)
''इकडे आड तिकडं विहीर'' (लचांड, पृ. २)
''बिनपगारी फुल अधिकारी'' (लचांड, पृ. २)
''मचाळ विहिरीतला गचाळ गाळ''(लचांड, पृ. २)
''रोज मरे त्याले कोण रडे''(लचांड, पृ. २)

या म्हणीतून वऱ्हाडी बोलीभाषेचा सहजपणा त्यांच्या कथानकात सदानंद देशमुख मांडतांना दिसून येतात.

वाक्प्रचार :—

अनेक अर्थ घेऊन भाषेला अलंकारीक साज देणारे मराठी बोलीभाषेत विविधप्रकारचे शब्द असतात. त्या शब्दाच्या पलिकडचा संकेतार्थ लक्षात घेऊनच या शब्दांचा वापर लेखक आपल्या साहित्यकृतीत करतात. याबाबत श्रीपाद भागवत म्हणतात,''वाच्यार्थ थोड्याफार अंशाने शिल्लक राहून जेव्हा त्यातून लाक्षणिक अर्थ प्रभावीपणे व्यक्त होतो तेव्हा त्यास वाक्प्रचार असे म्हणतात. ''[१०] सदानंद देशमुख यांनी आपल्या साहित्यकृतीतून खालील काही वाक्प्रचारांची योजना केल्यामुळे त्यांची वऱ्हाडी बोलीभाषेवरील पकड आपल्या सहज लक्षात येते.

'काळजाची बेंबळी झाली', 'हरळी फुटणे', मनाला पंख फुटणे', सुस्कारा टाकणे', अघळ पघळ बोलणे', तीन तेरा वाजणे', रक्तबंबाळ होणे', 'काळजात भदाड पडण्यासारखे झाले', उखळ पांढरे करणे' इत्यादी वाक्प्रचारांनी त्यांच्या साहित्यातील भाषेचे वैभव वाढवलेले बघावयास मिळते.

अलंकार :—

स्त्री सौदर्य अधिक खुलवण्याकरिता ज्याप्रमाणे दागिण्याचा वापर केला जातो तसेच साहित्यातील कविता, कथा, कादंबरी या लेखनकृतीत अलंकाराचा वापर केल्याने साहित्याची शोभा वाढते. सदानंद देशमुख यांनी आपल्या साहित्यात वैशिष्ट्येपूर्ण उपमा, रूपक, प्रतिमा, उत्प्रेक्षा, अतिश्योक्ती अलंकाराचा वापर केल्याने त्यांच्या साहित्यात वेगळेपण बघावयास मिळते.

१. ''फुलाच्या झाडावरच्या सर्व फांद्या घाव घालून तोडाव्यात, सरोवरातील तरंगणारी कमळपुष्प कोणी बोचकारून न्यावी व सरोवर उजाड ओव दिसावं तस झालं होत.'' (अंधारबन, पृ. २२)
२. ''कुऱ्हाडीच्या घावानं खोड चिंधडावं तसं गीताच्या बोलण्यानं सुमनचं काळीज चिंधाडल'' (अंधारबन, पृ. २९)
३. ''पुन्हांदा कृष्णावाणी तुमचे पाय मपल्या या सुदाम झोपडीस लागले.'' (लचांड, पृ. ३८)
४. ''दारिद्र्य भुताच्या पावलानं गावात वास्तव्यास आले'' (लचांड, पृ. ३८)
५. ''तर त्याच्यानं शेषरावचे कान किटले दाताखाली खडे रगडल्यावाणी व्हायला लागले'' (उठावण, पृ. ४)
६. ''फणफण करून राह्यला दारू पाजेल सांडावाणी फुसफुस करू लागला'' (उठावण, पृ. ४)
७. ''कापसाच्या पोत्यासारखा तुकामरामबुवा एकदम ढिला फसक झाला'' (महालूट पृ. ७)
८. ''तवा साल चिलटासारखं पतलछडांग दिसतं जाय आता रान हेल्यावाणी सुधरलं''(महालूट, पृ.७)

या विविध अलंकारातून सदानंद देशमुखांची बोलीभाषा कथा साहित्यविश्वाला समृद्ध करते.

सुभाषिते :—

सदानंद देशमुखांच्या कथा साहित्यातून म्हणी, वाक्प्रचाराबरोबरच सुभाषिते, संतलोकांची वचने यांचा प्रभावी वापर केल्याचे आपणास बघावयास मिळते. त्यामुळे साहजिकच त्यांच्या कथासाहित्याचे स्थान उंचावले आहे.

१. ''व्यवहार आणि भावना याचं युद्धच सुरू झालं होतं जणू बापलेकांत''(अंधारबन, पृ. १२)
२. ''माणसाने मानवील तसंच खावावं अन् सोभील तसंच लेवावं'' (अंधारबन, पृ. ५५)
३. ''रात्रं दिवस आम्हा युद्धाचा प्रसंग अंतर्बाह्य जग आणि मन...जीवाही अगोज पडती आवात येऊनिया नित्य, नित्य वारू'' (लचांड, पृ. १८)
४. ''ओले मूळ भेदी खडकाचे अंग अभ्यासाशी संग कार्यसिद्धी'' (लचांड, पृ. १८)
५. ''इक्रीची ढेप, इक्रीचं का पुरी पडते का काई म्हंता न घरकी मुर्गी दाल बराबर''(उठावण, पृ. १३)
६. ''जळे माझी काया लागला वोणवा धाव गा केशवा मायबापा'' (उठावण, पृ. १३)

७. ''पण मपल्याजोळ नाई नं आता दाम मी त करून हाह्यलो झाम झाम..''(महालूट, पृ. ६)
८. ''बार भाई खेती... अन् काई येना हाती...'' (महालूट, पृ. १४)

ग्रामीण संवेदनांचे चित्रण :—

सदानंद देशमुख यांच्या संपूर्ण साहित्यात जागोजागी ग्रामीण संवेदनांच चित्रण बघावयास मिळते. परिणामी कृषीजीवन आणि ग्रामीण जीवनाशी संबंधित विश्व दर्शन त्यांच्या साहित्यातून होतं.

उदा.

१. ''म्हणजे गावात आठ—दहा घरं चांगली खाऊन—पिऊन सुखी आहेत. ते हिरवळून जरा मासाळून आहेत. बाकी सगळे कडक! वठल्या झाडाच्या वाळल्या खोडासारखे. गावातील घरंही अजून तशीच जुन्या बांधणीची. आता म्हातारी होऊन खिंडार झाली. त्याची डागडुजी करायचं बळ अंगात नाही. भिंती पडायला पाहतात तर त्यांना लाकडी—जिकन्या लावून तोलून धरलेलं जुनं घर पडलं तर ते तसंच खिंडार सोडून घरधनी नवीन घर बांधणार. जुन्या घराच्या पुढ्यात चार—सहा टीनपत्रांच बसकं. ठेगणंठुसकं जुन्या खिंडाराच्या पुढ्यात हे नवीन घर दिसतं कसं तर जुन्या खिंडाराला पित्त झाल्यासारखं. असं सगळं चित्र म्हणजे विचित्र! या चार—दोन नापिकाच्या सालात दारिद्र्य भुताच्या पावलांन गावात वास्तव्यास आलेलं ते जाण्यास तयार नाही.'' (अंधारबण पृ. २१)
२. ''देवीदास चुलीतल्या आरासारखा धगधगत होता. त्याला डॉक्टरने आवरून धरलं. कोणीतरी ठोस मारण्याच्या ठेकेदारास उचलून पुन्हांदी खुर्चीत ठेवलं. तिथ भिजक्या कोंबडीच्या पिल्लासारखा तो बसला'' (उठावण पृ. ४८)
३. ''माणसं हबकून जागच्या जागी थबकले. ओरडू लागले, सगळा कल्लोळचं झाला. कशाचीच पर्वा न करता गाई कचाकच हिरवे कोमटे मुळापासून खात होत्या. हिरवंगार शेत काळभंगार होऊ लागलं होतं आणि काळ होणारं शेत पाहून शिवाचं मन हिरवळत होतं'' (लचांड पृ. ४७)
४. ''अंगणात विजेच्या दिव्याचा उजेड पडलेला होता तर लक्षात आलं की, दोन्ही बैलांच्या मागच्या पायाला चाकं लागून जखमा झाल्या आहेत. तो खोपा विस्कटून टाकलेल्या पाखरासारखा सैरभैर झाला.'' (महालूट पृ. ७)
५. ''जवा कणसावर दाणे तवा पाखरं झोंबती इथं गोदामाच्या दारी गधे, डुकरं लुचती'' (गावकळा पृ. १)

पात्रांच्या मानसिक स्थितीचे चित्रण :—

साहित्यकृती म्हटल की विविध स्वभावाचे पात्र तसेच घटना—प्रसगांचे चित्रण आलेच. त्याशिवाय साहित्याचे मर्म उलगडता येत नाही. हे तेवढेच खरे. सदानंद देशमुख यांच्या कथा साहित्यातील पात्र हे प्रामुख्याने ग्रामीण कृषीजीवनाशी निगडित असल्याचे बघावयास मिळते. त्यात ही पात्र दु:ख, दारिद्र, दुष्काळ, आजारपण, नापिकी आदी समस्यानी ग्रस्त आहेत. तेव्हा या पात्रांच्या मानसिक स्थितीचे चित्रण करतांना वाचकांच्या मनाचे वेध घेणारे ठरते. यात शंका नाहीच. हे खालील खालील कथासंग्रहात आलेल्या विविध प्रसंगावरून लक्षात येते.

१. ''बगळ्यानं आपली खरखरीत जीभ बाहेर काढून वळवळली. तसा त्यानं आपल्या शिरशिरलेल्या हात बगळ्याच्या जिभेपुढे नेला. त्याच्या जिभेच्या खरखरीत स्पर्शानं अंग शहारून आलं. अंगावरचे पिकले पांढुरके केस क्षणभर ताठ होत आहेत, असा त्याला भास झाला.''(गावकळा, पृ. १७)
२. ''आमासानं शेवंतीबीं उठली, तसं तिच्या पायाचं भदाड ठसठसून उठलं, हद्दीच्या पार ठणकायले लागलं. पुवाचे दोन—चार थेंब टपटप खाली पडले. तिनं भदाडकडी निरखून पाह्यलं, समदं पिलपिलं झालं व्हतं. नासक्या शेंदाडासारखं दिस व्हतं, इच्यावर काय

टाकावं, कशानं बरं होईल हे, आसा हमिशासारखे घोर तिले सतावायले लागला'' (अंधारबन, पृ. ९)

३. ''मग तो तिला तशीच छातीशी कवटाळून धरून पुन: पुन्हा तिचे डोळे उघडू लागला. चेहरा निरखून पाहू लागला तो शांत दिसत होता. कुठूनसं रक्त ओघळत होतं तो रक्तात न्हाऊन निघाला. अंधारात जखम दिसत नव्हती. डोळ्यातून आसवांच्या धारा... अंगातून घाम... अन् रक्त. तो चिंब चिंब न्हाऊन गेला.'' (लचांड, पृ. ९१)

४. ''आपल्या लग्नापायी सगळं घरदार बेजार... पाच एकर का होईना; पण शेत विकणार.... तेवढंच बंडूदादाचं कमी होणार... अन् पुन्हांदा आपल्या मनासारखा नवरा नाहीच भेटणार'' (महालूट, पृ. ६५)

५. ''तरी डोळ्यात थेंब नाही. आत मात्र अनेक विषारी विळख्यांची वळवळ जाणवत होती. काळजावर एकावर एक दंश होते. त्यानं अंग आग—आग होत होते'' (उठावण, पृ. ६)

कथानकात निसर्ग व प्राणी सृष्टीचं चित्रण :—

सदानंद देशमुख यांनी केलेले कथा साहित्याचे लेखन हे ग्रामीण व कृषीजीवनाशी निगडीत आहेत. याचा प्रत्यय आपणास येतोच. त्यामुळे साहजिकच खेड्यातील लोकांचे जीवन व निसर्ग यांच हुबेहुब चित्रण आपणास त्याच्या कथासाहित्यात बघावयास मिळते. निसर्गाच वर्णन करतांना डोंगर, टेकड्या, नदी, नाले, पाऊस, पाणी, झाडे—झुडपे, वृक्ष यांच्या बरोबरच प्राणीजीवनाशी संबंधित शेतात मदत करणारे बैल, गाय, म्हैस, कुत्रा, मांजर, कोंबडी, मेंढी, ससा, बकरी, इत्यादींचे वर्णन आले आहेत.

उदा.

१. ''दरवर्षी पिकलेल्या फळांचा बदबद पाऊस पाडणारं आणि गावातील पोरासोरानां आपल्याकडे बोलावून त्यांच्या जिभा जांभळ्या करणारं हे झाड! हे झाडं तोडलं जाणार? कल्पनेनंच तात्याला गदगदून आलं.'' (अंधारबन, पृ. १२)

२. ''सापाच्या तोंडातून बाहेर आलेल्या बोडकीसारखं'' (उठावण,ा पृ. १५०)

३. ''खोपा विस्कटून टाकलेल्या पाखरासारखा सैरभैर''(उठावण, पृ. १५०)

४. ''भुकेल्या पन्नास गाईनी सगळा फलाट आता सफाचट केला होता. पहिल्यांदा घाईने ओरबाडलेले उर सूर कोमटे आता त्या पुन्हा खात होत्या. कटिंगीचा दुसरा हात केसावरून फिरवावा तसे सगळे कोमटे आता सफाचट होत होते.'' (लचांड, पृ. १५०)

या विविध कल्पकतेचा केलेला लेखनातील वापर यावरूनच सदानंद देशमुखांच्या कथालेखनातील भाषाशैलीचा परिचय आपणास होतो.

निष्कर्ष :—

१. सदानंद देशमुख यांनी आपल्या कथासाहित्यात ग्रामीण बोलीतील शब्दांचा वापर केला त्यामुळे त्यांच्या लेखन भाषाशैलीचे वेगळेपण जाणवते.

२. सदानंद देशमुख यांनी आपल्या कथालेखनात ग्रामीणतत्त्वाला न सोडता भेदकता, आकर्षकता, आशयसन्मुक्ता या गुणांचा वापर केलेला दिसतो.

३. सदानंद देशमुख यांनी आपल्या कथालेखनात पात्रांच्या माध्यमातून वास्तवजीवन वाचकांपुढे मांडण्याकरिता मनोविश्लेषण तंत्राचा वापर केलेला दिसतो.

४. सदानंद देशमुख यांनी आपल्या कथालेखनातून ग्रामीण लोकांच्या स्वभावातील अनेकविध पदर वाचकांपुढे सादर केल्याचे दिसून येते.

५. सदानंद देशमुख यांनी आपल्या कथालेखनात घटना प्रसंगाचे वर्णन करताना ग्रामीण जीवनाशी निगडीत प्रतिमांचा वापर केलेला दिसून येतो.

संदर्भ :—

अ) आधारभूत संदर्भ ग्रंथ

१. देशमुख सदानंद — 'अंधारबन', कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद,प. आ. १९८९
२. देशमुख सदानंद — 'लचांड', मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे, प. आ. १९९२
३. देशमुख सदानंद — 'उठावण', मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे, प. आ. १९९४
४. देशमुख सदानंद — 'महालूट', मेहता पब्लिकेशन हाऊस, पुणे,प. आ. १९९५
५. देशमुख सदानंद — 'गावकळा', सुविद्य प्रकाशन, पुणे

ब) संदर्भ सूची

१. कुलकर्णी अ. वा. — 'साहित्य विचार', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प. आ. १९९९७, पृ. क्र. १३७
२. मालसे स. ग. — 'साहित्य सिद्धांत', महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, दु. आ. २००२,पृ. क्र. ९१
३. कुलकर्णी अ. वा. — 'साहित्य विचार', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प. आ. १९९७, पृ. क्र. ९७
४. नेमाडे भालचंद्र — 'साहित्याची भाषा', साकेत प्रकाशन, औरंगाबाद,प. आ. १९८७, पृ. क्र. ४०
५. जाधव रा. ग. — 'वाङ्मयीन निबंध लेखन', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, प. आ. १९८७, पृ. क्र. ९४
६. खांडगे मंदा (संपादन) — 'प्रबंध एकादशी', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प. आ. १९९९, पृ. क्र. १५२
७. लांजेवार लता —'वऱ्हाडी बोलीतील लोकसाहित्य — स्वरूप व समिक्षा', विजय प्रकाशन, पुणे, प. आ. २००३, पृ. क्र. १४४
८. तत्रैव — पृ. क्र. १४४
९. तत्रैव — प. क्र. १४५
१०. भागवद श्रीपाद — 'मराठी व्याकरण', विद्या भारती प्रकाशन, लातूर, पृ. क्र. २३२

डिजिटल व्यवसाय आणि ई कॉमर्स आधुनिक अर्थव्यवस्थेतील परिवर्तन

दिनेश रामराव घाटे
(संशोधक विद्यार्थी)
Faculty of Commerce & Management
Shri Shivaji College of Art's, Commerce & Science, Akola

1) सारांशः– (Abstract)

डिजिटल व्यवसाय आणि ई–कॉमर्स हे आधुनिक जागतिक अर्थव्यवस्थेचे महत्त्वाचे स्तंभ बनलेले आहे. तांत्रिक प्रगती आणि डिजिटल प्लॅटफॉर्मच्या व्यापक वापरामुळे व्यवसाय करण्याच्या पद्धतींमध्ये आमुलाग्र बदल झाला आहे. डिजिटल व्यवसाय म्हणजे संस्थांच्या कार्यपद्धती, व्यवसाय मॉडेल्स आणि मूल्यनिर्मिती प्रक्रियांमध्ये डिजिटल तंत्रज्ञानाचा धोरणात्मक वापर होय. क्लाउड कम्प्युटिंग, मोबाइल तंत्रज्ञान, बिग डेटा ॲनालिटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि सोशल मीडियाचा वापर करून कार्यक्षमता, ग्राहक सहभाग, नवोन्मेष आणि स्पर्धात्मक प्राबल्य वाढवले जाते.

ई–कॉमर्स हा डिजिटल व्यवसायाचा एक महत्त्वाचा घटक असून इंटरनेट आधारित प्लॅटफॉर्मद्वारे वस्तू व सेवांची खरेदी–विक्री केली जाते. यामध्ये व्यवसाय–ते–व्यवसाय (B2B), व्यवसाय–ते–ग्राहक (B2C), ग्राहक–ते–ग्राहक (C2C) आणि ग्राहक–ते–व्यवसाय (C2B) असे विविध व्यवहार मॉडेल्स समाविष्ट आहेत. ई–कॉमर्समुळे भौगोलिक मर्यादा कमी झाल्या असून व्यवहार आणि विपणन खर्चात घट झाली आहे. तसेच ग्राहकांना अधिक पर्याय, किंमत पारदर्शकता आणि सोयीसुविधा उपलब्ध झाल्या आहेत. डिजिटल पेमेंट प्रणाली, प्रगत लॉजिस्टिक्स आणि वैयक्तिकृत विपणन धोरणांमुळे विकसित व विकसनशील देशांमध्ये ई–कॉमर्सचा वेगाने विस्तार झाला आहे.

डिजिटल व्यवसाय आणि ई–कॉमर्स यांनी 21 व्या शतकात संस्थांच्या कार्यपद्धती, स्पर्धा आणि मूल्यनिर्मितीच्या पद्धतींमध्ये आमूलाग्र बदल घडवून आणले आहेत. इंटरनेट, मोबाईल संगणक आणि डेटा विश्लेषणाच्या व्यापक वापरामुळे व्यवसाय पारंपरिक मॉडेलमधून डिजिटल प्लॅटफॉर्मकडे वळले आहेत. या संशोधन पेपरमध्ये डिजिटल व्यवसाय आणि ई–कॉमर्सचा विकास, घटक, फायदे, आव्हाने, धोके, वापरले जाणारे तंत्रज्ञान, व्यावसायिक धोरणे आणि भविष्यातील प्रवाह यांचा सविस्तर अभ्यास करण्यात आला आहे. डिजिटल परिवर्तनामुळे जागतिक बाजारपेठ, ग्राहक अपेक्षा आणि नवोपक्रम कसा बदलत आहे हे या अभ्यासातून स्पष्ट होते.

2) प्रस्तावनाः– (Introduction)

आजच्या माहिती–तंत्रज्ञानाच्या युगात व्यवसाय करण्याची पद्धत पूर्णपणे बदललेली दिसून येते. संगणक, इंटरनेट, स्मार्टफोन, कृत्रिम बुद्धिमत्ता, क्लाउड कम्प्युटिंग आणि डिजिटल पेमेंट प्रणाली यांच्या विकासामुळे पारंपरिक व्यवसायापेक्षा डिजिटल बिझनेस आणि ई–कॉमर्स या संकल्पनांना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. डिजिटल तंत्रज्ञानाच्या मदतीने कमी वेळेत, कमी खर्चात आणि अधिक व्यापक बाजारपेठेत व्यवसाय करणे सहज शक्य झाले आहे.

डिजिटल बिझनेस म्हणजे इंटरनेट व डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून व्यवसायाच्या सर्व प्रक्रिया, उत्पादन, विपणन, विक्री, वितरण आणि ग्राहक सेवा संचालित करणे होय. तर ई–कॉमर्स म्हणजे वस्तू व सेवांची खरेदी–विक्री ही ऑनलाइन माध्यमातून करणे. आज Amazon, Flipkart, Meesho, Myntra तसेच भारतातील अनेक स्टार्ट–अप कंपन्या या ई–कॉमर्सच्या यशस्वी उदाहरणे आहेत. यामुळे ग्राहकांना घरबसल्या विविध पर्याय, सुलभ तुलना आणि सुरक्षित पेमेंट सुविधा उपलब्ध होत आहेत.

गेल्या काही दशकांमध्ये इंटरनेट आणि डिजिटल तंत्रज्ञानाच्या विकासामुळे जागतिक अर्थव्यवस्थेत मोठे परिवर्तन झाले आहे. डिजिटल व्यवसाय आणि ई–कॉमर्स या दोन संकल्पना परस्पर संबंधित असल्या तरी त्यांच्यात फरक आहे. डिजिटल व्यवसाय म्हणजे डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करून नवीन व्यवसाय प्रक्रिया निर्माण करणे

किंवा विद्यमान प्रक्रिया, संघटन संस्कृती आणि ग्राहक अनुभव सुधारित करणे. ई–कॉमर्स ही डिजिटल व्यवसायाची एक उपघटक असून त्यामध्ये इंटरनेटद्वारे वस्तू आणि सेवांची खरेदी–विक्री केली जाते.

जागतिकीकरण आणि तंत्रज्ञानातील प्रगतीमुळे डिजिटल व्यवसायाला मोठ्या प्रमाणावर चालना मिळाली आहे. पारंपरिक दुकाने असलेले व्यवसाय आता ऑनलाईन माध्यमांचा वापर करून जागतिक ग्राहकांपर्यंत पोहोचत आहेत. कोविड–19 महामारीमुळे डिजिटल माध्यमांचा प्रचार, प्रसार आणि स्वीकार अधिक वेगाने झाला.

माहिती व तंत्रज्ञानामध्ये होत असलेल्या प्रगतीमुळे व्यवसाय करण्याच्या पद्धतींमध्ये आमूलाग्र बदल झाला आहे. पारंपरिक व्यवसाय पद्धतींपासून डिजिटल व्यवसायाकडे आणि ई–कॉमर्सकडे जग वेगाने वाटचाल करत आहे. संगणक, इंटरनेट, स्मार्टफोन, क्लाउड कॉम्प्युटिंग, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि डिजिटल पेमेंट प्रणाली यांच्या वापरामुळे डिजिटल बिझनेस आणि ई–कॉमर्सचा मोठ्या प्रमाणावर विकास झाला आहे. आजच्या जागतिक अर्थव्यवस्थेत डिजिटल व्यवसाय आणि ई–कॉमर्स हे आर्थिक विकासाचे महत्त्वाचे घटक बनले आहेत.

भारतात डिजिटल बिझनेस आणि ई–कॉमर्सचा विकास विशेषतः डिजिटल इंडिया, मेक इन इंडिया, UPI व ऑनलाइन पेमेंट प्रणाली यांसारख्या सरकारी उपक्रमांमुळे वेगाने झाला आहे. कोविड–19 महामारीच्या काळात ऑनलाइन खरेदी–विक्रीला मोठी चालना मिळाली आणि डिजिटल व्यवसायाचे महत्त्व अधिक ठळकपणे जगासमोर आले. लघु व मध्यम उद्योगांसाठी (MSME) डिजिटल प्लॅटफॉर्म हे नवीन संधींचे दालन ठरले आहे. तथापि, डिजिटल बिझनेस आणि ई–कॉमर्ससमोर सायबर सुरक्षा, डेटा गोपनीयता, तांत्रिक अडचणी, डिजिटल साक्षरतेचा अभाव आणि कायदेशीर अडथळे यांसारखी आव्हानेही आहेत. त्यामुळे या क्षेत्राचा सखोल अभ्यास करणे आवश्यक आहे. या संशोधन पेपरमध्ये डिजिटल बिझनेस आणि ई–कॉमर्सची संकल्पना, स्वरूप, विकास, फायदे–तोटे, भारतातील स्थिती, तसेच भविष्यातील संधी व आव्हाने यांचा सविस्तर अभ्यास करण्यात येणार आहे. आधुनिक अर्थव्यवस्थेत डिजिटल बिझनेस आणि ई–कॉमर्सचे वाढते महत्त्व समजून घेणे हा या संशोधनाचा मुख्य उद्देश आहे.

3) डिजिटल बिझनेसची संकल्पना

डिजिटल बिझनेस म्हणजे इंटरनेट व डिजिटल तंत्रज्ञानाच्या साहाय्याने चालवला जाणारा व्यवसाय वा उद्योग. उत्पादन, विपणन, विक्री, ग्राहक सेवा, पेमेंट व व्यवस्थापन या सर्व प्रक्रिया डिजिटल माध्यमांतून पार पाडल्या जातात. डिजिटल बिझनेसचे प्रमुख घटक पुढीलप्रमाणे आहेतः

1) वेबसाइट व मोबाईल ॲप्स
2) सोशल मीडिया मार्केटिंग
3) डिजिटल पेमेंट प्रणाली
4) डेटा ॲनालिटिक्स
5) क्लाउड तंत्रज्ञान

डिजिटल बिझनेसमुळे व्यवसाय अधिक वेगवान, पारदर्शक आणि ग्राहककेंद्रित झालेला आहे.

4) ई–कॉमर्सची संकल्पना

ई–कॉमर्स म्हणजे इंटरनेटच्या माध्यमातून वस्तू व सेवांची खरेदी–विक्री करणे. ग्राहक घरबसल्या विविध उत्पादने पाहू शकतात, तुलना करू शकतात आणि ऑनलाइन पेमेंटद्वारे खरेदी करू शकतात. ई–कॉमर्सचे प्रमुख प्रकार पुढीलप्रमाणे आहेतः

B2C (Business to Consumer) – उदा. Amazon, Flipkart
B2B (Business to Business) – उदा. India MART
C2C (Consumer to Consumer) – उदा. OLX
C2B (Consumer to Business) – फ्रीलान्सिंग प्लॅटफॉर्म

5) डिजिटल बिझनेस आणि ई–कॉमर्सचा ऐतिहासिक विकास

प्रारंभिक टप्पा

1990 च्या दशकात इंटरनेटच्या प्रसारासोबत ई–कॉमर्सची सुरुवात झाली. सुरुवातीला ई–मेल आणि साध्या वेबसाइट्सद्वारे व्यावसायीक व्यवहार होत असत. Amazon आणि eBay यांसारख्या कंपन्यांनी ऑनलाईन व्यवहार

शक्य असल्याचे दाखवून दिले. पुढे ऑनलाइन पेमेंट गेटवे, सुरक्षित व्यवहार (SSL), ब्रॉडबॅंड इंटरनेट आणि लॉजिस्टिक सेवा विकसित झाल्यामुळे ई–कॉमर्सला चालना मिळाली व विस्तार झाला.

भारतामध्ये 2010 नंतर स्मार्टफोन आणि स्वस्त इंटरनेटमुळे डिजिटल व्यवसाय व ई–कॉमर्सचा वेगाने विकास झाला. डिजिटल इंडिया, मेक इन इंडिया यांसारख्या सरकारी उपक्रमांनीही या क्षेत्राला बळ दिले.

21 व्या शतकातील वाढ

स्मार्टफोन, सोशल मीडिया, क्लाउड कम्प्युटिंग आणि डिजिटल पेमेंट प्रणाली यांच्या वाढीमुळे डिजिटल व्यवसाय झपाट्याने विस्तारला. वेबसाइट्स स्थिर न राहता डायनॅमिक प्लॅटफॉर्ममध्ये रूपांतरित झाल्या.

महामारीचा प्रभाव

कोविड–19 महामारीने डिजिटल परिवर्तनाला गती दिली. लॉकडाऊनमुळे ग्राहक आणि व्यवसाय ऑनलाईन सेवांकडे वळले. ई–कॉमर्स, ऑनलाईन शिक्षण, दूरस्थ काम आणि टेलिहेल्थ या सेवांमध्ये मोठी वाढ झाली.

6) डिजिटल व्यवसायाचे मुख्य घटक

डिजिटल व्यवसाय केवळ ऑनलाईन विक्रीपुरता मर्यादित नसून त्यामध्ये विविध घटकांचा समावेश होतो.

1) डिजिटल प्लॅटफॉर्म : Amazon, Alibaba यांसारखे मार्केटप्लेस आणि Facebook, Instagram यांसारखी सोशल मीडिया प्लॅटफॉर्म खरेदीदार आणि विक्रेत्यांना जोडतात.

2) डिजिटल उत्पादने आणि सेवा : सॉफ्टवेअर, ऑनलाईन सबस्क्रिप्शन, स्ट्रीमिंग सेवा आणि क्लाउड सेवा यांचा यामध्ये समावेश होतो.

3) डेटा आणि विश्लेषण : डेटा हा डिजिटल व्यवसायाचा महत्त्वाचा स्रोत आहे. ग्राहक वर्तन समजून घेण्यासाठी आणि निर्णय घेण्यासाठी डेटा विश्लेषणाचा वापर केला जातो.

4) ग्राहक अनुभव व्यवस्थापन : वेबसाइट, मोबाईल ॲप, सोशल मीडिया आणि चॅटबॉट्सद्वारे ग्राहक अनुभव सुधारला जातो.

5) डिजिटल पुरवठा साखळी : IoT, RFID आणि ब्लॉकचेन यांसारख्या तंत्रज्ञानामुळे पुरवठा साखळी अधिक कार्यक्षम होते.

7) ई–कॉमर्सचे प्रकार

1) व्यवसाय ते ग्राहक (B2C):– हा एक सर्वात लोकप्रिय असा व्यवसायाचा प्रकार आहे ज्यामध्ये व्यावसायीक थेट ग्राहकांना उत्पादने विकतात. उदा. ऑनलाईन रिटेल स्टोअर्स.

2) व्यवसाय ते व्यवसाय (B2B):– एका व्यवसायाकडून दुसर–या व्यवसायाला उत्पादने किंवा सेवा पुरवणे किंवा विकणे यांचा अंतर्भाव होतो. उदा. औद्योगिक वस्तुंचा पुरवठादार.

3) ग्राहक ते ग्राहक (C2C):– यामध्ये एक ग्राहक दुस–या ग्राहकाला वस्तूंची विक्री करीत असतो. eBay, OLX यांसारख्या प्लॅटफॉर्मद्वारे ग्राहकांमध्ये व्यवहार.

4) ग्राहक ते व्यवसाय (C2B):– ग्राहक व्यवसायांना सेवा देतात, उदा. डिजिटल मार्केटिंग.

5) मोबाईल कॉमर्स (M&Commerce):– स्मार्टफोनद्वारे होणारे ई–कॉमर्स व्यवहार यामध्ये अंतर्भूत होतात.

8) डिजिटल व्यवसायाला चालना देणारी तंत्रज्ञान

1) क्लाउड कम्प्युटिंग:– कमी खर्चात स्केलेबल सुविधा उपलब्ध करून देते.

2) कृत्रिम बुद्धिमत्ता (AI):– वैयक्तिक शिफारसी, चॅटबॉट्स आणि फसवणूक शोधण्यासाठी वापरली जाते.

3) बिग डेटा विश्लेषण:– मोठ्या प्रमाणातील डेटामधून उपयुक्त माहिती मिळवली जाते.

4) मोबाईल तंत्रज्ञान:–कोणत्याही ठिकाणाहून सेवा वापरण्याची सोय.

5) ब्लॉकचेन:–व्यवहारांमध्ये पारदर्शकता आणि सुरक्षितता वाढवते.

9) डिजिटल व्यवसाय आणि ई–कॉमर्सचे फायदे

1) जागतिक बाजारपेठ उपलब्ध 2) उत्पादन खर्चात घट

3) ग्राहकांचे वैयक्तिक अनुभव 4) सोय आणि वेळेची बचत

5) व्यवसायाची जलद वाढ आणि नवोपक्रम 6) व्यवसाय कोणत्याही भौगोलिक मर्यादेशिवाय करता येतो.

7) कमी खर्चात व्यवसाय, दुकान, कर्मचारी व साठवणूक करता येते.
8) 24 तास 7 दिवस उपलब्धता, ग्राहक कोणत्याही वेळी खरेदी करू शकतात.
9) ग्राहक समाधान, जलद सेवा, सुलभ परतावा व विविध पर्याय.
10) डेटा आधारित निर्णय, ग्राहकांच्या वर्तनावर आधारित निर्णय घेता येतात.

10) आव्हाने आणि धोके

1) सायबर सुरक्षेचे धोके 2) तीव्र स्पर्धा
3) लॉजिस्टिक्स आणि वितरण समस्या 4) कायदेशीर आणि नियामक अडचणी
5) डिजिटल दरी (Digital Divide) 6) फायद्यांसोबत काही अडचणीही आहेतः
7) सायबर सुरक्षा आणि डेटा गोपनीयतेचा धोका 8) ऑनलाइन फसवणूक
9) तांत्रिक ज्ञानाचा अभाव 10) ग्रामीण भागातील इंटरनेट मर्यादा
11) स्पर्धा वाढल्यामुळे नफा कमी होणे

11) यशस्वी डिजिटल व्यवसायासाठी धोरणे

1) ग्राहक–केंद्रित दृष्टिकोन 2) ओम्नी–चॅनल उपस्थिती
3) लवचिक व्यवसाय मॉडेल 4) तंत्रज्ञान आणि कौशल्यात गुंतवणूक
5) भागीदारी आणि डिजिटल इकोसिस्टम

12) भविष्यातील प्रवाह

1) ऑगमेंटेड रिॲलिटी (AR) आणि व्हर्च्युअल रिॲलिटी (VR)
2) सोशल कॉमर्स
3) व्हॉईस कॉमर्स
4) शाश्वत (Sustainable) डिजिटल व्यवसाय
5) वाढती स्वयंचलन (Automation)

13) भविष्यात डिजिटल बिझनेस आणि ई–कॉमर्समध्ये पुढील बदल अपेक्षित आहेतः

1) कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि मशीन लर्निंगचा वाढता वापर
2) व्हॉइस सर्च आणि व्हर्च्युअल शॉपिंग
3) ड्रोन व ऑटोमेटेड डिलिव्हरी
4) ग्रामीण ई–कॉमर्सचा विस्तार

14) निष्कर्ष (Conclusion)

डिजिटल व्यवसाय आणि ई–कॉमर्स यांनी जागतिक अर्थव्यवस्थेला नवे रूप दिले आहे व आधुनिक अर्थव्यवस्थेचा कणा बनला आहे. तंत्रज्ञानाच्या मदतीने व्यवसाय अधिक कार्यक्षम, स्पर्धात्मक आणि ग्राहकाभिमुख झाला आहे. नवोपक्रम, कार्यक्षमता आणि ग्राहक समाधान या क्षेत्रांमध्ये मोठी प्रगती झाली आहे. भविष्यात AI, ब्लॉकचेन आणि AR/VR यांसारख्या तंत्रज्ञानामुळे डिजिटल व्यवसाय अधिक विस्तारेल. डिजिटल बिझनेस आणि ई–कॉमर्सच्या माध्यमातून रोजगारनिर्मिती, आर्थिक विकास आणि जागतिक व्यापाराला अधिक चालना मिळेल.यातुन योग्य धोरणे आणि तंत्रज्ञान स्वीकारणारे व्यवसाय यशस्वी ठरतील.

15) संदर्भ (References)

1. Chaffey, D. – Digital Business and E-Commerce Management
2. Laudon & Traver – E-Commerce: Business, Technology, Society
3. Turban et al. – Electronic Commerce
4. Harvard Business Review – Digital Commerce
5. Rayport & Jaworski – e-Commerce
6. S.M. Kolte - E-Commerce

अमरावती जिल्हा मेळघाट क्षेत्रातील महिलांना गर्भधारणे दरम्यान जीवनशैली संबंधित जोखीमीचे आरोग्य विषयक ज्ञान: एक अभ्यास

कु. लिना डी आकोटकर

आचार्य पदवी संशोधक

श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यायलय, अमरावती

गोषवारा:

अमरावती जिल्ह्यामधील मेळघाट क्षेत्र हे आदिवासी व दुर्गम भौगोलिक परिस्थितीमुळे आरोग्यदृष्ट्या संवेदनशील मानले जाते. या भागातील महिलांमध्ये गर्भधारणे दरम्यान जीवनशैली संबंधित जोखीमी बाबत आरोग्य विषयक ज्ञानाची पातळी मर्यादित असल्याचे विविध अहवालातून सूचित होते. प्रस्तुत अभ्यासाचा उद्देश मेळघाट क्षेत्रातील गर्भवती महिलांच्या जीवनशैली संबंधित जोखीमी बाबत असलेल्या आरोग्य ज्ञानाचे मूल्यांकन करणे हा आहे. या संशोधनात वर्णनात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला. निष्कर्षानुसार बहुसंख्या महिलांना संतुलित आहार आयर्न, फॉलिक ऍसिड गोळ्यांचे महत्त्व, नियमित तपासणी, विश्रांतीची गरज व इतर समसस्यांच्या लक्षणांची ओळख याबाबत अपुरे ज्ञान आढळते. पारंपरिक समजुती, अल्पशिक्षण, मर्यादित आरोग्यसेवा आणि आर्थिक अडचणी ही प्रमुख कारणे दिसून येतात.

अभ्यासातून असे निष्पन्न होते की, मेळघाट क्षेत्रात गर्भवती महिलांसाठी आरोग्य शिक्षण कार्यक्रम, पोषण पूरकता आधारित समुपदेशन वाढविणे अत्यावश्यक आहे. स्थानिक आरोग्य यंत्रणा व स्वयंसेवी संस्थांनी समन्वयाने कार्य केल्यास मातृ व बाल आरोग्य निदर्शकांमध्ये सुधारणा होऊ शकते.

संकेत शब्द: मेळघाट, अमरावती जिल्हा, आदिवासी महिला, गर्भधारणा, मातृ आरोग्य, जीवनशैली संबंधित जोखीम, आरोग्य साक्षरता, प्रसूतीपूर्वक काळजी, गर्भधारणेतील पोषण.

1 प्रस्तावना:

गर्भधारणा ही महिलांच्या जीवनातील अत्यंत संवेदनशील आणि आरोग्य दृष्ट्या महत्त्वाची अवस्था आहे. गर्भधारणे दरम्यान महिला संतुलित आहार, पुरेशी विश्रांती, नियमित तपासणी आणि योग्य जीवन शैलीचा अवलंब करणे आवश्यक असते. ॲनिमिया, उच्च रक्तदाब, जड श्रमामुळे होणारा थकवा, पोषणाचा अभाव आणि इतर जटील समसस्या उद्भवू शकतात. विशेषतः आदिवासी आणि दुर्गम ग्रामीण भागातील महिला या विविध जोखीमींशी अधिक संवेदनशील असतात. कारण या भागात मर्यादित आरोग्य सेवा, अल्पशिक्षण आणि पारंपारिक समजुती आढळतात. मेळघाट हा भाग आदिवासीबहुल असून शेतकरी व शेतमजूर महिलांमध्ये गर्भधारणे दरम्यान जीवनशैली आणि पोषण संबंधी अपुरे ज्ञान असल्याची शक्यता अधिक आहे. त्यामुळे या महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने जोखीम वाढते आणि मातृ व बाल मृत्यू दर याची संभाव्यता उंचावते. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत संशोधनाचा उद्देश मेळघाट क्षेत्रातील शेतकरी गर्भवती महिलांमध्ये जीवनशैलीशी संबंधित जोखीमि बाबत आरोग्य ज्ञानाची पातळी ओळखणे हा आहे. अभ्यासाद्वारे गर्भवती महिलांमध्ये पोषण व आरोग्यसेवा वापर, तसेच उच्च जोखीम लक्षणे ओळखण्याची आणि जीवनशैली सुधारण्यासाठी उपाययोजना संबंधित माहिती मिळवणे अपेक्षित आहे. हे संशोधन स्थानिक आरोग्य कार्यक्रम जनजागृती आणि आरोग्य धोरणे अधिक प्रभावी बनवण्यास मदत करेल.

2 उद्दिष्टे:

1) गर्भधारणे दरम्यान योग्य पोषण विषयी महिलांच्या ज्ञानाची पातळी तपासणे.

2) ॲनिमिया प्रतिबंधात्मक व आरोग्यविषयक जागरूकता अभ्यासणे.

3) आरोग्य शिक्षण कार्यक्रमाची गरज व प्रभावी उपाय सुचविणे.

3 संशोधनाचे महत्त्व:

गर्भधारणे दरम्यान महिलांची जीवनशैली आणि पोषणाच्या संदर्भातील जोखीम थेट मातृ आणि बाल आरोग्यावर परिणाम करतात. मेळघाट सारख्या आदिवासी व दुर्गम भागात योग्य माहिती न मिळाल्यामुळे प्रसुती विषयाची गुंतागुंत भीती आणि जड शारीरिक श्रमामुळे गर्भवती महिलांमध्ये आरोग्याचा धोका वाढतो. या अभ्यासातून योग्य आरोग्य ज्ञानाची गरज अधोरेखित केली जाऊ शकते. महिलांमध्ये अपूर्ण किंवा चुकीच्या आरोग्य ज्ञान आढळल्यास स्थानिक आरोग्य यंत्रणा स्वयंसेवी संस्था आणि सरकारी कार्यक्रम अधिक प्रभावी पद्धतीने आरोग्य शिक्षण आणि जागरूकता कार्यक्रम घेउ शकतात. आदिवासी भागातील पारंपारिक समजुती आर्थिक आणि शैक्षणिक मर्यादा सामाजिक संरचना या घटकांचा गर्भधारणे दरम्यान जीवनशैली संबंधित आरोग्य ज्ञानावर कसा परिणाम होते हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. हे आरोग्य धोरण आणि हस्तक्षेप अधिक लक्षित करण्यास मदत करते. एन. एफ. एच. एस. अहवाल आणि इतर आरोग्य सर्वेक्षणामधून आलेला डेटा पूर्ण न करता या क्षेत्रातील विशिष्ट समस्यांचा अभ्यास स्थानिक आरोग्य सेवा सुधारण्यासाठी आणि राष्ट्रीय आरोग्य धोरणामध्ये स्थानिक गरजा समाविष्ट करण्यास मदत करतो. आदिवासी व दुर्गम ग्रामीण भागातील गर्भवती महिलांचे जीवनशैलीशी संबंधित जोखीमी बाबतचा अभ्यास भारतीय संदर्भात कमी असल्याने हा संशोधन विषय नवीन माहिती पुरवतो. यामुळे पुढील अभ्यासकांसाठी आधार तयार होतो.

4 संशोधनाची उपयोगिता:

गर्भधारणे दरम्यान जीवनशैली पोषण आणि आरोग्य सेवा वापर याविषयी महिलांचे ज्ञान वाढल्यास मातृ आणि बाल आरोग्याच्या निदर्शनास सुधारणा होऊ शकते अभ्यासातून मिळालेली माहिती स्थानिक आरोग्य कर्मचारी स्वयंसेवी संस्था आणि शासकीय कार्यक्रम यांना लक्षात आरोग्य शिक्षण कार्यक्रम तयार करण्यास उपयोगी ठरेल. आदिवासी आणि दुर्गम ग्रामीण भागातील पारंपारिक समजुती आर्थिक परिस्थिती शैक्षणिक पातळी यांचा आरोग्य ज्ञानावर होणारा प्रभाव जाणून घेता येईल हे स्थानिक आरोग्य धोरणांना अधिक संवेदनशील बनविण्यास मदत करेल. स्थानिक आरोग्य सेवा आणि जनजागृती कार्यक्रम अधिक प्रभावी लक्षित आणि गरजा आधारित बनविण्या संशोधन उपयोगी ठरू शकते. मेळघाट सारख्या आदिवासी दुर्गम भागातील गर्भवती महिलांच्या जीवनशैली संबंधित जोखीमी बाबत मराठीत संशोधन उपलब्ध आहे या अभ्यासातील शैक्षणिक व वैज्ञानिक योगदान होईल आणि पुढील अभ्यासकांसाठी आधार तयार होईल.

5 गर्भधारणेदरम्यान जीवनशैली संबंधित जोखीम घटक

अमरावती जिल्हा मधील मेळघाट भाग हा भौगोलिकदृष्ट्या दुर्गम, आदिवासी व संसाधनांच्या मर्यादित उपलब्धतेमुळे आरोग्यदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र मानला जातो. गर्भधारणेदरम्यान महिलांच्या जीवनशैलीतील काही महत्त्वाचे जोखीम घटक मातृ व बाल आरोग्यावर थेट परिणाम करतात. खालील मुद्द्यांद्वारे हे जोखीम घटक सविस्तर स्पष्ट केले आहेत.

5.1 पोषण अभाव

गर्भधारणेदरम्यान महिलांना अतिरिक्त पोषणाची गरज असते. परंतु ग्रामीण व आदिवासी भागात पोषणाविषयी माहिती व अन्नस्रोत मर्यादित असतात.

5.2 आयर्न, कॅल्शियम व प्रोटीन यांचा अभाव:

गर्भधारणेदरम्यान महिलांच्या शरीरावर अतिरिक्त पोषणाची गरज निर्माण होते. आयर्न हे रक्तातील हिमोग्लोबिन वाढवण्यासाठी आवश्यक असून बाळाच्या वाढीसाठी महत्त्वाची भूमिका बजावते. आयर्नची कमतरता असल्यास ॲनिमिया होण्याची शक्यता वाढते, ज्यामुळे थकवा, अशक्तपणा व प्रसूतीदरम्यान धोका वाढू शकतो. कॅल्शियम हे बाळाच्या हाडे व दातांच्या विकासासाठी आवश्यक असते तसेच आईच्या हाडांचे संरक्षण करते. कॅल्शियम अभावामुळे आईच्या हाडांची झीज होऊ शकते. प्रोटीन हे बाळाच्या पेशी, स्नायू व ऊतींच्या विकासासाठी आवश्यक असते. प्रोटीन कमी असल्यास बाळाचा वाढीचा वेग कमी राहू शकतो व जन्मावेळी वजन कमी असण्याची शक्यता वाढते.

5.3 संतुलित आहाराची माहिती नसणे:

गर्भधारणेदरम्यान संतुलित आहाराचे महत्त्व अत्यंत मोठे असते, परंतु अनेक महिलांना संतुलित आहार म्हणजे नेमके काय याची स्पष्ट माहिती नसते. संतुलित आहारामध्ये धान्य, डाळी, दूध, फळे, भाज्या, अंडी किंवा इतर प्रथिनयुक्त पदार्थ यांचा समावेश असतो. काही ग्रामीण व आदिवासी भागांमध्ये "गर्भधारणेदरम्यान जास्त खाल्ल्यास बाळ मोठे होते व प्रसूती कठीण होते" अशी चुकीची समजूत आढळते. या गैरसमजुतीमुळे महिला आवश्यक पोषणयुक्त अन्नपदार्थ टाळतात. परिणामी आई व बाळ दोघांच्याही आरोग्यावर परिणाम होऊ शकतो. योग्य आहाराविषयी आरोग्य शिक्षण देणे अत्यंत आवश्यक आहे.

5.4 ॲनिमिया

ॲनिमिया हा गर्भवती महिलांमध्ये आढळणारा सर्वात सामान्य व गंभीर आरोग्य धोका मानला जातो. ॲनिमिया म्हणजे शरीरात हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी होणे होय. हिमोग्लोबिन हे रक्तातील ऑक्सिजन शरीराच्या सर्व भागांपर्यंत पोहोचवण्याचे काम करते. गर्भधारणेदरम्यान बाळाच्या वाढीसाठी व रक्तनिर्मितीसाठी आयर्नची गरज वाढते. आयर्नची कमतरता असल्यास ॲनिमिया होण्याची शक्यता वाढते. ॲनिमिया झाल्यास गर्भवती महिलांना थकवा, चक्कर येणे, श्वास लागणे, अशक्तपणा यांसारखी लक्षणे दिसू शकतात. गंभीर ॲनिमिया असल्यास प्रसूतीदरम्यान रक्तस्त्रावाचा धोका वाढतो तसेच अकाली प्रसूती किंवा कमी वजनाचे बाळ जन्माला येण्याची शक्यता वाढते. त्यामुळे गर्भधारणेदरम्यान नियमित रक्त तपासणी, आयर्न व फॉलिक ॲसिड गोळ्या घेणे आणि आयर्नयुक्त आहार घेणे अत्यंत आवश्यक आहे. योग्य वेळी उपचार घेतल्यास ॲनिमिया नियंत्रित ठेवता येतो. ॲनिमिया हा गर्भवती महिलांमध्ये सर्वात सामान्य आरोग्य धोका आहे.

5.5 आयर्न गोळ्या नियमित न घेणे:

सरकारकडून गर्भवती महिलांना आयर्न व फॉलिक ॲसिड गोळ्या मोफत दिल्या जातात, ज्यामुळे ॲनिमिया टाळण्यास मदत होते. परंतु काही महिलांना उलटी, मळमळ किंवा चुकीच्या समजुतीमुळे या गोळ्या नियमित घेणे टाळले जाते. त्यामुळे आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो व ॲनिमियाचा धोका वाढतो.

5.6 हिमोग्लोबिन तपासणी न करणे:

गर्भधारणेदरम्यान नियमित रक्त तपासणी न केल्यास ॲनिमिया वेळेवर ओळखता येत नाही. हिमोग्लोबिनची पातळी कमी झाल्यास त्यावर योग्य वेळी उपचार मिळत नाहीत. गंभीर ॲनिमिया असल्यास प्रसूतीवेळी अतिरक्तस्त्राव, अशक्तपणा व आई आणि बाळ दोघांच्याही जीवाला धोका निर्माण होऊ शकतो.

5.7 आरोग्य सेवा वापर कमी

ANC तपासणी कमी प्रमाणात:

ANC (Ante Natal Care) तपासणी ही गर्भधारणेदरम्यान आई व बाळाच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असते. या तपासणीमध्ये गर्भवती महिलेचे वजन, रक्तदाब, हिमोग्लोबिन पातळी तसेच बाळाची वाढ व स्थिती तपासली जाते. नियमित ANC तपासणीमुळे गर्भधारणेदरम्यान उद्भवणारे आजार किंवा धोके लवकर ओळखता येतात. परंतु ग्रामीण व दुर्गम भागात आरोग्य केंद्रापर्यंतचे अंतर जास्त असणे, योग्य वाहतुकीचा अभाव, आर्थिक अडचणी आणि कुटुंबाचा कमी पाठिंबा या कारणांमुळे अनेक महिला ANC तपासणीसाठी वेळेवर जात नाहीत. काही ठिकाणी जागरूकतेचा अभाव देखील दिसून येतो. परिणामी आई व बाळाच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे ANC तपासणीबाबत जनजागृती करणे आवश्यक आहे.

संस्थात्मक प्रसूतीचे कमी प्रमाण:

काही ग्रामीण व दुर्गम भागांमध्ये आजही घरगुती प्रसूतीची परंपरा प्रचलित आहे. परंतु संस्थात्मक प्रसूती (रुग्णालयात प्रसूती) न झाल्यास आपत्कालीन परिस्थितीत मोठा धोका निर्माण होऊ शकतो. प्रसूतीदरम्यान अतिरक्तस्त्राव, बाळाची अडचण, रक्तदाब समस्या किंवा इतर गुंतागुंत निर्माण झाल्यास तात्काळ वैद्यकीय मदत मिळणे कठीण होते. रुग्णालयात प्रसूती झाल्यास प्रशिक्षित डॉक्टर व नर्स उपलब्ध असतात तसेच आवश्यक औषधे व उपकरणे उपलब्ध असतात. त्यामुळे मातृ व बाल मृत्यू दर कमी करण्यासाठी संस्थात्मक प्रसूती वाढविणे अत्यंत आवश्यक आहे. जागरूकता, मोफत आरोग्य सेवा व वाहतूक सुविधा उपलब्ध करणे गरजेचे आहे.

6 सामाजिक व आर्थिक घटक

6.1 गरिबी:

गरिबी हा गर्भवती महिलांच्या आरोग्यावर परिणाम करणारा महत्त्वाचा सामाजिक व आर्थिक घटक आहे. आर्थिक परिस्थिती कमकुवत असल्यामुळे महिलांना पोषणयुक्त अन्नपदार्थ जसे दूध, फळे, डाळी, अंडी किंवा इतर प्रथिनयुक्त अन्न नियमितपणे मिळत नाही. यामुळे आई व बाळाच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. तसेच आरोग्य केंद्र दूर असल्यास तेथे जाण्यासाठी लागणारा प्रवास खर्च देखील अनेक कुटुंबांना परवडत नाही. परिणामी महिलांना आवश्यक आरोग्य तपासणी व उपचार वेळेवर मिळत नाहीत. त्यामुळे मातृ व बाल आरोग्य सुधारण्यासाठी आर्थिक सहाय्य योजना व मोफत आरोग्य सेवा उपलब्ध करणे आवश्यक आहे.

6.2 शिक्षणाचा अभाव:

शिक्षणाचा अभाव हा गर्भवती महिलांच्या आरोग्य जागरूकतेवर थेट परिणाम करणारा महत्त्वाचा घटक आहे. शिक्षण कमी असल्यामुळे महिलांना आरोग्यविषयक माहिती समजणे, डॉक्टरांच्या सूचना पाळणे व योग्य आरोग्य निर्णय घेणे कठीण जाते. संतुलित आहार, औषधोपचार, नियमित तपासणी, स्वच्छता याबाबतची माहिती योग्य प्रकारे समजत नाही. काही वेळा महिलांना सरकारी आरोग्य योजना, मोफत औषधे किंवा आरोग्य सेवा उपलब्ध आहेत याची माहितीही नसते. शिक्षणाच्या अभावामुळे अंधश्रद्धा व चुकीच्या समजुतींवर जास्त विश्वास ठेवला जातो. त्यामुळे महिलांमध्ये आरोग्य विषयक जागरूकता कमी राहते. यासाठी महिला शिक्षण, प्रौढ शिक्षण कार्यक्रम व आरोग्य जनजागृती उपक्रम राबविणे अत्यंत आवश्यक आहे. शिक्षण वाढल्यास मातृ व बाल आरोग्य सुधारण्यास मदत होते.

6.3 अंधश्रद्धा व पारंपरिक समजुती:

अंधश्रद्धा व पारंपरिक समजुती या गर्भवती महिलांच्या आरोग्यावर परिणाम करणारे महत्त्वाचे सामाजिक घटक आहेत. काही भागांमध्ये आधुनिक वैद्यकीय उपचारांपेक्षा पारंपरिक उपचारांवर अधिक विश्वास ठेवला जातो. काही वेळा गर्भधारणेदरम्यान अंडी, फळे किंवा इतर पोषणयुक्त अन्नपदार्थ टाळण्याच्या समजुती आढळतात. यामुळे

महिलांना आवश्यक पोषण मिळत नाही. काही ठिकाणी गर्भधारणेदरम्यान आरोग्य तपासणी किंवा रुग्णालयात जाणे टाळले जाते. या समजुतींमुळे आई व बाळाच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. त्यामुळे योग्य आरोग्य शिक्षण व जनजागृती करणे अत्यंत आवश्यक आहे. वरील सर्व घटक परस्पर संबंधित आहेत. पोषण अभावामुळे ॲनिमिया वाढतो, ॲनिमिया असल्यास आरोग्य जोखीम वाढते. सामाजिक व आर्थिक परिस्थिती आरोग्य सेवा वापरावर परिणाम करते. त्यामुळे या सर्व घटकांवर एकत्रित काम करणे आवश्यक आहे.

निष्कर्ष:

बहुसंख्या गर्भवती महिलांना संतुलित आर्यन, फॉलिक ऍसिड, संतुलित पोषणाची पुरकता, प्रसूतीपूर्व तपासणी आणि विश्रांतीची गरज यासंबंधी अपुरे ज्ञान आहे. जड कामे, शारीरिक श्रम, अपुरी विश्रांती, पोषणाचा अभाव आणि गर्भधारणे दरम्यान अयोग्य जीवनशैली ही महिलांच्या आरोग्यासाठी महत्त्वाची जोखीम ठरते. उच्च रक्तदाब, सुज, थकवा व तीव्र अशक्तपणा यासारखी जोखीम लक्षणे दिसून येतात. ज्यामुळे वेळेवर आरोग्यसेवा घेण्यात अडचण येते. पारंपरिक समजुती, अल्पशिक्षण, आर्थिक मर्यादा आणि आरोग्य सेवा रुग्णा पर्यंत पोहोचू शकत नाही. त्यामुळे हे आरोग्य विषयक ज्ञानावर प्रत्यक्ष परिणाम करतात. आरोग्य शिक्षण, जनजागृती, पोषण पूरक योजना आणि नियमित प्रसूती पूर्व तपासण्या महिलांच्या ज्ञान व व्यवहार सुधारण्यासाठी अत्यावश्यक आहेत. स्थानिक आरोग्य यंत्रणा व स्वयंसेवी संस्था जर महिलांमध्ये जीवनशैली संबंधित योग्य माहिती पोहोचवतील तर मातृत्वाच्या आरोग्यात सुधारणा होऊ शकते आणि प्रसूतीवर्ती गुंतागुंता कमी करता येते.

संदर्भ ग्रंथ सूची:

1. इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट फॉर पोपुलेशन सायन्स अँड मिनिस्ट्री ऑफ हेल्थ अँड फॅमिली वेल्फायर, 2021
2. मिनिस्ट्री ऑफ हेल्थ अँड फॅमिली वेल्फेअर, 2017
3. नॅशनल हेल्थ पॉलिसी, 2017
4. न्यू दिल्ली गव्हर्मेंट ऑफ इंडिया वर्ल्ड हेल्थ ऑर्गनायझेशन, 2020
5. शर्मा आर (2019) पॅटर्न हेल्थ अँड न्यूट्रिशन इन रुलर इंडिया न्यू दिल्ली अकॅडमी प्रेस.
6. https://main.icmr.niv.in
7. https:// amravati.gov.in/health
8. World Health Organization. *WHO Recommendations on Antenatal Care for a Positive Pregnancy Experience*. WHO, 2016.
9. International Institute for Population Sciences आणि ICF. *National Family Health Survey (NFHS-5), India, 2019–21*. IIPS, 2021.
10. Ministry of Health and Family Welfare. *Guidelines for Control of Iron Deficiency Anaemia*. भारत सरकार, 2013.
11. Park's Textbook of Preventive and Social Medicine. बानारसीदास भानोट पब्लिशर्स, 2021.
12. Public Health Department Maharashtra. *Tribal Health Action Plan for Maharashtra*. महाराष्ट्र शासन, 2018.

नाचणी, ज्वारी आणि बाजरीपासून बनविलेल्या प्राचीन पाककृतींचे पोषण विश्लेषण

कु. शिल्पा रमेशराव तीखिले

एम. ए. गृह-अर्थशास्त्र

पी.एच.डी संशोधक विद्यार्थिनी, रामकृष्ण महाविद्यालय, दारापूर

सारांश (Abstract)

भारतीय पारंपरिक आहारसंस्कृतीमध्ये भरडधान्यांना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. नाचणी (रागी), ज्वारी आणि बाजरी ही धान्ये हजारो वर्षांपासून भारतीय लोकांच्या दैनंदिन आहाराचा भाग राहिली आहेत. ही धान्ये केवळ ऊर्जा देणारी नसून त्यामध्ये प्रथिने, तंतुमय पदार्थ, जीवनसत्त्वे, खनिजे आणि अँटीऑक्सिडंट्स मोठ्या प्रमाणात आढळतात.

आधुनिक काळात पॉलिश केलेले तांदूळ, मैदा आणि प्रक्रिया केलेल्या अन्नपदार्थांचा वापर वाढल्यामुळे कुपोषण, लठ्ठपणा, मधुमेह आणि हृदयविकार यांसारख्या समस्या वाढताना दिसतात. या पार्श्वभूमीवर प्राचीन पाककृतींचे पोषण विश्लेषण करणे आवश्यक ठरते.

या संशोधनात नाचणी, ज्वारी आणि बाजरीपासून बनवलेल्या पारंपरिक पदार्थांचे पोषणमूल्य, आरोग्य फायदे, पचनावर होणारा परिणाम आणि आधुनिक आहारातील उपयुक्तता यांचा सखोल अभ्यास करण्यात आला आहे. संशोधनातून असे स्पष्ट होते की भरडधान्यांवर आधारित आहार हा संतुलित, किफायतशीर आणि शाश्वत आरोग्यासाठी अत्यंत उपयुक्त आहे.

कीवर्ड्स : भरडधान्ये, नाचणी, ज्वारी, बाजरी, प्राचीन पाककृती, पोषणमूल्य, पारंपरिक आहार, मिलेट्स

१. प्रस्तावना (Introduction)

भारताची खाद्यसंस्कृती विविधतेने नटलेली आहे. प्राचीन काळात लोक निसर्गाशी सुसंगत असा आहार घेत असत. स्थानिक हवामानात पिकणारी धान्ये, भाज्या आणि कडधान्ये यांचा संतुलित वापर केला जात होता.

भरडधान्ये ही “Future Smart Foods” म्हणून ओळखली जातात कारण ती कमी पाण्यात पिकतात, हवामान बदलांना तोंड देतात आणि पोषणदृष्ट्या समृद्ध असतात. नाचणीमध्ये कॅल्शियमचे प्रमाण तांदळापेक्षा अनेक पटीने जास्त आहे. ज्वारीमध्ये अँटीऑक्सिडंट्स आणि फायबर असल्यामुळे ती पचन सुधारते. बाजरी लोहाचा उत्तम स्रोत असल्यामुळे ॲनिमिया टाळण्यास मदत करते. पूर्वी लोक भाकरी, आंबील, लापशी, खिचडी, धिरडे यांसारखे साधे पण पौष्टिक पदार्थ खात असत. आजच्या फास्ट फूड संस्कृतीत या पदार्थांचे महत्त्व कमी झाले असले तरी आरोग्यदायी जीवनासाठी त्यांचे पुनरुज्जीवन अत्यावश्यक आहे.

२. संशोधनाची गरज (Need for the Study) वाढत्या lifestyle diseases मुळे पर्यायी आहार शोधण्याची गरज, कुपोषण कमी करण्यासाठी पोषणयुक्त अन्नाचा प्रचार, पारंपरिक खाद्यसंस्कृतीचे जतन,
सेंद्रिय व शाश्वत शेतीला प्रोत्साहन, ग्रामीण अर्थव्यवस्था मजबूत करणे.

३. संशोधनाची उद्दिष्टे (Objectives)

1) नाचणी, ज्वारी आणि बाजरीचे पोषणघटक समजून घेणे.

2) प्राचीन पाककृतींचे पोषण विश्लेषण करणे.

3) भरडधान्यांचा आरोग्यावर होणारा प्रभाव अभ्यासणे.

४. संशोधनाची गृहितके (Hypotheses)

1) भरडधान्यांपासून तयार पदार्थ अधिक पौष्टिक असतात.

2) त्यांचा नियमित आहारात समावेश केल्यास रोगप्रतिकारशक्ती वाढते.

3) कमी ग्लायसेमिक इंडेक्समुळे मधुमेह नियंत्रणात राहतो.

भरडधान्यांचा ऐतिहासिक संदर्भ

पुरातत्वीय पुराव्यानुसार भारतात सुमारे 3000–5000 वर्षांपूर्वी मिलेट्सची शेती केली जात होती. दुष्काळप्रवण भागात ही धान्ये लोकांचे मुख्य अन्न होते. आयुर्वेदात भरडधान्यांना "लघु" आणि "पचायला सोपे" असे वर्णन केले आहे. त्यामुळे श्रम करणाऱ्या लोकांसाठी ही आदर्श अन्नपद्धती होती. भारतीय खाद्यसंस्कृतीमध्ये भरडधान्यांना (Millets) प्राचीन काळापासून अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. ग्रामीण भागात दैनंदिन आहारात नाचणी, ज्वारी आणि बाजरी यांचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात असे. ही धान्ये स्थानिक हवामानात सहज पिकतात, कमी पाण्यात वाढतात आणि पोषणमूल्यांनी समृद्ध असतात.

पूर्वी लोक श्रमप्रधान जीवन जगत असल्यामुळे त्यांना ऊर्जा, ताकद आणि सहनशक्ती देणारा आहार आवश्यक होता. भरडधान्यांपासून बनवलेल्या पाककृती या गरजा पूर्ण करत असत. आधुनिक काळात जरी गहू व तांदळाचा वापर वाढला असला तरी आज पुन्हा आरोग्यदायी जीवनशैलीसाठी मिलेट्सकडे वळण्याची प्रवृत्ती दिसून येते.

नाचणी (रागी) पासून बनवलेल्या पाककृती

नाचणीचे वैशिष्ट्य : नाचणी ही कॅल्शियमचा उत्तम वनस्पती स्रोत मानली जाते. हाडांची वाढ, दातांची मजबुती आणि मुलांच्या शारीरिक विकासासाठी ती उपयुक्त आहे. तसेच ती ग्लूटेन-फ्री असल्यामुळे पचनास हलकी असते.

नाचणीची आंबील : नाचणीची आंबील ही पारंपरिक पेय स्वरूपातील पाककृती आहे. ग्रामीण भागात उन्हाळ्यात शरीराला थंडावा देण्यासाठी ती पिली जाते. आंबवण्याच्या प्रक्रियेमुळे त्यामध्ये प्रोबायोटिक घटक तयार होतात, जे पचनसंस्थेसाठी लाभदायक असतात.

आरोग्य फायदे : आतड्यांचे आरोग्य सुधारते, उष्णतेमुळे होणारा थकवा कमी करते, कॅल्शियमची कमतरता भरून काढते

नाचणी लापशी : लहान मुलांसाठी आणि गर्भवती महिलांसाठी नाचणी लापशी हा अत्यंत पौष्टिक पदार्थ आहे. त्यामध्ये ऊर्जा, लोह आणि कॅल्शियम भरपूर असते.

वैशिष्ट्ये : सहज पचणारी, अशक्तपणा कमी करणारी, वाढत्या मुलांसाठी उपयुक्त

नाचणी भाकरी : नाचणीची भाकरी ही ग्रामीण भागात नियमित खाल्ली जाते. ती पोट भरल्याची भावना जास्त वेळ टिकवते, त्यामुळे वजन नियंत्रणात मदत होते.

नाचणी लाडू : गूळ, तूप आणि नाचणीपासून बनवलेले लाडू ऊर्जा देणारे आणि हिमोग्लोबिन वाढवणारे असतात.

२. ज्वारीपासून बनवलेल्या पाककृती

◆ **ज्वारीचे वैशिष्ट्य :** ज्वारीमध्ये फायबर आणि अँटीऑक्सिडंट्स भरपूर असतात. ती रक्तातील साखर हळूहळू वाढवते (Low Glycemic Index), त्यामुळे मधुमेहींसाठी उपयुक्त आहे.

ज्वारीची भाकरी : ज्वारीची भाकरी महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर खाल्ली जाते. ती पचन सुधारते आणि बद्धकोष्ठता कमी करते.

आरोग्य फायदे: वजन नियंत्रण, हृदयाचे आरोग्य सुधारते, दीर्घकाळ ऊर्जा प्रदान करते

ज्वारी धिरडे : नाश्त्यासाठी तयार होणारे धिरडे कमी तेलात बनवले जातात. ते पौष्टिक आणि हलके असतात.

ज्वारी उपमा/भात : ज्वारीपासून बनवलेला उपमा किंवा भात पचायला हलका आणि मधुमेहींसाठी योग्य असतो.

३. बाजरीपासून बनवलेल्या पाककृती

◆ **बाजरीचे वैशिष्ट्य :** बाजरीमध्ये लोह आणि मॅग्नेशियम मुबलक प्रमाणात असते. हिमोग्लोबिन वाढवण्यासाठी आणि हृदयाच्या आरोग्यासाठी ती उपयुक्त आहे. हिवाळ्यात शरीराला उष्णता देणारा पदार्थ म्हणून बाजरीचा वापर केला जातो.

बाजरी भाकरी : बाजरीची भाकरी श्रम करणाऱ्या लोकांसाठी ऊर्जा देणारी आहे.

फायदे : हिवाळ्यात उपयुक्त, हिमोग्लोबिन वाढवते, पचन सुधारते

बाजरी खिचडी : बाजरी, डाळ आणि भाज्या यांचे मिश्रण असलेली खिचडी संतुलित आहार देते.

बाजरी थालीपीठ : नाश्त्यासाठी पौष्टिक आणि फायबरयुक्त पदार्थ आहे.

भरडधान्यांवर आधारित पाककृतींचे पोषणदृष्ट्या महत्त्व

उच्च फायबर: 1) पचन सुधारते आणि वजन नियंत्रणात मदत करते.

2) कमी ग्लायसेमिक इंडेक्स: मधुमेह नियंत्रणासाठी उपयुक्त.

3) खनिजे आणि जीवनसत्त्वे: कॅल्शियम, लोह, मॅग्नेशियम भरपूर.

4) रोगप्रतिकारशक्ती वाढवतात. 5) हृदयविकाराचा धोका कमी करतात.

सामाजिक आणि पर्यावरणीय महत्त्व :

1) कमी पाण्यात पिकतात

2) हवामान बदलांना तोंड देतात.

3) शेतकऱ्यांसाठी किफायतशीर

4) शाश्वत अन्नपद्धतीला प्रोत्साहन

निष्कर्ष

नाचणी, ज्वारी आणि बाजरीपासून बनवलेल्या पाककृती या भारतीय परंपरेचा महत्त्वाचा भाग आहेत. त्या केवळ चविष्ट नसून अत्यंत पौष्टिक, आरोग्यदायी आणि पर्यावरणपूरक आहेत. आजच्या काळात वाढत्या जीवनशैलीजन्य आजारांच्या पार्श्वभूमीवर या पारंपरिक पदार्थांचा दैनंदिन आहारात समावेश करणे आवश्यक आहे. "पारंपरिक अन्न म्हणजेच भविष्यातील आरोग्यदायी अन्न" ही संकल्पना स्वीकारल्यास निरोगी समाज निर्माण होऊ शकतो. नाचणी, ज्वारी आणि बाजरीपासून बनवलेल्या प्राचीन पाककृती या केवळ सांस्कृतिक वारसा नसून आधुनिक आरोग्य समस्यांवर प्रभावी उपाय ठरू शकतात. भरडधान्यांचा आहारात समावेश केल्यास संतुलित पोषण, मजबूत रोगप्रतिकारशक्ती आणि दीर्घकालीन आरोग्य मिळू शकते. त्यामुळे "Back to Traditional Foods" ही संकल्पना आजच्या युगात अत्यंत आवश्यक ठरते.

संदर्भ ग्रंथ सूची (References)

1) Gopalan, C. – Nutritive Value of Indian Foods
2) Swaminathan, M. – Food and Nutrition
3) Mudambi & Rajagopal – Fundamentals of Foods and Nutrition
4) National Institute of Nutrition, Hyderabad
5) FAO Reports on Millets
6) WHO Nutrition Guidelines
7) Indian Journal of Traditional Knowledge
8) Bamji, M.S. – Textbook of Human Nutrition

भारतीय कृषीव्यवस्थेचे बदलते स्वरूप

शुभम गणेश वाकडे
मु. गवणा पो. जवळा, ता.आर्णी, जि. यवतमाळ

सारांश

भारतीय कृषीव्यवस्था ही दीर्घकाळ उपजीविकाधारित आणि प्रामुख्याने स्थानिक गरजांवर केंद्रित अशी राहिली आहे. पारंपरिक काळात शेती ही कुटुंबाच्या उपजीविकेचे साधन मानली जात होती आणि तिचा आधार मुख्यत्वे नैसर्गिक संसाधने, मानवी श्रम आणि स्थानिक बाजारपेठांवर होता. तथापि, स्वातंत्र्यानंतर अन्नधान्याची वाढती गरज, लोकसंख्यावाढ आणि आर्थिक विकासाच्या उद्दिष्टांमुळे कृषी क्षेत्रात व्यापक संरचनात्मक बदल घडवून आणण्यात आले. परिणामी भारतीय कृषीव्यवस्था हळूहळू तंत्रज्ञानाधिष्ठित, बाजाराभिमुख आणि धोरणनियंत्रित प्रणालीमध्ये रूपांतरित होत गेली.

हरितक्रांतीच्या माध्यमातून सुधारित बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशके आणि सिंचन सुविधांचा मोठ्या प्रमाणावर वापर सुरू झाला. त्यानंतर कृषी यांत्रिकीकरण, बँक व सहकारी संस्थांद्वारे संस्थात्मक वित्तपुरवठा, किमान आधारभूत किंमत धोरण, कृषी उत्पन्न बाजार समित्यांद्वारे विपणन व्यवस्था, तसेच अलीकडील काळात डिजिटल शेती, ई-नाम आणि कृषी तंत्रज्ञानाधारित सेवा यांचा विस्तार झाला. या सर्व प्रक्रियांमुळे शेतीच्या उत्पादनक्षमतेत लक्षणीय वाढ झाली असून भारताने अन्नधान्याच्या बाबतीत मोठ्या प्रमाणावर आत्मनिर्भरता प्राप्त केली आहे. अन्नसुरक्षेच्या दृष्टीने ही प्रगती अत्यंत महत्त्वाची ठरली आहे.

मात्र या परिवर्तनाची दुसरी बाजूही तितकीच महत्त्वाची आहे. उच्च-निविष्ठा आधारित शेतीमुळे जमिनीची सुपीकता कमी होणे, भूजल पातळी खालावणे, रासायनिक प्रदूषण वाढणे आणि नैसर्गिक संसाधनांवर ताण निर्माण होणे यांसारख्या पर्यावरणीय समस्या तीव्र झाल्या आहेत. त्याचबरोबर उत्पादन खर्चात सातत्याने वाढ, बाजारभावातील अनिश्चितता, उत्पन्नातील चढउतार, प्रादेशिक विकासातील असमतोल आणि लहान व सीमांत शेतकऱ्यांची वाढती आर्थिक असुरक्षा ही आव्हाने अधिक ठळकपणे समोर आली आहेत. अनेक शेतकरी भांडवली गुंतवणुकीच्या मर्यादांमुळे आधुनिक तंत्रज्ञानाचा पूर्ण लाभ घेऊ शकत नाहीत आणि कर्जबाजारीपणाच्या चक्रात अडकण्याची शक्यता वाढते.

छत्रपती संभाजी महाराजांची उणी पुरी नऊ वर्षाची कारकीर्द (1680-89) अतिशय धमधूमीची व झंजावाती ठरली. छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले स्वराज्य सुरक्षित ठेवण्यासाठी मुघल, पोर्तुगीज आणि सिद्धी यांच्याशी चाललेला अविरत रणसंग्राम हेच संभाजीच्या महाराजांच्या एकूण कारकिर्दीचे स्वरूप होय. एकाच वेळी अनेक आघाड्यावर अविश्रांतपणे लढत असलेल्या संभाजी राजांना स्वराज्याच्या प्रशासनाकडे बारकाईने लक्ष देण्याइतकी सवड मिळणे दुरापास्त होते. याशिवाय त्यांच्याविरुद्ध झालेले कटकारस्थाने, राजघराण्यातील व राजदरबारातील मातब्बर व्यक्तींनी त्यांना केलेला तीव्र विरोध आणि शांततेचा अभाव यामुळे प्रशासनात सुसूत्रता व सूत्रबद्धता राखणे संभाजी महाराजांच्या दृष्टीने तारेवरची कसरत होती. परंतु प्राप्त परिस्थितीत तोल न जाऊ देता ही तारेवरची कसरत यशस्वी करण्याचा प्रयत्न संभाजी राजांनी केला. शिवाजी महाराजांच्या वेळेस जो शिरस्ता होता त्याचे कटाक्षाने पालन संभाजी राजांनी करून कार्यक्षम प्रशासन यंत्रणा उभारली. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये या ठिकाणी संभाजी महाराजांच्या केंद्रीय प्रशासन यंत्रणेतील अष्टप्रधान मंडळाच्या कामगिरीवर प्रकाश टाकणे संशोधकाचा उद्देश आहे.

छत्रपती संभाजी महाराजांचे अष्टप्रधान मंडळ :-

छत्रपती शिवाजी महाराजांच्या कारकिर्दीतील अष्टप्रधान मंडळ ही व्यवस्था छत्रपती संभाजी महाराजांनी आपल्या प्रशासनामध्ये स्वीकारली त्यांचे अष्टप्रधान मंडळ खालील प्रमाणे होते.

1) पेशवा(मुख्य प्रधान) :-

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात पेशवे पदावर असणाऱ्या मोरोपंत पिंगळे यांच्याकडेच संभाजी महाराजांच्या कारकिर्दीमध्ये सुरुवातीला काही दिवस पेशवे पद होते. परंतु संभाजी महाराजांच्या विरुद्ध झालेल्या कट कारस्थानामध्ये त्यांचा सहभाग असल्याचे उघड झाल्यामुळे जून 1680 मध्ये त्यांना कैद करण्यात आले. मोरोपंत पिंगळे प्रामाणिक अधिकारी परंतु अण्णाजी दत्तोच्या प्रभावाखाली आल्यामुळे त्यांनी संभाजी महाराजांच्या विरोधात भूमिका घेतली असल्याचे दिसते. 29 सप्टें. 1680 ते 12 ऑक्टो. 1680 त्यांचा मृत्यू झाला. संभाजी राजांनी त्यानंतर त्यांचा मुलगा निळोपंत मोरेश्वर याला पेशवे पदी नियुक्त केले. निळोपंत कार्यक्षम व स्वामीनिष्ठ होता त्यामुळे संभाजी महाराजांना राज्यकारभार चालविण्यासाठी निळोपंताची मौलिक मदत झाली. निळोपंत मनमिळाऊ स्वभावाचा व मितभासी असल्यामुळे रुसलेल्या किंवा दुखावले गेलेल्या अनेक वतनदारांना त्यांची समजूत काढून त्यांना स्वराज्य कार्यासाठी तयार करण्याची जबाबदारी निळोपंतांनी पार पाडली. त्याचबरोबर युद्धात पराक्रम सुद्धा गाजविला. निळोपंताकडे कल्याण भिवंडी प्रांताच्या सरसुभ्याची जबाबदारी होती. संभाजी महाराजांच्या वतीने इंग्रज अधिकाऱ्यांशी ते बोलणी करीत होते. निळोपंत आपल्या कामामध्ये तत्पर आणि स्वामिनिष्ठ होते. सन 1688 च्या पावसाळ्यानंतर निळोपंतांना मुघलांचा प्रतिकार करण्यासाठी कर्नाटक प्रांतामध्ये पाठविल्यामुळे संभाजी महाराजांच्या संकट प्रसंगी या कर्तबगार आणि स्वराज्यनिष्ठ सहकाऱ्यांशी मदत त्यांना मिळू शकली नसल्याचे दिसते. एकूण अष्टप्रधान मंडळामध्ये छत्रपतीच्या खालोखाल पेशव्यांना अधिकार असल्याचे दिसून येते.

2) अमात्य :-

संभाजी महाराजांच्या विरोधामध्ये रचलेल्या कटकारस्थानामध्ये अण्णाजी दत्तो प्रभूणीकर प्रमुख सूत्रधार होते. परंतु छत्रपती शिवाजी महाराजांच्या तालमीमध्ये तयार झालेल्या या जेष्ठ व अनुभवी मंत्र्याच्या मुसुद्देगिरीचा उपयोग स्वराज्याच्या रक्षणासाठी करून घेण्यासाठी संभाजी महाराजांनी उदार अंतकरणाने त्यांना क्षमा करून, मनाचा मोठेपणा दाखवून अमात्य पदावर नियुक्त केले. परंतु संभाजी महाराजांच्या विरुद्ध झालेल्या दुसऱ्या कटामध्ये सुद्धा अनाजीपंतांचा स्पष्ट सहभाग असल्याचे उघड झाल्यामुळे त्यांना देहदंडाची शिक्षा सुनावण्यात आली. यावेळी अमात्यपदाचा कार्यभार तात्पुरत्या स्वरूपात खंडेराव पानसंबळ यांच्याकडे सोपविण्यात आला. जानेवारी 1683 च्या सुमारास रघुनाथ नारायण हनुमंते यांना अमात्य पदावर नियुक्त करण्यात आले. रघुनाथ नारायण हनुमंते सुद्धा संभाजी महाराजांना फारसे अनुकूल नव्हते, परंतु जेष्ठ व अनुभवी मंत्र्यांचा प्रशासन कार्यासाठी उपयोग व्हावा या हेतूने महाराजांनी त्यांची या पदावर नियुक्ती केली असल्याचे लक्षात येते. रघुनाथ नारायण हनुमंते यांचा 4 मे 1683 रोजी मृत्यू झाला. त्यांच्या निधनानंतर त्यांचा मुलगा नारायण रघुनाथला या पदावर नियुक्त करण्यात आले. तर दुसरा मुलगा तिमाजी याला कर्नाटक प्रांतात ह्याच पदावर पाठविण्यात आले. वित्त व लेखा अधिकारी म्हणून राज्याचा हिशोब ठेवणे अमात्याचे काम होते. संभाजी महाराजांच्या कारकिर्दीत कोणतेही अमात्य प्रशासनामध्ये आपला प्रभाव दाखवू शकले नाही असे दिसते.

3) सचिव (सुरनीस):-

अष्टप्रधान मंडळामध्ये सचिव अथवा सुरनीस पदाला अत्यंत महत्त्वाचे स्थान होते. महत्वाच्या निर्णयाची शासकीय कागदपत्रे तपासने, लिहिणे, चुका दुरुस्त करणे, त्यावर स्वतःचा सिक्का उमटवून सही करणे इत्यादी काम ह्या अधिकाऱ्याला करावे लागत असल्यामुळे प्रत्येक पत्र सुरनीसाच्या नजरे खालून जात होते. शिवाजी महाराजांच्या कार्यकाळात ह्या पदावर अण्णाजी दत्तो काम करीत होते. परंतु संभाजी महाराजांच्या विरोधातील कटकारस्थानाचे मुख्य सूत्रधार अनाजीपंत असल्यामुळे महाराजांनी त्यांच्या जागी ह्या पदावर आबाजी सोनदेव यांची नियुक्ती केली. इ.स. 1685 पर्यंत आबाजी सोनदेव सचिव म्हणून कार्यरत होते. त्याचबरोबर कुडाळ पासून तुंगभद्रा नदीपर्यंतच्या प्रदेशाची सरकारकुणी त्यांच्याकडे होती. आबाजी सोनदेवच्या मृत्यूनंतर सुरनीसपदावर काही काळपर्यंत निळकंठ रामचंद्र भादनेकर यांची नियुक्ती करण्यात आली. इ.स. 1685 मध्ये शंकराजी नारायण गाडेकर यांना या पदावर संभाजी महाराजांनी नियुक्त केले. मावळ व उत्तर कोकणचा सुभा शंकराजी नारायण गाडेकर यांच्या अधिपत्याखाली होता. फेब्रुवारी 1689 मध्ये त्यांनी मोठा पराक्रम गाजवून राजगडचा किल्ला मुघलांकडून जिंकून घेतला. तसेच छत्रपती संभाजी महाराजांच्या मृत्यूनंतर शंकराची नारायण यांनी मावळ भागात जबरदस्त पराक्रम गाजवून स्वराज्याचे संरक्षण केल्याचे लक्षात येते. एकूण शंकरजी नारायण छत्रपती संभाजी महाराजांना एकनिष्ठ होते. त्यांनी पुढे संताजी घोरपडे धनाजी जाधव यांच्याबरोबर मुघल सत्तेला प्रतिकार करण्याचे काम केले.

4) सुमंत (डबीर) :-

छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या राज्याभिषेक समारंभ प्रसंगी सन 1674 मध्ये सुमंत म्हणून जनार्दन नारायण हनुमंते यांची नेमणूक केली. पन्हाळा सुभ्याचा कारभार त्यांच्याकडे होता. संभाजी महाराजांच्या कारकिर्दीत सन 1683 पर्यंत जनार्धन नारायण हनुमंते यांनी सुमंत पद सांभाळले. 27 जून 1683 मध्ये त्यांचा मृत्यू झाल्यानंतर वासुदेव जनार्धन यांच्याकडे काही काळ सुमंत पद दिले. त्यापुढे बाळकृष्ण वासुदेव यांची संभाजी राजांनी सुमंत पदावर नियुक्ती केली. या दोघांच्या कर्तबगारी बद्दल फारशी माहिती उपलब्ध नाही. परंतु उपलब्ध पुराव्याच्या आधारे संभाजी महाराजांबरोबर बाळकृष्ण वासुदेव एकनिष्ठ असल्याचे दिसते. युद्ध व शांततेच्या काळात परकीय सत्तांसोबत संबंध ठेवणे. आपल्या राज्याची प्रतिष्ठा सांभाळणे, तह करणे, पत्रव्यवहार करणे इत्यादी कार्य सुमंत पदावर काम करणाऱ्या मंत्र्याला करावी लागत होती.

5) सरसेनापती :-

राज्याभिषेक समारंभाच्या प्रसंगी शिवाजी महाराजांनी सरसेनापती म्हणून हंबीरराव मोहिते यांची नेमणूक होती. हंबीरराव मोहिते राणी सोयराबाईचे सख्खे बंधू व शिवाजी महाराजांचे मेहुणे होते. युद्धकलेमध्ये तरबेज असलेल्या हंबीरराव मोहिते यांनी अनेक युद्ध मोहिमांमध्ये पराक्रम गाजवून स्वराज्याच्या उभारणीमध्ये बहुमोलाचे योगदान दिले होते. शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतर अष्टप्रधान मंडळातील मंत्र्यांनी महाराणी सोयराबाईला हाताशी धरून संभाजी महाराजांच्या विरोधात खूप मोठे कट कारस्थान केले. संभाजी महाराजांना डावलून राजाराम महाराजांना मंचकारोहन केले. त्याचबरोबर पन्हाळा किल्ल्यावर असलेल्या संभाजी महाराजांना कैद करण्याचे आदेश दिले. या पार्श्वभूमीवर हंबीरराव मोहिते यांनी संभाजी महाराजांचा पक्ष घेऊन कटकारस्थान करणाऱ्या मंत्र्यांचा उद्देश पूर्ण होऊ दिला नाही. सेनापती हंबीरराव मोहिते यांनी अनाजीपंतासह सर्व कटकारस्थान करणाऱ्या मंत्र्यांना कैद करून संभाजीराजांपुढे उभे केले. आपली बहीण सोयराबाई व भाचा राजाराम यांचा पक्ष न घेता, ज्येष्ठ युवराज संभाजी राजांची बाजू घेऊन आपली सर्व लष्करी सामर्थ्य युवराज संभाजी यांच्या पाठीमागे उभे केल्यामुळे संभाजी महाराजांच्या मार्गातील मोठी अडचण दूर झाली. सरसेनापती म्हणून संभाजी महाराजांच्या कार्यकाळात हंबीरराव मोहित्यांनी मुघलांच्या आक्रमणाचा प्रखर प्रतिकार केला. हंबीरराव मोहिते हयात असेपर्यंत संभाजी राजांना कोणताही धोका नव्हता. हंबीरराव पराक्रमी असून त्यांनी मुघलांच्या आक्रमणाला मोठ्या हिमतीने तोंड दिले. परंतु ऑक्टोबर 1687 मध्ये मुघल लष्कराने वाईपर्यंत धडक मारली म्हणून त्यांना थांबविण्यासाठी गेलेल्या हंबीर रावांना तोफेचा एक गोळा लागल्यामुळे त्यामध्ये हंबीरराव धारातीर्थी पडले. एकूण सरसेनापती हंबीरराव मोहिते यांनी बहिण सोयराबाईसी असलेल्या जवळच्या नात्याचा विचार न करता संभाजी महाराजांचा पक्ष घेऊन आपली स्वामिनिष्ठा दाखवून दिल्याचे लक्षात येते. हंबीरराव मोहिते यांच्या मृत्यूनंतर मालोजी घोरपडे यांना सरसेनापती म्हणून संभाजीराजांनी नियुक्त केले. फेब्रुवारी 1689 मध्ये मुघल सैन्य संभाजी महाराजांना पकडण्यासाठी गेले असताना त्या मुगल फौजांचा प्रतिकार करीत असताना झालेल्या चकमकीत मालोजी घोरपडे यांचा मृत्यू झाला.

थोडक्यात सरसेनापती संपूर्ण लष्कराचा अधिकारी असून लष्करी व्यवस्था व युद्ध मोहिमांची आयोजन नियोजन व शत्रूपासून स्वराज्याचे रक्षण करण्याची जबाबदारी सरसेनापतीची होती. संभाजी महाराजांच्या कार्यकाळातील हंबीरराव मोहिते व मालोजी घोरपडे या दोन्ही सेनापतींनी संभाजी महाराजांबरोबर एकनिष्ठ राहून स्वराज्याची सेवा प्रामाणिकपणे केल्याचे दिसून येते.

6) पंडितराव (दानाध्यक्ष):- शिवाजी महाराजांनी मोरेश्वर पंडितराव यांना दानाध्यक्ष म्हणून नियुक्त केले होते. संभाजी राजांच्या कार्यकाळात पंडितराव किंवा दानाध्यक्ष हे पद मोरेश्वर पंडितराव यांच्याकडेच असल्याचे आढळते. धार्मिक बाबीची व्यवस्था पाहणे. छत्रपतीच्या वतीने विद्वान ब्राह्मणांचा सत्कार करणे, धर्मसभेद्वारे काही निर्णय घेणे, सण उत्सवाचे आयोजन करणे इत्यादी कर्तव्य या मंत्र्याला करावी लागत होती.

7) मंत्री (वाकेनवीस):- छत्रपती शिवाजी महाराजांनी वाकेनवीस किंवा मंत्री या पदावर दत्ताजी त्रिमल यांची नियुक्ती केली होती. सन १६७८ मध्ये दत्ताजीचा मृत्यू झाल्यानंतर त्यांचा मुलगा रामचंद्र दत्ताजी यांना या पदावर नियुक्त केले. छत्रपती संभाजी महाराजांच्या कार्यकाळामध्ये रामचंद्र दत्ताजी यांना कुतुबशहा व आदिलशहा यांच्याकडे मुतालिक म्हणून पाठविले होते असे वा.सी. बेंद्रे यांचे मत आहे. बेंद्रे यांच्या मताप्रमाणे संभाजी राजांनी कवी कलश यांच्याकडे या खात्याचा कार्यभार सोपविला असावा. कारण संभाजी महाराजांच्या विरोधात सतत कटकारस्थाने होत होती. त्यामुळे छत्रपतीच्या विरोधात कटकारस्थान शिजत असेल तर त्यापासून छत्रपतीला धोका होऊ न देणे, राजाची भोजन व्यवस्था सांभाळणे इत्यादी कार्य या मंत्राला करावे लागत होते.एकूण खाजगी सचिव म्हणून येणाऱ्या सर्व जबाबदाऱ्या या मंत्राला पार पाडाव्या लागत असल्यामुळे संभाजी राजांनी या पदाचा कारभार कवी कलशकडे दिला असावा असे वाटते.

8) न्यायाधीश :- छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून निराजी रावजी न्यायाधीश म्हणून काम पाहत होते. छत्रपती संभाजी महाराजांच्या कार्यकाळात निराजी रावजी यांचा मुलगा प्रल्हादपंत यांना न्यायाधीश म्हणून नियुक्त केले. सन 1681 पासून संभाजी महाराजांच्या मृत्यूपर्यंत प्रल्हाद पंतांनी न्यायदानाचे काम केले. न्यायदानाच्या

बाबतीत सर्व अधिकार त्यांच्याकडे असून त्यांनी केलेल्या निवाड्याची अंमलबजावणी कवी कलश यांच्या माध्यमातून केली असल्याचे दिसून येते.

9) छंदोगामात्य कवी कलश :- अत्यंत प्रतिकूल परिस्थितीमध्ये संभाजी महाराजांनी मराठा स्वराज्याची सूत्रे स्वीकारली. अष्टप्रधान मंडळातील हंबीरराव मोहिते सारख्या काही निवडक मंत्र्यांचा अपवाद वगळता अनेकजण कटकारस्थानामध्ये सहभागी होऊन संभाजी महाराजांना विरोध करीत होते. त्या पार्श्वभूमीवर कवी कलश याने मात्र संभाजी महाराजांना कठीण प्रसंगात साथ दिल्यामुळे तो संभाजी महाराजांच्या जवळ आला. कवी कलश संभाजी महाराजांचा मित्र होता. संस्कृत विषयाचा तज्ञ, कवी, मधुर वाणी, सुसंस्कृत व्यवहार तसेच कवी कलश तंत्रमार्गी असून वशीकरण विद्या व मंत्र प्रयोग यात निष्णांत होता. दरबारातील ज्येष्ठ मंत्र्यांनी संभाजी राजांना विरोध केल्यामुळे डिसेंबर 1683 मध्ये कवी कलशाची नियुक्ती राजांनी "कारभाराचे अध्यक्ष" किंवा 'कुलएखतियार' या पदावर केली. कुल येखतीयार म्हणजे राजाचा प्रशासन व राजनैतिक क्षेत्रातील प्रमुख सल्लागार होय. त्यानंतर 3 ऑगस्ट 1684 च्या एका पत्रानुसार संभाजी महाराजांनी कवी कलशची नेमणूक 'छंदोगामात्य' या पदावर केली.'छंदोगामात्य' म्हणजे 'सामवेदाध्यायी प्रधान' असा होतो. दुसऱ्या शब्दात सामवेदी ब्राह्मणांची व्यवस्था करणारा अधिकारी होय. वास्तविक या पदाचा समावेश अष्टप्रधान मंडळामध्ये नव्हता तसेच त्याला काही विशेष महत्त्व नव्हते. संभाजी महाराजांचा जवळचा विश्वासू मित्र आणि प्रशासन, धर्मशास्त्र न्यायदान, लढाया, तहाच्या वाटाघाटी, राजनैतिक उलाढाली इत्यादी अनेक व्यवहार कवी कलश सहजपणे हाताळत असल्यामुळे 'छंदोगा मात्य' पदाला महत्त्व प्राप्त झाले. एकूण संभाजी महाराजांच्या कार्यकाळात कवी कलश संभाजी राजांची एकनिष्ठ व विश्वासास पात्र सहकारी असल्याचे दिसून येते. त्याने शेवटपर्यंत संभाजी महाराजांना साथ दिली. संभाजी राजा बरोबर कवी कलश सुद्धा मृत्यूला सामोरा गेला.

चिटणीस :- संभाजी महाराजांच्या कार्यकाळात चिटणीस हा अधिकारी छत्रपतीचा लेखनिक म्हणून काम करत असे. अष्टप्रधान मंडळामध्ये जरी त्याचा समावेश नसला तरी छत्रपतीच्या राजमंडळामध्ये त्याला महत्त्वाचे स्थान होते. राजपत्रे लिहिण्याचे आणि महत्त्वाच्या राजकारणी पत्रांना उत्तर देण्याचे काम चिटणीसाकडे होते. बाळाजी आवजी शिवकाळात या पदावर कार्यरत होते. अनाजीपंत सूरनीस यांच्या प्रभावाखाली येऊन बाळाजी आवजीने महाराजांच्या विरोधात भूमिका घेतल्यामुळे बाळाजी पंत यांना मृत्युदंडाची शिक्षा देण्यात आली. त्यानंतर महाराजांनी बाळाजी आवजीचा मुलगा खंडो बल्लाळ याची चिटणीस पदी नियुक्त केली. संभाजी महाराजांच्या गोव्यावरील स्वारी प्रसंगी संभाजी महाराजांचा घोडा खाडीत गेलेला असताना याच खंडो बल्लाळ याने घोड्यावर नियंत्रण मिळवून संभाजी राजांचा जीव वाचविला. एकूण खंडो बल्लाळने आपला जीव धोक्यात घालून महाराजांचे प्राण वाचवून स्वराज्याची इमानीतबारे सेवा केल्याची दिसते.

अष्टप्रधानाचे प्रशासन कार्यालय :-

केंद्रीय प्रशासनामध्ये अष्टप्रधानांना कार्यालयीन कामकाजासाठी स्वतंत्र कार्यालय दिले जात असत. छत्रपतीकडून मिळालेल्या अधिकाराचा वापर करून त्यांना आपली जबाबदारी पार पाडावी लागत असे. सर्व मंत्री छत्रपतींना जबाबदार असत. त्यांची नेमणूक, बढती आणि बडतर्फी, यांचे सर्वाधिकार छत्रपतीच्या हाती होते. प्रधानांची संख्या आठच असावी असे बंधन नव्हते, छत्रपती आपल्या मतानुसार आणि आवश्यकतेनुसार संख्येमध्ये बदल करीत असत. काही मंत्र्यांकडे सरकारकुणाची म्हणजे विशिष्ट प्रांताची किंवा सुभ्यांची व्यवस्था सोपविलेली असे. पंडितराव आणि न्यायाधीश वगळता इतर सर्व मंत्र्यांना युद्ध मोहिमांवर जावे लागत असे. अशा मंत्र्यांच्या अनुपस्थितीत त्यांचे मुतालिक कारभार पाहत असत. याशिवाय प्रत्येक मंत्राकडे कामकाज पाहण्यासाठी आठ अधिकारी कार्यरत होते. त्यामध्ये दिवाण, मुजुमदार, फडणीस, सबनीस, कारखानिस, चिटणीस, जामदार आणि पोतनीस यांचा समावेश होता. वरील सर्व अधिकारी मंत्र्यांना मदत करण्यासाठी नियुक्त करण्यात आले होते.

कारखाने आणि महाल :- शिवाजी महाराजांनी प्रशासकीय सोयीसाठी अठरा कारखाने आणि बारा महाल ही पद्धत सुरू केली होती. कारखाने आणि महाल याचा कारभार अष्टप्रधान मंडळाच्या देखरेखीखाली चालत असे. कारखाने

दौलतीच्या आणि महाल राजाच्या मालकीचे असत. दौलत म्हणजे अष्टप्रधान व त्यांचे सहाय्यक अधिकारी, चिटणीस आणि त्यांचे सहाय्यक यांच्या एकत्रित संघटनाला दौलत असे संबोधले जात होते. छत्रपती संभाजी महाराजांनी कारखाने आणि महाल या पद्धतीचा स्वीकार केला. त्यांचा कारभारसुद्धा विनाअडथळा याच पद्धतीचा अवलंब करून सुरू असल्याचे लक्षात येते.

निष्कर्ष :-

छत्रपती शिवाजी महाराजांच्या अकाली निधनामुळे मराठ्यांचे राज्य अचानक संकटात सापडले. अशा बिकट प्रसंगात रायगडावरील अष्टप्रधान मंडळातील मंत्र्यांनी युवराज संभाजी राजांचा ज्येष्ठतेचा अधिकार डावलून राजाराम महाराजांना मंचकारोहन केले. अशा परिस्थितीत संभाजीराजांनी योग्य त्या लष्करी व मुलकी हालचाली करून आपला अधिकार प्राप्त केला. संभाजी राजांची एकूण नऊ वर्षाची कारकीर्द अतिशय धकाधकीची होती. मोगल, पोर्तुगीज व सिद्धी या सत्ताधीशांसोबत संघर्ष करावा लागला. त्याचबरोबर दरबारातील मातब्बर मंडळींनी सत्ता हाती घेतल्यानंतर सुद्धा कटकारस्थाने सुरूच ठेवल्यामुळे राज्यकारभाराकडे बारकाईने लक्ष देण्यास उसंत मिळाली नाही. अष्टप्रधान मंडळातील अनाजीपंत यांच्यासारखे ज्येष्ठ मंत्री आपल्या इतर सहकाऱ्यांना सोबत घेऊन छत्रपतीच्या जीवावर उठलेले असताना विश्वास कोणावर ठेवावा असा प्रश्न निर्माण झाला. या पार्श्वभूमीवर प्रत्यक्ष मुघल बादशहा औरंगजेब स्वराज्याचा घास घेण्यासाठी प्रचंड सामर्थ्यासह स्वराज्यावर चालून आला. अशा विपरीत आणि अंधकारमय परिस्थितीमध्ये प्रकाशाचा एकच आधार होता, तो म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजांनी विविध तात्विक आणि नैतिक मुद्द्यांच्या आधारावर निर्माण केलेली स्वराज्यातील प्रशासन यंत्रणा. संभाजी महाराजांनी या प्रभावी व कार्यक्षम प्रशासन यंत्रणेमध्ये आवश्यक त्या ठिकाणी योग्य ते बदल करून नऊ वर्षे पर्यंत राज्य कारभार चालविला. आपला ज्येष्ठतेचा अधिकार डावलून, जीवावर उठलेल्या कारस्थानी मंत्र्यांना उदार अंतकरणाने क्षमा करून, त्यांच्या प्रशासकीय अनुभवाचा फायदा स्वराज्याला करून घेण्यासाठी त्यांना अष्टप्रधान मंडळात नियुक्त केले. त्यांच्या प्रशासकीय अनुभवाचा स्वराज्यासाठी उपयोग करणे हाच त्या पाठीमागे प्रामाणिक हेतू होता. तथापि, काही दिवसानंतर पुन्हा छत्रपतींनाच ठार मारण्याचे आणि पदच्युत करण्याचे दोन वेगवेगळे कट उघडकीस आल्यामुळे छत्रपतीपदाचे सर्वोच्च अधिकार वापरून संभाजी महाराजांनी सबंधित सर्व मंत्रांना देहदंडाची शिक्षा दिल्या. संभाजी महाराज्यांच्या प्रस्तुत निर्णयावरून त्यांच्यातील कार्यक्षम, धाडशी व खंबीर राज्यकर्त्याची प्रचिती येते.

संभाजी महाराजांचा राज्यकारभार मराठी राज्याला हितकारक नव्हता, मुलकी व लष्करी व्यवस्थेकडे त्यांनी दुर्लक्ष केले. कवी कलशला 'छंदोगामात्य' या पदावर नियुक्त करून अकारण महत्त्व दिले, सर्वत्र बेबंध शाही माजली होती ही आणि अशा स्वरूपाचे अनेक आरोप संभाजी महाराजांच्या कारकिर्दीवर केले जातात. तथापि, प्रबळ शत्रूसोबत लढत असताना आणि सतत मृत्यूच्या छायेत वावरत असतानाही छत्रपती संभाजी महाराजांनी ज्या धिरोदात्तपणे परिस्थितीला सामोरे जाऊन प्रशासकीय चौकट सांभाळली यावरून त्यांच्यावर केलेले आरोप बिन बुडाचे, खोटे आणि निराधार ठरतात.

संदर्भ ग्रंथ :-

1) बेंद्रे वा.सी. इतिहासाचे भीष्माचार्य, छत्रपती संभाजी महाराज, मनोरमा प्रकाशन दादर, मुंबई प्रथम आवृत्ती, 1960.

2) गोखले डॉ. सौ.कमल, शिवपुत्र संभाजी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन विजयनगर पुणे, प्रथम प्रथम आवृत्ती, 1971.

3) पठाण डॉ.इस्माईल हुसेन साहेब, छत्रपती संभाजी महाराज, मनोविकास प्रकाशन,पुणे.

4) पवार डॉ. जयसिंगराव, छत्रपती संभाजी स्मारक ग्रंथ, रिया पब्लिकेशन कोल्हापूर, 2009.

5) शिवदे डॉ. सदाशिव, ज्वलन्ज्वलनतेजस संभाजी राजा, डायमंड पब्लिकेशन, पुणे.

6) उदावंत संजय सुशांत, श्री शंभू छत्रपती स्मारक ग्रंथ, मधुश्री पब्लिकेशन, बुधवार पेठ पुणे.

7) वाकळे डॉ.गोरक्षनाथ, शिवपुत्र छत्रपती शंभुराजे, जिजाई प्रकाशन, वैजापूर छत्रपती संभाजी नगर.

डॉ. फ्रँकोइस क्वेस्ने (François Quesnay) यांचा 'संपत्ती संचलनाचा आराखडा' व भारत : एक चिकित्सक अभ्यास

प्रा. गांगुर्डे पंकजकुमार सुरेश

अर्थशास्त्र विभाग, मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे कर्मवीर काकासाहेब वाघ कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय पिंपळगाव (ब), ता. निफाड, जि. नाशिक (४२२२०९)

गोषवारा (Abstruct):-

या संशोधनपत्रात फ्रँकोइस क्वेस्ने (François Quesnay) यांच्या Tableau Économique (टॅब्लो इकॉनॉमिक) 'आर्थिक तक्ता' किंवा 'आर्थिक सारणी' या सिद्धांताचा सखोल अभ्यास करून भारतीय अर्थव्यवस्थेशी त्याची तुलनात्मक सांगड घालण्यात आली आहे. फिजिओक्रॅट विचारसरणीच्या आधारे कृषी हा संपत्तीचा मुख्य स्रोत असल्याचे प्रतिपादन करण्यात आले होते. प्रस्तुत अभ्यासात कृषी, उद्योग, सेवा क्षेत्र, अधिशेष संकल्पना आणि उत्पन्नाचा परिपत्रक प्रवाह यांचा भारतातील संदर्भात अभ्यास केला आहे. संशोधनात ऐतिहासिक व विश्लेषणात्मक पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. निष्कर्षतः आधुनिक भारतात Quesnay यांचे मॉडेल पूर्णपणे लागू नसले आधुनिक अर्थशास्त्रातील 'इनपुट-आउटपुट विश्लेषण' (Input-Output Analysis) आणि 'चक्राकार प्रवाह' (Circular Flow of Income) या संकल्पनांचा पाया मानले जाते.कृषीप्रधान अर्थव्यवस्था, अधिशेष निर्मिती, जमीनदार वर्ग आणि परिपत्रक उत्पन्न प्रवाह या घटकांचा भारतातील संदर्भात अभ्यास करण्यात आला आहे. संशोधनातून असे दिसून येते की, भारतातील कृषी व ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या रचनेत फ्रँकोइस क्वेस्ने यांच्या विचारांचे काही अंश आढळतात; तथापि, आधुनिक भारतात उद्योग, सेवा क्षेत्र, सरकारी हस्तक्षेप आणि जागतिकीकरणामुळे मूळ मॉडेलमध्ये व्यापक बदल आवश्यक ठरतात.

प्रस्तावना (Introduction):-

अठराव्या शतकातील फ्रेंच अर्थतज्ज्ञ फ्रँकोइस क्वेस्ने François Quesnay यांनी 1758 मध्ये Tableau Économique (टॅब्लो इकॉनॉमिक) सादर केले. या मॉडेलद्वारे त्यांनी अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाचा परिपत्रक प्रवाह स्पष्ट केला.फ्रँकोइस क्वेस्ने यांनी कृषी हा संपत्तीचा मुख्य स्रोत असल्याचे प्रतिपादन केले आणि अर्थव्यवस्थेतील उत्पन्नाचा प्रवाह तीन वर्गांद्वारे स्पष्ट केला. भारत ऐतिहासिकदृष्ट्या कृषीप्रधान देश राहिला आहे. त्यामुळे फ्रँकोइस क्वेस्ने यांच्या सिद्धांताचा भारतीय अर्थव्यवस्थेशी संबंध अभ्यासणे आवश्यक ठरते.त्यांनी अर्थव्यवस्थेला जैविक प्रणालीप्रमाणे समजले. जसे मानवी शरीरात रक्ताभिसरण चालते, तसेच अर्थव्यवस्थेत संपत्तीचा प्रवाह सतत चालू राहतो. या विचारातूनच "संपत्ती संचलनाचा आराखडा" ही संकल्पना विकसित झाली.

संशोधनाची उद्दिष्टे (Objectives):-

१. फ्रँकोइस क्वेस्ने यांच्या संपत्ती संचलनाच्या आराखड्याचे विश्लेषण करणे.
२. आराखड्यातील वर्गरचना व अधिशेष संकल्पना विश्लेषित करणे
३. आराखड्याच्या मर्यादा व उपयुक्तता तपासणे
४. भारतीय अर्थव्यवस्थेशी त्याची तुलना करणे.
५. आधुनिक राष्ट्रीय उत्पन्न मॉडेलशी तुलना करणे
६. आधुनिक संदर्भातील उपयुक्तता तपासणे.
७. भारतातील कृषी आणि जमीनदारी व्यवस्थेचा अभ्यास करणे

साहित्याचा आढावा (Review of Literature) :-

Blaug (1997) यांनी Quesnay यांना राष्ट्रीय उत्पन्न विश्लेषणाचा जनक म्हटले आहे. Haney (1949) यांच्या मते Tableau Économique हे आर्थिक विचारांच्या इतिहासातील क्रांतिकारी मॉडेल होते. Gide and Rist (1915) यांनी फिजिओक्रॅट विचारसरणीचा अभ्यास करताना कृषीला दिलेले प्राधान्य आणि laissez-faire धोरणाचा पुरस्कार यावर भर दिला आहे. Meek (1962) यांनी अधिशेष संकल्पनेचा पुढील मार्क्सवादी विचारांवर झालेला प्रभाव स्पष्ट केला आहे. वरील साहित्याच्या आधारे दिसून येते की फ्रँकोइस क्वेस्ने यांचा आराखडा हा केवळ कृषी सिद्धांत नसून उत्पन्न प्रवाहाच्या संरचनात्मक विश्लेषणाचा प्रारंभबिंदू आहे. भारतीय अर्थव्यवस्थेच्या संदर्भात कृषी व जमीनदारी व्यवस्थेवर विविध अभ्यास उपलब्ध आहेत; मात्र फ्रँकोइस क्वेस्ने मॉडेल व भारत यांची तुलनात्मक सांगड मर्यादित स्वरूपात आढळते.

संशोधन पद्धती (Research Methodology):-

सदर संशोधन पेपर हा वर्णनात्मक व विश्लेषणात्मक स्वरूपाचा आहे. यासाठी दुय्यम माहितीचा (Secondary Data) वापर करण्यात आला आहे. पुस्तके, संशोधन लेख, जर्नल्स व संदर्भग्रंथ यांचा आधार घेण्यात आला आहे.

- ऐतिहासिक व विश्लेषणात्मक संशोधन पद्धती
- द्वितीयक स्रोतांचा वापर (ग्रंथ, संशोधन लेख)
- तुलनात्मक विश्लेषण

सैद्धांतिक चौकट किंवा सिद्धांताधारित संरचना (Theoretical Framework):-

फ्रँकोइस क्वेस्ने यांनी अर्थव्यवस्थेचे तीन प्रमुख वर्ग केले:

(1) Productive Class (उत्पादक वर्ग)

शेतकरी व कृषी कामगार. कृषी उत्पादनाद्वारे “Net Product” निर्माण करतात.

(2) Sterile Class (निर्जीव वर्ग)

कारागीर, उद्योग व व्यापारी. उत्पादन करतात परंतु अधिशेष निर्माण करत नाहीत.

(3) Proprietary Class (मालक वर्ग)

जमीनदार. भाडे स्वरूपात उत्पन्न प्राप्त करतात.

फ्रँकोइस क्वेस्ने यांची वर्गरचना:-

तक्ता क्र.१.

अ.क्र.	वर्ग	कार्य	उत्पन्नाचे स्वरूप
१.	उत्पादक वर्ग (Productive Class)	कृषी उत्पादन	अधिशेष निर्माण
२.	निर्जीव वर्ग (Sterile Class)	उद्योग/व्यापार	रूपांतरण
३.	मालक वर्ग (Proprietary Class)	जमीन मालकी	भाडे प्राप्त

संपत्ती संचलनाची प्रक्रिया:-

१. कृषी क्षेत्रात उत्पादन होते.
२. अधिशेष जमीनदारांकडे जातो.
३. जमीनदार उद्योग व कृषी उत्पादनावर खर्च करतात.
४. उत्पन्नाचा परिपत्रक प्रवाह निर्माण होतो.

ही प्रक्रिया आधुनिक Circular Flow of Income संकल्पनेशी साधर्म्य दर्शवते.

फ्रँकोइस क्वेस्ने यांनी अर्थव्यवस्थेला तीन वर्गांमध्ये विभागले: उत्पादक वर्ग (कृषी), निर्जीव वर्ग (उद्योग/व्यापार) आणि मालक वर्ग (जमीनदार). कृषी क्षेत्रातून अधिशेष निर्माण होतो आणि तो परिपत्रक पद्धतीने इतर वर्गांकडे प्रवाहित होतो.

भारतातील कृषी व जमीनदारी व्यवस्था:-

भारतामध्ये ब्रिटिश काळात जमीनदारी पद्धती अस्तित्वात होती. जमीनदार वर्ग भाडे स्वरूपात उत्पन्न मिळवत असे, तर शेतकरी उत्पादन करीत असत. ही रचना फ्रँकोइस क्वेस्ने यांच्या वर्गरचनेशी काही प्रमाणात साम्य दर्शवते.

तथापि, आधुनिक भारतात:

- सेवा क्षेत्राचा GDP मध्ये सर्वाधिक वाटा आहे.
- औद्योगिक क्षेत्र मोठ्या प्रमाणात अधिशेष निर्माण करते.
- सरकार व बँकिंग व्यवस्था अर्थव्यवस्थेचा महत्त्वाचा भाग आहेत.

तुलनात्मक विश्लेषण :-

अ.क्र	घटक	Quesnay मॉडेल	भारत (आधुनिक)
१.	मुख्य उत्पादक	कृषी	सेवा + उद्योग + कृषी
२.	जमीनदार भूमिका	महत्त्वाची	मर्यादित
३.	सरकारी हस्तक्षेप	नाही	व्यापक
४.	जागतिक व्यापार	विचारात नाही	अत्यंत महत्त्वाचा

वरील तक्त्यामध्ये फ्रँकोइस क्वेस्ने (François Quesnay) यांच्या Tableau Économique (संपत्ती संचलनाचा आराखडा) आणि आधुनिक भारताच्या अर्थव्यवस्थेतील संरचनेची तुलनात्मक मांडणी केलेली आहे. त्याचे विश्लेषण पुढीलप्रमाणे—

अ.क्र	घटक	Quesnay मॉडेल	भारत (आधुनिक)	विश्लेषण
१.	मुख्य उत्पादक	कृषी हा एकमेव "उत्पादक" क्षेत्र मानला आहे. फिजिओक्रॅट विचारसरणीनुसार जमिनीमधून निर्माण होणारा "नेट प्रॉडक्ट" (Net Product) हा संपत्तीचा खरा स्रोत आहे. उद्योग व व्यापार हे "निर्जीव" (Sterile) क्षेत्र मानले गेले.	भारतामध्ये सेवा, उद्योग आणि कृषी हे तिन्ही क्षेत्र अर्थविकासाचे मुख्य आधार आहेत. GDP मध्ये सेवा क्षेत्राचा सर्वाधिक वाटा आहे. त्यामुळे संपत्ती निर्मितीचा स्रोत बहुआयामी झाला आहे.	फ्रँकोइस क्वेस्ने यांचे मॉडेल कृषीप्रधान अर्थव्यवस्थेसाठी योग्य होते; परंतु आधुनिक भारतात उत्पादन संरचना विविधीकृत (Diversified) आहे.
२.	जमीनदार भूमिका	जमीनदार वर्गाला महत्त्वाची भूमिका आहे. कृषी उत्पादनातून निर्माण होणारा अधिशेष (Surplus) जमीनदारांकडे जातो आणि त्यातून अर्थचक्र फिरते.	जमीनदारांची भूमिका मर्यादित आहे. औद्योगिकीकरण, जमीन सुधारणा कायदे, सहकारी चळवळ आणि भांडवलशाही रचना यामुळे जमीनदारांचे आर्थिक वर्चस्व कमी झाले आहे	फ्रँकोइस क्वेस्ने मॉडेलमध्ये जमीन ही संपत्तीचे केंद्र आहे; आधुनिक भारतात भांडवल, तंत्रज्ञान आणि उद्योजकता हे अधिक प्रभावी घटक आहेत
३.	सरकारी हस्तक्षेप	"Laissez-Faire" धोरणावर भर आहे. सरकारने अर्थव्यवस्थेत हस्तक्षेप करू नये, असे मत होते.	भारतामध्ये सरकारचा व्यापक हस्तक्षेप आहे— नियोजन, वित्तीय धोरण, चलनविषयक धोरण,	फ्रँकोइस क्वेस्ने यांनी नैसर्गिक आर्थिक नियमांवर विश्वास ठेवला; आधुनिक भारतात मिश्र अर्थव्यवस्था (Mixed

			करप्रणाली, अनुदाने, कल्याणकारी योजना इत्यादींच्या माध्यमातून. उदाहरणार्थ, Reserve Bank of India चलनविषयक धोरणाद्वारे अर्थचक्र नियंत्रित करते.	Economy) स्वीकारली गेली
४.	जागतिक व्यापार	आंतरराष्ट्रीय व्यापाराचा स्पष्ट विचार नाही. मॉडेल प्रामुख्याने अंतर्गत आर्थिक प्रवाहांवर आधारित आहे.	जागतिक व्यापार अत्यंत महत्त्वाचा आहे. निर्यात-आयात, परकीय गुंतवणूक (FDI), WTO सदस्यत्व, मुक्त व्यापार करार (FTA) यांमुळे भारताची अर्थव्यवस्था जागतिक प्रणालीशी जोडलेली आहे.	आधुनिक भारताची अर्थव्यवस्था खुली (Open Economy) आहे; Quesnay मॉडेल बंद अर्थव्यवस्थेवर आधारित होते.

तक्त्यातील तुलना दर्शवते की, डॉ.फ्रँकोइस क्वेस्ने यांचा संपत्ती संचलनाचा आराखडा कृषीप्रधान, जमीनकेंद्रित आणि राज्याच्या मर्यादित भूमिकेवर आधारित होता. त्याउलट आधुनिक भारताची अर्थव्यवस्था बहु-क्षेत्रीय, तंत्रज्ञानाधारित, जागतिक व्यापाराशी निगडित आणि राज्याच्या सक्रिय हस्तक्षेपावर आधारित आहे. यावरून असे स्पष्ट होते की डॉ.फ्रँकोइस क्वेस्ने यांचे मॉडेल ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचे असले तरी, ते आधुनिक भारताच्या जटिल आणि गतिमान अर्थव्यवस्थेला पूर्णतः लागू पडत नाही; मात्र अर्थचक्र आणि अधिशेष संकल्पना समजण्यासाठी ते मूलभूत मार्गदर्शक ठरते.

तक्ता :-

अ.क्र.	घटक	Quesnay मॉडेल	आधुनिक भारत
१.	मुख्य उत्पादक	कृषी	सेवा + उद्योग + कृषी
२.	सरकारी भूमिका	नाही	महत्त्वाची
३.	वित्तीय संस्था	अनुपस्थित	समाविष्ट



भारतामध्ये सेवा क्षेत्राचा GDP मध्ये सर्वाधिक वाटा आहे. त्यामुळे डॉ.फ्रँकोइस क्वेस्ने यांनी कृषीला दिलेले सर्वोच्च स्थान आधुनिक भारतात मर्यादित ठरते. तथापि, उत्पन्नाचा परिपत्रक प्रवाह समजण्यासाठी त्यांचा सिद्धांत उपयुक्त आहे.

डॉ. फ्रँकोइस क्वेस्ने संपत्तीचा प्रवाह उदाहरणाद्वारे स्पष्टीकरण –

देशात तयार झालेल्या संपत्तीचे मूल्य ५ कोटी आहे ही संपत्ती शेतकरी वर्गाने तयार केली आहे. यापैकी निर्वाहासाठी २ कोटी बाजूला ठेवले जातात हा भाग संपत्तीच्या वितरणात येत नाही उरलेले ३ कोटी यापैकी १ कोटी शेतकरी कामगार व्यावसायिक यांना देऊन वस्तू विकत घेतो व २ कोटी जमीन मालकाला खंड देतो शिल्लक नाही.जमीन मालक २ कोटी पैकी १ कोटी शेतक़्याला देऊन धान्य विकत घेतो आणि १ कोटी अनुत्पादक वर्गाकडून वस्तू विकत घेतो त्यामुळे जमीन मालकाकडे शिल्लक राहत नाही. शेतकरी व जमीन मालकाने अनुत्पादक वर्गाला १ कोटी दिले त्यामुळे या वर्गाकडे २ कोटी आहे.त्यापैकी १ कोटी शेतकरी वर्गाकडून कच्चा माल व १ कोटी धान्य खरेदी करतो त्यामुळे २ कोटी शेतक़्यालाच मिळतात. थोडक्यात, जमीन मालकाने दिलेले १ कोटी व अनुत्पादक वर्गाचे २ कोटी पुन्हा शेतकरी वर्गाकडे ३ कोटी परत येतात असा संपत्तीचा प्रवाह फिरत असतो.

उदाहरणाच्या आधारे हा संपत्तीचा प्रवाह पुढीलप्रमाणे स्पष्ट होतो:-

१. **एकूण उत्पादन**- देशात तयार झालेली संपत्ती = ₹ 5 कोटी आहे ही संपत्ती पूर्णपणे शेतकरी वर्गाने निर्माण केलेली आहे.

२. **शेतकरी वर्गाचे विभाजन**- निर्वाहासाठी राखून ठेवले = ₹ 2 कोटी (हे बाजारात फिरत नाही) ,उरलेली शिल्लक = ₹ 3 कोटी. या ₹3 कोटींचे वितरण: ₹1 कोटी → कामगार/व्यावसायिकांकडून वस्तू खरेदी, ₹2 कोटी → जमीनदाराला खंड (भाडे) त्यामुळे शेतक़्याकडे शिल्लक राहत नाही.

३. **जमीनदार वर्गाची खर्च प्रक्रिया-** जमीनदाराकडे आलेले ₹2 कोटी: ₹1 कोटी → शेतक़्याकडून धान्य खरेदी ,₹1 कोटी → अनुत्पादक वर्गाकडून वस्तू खरेदी त्यामुळे जमीनदाराकडेही शिल्लक राहत नाही.

४. **अनुत्पादक वर्गाची खर्च प्रक्रिया- शेतकरी (₹1 कोटी) + जमीनदार (₹1 कोटी) = ₹2 कोटी अनुत्पादक वर्गाकडे जमा .या ₹2 कोटींचा उपयोग: ₹1 कोटी → शेतक़्याकडून कच्चा माल, ₹1 कोटी → शेतक़्याकडून धान्य त्यामुळे ही संपूर्ण रक्कम पुन्हा शेतकरी वर्गाकडे परत जाते.**

५. **संपत्तीचा परिपूर्ण प्रवाह (Circular Flow)-**

अ.क्र.	वर्ग	सुरुवातीला मिळाले	खर्च	अंतिम शिल्लक
१.	शेतकरी	5 कोटी	3 कोटी वितरण	3 कोटी परत
२.	जमीनदार	2 कोटी	2 कोटी	0
३.	अनुत्पादक	2 कोटी	2 कोटी	0

जमीनदाराचे ₹1 कोटी + अनुत्पादक वर्गाचे ₹2 कोटी = ₹3 कोटी पुन्हा शेतक़्याकडे परत येतात.

डॉ. फ्रँकोइस क्वेस्ने यांच्या संपत्तीच्या वर्तुळाकार प्रवाह संकल्पनेच्या आधारे आजच्या भारता संदर्भात पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण करता येते.

भारतातील संपत्तीचा प्रवाह : आधुनिक संदर्भ

१. उत्पादनाचा स्रोत – बदललेली रचना :-

क्वेस्ने यांच्या मते शेती हा एकमेव उत्पादक क्षेत्र होता.परंतु आज भारतात सेवा क्षेत्र (IT, बँकिंग, पर्यटन) – सर्वात मोठा वाटा उद्योग क्षेत्र (उत्पादन, बांधकाम) ,कृषी क्षेत्र (अन्नधान्य, कच्चा माल) असून आज संपत्ती केवळ शेतीतून नव्हे तर तीनही क्षेत्रांतून निर्माण होते.

२. वर्गरचनेतील बदल-

अ.क्र.	क्वेस्ने मॉडेल	आधुनिक भारत
१.	शेतकरी वर्ग	उत्पादक क्षेत्र (कृषी + उद्योग + सेवा)
२.	जमीनदार वर्ग	भांडवलदार, गुंतवणूकदार, मालमत्ता धारक
३.	अनुत्पादक वर्ग	सेवा पुरवठादार, लघुउद्योग, व्यापारी

आज "अनुत्पादक" हा शब्द लागू होत नाही, कारण सेवा क्षेत्रही उत्पादनक्षम आहे.

३.आधुनिक संपत्तीचा प्रवाह-

- उद्योग/सेवा/कृषी क्षेत्र उत्पादन करतात.
- उत्पन्न → कामगारांना वेतन, भांडवलदारांना नफा, सरकारला कर.
- वेतनधारक व भांडवलदार खर्च करतात → वस्तू व सेवा खरेदी.
- सरकार कराद्वारे मिळालेली रक्कम → पायाभूत सुविधा, कल्याणकारी योजना.
- हा खर्च पुन्हा उद्योग व सेवा क्षेत्राकडे परत जातो.

त्यामुळे संपत्ती सतत फिरत राहते.

४. सरकारची भूमिका-

क्वेस्ने यांच्या मॉडेलमध्ये सरकारची भूमिका नगण्य होती. परंतु भारतात सरकार हा संपत्तीच्या प्रवाहातील एक प्रमुख घटक आहे.त्यात

- करप्रणाली
- अनुदाने (Subsidies)
- सामाजिक सुरक्षा योजना
- RBI द्वारे चलन व पतधोरण

५. जागतिक व्यापाराचा प्रभाव- क्वेस्ने मॉडेलमध्ये परकीय व्यापार नव्हता. आज भारत

- निर्यात (IT सेवा, औषधे, कापड)
- आयात (कच्चे तेल, तंत्रज्ञान)

संपत्तीचा प्रवाह आता आंतरराष्ट्रीय स्तरावर देखील फिरतो.

निष्कर्ष (Conclusion):-

डॉ. फ्रँकोइस क्वेस्ने (François Quesnay) यांचा संपत्ती संचलनाचा आराखडा हा राष्ट्रीय उत्पन्न सिद्धांताचा पाया मानला जातो. भारतीय अर्थव्यवस्थेच्या संदर्भात त्याचे काही घटक सुसंगत दिसतात; मात्र आधुनिक बहुउद्देशीय अर्थरचनेमुळे मूळ मॉडेलमध्ये व्यापक बदल आवश्यक ठरतात.डॉ.फ्रँकोइस क्वेस्ने यांचा संपत्ती संचलनाचा आराखडा हा अर्थशास्त्राच्या इतिहासातील मैलाचा दगड आहे. त्यांनी प्रथमच अर्थव्यवस्थेतील उत्पादन, वितरण व उपभोग यांचा परिपत्रक संबंध स्पष्ट केला. जरी त्यांच्या सिद्धांतात उद्योग व सरकारी हस्तक्षेपाचा विचार नसला तरी राष्ट्रीय उत्पन्न विश्लेषणाची मूलभूत चौकट त्यांनी दिली. आजच्या जागतिक अर्थव्यवस्थेत Tableau Économique प्रत्यक्ष लागू नसला तरी सैद्धांतिक पाया म्हणून त्याचे महत्त्व निर्विवाद आहे.डॉ.फ्रँकोइस क्वेस्ने यांचा संपत्ती संचलनाचा आराखडा हा अर्थशास्त्राच्या इतिहासातील क्रांतिकारी टप्पा आहे. जरी त्यांच्या विचारांमध्ये मर्यादा असल्या तरी आधुनिक अर्थव्यवस्थेतील उत्पन्न प्रवाह संकल्पनेचा पाया त्यांनी घातला. त्यामुळे डॉ.फ्रँकोइस क्वेस्ने यांचे योगदान अर्थशास्त्राच्या विकासात मोलाचे मानले जाते.

संदर्भ सूची (References) :-

१. Blaug, M. (1997). Economic Theory in Retrospect. Cambridge University Press. (ब्लॉग, एम. (१९९७). आर्थिक सिद्धांतातील पूर्वलक्ष्य. केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस)

२. Gide, C., & Rist, C. (1915). A History of Economic Doctrines. (गिड, सी., आणि रिस्ट, सी. (१९१५). आर्थिक सिद्धांतांचा इतिहास)

३. Haney, L. H. (1949). History of Economic Thought. (हॅनी, एल. एच. (१९४९). आर्थिक विचारांचा इतिहास)

४. Meek, R. L. (1962). The Economics of Physiocracy. Harvard University Press. (मीक, आर. एल. (१९६२). भौतिकशास्त्राचे अर्थशास्त्र. हार्वर्ड युनिव्हर्सिटी प्रेस)

५. Quesnay, F. (1758). Tableau Économique. (क्वेस्ने, एफ. (१७५८). आर्थिक सारणी)

६. Government of India. (Recent Economic Survey Reports भारत सरकार. (अलीकडील आर्थिक सर्वेक्षण अहवाल)

मध्ययुगीन भारतीय समाज आणि संस्कृती : एक ऐतिहासिक व विश्लेषणात्मक अभ्यास

धर्मा किशोर गावंडे
(संशोधक विद्यार्थी)
श्री शिवाजी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अकोट

सारांश

मध्ययुगीन भारताचा कालखंड साधारणतः ८व्या शतकापासून १८व्या शतकापर्यंत मानला जातो. या काळात भारतीय उपखंडातील राजकीय रचना अस्थिर होती; अनेक प्रादेशिक साम्राज्ये, राजवंश आणि सत्ताधारी गट उदयास आले आणि पतन झाले. त्याचवेळी समाजाचे आर्थिक, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक आणि सांस्कृतिक जीवन अत्यंत समृद्ध आणि वैविध्यपूर्ण होते. या काळातील समाजाचा अभ्यास करण्याचा उद्देश केवळ ऐतिहासिक राजकीय घटना नोंदवणे नाही, तर सामाजिक रचना, आर्थिक व्यवहार, धार्मिक परंपरा, कला-संस्कृती, शैक्षणिक व बौद्धिक जीवन यांचा सखोल अभ्यास करून मध्ययुगीन भारतीय समाजाची संपूर्ण समृद्धी व वैशिष्ट्ये स्पष्ट करणे हा आहे.

या संशोधनासाठी मुख्यतः सैद्धांतिक (Conceptual) पद्धत वापरण्यात आली आहे. माहिती संकलनासाठी प्राचीन व मध्ययुगीन ग्रंथ, ऐतिहासिक नोंदी, स्थापत्यकला, भित्तिचित्रे, शिल्पकला, मठ-मद्रसा, साहित्य आणि विविध धर्मपरंपरांचा अभ्यास केला गेला. याशिवाय आर्थिक जीवनाचा अभ्यास करताना कृषी, उद्योग, हस्तकला, व्यापार, कर आणि चलनव्यवस्थेचा सखोल अभ्यास केला गेला, ज्यामुळे त्या काळातील आर्थिक स्थैर्य व प्रगती स्पष्ट झाली. धर्म, भक्ति आणि सूफी चळवळींचा अभ्यास करून धार्मिक सहिष्णुता, समाजातील एकात्मता व सांस्कृतिक मिश्रण यांचा अभ्यास केला गेला. स्थापत्य, कला, साहित्य आणि शैक्षणिक परंपरेच्या माध्यमातून समाजातील बौद्धिक व सांस्कृतिक प्रगती स्पष्ट झाली.

मुख्य निष्कर्ष असे दर्शवितात की मध्ययुगीन भारतीय समाज सामाजिक, धार्मिक, आर्थिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या अत्यंत समृद्ध होता. समाजाची रचना जातिव्यवस्था, सामाजिक स्तर, कुटुंब परंपरा, स्त्रिया व पुरुषांच्या भूमिकांवर आधारित होती. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या वर्णांचा समाजातील ठराविक स्थान असल्यामुळे सामाजिक स्थैर्य राखले गेले. ग्रामीण जीवन कृषी, पशुपालन, हस्तकला व स्थानिक उद्योग यांवर केंद्रित होते, तर शहरी जीवन व्यापार, प्रशासन, कला, स्थापत्य व शिक्षण यांच्याशी संबंधित होते. स्त्रिया मुख्यत्वे घरगुती, धार्मिक व सांस्कृतिक कार्यांमध्ये गुंतलेल्या असल्या तरी काही प्रांतांमध्ये त्यांनी सार्वजनिक जीवनात योगदान दिले. धार्मिक जीवन हा समाजाचा मुख्य आधार होता. हिंदू धर्माच्या भक्ती चळवळींनी समाजात आध्यात्मिक व नैतिक मूल्यांचा प्रसार केला. रामानंद, कबीर, मीराबाई व तुलसीदास यांच्या भक्ति साहित्यामुळे सामाजिक सहिष्णुता व लोककल्याणाची भावना वाढली. मुस्लिम साम्राज्यांच्या स्थापनेसह इस्लाम धर्माची संस्कृती, वास्तुकला, साहित्य व संगीत यांमध्ये मोठे योगदान दिसून आले. बौद्ध व जैन धर्माच्या परंपरांनीही सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक जीवनात महत्त्वपूर्ण योगदान दिले. मध्ययुगीन भारतातील कला, स्थापत्य व साहित्य अत्यंत समृद्ध होते. हिंदू मंदिर, मुस्लिम मशीद, भित्तिचित्रे, शिल्पकला, स्तूपे व मठातील कलाकृती समाजातील सांस्कृतिक समृद्धीचे अधिष्ठान ठरले. साहित्याच्या क्षेत्रात संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश, हिंदी, तमिळ, फारसी व उर्दू यासारख्या भाषांमध्ये काव्य, नाट्य, इतिहास, धर्मग्रंथ, तत्त्वज्ञान व भक्ति साहित्य समृद्ध झाले. शिक्षण व ज्ञानपरंपरेत गुरुकुल, मठ व मद्रसा या माध्यमातून धार्मिक, तात्त्विक व वैज्ञानिक शिक्षणाचा प्रसार झाला. आर्यभट्ट, वराहमिहिर यांसारखे गणितज्ञ व खगोलशास्त्रज्ञ या काळात कार्यरत होते. शिक्षण मुख्यत्वे वरवर्गीय वर्गासाठी खुली असली तरी, मठ, गुरुकुल व मंदिर हे ज्ञानाचे प्रसारक केंद्र होते.

सारांशतः मध्ययुगीन भारतीय समाज सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक व बौद्धिक दृष्ट्या वैविध्यपूर्ण व समृद्ध होता. विविध धर्म, कला, स्थापत्य, साहित्य व शिक्षणाच्या माध्यमातून समाजाने ठोस सांस्कृतिक व बौद्धिक पाया तयार केला, जो पुढील काळातील भारतीय समाजासाठी महत्त्वपूर्ण ठरला. या काळातील सामाजिक-सांस्कृतिक

वैशिष्ट्यांचा अभ्यास केल्यास मध्ययुगीन भारताची सामाजिक, धार्मिक, आर्थिक व सांस्कृतिक समृद्धी स्पष्टपणे दिसून येते.

प्रस्तावना

भारतीय उपखंडाचा इतिहास विविध कालखंडांमध्ये विभागलेला आहे, ज्यामध्ये प्राचीन, मध्ययुगीन आणि आधुनिक काळ महत्वाचा मानला जातो. मध्ययुगीन भारताचा कालखंड साधारणतः ८व्या शतकापासून १८व्या शतकापर्यंत मानला जातो. या काळात राजकीय स्थैर्याचे अभाव असूनही सामाजिक, आर्थिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक जीवन अत्यंत समृद्ध होते. विविध प्रादेशिक साम्राज्ये, राजवंश आणि सत्ताधारी गट उदयास आले आणि पतन झाले, ज्यामुळे राजकीय दृष्ट्या अस्थिरता निर्माण झाली, परंतु या परिस्थितीत समाजाने सामाजिक, सांस्कृतिक आणि बौद्धिक समृद्धीची नवी उंची गाठली.

मध्ययुगीन भारतीय समाज ही एक बहुपातळीची आणि विविधतेने समृद्ध रचना होती. या काळात समाजाचे विभाजन मुख्यतः जातिव्यवस्था, सामाजिक स्तर, धर्म व प्रांतीय जीवनशैली यांवर आधारित होते. ग्रामीण समाज कृषी, हस्तकला आणि स्थानिक उद्योगावर केंद्रित होता, तर शहरी समाजात व्यापार, कला, स्थापत्य, प्रशासन आणि शिक्षण महत्त्वपूर्ण भूमिका बजावत होते. या काळात धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक मिश्रणामुळे समाजात सहिष्णुता, एकात्मता आणि सांस्कृतिक आदानप्रदान दिसून आले.

मध्ययुगीन भारताचा अभ्यास आजच्या सामाजिक आणि सांस्कृतिक समजासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे. या काळातील समाज, धर्म, कला, साहित्य, स्थापत्य, शिक्षण व अर्थव्यवस्था या सर्व घटकांचा अभ्यास केल्यास केवळ इतिहासाचे ज्ञान नाही तर सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्यांचा अभ्यासही करता येतो. आधुनिक काळातील बहुसांस्कृतिक समाज, सहिष्णुता, धार्मिक संवाद व सांस्कृतिक आदानप्रदान या पैलूंना मध्ययुगीन भारतातील अनुभवांपासून शिकण्याची संधी मिळते.

मध्ययुगीन भारतीय समाजावर अनेक ऐतिहासिक नोंदी असूनही त्याचे संपूर्ण सामाजिक, आर्थिक, धार्मिक व सांस्कृतिक स्वरूप अजूनही व्यवस्थित समजलेले नाही. अनेक वेळा या काळातील धार्मिक संघर्ष, राजकीय अस्थिरता किंवा प्रादेशिक सत्ता केंद्रांवर लक्ष केंद्रित केले जाते, परंतु समाजाच्या सामाजिक रचना, स्त्रियांची भूमिका, शिक्षण व सांस्कृतिक समृद्धी यांचा अभ्यास कमी प्रमाणात झाला आहे. या संशोधनाचा उद्देश या घटकांचा सखोल अभ्यास करून मध्ययुगीन भारतीय समाजाची पूर्ण सामाजिक-सांस्कृतिक प्रतिमा उभारणे हा आहे.

संशोधनाचे उद्दिष्ट

1. मध्ययुगीन भारतीय समाजाची सामाजिक रचना, जाती-व्यवस्था, स्त्रिया आणि कुटुंबसंस्थेचे स्वरूप स्पष्ट करणे.
2. आर्थिक जीवन – कृषी, उद्योग, हस्तकला, व्यापार आणि चलनव्यवस्थेचा अभ्यास करणे.
3. धार्मिक, सांस्कृतिक आणि बौद्धिक जीवन – भक्ति, सूफी, जैन, बौद्ध व मुस्लिम परंपरा यांचा सखोल अभ्यास करणे.
4. कला, स्थापत्य आणि साहित्य यांचा समाजातील प्रभाव समजून घेणे.
5. शिक्षण व ज्ञानपरंपरेच्या माध्यमातून समाजातील बौद्धिक प्रगती स्पष्ट करणे.

संशोधन पद्धत

हे संशोधन संकल्पनात्मक (Conceptual) स्वरूपाचे आहे. या अभ्यासात मध्ययुगीन भारतीय समाज आणि संस्कृतीच्या विविध पैलूंवर सखोल विचार केला गेला आहे. माहिती संकलनासाठी दुय्यम स्रोतांचा वापर केला आहे, ज्यामध्ये प्राचीन आणि मध्ययुगीन ग्रंथ, ऐतिहासिक नोंदी, शैक्षणिक लेख, संशोधन पेपर, शास्त्रीय मासिके आणि पुस्तकांचा समावेश आहे. तसेच सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक आणि धार्मिक संदर्भ यांचा तुलनात्मक अभ्यास करून समाजाच्या विविध पैलूंचे विश्लेषण केले आहे. या पद्धतीमुळे समाजाच्या रचना, धार्मिक प्रवाह, आर्थिक जीवन, कला, साहित्य, स्थापत्य व शिक्षण यांचा सखोल अभ्यास शक्य झाला. संकल्पनात्मक पद्धत वापरल्यामुळे संशोधनाचा केंद्रबिंदू मध्ययुगीन समाजाचे संपूर्ण सामाजिक-सांस्कृतिक स्वरूप आणि त्याच्या आधुनिक संदर्भातील महत्त्व आहे.

मध्ययुगीन भारतीय समाजरचना

मध्ययुगीन भारताचा समाज अत्यंत सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या विविधतेने परिपूर्ण होता. या काळातील समाजाची रचना स्पष्टपणे सामाजिक स्तर, जातिव्यवस्था, कुटुंबसंस्था, स्त्रियांची भूमिका, शिक्षण व ज्ञानपरंपरा या घटकांवर आधारित होती. जरी राजकीय दृष्ट्या हा काळ अस्थिर राहिला तरी सामाजिक व सांस्कृतिक जीवनाने स्थिरता राखली.

जातिव्यवस्था

मध्ययुगीन भारतीय समाजातील जातिव्यवस्था अधिक कठोर स्वरूपाची होती. प्राचीन काळाप्रमाणे वर्णानुसार समाजाचे विभाजन कायम होते; ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र या चार मुख्य वर्णांचा सामाजिक जीवनात ठराविक स्थान आणि भूमिका होती. या काळात व्यवसायानुसार उपजात्यांचे विभागही अधिक ठळक झाले. उदाहरणार्थ, कृषी व्यवसाय करणारे शेतकरी, कारागीर, व्यापारी व लोहार यांचे उपगट समाजात स्पष्टपणे ओळखले जात होते. सामाजिक गतिशीलता खूप कमी होती; व्यक्तीला आपल्या जन्माच्या जातीतून पुढील संधी मर्यादित होत्या. काही अपवादात्मक परिस्थितींमध्ये, सामंत राजवटीच्या प्रशासन किंवा धार्मिक संस्थांमध्ये काही व्यक्तींना वंशापासून भिन्न कार्य करण्याची संधी मिळाली. तथापि, बहुतेक वेळा जातीय सीमा समाजाचे मुख्य नियंत्रण करणारे घटक ठरल्या.

जातिव्यवस्थेच्या कठोरतेमुळे विवाह, व्यवसाय, धार्मिक व सामाजिक सहभाग यासंबंधी नियम कडक होते. उदाहरणार्थ, विवाहाचे नियम फक्त आपल्या जातीतच मर्यादित होते. त्यामुळे सामाजिक संरचना स्थिर राहिली, परंतु यामुळे काही वेळा समाजातील नवकल्पना आणि सामाजिक सुधारणा मंदावल्या.

स्त्रियांची स्थिती

मध्ययुगीन काळात स्त्रिया मुख्यत्वे कुटुंब व घरगुती कार्यांमध्ये गुंतलेल्या होत्या. तथापि, त्यांच्या स्थितीत भिन्नता प्रांत, धर्म, सामाजिक स्तर आणि आर्थिक स्थितीनुसार होती. स्त्रियांच्या शिक्षणावर अनेकदा निर्बंध होते. हिंदू समाजात सती प्रथा, बालविवाह, पतीपरायणता या प्रथा प्रचलित होत्या, ज्यामुळे स्त्रियांना सामाजिक व वैयक्तिक स्वतंत्रतेत मर्यादा भासत होत्या. मुसलमान समाजातही स्त्रियांना शिक्षणाची संधी मर्यादित प्रमाणातच मिळत असे, जिथे घरगुती शिक्षण आणि धार्मिक शिक्षण प्राधान्याने दिले जात असे.

तरीही, काही स्त्रिया प्रशासन, कला, साहित्य व सामाजिक कार्यात प्रगती करताना दिसतात. उदाहरणार्थ, रानी चन्नाम्मा, राणी अहिल्याबाई होळकर, मीराबाई यांसारख्या स्त्रियांनी शासन, सांस्कृतिक उन्नती आणि भक्ति साहित्याच्या माध्यमातून समाजावर प्रभाव टाकला. यावरून दिसून येते की सामाजिक निर्बंध असूनही, काही स्त्रियांनी आपली भूमिका पारंपरिक चौकटीतून बाहेर काढून समाजात महत्त्वाची छाप सोडली.

शिक्षणपद्धती

मध्ययुगीन काळात शिक्षणप्रणाली धार्मिक आणि संस्कृतिक दृष्ट्या केंद्रित होती. शिक्षणाचे मुख्य केंद्र गुरुकुल आणि मदरसा होते. हिंदू गुरुकुल प्रणालीत विद्यार्थी वेद, वेदांग, गणित, तत्त्वज्ञान, नैतिक शिक्षण व जीवन कौशल्य शिकत असे. गुरुकुल प्रथेत शिक्षक (गुरू) आणि विद्यार्थी (शिष्य) यांच्यातील नाते अत्यंत महत्त्वाचे मानले जात असे, जिथे शिक्षण केवळ ज्ञानाचा प्रसार नव्हे तर नैतिक, सामाजिक व आध्यात्मिक मूल्यांचा विकास करण्याचे साधन होते.

मुस्लिम समाजात मदरसा प्रणाली विकसित झाली होती, जिथे धार्मिक शिक्षणासह कुराण, हदीस, फारसी आणि अरबी भाषा, तत्त्वज्ञान आणि प्रशासनाचे ज्ञान शिकवले जात असे. या पद्धतीने विद्यार्थ्यांना धार्मिक, बौद्धिक आणि प्रशासनिक कौशल्य मिळाले. तसेच शहरी भागांमध्ये खाजगी शिक्षण संस्था आणि व्यापारी वर्गासाठी व्यावसायिक शिक्षणाची व्यवस्था सुरू झाली.

शिक्षणाच्या माध्यमातून समाजात बौद्धिक प्रगती झाली आणि सांस्कृतिक व धार्मिक आदानप्रदान सुलभ झाले. गुरुकुल आणि मदरसा हे ज्ञानाचे केंद्र होते, जिथून संस्कृत, फारसी, अपभ्रंश, प्राकृत यांसारख्या भाषांचा अभ्यास होत असे. तसेच भक्ति साहित्य, सूफी गझल्स आणि तात्त्विक ग्रंथांच्या माध्यमातून समाजातील नैतिक, धार्मिक आणि बौद्धिक मूल्यांचा प्रसार झाला.

धार्मिक व सांस्कृतिक चळवळी: भक्ति चळवळ

मध्ययुगीन भारतीय समाजात धार्मिक चळवळींनी सामाजिक आणि सांस्कृतिक जीवनावर खोल प्रभाव टाकला. या काळात विशेषतः भक्ति चळवळ फार प्रसारित झाली, ज्याचा मुख्य उद्देश होता लोकांमध्ये ईश्वरभक्ती, नैतिक मूल्ये आणि सामाजिक समता यांचा प्रसार करणे. भक्ति चळवळीने जातिव्यवस्था, वर्णभेद आणि सामाजिक असमानता यांचा विरोध केला आणि व्यक्तीच्या अंतरात्म्याभिमुख धार्मिक अनुभवावर भर दिला.

भक्ति चळवळीच्या प्रवर्तकांनी धार्मिक सहिष्णुता, सामाजिक एकात्मता आणि नैतिक जीवन या मूल्यांना प्रमुख मानले. या चळवळीमुळे धार्मिक अनुभव फक्त मंदिरात किंवा उच्चवर्गीय समाजापुरता मर्यादित राहत नाही, तर सर्व समाजासाठी खुले आणि सर्वसमावेशक बनतो. भक्ति संतांनी लोकांच्या मातीतून लोकसाहित्य, भजन, कीर्तन आणि प्रवचन यांचा माध्यमातून लोकांपर्यंत संदेश पोहचवला.

कबीर या संताने समाजातील जातीय भेदभावावर जोरदार टीका केली. कबीर म्हणायचा की, जात, वर्ण किंवा सामाजिक स्तर यावर आधारित भेदभाव निरर्थक आहे आणि ईश्वरभक्ती ह्या सर्वसामान्य मूल्यांवर आधारित असावी. त्याच्या दोह्यांमध्ये सामाजिक समतेसाठी प्रेरक संदेश आहेत.

संत तुकाराम यांची अभंग रचना समाजातील गरीब आणि पिछडलेल्या लोकांपर्यंत ईश्वरभक्तीचा संदेश पोहचवण्यासाठी अत्यंत प्रभावी ठरली. तुकारामाने सामाजिक न्याय, भक्ती आणि नैतिक मूल्ये ह्या तीन पैलूंवर भर दिला, ज्यामुळे सामान्य माणसाला धर्म समजण्यास सुलभता मिळाली.

मीराबाई, कृष्णभक्त म्हणून प्रसिद्ध, हिने स्त्रियांच्या आध्यात्मिक मुक्तीसाठी भक्ति मार्गाचा प्रचार केला. मीराबाईच्या भजनांमध्ये स्त्रियांचे सामाजिक व धार्मिक बंधन मोडून स्वतःच्या भक्ती मार्गावर चालण्याचे प्रोत्साहन दिसते. तिच्या काव्यात सामाजिक समता, स्त्रियांच्या अधिकारांचे समर्थन आणि भक्तीचे सार्वत्रिक स्वरूप प्रतिबिंबित होते.

गुरु नानक, सिख धर्माचे संस्थापक, यांनी देखील भक्ति चळवळीला नवा आयाम दिला. गुरु नानकाने धर्मीय सहिष्णुता, जातीय भेद नाकारणे आणि सेवा (सेवा-समाज) यावर आधारित जीवन या तत्वांचा प्रचार केला. त्यांनी समाजात लोकसमानता आणि मानवतेवर आधारित अध्यात्मिक मूल्ये रुजवली.

भक्ति चळवळीचा परिणाम सांस्कृतिक जीवनावरही स्पष्ट दिसतो. अभंग, भजन, कीर्तन, गझल व नाटक या माध्यमातून धार्मिक संदेश सामान्य लोकांपर्यंत पोहचले. या चळवळीने साहित्य, संगीत आणि कला या क्षेत्रांचा प्रसार वाढवला, तसेच सामाजिक समता, मानवतावाद आणि नैतिक मूल्यांचा प्रसार साधला.

मध्ययुगीन भारतीय भक्ति चळवळीने समाजातील जातीय, सामाजिक आणि धार्मिक भेदभावावर विरोध केला, लोकांमध्ये धार्मिक अनुभव आणि ईश्वरभक्तीला सर्वसमावेशक बनवले, आणि सांस्कृतिक जीवनात नैतिकता, मानवता आणि सहिष्णुतेचा पाया घालला. संत कबीर, तुकाराम, मीराबाई आणि गुरु नानक यांसारख्या संतांनी भक्ति चळवळीच्या माध्यमातून समाज सुधारणा, धार्मिक समता आणि सांस्कृतिक समृद्धी साधली.

सूफी परंपरा

मध्ययुगीन भारतात सूफी परंपरा धर्म, समाज आणि संस्कृतीवर खोल प्रभाव टाकणारी ठरली. सूफी संतांनी प्रेम, सहिष्णुता, मानवता आणि बंधुभाव या मूल्यांचा प्रचार केला, ज्यामुळे समाजात धार्मिक सहिष्णुता आणि ऐक्य निर्माण झाले. सूफी चळवळीचा उद्देश फक्त आध्यात्मिक प्रगती नव्हे, तर समाजातील भेदभाव, जातीय भेद आणि धार्मिक संघर्ष कमी करून लोकांमध्ये सांस्कृतिक आणि धार्मिक समन्वय वाढवणे हा होता.

सूफी संतांचे जीवन हे सामाजिक सेवा, धार्मिक समर्पण आणि भक्तीपूर्ण जीवन यांचे उदाहरण होते. ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ती, अजमेर येथे, गरीब आणि गरजू लोकांशी निकट राहून सेवा, भक्ती आणि मानवतावादाचे संदेश पसरवले. त्यांचा संदेश असा होता की ईश्वरभक्ती कोणत्याही जाती, धर्म किंवा सामाजिक स्तराच्या लोकांसाठी खुली आहे.

निजामुद्दीन औलिया, दिल्ली येथे, सूफी परंपरेचा प्रसार करीत समाजातील सर्व वर्गांमध्ये सांस्कृतिक आणि धार्मिक ऐक्य प्रस्थापित केले. त्यांनी भक्ती आणि प्रेमाच्या माध्यमातून समाजातील लोकांमध्ये समानता, आपुलकी आणि धार्मिक संवाद यांचे महत्त्व अधोरेखित केले.

सूफी परंपरेने भक्ति चळवळीबरोबर धार्मिक समन्वय व सामाजिक एकात्मता वाढवली. सूफी दरगाह, भजन, काव्य, गझल आणि कीर्तन यांसारख्या माध्यमातून लोकांपर्यंत आध्यात्मिक संदेश पोहोचवला. यामुळे हिंदू आणि

मुस्लिम समाजामध्ये सांस्कृतिक आदानप्रदान वाढले आणि विविध धर्मीय समुदायांमध्ये सहिष्णुता व बंधुत्व प्रस्थापित झाले.

सारांशतः

सूफी परंपरेने मध्ययुगीन भारतात धार्मिक सहिष्णुता, सामाजिक समता आणि सांस्कृतिक ऐक्य या मूल्यांचा प्रसार केला. ख्वाजा मोईनुद्दीन चिश्टी आणि निजामुद्दीन औलिया यांसारख्या संतांनी भक्ती, प्रेम आणि मानवतेवर आधारित जीवनाचा मार्ग दाखवून समाजात स्थिरता आणि सांस्कृतिक समृद्धी साधली.

कला, साहित्य व स्थापत्य: स्थापत्यकला

मध्ययुगीन भारतात स्थापत्यकलेचा काळ सुवर्णकाळ मानला जातो. या काळात राजकीय, धार्मिक आणि सामाजिक गरजांसाठी भव्य वास्तूंचा विकास झाला, ज्यामध्ये मंदिरे, मशीद, किल्ले, महाल आणि स्मारके यांचा समावेश होता. स्थापत्यकलेत पारंपरिक भारतीय शैलीसोबत पर्शियन, इस्लामी आणि स्थानिक लोककला शैलीचा संगम दिसून येतो, ज्यामुळे स्थापत्यकलेत एक अनोखी मिश्रित शैली विकसित झाली.

या काळातील वास्तुकलेची वैशिष्ट्ये म्हणजे भव्यता, शिल्पकला, कोरीव नक्षीकाम, गुंबद आणि बागा-संरचना. स्थापत्य हे फक्त सौंदर्याचे प्रतीक नव्हे तर धार्मिक श्रद्धा, सामाजिक मूल्ये आणि प्रशासनाचे केंद्रही होते. स्थापत्यकलेत उपयोगलेले दगड, संगमरवरी काम, लाल विटा आणि काष्ठकाम यांमध्ये काळाची तांत्रिक प्रावीण्यता आणि सौंदर्यबोध स्पष्ट दिसतो.

ताजमहल (आग्रा) ही मुघल स्थापत्यकलेची सर्वोत्तम उदाहरणे आहे. या स्मारकात भारतीय आणि परशियन शैलींचा विलक्षण संगम दिसतो. ताजमहल केवळ प्रेमाचा प्रतीक नाही, तर स्थापत्यकलेतील नक्षीकाम, संगमरवरी काम आणि बागा-संरचना यांमुळे तांत्रिक कौशल्याचा उत्कृष्ट नमुना आहे.

कुतुब मिनार (दिल्ली) विजयी स्थापत्यकलेचे प्रतीक आहे. त्याची उंची, कोरीव नक्षीकाम आणि स्थापत्य सौंदर्य त्या काळातील तांत्रिक प्रावीण्य दर्शवते. हे स्मारक राजकीय व धार्मिक उद्देशांसाठी निर्माण केले गेले.

लाल किल्ला (दिल्ली) हा मुघल प्रशासनाचे महत्त्वाचे केंद्र होते. येथे राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जात, ज्यामुळे स्थापत्यकलेच्या माध्यमातून समाजाचे सांस्कृतिक जीवन प्रतिबिंबित झाले.

हुमायूँचा मकबरा बागा-संरचनात्मक शैलीचे महत्त्वाचे उदाहरण आहे. या मकबऱ्यात गुंबद, संगमरवरी शिल्पकला, बागा-तंत्र आणि वास्तुशास्त्रीय तंत्राचा अद्‌भुत संगम आहे.

या स्थापत्यकलेतून मध्ययुगीन भारतातील सांस्कृतिक समृद्धी, तांत्रिक कौशल्य, धार्मिक सहिष्णुता आणि प्रशासनिक प्रगल्भता स्पष्ट दिसते. स्थापत्यकला केवळ भव्यता किंवा सौंदर्याचे प्रतीक नसून, त्या काळातील समाज, धर्म, कला आणि सांस्कृतिक मूल्यांची झलक दर्शवते.

सारांशतः मध्ययुगीन स्थापत्यकलेत भारतीय परंपरा, परदेशी शैली, तांत्रिक कौशल्य, सांस्कृतिक समृद्धी आणि भव्य सौंदर्य यांचा विलक्षण संगम दिसतो. ताजमहल, कुतुब मिनार, लाल किल्ला आणि हुमायूँचा मकबरा यांसारख्या वास्तूंपासून त्या काळातील स्थापत्यकलेची प्रावीण्यता स्पष्ट होते.

निष्कर्ष

मध्ययुगीन भारतीय समाजाचा अभ्यास केल्यावर दिसून येते की हा समाज सामाजिक, धार्मिक, आर्थिक, सांस्कृतिक आणि बौद्धिक दृष्ट्या अत्यंत समृद्ध होता. सामाजिक रचना जातिव्यवस्था, सामाजिक स्तर, कुटुंब परंपरा, स्त्रिया व पुरुषांची भूमिका यावर आधारित होती, ज्यामुळे समाजात ठराविक स्थैर्य आणि सुव्यवस्था राखली गेली. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व शूद्र या वर्णांचा समाजातील स्थान स्पष्ट असल्यामुळे सामाजिक व्यवहार व नियम सुसंगत होते, तर ग्रामीण व शहरी जीवन वेगवेगळ्या आर्थिक आणि सामाजिक क्रियाकलापांवर केंद्रित होते.

धार्मिक आणि आध्यात्मिक जीवन समाजाचा मूलाधार ठरले. हिंदू भक्ती चळवळींनी समाजात नैतिक मूल्ये, सहिष्णुता आणि लोककल्याणाची भावना रुजवली, तर सूफी संतांनी प्रेम, बंधुभाव आणि सर्वसमावेशक धार्मिक दृष्टिकोन प्रसारित केला. या दोन चळवळींनी समाजातील धार्मिक समन्वय, सामाजिक ऐक्य आणि सांस्कृतिक आदानप्रदान वाढवले.

अर्थव्यवस्था कृषी, हस्तकला, उद्योग आणि आंतरराष्ट्रीय व्यापारावर आधारित होती. सिंचन, तलाव, पाटबंधारे आणि नद्यांचा उपयोग करून शेतीची उत्पादकता वाढवली गेली. उद्योग क्षेत्रातील कापड, हाते कामे,

मसाले, दागिने व लोहारकाम हे त्या काळातील आर्थिक समृद्धीचे प्रमुख घटक होते. आंतरराष्ट्रीय व्यापारामुळे भारताचा अरब, फारस, चीन आणि युरोपशी संबंध दृढ झाला.

कला, स्थापत्य आणि साहित्य या क्षेत्रात मध्ययुगीन भारत अत्यंत समृद्ध होते. भित्तिचित्रे, शिल्पकला, मंदिर व मशीद यांसारख्या स्थापत्यकलेत तांत्रिक कौशल्य, सौंदर्य आणि सांस्कृतिक समृद्धी दिसून येते. साहित्य क्षेत्रात संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश, हिंदी, फारसी, उर्दू आणि तमिळ भाषांमध्ये भक्ति साहित्य, काव्य, नाट्य आणि धर्मग्रंथांचा प्रसार झाला. शिक्षण गुरुकुल, मठ व मद्रसा या माध्यमातून धार्मिक, तात्त्विक आणि वैज्ञानिक ज्ञान प्रसारित केले गेले.

सारांशतः मध्ययुगीन भारतीय समाज हा वैविध्यपूर्ण, समृद्ध आणि सांस्कृतिक दृष्ट्या समृद्ध होता. विविध धर्म, कला, साहित्य, स्थापत्य आणि शिक्षण यांमुळे समाजाने ठोस सांस्कृतिक व बौद्धिक पाया निर्माण केला, जो पुढील काळातील भारतीय समाजासाठी मार्गदर्शक ठरला. या काळातील सामाजिक, धार्मिक, आर्थिक आणि सांस्कृतिक वैशिष्ट्यांचा अभ्यास केल्यास मध्ययुगीन भारताची व्यापक समृद्धी आणि वैविध्यपूर्णता स्पष्ट होते.

संदर्भसूची.

1. Chandra, Satish. History of Medieval India. Orient Blackswan, 2007.
2. Habib, Irfan. The Agrarian System of Mughal India. Oxford University Press, 2010.
3. Kulke, Hermann, and Dietmar Rothermund. A History of India. Routledge, 2004.
4. Sharma, R. Medieval India. NCERT, 2018.

जागतिकीकरणाचे भिषण वास्तव दाखवणारी कांदबरी: 'पखाल'

विलास रामेश्वर तनपुरे
सहा. शिक्षक, शेगाव
संषोधक विदयार्थी

बाबाराव मुसळे यांनी अनेक कांदबन्या लिहिल्यात. त्यांच्या पहिल्याच ग्रामीण कादंबरी 'हाल्या हसल्या दुभू दे' त्यांना एक सशक्त ग्रामीण कादंबरीकार म्हणून सर्वदूर पोहचविले. त्यांना कादंबरीकार म्हणून ओळख देण्यास ती एकच कादंबरी पुरेशी ठरली. मात्र त्यानंतर एकामागोमाग एक त्याच्या ग्रामीण कादंबऱ्या येत राहिल्या आणि ग्रामीण मराठी कादंबरीचे विश्व ते समृद्ध करत राहिले. त्यांची 'पखाल' ही सुद्धा याच प्रकारातील कादंबरी आहे. एकिकडे जागतिकीकरणाचा आपण सगळीकडे स्वागत करून आपण त्याला विकास हे गोंडस नाव दिले, दुसरीकडे या जागतिकीकरणाचे ग्रामीण जीवनावर गंभीर परिणाम झाले याचे वास्तव चित्रण या कादंबरीत केले गेले आहे. ही कादंबरी गावखेडयातील बलुतेदारी प्रथा आणि तिचे बदलते स्वरूप दाखवते. जागतिकीकरणाचा स्पर्श होण्यापासून खेडी स्वतःला फार दिवस वाचवू शकणार नव्हती. त्यातही गावखेडयातील एका वर्गाला या विकासाचे प्रचंड आकर्षण होते, तर एक वर्ग असा होता की त्याला गावातील सर्व व्यवस्था ही गुणदोषासंह जशास तशी राहावी असे वाटत होते. मात्र काळाची पावले कोणालाही रोखत येत नाहीत आणि ग्रामव्यवस्था अपरिहार्यपणे बदलत गेली. 'पखाल'च्या रूपाने विलुप्त होत असलेली किंवा पूर्णपणे विलुप्त झालेली गावातील बलुतेदारी प्रथा नव्या वाचकांच्या समोर लेखकाने लिलया उभी केली आहे.

'पखाल' ही ग्रामीण कादंबरी आहे आणि नावाप्रमाणेच ती 'पखाल' या एका पाणी भरण्याच्या चामड्याच्या वस्तूशी निगडीत आहे. या कादंबरीचे कथासूत्रच मुळात या चामड्याच्या वस्तूभोवती फिरते. कादंबरीतील एखादेच पान अभावाने पखालीचा उल्लेख आल्याविणा सुटले असेल. पुंजा हा महादजी कोळी जातीचा पखालजी या कादंबरीचा नायक आहे. अर्थातच त्याची पत्नी गिरजा ही ओघानेच या कथानकात नायिका ठरते. एखाद्या कथासुत्रात जसे नायक आवश्यक असतात तसे खलनायकही आवश्यक असतात. या कथानकात खरे तर पुंजाच्या गावचा सरपंच हा खलनायक वाटतो; परंतु कथानक जसे पुढे जात जाते तसे, सरपंचाचा भांऊ भावराव भांबळे हा कथानकात एक दृष्ट प्रवृत्तीचा खलनायक म्हणून समोर येतो. पुढे त्याचा मुलगा रूस्तुमा त्याची जागा घेतो. अशाप्रकारे एखाद्या चित्रपटातल्या कथेप्रमाणे या कादंबरीचे कथानक वाटते.

पुंजा हा या कथेचा नायक बारा बलुतेदारीतील एक बलुतेदार आहे आणि गावामध्ये प्रतिष्ठित कुणब्यांच्या घरी नदीवरून पखालीने पाणी भरणे हा त्याचा पिढीजात धंदा आहे. पुंजाला या कामाशिवाय कोणतेही काम जमत नाही आणि दुसरे एखादे काम करावे असेही त्याला वाटत नाही. तो त्याच्या पखालीच्या या व्यवसायात पुर्ण समाधानी असतो. गावातील ज्या निवडक लोकांच्या घरी तो पखाल टाकतो, त्या घरातून त्याला बलुतं मिळते. म्हणजे बलुत्याच्या स्वरूपात धान्य मिळते. मात्र याशिवाय रोज त्याला पखालीकरिता ज्या घरी पखाल टाकली त्या घरून भाकरी पखालीची भाकर मिळते. पुंजाचा हा धंदा अविरत चाललेला असतो. त्याच्या काही जातभाईंनी पखालीचा व्यवसाय सोडून दिला. काहींनी बलुतं सोडून रोखीने व्यवहार सुरू केले. मात्र पुंजाला पडलेल्या परंपरेत थोडाही बदल नको आहे. त्याची बायको गिरजा ही त्याला या धंद्यात लोकांच्या शेतातून म्हशींना भारा आणणे, गावातून भाकरी गोळा करणे अशाप्रकारे मदत करते. पुंजाला एक मुलगी आहे कचरी आणि दोन मुले आहेत, मोठा दगडू तर लहाना राजू. थोरल्या मुलाचे लग्न होते. त्याला पुंजाच्या मेव्हण्याचीच मुलगी सुमन ही केलेली असते. त्याचा मेव्हणा हरिभाऊ हा त्यांच्या जातीचा नेता आहे, मात्र त्याचे आणि पुंजाचे कधीच जमत नाही, पुंजाला त्याचा कोणताही सल्ला पटत नाही. दगडूला पुंजाने ज्याला त्यांने त्या पखालीच्या धंद्यापाई अडाणी ठेवले तरिही हरिभाऊने वचनात

बांधेल असल्याने आपली मुलगी सुमनचे लग्न दगडूशी लावून दिले. पण हरिभाऊशी पटत नसल्याने कित्येक दिवस पुंजा सूनेशी बोलला नाही. पण सुमन आपल्या सालस व नम्र स्वभावाने घरातील प्रत्येकाचे मन जिंकून घेतले आणि पुंजाच्या घरातील सुखदुःखाशी समरस झाली.

कथानकाच्या प्रारंभीच गावातील राजकारणाचा प्रवेश होतो. गावात भूतकाळातील काही कारणाने पडलेली दुही, पोलीस पाटील आणि सरपंच यांच्या दोन गटात गावाची झालेली विभागणी. पुंजाचा पोलीस पाटलाकडे असलेला कल याचे वर्णन येते. यासोबतच गावातील बुद्ध मंडळीवर पूर्वी झालेला अन्याय आणि बदलल्या काळात त्यांच्याकडे गावाच्या सत्तेच्या गेलेल्या चाव्या याचे चित्रण आलेले आहे. असे असले तरी गावातील जातीभेद मात्र अजूनही कायम आहे. केवळ गावातील दलितांवर आता अन्याय करण्याची कोणाची प्राज्ञा होत नाही. उलट दलितच गावावर सत्ता गाजवू लागले आहेत. एकोप्याने त्यांनी राजकारणात आपले स्थान मजबूत केले. कायद्याने मिळालेल्या संरक्षणाचा त्यांनी योग्य फायदा घेतला. मात्र जात नाही जात या न्यायाने जातीभेद कायमच आहे. अजूनही पुंजा सारखा बलुतेदार दलिताच्या घरी पाणी पखाल देत नाही. त्याला आपली जात त्याच्या जातीपेक्षा श्रेष्ठ वाटते. हा दलित- सवर्ण संघर्ष कोणत्याही ग्रामीण कादंबरीचा अविभाज्य भाग आहे; तो याही कादंबरीत येऊन जातो.

कादंबरीचे एक वैशिष्ट्य म्हणजे मुख्य कथानकाच्या जोडीने अनेक येणारी उपकथानके ठिकाणी पहावयास मिळातात. जसे पुंजाचा चुलता जानूची कहाणी, पांडेबुवाच्या गावाची कथा, दगडूच्या लग्नाची कथा अशी अनेक उपकथानके या कादंबरीत येतात आणि ती मुख्य कथानकांचा भाग बनून जातात. त्यांची मुख्य कथानकातील सरमिसळ लेखकाने इतकी नकळत केली आहे, की ही उपकथानके आहेत याचा विसर पडातो.

गाव म्हटले की गावात भांडणं आलीच. त्या भांडणांना अनेक निमित्ये कारणीभूत ठरतात. कधी शेताची भांडणे, तर कधी वाटणीची भांडणे. गावातील ही भांडणे शक्यतोवर भावकीतच असतात. याही गावामध्ये भांबळे मंडळींचे वतनदारांचे हे गाव. मात्र भांबळेमध्ये सरंपच आणि गावचे पोलीस पाटील दशरथ पाटील यांच्यात तीन पिढ्यांपासून चालत आलेली दुही आहे. स्वाभाविकपणे गावातील अर्धी मंडळी सरपंचाच्या आणि अर्धी पाटलाच्या बाजूने आहे. गावाची सत्ता सरपंचाच्या हातात आहे, तर पोलीस स्टेशनच्या कामामध्ये पाटलाचा दरारा आहे. सरपंच आणि पाटलाच भांडणही असेच धुऱ्याच्या भांडणावरून झाले, त्यात सरपंचाच्या पणजाने दशरथ पाटलाच्या पणज्याच्या संख्या भावाला डोक्यात दगड घालून ठार केलेले. हे वैर आता तिसऱ्या पिढीत आलेले.

ही कादंबरी म्हणजे गावसंस्कृतीचे एक उत्तम उदाहरण आहे. कादंबरीच्या कथानकाच्या ओघाने गावातील संस्कृती जागोजागी बघावयास मिळते. गावातील सर्व जातीधर्माचे लोक एकमेकांशी काहीना काही नाते लावून बोलतात. जसे गोविंदा भांबळया नेहमी गिरजाची भावजय म्हणून दिल्लगी करतो. गावातील सूना पुंजाला 'मामाजी' म्हणतात. तर तोही त्यांना 'सूनबाई' म्हणून आवाज देतो. गावातील सर्वच अबाल वृद्धांच एकमेकांशी असे मानलेले नाते पाहावायास आहे. याशिवाय पेरणीची लगबग, शेतातील कामे, आखाडात झोपडे शेकारणे, टिनपत्रे फेरणे इत्यादी कामाची एक जंत्रीच कादंबरीकाराने दिलेली आहे.

कादबरीच्या कथानकात एक नायक असतो. या कादंबरीचा पुंजा नायक आहे. तो अत्यंत सरळमार्गी आहे. त्यांचे जीवन म्हणजे 'पखाल' आहे, त्याची पखाल आणि ज्या म्हशीच्या पाठीवर तो पखाल वाहतो ती म्हैस, नदी किंवा पाणी भरण्याची विहिर एवढेच त्यांचे विश्व आहे. मात्र या पखालीच्या निमित्ताने त्याला रामप्रहरात गावात फिरावे लागते, अनेकदा त्याला गावातील स्त्रियांना पखाल घेण्यासाठी रामप्रहरी आवाज देवून जागे करावे लागते, अशावेळी नवीन लग्न झालेल्या स्त्रियांची लवकर उठावे लागल्याने हाणारी तारांबळ त्याच्या अनुभवास येते. भागी भाबंळीनसारख्या चुकीच्या वळणाच्या बायकांशी सुद्धा त्यांचा संपर्क येतो. अशावेळी त्याची अनेकदा चिडचिड होते, परंतु तो संयमाने आपली पखाल वाहण्याचे काम करतो. त्या बदल्यात त्याला जी रोजची भाकरी मिळते,तीही वेगवेगळया प्रकारची असते. कोणी त्याला करपलेली भाकरी देते, कोणी शिळी देते, कोणी उपकार केल्याप्रमाणे देते. त्याला मिळणाऱ्या बलूत्याचेही असेच असते. ज्वारी भिजली तर 'बलुतं घेऊन जा' म्हणुन कुणबी घाई करतात आणि

ज्वारी चांगली असली तर 'पुढच्या वर्षी देऊ' म्हणुन टाळाटाळ करतात. मात्र अनेकदा त्याला माणूसकीचेही दर्शन होते. मात्र त्याच्या संथ चालत असलेल्या जीवनता अचानक नळयोजनेमुळे संघर्ष उभा राहतो. वास्तविक नळयोजना बदलत्या काळात अपरिहार्य बाब असली, तरी त्या नळयोजनेला बंद पाडण्यासाठी पुंजा मनातल्या मनात अनेक मनोराज्ये उभी करतो. ज्या प्रत्यक्षात कधीच उतरणार नाहीत, अशा अवास्तव कल्पना करतो. या बाबतीत लेखक पुंजाचे मनोविश्लेषण करण्यात अत्यंत यशस्वी झाला आहे. मनोविश्लेषणाच्या बाबतीत कादंबरीत गिरजाचीही स्वगते अनेक ठिकाणी येतात. पुंजा कितिही चुकीचे वागला, तरी गिरजा त्याला समजूनच घेते. तिच्या मनात चालणारे विचार अनेक ठिकाणी कादंबरीत येऊन जातात. दगडूची बायको सुमनचे नवीन लग्न झाल्यानंतर संभाव्य प्रणयाबाबतचे विचार कादंबरीत येतात. पुंजा घर सोडून गेल्यानंतर दगडूच्या मनातीलही विचार कादंबरीत येतात. मात्र कादंबरीत सर्वाधिक मनोविचार हे पुंजा आणि गिरजाचेच येतात. पुंजा तर देव, धर्म, त्याची म्हैस, यांच्याबाबत विचार करतो. नळ योजनेला कसे थांबवता येईल याचाच सदोदित विचार करतो. या सर्व पात्रांची वेगवेगळी मनोदशा चितारतांना या पात्रांमध्ये लेखकाला एकप्रकारे काया प्रवेशच करावा लागला असणार.

कादंबरीला जसा नायक जरूरी असतो, तशी खलनायकाशिवाय ती खुलत नाही. या कादंबरीचा खलनायक हा सरपंच आहे. त्याने गावाच्या भल्यासाठी आणलेली विकासाची बाब असलेली नळयोजना आणि तीच कादंबरीचा नायक असलेल्या पुंजाला खलनायकी स्वरूपाची वाटते आणि नकळत वाचक म्हणून आपणही कधी पुंजाच्या बाजूने उभे राहतो ते आपल्यालाही कळत नाही. ही या कादंबरीच्या निवेदनशैलीची खरी ताकद आहे. सुरूवातीला खरा खलनायक सरपंच वाटतो; परंतु पुढे पुढे त्याचा भाऊ भावराव हा खलनायक म्हणून पुढे येतो. त्याहीपुढे त्यांचा मुलगा रूस्तुमासुद्धा खलनायक म्हणून पुढे येतो. भावराव पुंजाला बलुतं देत नाही. मुलीच्या लग्नात जबरदस्तीने पखाली आणण्यास सांगून आहेर देत नाही. कर्मधर्मसंयोगाने रूस्तूमाकडून गणेशला पुरात जाण्यास प्रोत्साहन दिले जाते आणि दगडू कारण नसतांना रूस्तूमाच्या जेलमध्ये जाण्यास कारण ठरतो. ही घटना भावराव आणि पुंजात असलेले वैर आणखीच चिघळवते. सरपंचाने रघ्या नावाचा गावगुंड पाळलेला असतो. त्याच्या वर्तनाची अनामिक भिती गिरजाला आणि पुंजालाही सातत्याने सतावते. गिरजाचा भाऊ, सुमनचा बाप हरिभाऊ याचा गिरजाला प्रत्येक प्रसंगात आधार वाटत असतो, तोच माणूस पुंजाचा नावडता माणूस असतो. त्याचा कोणताही सल्ला पुंजाला मान्य नसतो, कारण त्याचे सल्ले हे पखालीच्या विरोधात जाणारे वाटतात आणि पुंजा पखालीच्या विरोधात जायला अजिबात तयार होत नाही.

गावातील राजकारणाचा एक भाग म्हणून पुंजा दशरथ पाटलाच्या बाजूचा असल्याने, सरपंच त्याला प्लॉट मिळू देत नाही. नळयोजना गावात येऊन पुंजाचा पखालीचा धंदा लवकर बंद पडावा म्हणून अधिकचे प्रयत्न करतो. त्यांचा भाऊ भावराव पुंजाच्या म्हशी चोराकरवी चोरून नेण्याचा प्रयत्न करतो. दशरथ पाटील ते प्रयत्न हाणून पाडतात. दगडूचं लग्न झाल्यावर पुंजा आणि गिरजा शंकर भांबळेच्या एका खोलीत झोपायला जात असतात. पण भावराव, शंकर भांबळेच्या जावयाकडून शंकर भांबळेवर दबाव आणून त्याला ती खोली सोडायला भाग पाडतो.दशरथ पाटील गणेशच्या प्रकरणात पुंजाला पोलीस स्टेशनच्या भानगडीत मदत करतात. त्यांची पत्नी रेणू पाटलीण गिरजाला सतत आधार देते. कादंबरीचा कळस म्हणजे नळयोजना गावात येते, तेव्हा पुंजा त्या नळयोजनेलाच आपला शत्रु समजायला लागतो, नव्हे नळयोजनेशी जोडलेला प्रत्येक घटक त्याला शत्रू वाटायला लागतो. याच मानसिकतेतून तो नळयोजनेच्या कामावर आलेली एक स्त्री त्याच्याकडे पाहून हसते, तेव्हा तिला तिच्या नवऱ्याकडून मार खायला घालतो. मात्र जेव्हा त्याला कळते, की आपण तिच्या बापासारखे दिसतो म्हणून ती आपल्याकडे पाहून हसत होती; तेव्हा त्याला त्या गोष्टीचे अतिशय वाईट वाटते. हा एक भावनिक, हळवा प्रसंग लेखकाने उभा केला आहे. पुंजा गावात आलेल्या साहेब लोकांची गाडी जाणीवपुर्वक रस्त्यात म्हैस उभी करून आडवतो आणि त्या साहेबांचा पाठलाग करतो हा प्रसंग एकाचवेळी कारुण्य आणि हास्य निर्माण करतो. पुंजा नळयोजना गावात आल्याने इतका पिसाळून जातो की, त्याला आता वेड लागले आहे असे गावकरी म्हणायला लागतात. त्याला

चिडवतात, मात्र अशाही वेळी त्याला शिवाराम गोळ्याची सून अतिशय चांगली वागणूक देते. त्याला भाकर देते, उलट परसा भांवळ्याची बायको परभी आणि सून त्याला टाकून बोलतात. अशा कटू प्रसंगातून त्याला जावे लागते. तो चांभाराकडे पखाल शिवायला गेल्यावर चांभाराकडून त्याला वाईट वागणूक मिळते. चांभार त्याच्याकडून इंधन फोडून घेतो. हा प्रसंग गाडगेबाबांच्या चरित्रात येऊन गेलेल्या पत्रवाचनाच्या एका प्रसंगाची आठवण करून देतो.

पुंजाला त्याचा समाज कुठे चालला आहे याचे काहीही देणेघेणे नसते. त्याचे जीवन सर्वस्व ही पखालच असते. आपली पारंपारिक पखाल बंद होऊ नये असे त्याला मनोमन वाटते. त्यासाठी त्याच्या मनात अनेक वाईट विचारांचेही थैमान सुरू असते. नळयोजनेचा तो इतका कट्टर शत्रू बनतो की, गिरजाने नळावर पाणी भरले म्हणून तो तिला जीवघेणी मारहाण करतो. मध्ये पडलेल्या सुमनच्याही पोटात लाथ मारतो. त्यामुळे सुमनचा गर्भपात होतो. गिरजा तिला माहेरी पाठवते तेव्हा तो तिच्या माहेरी जावून तिचे पाय धरून माफी मागतो. या ठिकाणी त्याच्यातल्या हळव्या माणासाचे दर्शन होते. आयुष्यात हरिभाऊपुढे रगीने राहिलेल्या पुंजाला पहिल्यांदाच हरिभाऊच्या नजरेला नजर देण्याची लाज वाटते म्हणून त्याची भेट न घेताच तो गावाकडे परततो. आपणही चांभाराप्रमाणे आपल्या मुलाला दगडूला शिकवायला पाहिजेत होते असे त्याला वाटू लागते. अखेर दगडूला मुंबईला जाण्यापासून रोखणारा पुंजा स्वतःच त्याला मुंबईला जाण्याचा आग्रह धरतो. या कादंबरीचे संपूर्ण कथानक पखाल या वस्तूभोवती फिरत असते त्यामुळे कादंबरीला दिलेले 'पखाल' हे शिर्षक अतिशय समर्पक ठरते. पुंजाची पखाल बंद पडल्याचे दुःख केवळ पुंजा आणि कादंबरीच्या वाचकालाच होते. झाले तर काहीसे ते गिरजाला होते. मात्र तिने वास्तवाचा स्वीकार केलेला असतो, नळयोजना अपरिहार्य परिवर्तन आहे हे ती स्वीकारून पुढे चालते; पण पुंजाचे दुःखणे वेगळेच आहे. नको असलेल्या वास्तवाचा स्वीकार करायला त्याचे मन तयार होत नाही, परिणामी त्याची अवस्था भ्रमिष्टासारखी होते. त्याचे दु:ख अधिक खोल बनते.

जगामध्ये 1750 च्या दरम्यान औद्योगिक क्रांती झाली या औद्योगिक क्रांतीने जगामध्ये यांत्रिकीकरण आणले आणि यांत्रिकीकरणामुळे कुटीर व लघुउद्योग नष्ट झाले. ब्रिटिश काळात भारतीय खेड्यातील स्वयंपूर्णता नष्ट झाली. समृद्ध एकक असलेली खेडी जागतिकीकरणाचा एक भाग बनली. स्वातंत्र्यानंतर भारतीय ग्रामीण व्यवस्थेचा कणा असलेली बलुतेदारी व्यवस्था पार कोलमडली. जागतिकीकरणाने या व्यवस्थेला अखेरचा धक्का दिला. ज्या बलुतेदारांनी काळाची पाऊले ओळखून आपल्या व्यवसायाला आधुनिकीकरणाची जोड दिली, यांत्रिकीकरण स्वीकारले, शहराची वाट धरली ते या व्यवस्थेमध्ये तरले. मात्र ज्यांच्या व्यवसायामध्ये यांत्रिकीकरणाला वाव नव्हता, ज्यांना यांत्रिकीकरण स्वीकारता आले नाही अशांचे व्यवसाय या नव्या व्यवस्थेमध्ये पार बुडाले आणि हे लोक देशोधडीला लागले.'पखाल' या कादंबरीने अशाच एका बलुतेदाराची प्रतिनिधिक शोकांतिका मांडली आहे. या जागतिकीकरणात किंवा आधुनिकीकरणात ज्यांचा व्यवसाय पार रसातळाला गेला अशा बलुतेदाराचे दुःख ही कादंबरी मांडते या बलुतेदारांचे व्यवसायच नाही, तर त्यांचे भावविश्व सुद्धा या जागतिकीकरणाने संपवले याचे विदारक चित्र कादंबरीकार ज्या पद्धतीने मांडतो त्यामुळे आपल्याला जागतिकीकरणाचे भयानक वास्तव जवळून कळल्यावाचून राहत नाही

शिक्षक शिक्षणामध्ये इ-लर्निंग आणि डिजिटल शिक्षणाचा विद्यार्थ्यांच्या स्व संकल्पनेवर होणारा परीणाम: एक अभ्यास

डॉ. शर्मिला देविदास बावस्कार

सहाय्यक प्राध्यापक,

सावित्रीबाई फुले शिक्षण महाविद्यालय, अकोट, जि.अकोला.

प्रस्तावना:

शिक्षक शिक्षणामध्ये डिजिटल शिक्षण आणि ई-लर्निंगचा वापर केवळ काळाची गरज नसून ती एक शैक्षणिक क्रांती आहे. तंत्रज्ञानाच्या मदतीने शिक्षणाची व्याप्ती विस्तारली असून, त्याचा शिक्षकांच्या अध्यापन पद्धतीवर आणि विद्यार्थ्यांच्या मानसशास्त्रीय पैलूंवर, विशेषतः 'स्व-संकल्पनेवर' (Self-Concept) मोठा परिणाम होत आहे.

१. शिक्षक शिक्षणामध्ये डिजिटल शिक्षणाची उपयुक्तता:

डिजिटल साधनांमुळे शिक्षक प्रशिक्षणाचा दर्जा सुधारण्यास मदत झाली आहे.

- **अद्ययावत ज्ञानाची उपलब्धता:**

ई-लर्निंगमुळे शिक्षकांना जागतिक स्तरावरील नवीन शोध, अध्यापन पद्धती आणि अभ्यासक्रम एका क्लिकवर उपलब्ध होतात.

- **लवचिकता (Flexibility):**

शिक्षक आपल्या वेळेनुसार आणि गतीनुसार कोर्सेस (उदा. MOOCs, SWAYAM) पूर्ण करू शकतात.

- **प्रभावी सादरीकरण:**

चित्रे, व्हिडिओ, ॲनिमेशन आणि सिम्युलेशनच्या वापरामुळे कठीण संकल्पना सोप्या करून सांगणे शिक्षकांना शक्य झाले आहे.

- **सहयोग आणि नेटवर्किंग:**

विविध चर्चासत्रे (Webinars) आणि ऑनलाईन प्लॅटफॉर्ममुळे जगभरातील तज्ज्ञ शिक्षकांशी संवाद साधता येतो.

३. डिजिटल शिक्षणाचे स्वरूप आणि घटक:

- LMS (Learning Management System) अभ्यासक्रम व्यवस्थापन आणि प्रगतीचा मागोवा घेण्यासाठी.
- Multimedia Tools क्लिष्ट विषय दृकश्राव्य माध्यमातून समजून घेण्यासाठी.
- Virtual Classrooms भौगोलिक सीमा ओलांडून तज्ज्ञांकडून शिकण्यासाठी.
- Assessment Tools तात्काळ निकाल आणि फीडबॅक मिळवण्यासाठी.

डिजिटल शिक्षण (Digital Education) ही एक आधुनिक शिक्षण पद्धती आहे, ज्यामध्ये माहिती आणि तंत्रज्ञानाचा (ICT) वापर करून अध्यापन आणि अध्ययन प्रक्रिया पूर्ण केली जाते. सोप्या भाषेत सांगायचे तर, पारंपारिक खडू आणि फळा यांच्या पलीकडे जाऊन संगणक, इंटरनेट आणि डिजिटल साधनांच्या मदतीने ज्ञान मिळवणे म्हणजे डिजिटल शिक्षण. या संकल्पनेचे मुख्य पैलू खालीलप्रमाणे आहेत:

१. डिजिटल शिक्षणाचे स्वरूप:

डिजिटल शिक्षण हे केवळ ऑनलाईन क्लासपुरते मर्यादित नसून त्यात खालील गोष्टींचा समावेश होतो:

ई-लर्निंग (E-learning): इंटरनेटच्या माध्यमातून कोर्सेस पूर्ण करणे.

मिश्र शिक्षण (Blended Learning): प्रत्यक्ष वर्गातील शिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण यांचा मेळ.

मोबाईल लर्निंग (M-learning): शैक्षणिक ॲप्स आणि स्मार्टफोनद्वारे कोठेही आणि कधीही शिकणे.

२. मुख्य साधने (Digital Tools):

डिजिटल शिक्षण यशस्वी करण्यासाठी खालील साधनांची मदत घेतली जाते:

- हार्डवेअर: लॅपटॉप, टॅब्लेट, स्मार्ट बोर्ड आणि प्रोजेक्टर.
- सॉफ्टवेअर/ॲप्स: Google Classroom, Zoom, Microsoft Teams, आणि विविध शैक्षणिक ॲप्स (उदा. BYJU'S, Khan Academy).
- डिजिटल साहित्य: ई-बुक्स, शैक्षणिक व्हिडिओ (YouTube), ऑडिओ पॉडकास्ट आणि ॲनिमेटेड सिरीज.

३. डिजिटल शिक्षणाचे फायदे:

लवचिकता: विद्यार्थी आपल्या सवडीनुसार आणि गतीनुसार (Self-paced) शिकू शकतात.

अद्ययावत माहिती: पुस्तकातील माहिती जुनी होऊ शकते, पण डिजिटल माध्यमावर दररोज नवीन माहिती अपडेट होते.

दृश्य परिणाम: क्लिष्ट वैज्ञानिक प्रयोग किंवा ऐतिहासिक घटना ॲनिमेशनद्वारे पाहिल्यामुळे जास्त काळ लक्षात राहतात.

कमी खर्च: प्रवास खर्च वाचतो आणि अनेक जागतिक दर्जाचे कोर्सेस कमी शुल्कात उपलब्ध होतात.

४. डिजिटल शिक्षणातील शिक्षकाची भूमिका;

डिजिटल युगात शिक्षकाची भूमिका 'माहिती देणारा' यापेक्षा 'मार्गदर्शक' (Facilitator) म्हणून अधिक महत्त्वाची ठरते.

- योग्य डिजिटल साहित्य निवडणे.
- विद्यार्थ्यांना तंत्रज्ञानाचा सुरक्षित वापर शिकवणे.
- विद्यार्थ्यांच्या शंकांचे ऑनलाईन निरसन करणे.

ई-लर्निंग (E-Learning):

ई-लर्निंग (E-Learning) किंवा 'Electronic Learning' म्हणजे इलेक्ट्रॉनिक तंत्रज्ञान आणि माध्यमांचा वापर करून प्राप्त केलेले शिक्षण. ही डिजिटल शिक्षणाचीच एक प्रमुख उपशाखा आहे, जी प्रामुख्याने इंटरनेट आणि संगणकीय साधनांवर आधारित असते. या संकल्पनेचे सखोल विश्लेषण खालील मुद्द्यांनुसार करता येईल:

१. ई-लर्निंगची व्याख्या:

जेव्हा अध्यापन आणि अध्ययन प्रक्रिया प्रत्यक्ष वर्गाच्या भिंतीबाहेर, इंटरनेट, नेटवर्क आणि स्टोरेज मीडियाच्या (CD, Pen drive, Cloud) सहाय्याने पार पडते, तेव्हा त्याला ई-लर्निंग म्हणतात. यात शिक्षक आणि विद्यार्थी एकाच वेळी एकाच ठिकाणी असणे अनिवार्य नसते.

२. ई-लर्निंगचे मुख्य प्रकार:

ई-लर्निंग प्रामुख्याने दोन पद्धतींनी चालते:

तुल्यकालिक (Synchronous): यात शिक्षक आणि विद्यार्थी 'रिअल-टाइम'मध्ये ऑनलाईन संवाद साधतात. उदा. Zoom मीटिंग, Google Meet, लाईव्ह वेबिनार.

अतुल्यकालिक (Asynchronous): यात शिक्षण साहित्य आधीच रेकॉर्ड केलेले असते. विद्यार्थी त्यांच्या सवडीनुसार ते पाहू शकतात.

उदा. YouTube व्हिडिओ, ईमेल, रेकॉर्ड केलेले कोर्सेस (Udemy, Coursera).

३. ई-लर्निंगचे प्रमुख घटक (Components):

ई-लर्निंग प्रभावी होण्यासाठी खालील गोष्टींची आवश्यकता असते:

LMS (Learning Management System): जसे की Google Classroom किंवा Moodle, जिथे अभ्यासक्रम, असाइनमेंट आणि निकाल व्यवस्थापित केले जातात.

डिजिटल साहित्य (Content): पीडीएफ नोट्स, ई-बुक्स, व्हिडिओ लेक्चर्स आणि ॲनिमेशन.

मूल्यमापन (Assessment): ऑनलाईन क्विझ (Quizzes), गुगल फॉर्म्स आणि ऑटो-ग्रेडिंग सिस्टिम.

संवाद साधने: चॅट बॉक्स, डिस्कशन फोरम्स आणि ईमेल.

४. ई-लर्निंगची वैशिष्ट्ये:

कोठेही आणि कधीही (Anytime, Anywhere): भौगोलिक सीमांचे बंधन राहत नाही. ग्रामीण भागातील विद्यार्थीही जागतिक दर्जाच्या विद्यापीठातून शिकू शकतो.

- गतीची निवड (Self-Paced): जर एखादी संकल्पना समजली नाही, तर विद्यार्थी व्हिडिओ पुन्हा पुन्हा पाहू शकतो.
- खर्च बचत: कागद, छपाई, प्रवास आणि राहण्याचा खर्च मोठ्या प्रमाणात कमी होतो.
- अद्ययावतता: माहितीमध्ये बदल झाल्यास ती त्वरित अपडेट करता येते, जे छापील पुस्तकांच्या बाबतीत कठीण असते.

५. ई-लर्निंग व डिजिटल शिक्षणातील आव्हाने :

डिजिटल शिक्षण (Digital Education) आजच्या काळाची गरज असली, तरी त्यात अनेक आव्हाने (Challenges) आहेत. मराठीत 'डिजिटल शिक्षणातील आव्हाने' खालील मुद्द्यांच्या आधारे समजून घेता येतील:

१. तांत्रिक सोयीसुविधांचा अभाव (Lack of Infrastructure):

ग्रामीण आणि दुर्गम भागांत अजूनही वीज आणि इंटरनेटची मोठी समस्या आहे.

इंटरनेट कनेक्टिव्हिटी: अनेक ठिकाणी हाय-स्पीड इंटरनेट उपलब्ध नाही, ज्यामुळे व्हिडिओ लेक्चर्समध्ये अडथळे येतात.

साधनांची कमतरता: सर्वच विद्यार्थ्यांकडे स्मार्टफोन, लॅपटॉप किंवा टॅबलेट नसतात. एकाच घरात दोन-तीन मुले असल्यास एकाच फोनवर सर्वांचे शिक्षण होणे कठीण जाते.

२. डिजिटल साक्षरता (Digital Literacy):

- केवळ विद्यार्थ्यांकडे गॅजेट्स असून चालत नाही, तर ते वापरण्याचे कौशल्यही हवे.

- **शिक्षकांसाठी आव्हान**: अनेक अनुभवी शिक्षकांना नवीन तंत्रज्ञान, ॲप्स आणि ऑनलाइन टूल्स वापरण्यात अडचणी येतात.
- **पालकांचा सहभाग**: ग्रामीण भागातील किंवा कमी शिकलेल्या पालकांना मुलांना डिजिटल अभ्यासात मदत करणे कठीण जाते.

३. एकाग्रता आणि मानसिक आरोग्य:

वर्गातील प्रत्यक्ष शिक्षणापेक्षा स्क्रीनसमोर बसून शिकणे वेगळे असते.

- **लक्ष विचलित होणे**: सोशल मीडिया, गेम्स आणि नोटिफिकेशनमुळे विद्यार्थ्यांचे अभ्यासावरून लक्ष सहज उडते.
- **सामाजिक संवाद कमी होणे**: शाळेत मुलांचा एकमेकांशी जो संवाद होतो, तो डिजिटल शिक्षणात हरवतो, ज्यामुळे मुलांमध्ये एकटेपणा वाढू शकतो.
- **शारीरिक समस्या**: सतत स्क्रीनकडे पाहिल्यामुळे डोळ्यांचे विकार, पाठदुखी आणि व्यायामाचा अभाव यांसारख्या समस्या उद्भवतात.

४. मूल्यमापन आणि शिस्त (Assessment & Discipline):

- **परीक्षेतील पारदर्शकता**: ऑनलाइन परीक्षांमध्ये गैरप्रकार रोखणे हे मोठे आव्हान आहे. विद्यार्थ्याने स्वतः अभ्यास केला आहे की कॉपी केली आहे, हे समजणे कठीण जाते.
- **स्वयं-शिस्त**: प्रत्यक्ष शिक्षक समोर नसल्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये हवी तशी शिस्त राहत नाही.

५. अभ्यासक्रमाचे स्वरूप:

सर्वच विषय (उदा. विज्ञान प्रयोग, क्रीडा, चित्रकला) ऑनलाइन पद्धतीने प्रभावीपणे शिकवता येत नाहीत. प्रयोगशाळेत जाऊन मिळणारा अनुभव मोबाईल स्क्रीनवर मिळू शकत नाही.

स्व-संकल्पना' (Self-Concept):

स्व-संकल्पना' (Self-Concept) ही मानसशास्त्रातील एक अत्यंत महत्त्वाची आणि व्यापक संकल्पना आहे. सोप्या भाषेत सांगायचे तर, "स्वतःबद्दलची स्वतःची धारणा किंवा प्रतिमा" म्हणजे स्व-संकल्पना होय.

"मी कोण आहे?", "माझ्या क्षमता काय आहेत?", आणि "माझे इतरांच्या नजरेत काय स्थान आहे?" या प्रश्नांची उत्तरे शोधताना जी प्रतिमा आपल्या मनात तयार होते, तिलाच स्व-संकल्पना म्हणतात.

स्व-संकल्पनेचे मुख्य तीन भाग (Components)

प्रसिद्ध मानसशास्त्रज्ञ कार्ल रॉजर्स (Carl Rogers) यांच्या मते, स्व-संकल्पनेचे तीन महत्त्वाचे घटक आहेत:

१. स्व-प्रतिमा (Self-Image)

तुम्ही सध्या स्वतःला कसे पाहता? यात तुमच्या शारीरिक वैशिष्ट्यांचा (उंच, सावळा, देखणा) आणि तुमच्या सामाजिक भूमिकांचा (विद्यार्थी, मुलगा/मुलगी, खेळाडू) समावेश होतो.

उदाहरण: "मी एक प्रामाणिक विद्यार्थी आहे."

२. स्व-आदर / स्वाभिमान (Self-Esteem)

तुम्ही स्वतःला किती महत्त्व देता किंवा स्वतःवर किती प्रेम करता? यात स्वतःचे मूल्यमापन केले जाते.

उच्च स्वाभिमान: स्वतःच्या गुणांवर विश्वास असणे.

कमी स्वाभिमान: सतत स्वतःतील दोष शोधणे किंवा न्यूनगंड बाळगणे.

३. आदर्श स्व (Ideal Self)

तुम्हाला भविष्यात 'काय' बनायला आवडेल? तुमच्या मते तुमची सर्वोत्तम आवृत्ती कोणती असेल? जर तुमची 'स्व-प्रतिमा' आणि 'आदर्श स्व' यामध्ये जास्त अंतर असेल, तर मानसिक तणाव निर्माण होऊ शकतो. पण जर ही दोन्ही जवळ असतील, तर व्यक्ती समाधानी असते.

स्व-संकल्पनेवर परिणाम करणारे घटक:

१. कौटुंबिक वातावरण: लहानपणी आई-वडील आणि कुटुंबाकडून मिळणारे प्रोत्साहन किंवा टीका.

२. सामाजिक अनुभव: मित्रमंडळी आणि समाजातील लोकांकडून मिळणारी वागणूक.

३. शिक्षण: शिक्षकांचे मार्गदर्शन आणि शैक्षणिक यश-अपयश.

४. डिजिटल माध्यम: आजच्या काळात सोशल मीडिया आणि ई-लर्निंगमुळे विद्यार्थी स्वतःची तुलना इतरांशी करतात, ज्याचा परिणाम त्यांच्या स्व-संकल्पनेवर होतो.

स्व-संकल्पनेचे प्रकार:

शैक्षणिक स्व-संकल्पना: अभ्यासात मी किती हुशार आहे?

सामाजिक स्व-संकल्पना: माझे इतरांशी संबंध कसे आहेत? मी लोकांशी नीट बोलू शकतो का?

शारीरिक स्व-संकल्पना: मी दिसायला कसा आहे? माझे आरोग्य कसे आहे?

जेव्हा एखादा विद्यार्थी डिजिटल शिक्षण घेतो, तेव्हा त्याला नवनवीन तंत्रज्ञान जमू लागते. या यशामुळे त्याची 'शैक्षणिक स्व-संकल्पना' सुधारते आणि त्याला स्वतःबद्दल अभिमान वाटू लागतो. मात्र, जर त्याला तांत्रिक अडचणी आल्या, तर तो स्वतःला 'अक्षम' समजू शकतो, ज्यामुळे स्व-संकल्पना नकारात्मक होऊ शकते

ई-लर्निंग आणि डिजिटल शिक्षणाचा विद्यार्थ्यांच्या स्व संकल्पनेवर होणारा परीणाम

ई-लर्निंग आणि डिजिटल शिक्षणाचा विद्यार्थ्यांच्या 'स्व-संकल्पनेवर' (Self-Concept) होणारा परिणाम हा मानसशास्त्रीय आणि शैक्षणिक दृष्टिकोनातून अत्यंत महत्त्वाचा विषय आहे. 'स्व-संकल्पना' म्हणजे विद्यार्थ्याची स्वतःच्या क्षमतेबद्दलची, रूपाबद्दलची आणि मूल्याबद्दलची धारणा. याचे परिणाम खालील दोन प्रमुख विभागांत मांडता येतील:

१. सकारात्मक परिणाम (Positive Impact)

डिजिटल शिक्षण विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासात आणि स्व-प्रतिमेत सुधारणा घडवून आणते:

स्वावलंबन आणि आत्मविश्वास (Self-reliance): ई-लर्निंगमध्ये विद्यार्थी स्वतः माहिती शोधतात, प्रेझेंटेशन बनवतात आणि तंत्रज्ञान हाताळतात. "मी तांत्रिक गोष्टी करू शकतो/शकते" ही भावना त्यांच्यातील आत्मविश्वास वाढवते.

वैयक्तिक गतीने शिकणे (Pace of Learning): पारंपारिक वर्गात मागे पडण्याची भीती असते. डिजिटल शिक्षणात विद्यार्थी एखादा व्हिडिओ पुन्हा-पुन्हा पाहू शकतात. जेव्हा त्यांना संकल्पना स्पष्ट होते, तेव्हा त्यांची 'शैक्षणिक स्व-संकल्पना' (Academic Self-concept) उंचावते.

सर्जनशीलतेला वाव (Creativity): कॅनव्हा (Canva), कोडिंग किंवा व्हिडिओ मेकिंग यांसारख्या साधनांमुळे विद्यार्थ्यांना त्यांचे सुप्त गुण दाखवता येतात. यामुळे "मी सर्जनशील आहे" ही जाणीव त्यांच्यात निर्माण होते.

तुलनेचा अभाव: काही वेळा ऑनलाईन शिक्षणात विद्यार्थी इतरांच्या नजरेखाली नसतात, त्यामुळे चुकीचे उत्तर देण्याची भीती कमी होते. यामुळे अंतर्मुख (Introvert) विद्यार्थी अधिक मुक्तपणे व्यक्त होतात.

२. नकारात्मक परिणाम (Negative Impact/Challenges)

काही वेळा डिजिटल शिक्षण स्व-संकल्पनेवर प्रतिकूल परिणामही करू शकते:

सामाजिक अलिप्तता (Social Isolation): प्रत्यक्ष मित्र आणि शिक्षकांशी संपर्क कमी झाल्यामुळे विद्यार्थ्यांची 'सामाजिक स्व-संकल्पना' (Social Self-concept) कमकुवत होऊ शकते. त्यांना संघात (Team) काम करण्यात **अडचण येऊ शकते.**

डिजिटल दरीमुळे न्यूनगंड (Digital Divide): ज्या विद्यार्थ्यांकडे चांगले इंटरनेट किंवा हाय-एंड लॅपटॉप नाहीत, त्यांना इतरांच्या तुलनेत आपण 'मागे' आहोत असे वाटू लागते. यामुळे त्यांच्यात न्यूनगंड (Inferiority Complex) निर्माण होऊ शकतो.

सायबर बुलिंग (Cyber Bullying): ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर होणारी टीका किंवा ट्रोलिंग विद्यार्थ्याच्या मानसिक आरोग्यावर आणि स्व-प्रतिमेवर खोलवर परिणाम करू शकते.

अवास्तव तुलना: सोशल मीडिया किंवा ऑनलाईन क्लासमध्ये इतरांच्या 'परफेक्ट' कामगिरीशी स्वतःची तुलना केल्यामुळे स्वतःबद्दलची धारणा नकारात्मक होऊ शकते.

संशोधनाची उद्दिष्टे (Objectives):

१. शिक्षक प्रशिक्षणात ई-लर्निंगच्या विविध साधनांची उपयुक्तता अभ्यासणे.

२. डिजिटल शिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक स्व-संकल्पनेत होणारा बदल तपासणे.

३. विद्यार्थ्यांच्या आत्मविश्वासावर तंत्रज्ञानाचा होणारा सकारात्मक व नकारात्मक परिणाम शोधणे.

परिकल्पना:

"शिक्षक शिक्षणामध्ये डिजिटल साधनांच्या वापरामुळे शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांच्या स्व-संकल्पनेत (Self-concept) लक्षणीय सकारात्मक बदल होतो."

संशोधन कार्यपद्धती:

प्रस्तुत संशोधन हे वर्तमान काळाशी संबंधित असल्यामुळे यासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धती अंतर्गत सर्वेक्षण पद्धतीचा वापर करण्यात आला आहे.

जनसंख्या:

प्रस्तुत संशोधनाकरिता अकोट शहरातील सर्व शिक्षक प्रशिक्षणार्थी ही प्रस्तुत संशोधनाची जनसंख्या निश्चित करण्यात आली.

नमुना निवड:

प्रस्तुत संशोधनाकरिता अकोट शहरातील सावित्रीबाई फुले शिक्षण महाविद्यालय अकोट येथील 40 शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांची नमूना म्हणून निवड करण्यात आली.

संशोधन साधने:

प्रस्तुत संशोधनाकरिता शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांसाठी प्रश्नावली या संशोधन साधनाचा वापर करण्यात आला.

सांख्यिकीय तंत्र:

काय स्क्वेअर या सांख्यिकीय तंत्राच्या आधारे प्रस्तुत संशोधनाचे सांख्यिकीय विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात आले.

प्राप्त माहितीचे विश्लेषण:

प्रस्तुत संशोधनात अकोट शहरातील सावित्रीबाई फुले शिक्षण महाविद्यालय अकोट येथील 40 शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांकडून प्रश्नावलीच्या माध्यमातून माहिती संकलित करण्यात आली व प्राप्त माहितीचे काय स्क्वेअर x२ द्वारे सांख्यिकीय विश्लेषण व अर्थनिर्वचन करण्यात आले.

परिकल्पनेचे परीक्षण:

प्र. - ई लर्निंग आणि डिजिटल शिक्षणाच्या माध्यमातून केलेले अध्यापन तुम्हाला उपयुक्त वाटते काय?

	होय	**नाही**	**कधी कधी**
निरिक्षितवारंवारिता(fo)	30	5	5
अपेक्षित वारंवारिता (fe)	13.33	13.33	13.33
fo - fe	16.67	-8.33	-8.33
(fo – fe)2	277.89	69.39	69.39
(fo – fe)2 / fe	20.85	5.21	5.21

काय स्क्वेअर (x२) = 20.85 + 5.21 + 5.21=31.27

df = (C-1) (R-1) = (3-1) (2-1)=2×1 df = 2

वरील सारणीवरून असे दिसून येते की, df 2 असतांना 0.01 सार्थकता स्तरावर नमूना काय स्क्वेअर x२ मूल्य हे 9.21 एवढे असून प्राप्त काय स्क्वेअर (x२) मूल्य हे 31.27 इतके आहे, म्हणजेच प्राप्त मूल्य हे नमुना मूल्यापेक्षा अधिक आहे. याचाच अर्थ असा की, शिक्षक शिक्षणामध्ये ई-लर्निंग आणि डिजिटल शिक्षणाच्या माध्यमातून केलेले अध्यापन हे विद्यार्थ्यांना उपयुक्त वाटते ते त्यांच्या स्व-संकल्पनांना सकारात्मक आकार देते. प्रस्तुत विश्लेषणावरून "शिक्षक शिक्षणामध्ये डिजिटल साधनांच्या वापरामुळे शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांच्या स्व-संकल्पनेत (Self-concept) लक्षणीय सकारात्मक बदल होतो." या परिकल्पनेचा स्वीकार करण्यात येत आहे.

यावरून असे दिसून येते की, "शिक्षक शिक्षणामध्ये डिजिटल साधनांच्या वापरामुळे शिक्षक प्रशिक्षणार्थ्यांच्या स्व-संकल्पनेत (Self-concept) लक्षणीय सकारात्मक बदल होतो."

निष्कर्ष

- डिजिटल शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या स्व-संकल्पनेला 'आधुनिक' आणि 'सक्षम' बनवते, परंतु त्यासाठी शिक्षकांचे मार्गदर्शन आवश्यक आहे.
- डिजिटल शिक्षण हे शिक्षकांसाठी एक प्रभावी शस्त्र आहे, जे केवळ माहिती देत नाही तर विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाला आकार देते.
- जर शिक्षकांनी डिजिटल साधनांचा वापर केवळ माहिती देण्यासाठी न करता विद्यार्थ्यांच्या कौतुकासाठी आणि प्रोत्साहनासाठी केला, तर विद्यार्थ्यांची स्व-संकल्पना नक्कीच सकारात्मक होईल.

- योग्य मार्गदर्शनाखाली ई-लर्निंग विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबन आणि आत्मविश्वास निर्माण करण्यास मदत करते.
- ई-लर्निंग ही केवळ पर्यायी व्यवस्था नसून ती भविष्यातील शिक्षणाचा पाया आहे. विशेषतः शिक्षक प्रशिक्षणामध्ये (Teacher Training) ई-लर्निंगमुळे शिक्षकांना नवनवीन शैक्षणिक तंत्रे (Pedagogy) आत्मसात करणे सोपे झाले आहे.

शिफारशी:

डिजिटल शिक्षण अधिक प्रभावी करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांची स्व-संकल्पना (Self-concept) उंचावण्यासाठी खालील शिफारशी (Recommendations) सुचविता येतील:

१. शिक्षकांसाठी शिफारशी:

- शिक्षकांनी केवळ तंत्रज्ञान वापरणेच नव्हे, तर त्यातील नवीन सॉफ्टवेअर आणि 'एआय' (AI) साधनांचे नियमित प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे.
- डिजिटल शिक्षण देताना विद्यार्थ्यांमध्ये न्यूनगंड निर्माण होऊ नये, यासाठी शिक्षकांनी त्यांच्याशी वैयक्तिक संवाद साधून त्यांचा आत्मविश्वास वाढवावा.
- ऑनलाईन शिक्षणात विद्यार्थ्यांच्या कामाचे तात्काळ आणि सकारात्मक कौतुक करावे, ज्यामुळे त्यांची 'शैक्षणिक स्व-संकल्पना' सकारात्मक राहील.

२. शिक्षणसंस्था आणि शासनासाठी शिफारशी:

- ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्वस्त दरात इंटरनेट आणि टॅब्लेट/लॅपटॉप उपलब्ध करून देण्यासाठी विशेष योजना राबवाव्यात.
- पूर्णपणे ऑनलाईन शिक्षणापेक्षा प्रत्यक्ष वर्ग आणि ऑनलाईन शिक्षण यांचा मेळ घालावा, जेणेकरून विद्यार्थ्यांचा सामाजिक विकास (Social Self) खुंटणार नाही.
- अभ्यासक्रमात सायबर सुरक्षेचा समावेश करावा, जेणेकरून विद्यार्थ्यांना ऑनलाईन धोक्यांपासून स्वतःचे रक्षण कसे करावे हे समजेल.

३. विद्यार्थ्यांसाठी शिफारशी:

- विद्यार्थ्यांनी केवळ शिक्षकांवर अवलंबून न राहता स्वतःहून नवीन गोष्टी शिकण्यासाठी ई-लर्निंग प्लॅटफॉर्मचा (उदा. SWAYAM, Coursera) वापर करावा.
- स्क्रीन टाइम मर्यादित ठेवून प्रत्यक्ष मैदानी खेळ आणि सामाजिक संवादासाठी वेळ द्यावा, ज्यामुळे सर्वांगीण स्व-संकल्पना सुधारेल.
- ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर स्वतःची तुलना इतरांशी करण्यापेक्षा स्वतःच्या प्रगतीवर लक्ष केंद्रित करावे.

४. पालकांसाठी शिफारशी:

- मुलांच्या डिजिटल शिक्षणात रस घ्यावा आणि त्यांना तांत्रिक अडचणी आल्यास धीर द्यावा.
- मुले इंटरनेटचा वापर शैक्षणिक कारणांसाठीच करत आहेत ना, याकडे सकारात्मक दृष्टीने लक्ष द्यावे.

संदर्भ ग्रंथसूची (References):

1. दांडेकर, वा. ना. व बापट, शुभदा (२०१४): शैक्षणिक मानसशास्त्र, श्रीविद्या प्रकाशन, पुणे. (स्व-संकल्पना आणि विद्यार्थ्यांचे मानसशास्त्र समजून घेण्यासाठी अत्यंत उपयुक्त).

2. हवेले, पी. बी. (२०१८): शिक्षण आणि माहिती तंत्रज्ञान, फडके प्रकाशन, कोल्हापूर. (डिजिटल शिक्षणाची साधने आणि शिक्षक शिक्षणातील वापरासाठी).
3. जगताप, ह. ना. (२०१२): शैक्षणिक तंत्रज्ञान आणि संगणक सहाय्यित अनुदेशन, नित्य नूतन प्रकाशन, पुणे.
4. देशमुख, वीणा (२०१६): अध्ययन-अध्यापन प्रक्रिया आणि तंत्रज्ञान, विद्या प्रकाशन, नागपूर.
5. Aggarwal, J. C. (2014): Essentials of Educational Technology, Vikas Publishing House. (ई-लर्निंगच्या मूलभूत संकल्पनांसाठी).
6. Rogers, Carl R. (1961): On Becoming a Person, Houghton Mifflin. (स्व-संकल्पना या विषयातील मूळ सिद्धांत समजून घेण्यासाठी).
7. Mangal, S. K., & Mangal, Uma (2009): Essentials of Educational Technology, PHI Learning Pvt. Ltd.
8. www.inflibnet.ac.in

आधुनिक मराठी साहित्य आणि सामाजिक वास्तव

संशोधक विद्यार्थिनी

कु.अरूणा मंगलराव टोंगसे

आचार्य पदवी संशोधन केंद्र

डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी कला महाविद्यालय, शेंदुर्जनाघाट ता. वरुड जि.अमरावती

कवी बबन सराडकर यांच्या सामाजिक कविता

प्रस्तावना

सामाजिक कविता म्हणजे समाजातील समस्या, ज्वलंत प्रश्न आणि मानवी संबंधांवर भाष्य करणारी कविता, जी समाजाला दिशा दाखवते किंवा त्यावर भाष्य करते. सामाजिक कविता हे एक प्रभावी माध्यम आहे जे समाजाला आरसा दाखवून बदलासाठी उभे राहण्यास मदत करते.मराठी साहित्यात अनेक कवींनी सामाजिक कविता लिहिल्या आहेत, जसे की, संत तुकडोजी महाराज,महात्मा ज्योतिबा फुले ,कुसुमाग्रज,नारायण सुर्वे, सुरेश भट इत्यादी कितीतरी कवीं. याच नाही तर यासारख्या कितीतरी संतांच्या, कवींच्या कवितांमध्ये अभंग, किर्तन, पोवाडे, लोकगीत, समाजातील विषमता, गरिबी, स्त्री-पुरुष संबंध, बदलणारे जीवन आणि मानवी भावनांचे चित्रण आढळते, की जे वाचकाला विचार करायला लावतात. मानवाच्या मनाला थेट स्पर्श करतात.

विषय प्रतिपादन

केशवसुतांच्या काळामध्ये म्हणजे दहा-पंधरा वर्षेआधी महात्मा ज्योतिराव फुले यांनी अखंडादी रचनेतून काव्यरचना केली. शेतक-यांच्या दुःखाचे व शोषणाचे स्वरूप कवितेमधून प्रकट केले. 'कुळवाडी भूषण छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा'सारख्या रचनेतून नवी इतिहास दृष्टी प्रकट केली.तर केशवसुतांच्या 'तुतारी', 'नवा शिपाई', 'आम्ही कोण'अशा अनेक कितीतरी कवितांमधून एक नवीन संवेदनशीलतेचा अविष्कार प्रकट झाला."पाठीवरती हात ठेवून फक्त लढ म्हणा!" या ओळी प्रसिद्ध मराठी कवी कुसुमाग्रज (वि.वा. शिरवाडकर) यांच्या 'कणा' या कवितेतील आहेत, जी अत्यंत प्रेरणादायी आहे आणि अनेकदा लोकांना संकटात धीर देण्यासाठी वापरली जाते. ही कविता एका गरीब पण स्वाभिमानी व्यक्तीची आहे, जी संकटात असतांनाही हार मानत नाही आणि मदतीसाठी आलेल्या व्यक्तीला केवळ पाठीवर हात ठेवून 'लढ' म्हणण्यास सांगते, असे सांगते की 'मोडून पडला संसार तरी मोडला नाही कणा'. ही कविता धैर्य, जिद्द आणि स्वाभिमानाचे प्रतीक मानली जाते आणि आजही ती अनेकांना प्रेरणा देते आणि बा.सी. मर्ढेकर ज्यांनी आधुनिकतेला स्पर्श केला.मर्ढेकरांच्या कवितेने नवतेचे प्रवर्तन केले त्यामुळे या कवितेला 'नवकविता ' असे देखील संबोधले गेले. स्वातंत्र्यदरम्यानच्या सामाजिक घडामोडींचा प्रभाव या काळातील साहित्यावर पडला. पाश्चात्य जीवनातील घडामोडीचा, विचार प्रवाहांचा,भारतीयांच्या संदर्भातील भांडवली उद्योग प्रधान संस्कृतीचा या कवितेशी खूप जवळचा संबंध आहे.त्यामुळे या कवितेला नवकविता असे संबोधले गेले. उदा. 'गणपत वाणी बिडी पिताना'ही मर्ढेकरांचीएक व्यक्तीचित्रणात्मक उल्लेखनीय कविता आहे. यातून सर्वसामान्यांच्या जीवनातील मूलभूत स्वरूपाचे दुःख आणि त्याविषयीच्या करुणाभाव प्रकट झालेला आहे. सर्वसामान्य माणसाला त्याच्या स्वप्नाच्या पूर्तीसाठी आयुष्यभर झगडावे लागते.तरीही त्याची स्वप्नपूर्ती होत नाही. विरोध विपरीतभावाचे व त्याच्या दारिद्र्याचे आणि स्वप्नभंगाचे चित्रण या कवितेत आहे.सामान्यांच्या जीवनाचा करून असा शोकांत भाव

अधिक गडद केला आहे. आयुष्य हेच एक दुर्दैवी अभावग्रस्त आणि त्यात स्वप्नपूर्ती न होता मरण येते हे दुहेरी दुर्दैव सामान्य माणसाच्या वाट्याला येते. तसेच नारायण सुर्वे सामाजिक जणिवेच्या दृष्टीने महत्त्वाचे कवी.त्यांनी कविता रूपाने आधुनिक मराठी कवितेत आणखी एक नवे जग आणले.'कामगार आहे मी तळपती तलवार आहे सारस्वतांनो थोडासा गुन्हा करणार आहे'. या भूमिकेच्या प्रभावातून त्यांच्या कवितेतून एक नवीन जग अवतीर्ण झाले. मुंबईमधील महानगरीय कामगार मजुराचे चित्र त्यांच्या कवितेतून प्रथमच प्रगट झाले. कामगारांचा संघर्ष आणि याच वस्तीतून सूर्य येईल असा आशावाद या कवितेतून व्यक्त झाला आहे. जनसामान्यांच्या बोलण्याला सुर्वे यांनी कवितिक रूप प्राप्त करून दिले. महानगरातल्या कामगार जगाचे अत्यंत सजीव चैतन्यशील चित्र सुर्वे यांच्या कवितेत आहे.कामगारांच्या वास्तव जगाचे आणि त्यांच्या आव्हान आवाहनाचे चित्र आहे. दररोज हालअपेष्टांच्या काळातही समाज आणि वांग्मयीन परंपरेला आव्हान आहे. तसेच सुरेश भट यांच्या रचनेतून 'उषःकाल होता होता काळरात्र झाली अरे पुन्हा आयुष्याच्या पेटवा मशाली'या कवितेत स्वातंत्र्यानंतरच्या भारतीय समाजाच्या स्वप्नभंगाची जाणीव व्यक्त झाली आहे. पारतंत्र्याच्या जोखंडातून भारत मुक्त झाल्यानंतर असा स्वातंत्र्याचा आनंद सर्वांनाच झाला. स्वातंत्र्यानंतर सर्व समाज सुखी होईल लोक कल्याणकारी राज्य अस्तित्वात येईल असे वाटू लागले परंतु याच स्वप्नभंगाची कैफियत या कवितेमध्ये आहे. 'साहेबराव पाटील'ही विठ्ठल वाघ यांची कविता आहे मराठी कवितेत आत्महत्याग्रस्त शेतक़ऱ्यांच्या दुःखाची संवेदना प्रकट करणारी ही कविता. गावातील शिकलेल्या मित्राने आपल्या मृत शेतक़ऱ्यांशी अपराध भावाने केलेला ही संवाद युक्त कविता आहे. असे आपल्याला कितीतरी कवींची उदाहरणे देता येईल.

अशाच कवींच्या पावलावर पाऊल ठेवून कवी बबन सराडकर यांची काही सामाजिक कविताअंकुरित झाल्या ज्या हृदयस्पर्शी आहेत.

अशी कशी धरणीची माया ममता आटली
कसा चोरुनिया पान्हा माय वैरीण जाहली!
चला जाती-धर्माचे हे झेंडे बुडवू पाण्यात
शोधू माणूस माणूस दगडांच्या ढिगाऱ्यात....(धरणीकंप: आवर सावर)

किंवा

रक्त असते लाल साऱ्यांचे तरीही
लोक का लढतात व्देशाच्या लढाया?
धर्म, जाती ,पंथ झाले खूप आता
कोणता झेंडा धरू माणूस व्हाया....?(झेंडा:आवर सावर)

माणूस शोधण्याचे धडपड किंवा माणूस होण्याची धडपड वरील ओळीतून आपल्याला दिसून येत आहे .त्याही पुढे जाऊन समाजातील विषमता कवीने' इथं तिथं 'या कवितेत व्यक्त केली आहे

तिथं महाल-माड्यात उडे सात रंगी थवा
इथं फाटकी झोपडी ,त्यात विझू विझू दिवा....
आम्ही गाळायाचा घाम तुम्ही करावा लिलाव
अरे ,इथं आयुष्याची कशी भोवऱ्यात नाव!
गंधाळते कस्तुरीत तिथं रामायण -गीता

इथं बर बाजारात कुणी पोटासाठी सीता.....
दिसा दिसाला वाढते तिथं वैभवाची रास
अन कोवळ्या कळ्यांचा इथं भरडतो श्वास....
आम्ही भोगायची दुःखे, तुम्ही खावा दूध- मेवा
इथे देहाची शेकोटी चुलीवर नाही तवा.....
देवळाच्या कळसाला कौतुकाची बरसात
मातीतल्या दगडाचे सारे जिणे अंधारात.....
काय बांधावी देवळे मृगजळी देवासाठी?
इथं आक्रंदतो कृष्ण मुठभर पोह्यासाठी....
तुम्ही सजवावे अंग अंग मोरपिसाऱ्यात
इथे देह झाकतांना उडे लक्तरे वाऱ्यात....
आम्हाला नको ती कीर्तने, नको गोपाळाचा काला
अजूनही कावळ्याचा नाही राजहंस झाला !(आवरसावर :इथं-तिथं पृ.१०३)

हे सर्व बंद व्हावे म्हणून सराडकरांनी आपले ओजस्वी विचार जनमानसाच्या मनावर बिंबवण्याचा पोटतिडकीने प्रयत्न केला आहे.वंचितांच्या डोळ्यातील अश्रू पुसायला लावणारं शिक्षण अभिप्रेत आहे. देवाधर्माच्या नावाखाली माणसाची वैचारिकता विकलांग झाली आहे.ज्या देशात ही मंडळी सुखासाठी यज्ञ करतात दह्या, दुधाचा अभिषेक करतात त्या देशातल्या उपाशी माणसाचे प्रश्न कसे सुटणार? ही वेदना ' इथं तिथं' या कवितेतून मांडताना दिसतात. या कवितेतयेत कवी सामाजिक विषमतेवर, अन्यायावर आणि ढोंगी धार्मिकतेवर अतिशय तीव्र शब्दांत भाष्य करते.

कवी म्हणतात, इथे श्रीमंतांच्या महाल-माड्यांमध्ये रंगीबेरंगी ऐश्वर्य उधळत आहे, तर त्याच समाजात गरीबांची फाटकी झोपडी आहे . एकीकडे आम्ही कष्टकरी लोक घाम गाळतो, आणि दुसरीकडे श्रीमंत वर्ग आमच्या श्रमांचा लिलाव करतो. अशा परिस्थितीत गरिबांचे आयुष्य जणू भोवऱ्यात अडकलेल्या नावेसारखे अस्थिर झाले आहे. श्रीमंतांच्या जगात कस्तुरीचा सुगंध, रामायण-गीतेचे उच्चार आहेत; पण इथे गरिबांच्या बाजारात पोटासाठी "सीतेसारख्या" स्त्रीची विक्री होते—ही समाजाची विदारक अवस्था कवी दाखवतो. तिकडे वैभव दिवसेंदिवस वाढत जाते, आणि इकडे मात्र कोवळ्या जीवांचा श्वासच चिरडला जातो आहे .आम्ही दुःख भोगायचे, तर त्यांनी दूध-मेवा उपभोगायचा—ही अन्यायकारक विभागणी आहे. गरीबांच्या देहाची शेकोटी पेटते आहे, पण त्यांच्या चुलीवर तवा पेटत नाही. देवळांच्या कळसांवर कौतुकाचा वर्षाव होतो, पण मातीत जगणाऱ्या माणसांचे आयुष्य अंधारातच राहते. म्हणून कवी प्रश्न विचारतो—

मृगजळासारख्या देवासाठी एवढी भव्य देवळे कशाला?

जेव्हा इथे कृष्णासारखा बालक मुठभर पोह्यासाठी आक्रंदन करतो, तेव्हा खरा धर्म कुठे आहे?

श्रीमंत लोक अंगावर मोरपिसाऱ्याची सजावट करतात, तर गरीबांना देह झाकताना वाऱ्यात लक्तरे उडतात. त्यामुळे कवी ठामपणे म्हणतो—

आम्हाला नको ती कीर्तने, नको तो गोपाळाचा काला;

कारण समाजातील कावळा अजून राजहंस झालेला नाही, म्हणजेच समाज अजूनही शुद्ध, समतावादी आणि न्यायपूर्ण झालेला नाही.ही कविता धर्म, संपत्ती आणि समाजव्यवस्थेतील ढोंग उघड करते. जोपर्यंत गरिबांचे दु:ख संपत नाही, तोपर्यंत देवपूजा, कीर्तने आणि उत्सव निरर्थक आहेत—असा कवीचा स्पष्ट, विद्रोही सामाजिक संदेश आहे.

समाजातील सामाजिक विषमता प्रत्येक ओळी ओळीतून दाखविली आहे.संपूर्ण समाजाचं चित्रणच जणु बबन सराडकर यांनी या कवितेत चित्रीत केले आहे .समाजातील वास्तव चित्रीत करणारी 'इथं-तिथं' ही कविता वाचताना अर्थ सहज उलगडत जातो आणि समाजातील असे भीषण वास्तव पाहून मन हेलावून जाते.पु ढे कवी सांगतात ....

प्रत्येकाने थोडे थांबून
बुडत्याला बोट द्यावे
थडी लागताच मोबदल्यात
चिमूटभर हृदय घ्यावे.....(पापणपालखी: दिवा पृ.८)

या ओळीतून कवी सराडकरांच्या उदात्त भावना दिसून येतात.वर्तमानाच्या प्रसन्न पायवाटेने आयुष्याचा प्रवास किती अर्थपूर्ण करता येतो माणसाला.परिवर्तनाची मशाल हातात घेऊन समाजाला उजेड वाटता येतो फक्त माणसाने माणुसकीचे कर्तव्य जपायला पाहिजे.

शिडी वरून शिडी गाठत चढत जावे
सुटलेल्या पायऱ्यांसाठी थबकूबटू नये
मात्र जेव्हा अंतराळ कवेत असते
त्या क्षणी पहिली शिडी विसरू नये.....(पापणपालखी: मुजरे पृ.५६)

किंवा

अरे माणसा, मला फुलांचे गुच्छ कशाला
प्रेतासाठी असे मल्मली वस्त्र कशाला
जगलो तेव्हा साधी चटणी भाकर नव्हती
उगाच आता मरणा नंतर खीर कशाला? (पापणपालखी: खीर पृ.७६)

असे प्रेरणादायी आणि अर्थयुक्त विचार बबन सराडकर यांनी आपल्या काव्यातून मांडले दिसते .याही पलीकडे जाऊन बबन सराडकर सांगतात....

नाही राहिली मशीद, नाही राहिले मंदिर
कुठे हरवलं चर्च कुठे गेले गुरुद्वार?
चला जाती धर्माचे हे झेंडे बुडवू पाण्यात
शोधू माणूस माणूस दगडांच्या ढिगाऱ्यात.....(पापणपालखी: धरणी कंप पृ.५०)

किंवा

आम्ही श्रमिकांची बाळं
श्रम कष्टाला ओवाळू
शाहू फुल्यांच्या स्वप्नांचा

नवा भारत उभारू..... ..(पापणपालखी: आम्ही पाखरं पृ५७)

बबन सराडकर यांच्या काव्यातून असे आधुनिक विचारही मांडताना दिसतात. मंदिर ,मज्जिद,चर्च गुरुद्वारअसे जातीधर्म न मानता फक्त एक 'माणूस'असावा. आणिअसा माणूस जेव्हा मिळेल तेव्हा खऱ्या अर्थाने शाहू फुले यांच्या स्वप्नातला भारत उभारल्या जाईल.'आता तरी गडे हो माणूस अंकुरावा' ही वेदना ही व्यथा सराडकर आपल्या कवितेतून मांडताना दिसतात.माणसा माणसात दरी निर्माण होत चालली आहे. जाती धर्माच्या नावाखाली हिंसाचार माजत आहे. भ्रष्टाचारी, गुंड प्रवृत्ती असेल तर देशाचे भवितव्य काय असेल हा प्रश्न कवीला भेडसावत आहेआणि म्हणूनच कवितेतून आपले विचार कवी मांडताना दिसतात.जेणेकरून जन सामान्यांच्या मनापर्यंत हे प्रश्न पोहोचतीलआणि देशाचे कल्याण होण्यास मदत होईल.म्हणूनच 'शाहू फुल्यांच्या स्वप्नांचा नवा भारत उभारू'असे कवी सांगत आहे. शेतकऱ्याला जगाचा पोशिंदा म्हणतात त्याचा जन्मच कल्याणासाठी असतो. त्याचे स्वप्न कधी फुलत नाही.व्यवस्थेचे दलाल लुटत राहतात. त्याच्या जगण्याची क्रूर थट्टा होत राहते. ही कविता कवी शेतकरी असल्याची जाणीव आहे.निसर्गाची अवकृपा व व्यवस्थेचे शोषण यामुळे कर्जाचे डोंगर वाढत जातो व शेतकरी आत्महत्येस प्रवृत्त होतो.हे सांगतांना कवी म्हणतात.....

देह झिजतो मातीत पिक बुडते पाण्यात
पिचलेल्या आयुष्याचा भाव ठरतो पेठीत
सुगी येते, सुगी जाते,हीच युगाची लढाई
ज्याचे काळीज फुलांचे त्यास कापती कसाई (पापणपालखी: शेतकरी पृ.५२)

किंवा

सिकंदराने सोबत नेले काय शेवटी?
वाटत जावे दुनियेला हंगाम जरासे.....
मी म्हटले जखमेला द्या बांधून जरासे
त्यांनी केला घात , शिडकले मीठ जरासे.....(आवरसावर : हात पृ.१३३)

जीवनाचे वास्तव सत्य सांगताना कवी बबन सराडकर सांगतात शेतकरी जीवनाची कथा आणि व्यथा. देहाची माती करणाऱ्या व जीवाचे रान करणा करणाऱ्या व जीवाचे रान करणाऱ्या शेतकऱ्यांना लुटून व टोचून खाणारे तोंड उघडून टिपलेलेच असतात याचे भेदक चित्र सराडकर यांनी केले आहे.तसेच जीवनाचे वास्तव सत्य की शेवटी सोबत काहीच जात नाही. त्या करीता शिकंदराचे उदाहरणही देतात.बबन सराडकर यांचे हायकू, मुक्तकं,गझल , ओवी अभंग वा कुठल्याही काव्य प्रकार असो त्यामधून सामाजिक वास्तवता प्रगट होतेच.या ठिकाणी सराडकर यांची'भाकरी' ही कविता

शब्दांशी क्रीडा करीत कविता लिहिणे सोपे असते
यमक रदीफ काफीयांनी गझल लिहिणे कठीण नसते
सीतेच्या मुखाला चंद्र म्हणणे कठिण नसते
उगवत्या सूर्याला प्रणाम करणे सोपे असते....
मात्र खळगी पोटाची जेव्हा जेव्हा रिती असते
तेव्हा चंद्र सूर्यापेक्षा एक भाकरी सुंदर दिसते !(कृष्णविवर : भाकरी)

किती समर्पक आणि कमीतकमी शब्दात सत्य मांडले आहेत.

गोषवारा

बबन सराडकर यांची हीच शैली वाचकांना मंत्रमुग्ध करणारी आहे .सेवा त्याग सहानुभूती हे अशी मूल्य आहेत की त्यांच्यापुढे वैफल्य आणि औदासीन्य शरण येते. ह्या मूल्यांची जपणूकही सराडकरांच्या कवितेने प्रत्येक ठिकाणी केली आहे. कधी निराशेच्या काळोखात तर कधी उमेदीच्या प्रकाश किरणात सराडकर यांची कविता लंबकाप्रमाणे हेलकावत राहिली आहे किंबहुना असेच म्हणता येईल की आशा निराशेच्या दोन बिंदूंमधल्यायेरझारा म्हणजे बबन सराडकर यांची कविता होय.

निष्कर्ष

- मराठीत कविता या वाङ्मय प्रकारात विपुल आणि वैविध्य पूर्ण निर्मिती झाली आहे.
- पद्याची परंपरा ही प्राचीन परंपरा आहे.आद्यकवी मुकुंदराज्यांपासून ते आत्तापर्यंत अनेक महत्त्वाच्या कवींनी मराठी काव्य परंपरा समृद्ध केली आहे. विचार, भावना ,कल्पना आणि संवेदनांचा आविष्कार त्यामधून घडला आहे.
- लिखित परंपरे आधीही मौखिक कवितेची परंपरा अस्तित्वात होती कविता किंवा साहित्य निर्मितीचा त्या त्या समाज संस्कृतीशी फारसा निकटचा संबंध असतो.
- साहित्य हे त्या त्या काळातील समाजाला दाखविणारा एक आरसा असतो.कधी हे साहित्य समाजाला मार्गदर्शन करतात तर कधी कान उघाडणी करतात.तर कधी वास्तवतेचं दर्शन घडवून आणतात. आणि हेच कार्य बबन सराडककराडकर यांच्या सामाजिक कवितेने केले असल्याचे दिसून येते.

संदर्भ ग्रंथ सूची

1. अर्वाचीन मराठी कविता:अमरावती विद्यापीठ राघव पब्लिकेशन नागपूर प्रस्तावना डॉक्टर रणधीर शिंदे शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.
2. सराडकर बबन:'पापन पालखी'
3. सराडकर बबन:'आवरसावर'
4. सराडकर बबन:'कृष्णविवर'
5. पै शिरीष:'कृष्णविवर 'प्रस्तावना
6. अर्वाचीन मराठी कविता: राघव पब्लिकेशन नागपुर प्रथम आवृत्ती २०१७

समकालीन दलित कवितेतील वर्तमान वास्तवाचे प्रतिबिंब

डॉ. भूषण प्रदीपकुमार देशमुख

मराठी विभाग

डॉ गोपाळराव खेडकर महाविद्यालय,गाडेगाव (तेल्हारा)

Abstract (सारांश)

समकालीन दलित कविता ही केवळ साहित्यिक अभिव्यक्ती नसून ती सामाजिक परिवर्तनाची प्रभावी चळवळ आहे. प्रस्तुत संशोधन लेखामध्ये समकालीन दलित कवितेतून व्यक्त होणाऱ्या वर्तमान सामाजिक, राजकीय, आर्थिक आणि सांस्कृतिक वास्तवाचे चिकित्सक विश्लेषण करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. दलित कवितेने पारंपरिक साहित्यिक संकेतांना छेद देत शोषण, अन्याय, जातीय विषमता, अस्मितेचा संघर्ष, स्त्री-दलित अनुभव, जागतिकीकरणाचे परिणाम आणि आधुनिक जीवनातील विसंगती यांना आपल्या काव्यात स्थान दिले आहे.

वर्तमान काळातील दलित कवी आपल्या अनुभूतींना थेट, प्रखर आणि विद्रोही स्वरूपात मांडताना दिसतात. ही कविता केवळ वेदनेची अभिव्यक्ती नसून ती सामाजिक परिवर्तनाचा घोष आहे. संशोधनात निवडक समकालीन दलित कवींच्या कवितांचा आशय, शैली, प्रतीकयोजना आणि विचारधारा यांचा अभ्यास करून वर्तमान वास्तवाचे प्रतिबिंब स्पष्ट करण्यात आले आहे.

या अभ्यासातून असे निदर्शनास येते की समकालीन दलित कविता ही आधुनिक भारतीय समाजाच्या विसंगती, संघर्ष आणि परिवर्तनवादी जाणिवांचे प्रभावी दस्तावेजीकरण आहे.

Keywords (मुख्य शब्द) समकालीन दलित कविता, वर्तमान वास्तव, सामाजिक विषमता, अस्मिता, प्रतिकार, परिवर्तनवाद, जातिव्यवस्था, जागतिकीकरण, दलित साहित्य, सामाजिक न्याय

Research Methods (संशोधन पद्धती) प्रस्तुत संशोधनात गुणात्मक (Qualitative) संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

ग्रंथालयीन पद्धत (Library Method) – समकालीन दलित कवींच्या निवडक काव्यसंग्रहांचा, समीक्षाग्रंथांचा आणि संशोधनपर लेखांचा अभ्यास करण्यात आला आहे.

चिकित्सक पद्धत (Analytical Method) – कवितेतील आशय, प्रतीके, प्रतिमा, भाषा आणि अभिव्यक्ती शैली यांचे विश्लेषण करण्यात आले आहे.

सामाजिक संदर्भ पद्धत (Contextual Method) – कवितेतील विचारांना वर्तमान सामाजिक, राजकीय आणि आर्थिक परिस्थितीशी संदर्भित करून अभ्यास करण्यात आला आहे.

तुलनात्मक दृष्टिकोन (Comparative Approach) – पारंपरिक साहित्य आणि दलित साहित्य यांतील आशयभेद स्पष्ट करण्यासाठी तुलनात्मक अभ्यास करण्यात आला आहे.

या सर्व पद्धतींच्या साहाय्याने समकालीन दलित कवितेत प्रतिबिंबित होणाऱ्या वर्तमान वास्तवाचे सखोल परीक्षण करण्यात आले आहे.

Introduction (प्रस्तावना)

मराठी साहित्यातील दलित कविता ही विसाव्या शतकाच्या उत्तरार्धात उदयास आलेली एक प्रभावी आणि परिवर्तनवादी साहित्यचळवळ आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारसरणीने प्रेरित झालेल्या या काव्यप्रवाहाने समाजातील अन्याय, शोषण आणि जातीय दडपशाहीविरुद्ध आवाज उठविला. समकालीन काळात दलित कवितेने नव्या सामाजिक प्रश्नांना स्पर्श केला आहे. जागतिकीकरण, शहरीकरण, भांडवलशाही व्यवस्था, राजकीय सत्ताकेंद्रे, शिक्षणातील असमानता, स्त्री-दलित अनुभव आणि ओळख राजकारण यांसारख्या विविध घटकांनी दलित कवितेच्या आशयात व्यापकता आणली आहे. समकालीन दलित कवी केवळ व्यक्तिगत वेदना व्यक्त करत नाहीत, तर ते सामूहिक अस्मितेचा आणि सामाजिक न्यायाचा घोष करतात. त्यांच्या कवितेत विद्रोह आहे, प्रश्न आहे, आणि

परिवर्तनाची आकांक्षा आहे. या कवितेचा स्वर कधी आक्रोशात्मक, कधी चिंतनशील तर कधी प्रखर राजकीय भानाने युक्त असा आढळतो.

वर्तमान परिप्रेक्ष्यात समकालीन दलित कवितेचा विचार करताना आपणास अनुक्रमे वर्तमान परिप्रेक्ष्य आणि समकालीन या दोन संकल्पना समजावून घेणे गरजेचे आहे. वर्तमान परिप्रेक्ष्य ही संकल्पना मुख्यतः 1990 नंतरच्या कालखंडाच्या अनुषंगाने वापरण्यात आलेली आहे. 1990 नंतरचा कालखंड हा जागतिकीकरणाचा कालखंड म्हणून ओळखला जातो. फार मोठ्या सामाजिक बदलाचा, परिवर्तनाचा हा कालखंड आहे. या कालखंडास माहिती तंत्रज्ञानाचे युग असेही संबोधले जाते. इंटरनेट, संगणक, सॅटॅलाइट आणि मोबाईल इत्यादींनी पारंपारिक जीवनाला नवा आकार दिला. मानवी प्रवृत्ती ही स्वाभाविकपणे या आधुनिक जीवनाकडे आकर्षिल्या गेली. सदर कालखंड हा उदारमतवादी कालखंड म्हणून जरी प्रत्ययास येत असला तरी प्रचंड विरोधाभास, विसंगतीने भरलेला हा कालखंड आहे. एकीकडे माहितीचे खुले जग तर दुसरीकडे माहितीपासून वंचित असलेला समाज, एकीकडे प्रचंड अवर्षण तर दुसरीकडे प्रचंड प्रमाणात साधनसंपत्ती, एकीकडे प्रचंड गरिबी दुसरीकडे प्रचंड श्रीमंती आणि हे सर्व आकाराला आले आहे ते याच कालखंडात. सर्वसामान्यांप्रमाणे दलित जीवनही या कालखंडाच्या कचाट्यातून सुटलेले नाही. त्यांच्या स्वतःच्या स्वतंत्र अशा काही समस्या या कालखंडाने निर्माण केल्या. ज्यात दलित जीवन भरडल्या जात आहे म्हणून या अनुषंगाने वर्तमान परिप्रेक्ष्य ही संकल्पना सदर शोधनिबंधाच्या अनुषंगाने समजून घेणे गरजेचे आहे. समकालीन म्हणजे एका काळाबरोबर असणे किंवा काळाशी समांतर असणे साहित्य म्हणून ज्या वेळेस आपण समकालीन साहित्याचा विचार करतो त्यावेळेस "समकालीन साहित्य म्हणजे जे साहित्य आपल्या काळाबरोबर आहे ज्या काळात ते निर्माण होत असते त्या काळाचे प्रतिबिंब त्यात आहे त्या काळातील विचार जाणिवा मते ज्या साहित्यातून व्यक्त होतात, असे साहित्य"१ म्हणून मग वर्तमान काळाशी दलित साहित्य किंवा दलित कविता ही समकालीन आहे का? की ती काळाशी फटकून वागते ? किंवा दलित जीवनाचा पूर्वसुरच ती अभिव्यक्त करते का? इत्यादी प्रश्नांचा शोध सदर शोधनिबंधात घ्यावयाचा आहे. सदर काव्यसंग्रहाची चिकित्सा करताना प्रस्तुत शोधनिबंध लेखकाने स्वतःला काही मर्यादा घालून घेतल्या आहेत. त्या अशा आहेत की, ही चिकित्सा करताना समकालीन असणाऱ्या या कवितेच्या वर्तमान जीवन जाणिवांचा शोध फक्त येथे अपेक्षित आहे. त्यांच्या कवितेला असणारी जागतिकीकरणाची पार्श्वभूमी तपासणे या कवीच्या कवितांमधून काही समान सूत्रे हाती लागतात का? प्रतिमांचे विश्व त्यांच्या कवितेमध्ये कितपत समान आहे? वर्तमानाकडे बघण्याचा त्यांचा दृष्टिकोन कसा आहे? हे या शोधनिबंधाचे संदर्भात अपेक्षित आहे. 'एकच ओघ आम्हातून वाहत' असल्यामुळे तोच ओघ फक्त इथे शोधायचा आहे. त्यामुळे सदर कवींची कवितावाईट आहे की, चांगली आहे किंवा केवळ तिची भलामण करून स्तुतिपर मांडणी करण्याचाही उद्देश नाही. इथे फक्त कविता गृहीत धरलेली आहे. शोधनिबंधाला सुरुवात करण्यापूर्वी १९९० नंतरच्या कवितेच्या संदर्भात आणखी एक निरीक्षण येथे नोंदवता येते ते असे की, कविता लिहिणाऱ्या दलित कवींची संख्या उदंड झाल्यामुळे काव्यसंग्रह आणि त्यांच्या प्रकाशनांच्या संख्येत प्रचंड वाढ झाली आहे. उत्तरोत्तर ही संख्या वाढत जाणार हे निश्चित यात दुसरी गोष्ट अशी की, या प्रकाशित काव्यसंग्रहापैकी बहुतांश कवींनी स्वतःचे काव्यसंग्रह स्वतः प्रकाशित केलेले आहे. आणि यात काही वावगे आहे, असे नाही. उलट यामुळे आपल्या कृतक वाङमयाभिनिवेशात अडकलेला मराठी प्रकाशन व्यवहार हा खिळखिळा झाला किंवा सुलभ झाला. असेही म्हणता येईल. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून साहित्य निर्मितीचा हा ओघ सुरु असल्याने वर्तमान जीवन जाणिवांचा समृद्ध संदर्भ या कवितांमधून पहावयास मिळतो. ही संख्या पाहता विषय विवेचन अधिक व्यापक होऊ नये याकरिता १९९० नंतर प्रकाशित झालेल्या काही निवडक दलित कवींच्या कवितासंग्रहाचा विचार सदर शोधनिबंधात करण्यात येणार आहे.

सदर शोध निबंधासाठी एकूण सहा काव्यसंग्रहाची निवड केलेली आहे. ते पुढीलप्रमाणे - १. नंतर आलेले लोक - अरुण काळे २. धगीवरची अक्षर- उत्तम अंभोरे, ३. पुन्हा चाल करु या ! लोकनाथ यशवंत, ४. अजूनही अस्वस्थ रोहिणी - अविनाश गायकवाड, ५. ग्लोबल वर्तमानाच्या कविता - सुनिल अभिमान अवचार, ६. तळ ढवळताना- लहू कानडे. हे सहाही काव्यसंग्रह प्रामुख्याने दोन हजार सालनंतर प्रकाशित झालेले आहेत. इथे एक गोष्ट आधीच स्पष्ट करायला हवी की, या निवडलेल्या काव्यसंग्रहाव्यतिरिक्तही याच कवींचे इतर काव्यसंग्रहही प्रसिद्ध आहेत त्यांचा आपण विचार करणार नाही.

या सहाही काव्यसंग्रहाची शीर्षक अत्यंत बोलकी आहेत. शीर्षक उच्चारताच जाणिवेच्या पटलावर प्रतिमा दृश्यमान करण्यात ते समर्थ ठरतात. या शीर्षकापैकी 'धगीवरची अक्षर' हे शीर्षकनाम वजा केले असता उर्वरित पाचही

काव्यसंग्रहाची शीर्षक जागतिकीकरणाच्या रेट्यातून जन्मास आलेली आहेत. जागतिकीकरण अटळ आहे व ते धोकादायक असल्यामुळे त्यापासून सावध राहण्याचा व त्याच्या चाहुलीचा इशाराच प्रस्तुत शीर्षकातून प्रत्ययास येतो. सदर शीर्षकाना आपणास खालिल नामिक गटात समाविष्ट करता येते.

१. सामान्य नामः नंतर आलेले लोक, ग्लोबल वर्तमानाच्या कविता, तळ ढवळताना.

२. विशेष नाम : धगीवरची अक्षर.

३. भाववाचक नाव : पुन्हा चाल करु या!, अजूनही अस्वस्थ रोहिणी.

या शीर्षकामध्ये उद्गार चिन्हाचा वापर फक्त एकाच काव्यसंग्रहाच्या शीर्षकांमध्ये केला गेलेला आहे. बाकी कुठल्याच शीर्षकात विरामचिन्हांचा वापर केलेला नाही तसा वापर केला गेला असता तर शीर्षकनाम प्रभावी ठरले असते या सबंध शीर्षकाचा बारकाईने विचार केला असता असे दिसून येते की, ही शीर्षक पुन्हा एकदा परिवर्तनासाठी उद्युक्त झालेली आहेत. जागतिकीकरणाच्या अदृश्य पावलांना त्यांनी ओळखल्यामुळे व्यवस्थेतील संभाव्य धोक्याबद्दल ते सजग झालेले आहे. व्यवस्थेने कूस बदलली मात्र मूळ ढाचा कायमच ठेवला छद्मी मुखवटा धारण करून जन्माला आलेली ही व्यवस्था या व्यवस्थेची वारंवारिता कायम आहे.

प्रस्तुत संशोधनात समकालीन दलित कवितेतून प्रतिबिंबित होणाऱ्या वर्तमान वास्तवाचा अभ्यास करण्यात येणार आहे. आजच्या भारतीय समाजातील सामाजिक विसंगती, आर्थिक विषमता, सांस्कृतिक संघर्ष आणि मानवी अस्मितेचा प्रश्न या सर्वांचा काव्यात्मक आविष्कार कसा घडतो, हे या लेखाचा केंद्रबिंदू आहे.

पुन्हा ज्यांनी ही व्यवस्था जन्माला घातली त्यांनीच ही जागतिकीकरणाची प्रक्रिया गतिमान केली. हे नवनिर्माण करण्याचा आव आणणारे लोक 'नंतर आलेले लोक' आहेत या नंतर आलेल्या लोकांनी 'दुसऱ्या देशावर आपले राष्ट्रगीत लिहिले' त्याहूनही मुळच्या लोकांना हद्दपार केले म्हणूनच 'तळ ढवळताना' 'ग्लोबल वर्तमानाच्या कवितां' मध्ये 'अजूनही अस्वस्थ रोहिणी' साठी 'धगीवरची अक्षर' सोबत घेऊन नंतर आलेल्या लोकांवर 'पुन्हा चाल करु या!' ही या पाठीमागची भावना होय. शिर्षयुद्धाला पुन्हा सुरुवात झाली आहे. असा भावार्थ सदर शीर्षकामधून प्रकट होतो.

जागतिकीकरणात ग्लोबल वॉर्मिंग आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तीव्रतर होत आहे. कदाचित पाण्यासाठी तिसरे महायुद्ध होण्याचीही शक्यता वर्तविली जाते. पाण्याला भारतीय संस्कृतीमध्ये पवित्र मानले जाते. भारतामधील कुठलाही धार्मिक रीतिरिवाज पाण्याशिवाय पूर्ण होत नाही. मुळात पाणीही नैसर्गिक देणगी असली तरी धार्मिक सोपस्कारामुळे व त्याच्या जैविक गरजेमुळे पाणी हे एकाच वेळी समतेचे तसेच विषमतेचेही प्रतीक बनले. भारतामध्ये क्रांती आणि प्रतिक्रांतीसाठी पाण्याचा वापर केला गेला. बाटलीबंद पाणी कुठेही सहज उपलब्ध होत असले तरी अजूनही विकसनशील अथवा विकसित राष्ट्र अथवा महासत्ता पाण्याची मूलभूत गरज पूर्ण करू शकलेले नाहीत हे वास्तव सत्य आहे. म्हणून अविनाश गायकवाड यांना 'अजूनही रोहिणी अस्वस्थ' वाटते.

'पाणी' या प्रतिकाचा वापर जवळपास सर्वच काव्यसंग्रहातून झालेला दिसतो. उत्तम अंभोरे यांच्या कवितेत पाण्याचा संदर्भ कावळ्या सहित येतो. 'पाण्याचाच नवा साठा शोधण्याच्या गोष्टी ते कोवळ्या कावळ्यांना शिकवताहेत' सुनील अवचार यांना 'पाण्याशिवाय तू काही दिवस जिवंत राहू शकतोस' असे वाटत असले तरी 'साध्या पाण्याऐवजी : Bisleri Aqua Guard 'ची होणारी ग्लोबल संस्कृती पाण्याच्या अभावी भटकंती करणाऱ्या सामान्यांच्या समूहाविषयी प्रश्न उपस्थित करते 'मोर्चे आडवा, मोर्चे जिरवा, पोलिसांचा कर्तव्यदक्ष कार्यक्रम, दलितांची एक संपूर्ण पिढी नेस्तनाबूत' येथे लोकनाथ यशवंत पुन्हा पाण्याचा संदर्भ रूपकात्मक वापरतात.

रोहिणी नदी बौद्ध संस्कृतीमध्ये विशेष संदर्भात ओळखली जाते. शाक्य आणि कोलीय यांच्यात रोहिणीच्या पाण्यावरून संघर्ष निर्माण झाला असताना राजपूत्र सिद्धार्थाने हा प्रश्न सामोपचाराने, अहिंसेने सोडवावा यासाठीचा आग्रह धरला. बहुमताच्या विरोधी गेल्याने राजपूत्र सिद्धार्थ शिक्षेस पात्र ठरला. आणि सर्वसंगपरित्याग करून दुःखाचा शोध घेण्यास निघालेला राजपूत्र सिद्धार्थाचा गौतम बुद्ध झाला. हिंसेने अस्वस्थ झालेली रोहिणी पुन्हा एकदा खळाळली. ही रोहिणी नदी अजूनही अस्वस्थ आहे असे अविनाश गायकवाड यांना वाटते.

पाणी हे जीवन आहे आणि त्याच्यावर सर्वांचा समान हक्क आहे. परंतु याच पवित्र पाण्यापासून माणसांना अस्पृश्य म्हणून दूर ठेवले. पाण्यालाही विटाळ होऊ लागला. पुन्हा एकदा रोहिणी अस्वस्थ झाली. आणि पुन्हा एकदा तथागत जन्मला.

"चवदार तळ्याच्या अंगावर उडाले शहारे

पुन्हा एकदा माणसाच्या मुक्तीचा
फडकावला जाहीरनामा तथागताने
रोहिणीचा कुंठित प्रवाह असा
खळाळून वाहीला जोमाने"२

'वॉटर किंग्डम-१' आणि 'वॉटर किंग्डम-२' पाण्याचं महात्म्य सांगणाऱ्या अशा दोन कविता 'नंतर आलेले लोक' या काव्यसंग्रहात येतात.

"पाण्याचा तंटा आणि लवाद आपल्याला मिळतो एक बुद्ध पाण्याच्या पायऱ्या चढून आकाशाच्या वर जातो कबीर हौदातून उगवते चिरंतन ज्योती तळयाचा नक्शा उतरवतो भीम पाणी अन्यायाची बाजू पाणी क्रांतीच माध्यम"३

नव्वदनंतरच्या जागतिकीकरणात पाण्यावर अधिसत्ता गाजवणारे नवे वॉटर किंग्डम अस्तित्वात आलेले आहे. हजारो रुपये मोजून घंटा दोन घंटे पाण्यात मनसोक्त डुंबा किंवा बाटलीबंद पाण्यासाठी पैसे मोजा 'नुकतेच जगण्याला दोन कोंब फुटले असताना' हे असे पाण्याच्या विक्रीचे नवे भांडवली अर्थशास्त्र जन्मास आल्याने कवी अस्वस्थ होतो. बाजारात विक्रीला आलेल्या बाटलीकडे पाहून 'बिसलेरीची बाटली निळया झाकणाची, तसाच तो निळा टोपीवाला' डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर निष्ठा असलेला सच्चा भीमसैनिक दिसतो. पाणी वापरून बाटली फेकून द्यावी, अगदी तसाच हा भीमसैनिक

'चैत्यभूमीच्या रस्त्यावर निपचित पडला, रिकाम्या बाटलीसारखा'
"माणसाने कायम शुद्ध पाणी प्यायला हवे म्हणून
पाणी गाळून घ्यावं उकळून घ्यावं
झालं तर दोन थेंब औषध टाकून सुद्धा ठेवावं
पण पाणीच मिळत नसेल तर काय कराव ?"४

हे मात्र कोणीच सांगू शकत नाही याकडे लहू कानडे लक्ष वेधतात जशी पाण्याची चव तसा त्या गावातील लोकांचा स्वभाव किंवा बारा गावचं पाणी प्यायलेला माणूस कणखर असतो अशी लोकोक्ती आहे. म्हणूनच समुद्र असलेल्या गावात लहू कानडेना करमत नाही.

सदर सहाही काव्यसंग्रहातून जागतिकीकरणाच्या भयाचा ओघ वाहताना दिसतो. जागतिकीकरणाची सुरुवात झालेल्या या सहस्त्रका बद्दल आणि हे सहस्त्रक ज्यामुळे आपल्या अंगावर आलेले आहे. अशा माहिती-तंत्रज्ञान युगाबद्दल उद्देशून अरुण काळे म्हणतात,

पडद्यावरील आभासी मनुष्य अधिक जवळचा वाटत चाललाय. जागतिकीकरणातून निर्माण झालेल्या समस्येच्या मुळाशी हे कवी जातात. अग्निशामक दलाच्या गाडीची धोक्याची घंटा खणखणावी आणि आपण सावध व्हावे, अगदी त्याप्रमाणे हे कवी आपणास सावध करतात. जागतिकीकरणात 'दलितत्व नष्ट होण्याऐवजी डिलीट झाला. वापरा फेका आणि तुमचा भाव सांगा, चुपचाप बसा. माहिती एन्जॉय करा. चोरण्यापासून ते कायमचूर्णपर्यंत' हरेक गोष्टीच्या तत्वज्ञानात ट्रेड संस्कृतीने मूळ धरला आहे. संस्कृतीच रखेल झाली आहे. खुल्या आर्थिक क्षेत्रात कितीही मुक्त स्पर्धा असली तरी आडनावावरून समजणारे इंगित ते लपवू शकत नाही. आणि आलेली निनावी ओकारी ही दाबू शकत नाही.

यातील काही कवी आपल्या काव्यसंग्रहातून मुलांशी संवाद साधताना आढळतात. मुळात त्यांना संवाद का साधावा वाटतो? याचे उत्तर आपल्याला अवतीभोवतीच्या पर्यावरणात आढळते. दिवसेंदिवस वडील आणि मुलगा यामध्ये विसंवाद वाढतो आहे. जागतिकीकरण आणि माहिती तंत्रज्ञानाने तरुणांच्या मनोविश्वावर केलेला कब्जा हा जुन्या पिढीसाठी चिंतेचा विषय. नव्या पिढीची म्हणजेच मुलांची जुन्या पिढीकडे म्हणजेच वडिलांकडे पाहण्याची दृष्टीच बदलली. चळवळ, समाज, विचार या गोष्टी त्यांच्यासाठी आउटडेटेड झाल्यात. तर ज्याला वरची कमाई, तो लोकप्रिय हा सिद्धांत त्यांनी मनात घट्ट रुजून घेतलाय. त्यामुळे गल्लोगल्ली, नाक्यानाक्यावर झळकणाऱ्या बॅनर्स वरील गळयात सोन्याच्या चैनी आणि बोटात अंगठ्या असलेले लोक त्यांचे रोल मॉडेल ठरत आहेत. वडील आणि मुलगा यांच्यातील वाढलेल्या विसंवादाचे कारण आणि बदलती वर्तमान व्यवस्था याचे यथार्थ चित्रण आपल्याला अरुण काळे यांच्या 'प्रेमाचं होऊ द्या ना जागतिकीकरण' या कवितेत प्रतीत होते. 'दहा किलो दप्तर वाहणारा माझा मुलगा' ही येणारी ओळ बरेच काही सांगून जाते. लोकनाथ यशवंत यांची 'वडिलांनी मुलाला पोस्ट न केलेले पत्र' ही

कविता थेट मुलाशी संवाद साधणारी आहे. तर अविनाश गायकवाड यांना मात्र असं वाटतं की, 'मुलांच्या पुढ्यात तर इच्छा भोगाचं प्रसरणशील अनंत आकाश' आहे. वास्तवापासून तो दूर आहे. आभासी दुनियेत तो गेम ॲडिक्ट झालाय. आभासालाच वास्तव समजणाऱ्या आपल्या मुलाला,

"भिकारी बाप मिळाल्याची मधूनच
डोळे गुरगुरतात मुलाचे घरभर
संगणकाचा माऊस कीबोर्ड वर
सनासन फिरतात सैरभैर बोट
तो करतो सारखा गाड्यांचे एक्सीडेंट"९

बाप करत राहतो संघर्ष मुलाला सकारात्मक विधायक मार्गावर आणण्याचा हे करत असताना बापालाच पडतो प्रश्न,

"बाप रिप्लेस करायचा क्रांतीकारक विचार
येत असेल का कधी मुलाच्या डोक्यात ?"१०

लहू कानडे यांच्या कवितेत आनंदी होऊन पहिल्यांदा मतदानाला निघालेला मुलगा मित्राच्या बोलल्याने हिरमुसतो, तेव्हा बाप त्याला प्रेमाने समजावतो; धीर देतो; नवे बळ देतो.

जागतिकीकरणाच्या व्यवस्थेवर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा ॲंटिव्हायरस लागू पडणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हेच दलित साहित्याचे मुख्य प्रेरणास्त्रोत असल्याने त्यांच्या विषयीची आदराचीभावना या कवितासंग्रहातून व्यक्त होते. त्यासाठी विविध प्रतिमाने या कवींनी वापरली आहेत. सदर काव्यसंग्रहातून आलेले ही प्रतिमाने नाविन्यपूर्ण आहेत. आधुनिक जीवनशैलीमुळे बदललेल्या भाषाशैलीचा प्रभाव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना वापरल्या जाणाऱ्या या प्रतिमामधून दिसून येतो. अरुण काळे, 'तू मदरबोर्ड माझ्या संगणकाचा' हे प्रतीक वापरतात. उत्तम अंभोरे, 'ओझोन लेयर' ही प्रतिमा वापरतात. अविनाश गायकवाड यांना बाबासाहेब 'तथागत' असे वाटतात. सुनिल अवचार, 'एक बोट दिशादर्शक' असे म्हणतात. लहू कानडे यांना बाबासाहेब 'रापीची धार' वाटतात. येतात. या सहा काव्यसंग्रहातील समान सूत्रांचा शोध घेतल्यानंतर आपल्याला काही ठोस निष्कर्ष नोंदवता

निष्कर्ष-:

१. जागतिकीकरणाच्या भयाचा ओघ या काव्यसंग्रहातून स्त्रवतांना दिसतो.
२. सदर कवी हे विद्रोही गटात समाविष्ट होतात.
३. आधुनिक जीवनशैलीच्या प्रतिमांचा वापर काव्यसंग्रहात वैपुल्याने झालेला दिसून येतो.
४. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांवरील अव्यभिचारी निष्ठा हाही विशेष नोंदवावासा वाटतो.
५. इंग्रजी शब्दांचा वापर अधिक्याने दिसतो.
६. सदर कवितेची भाषाशैली ही वर्तमानाशी संवादी दिसते.

या सहाही काव्यसंग्रहातील समान सूत्राचा शोध घेणे प्रस्तुत शोधनिबंधात अपेक्षित होते. त्यासाठी सदर कवी कोणत्या प्रतिमा वापरतात? त्या समानार्थी आहेत का? वर्तमानाकडे बघण्याचा त्यांचा दृष्टिकोन कसा आहे? याची चर्चा करणे येथे क्रमप्राप्त होते. आणि त्याचबरोबर आजच्या वर्तमान परिप्रेक्ष्यात वर्तमानाकडे पाहण्याचा कवींचा दृष्टिकोन नेमका कसा आहे? दलित जीवनाचे नेमके चित्र यात कसे येते? याचा शोध घेताना हे सहाही कवी वर्तमानाकडे व्यापकपणे पाहताना दिसतात. दलित जीवनाचे आमुलाग्र चित्र त्यांनी मांडलेले आहे. दलित जीवनाची दुखरी नस पकडण्यात त्यांना यश आलेले आहे. आणि त्याचबरोबर त्यांनी मांडलेला विचार हा केवळ दलितांपुरताच मर्यादित राहत नाही तर तो सर्वव्यापक होताना दिसतो. त्यामुळे ही दलित कविता निश्चितच आश्वासक असली तरी वर्तमानाच्या संदर्भात ती अधिक समकालीन वाटते.

संदर्भ ग्रंथ :

1. डहाके वसंत, नवसाहित्य आणि नवसहित्योत्तर साहित्य, संपादक व अभ्यासक्रम संयोजक - डॉ. शरणकुमार लिंबाळे, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक, प्रथम प्रकाशन २००१, पु.मु. २०१२. पृ. २.
2. गायकवाड अविनाश, साद घालतेय रोहिणी अजूनही अस्वस्थ रोहिणी, आशय प्रकाशन, ठाणे, पहिली आवृत्ती २००८, पृ. ६७.
3. काळे अरुण, वॉटर किंगडम-१. नंतर आलेले लोक, लोकवाङमयगृह प्रकाशन, मुंबई, पाचवी आवृत्ती २००८, पृ. ६८.

4. कानडे लहू, पीआरए, तळ ढवळतांना, लोकवाङमयगृह प्रकाशन, मुंबई, दुसरी आवृत्ती २०१२, पृ. २९.
5. काळे अरुण, अर्थयुदध, उनि, पृ. ९.
6. कानडे लहू, बाप्पा नव्यासहस्त्रका...! उनि. पृ.४.
7. लोकनाथ यशवंत, शेवटी भाजी भाकरीचा सवाल, पुन्हा चाल करू या!, यंग इंडिया पब्लिकेशन, मुंबई, पहिली आवृत्ती २००९ पृ. ९७.
8. गायकवाड अविनाश, रिपलेसमेंट, उनि, पृ.५८.

संत तुकारामांचा वैज्ञानिक दृष्टिकोन

प्रा. डॉ. विजय वि. खुमकर

डॉ. गोपाळराव खेडकर महाविद्यालय, गाडेगाव (तेल्हारा)

संत तुकाराम महाराजांचा वैज्ञानिक दृष्टिकोन हा एक महत्त्वाचा विषय आहे. तुकाराम महाराजांच्या अभंगांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाचे अनेक संदर्भ आढळतात. त्यांनी प्रकृतीचे निरीक्षण करून अनेक वैज्ञानिक तथ्ये मांडली आहेत. तुकाराम महाराजांनी प्रकृतीचे गाढ निरीक्षण केले होते. त्यांनी पाऊस, वारा, पाणी, अग्नी यांसारख्या प्रकृतीच्या घटकांचे वर्णन केले आहे. तुकाराम महाराजांनी अध्यात्म आणि विज्ञान यांचा समन्वय साधला आहे. त्यांनी सांगितले की, प्रकृतीचे नियम अध्यात्मिक दृष्टिकोनातून समजून घेणे आवश्यक आहे.

तुकाराम महाराजांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाने सामाजिक सुधारणेला चालना दिली. त्यांनी अंधश्रद्धा आणि कर्मकांडांवर टीका केली.संत तुकाराम महाराज हे केवळ एक महान वारकरी संत आणि कवी नव्हते, तर त्यांचे विचार अत्यंत तर्कनिष्ठ, वास्तववादी आणि विवेकी होते. ज्या काळात समाजात अंधश्रद्धा आणि कर्मकांडांचा पगडा होता, त्या काळात त्यांनी मांडलेले विचार आजच्या 'वैज्ञानिक दृष्टिकोनाशी' (Scientific Temper) कमालीचे साधर्म्य दर्शवतात. त्यांच्या अभंगांतून डोकावणारा वैज्ञानिक दृष्टिकोन आपण पुढील मुद्द्यांच्या आधारे पाहू शकतो.

कार्यकारण भाव (Causality)

विज्ञानाचा पाया 'कार्यकारण भाव' हा आहे.म्हणजेच कोणत्याही घटनेमागे काहीतरी ठोस कारण असते. तुकोबांनी हेच तत्व आध्यात्मिक क्षेत्रात मांडले. "बीज तैसे फळ" असे सांगून त्यांनी स्पष्ट केले की, तुम्ही जे पेराल तेच उगवेल. चमत्कार किंवा दैवी शक्तीवर विसंबून न राहता, त्यांनी कृतीला (Action) महत्त्व दिले.त्यांनी समाजाला "असाध्य ते साध्य करिता सायास, कारण अभ्यास तुका म्हणे" येथे 'अभ्यास' आणि 'सायास' (प्रयत्न) हे कारण आहे आणि 'असाध्य गोष्टी साध्य होणे' हे त्याचे कार्य आहे. काहीही आपोआप किंवा चमत्कारामुळे घडत नाही, तर त्यामागे सातत्यपूर्ण प्रयत्न असतात.हा मंत्र देऊन कष्टाचे महत्त्व पटवून दिले.तुकोबांनी रूढीवादी परंपरांना नाकारून सत्याच्या मार्गाचा अवलंब केला आणि प्रेषिताप्रमाणे लोकांचे जीवन उजळले.

शुद्ध बीजापोटी फळे रसाळ गोमटी।
मुखी अमृताची वाणी देह वेचावा कारणी।
सर्वांग निर्मळ चित्त जैसे गंगाजळ।
तुका म्हणे जाती ताप दर्शनी विश्रांती।।

हा तुकोबांचा सर्वात प्रसिद्ध सिद्धांत आहे. विज्ञानाच्या भाषेत सांगायचे तर, 'जेनेटिक कोड' (Genetic Code) किंवा गुणधर्म जे बीजात असतात, तेच फळात उतरतात. जर तुम्हाला गोड फळ हवे असेल, तर बीजही उत्तम दर्जाचेच पेरावे लागेल. माणसाचे विचार आणि कृती (कारण) जर शुद्ध असतील, तरच त्याचे जीवन आणि परिणाम (कार्य) चांगले मिळतील.

अंधश्रद्धा आणि कर्मकांडांवर प्रहार

संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगांच्या माध्यमातून तत्कालीन धर्मसत्तेवर आणि दांभिक लोकांवर कठोर टीका केली. 'दया तिचे नाव । भूताचे पालण आणिक निर्दालन । कंटकाचे ।।' या उक्तीतून त्यांनी दुष्टांचे निर्दालन

आणि गरिबांचे पालनपोषण हाच खरा धर्म असल्याचे सांगितले.समाजप्रबोधन आणि लोकभाषा: त्यांनी बहुजन समाजाला समजेल अशा लोकभाषेतून, म्हणजेच मराठीतून, अभंग रचना केली. कीर्तनांच्या माध्यमातून त्यांनी समाजप्रबोधन केले, जेणेकरून बहुजन समाज जागृत होईल.समाजात माजलेल्या बुवाबाजीवर आणि अंधश्रद्धेवर त्यांनी प्रखर शब्दात टीका केली. 'मुखे सांगे ब्रह्मज्ञान । जनलोकाची कापितो मान' किंवा 'नवसे कन्यापुत्र होती, तर का करावी लागती पती' यांसारख्या अभंगांतून त्यांनी लोकांचे डोळे उघडण्याचे काम केले.शुद्रांना ज्ञान ग्रहणाचा अधिकार नाकारला गेला असताना, तुकारामांनी समतेवर आधारित समाजाचा पुरस्कार केला. दुःखी माणसांना पाहून ते स्वतः दुःखी होत असत आणि त्यांचा छळ त्यांना पाहवत नसे.

त्यांनी आपले संपूर्ण जीवन समाजाच्या हितासाठी खर्ची घातले. 'नाचू कीर्तनाचे रंगी । ज्ञानदीप लावू जगी ।।' हे त्यांचे उद्दिष्ट होते. त्यांनी समाजातील चातुर्वर्ण्य व्यवस्था खिळखिळी करून कर्माचे श्रेष्ठत्व रुजविण्याचा प्रयत्न केला.तत्कालीन समाजात पसरलेल्या बुवाबाजीवर त्यांनी कडाडून टीका केली. अंगाला राख फासणे, जटा वाढवणे किंवा निव्वळ बाह्य अवडंबर करणे म्हणजे धर्म नव्हे, हे त्यांनी स्पष्टपणे सांगितले."नवसे कन्यापुत्र होती | तरी का करणे लागे पती"

हा अभंग म्हणजे शुद्ध तर्कशास्त्राचा नमुना आहे. जर नवस केल्याने मुले झाली असती, तर लग्नाची गरजच काय उरली असती? हा प्रश्न विचारून त्यांनी अंधश्रद्धेला मुळापासून हादरा दिला.

निरीक्षणात्मक दृष्टी (Observational Approach)

संत तुकाराम महाराजांची निरीक्षणात्मक दृष्टी ही त्यांच्या वैज्ञानिक विचारसरणीचा एक महत्त्वाचा पैलू आहे. त्यांनी केवळ ग्रंथांतील ज्ञान प्रमाण मानले नाही, तर सभोवतालचा निसर्ग, मानवी स्वभाव आणि सामाजिक व्यवहार यांचे सूक्ष्म निरीक्षण करून आपले तत्त्वज्ञान मांडले.

तुकोबांनी निसर्गातील घटकांचा वापर करून जीवनाचे मोठे सत्य सांगितले. झाडे, पक्षी, पाऊस आणि नद्या यांकडे त्यांनी केवळ सौंदर्य म्हणून पाहिले नाही, तर त्यातून मिळणाऱ्या शिकवणीचे निरीक्षण केले."वृक्षवल्ली आम्हा सोयरे..." या अभंगात त्यांनी पक्ष्यांचे गाणे, हवेची झुळूक आणि वृक्षांची परोपकारी वृत्ती यांचे निरीक्षण नोंदवले आहे. त्यांना जाणवले की, निसर्ग काहीही न मागता आपल्याला सर्व काही देतो.तसेच त्यांनी माणसांच्या वागण्यातील दांभिकपणा आणि प्रामाणिकपणा यांचे अचूक निरीक्षण केले होते. समाजात वावरणारे लोक वरून कसे दिसतात आणि आतून कसे असतात, याचे त्यांनी दर्शन घडवले.

"मुंगी उडाली आकाशी | तिणे गिळिले सूर्याशी" यांसारख्या रूपकांमधून त्यांनी मानवी अहंकाराचे किंवा आध्यात्मिक उंचीचे वर्णन केले. 'कावळयाच्या गळा मोती' किंवा 'गाढवाच्या पाठीवर चंदनाची पोती' यांसारखी उदाहरणे देऊन त्यांनी माणसाच्या अयोग्यतेवर आणि अहंकारावर प्रहार केला.त्या काळात चालणाऱ्या बाजारपेठा, कर्जव्यवहार (जो त्यांनी स्वतः केला होता) आणि कौटुंबिक कलह यांचे त्यांचे निरीक्षण दांडगे होते. त्यांनी सावकारी पाशातून सुटका करण्यासाठी लोकांची कर्जखते इंद्रायणीत बुडवली. हा निर्णय घेण्यापूर्वी त्यांनी समाजात कर्जबाजारीपणामुळे होणारी घरांची वाताहत जवळून पाहिली होती. विज्ञानात जसे 'Observation' (निरीक्षण) नंतर 'Inference' (निष्कर्ष) काढला जातो, तसेच तुकोबांनी केले. **"अनुभव आलियाविण | कोरड्या गोष्टी सांगू नयेत"** त्यांनी स्पष्ट केले की, जोपर्यंत तुम्ही स्वतः एखादी गोष्ट अनुभवत नाही किंवा तिचे निरीक्षण करत नाही, तोपर्यंत ती सत्य मानू नका. हीच दृष्टी आजच्या आधुनिक विज्ञानाचा मूळ आधार आहे.वैज्ञानिक नेहमी निसर्गाचे सूक्ष्म निरीक्षण

करतो. तुकोबांच्या अभंगात निसर्ग, प्राणी आणि मानवी स्वभाव यांचे अतिशय अचूक वर्णन आढळते. त्यांनी जगाकडे उघड्या डोळयांनी पाहिले. "सत्य असत्यासी मन केले ग्वाही,मानिऐले नाही बहुमता"असे म्हणत त्यांनी कोणत्याही गोष्टीची सत्यता स्वतःच्या अनुभवाच्या आणि विवेकाच्या कसोटीवर तपासून पाहण्यास सांगितले.संत तुकारामांची दृष्टी ही एका 'समाज-वैज्ञानिकाची' दृष्टी होती. त्यांनी समाजातील दोष केवळ पाहिले नाहीत, तर ते का आहेत याची कारणमीमांसा केली आणि त्यावर 'भक्ती' व 'विवेक' यांसारखे जालीम उपाय सुचवले. त्यांच्या अभंगांतील प्रत्येक दृष्टांत हा त्यांच्या सूक्ष्म निरीक्षणाचा जिवंत पुरावा आहे.संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगांच्या वह्या इंद्रायणी नदीत बुडवणे आणि त्या पुन्हा नव्याने कोरड्या बाहेर निघणे, ही घटना वारकरी संप्रदायात अत्यंत महत्त्वाची मानली जाते. पण या घटनेमागे केवळ 'चमत्कार' नसून एक खंबीर वैचारिक आणि क्रांतिकारी भूमिका होती.त्या काळातील परिस्थिती आणि तुकोबांच्या निर्णयामागची कारणे म्हणजे त्या काळी संस्कृत हीच ज्ञानाची भाषा मानली जात असे आणि विशिष्ट वर्गाचीच त्यावर मक्तेदारी होती. तुकोबांनी प्राकृत (मराठी) भाषेत अभंग रचून अध्यात्म आणि ज्ञान सामान्य माणसाच्या दारापर्यंत नेले. हे प्रस्थापित व्यवस्थेला मान्य नव्हते. त्यांनी तुकोबांवर दबाव आणला की, "शूद्राने वेदांत सांगणे हा अधर्म आहे." या दबावापोटी आणि धर्माज्ञेचा आदर राखण्यासाठी त्यांनी आपल्या वह्या नदीत अर्पण केल्या.तुकोबांचा स्वतःच्या विचारांवर आणि पांडुरंगावर अढळ विश्वास होता. त्यांनी विचार केला की, जर माझे अभंग 'सत्य' असतील आणि ते ईश्वराच्या प्रेरणेतून आले असतील, तर त्यांचे रक्षण तोच करेल. हा एक प्रकारचा 'वैचारिक सत्याग्रह' होता. त्यांनी स्वतःला आणि आपल्या साहित्याला निसर्गाच्या (पाण्याच्या) हवाली केले.तुकोबांच्या मते, त्यांचे विचार हे त्यांचे खासगी मालमत्ता नसून ते समाजाचे लेणे होते.

"आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने | शब्दांचीच शस्त्रे यत्न करू" जेव्हा त्यांचे हे शब्दांचे धनच हिरावून घेण्याचा प्रयत्न झाला, तेव्हा त्यांनी ते विसर्जित करून आपली निष्ठा सिद्ध केली. १३ दिवसांच्या अनुष्ठानानंतर जेव्हा वह्या तरंगल्या, तेव्हा तो केवळ कागदांचा विजय नव्हता, तर 'अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा' आणि 'सामान्यांच्या भाषेचा' विजय होता. कागद भिजला तरी त्यातील 'विचार' पुसता येत नाहीत. तुकोबांचे अभंग लोकांच्या मुखोद्गत (तोंडपाठ) होते. वह्या पाण्यात असल्या तरी त्या लोकांच्या हृदयात जिवंत होत्या.प्रस्थापितांनी त्यांना त्रास दिला, पण तुकोबांनी त्यांच्याशी युद्ध न करता स्वतःच्या साहित्याचा त्याग करून एक मूक पण प्रभावी क्रांती केली.या घटनेनंतर तुकोबांना विरोध करणाऱ्यांनीही त्यांचे श्रेष्ठत्व मान्य केले. मराठी भाषेला धर्माच्या आणि ज्ञानाच्या दरबारात मानाचे स्थान मिळाले.

पर्यावरणवादी विचार

संत तुकाराम महाराज हे जगातील पहिले 'पर्यावरणवादी संत' मानले जातात. आज ज्याला आपण 'Ecological Balance' किंवा 'Environmental Conservation' म्हणतो, तो विचार तुकोबांनी ४०० वर्षांपूर्वी आपल्या अभंगांतून अत्यंत साध्या भाषेत मांडला होता.तुकोबांनी निसर्गाला केवळ उपभोग्य वस्तू मानले नाही, तर त्याला आपल्या कुटुंबाचा भाग मानले. त्यांच्या सर्वात प्रसिद्ध अभंगात ते म्हणतात, **"वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे | पक्षीही सुस्वरे आळविती"** झाडे, वेली आणि वनातील प्राणी हे माझे 'सोयरे' (नातेवाईक) आहेत. पक्ष्यांचे गाणे हे माझ्यासाठी ईश्वराची प्रार्थना आहे. मानवाचा अस्तित्वासाठी निसर्गावर अवलंबून राहण्याचा 'Biological Interdependence' हा सिद्धांत तुकोबांनी नात्याच्या गुंफणीतून मांडला.तुकोबांनी चिंतनासाठी 'भामचंद्र' आणि 'भंडारा' या डोंगरांच्या निवडीतून हे सुचवले की, मानवी हस्तक्षेपाशिवाय निसर्ग अधिक शुद्ध असतो.त्यांनी

निसर्गातील शांततेचे वर्णन करताना म्हटले की, तिथे माणसांच्या कोलाहलापेक्षा निसर्गाचा 'संवाद' अधिक स्पष्ट ऐकू येतो. **"येणे सुखे येती अंतराची सुखे | वाचेसी कौतुके बोलताती"** निसर्गाच्या सानिध्यात राहिल्याने मनाला जे सुख मिळते, ते कोणत्याही भौतिक सुखापेक्षा श्रेष्ठ आहे.विज्ञानानुसार प्रत्येक प्राण्याचे अन्नसाखळीत महत्त्व आहे. तुकोबांनी हेच आध्यात्मिक भाषेत "भूतदया" म्हणून मांडले. **"तुका म्हणे दया | तिचे नाव तेचि गया"** कोणत्याही सजीवावर दया करणे हेच सर्वात मोठे तीर्थक्षेत्र आहे.त्यांनी प्राण्यांना छळणे किंवा त्यांची हत्या करणे याला कडाडून विरोध केला, कारण प्रत्येक जीवामध्ये तोच एक 'परमात्मा' वास करतो.तुकोबांचे जीवन इंद्रायणी नदीच्या काठी गेले. त्यांनी पाण्याचे पावित्र्य जपण्याचा संदेश दिला. त्यांच्या मते, पाणी हे केवळ तहान भागवणारे साधन नसून ते जीवन देणारे चैतन्य आहे. त्यांनी नदीला आईचा दर्जा दिला, जेणेकरून लोक तिचे प्रदूषण करणार नाहीत.आजचे विज्ञान ज्या पर्यावरणाच्या रक्षणाबद्दल बोलते, तोच विचार तुकोबांनी ४०० वर्षांपूर्वी मांडला होता.निसर्ग आणि मानव यांचा परस्पर संबंध त्यांनी वैज्ञानिक भाषेत सांगण्याऐवजी भावनेच्या भाषेत सांगितला, ज्यामुळे तो सामान्यांपर्यंत पोहोचला. झाडे आणि प्राणी हे आपले नातेवाईक आहेत, हे सांगणे म्हणजे जैवविविधतेचे (Biodiversity) महत्त्व ओळखणेच होय.संत तुकारामांचा पर्यावरणवाद हा केवळ कागदावरचा नसून तो त्यांच्या जगण्याचा भाग होता. "निसर्गाचा समतोल राखला तरच मानवाचे कल्याण होईल," हा वैज्ञानिक संदेश त्यांनी भक्तीच्या माध्यमातून घराघरांत पोहोचवला. आजच्या ग्लोबल वॉर्मिंगच्या युगात तुकोबांचे हे विचार अधिक मार्गदर्शक ठरतात.तुकोबांचे कुटुंब शेती आणि व्यापार करायचे. त्यांनी शेतीकडे केवळ उपजीविकेचे साधन म्हणून पाहिले नाही, तर तो त्यांच्या चिंतनाचा भाग होता. "पेरले ते उगवते" हा निसर्गनियम त्यांनी शेतातूनच शिकला. त्यांनी अभंगात म्हटले आहे की, जसा शेतकरी पिकाचे पाखरांपासून रक्षण करण्यासाठी 'गोफण' धरतो, तसे माणसाने आपल्या मनातील कुविचारांचे रक्षण करण्यासाठी विवेकाची गोफण धरली पाहिजे.त्यांच्या आयुष्यात पडलेल्या भीषण दुष्काळात त्यांनी पाहिले की, निसर्ग जेव्हा कोपतो तेव्हा माणसाचे सर्व अहंकार गळून पडतात. या काळात त्यांनी स्वतःच्या वाटणीचे धान्य गरिबांना वाटले, हा त्यांचा मोठा परमार्थ होता. कर्जखते इंद्रायणीत बुडवणेतुकाराम महाराजांच्या आयुष्यातील सर्वात क्रांतिकारी आणि धाडसी निर्णय म्हणजे त्यांनी त्यांच्या वाटणीची 'कर्जखते' (Loan Documents) इंद्रायणी नदीत बुडवली.तुकोबांचे वडील सावकारी करायचे. लोकांकडे कर्जाची कागदपत्रे होती. पण दुष्काळामुळे लोक कंगाल झाले होते आणि कर्ज फेडणे त्यांच्या आवाक्याबाहेर होते. तुकोबांना जाणवले की, ही कागदपत्रे म्हणजे लोकांच्या गळयातील फास आहेत. त्यांनी आपल्या वाटणीची सर्व कर्जखते गोळा केली आणि इंद्रायणीच्या डोहात विसर्जित केली. या एका निर्णयाने अनेक गरीब शेतकरी कर्जमुक्त झाले. **"माणूस वाचवणे"** हे कागदावरील "धनापेक्षा" श्रेष्ठ आहे, हे त्यांनी कृतीतून सिद्ध केले. हा आजच्या काळातील 'कर्जमाफी'चा सर्वात जुना आणि नैतिक आदर्श मानला जातो.

प्रयोगातून सत्य शोधणे

संत तुकाराम महाराजांना 'सत्यशोधक' म्हणणे अत्यंत यथोचित आहे, कारण त्यांनी आयुष्यभर सत्याचा शोध घेतला आणि जे सत्य उमजले ते समाजाला निर्भीडपणे सांगितले. महात्मा जोतिराव फुले यांनी जेव्हा 'सत्यशोधक समाजा'ची स्थापना केली, तेव्हा त्यांच्यावर तुकोबांच्या विचारांचा मोठा प्रभाव होता. किंबहुना, फुलेंनी तुकोबांच्या अभंगांच्या धर्तीवरच आपले 'अखंड' रचले.तुकोबांसाठी सत्य हे केवळ बोलण्यापुरते नव्हते, तर ते जगण्याचे साधन होते. त्यांनी स्पष्ट केले की, सत्य सांगताना कोणाचीही भीड बाळगू नये. "सत्य **असत्यासी मन केले ग्वाही | मानियले नाही बहुमता"** काय सत्य आहे आणि काय असत्य, याचा निर्णय मी माझ्या अंतरात्म्याच्या साक्षीने (Logic and

Conscience) घेतला आहे. बहुमताने (बहुतेक लोक जे म्हणतात ते) मी सत्य मानले नाही.अंधानुकरण न करता स्वतःच्या बुद्धीने सत्याचा शोध घेणे. त्या काळातील कर्मकांडांच्या जंजाळातून देवाला मुक्त करून त्यांनी तो माणसांत शोधला. "देव बाजारचा भाजीपाला नाही" असे म्हणून त्यांनी बुवाबाजीवर प्रहार केला.

"जे का रंजले गांजले | त्यासी म्हणे जो आपुले |
तोचि साधू ओळखावा | देव तेथेचि जाणावा"

हा विचार म्हणजे धर्मातील 'सत्याचा शोध' आहे. पीडितांची सेवा करणे हीच खरी भक्ती, हा सत्यशोधक विचार त्यांनी रुजवला.एक सत्यशोधक म्हणून त्यांनी समाजातील जातीभेद आणि उच्च-नीचतेवर कडाडून टीका केली.

"विष्णूꣳमय जग वैष्णवांचा धर्म | भेदाभेद भ्रम अमंगळ"

हे संपूर्ण जग एकाच तत्त्वाचे बनलेले असताना भेदभाव करणे हे 'अमंगळ' (अशास्त्रीय/पाप) आहे, असे त्यांनी ठासून सांगितले.सत्य हे केवळ संस्कृतमध्ये किंवा पोथ्यांमध्ये बंदिस्त नसून ते सामान्य माणसाच्या 'मराठी' भाषेतही असू शकते, हा मोठा शोध त्यांनी लावला. त्यांनी ज्ञानाची कवाडे सर्वांसाठी खुली केली. म्हणूनच त्यांना 'बंडखोर सत्यशोधक' म्हटले जाते.सत्याचा शोध घेणाऱ्याला नेहमीच संकटांना सामोरे जावे लागते. तुकोबांनाही मंबाजी गोसावींसारख्या लोकां कडून त्रास झाला, त्यांच्या वह्या बुडवण्यात आल्या. पण "सत्य ते कधीही लपत नाही" या न्यायाने ते तावून सुलाखून बाहेर पडले.'सत्यशोधक तुकाराम' म्हणजे एक असा महापुरुष, ज्याने ईश्वराच्या नावाखाली चालणारी लूट थांबवून माणसाला स्वाभिमानाने जगायला शिकवले. त्यांनी मांडलेला सत्याचा मार्ग हा विज्ञानावर आधारित आणि मानवतेचा पुरस्कार करणारा आहे.विज्ञान प्रयोगावर विश्वास ठेवते. तुकाराम महाराज म्हणतात, "अनुभव आल्याविण | कोरड्या गोष्टी सांगू नयेत". त्यांनी स्वतःच्या आयुष्यात भक्तीचा आणि नीतिमत्तेचा प्रयोग केला आणि जो अनुभव आला, तोच जगाला सांगितला. त्यांच्यासाठी 'अनुभव' हेच सर्वात मोठे प्रमाणपत्र होते.

निष्कर्ष:-

- संत तुकारामांचा वैज्ञानिक दृष्टिकोन म्हणजे केवळ प्रयोगशाळेतील प्रयोग नव्हे, तर 'विचारांची स्पष्टता' आणि 'विवेकाची जागृती' होय. त्यांनी माणसाला देवाच्या नावाखाली घाबरवण्यापेक्षा, स्वतःच्या कर्मावर विश्वास ठेवायला शिकवले.
- तुकोबांचा कार्यकारण भाव हा माणसाला 'दैववादाकडून' 'प्रयत्नवादाकडे' नेणारा आहे. त्यांनी ईश्वरालाही कर्माच्या चौकटीत पाहिले, ज्यामुळे सामान्य माणसाला स्वतःच्या जीवनाचा शिल्पकार होण्याची प्रेरणा मिळाली.
- इंद्रायणीत वह्या बुडवणे ही तुकोबांच्या 'धैर्याची' आणि 'निश्चयाची' पराकाष्ठा होती. त्यातून त्यांनी सिद्ध केले की, सत्य कधीही बुडत नाही आणि जे जनहिताचे असते, त्याचे रक्षण काळच करतो.
- तुकोबांनी शेती करताना 'काबाडकष्ट' केले आणि व्यवहार करताना 'प्रामाणिकपणा' जपला. त्यांनी जगाला शिकवले की, "प्रपंच करून परमार्थ साधता येतो." देव केवळ मंदिरात नाही, तर तो शेतात राबणाऱ्या कष्टकऱ्यांच्या घामात आहे, हाच त्यांचा खरा संदेश होता.

संदर्भ:-

1. वासुदेव पटवर्धन व गणेश केळकर - 'श्री तुकारामांच्या अभंगाची चर्चा (खंड १)' साहित्य अकादमी, पुनर्मुद्रन २००९
2. पठाण, डॉ.यू.म.- 'महाराष्ट्राची संत परंपरा', दिलीप राज प्रकाशन प्रा.लि., पुणे, प्रथमावृत्ती १५ ऑगस्ट २०१२
3. सावरकर, डॉ. सुभाष- 'संतवाङ्मयाचे जनसाहित्य मूल्य', मराठी जनसाहित्य परिषद अमरावती, प्रथमावृत्ती २८ मार्च २०१५

विदर्भातील शेतकऱ्यांच्या जीवनमान सुधारण्यात प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधी योजनेची भूमिका.

कु. दामिनी कापडे
संशोधक विद्यार्थीनी
मार्गदर्शक
डॉ. दिपक राऊत
(अर्थशास्त्र विभाग प्रमुख)
सरस्वती कला महाविद्यालय, दहिहांडा .

सारांश

भारत हा कृषिप्रधान देश असून शेतकरी हा देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा आहे. तथापि वाढता उत्पादनखर्च, कर्जबाजारीपणा, हवामानातील अनिश्चितता आणि शेतीमालाला मिळणारा अपुरा दर यांमुळे शेतकऱ्यांचे जीवनमान अस्थिर झालेले आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाने सन २०१९ मध्ये प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधी (PM-KISAN) योजना सुरू केली. या योजनेअंतर्गत पात्र शेतकऱ्यांना दरवर्षी रुपये ६,००० इतका निधी थेट बँक खात्यात जमा केला जातो.

सदर संशोधनाचा उद्देश विदर्भातील शेतकऱ्यांच्या जीवनमान सुधारण्यात प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधी योजनेची भूमिका अभ्यासणे हा आहे. संशोधनासाठी प्राथमिक माहिती प्रश्नावली, मुलाखत व प्रत्यक्ष निरीक्षणाद्वारे संकलित करण्यात आली असून दुय्यम माहिती शासन अहवाल, संशोधन लेख व अधिकृत संकेतस्थळांवरून घेण्यात आली आहे. संकलित माहितीचे विश्लेषण सांख्यिकीय साधनांच्या सहाय्याने करण्यात आले.

अभ्यासातून असे आढळून आले की, प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधी योजनेमुळे शेतकऱ्यांना तात्पुरता आर्थिक दिलासा मिळतो. या निधीचा उपयोग प्रामुख्याने बियाणे, खते, कुटुंबाचा दैनंदिन खर्च, आरोग्य व शिक्षणासाठी केला जातो. विशेषतः लहान व सीमांत शेतकऱ्यांसाठी ही योजना उपयुक्त ठरली आहे. मात्र दीर्घकालीन उत्पन्नवाढ, कर्जबोजा कमी होणे व आर्थिक शाश्वतता साध्य करण्यात हा निधी अपुरा असल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवनमान सुधारण्यात या योजनेची भूमिका सहाय्यक स्वरूपाची असली, तरी ती पुरेशी नाही.

Keywords: प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधी, विदर्भ, शेतकरी जीवनमान, आर्थिक परिणाम, कृषी धोरण

प्रस्तावना : भारतीय शेती क्षेत्र हे देशाच्या सामाजिक व आर्थिक रचनेचे मूलभूत अधिष्ठान आहे. विदर्भ हा महाराष्ट्रातील कृषीदृष्ट्या अत्यंत संवेदनशील प्रदेश मानला जातो. अल्प व अनियमित पर्जन्यमान, सिंचन सुविधांचा अभाव, कर्जबाजारीपणा आणि आत्महत्यांचे वाढते प्रमाण यांमुळे विदर्भातील शेतकरी मोठ्या आर्थिक व मानसिक तणावाखाली जीवन जगत आहे. अशा परिस्थितीत शासनाच्या कल्याणकारी योजना शेतकऱ्यांसाठी महत्त्वाचा आधार ठरतात.

प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधी योजना ही केंद्र शासनाची एक महत्त्वाची थेट लाभ हस्तांतरण योजना असून तिचा उद्देश शेतकऱ्यांना किमान आर्थिक आधार देणे हा आहे. या योजनेचा विदर्भातील शेतकऱ्यांच्या जीवनमानावर नेमका काय परिणाम झाला आहे, हे अभ्यासणे आवश्यक ठरते.

संशोधनाची गरज

- विदर्भातील शेतकऱ्यांच्या जीवनमानावर PM-KISAN योजनेचा प्रत्यक्ष आर्थिक परिणाम जाणून घेणे
- योजनेच्या अंमलबजावणीतील मर्यादा व अडचणी स्पष्ट करणे
- भविष्यातील कृषी कल्याणकारी धोरणांसाठी दिशादर्शक निष्कर्ष मांडणे

संशोधन उद्दिष्टे

- प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधी योजनेची विदर्भातील शेतकऱ्यांच्या जीवनमान सुधारण्यातली भूमिका अभ्यासणे

- शेतकऱ्यांच्या उत्पन्न व खर्चातील बदलांचे विश्लेषण करणे
- योजनेबाबत शेतकऱ्यांच्या समाधानाची पातळी तपासणे
- लहान व सीमांत शेतकऱ्यांवरील योजनेच्या परिणामांचा अभ्यास करणे

संशोधन गृहितके

- प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधी योजनेमुळे विदर्भातील शेतकऱ्यांच्या जीवनमानात तात्पुरती सुधारणा झाली आहे.
- लहान व सीमांत शेतकऱ्यांना या योजनेचा अधिक लाभ झाला आहे.
- या योजनेमुळे शेतकऱ्यांचा दीर्घकालीन कर्जबोजा कमी झालेला नाही.

संशोधन पद्धती: सदर संशोधनासाठी वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला आहे.

७) विश्लेषण व चर्चा

PM-KISAN योजनेअंतर्गत मिळणारा वार्षिक ₹६,००० चा निधी हा शेतकऱ्यांसाठी तातडीच्या आर्थिक गरजा पूर्ण करण्याच्या दृष्टीने महत्त्वाचा आधार ठरतो. विशेषतः शेतीच्या हंगामाच्या सुरुवातीला बियाणे, खते, कीटकनाशके, तसेच शेतीसाठी लागणाऱ्या लहानमोठ्या साधनांची खरेदी करण्यासाठी या निधीचा मोठ्या प्रमाणावर उपयोग केला जातो. विदर्भासारख्या दुष्काळग्रस्त व आर्थिकदृष्ट्या मागास भागात शेतकऱ्यांकडे त्वरित रोख रकमेची कमतरता असल्याने हा निधी तात्पुरत्या अडचणींवर मात करण्यास मदत करतो. या योजनेचा आणखी एक सकारात्मक परिणाम म्हणजे शेतकऱ्यांच्या कुटुंबाच्या दैनंदिन खर्चावर होणारा ताण काही प्रमाणात कमी होतो. अन्नधान्य, औषधोपचार, मुलांचे शिक्षण, वीजबिल, पाणीपुरवठा यांसारख्या मूलभूत गरजांसाठी शेतकरी हा निधी वापरत असल्याचे अभ्यासातून दिसून येते. परिणामी कर्ज घेण्याची तातडीची गरज काही अंशी टळते आणि आर्थिक तणावात थोडीफार घट होते. लहान व सीमांत शेतकऱ्यांसाठी हा दिलासा तुलनेने अधिक महत्त्वाचा ठरतो.

तथापि, वाढता उत्पादनखर्च हा या योजनेच्या मर्यादा स्पष्टपणे दाखवून देतो. बी-बियाणे, रासायनिक खते, मजुरी, सिंचन, वीज, कीटकनाशके आणि यांत्रिकीकरण यासाठी लागणारा खर्च गेल्या काही वर्षांत लक्षणीय प्रमाणात वाढलेला आहे. या पार्श्वभूमीवर वार्षिक ₹६,००० इतका निधी हा एकूण उत्पादनखर्चाच्या तुलनेत अत्यल्प ठरतो. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पन्नात मूलभूत वाढ होत नाही किंवा त्यांच्या कर्जबाजारीपणात लक्षणीय घट होत नाही.

याशिवाय, हा निधी ठराविक कालावधीत तीन हप्त्यांत दिला जात असल्याने तो दीर्घकालीन आर्थिक नियोजनासाठी उपयुक्त ठरत नाही. शेती व्यवसायातील जोखमी—जसे की नैसर्गिक आपत्ती, पीक नुकसान, बाजारातील दरातील चढउतार—यांवर मात करण्यासाठी आवश्यक असलेली आर्थिक सुरक्षितता या योजनेद्वारे मिळत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांच्या एकूण आर्थिक स्थितीत मूलभूत व शाश्वत बदल घडून येत नाहीत. एकूणच, PM-KISAN योजना ही शेतकऱ्यांच्या जीवनमान सुधारण्यासाठी एक सहाय्यक व पूरक उपाय म्हणून महत्त्वाची भूमिका बजावते. ती तातडीचा आर्थिक दिलासा देते, मात्र शेतकऱ्यांच्या आर्थिक समस्यांचे संपूर्ण निराकरण करण्यास अपुरी आहे. म्हणूनच या योजनेला पूरक स्वरूपात उत्पादनखर्च कमी करणारी धोरणे, किमान आधारभूत किंमत, कर्जसुलभता, सिंचन सुविधा व बाजारव्यवस्थेतील सुधारणा आवश्यक असल्याचे अभ्यासातून स्पष्ट होते.

निष्कर्ष

प्रधानमंत्री शेतकरी सन्मान निधी योजना ही विदर्भातील शेतकऱ्यांसाठी आर्थिक दिलासा देणारी योजना आहे. ती शेतकऱ्यांच्या जीवनमानात तात्पुरती सुधारणा घडवून आणते. तथापि दीर्घकालीन आर्थिक स्थैर्य, कर्जमुक्ती व शाश्वत शेतीसाठी ही योजना अपुरी आहे. म्हणूनच या योजनेस पूरक स्वरूपात सिंचन सुविधा, हमीभाव, बाजारव्यवस्था सुधारणा व कृषी कर्ज धोरणांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

संदर्भसूची

1. भारत सरकार – कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय : PM-KISAN योजना अहवाल
2. महाराष्ट्र राज्य कृषी विभाग अहवाल
3. संबंधित संशोधन लेख व जर्नल्स
4. कृषी अर्थशास्त्र विषयक पुस्तके

मराठीतील शाहीरी परंपरा: एक अभ्यास

प्रा. डॉ. सुनंदा चरडे

मराठी विभाग प्रमुख, कला व वाणिज्य महाविद्यालय, भिसी ता. चिमूर जि. चंद्रपूर

भुमिका :

महाराष्ट्रात अठराव्या शतकात थोडी वेगळी आणि स्वतंत्र वळणाची संत आणि पंडितांच्या कवितेपेक्षा वेगळी असणारी शाहिरी कविता लिहिली जात होती. ही लिहीणारे शाहीर म्हणजे राम जोशी, अनंत फंदी, सगनभाऊ, प्रभाकर, होनाजी बाळा, परशराम यांनी आपल्या लेखणी आणि वाणीतून डफ-तुणतुण्याच्या साथीने लोकांचे रंजन केले. त्यांच्या काव्याचे विषय आणि प्रेरणा वेगळ्या होत्या.

सन १८५० पूर्वी मराठीच्या इतिहासात अनंत कवी होऊन गेलेत. त्यांचा समावेश वेगवेगळ्या पद्धतीने केला जात होता तो म्हणजे संत, पंत आणि तंत. प्राचीन मराठी कवितेत प्रामुख्याने तीन प्रवाह दिसतात ते म्हणजे संत काव्य, पंडिती काव्य आणि शाहीरी काव्य असे तीन प्रमुख प्रवाह आहेत. प्रत्येक काव्यप्रकाराचे एक विशिष्टत्व जाणवते. ज्ञानेश्वर, नामदेव, एकनाथ, रामदास व तुकाराम इत्यादी संतांनी आपल्या ओवी अभंगाद्वारे केलेल्या रचनेस संत काव्य म्हणतात. मुक्तेश्वर, वामन पंडित , रघुनाथ पंडित, सामराज, श्रीधर, नागेश, मोरोपंत आदी पंडितांनी केलेल्या आख्यानपर रचनेला पंडितीकाव्य म्हणून संबोधण्यात येते. तर शृंगार आणि वीर रसाची आपल्या काव्यातून मुक्तपणे उधळण करणारे शाहिरी वांग्मय. हे लावणी आणि पोवाडा या आपल्या काव्यातून लौकिक जीवनातील विविध विषय गात असत.

बीज शब्द : पंडित, आख्यान, शाहीर, शाहिरी, राजाश्रय, बिदागी

प्रस्तावना

संतांच्या कवितेतून ईश्वराच्या भेटीची तळमळ आणि साधकावस्थेपासून मोक्षप्राप्ती पर्यंतच्या विविध मनोवस्थांचे चित्रण पाहायला मिळते. भक्ती, ज्ञान आणि वैराग्य ही संत कवितेची वैशिष्ट्ये आहेत. पंडित कवींनी रामायण, महाभारत, भागवत, पुराण, रघुवंश, कुमारसंभव, हनुमन्नाटक, शाकुंतल नाटक यांसारख्या विषयांना आणि रसांना आपल्या महाकाव्यातून आणि नाटकातून आपल्या आख्यानकाव्याचे विषय मांडले. त्यांना डौलदार भाषेने, तंत्रबद्धतेने आणि विविध वृत्तांनी आपले काव्य सजवले.

मोक्षप्राप्ती ही संतांची भूमिका मोक्षप्राप्तीसोबतच कवित्वाचा विद्वजन्य आस्वाद घेणे ही पंडितांची दृष्टी होती. संतांच्या समोर फारसा न शिकलेला बहुजन समाज होता तर पंडितांच्या समोर सुशिक्षित काव्य मर्मज्ञ असा वाचक वर्ग होता, श्रोता होता असे म्हणावे लागेल. मराठीतील आणि संस्कृतातील कलाविलास यांचा संगम म्हणजे पंडितीकाव्य म्हणता येईल.

"म.ना. अदवंत म्हणतात, संतकाव्य महाराष्ट्राच्या आध्यात्मिक जीवनाचे प्रतिबिंब असले तरी शाहिरी काव्य महाराष्ट्राच्या राजकीय आणि सामाजिक जीवनाचे प्रतिबिंब आहे."१ शाहिरी काव्याचे 'मराठ्यांची खरी गाणी' असेही वर्णन केले जाते. शाहिरी कवितेच्या मराठीपणाबद्दल वि. पा. दांडेकर म्हणतात, "मराठ्यांचे मनगट, मराठ्यांचे

मन, मराठ्यांच्या भावभावना, मराठ्यांचे आचार-विचार, मराठ्यांचा पोशाख आणि मराठ्यांचा मानधनी मोठेपणा या सर्वांचे प्रतिबिंब लावण्यांमध्ये व पोवाड्यात उत्तम प्रकारे पडले आहे हे खरे मराठी काव्य होय."२

शाहीर हे नाव अरबी-फारसी भाषांमधून बहामनी राज्याच्या अमलापासून मराठीत सुरू झाले. शाहीर म्हणजे कवी आणि शायरी म्हणजे कविता. शाहीर म्हटला म्हणजे लावण्या आणि पोवाडे यांची रचना करणारा कवी असे म्हटले जाते. शाहिरी कवितेची दोन अंग म्हणजे पोवाडे आणि लावण्या ही आहेत. पुरातन काळापासूनच पोवाडयामधून वीरांच्या पराक्रमाचे, त्यांच्या सामर्थ्याचे, त्यांच्या विद्वत्तेचे त्यांच्या कला कौशल्याचे वर्णन केले जाते. हे वर्णन म्हणजे ठासून केलेली स्तुती होय. अशा या स्तुतीपर पोवाड्याला म. ना. सहस्त्रबुद्धे कीर्तिकाव्य म्हणतात.

काव्यरचनेची जी कृती आहे तिला सुकृती असे म्हणतात, "महाराष्ट्रात कुलधर्माच्या वेळी गोंधळ घालण्याचा प्रकार फार पुरातन आहे. नामदेवांच्या वेळीही हा प्रकार होता. या गोंधळातून पोवाडा हा प्रकार पुढे विकसित झाला असावा."३

पोवाड्यातील धावती, ओघवती रचना तसेच तुटक पण आवेशपूर्ण भाषा यामुळे ते ऐकताना श्रोत्यांच्या मनात वीर रसाची निर्मिती होऊन त्यांचे देहभान हरपल्याशिवाय राहत नाही. पोवाडा हा दृकश्राव्य काव्य आहे. वि. का. राजवाडे त्यास चंपूकाव्य म्हणतात. त्यांच्या मते पोवाडा हे नाटक आहे नाटकात ज्याप्रमाणे अनेक पात्र असतात, तसेच पोवाड्यात मुख्य शाहीर आणि त्यांचे साथीदार असतात. पोवाडा म्हणजे एक स्तुति स्तोत्रच असते. पूर्वीपासूनच आपल्याकडे असे स्तुतिस्तोत्र भाट गात असत. आपल्या आश्रयदात्याचे पराक्रम पोवाडयातून गाऊन सांगत असत, अगदी हेच भाटांचे कार्य पुढे शाहिरांनी केले.

पोवाड्यामधून वीर रसाबरोबरच करूणरसही जाणवतो. पोवाड्यांमधून मराठ्यांच्या सामुदायिक भावजीवनाचे चित्रण किंवा तत्कालीन लोक जीवनाचे चित्रण शाहीर आपल्या काव्यातून करीत होते. व्यक्तीने केलेला कुठलाही पराक्रम असो अथवा राजकारणातील महत्त्वपूर्ण घटनांचे वर्णन शाहीर यथातथ्य करीत असत. त्याचबरोबर सांस्कृतिक जीवनाचे प्रतिबिंब त्यात दिसते. प्राचीन मराठीतील सुमारे ३०० पोवाडे उपलब्ध आहेत. शाहिरांनी पोवाडातून केलेली रचना स्वयंपूर्ण असल्याचे इतिहास सांगतो. पोवाड्यातील रचना कुणाच्यातरी आज्ञेवरून किंवा सांगण्यावरून झाल्याचे म्हटले जाते. पुढे इ.स. १८१८ मध्ये स्वराज्य जाऊन ब्रिटिश राज्य सुरू झाले आणि शाहिरांच्या वाणीतील ओजही त्याबरोबर लुप्त झाले असे इतिहास सांगतो. शेवटी शाहिरांवर पोटासाठी स्तुतिस्तोत्र गाण्याची वेळ आली. प्रभाकर आणि परशराम हे शाहीर इंग्रजी अंमलापर्यंत जिवंत असल्याचेही सांगण्यात येते.

शाहिरी कवितेचे दुसरे अंग लावणी हे होय. एकेकाळी संपूर्ण महाराष्ट्राला वेड लावणारी लावणी ही पोवाड्यापेक्षा नाजूक आणि अटकर बांधण्याची होती. पोवाडा हा काहीसा रांगडा ओबडधोबड म्हणावा असा होता. लावणी ही सामाजिक जीवनातून निर्माण झाली, तर पोवाडे हे राजकीय जीवनातून निर्माण झाले. शृंगार हा लावणीचा रसराज होता, लावणी मध्ये प्रणय धुंद अशी चित्रे जास्त प्रमाणात आढळतात. लावणीद्वारे वैश्विक सुखाची प्राप्ती काही अभ्यासक करून द्यायचे. अशा या लावणीचा जन्म पूर्वपेशवाईमध्ये झाला आणि पाणीपता पासून पुढे स्वराज्य नाशाच्या कालखंडापर्यंत लावणी बहरतच गेली. मराठी साम्राज्याचा विकास आणि विस्ताराचा जो कालखंड होता तोच लावणीचा जन्म आणि विकासाचा कालखंड मानला जातो. तो अमाप अशा वैभव संपन्नतेचा काळ होता. त्यामुळे एहिक जीवनात सुखोपभोग आणि विलासी जीवन याला ऊत येत होता तेव्हा शाहिरांना मोठ्या प्रमाणात लोकाश्रय आणि राजाश्रय सुद्धा मिळत होता अशा या काळात लावणीला उधाण आले.

लावणीच्या उत्पत्ती विषयी वेगवेगळ्या कल्पना केल्या जातात. त्या म्हणजे शेतात लावणी करताना म्हटले जाते ते लावणी गीत होय असेही सांगितले जाते. परंतु कुठे कुठे "लावणी हे लोकगीत असले तरी कृषीगीत नाही. 'लवण' म्हणजे 'सुंदर' त्यावरून 'लावण्य' या भाववाचक नामाप्रमाणे स्त्री सौंदर्य वर्णन पर काव्य म्हणजे लावणी अशी व्याख्या केली जाते."४

लावणी हा शुद्ध मराठी काव्य प्रकार असल्याचे सांगतात. शोभिवंत अथवा सुभग रचना या अर्थाने शाहिरांनी आपल्या काव्यास लावणी हा शब्द वापरला असावा असे म.वा. धोंड यांना वाटते..... तर 'जी हृदयाला चटका लावते ती लावणी' अशी लावणीची व्याख्या अ. ब.कोल्हटकरांनी केली आहे.' संत कवितेतील गवळणी आणि विरहणी मधील भावदर्शनाचे स्वरूप लावणी सारखेच म्हणता येईल असे आहे. पंडित कवींचे काही आखाडे लावणीशी मिळते जुळतेच आहे. पुढे पुढे काळाबरोबर लावणीला रागदारीची जोड मिळाली आणि तमाशाच्या फडातून ती कलावंतीच्या बैठकीत तिने प्रवेश केला. लावणीचे शृंगारिक गाणे झाले

लावणी ही सामाजिक जीवनातून लोकरंजनासाठी रचल्या गेली आणि जनसमुदायासमोर सादर झाली. लावणीचा एक वेगळा आपला ढंग आणि ताल होता ती लावणीच्या रचनेतील कौशल्य सादर करताना दिसत होती. या लावण्या जनसमुदायासमोर सादर होताना शाहिरांच्या मनात बिदागीची अपेक्षा होती. बहुजन समाजाला आवडतील आणि त्यांना आपलेसे करतील असे विषय लावणीत निवडण्याची शाहिरांची भूमिका लक्षात घेण्यासारखे आहे. त्यामुळे लावण्याप्रमाणे शाहिरांचे उपदेश पर फटके ही लोकप्रिय ठरले. शाहिरांनी काव्यात अस्सल मराठी मनाचे प्रतिबिंब पहावयास मिळते. असे हे लावण्यासाठी प्रसिद्ध असणारे शाहीर आणि त्यांच्या लावण्यांचा थोडक्यात परिचय या शोधानिबंधा द्वारे घेऊन लावणीचे स्वरूप बघूया स्वरूप बघूया.....

अनंत फंदी

अनंत फंदी यांचा जन्म इ.स.१७४४ मध्ये झाला असून ते मुळचे संगमनेरचे .त्यांच्या पूर्वजांचा धंदा गोंधळीपणाचा आणि सराफीचा होता अशी आख्यायिका आहे की भवानीबाबा नावाच्या साधूंनी धोंडा मारला आणि तेव्हापासून त्यांना कविता करण्याची स्फुर्ती झाली. आपल्या कविता नंतर ते शाहीर बनले आणि पेशव्यांच्या दरबारातील ते कवी झाले.

'फांदी अनंत कवनाचा सागर किंवा मोठमोठ्या राज्यांमधि महशूर । जगजाहिर चारी तर्फा' असे होनाजी बाळाचे फंदी यांनी वर्णन केले आहे. अहिल्यहोळकर यांच्या आदेशामुळे ते कीर्तनाकडे वळले आणि कीर्तनकार म्हणूनही त्यांचा लौकिक झाला. फंदी यांचे सात पोवाडे आणि काही लावण्या उपलब्ध आहेत तसेच अनंत फांदी यांचे फटके आजही लोकप्रिय आहेत. 'माधवग्रथ' किंवा 'माधवनिधनकाव्य' हे ३५९ ओव्यांचे काव्य दुसऱ्या बाजीरावांनी फंदीकडून लिहून घेतलेले आहे. हा काव्यग्रंथ बाजीराव लिहून घेण्यामागे बाजीरावांची फंदीवर असलेली मर्जी दिसून येते . खरडयाच्या लढाई वरील पोवाडा त्यांचा प्रसिद्ध आहे. काही काळानंतर फंदींनी पुणे प्रांतावरील कारभारावरही पोवाडे लिहिले आहेत. इतर काही कारणामुळे बाजीरावांची फंदीवर गैरमर्जी झाली आणि पुढे त्यांनी बाजीरावाच्या निंदेने भरलेले पोवाडे गाऊ लागले. तसेच दुष्काळ, पेंढार आणि रावबाजींच्या कारकिर्दीतील अंदाधुंदी या विषयावरही त्यांनी बरीच कवणे लिहिलेले आढळतात. ती लावणी म्हणजे 'उलटा जमाना आला रे । सेवक स्वामीचे मानीना' अनंत फंदी यांनी कधी आपल्या लावण्यांमधून समाजाचे सूक्ष्म निरीक्षण केलेले दिसते. तसेच जीवनातील काही कटु अनुभव आले आणि भोवतालच्या परिस्थितीच्या निरीक्षणातून त्यांच्या लेखनीला उपरोधाची धार

चढल्याचेही लक्षात येते. अशा प्रकारची त्यांची रचना म्हणजे, 'हे मुर्खा खूण तर्का पर्का पुरुष आपला नसे.' या लावणीतून 'दिसते तसे नसते' असे सत्य त्यांनी 'म्या म्हटले हा चक रुपया दिसतो माल खरा ! वाजून जो पाहतो तो आंत तांब्याच्या भुरभुरा' असा उपरोध व्यक्त करतात , तर 'फंदी आनंदाचे छंद जिव्हरी शस्त्र भोस्कितसे' असा आपल्याच शैलीबद्दलचा विश्वास प्रकट करतात.

अनंत फंदी यांची चंद्रवळ प्रसिद्ध लावणी आहे. त्यांची कल्पना शक्ती सुमार असल्यामुळे त्यांच्या लावणी तून विविध विषय हाताळलेले दिसतात.

उदाहरणार्थ,

'अनंत भगवंताचे नामे त्यातूनही उत्तम गाईला उद्धरती अधम'

'धन्य तुझे लावण्य'

'मांड्या गुडघ्या सरळ पोटऱ्या पायी जोडवी खाणाणी । जसे घोड्याचे नाल वाजती आवाज कानी दनानी '

' बिकट वाट वहिवाट नसावी धोपट मार्गा सोडू नको । संसारामध्ये ऐसा आपला उगाच भटकत फिरू नको '

'स्नेहासाठी पदर मोड कर परंतु जामिन होऊ नको'

'बरी खुशामत शहाण्याची ही मूर्खाची ती मैत्री नको । कष्टाची बरी भाजिभाकरी तूपसाखरेची चोरि नको'

अशा रचनेतून संसारी माणसाला वर्तन क्रमाचा आदर्श घालून दिला.

'शोध करी रे मना । हरिभजनाविण अवघे वृथा'

'दे सोडुनि तरी फंद वाउगे विषयाची तरी काय मजा । हरिनामाची लाव ध्वजा'

'सत्कर्माचा तोटा । समय खोटा रे खोटा '

'फांदी आनंदाची कविता । सवाई खोटा रे खोटा '

अशाप्रकारे अनंत फंदींचे फटके म्हणजे काही उपदेश पर सुंदर कवने आहेत, कधी ते संसारिकांना व्यावहारिक उपदेश करतात, तर कधी तडफदार आणि आत्मविश्वास पूर्वक निर्भीड अशी भाषा त्यांच्या काव्यात दिसते. अशा या शाहीराचा १८१९ मध्ये अंत झाला.

परशराम

इ. स. १७५४ मध्ये जन्मलेल्या शाहीर परशराम यांच्या लावण्या जास्त प्रमाणात प्रसिद्ध असल्याचे दिसून येते. त्यांच्या लावणी मध्ये राजकीय परिस्थितीचे स्पष्ट आणि निर्भय चित्रण दिसते. रामजोशी हे शाहीर मूळचे सिन्नर तालुक्यातील वावी या गावचे राहणारे होते. त्यांच्या घरात शिंप्याचा व्यवसाय होता. त्यांच्या जीवनाविषयी फारशी माहिती उपलब्ध नाही, परंतु वयाच्या पंधराव्या वर्षी त्यांनी विठ्ठलाची उपासना केली होती असं सांगण्यात येते, आणि देवपूरकर बाबा भागवत हे त्यांचे गुरु होते. त्यांच्या गुरुच्या आदेशानेच ते पोवाडे आणि लावण्याकडे वळले. त्यांचा अभ्यास फारसा नसला तरी रामायण महाभारत आणि संत साहित्याचा त्यांना चांगला परिचय होता असे त्यांच्या सकस अशा लेखणीतून आपल्याला हे स्पष्ट जाणवते. त्यामुळे त्यांचे काव्य अधिक संपन्न झाल्याचे दिसते. त्यांनी विना हाती घेऊन स्वतःच्या लावण्या गोड सुरात गायल्या.

तमाशामध्ये पुरुषाने स्त्रीचे सोंग घेण्याची प्रथा ही परशुराम यांच्या लावणीतूनच पडल्याचे मानल्या जाते. त्यांची प्रसिद्धी दूरपर्यंत पसरलेली होती. होनाजींच्या लावणीला उत्तर म्हणून त्यांनी 'पश्चिम-वाहिनी गोदा , प्रतिमूळ

गंगा' ही लावणी म्हणून दाखवली. या लावणी मधील गंगेची व पर्यायाने राघोबा व बाजीराव यांची स्तुती आवडून स्वतः बाजीरावांनी त्यांना जहागिरी देवू केली, परंतु परशरामांनी त्यांना खालील काव्यरचनेतून नकार दिला.

'पोट भराया उभारीला ना तमाशाचा धंदा
महाल मोकासे जहरी वळसे करितील अपुला बनला
सुईदोऱ्याला हयात असों द्या तोचि इनाम मोकासा
निजकर्मी रत नर झाल्यावर काय उणा मग त्या पैसा ।।'

पण शेवटी त्यांना पोटासाठी स्वाभिमान विकावा लागला असं दिसतं. त्यांच्या नि:स्पृहपणाचा ठसा काव्यरचनेवर उमटलेला बघून "श्री.म. वर्दे म्हणतात, दरबारी कारस्थानाची झळ न लागलेला, शहराच्या सोजल्यांची बाधा न झालेला, रावबाजीच्या आणि अनीतिकर्दमापासून अलिप्त असलेला, खेड्यापाड्यातील , शेतमाळावरील, झोपड्याखोपटामधील मोकळा, स्वतंत्र, साधाभोळा दिलदार, बाणेदार, हौशी, उघड्या मनाचा खरा मराठा परशुरामाच्या लावणी तर बघायला मिळतो."५

'राजांचे झाले फर्जी'
' सुरत्वाशी डाग लागला'
' राव्या परी पिंजऱ्यात कोंडले'
'रथगाड्या अंबा-या पालख्या टांगून ठेवल्या आढयाला। धमण्या छकडे म्याने बसाया दुखणाईत जीव मढयाला'

परशुराम यांनी आपल्या लावणीतून इंग्रजी आमदानीतील समाजाचा चित्रण यथातथ्य केलेले दिसते. इंग्रजी धनु बुडाला शूर सरदार झाला अशा या इंग्रजी आमदानी मध्ये परशुरामांनी निर्भयपणे काव्य आपल्या लावणी, पोवाडयातून व्यक्त केले. त्यासाठी परशुरामाला 'हे लक्ष्मीला आलेले मूळ' आहे असे म्हटले गेले आहे. ते आपल्या पोवाडे आणि लावणीतून शीलहिन आणि पोकळ अशा लोकांचा समाचार घेतात. अशा लोकांची त्यांना चिड येते. परशुरामांच्या लावण्यांमध्ये विषयवैशिष्ट्य जास्त प्रमाणात जाणवते. 'ऊठ झाला प्रांत:काळ' ही लावणी म्हणजे 'घनश्याम सुंदरा'चेच दुसरे रुप होय असे म्हटले आहे. 'सती सुलोचना ' हे त्यांचे पौराणिक विषयावर आधारित काव्य आहे. तसेच त्यांच्या 'मानवी जीवनाची कहाणी', 'काळीगोरीचे भांडण' अशा वेदांत पर लावण्या सुद्धा प्रसिद्ध आहेत. त्यातून मानवी जीवनाचे चित्र त्यांनी उभे केले. रा.श्री.जोग 'धड संत नव्हे, धड शाहीरही नाही' असे उद्गार काढतात.

शाहीर परशराम हे पेशवेकालीन ऐश्वर्याचे वर्णन त्यांच्या लावण्यातून येते. तसेच त्यांच्या लावणी मध्ये पतिव्रतेचे अनुकरण करणारी बाष्कळ स्त्री, सवतींचे भांडण, लढाईतून पळून आलेला पण फुशारकी मारणारा शिपाई तर नवऱ्याला वेगळे होण्याचा आग्रह धरणारी दुधड नारी अशी विनोदी चित्रे त्यांच्या लावण्यात आढळतात अशा प्रकारच्या काही लावण्या पुढील प्रमाणे -

पहिल्यापासून केली कमाई कवडी कवडी पुसा
तोडा सुतळीचा वाटून घ्या तुम्ही बरोबरीचा हिस्सा
नग डागिने घडवा मजला रोकड हुंडी दुसा
माझ्या माहेरी जाऊन राहू बिनघोराने असा

प्रस्तुत लावणीतून नवऱ्याजवळ आग्रह धरणारी स्त्री दिसते.तर 'सांड गावामध्ये फिरतो भांड रिकामटेकडा असून

इकडील काडी तिकडे करीना घर कसे चालेल बसून ?

तीन तुकड्याचे एक मुंडासे तीनदा बांधी कसून

डावे कानावर ठेवूनी पागोटे वर तीन पाणी खोसून '

अशा प्रकारे आपल्या लावणीतून ऐतखाऊ नवऱ्याचे विनोदी, उपहासपूर्ण वर्णन शाहीर परशराम करतात. आपल्या शब्दातून व्यक्तीचित्र निर्मिती करण्याचा सामर्थ्य परशुरामांच्या लावणीतून आपल्याला दिसते. उदाहरणार्थ,

'निर्मळ मुखडा चंद्राकार । सरळ नाकाची शोभतेधार'

'गगनात चांदणी ठळक मारीशी झळक उभी गं अंगणी। किती नटून थटून मारशिल छनाछन नयनाच्या संगिनी ।'

'गोरे गाल जसा नरम खवा '

'कुसुंबी गाल जशी बनात '

अशा गावरान उपमा देतात. रामजोशींचा भाषा विलास आणि होनाजींचे भावनासौंदर्य परशुराम जवळ नसले तरी विसंगती दर्शनातून विनोद निर्मिती करण्याचा आगळेपणा मात्र त्यांच्यात होता. असे म्हणतात त्यांनी स्वतः 'आजपासून आमचे मरण चार दिवसांनी आहे, गंगेच्या काठी मंजुरास मरण्यास जातो' असे त्यांनी सर्वांना सांगितले होते आणि खरोखर चौथ्या दिवशी १८४४मध्ये त्यांना मृत्यू आला.

रामजोशी

पंडित कवी आणि शाहीर अशा दोन परंपरांना जोडणारा दुवा म्हणजे रामजोशी. त्यांचे मूळ घराणे सोलापूरचे असून त्यांच्या घराण्यात विद्वत्तेची परंपरा असताना ते शाहिरांच्या फडातच अधिक रमले. रामजोशी यांचे व्यक्तिमत्व व्युत्पन्नता आणि कवित्व यांच्याशी जोडले असले तरी त्यांची वृत्ती अत्यंत रंगेल होती असे . शा.सं. बाबा पाध्ये यांच्याकडे पंढरपूर येथे त्यांनी अध्ययन केले. संस्कृतचा गाडा अभ्यास असणारे हे एकमेव शाहीर होते. मोरोपंतांच्या उपदेशामुळे रामजोशी किर्तन करू लागले. मोरोपंत त्यांना 'कविप्रवर' असे संबोधत असे. रामजोशी स्वतःचा उल्लेख 'कविराय' असा करत असत. मोरोपंतांच्या काव्यरचनेची छटा राम जोशींच्या कवणात दिसते. "श्री.म.वर्दे म्हणतात,संस्कृतच्या अध्ययनामुळे त्यांच्या कवनास विशेषतः शृंगरास संस्कृत वाङ्मयातील शृंगाराचे वळण लागले. इतर शाहिरांच्या इतके त्यांच्या लावण्यात मराठी वळण, मराठी भावनाही आढळत नाहीत. एकंदर शाहिरी वाङ्मयात त्यांची सभ्यता विशेष दिसते. त्यांच्या लावण्यात स्त्रीच्या यौवनाची, प्रियकरांसाठी होणाऱ्या तळमळीची वर्णन असले तरी ते सर्व वैवाहिक जीवनातील प्रस्थापित नितीच्या मर्यादेत राहिली आहे."६

'सुंदरा मनामध्ये भरली जरा नाही ठरली हवेलित शिरली मोत्याचा भांग' किंवा 'अंगि तारुण्याचा बहर ज्वानिचा कहर मारिते लहर मदन तलवार'

'कुण्या ग सुभगाची मंजिरी' त्यांच्या लावणीत जसे शृंगाराचे वर्णन आहे तसेच कृष्ण-गोपींच्या वसंतातील रासक्रीडेचे वर्णन सुद्धा आलेले दिसते.

'श्रीरंग गोपिकोत्संग धरुनि करि रंग हा बाई

कुंजात मातला वसंत सांगू मी काई'

'झाली तरुणपणाची धूळ पती नाही सेजेवरी सुंदरा रडे मुळमूळ'

' तुम्ही सजना- सुजणा घ्या आदराचे पान । मज दुबळीचा राखा स्वाभिमान'

कुठे विरहव्याप्त नायिका तर कुठे नव-याची विनवणी करणारी नायिका दिसते.तसेच त्यांच्या लावणीत देवदेवतांविषयीचे उल्लेख जास्त प्रमाणात आढळतात.महाराष्ट्रभर प्रवास करुन त्यांनी पंढरपूर पासून तुळजापूरच्या भवानी पर्यंतचे वर्णन आहे.

'भूतळात जशि या स्थळांत यमुनाचाळांत हिमनगबाळ
अशी भुवनत्रयि कोणती दुजी वेल्हाळा
कुचतट कसूनि सूचिदटा घाटशिल घटाव करिते माता भक्ताची वाट पाहतसे येता जाता
कुणी कसा असो जन पिसा विमानी बसा म्हणति सुर आता या पापनाशी तीर्थात जाऊन नाहता'

या ओळींबरोबरच रामजोशी यांच्या काही लावण्या मनाची पकड घेणाऱ्या आहेत, त्या पुढील प्रमाणे 'नरजन्मामधि नरा करुनि घे नर नारायणा गडी । तरिच हे सार्थक मानवकुडी' दो दिवसाची तनु हे साची, सुरत रसाची करुनि मजा । गमजा करितां मनि उमजाना हे सुख न पुढे पडेल वजा ।। भाई सावध व्हा ।।' या त्यांच्या लावण्या आजही लोकप्रिय आहेत.

'हटातटाने पट्टा रंगवूनी जटा धरीशी का शिरी । मठाची उठाठेव का तरी । वनांत अथवा जनांत हो का मनात व्हावे परी । हरीचे नाव भवाबुधि तरी ।। काय गळयात घालशी तुळशीची लाकडे । ही काय भवाला दूर करितील माकडे । बाहेर मिळविशी । आंत हरिशी वाकडे ।अशा भक्तीच्या रसासहित तू कसा म्हणावीशी बुधा हरि रस सांडूने किसी दुधा' अशा प्रकारे भाषेचे लालित्या त्यांच्या लावण्यामधून आपल्याला दिसते. रामजोशी यांचे पोवाडे फार थोडे आहेत. 'ब्राह्मणी राज्य जोरदार' लंकाच पुण्यामध्ये लेशन दारिद्र्याचे साक्षात विष्णू अवतार पेशवे कूळ', असे पेशवाईचे ते वर्कतात पेशवाईच्या वैभवाचे वर्णन ते करतात.

'चिका आत ज्या निका पढविल्या पिकाशी गळ लावीती। विकावया त्या नेल्या किती अबला उरल्या जन चुंअशी समाजातील दैन्यावस्था ऐंशी ही गाठ बयाबाईची मज पडली साची कविता इजसंगे रंगाली'त्यांनी आपल्या अनेक लावण्यांना स्वरांची जोड दिली अशा या लावणी काराची बाजीरावांना कदर होती . त्यांनी बिदाग्या आणि देणग्या त्यांना दरमहा २५ रुपयाची नेमणूकही करून दिली होती. रामजोशी हा यशस्वी कीर्तनकार आणि शाहीर व्यक्तिगत जीवनात मात्र विलासी आणि मद्यपी होता. तो मिळालेला सगळा पैसा आणि वैभव व्यसनात उधळून दरिद्री झाला होता. शेवटी काशीयात्रा घडावी म्हणून तो रावबाजी जवळ आला पण त्याला मदत मिळाली नाही आणि शेवटी काशीयात्राही मिळाली नाही. शेवटी असा हा कविराज शाहीर रामजोशी इ.स. १८१३ मध्ये स्वर्गवासी झाला. प्रमाणे रामजोशी 'कविराय चमकला हिरा' असा स्वतःचा गौरव पूर्ण उल्लेख करतात शाहिरांना ते काजवे संबोधतात. पंडित्य आणि पाचकळपणा, विद्वत्ता आणि ग्राम्यता, वैराग्य आणि व्यसनांधता यांचे काही अलौकिक मिश्रण त्यांच्या चरित्रात आणि कवित्वातही आढळते.

प्रभाकर

प्रभाकर जनार्दन दातार या शाहिराचा जन्म इ.स. १७६९ रोजी नासिक जिल्ह्यातील गंगापूरला येथे झाला. वयाच्या २२ व्या वर्षी तो पुण्याला कारकून म्हणून राहिला आणि इथूनच पुढे तमाशाच्या जगाशी त्यांचा संबंध आला आणि आपल्या प्रतिभेच्या जोरावर त्याने 'प्रभाकराचे कवन पसरले सहज शतावधी नगरात' अशी लोकप्रिय लावणी गायले. बाजीरावाची त्यांच्यावर मर्जी होती. बाजीरावांवर जवळजवळ त्याच्या ३०-३२ लावण्या प्रभाकरांनी लिहिल्या आहेत. प्रभाकर या शाहिरांनी पेशवाईचा उत्कर्ष आणि दैन्यावस्था अशा दोन्ही अवस्था पाहिल्या होत्या.

सवाई माधवरावांच्या रंगाचा दरबार, खरड्याची लढाई, सवाई माधवांचा मृत्यू, रावबाजींची विलासी कारकिर्द या सर्व गोष्टी प्रभाकर यांच्या हयातीतच घडलेल्या होत्या.

प्रभाकरांचे पोवाडे जास्त प्रमाणात उपलब्ध आहेत. त्यांच्या एकंदर तेरा पोवाडांपैकी दोन दुसऱ्या बाजीरावांवर तीन सवाई माधवराव आणि दोन पेशवे वंश वर्णन पर आणि बाकीचे राघोजी यांगरे, नाना शंकर शेठ इत्यादी व्यक्तींवर लिहिलेली आहे. प्रभाकरांनी लिहिलेले पोवाडे करुन रसपूर्ण असून हृदयाला पिळ पाडणारे आहेत. पोवाडे हे करूनरसपूर्ण असून हृदयाला पिळ पाडणारे आहेत. पोवाडे म्हणजे मराठी भाषेचा बहुमोल असा अलंकार मानले जातात. त्यांचे सर्वच पोवाडे उत्कृष्ट आहे. त्यांच्या सर्व पोवाडा विषयी गं.भा. निरंतर म्हणतात,' माधवरावांविषयी नितांत आदर दाखवणारा प्रभाकर रावबाजींच्या ही कवणात तितकाच तन्मय झालेला दिसतो. आणि कसाही असो कोणीही असो त्याच्या सेवेसाठी प्रभाकराच्या कविता हजर असावयाचे' पेशवाई गेल्यावर प्रभाकराचा आधार तुटला आणि पोटासाठी लाचार होऊन दारोदार भटकण्याची पाळी त्याच्यावर आली. या लाचारीमुळे नाना शंकर शेठ, पेस्तनजीशेट, स्प्रिंगल साहेबांचे मोजणी ऑफिस यांवर त्यांना पोवाडे लिहावे लागले. इ.स.१८४३ मध्ये त्यांना मृत्यू आला.

प्रभाकरांच्या लावणीतील शृंगार वेगळा आहे.बाजीरावांच्या विलास वर्णन पर त्यांच्या ३०/३२ लावण्या प्रसिद्ध आहेत. त्यांच्या लावणीतील नायक श्रीमंत आहे. त्यांच्या लावणीतील शृंगाराला नैतिकतेचे बंधन नाही. त्यामुळे कामवासनेच्या भडक चित्रांचे दर्शन त्यांच्या लावणीतून घडते, तसेच त्यांच्या काही लावण्या सुंदर आहेत.

'मोहिनी जशी सुरत सभेमध्ये अमृतवाणी करी तशी नार पंगतीत आग्रह करी' असे खानदानी स्त्रीच्या सौंदर्याचे आणि रुबाबाचे डौलदार वर्णन सुद्धा त्यांच्या लावणीत येते.

'डुलत खुलत चाले, झुलत झुलत बोलता हले हलकढी'

'कधी प्राणसखे भेटती '

'नका जाऊ दूर देशी घरी काय धनद्रव्याला कमी । आली हो वर्षाची नागपंचमी '

'सगुण गुण गंभीरा तुला कशी दुपारची रे सोसेल कहाली'

'परम परदेश कठिण कांते । कसे ग तुज न्यावे सगुनशांते '

अशाप्रकारे नायक- नायिकेचे वर्णन आपल्या लावणीतून प्रभाकरांनी केलेले आहे.

लढाईवर जाणाऱ्या नवऱ्याला पराभूत करताना तिने म्हटलेली लावणी त्यातून तत्कालीन चालीरीतीचे, समजुतीचे दर्शन घडते. तत्कालीन मराठी स्त्रीच्या दागिन्यांचे वर्णन त्यांच्या लावणीतून आढळते.

'मुळी मुलुख कर्नाटक । निर्दयी लोक कंटक

विश्वासघातकी ठक । बिकट झाडी चहूकडून ।।'

प्रभाकरांच्या अनेक पौराणिक लावण्यातूनही चालीरीती- समजुती बरोबरच मानवी प्रवृत्तीचे सहज दर्शन घडताना दिसते .

'निरजिवांस साये जिव झाले श्रव सुटले महान गिरींना ।।

'चंद्रभागेच्या तिरी विटेवरी कटि कर ठेवुनी उभा

भक्तांचा कैवारी सावळा त्रैलोक्याचा सुभा'

अशाप्रकारे संताच्या तोडीचे वर्णन प्रभाकरांच्या लावण्यात आलेले दिसते. त्यांची बरीच कवणे ही त्यांच्या भावनांच्या उत्कट आविष्कार आणि प्रासादिक भाषेमुळे प्रसिद्ध आहेत.

प्रभाकर यांनी 'कवीची कविता अमृता समान',' प्रभाकराची जडण अमोलिक जसा शिरी शिरपेंच तुरा', 'प्रभाकराचे कवन प्रतिष्ठित सभेत गायाला' असा उल्लेख त्यांनी स्वतःच्या कविता विषयी केलेला आहे. इ.स. १८४३ मध्ये शाहीर प्रभाकर यांचा मृत्यू झाला .

सगनभाऊ

सगनभाऊ यांचा जन्म इ. स. १७७८ रोजी झाला असून ते मूळचे जेजुरीचे. त्यांची संपूर्ण हयात पुण्यात गेली. त्यांच्या घरी शिकलगारीचा धंदा होता. रामा गोंधळी हा त्यांचा प्रमुख साथीदार होता. सगनभाऊ वर बाजीरावांची मर्जी असल्याचे सांगितले जाते. सगनभाऊ हा होनाजीबाळाचा प्रतिस्पर्धीच होता.

'सगनभाऊ म्हणे होनाजी बाळा उत्तर द्यावे रोकडे' किंवा 'होना गवळयाचा झाला चुना' असे होनाजी बाळा विषयी ते म्हणतात.

बेबंदशाही चे वर्णन करताना सगनभाऊ म्हणतात,

'दळणासारखे किडे रगडले रडती नरनारी । लेकराला माय विसरली कसा ईश्वर तारी.'

लक्षांचे अन्न गेले राव अंतरले गादीला । एकटेपक्षावाने उडाले टाकून गादीला । एकटे पक्षावाणी उडाले टाकून मादीला'

हा दुसऱ्या बाजीरावावरील त्यांचा पोवाडा प्रसिद्ध आहे, तर पुणे नगरीची दिनवाणी स्थिती चित्रित करताना ते म्हणतात 'एक्या प्राण्यावांचून शहर करिती गयावाया । थानपिते बालक लोटून दिलेस रघुराया । मी अनाथ माऊली कशी नाही आली तुज माया । रयत बिचारी लोल झाली उपटल पराला' अशाप्रकारे पुणे नगरीचे दिनवाणे चित्रण केले आहे. पेशवाई बुडाल्यानंतर ते साताऱ्याच्या छत्रपतींच्या दरबारात जातात. तेथे त्यांनी पानिपतचा पोवाडा रचला. तो अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. तसेच साताराच्या प्रतापसिंह महाराजांवर त्यांनी दोन पोवाडे रचले.

सगनभाऊ च्या लावणीमध्ये मनोभावानेला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे असे पुढील लावणी वरुन लक्षात येते. 'असी कि रे प्रीत वाढल' 'आली दुनिया उफराटी फार तुम्ही सावधगिरीने असा' हा व्यवहारिक संदेश देणारी नायिका, तर 'परनारीशी भाषण करता विचार नाही बरा' असा नीतिविषयक उपदेशही त्यांची नायिका करते. 'चंद्राचे चांदणे शितळ का उष्ण' या लावणीत आलेले शृंगार दर्शन मार्मिक आहे

सगनभाऊ हे जातीने मुसलमान होते, परंतु मराठी संस्कृतीशी ते एकरूप झाले होते. रामायण- महाभारत आधी ग्रंथांचे किंवा देवादिकांचे दाखले त्यांच्या कवनातून अनेकदा आलेले आहेत. पंढरपूर व विठ्ठल यांविषयीचे वर्णन त्यांनी भक्ती भावपूर्ण केलेले आहे. मराठमोळया चालीरीतींचा त्यांना अभिमान असल्याचे त्यांच्या कवनातून प्रकट होतो. इतर शहिरांच्या मानाने त्यांना विद्वत्ता कमी होती परंतु त्यांच्या भाषेत मात्र जोम होता असे त्यांचे पोवाडे बघता दिसते. त्यांना आपल्या रचनेविषयी आत्मविश्वास होता आणि तो त्यांनी 'सगनभाऊच्या कवनावरती फंदी लोक झुरती' अशा प्रकारे व्यक्त केलेला आहे. अशा या शाहिराचा मृत्यू १८४० मध्ये झाला.

होनाजी बाळा

होनाजी बाळा यांचा कालखंड साधारणता १८ व्या शतकाची अखेर आणि १९ साव्या शतकाची सुरुवात असे म्हणता येईल. 'घन:श्याम सुंदरा' ह्या लावणीमुळे होनाजी बाळा अमर झाले. होनाजी सयाजी शिलारखाने असे त्यांचे

पूर्ण नाव होते. पिढीजात कवित्व करणाऱ्या घराण्यात त्यांचा जन्म झाला होता. त्यांच्या आज्याचे नाव साताप्पा आणि चुलता बाळा हे दोघेही नामांकित शाहिर होते. बाळा करंजकर शिंपी हा होनाजीचा साथीदार होता. त्यांच्या लावणीतील शब्द हे होनाजीचे आणि स्वर मात्र बाळाजीचा असायचा. त्यांच्या साथीदाराचे बाळा हे नाव होनाजीने आपल्या नावापुढे लावले आणि लावण्या तयार केल्या.

होनाजी हे संगीततज्ञ व कल्पक होते. दादोबा पांडुरंग यांनी आपल्या आत्मचरित्रात होनाजी सरस असल्याचे कबूल केलेले आहे.

होनाजींनी पोवाडे लिहिले पण तेवढे गाजले नाही. पोवाडांपेक्षा त्यांची लावणी अधिक प्रसिद्ध झाली. त्यांचे ऐकूण तीन-चारच पोवाडे आहेत. होनाजी आपल्या लावण्या मधून प्रेम भावनेच्या विविध छटा हळुवारपणे व्यक्त करतात.

त्यांच्या शृंगारा पासून निपुत्रिकेच्या करूण आर्ततेपर्यंत तर प्रीतीचे बाण मारून प्रवासाला माने निघून गेलेल्या पतीच्या विरहाने झुरणारी यासारखे विषय त्यांच्या लावणी येतात .

'गेला जसा तसा कधी पाहीन आपला प्राणविसावा । सत्वर उठा सख्यांनो मजला पक्षांचे पर लावा' असे उद्गार आपल्या लावणीतून ते चित्रित करतात.

'तुझ्या प्रीतीचे दुःख मला दाऊ नको रे । वधून जाई प्राण घेई जगी ठेवू नको रे' या लावणी मधून प्रीतीचे सामर्थ्य आणि प्रीतीचा परिणाम दोन्ही गोष्टी घडवताना दिसतात.

'जगी सांगतात प्रीत पतंगाची खरी झड घालून प्राण देतो दीपकाचे वरी' अशी प्रेम विषयक जाणीव त्यांच्या काव्यातून दिसते. 'लटपट लटपट तुझं चालणं ग मोठ्या नख-याचं ' स्त्री सौंदर्याचे सुंदर वर्णन आलेले आहे . 'सरळ चिरी कुंकवाची कपाळी लाल जशी पिकली मिरची 'बांधिव बुचड्याचे लबक पदर अतिसुबक खोलला तिपदरी वेणीचा चंदन ढाळितच जसा लपेटा काळे नांगिनीचा. हिन माझे प्रारब्ध वांझपण कधी फिटेल बाई । एक बालक पोटी नाही' यांतून निपुत्रिकेचे दु:ख तर 'फंदी अनंत कवनाचा सागर' असे म्हणून कवी फंदी बद्दलचा आदरभाव व्यक्त केला आहे .

शंकर-पार्वतीसंवाद, श्रीकृष्णतुला, द्रौपदीवस्त्रहरण, मल्हारी, मार्तंड दमयंती विलाप असे पौराणिक प्रसंग त्यांच्या लावणीचे विषय आहेत. त्यांची 'घनश्याम सुंदरा' ही लावणी म्हणजे महाराष्ट्र शारदेला वाहिलेले अमर लेणे होय, असे म्हटले आहे. या एकाच लावणीने ते मराठी "'पंच पंच उष:कालांतील पावित्र्य व सौंदर्य या भुपाळीत भरले आहे.' असे म.ना. अदवंत म्हणतात."७

लावणीला 'मराठी काव्याची प्रभात' असे म्हटले जाते. शिवकाळापासून सुरुवात झालेली लावणी पेशवाई बरोबर तिचा शेवट झाला. शायरी काव्यातून समाज जीवनाचे चित्र प्रतिबंबित झाले ही प्रगल्भ जाणीव आहे तसेच तत्कालीन महाराष्ट्राचे चित्र दिसते.

दुसरा बाजीराव यांच्या कारकिर्दीतील विलासी आणि सुखवस्तू जीवनाचे दर्शन घडते. असे म्हणतात अस्सल मराठी लावणीचा उत्कर्ष दुसऱ्या बाजीरावाच्या काळात झालेला आहे असे मानले जाते. शाहिरांची भाषा ही ग्रामीणांची नाही तर शिष्टाची भाषा त्यांच्या शाहिरीत आहे . शाहिरी कवितेच्या प्रेरणा आणि आविष्कार स्वतंत्र आहेत. "अध्यात्म, तत्त्वज्ञान, रामकृष्णांच्या कथा यात रमलेली प्राचीन मराठी कविता शिवशाहीपासून, विशेषतः पेशवाई पासून लौकिक क्षेत्रात वाळली. मराठ्यांचे पराक्रम तिने पोवाडयातून गाण्यास सुरुवात केली. लावणी विरह व स्त्री-पुरुष प्रेम यांची लज्जत आली. रंगपंचमी, होळी, दुष्काळ, दरबार, खरड्याची लढाई असे ऐहिक वा लौकिक

विषय तिला रुचू लागले. रामजोशी, प्रभाकर, अनंतफंदी, परशुराम, होनाजीबाळा, सगनभाऊ इत्यादी पेशवाईअखेरच्या शाहिरांची काही कवने अव्वल इंग्रजीतही टिकून होती. काही शाहिरांनी पेशवाईचा पडता काळ व नवी इंग्रज राजवट यांच्यांतील सुखदुःखे अनुभवली होती. प्रभाकर, परशराम इत्यादींनी याबद्दल त्या काळाचा उल्लेख आपल्या कवनांतून केलेला दिसतो. 'लाल शरीर, टोपी, अंगी आठ प्रहर अंगरखा' घालून येणारे हे नवे राज्यकर्ते प्रभाकरने पाहिलेले दिसतात. 'जुने कायदे अगदी मोडले जधिपुन झाली इंग्रजी' अशी त्याची साक्ष आहे. राजे राजवाड्यांची आता सध्या संपल्यामुळे पेशवाईतील ही शाहिरी परंपरा काही काळ तशीच बुडी मारून राहिली."८(१०८)हा आशय शाहिरी कवितेचा उदय आणि अस्त सांगणारा आहे,असे प्रकर्षाने जाणवते.

तत्कालीन राज्यकर्ते आणि आश्रयदाते यांची कीर्ती गाणे किंवा यशाची गाथा गाणे ही पोवाडयांची भूमिका होती तर लावणीचा हेतू नागरी,धानिक आणि रसिकांच्या रंजन करणे. पोवाडा हा विशिष्ट विषय रचनेच्या संकेतात अडकला पण लावणी मात्र विषय आणि संकेत यांच्या बंधनात अडकलेली नव्हती. तिच्या मध्ये विषयाची विविधता, नाविण्य , आकर्षकता जाणवत राहते. तिच्या मध्ये यमक-प्रासादासोबतच नादमाधुर्य हे महत्त्वाचे वैशिष्ट्य आढळते. लावणी म्हणजे नुसते गीत नाही, तर तिला नाट्यगीत म्हणावे असे आहे. लावणीला अभिनयाची जोड आहे . मधल्या काही काळात लावणी मधून गावरान शब्दांचा वापर झालेलाही आपल्याला दिसतो. लावणी ज्या काळात जन्माला आली, त्या काळामध्ये पोवाडे अधिक प्रमाणात लिहिलेले आढळतात. दात्याच्या आज्ञेनुसार शाहीर कवणे करताना दिसत होते, तर काही पोटासाठी कवणे करित होती. कधी त्यातून विनोद, विसंगती आणि मनोरंजनही दिसते. लौकिक जीवनामध्ये समरसुन काव्य लेखन करण्याचे श्रेय शाहिरांकडे जाते. अस्सल मराठमोळेपणा आणि निवेदनाचा विशिष्ट ढंग हा मराठी कवितेला शाहीरांकडून मिळालेला आहे. भाषेलाही विशिष्ट ढंग आणि नखरा असतो याची जाणीव लावणी करून देते. या जाणीवेतून मराठी मन आणि मराठी कविता फुलु लागली होती, समृद्ध होऊ लागली होती. तिच्या समृद्ध अशा विकासामध्ये एक संत परंपराही होती. ज्ञानेश्वरापासून तुकाराम पर्यंत, मुक्तेश्वर-वामनांपासून मोरोपंतां पर्यंत, रामजोशी पासून सगनभाऊ-होनाजीपर्यतची फार मोठी परंपरा मराठी कवितेला लाभली आहे. या सर्व कवींनी मराठी कवितेचे दालन लोकमानसांसाठी वैभवसंपन्न केले असे म्हणता येईल. पुढे काही परंपरा नष्ट होत गेल्या आणि शाहिरी कवितेचा प्रवाह हळूहळू थांबला.

संदर्भ :

१. 'प्राचीन मराठी वांग्मयाचा इतिहास', ल.रा. नासिराबादकर, फडके प्रकाशन, कोल्हापूर. पृष्ठ क्रमांक २८८.
२. तत्रैव, पृष्ठ क्रमांक २८८.
३. तत्रैव, पृष्ठ क्रमांक २८८-२८९.
४. तत्रैव, पृष्ठ क्रमांक २९२.
५. तत्रैव, पृष्ठ क्रमांक २९९.
६. तत्रैव, पृष्ठ क्रमांक ३०१.
७. तत्रैव, पृष्ठ क्रमांक ३१०.
८. 'अर्वाचीन मराठी वाङ्मयाचा इतिहास',(१८०० ते १९६०), प्र. न. जोशी, स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे. पृष्ठ क्रमांक १०८.

संदर्भ ग्रंथ :

१. जोशी प्र.न.,'अर्वाचीन मराठी वांग्याचा इतिहास (१८००ते१९६०), स्नेहवर्धन प्रकाशन, पुणे. द्वितीयावृत्ती, २०००.
२. नसिराबादकर ल.रा.,' प्राचीन मराठी वांग्मयाचा इतिहास', फडके प्रकाशन ,कोल्हापूर. अकरावी आवृत्ती ऑगस्ट २०१६.

साहित्य समीक्षा : परंपरा व नवदृष्टी

डॉ. नकुल जनार्दन धरमकर
श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती.

घोषवारा :-

समीक्षा म्हणजे साहित्यकृतीच्या गुणदोषांचे परीक्षण करून मूल्यमापन करणे होय. मराठीतील 'समीक्षा' हा शब्द 'सम ईक्ष' या दोन पदांनी बनलेला आहे. याचा अर्थ याठिकाणी सम म्हणजे 'सर्व बाजूनी' आणि ईक्ष म्हणजे 'पाहणे' असा होतो. म्हणजेच साहित्यकृतीच्या सर्व बाजूनी पाहणे म्हणजे 'समीक्षा' होय. साहित्यकृतीचा चिकित्सक अभ्यास तीच्या माध्यमातून केला जातो. समीक्षेची नेमकी संकल्पना समजून घेण्यासाठी आपणाला अभ्यासकांनी केलेल्या व्याख्यांचा आधार घ्यावा लागेल. प्रस्तुत, शोध निबंधाच्या माध्यामतून साहित्याच्या महत्त्वपूर्ण समीक्षा पद्धतींची ओळख करून घेण्यात येणार आहे. याबरोबरच साहित्य समीक्षेच्या विविध पद्धती व त्यांची वैशिष्ट्ये ज्ञात होतील. साहित्य समीक्षेचे स्वरूप समजावून घेऊन साहित्य समीक्षेच्या विविध अभ्यासकांनी केलेल्या व्याख्या समजावून घेण्याचा प्रयत्न केला आहे. साहित्य समीक्षेच्या पाश्चात्त्य व भारतीय अभ्यासकांनी केलेल्या व्याख्यांचा आढावा घेतला जाणार आहे. प्रस्तुत व्याख्यांच्या माध्यामतून साहित्य समीक्षेचे स्वरूप व कार्य स्पष्ट होण्यास मदत होणार आहे.

प्रस्तावना :-

साहित्य आणि समीक्षा यांचे अतूट असे नाते आहे. साहिताच्या क्षेत्रात समीक्षेला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. साहित्यसमीक्षेच्या माध्यमातून साहित्यकृतीचा विविध अंगांनी अभ्यास केला जातो. या अभ्यासातून समीक्षक साहित्यकृतीवर आपले मत व्यक्त करीत असतो. यालाच आपण टीका असे म्हणतो. हीटीका लेखकाप्रमाणेच वाचकाच्या दृष्टीनेही महत्त्वाची असते. तीचा आणि लेखकाचा, वाचकाचा, समाजाचा, वास्तवाचा, इतिहासाचा, मूल्यांचा अनुबंध समीक्षक आपल्या समीक्षेच्या माध्यमातून तपासत असतो. तसेच त्या विशिष्ट साहित्यकृतीचा विषय, आशय, अर्थ, संरचना, रूपबंध, भाषा, विचारप्रणाली, तत्त्वज्ञान, जीवनदृष्टी ३. घटकांचाही विचार समीक्षेच्या माध्यमातून केला जातो. या अर्थानी साहित्यकृतीची समीक्षा ही त्या साहित्यकृतीच्या विविध अंगांनी केली जाते. साहित्यासमीक्षेत साहित्यकृतीचा लेखक कोण आहे? सी किंवा पुरुष, तो कोणत्या समाजातून आला आहे? त्या समाज्याची आर्थिक स्थिती कशी आहे? तो कोणत्या काळात लेखन करतो आहे? त्याचा वाचक वर्ग कोणता आहे? इ.चा विचार होतो. या सर्व भूमिकेतून साहित्याच्या क्षेत्रात समीक्षेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. म्हणून प्रस्तुत शोधनिबंधातून साहित्यसमीक्षेची संकल्पना, स्वरूप व कार्ये जाणून घेणार आहोत.

विषयविवेचन :-

'समीक्षा' ही साहित्यकृतीचा अर्थ विशद करीत असते म्हणजेच त्या साहित्यकृतीचा नेमका अर्थ वाचकापर्यंत पोहोचवत असते म्हणून ती वाचकाना मार्गदर्शक ठरते. त्याचबरोबर ती साहित्यकृतीचे वस्तुनिष्ठपणे मुल्यमापनही करते. ही समीक्षा विविध प्रकारे केली जाते. त्यामुळे साहित्यकृतीला देखील योग्य न्याय मिळतो. त्यामुळे ती लेखकालाही मार्गदर्शक ठरते. समीक्षा ही साहित्यकृतीतील वैशिष्ट्ये अधोरेखित करत असते. ती एक व्यापक संकल्पना आहे. म्हणून साहित्य कृती आणि समीक्षा यांच्यामध्ये भेद नाही, असे आपणास म्हणता येईल. म्हणून प्रस्तूत शोधनिबंधाच्या माध्यमातून साहित्यसमीक्षेची संकल्पना, स्वरूप, कार्ये समजावून घेणार आहोत.

साहित्यसामिक्षेची संकल्पना :-

Criticism या इंग्रजी शब्दाला पर्याय म्हणून मराठीत 'समीक्षा' हा शब्द वापरला जातो. Criticism हा शब्द 'to criticize' पासून तयार झाला आहे. याचा अर्थ दोष काढणे, गुणदोष विवेचन करणे, टीकेची कला,कडक टीका

असा होतो. म्हणून Criticism ला 'समीक्षा' हा योग्य पर्याय वाटतो, त्याचबरोबर Criticism चा व्यापक अर्थही समजतो.

मराठीतील 'समीक्षा' हा शब्द 'सम ईक्ष' या दोन पदांनी बनलेला आहे, याचा अर्थ याठिकाणी सम म्हणजे 'सर्व बाजूनी' आणि ईक्ष म्हणजे 'पाहणे' असा होतो. म्हणजेच साहित्यकृतीच्या सर्व बाजूनी पाहणे म्हणजे 'समीक्षा' होय. साहित्यकृतीचा चिकित्सक अभ्यास तीच्या माध्यमातून केला जातो. समीक्षेची नेमकी संकल्पना समजून घेण्यासाठी आपणाला अभ्यासकांनी केलेल्या व्याख्यांचा आधार घ्यावा लागेल. या व्याख्यावरून समीक्षेचे स्वरूप समजण्यास मदत होईल.

साहित्यसमिक्षेच्या पद्धती :-

साहित्यकृतीचा अभ्यास तिच्या विविध अंगानी केला जातो. त्यावरून साहित्यसामिक्षेच्या विविध पद्धती निर्माण झाल्या आहेत. समिक्षापद्धतीतून साहित्यकृतीचा चिकित्सक अभ्यास करता येतो. या समीक्षापद्धती पुढीलप्रमाणे

१. आस्वादक समीक्षाः

साहित्य समीक्षेची ही एक लोकप्रिय समीक्षा पद्धती आहे. साहित्य समीक्षेत काटेकोर नियमांना धरून साहित्याचे वाभाडे न काढता साहित्याकडे सहानुभूतीने व रसिकतेने पाहावे. अभ्यासकाला आलेल्या वैयक्तिक अनुभवाच्या आधारे समीक्षा केली जाते. आस्वादक समीक्षेच्या आधारे साहित्यकृतीचे विश्लेषण केल्यास साहित्यकृतील योग्य न्याय मिळवून देता येतो. साहित्याचे विश्लेषण करताना काटेकोर नियमांना अनुसरून केले जात नाही. तर विश्लेषण करताना साहित्याकडे सहानुभूतीने पहिले जाते. साहित्यकृतीचे रसिकतेने विश्लेषण केले जात असते. साहित्यकृतीचा आस्वाद घेणे म्हणजे साहित्याचा आनंद घेणे. या विचाराधारेतून आस्वादक समीक्षेचा उदय झाला आहे. मुळात समीक्षा म्हणजेच साहित्यकृतीचा आस्वाद घेणे होय.

२. समाजशास्त्रीय समीक्षाः

साहित्य हा समाजाचा आरसा असतो. साहित्यातून समाजाचे प्रतिबिंब पडत असते. लेखक हा देखील समाजाचा एक भाग असतो. साहित्यकृती ही समाजातच जन्माला येत असते. म्हणजे साहित्यिक हा देखील समाजातच जन्माला आलेला असतो. त्या समाजाचे संस्कार सातत्याने होत असतो. त्यामुळे साहित्य आणि समाज ह्यांच्यातील संबंध हे महत्त्वपूर्ण स्वरूपाचे असतात. समीक्षक हा सुध्दा समाजाच एक भाग असतो. याचाच अर्थ समाजाशिवाय लेखक आणि साहित्यकृती होऊ शकत नाही या विचारधारेतून समाजशास्त्रीय समीक्षा उदयास आली आहे. समाजशास्त्रीय समीक्षेची व्याख्या करताना डॉ. अशोक जोशी म्हणतात की, "समाजशास्त्र या ज्ञानशाखेचे मुलभूत ज्ञान मिळवून साहित्यसमीक्षेत समाजशास्त्रातील नेमक्या कोणत्या संकल्पना वापरता येतील याची जाणीवपूर्वक निवड करून प्रत्यक्ष वाङमयाच्या संदर्भात त्यांचा वापर करणे म्हणजे समाजशास्त्रीय समीक्षा करणे." समाजशास्त्रीय समीक्षेची अत्यंत साधी आणि सोपी व्याख्या डॉ. अशोक जोशी यांनी केलेली आहे. साहित्यकृतीला योग्य न्याय मिळवून देण्यासाठी समाजशास्त्रीय समीक्षा नेहमी उपयुक्त ठरते.

३. मार्क्सवादी समीक्षाः

साहित्य सामिक्षेबाबत मार्क्सवादी समीक्षेचा उदात्त दृष्टीकोन असलेला दिसून येतो. साहित्य ही एक स्वतंत्र निर्मिती नसून ती समाजाची निर्मिती असते. साहित्य हे समाजसापेक्ष असते. साहित्य निर्मिती करणे ही सामजिक गोष्टच आहे. त्यामुळे साहित्यातून येणारी मूल्ये ही स्वतंत्र मूल्ये नसतात तर ती समाजाची मूल्ये असतात. याचा विचार करून मार्क्सवादी समीक्षेत सामाजिक मूल्ये समोर ठेऊन साहित्यकृतीवर निष्कर्ष जातात. साहित्य आणि समाज यांचा परस्पर अनुबंध असतो. हे मान्य करून मार्क्सवादी समीक्षा केली जाते. साहित्याचे प्रयोजन साम्यवादी समाजरचना अस्तित्त्वात आणण्यास पोषक असले पाहिजे, श्रमजीवी बहुजन वर्गासाठीते असल्यामुळे ते सुबोध असले पाहिजे असा विचार मार्क्सवादी समीक्षेतून उदयाला आला. ।

४. मनोवैज्ञानिक समीक्षाः

यालाच मानसशास्त्रीय समीक्षा पद्धती असे म्हंटले जाते. सिग्मंड फ्रॉईड यांच्या मानसशास्त्रीय तत्त्वज्ञानातून ही समीक्षा पद्धतीत उदयास आली आहे. मानसशास्त्रात मानवी मनाचा अभ्यास केला जातो. मानवाच्या मनावर

बऱ्याच गोष्टी अवलंबून असतात. त्यामुळे साहित्यकृतीचे परीक्षण, विश्लेषण करताना लेखकाचे मन आणि त्याचे व्यक्तिमत्त्व या दोन घटकांचा साहित्यातून शोध घेणे हे समीक्षेचे महत्त्वाचे कार्य आहे. लेखक लिहितो त्याच्या पाठीमागे त्याचा मानसिक संघर्ष असतो. याचा शोध साहित्यकृतीच्या माध्यमातून समीक्षक घेत असतो.

५. आदिबंधात्मक समीक्षाः

मानसशास्त्रावर आधारितच ही समीक्षा पद्धती आहे. कार्ल युंग या मानसशास्त्रज्ञाने आदिबंधाची व मुलबंधाची संकल्पना मांडली. माणसांच्या मनातील अबोध शक्ती म्हणजे आदिबंध होय, मनुष्य हा समुहाने राहणारा प्राणी आहे. व्यक्तीची नाळ समाजाशी जोडलेली असते. त्यामुळे व्यक्ती आणि समाज वेगळे करता येत नाहीत, साहित्य हे समाजाच्या सामुहिक जाणीव आकाराला येत असते. म्हणून आदिबंधात्मकसमीक्षेत या सर्व बाबींचा विचार करून साहित्याचा अभ्यास केला जातो. मॉड बॉडकिन ह्या मानसशास्त्राच्याप्राध्यापिकेने युगप्रणीत आदिबंधाच्यासिद्धांताचा आधार घेऊन आर्किटायपल पॅटर्नस इन पोएट्री (१९३४) हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथाने मानसशास्त्रीय साहित्यसमीक्षेचा एक महत्त्वाचा भाग असलेल्या आदिबंधात्मक समीक्षेचा पाया घातला.

६. स्त्रीवादी समीक्षा:

फिमेल म्हणजे खी तर फिमिनेझम म्हणजे खीवाद होय. १९६० नंतर स्त्रीवादी साहित्याचा प्रवाह मराठी साहित्यात निर्माण झाला. स्त्रीवादी साहित्याच्या अभ्यासातून खीवादी समीक्षा ही संकल्पना पुढे आली. श्रीवादी समीक्षेतून स्त्रीवादी प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम केले जाते तसेच स्त्रियांचे भावविश्व या समीक्षेतून समजावून घेता येते. स्त्रीवादी साहित्याच्या विश्लेषणासाठी ही एक महत्त्वाची समीक्षा पद्धती आहे.

७. चरित्रात्मक समीक्षाः

एखाद्या व्यक्तीच्या संपूर्ण आयुष्यावर दसऱ्या व्यक्तीने लिहिलेले लेखन म्हणजे त्या व्यक्तीचे चरित्र होय. ज्या व्यक्तीचे चरित्र लिहिले जाते त्या व्यक्तीच्या जगण्याला काही मागचे-पुढचे संदर्भ असतात. तसेच साहित्यकृतीलाही मागचे-पुढचे संदर्भ असतात. असा विचार चरित्रात्मक समीक्षेतून पुढे आला आहे. साहित्यकृतीला असणारे संदर्भ हे त्या लेखकाचे असतात असे ही समीक्षा मानते. प्रस्तुत समीक्षेच्या आधारे साहित्यकृतीचे विश्लेषण करताना आकलन, अर्थनिर्णयन आणि मूल्यमापन हे त्या व्यक्तीच्या संदभनि होत असते. म्हणून चरित्रात्मक समीक्षा पद्धती ही विश्वासार्ह समीक्षा पद्धती मानली जाते.

८. ऐतिहासिक समीक्षा :

प्रस्तुत समीक्षेच्या आधारे साहित्याचे मूल्यमापन करताना साहित्यकृतीचे ऐतिहासिक संदर्भ आणि त्यातील गुणदोषांचे परीक्षण केले जाते. सदर समीक्षा पद्धतीतून साहित्यकृतीमध्ये येणारा ऐतिहासिक आशय अथवा संदर्भ पाहावे लागतात. कारण यातूनच साहित्यिकांना इतिहास आणि समकाल यामधील अंतर सहज लक्षात येते. म्हणजे ऐतिहासिक समीक्षा पद्धतीतून साहित्यकृतीचे आकलन करत असताना साहित्यकृतीत आलेले पारंपारिक संदर्भ त्यालाच आपण ऐतिहासिक संदर्भ असे म्हणतो त्याच्या आधारे कलाकृतीचे गुणदोष तपासून लेखकाला व वाचकाला मार्गदर्शन केले जाते. त्याला ऐतिहासिक समीक्षा पद्धती असे म्हणतात.

९. भाषाशास्त्रीय समीक्षा :

भाषा आणि साहित्य यांचा जवळचा संबंध आहे. भाषेशिवाय साहित्यनिर्मिती अशक्य आहे. म्हणून साहित्यकृतीचा अभ्यास करीत असताना भाषेचा अभ्यास करणे क्रमप्राप्त आहे. म्हणून भाषाशास्त्रीय समीक्षा पद्धतीत साहित्यकृतीच्या भाषेच्या गुणदोषांचे परीक्षण व मूल्यमापन केले जाते. कलाकृतीच्या भाषेवर या समीक्षा पद्धतीतून प्रकाश टाकला जातो. एखादी साहित्यकृती निर्माण होत असताना ती साहित्यकृती ज्या भाषेतून निर्माण होत असते त्या भाषेचा अभ्यास करून त्यातील गुणदोष दाखविले जातात. भाषेच्या अंगाने साहित्यकृतीचे वस्तुनिष्ठपणे मूल्यमापन केले जाते. यावरून अलीकडील काळातील एक महत्त्वाची समीक्षा पद्धती म्हणून भाषाशाखीय समीक्षेला ओळखले जाते.

१०. शैलीवैज्ञानिक समीक्षा :

साहित्यकृतीचा वस्तूनिष्ठ अभ्यास व्हावा यासाठी अलीकडे जी महत्त्वपूर्ण संकल्पना विकसित झाली ती म्हणजे शैली होय. Style या शब्दाला पर्याय म्हणून मराठीमध्ये शैली ही संकल्पना अस्तित्वात आली. तसे पाहिले तर प्राचीन

काळापासून शैली ही संज्ञा वामनाच्या 'रीती' या संकल्पनेला समानार्थी वापरली जात होती. परंतु अलीकडे भाषा विज्ञानाच्या अनुषंगाने तीला व्यापक स्वरूप प्राप्त झाले आहे. सर्वसाधारणपणे आपण शैली हा शब्द भाषाशैली या अधनि वापरतो. परंतु हा अर्थ परिपूर्ण स्वरूपाचा वाटत नाही. कारण शैली हा शब्द आपण दैनंदिन जीवनात अनेक अर्थानी वापरत असतो. उदा. भाषाशैली, साहित्यशैली, बोलण्याची शैली, गाण्याची शैली, इ. शैली ही संज्ञा रीती, पध्दत, ढब, लकब, धाटणी, कौशल्य, वैशिष्ट्ये, तंत्र, अशा अनेक अर्थांनी वापरली जाते. शैली या घटकाचा विचार 'साहित्यविचार' आणि 'भाषाविज्ञान' या दोन संकल्पनांच्या आधारे करता येतो. प्राचीन काळातील 'रीती' विचारातील 'बंधगुण' आणि 'अर्थगुण' यांच्याशी शैलीचा संबंध जोडला आहे. तर अलीकडे भाषाविज्ञानाच्या आधारे शैलीचा शास्त्रशुद्ध पद्धतीने अभ्यास केला जातो त्यास 'शैलीविज्ञान असे म्हणतात.

निष्कर्ष :-

1. साहित्यकृतीचा नेमका अर्थ वाचकापर्यंत पोहचविण्याचे महत्त्वपूर्ण कार्य साहित्य समीक्षेच्या माध्यामतून केले जाते.
2. साहित्य समीक्षा ही लेखकाबरोबरच वाचकालाही मार्गदर्शन करते. यातून साहित्यकृतीतील गुण-दोष दाखविले जातात.
3. साहित्य समीक्षेतून साहित्यकृतीचा वस्तुनिष्ठ अभ्यास करून तिची योग्यता स्पष्ट केली जाते.
4. साहित्य समीक्षेच्या माध्यामतून वाचकांची वाङमयीन अभिरुची विकसित केली जाते.
5. साहित्यकृतीच्या चिकित्सक अभ्यासातून कलाकृतीविषयी योग्य निर्णय देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य साहित्य समीक्षेच्या माध्यामतून केले जाते.

समारोप :-

अशा प्रकारे समीक्षा ही लेखकांनी निर्माण साहित्यकृतीबद्दल यथार्थ निर्णय देणे, कलाकृतीचा जाणकारपणे आस्वाद घेणे, त्याचबरोबर रसग्रहण, परीक्षण, मूल्यमापन करण्याचे कार्य करते. ती काही निश्चित तत्त्वांच्या आधारे, पूर्वग्रहदूषित मनाने कलाकृतीतील सौंदर्याचाशोध घेऊन न्याय देण्याचे महान कार्य करीत असते. लेखकांना मार्गदर्शन करणे हे समीक्षेचे महत्त्वाचे उद्दिष्ट आहे. तर समीक्षक हा लेखक आणि वाचक यांच्यातील महत्त्वाचा दुवा आहे. समीक्षा ही साहित्यकृतीच्या मुळाशी जाण्याचा नेहमी प्रयत्न करत असते.

त्यातून त्या साहित्यकृतीतील नेमके मर्म उलघडत असते. साहित्यकृतीवर साहित्यसमीक्षा अवलंबून असते तर आपल्या साहित्यकृतीला योग्य न्याय मिळावा व तीचे साहित्यविश्वातील स्थान स्पष्ट व्हावे असे लेखकाला वाटत असते. म्हणून साहित्यकृती व समीक्षा यादोन्ही परस्परावलंबी संकल्पना आहेत.

संदर्भ ग्रंथ :-

१. नेमाडे, भालचंद्र, टीकास्वयंवर, साकेत प्रकाशन, औरंगाबाद.

२. डॉ. मनोहर जाधव, संपा. 'समीक्षेतील नव्या संकल्पना'

३. पाटील गंगाधर : 'साहित्य समीक्षेचे स्वरूप' 'अनुष्टुभ' सप्टेंबर-ऑक्टोबर-१९८७.

४. पाटील गंगाधर : सामिक्षामीमांसा, मौज प्रकाशन मुंबई.

५. गो.म.कुलकर्णी, (संपा) 'नवसमीक्षा' मेहता पब्लिसिंग हाऊस, पुणे.

६. वसंत आबाजी डहाके : मराठी समीक्षेची सद्यस्थिती', पॉप्युलर प्रकाशन मुंबई.

भारतातील उच्च शिक्षण व्यवस्थेसाठी नवीन आणि भविष्योन्मुख दृष्टिकोन

डॉ. गोपाल ढोले

प्राचार्य, डॉ.गोपाळराव खेडकर महाविद्यालय गाडेगाव (तेल्हारा), जि. अकोला

सारांश:

भारतातील उच्च शिक्षण व्यवस्था सध्या जागतिकीकरण, तंत्रज्ञानातील झपाट्याने होणारे बदल आणि कौशल्याधारित अर्थव्यवस्थेच्या गरजा यामुळे परिवर्तनाच्या निर्णायक टप्प्यावर उभी आहे. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत संशोधनात भारतीय उच्च शिक्षण व्यवस्थेसाठी नवीन आणि भविष्योन्मुख दृष्टिकोन मांडण्याचा प्रयत्न केला आहे. पारंपरिक ज्ञानकेंद्रित शिक्षणपद्धतीपासून पुढे जात, नवोन्मेष, आंतरशाखीयता, डिजिटल शिक्षण, कौशल्यविकास आणि उद्योग-शैक्षणिक सहकार्य यांना केंद्रस्थानी ठेवणे आवश्यक असल्याचे या अभ्यासातून स्पष्ट होते. राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 च्या अनुषंगाने लवचिक अभ्यासक्रम, बहुपर्यायी प्रवेश-निर्गमन प्रणाली, संशोधनाभिमुखता आणि गुणवत्तावृद्धी यांचा विचारही येथे मांडला आहे. तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता, ऑनलाइन शिक्षण प्लॅटफॉर्म आणि जागतिक सहकार्य यांचा प्रभावी वापर करून शिक्षण अधिक समावेशक, सुलभ आणि परिणामकारक करण्यावर भर दिला आहे. याशिवाय ग्रामीण व वंचित घटकांसाठी शिक्षणाची उपलब्धता वाढविणे, शिक्षक प्रशिक्षण सुदृढ करणे आणि संस्थात्मक स्वायत्तता वाढविणे हेही भविष्यातील महत्त्वाचे घटक म्हणून अधोरेखित करण्यात आले आहेत. एकूणच, भारतीय उच्च शिक्षण व्यवस्थेला जागतिक दर्जाची, रोजगाराभिमुख आणि शाश्वत विकासाला पूरक अशी बनविण्यासाठी या भविष्योन्मुख दृष्टिकोनाची आवश्यकता अधोरेखित केली आहे.

बीजशब्द: उच्च शिक्षण, भविष्योन्मुख दृष्टिकोन, राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020, डिजिटल शिक्षण, कौशल्यविकास, आंतरशाखीयता, नवोन्मेष, कृत्रिम बुद्धिमत्ता, समावेशक शिक्षण, जागतिकीकरण

प्रस्तावना:

भारताला सर्वांगीण आणि बहुविद्याशाखीय शिक्षणाची प्रदीर्घ परंपरा लागू आहे बाणभट्टाच्या कादंबरी सारख्या प्राचीन भारतीय साहित्यामध्ये चांगल्या शिक्षणाचे वर्णन म्हणजे 64 कलांचे ज्ञान असणे असे केले आहे आणि या 64 कलांमध्ये केवळ गायन व चित्रकला असे विषय नव्हते तर रसायनशास्त्र आणि गणित यासारखी वैज्ञानिक क्षेत्रे सुतारकाम आणि वस्त्र निर्मिती यासारखे व्यवसाय क्षेत्र वैद्यकीय आणि अभियांत्रिकी यासारखी व्यावसायिक क्षेत्रे तसेच संवाद चर्चा आणि वादविवाद यासारखी व्यवहार कौशल्य सॉफ्ट स्किल असे विषय होते. गणित विज्ञान व्यवसाय विषय व्यावसायिक विषय आणि व्यवहार कौशल्य यासह कल्पक मानवी प्रयत्नांच्या सर्व शाखांना कला मानले पाहिजे या कल्पनेचा उदय मुळात संधीग्धपणे भारतीय आहे अनेक कलांचे ज्ञान किंवा आधुनिक काळात ज्याला सामान्यपणे लिबरल आर्ट म्हणतात ती कला भारतीय शिक्षणामध्ये परत आणली पाहिजे कारण 21 व्या शतकामध्ये नेमके याच प्रकारचे शिक्षण आता आवश्यक झाले आहे बौद्धिक सौंदर्य विषयक सामाजिक शारीरिक भावनिक आणि नैतिक या सर्व मानवी क्षमता एकात्मिकपणे विकसित करणे हे सर्वांगीण आणि बहुविद्याशाखीय शिक्षणाचे उद्दिष्ट असेल शिक्षण कला मानवशास्त्रे भाषा विज्ञान सामाजिक शास्त्रे आणि व्यावसायिक तांत्रिक व व्यवसाय क्षेत्र अशा 21व्या शतकात आवश्यक असलेल्या विविध क्षेत्रांमध्ये क्षमता सामाजिक सहभागाचे नितीनियम संवाद चर्चा आणि वादविवाद यासारखी व्यावहारिक कौशल्य आणि निवडलेल्या क्षेत्रात सखोल विशेषज्ञता असलेल्या अष्टपैलू व्यक्ती विकसित करण्यास मदत करेल दीर्घकालीन विचार करता सर्वांगीण शिक्षण हा व्यावसायिक तांत्रिक आणि व्यवसाय शाखा मधील विषयांच्या सर्व पदवी पूर्व शिक्षणाचा दृष्टिकोन असावयास पाहिजे. 21 व्या शतकामध्ये भारताला चौथ्या औद्योगिक क्रांतीकडे नेण्यासाठी भारताच्या इतिहासात वर्णन केल्याप्रमाणे एक सर्वांगीण आणि बहुशाखिय

शिक्षण भारतातील शिक्षणासाठी आवश्यक आहे आयआयटी सारख्या अभियांत्रिकी संस्था सुद्धा कला मानव्य शास्त्रे यांचा अधिक समावेशक आणि सर्वांगीण बहुविद्याशाखीय शिक्षणाकडे पुढील काळात वाढतील कला मानवशास्त्राचे विद्यार्थी जास्त प्रमाणात विज्ञान शिकायचे ध्येय ठेवतील आणि सर्वजण अधिक व्यावसायिक विषय आणि व्यावहारिक कौशल्य समाविष्ट करण्यासाठी प्रयत्न करतील मनुष्य आणि समाजाच्या कल्याणाच्या दृष्टीने तसेच भारताच्या घटनेमध्ये कल्पिलेला भारत एक लोक तांत्रिक न्याय सामाजिक रित्या जागृत सुसंस्कृत आणि माणुसकी असलेले राष्ट्र जिथे स्वातंत्र्य समता बंधुभाव आणि सर्वांना न्यायाचा अधिकार असेल असे राष्ट्र विकसित करण्यामध्ये उच्च शिक्षणाची भूमिका खूप महत्त्वाची आहे शाश्वत उपजीविका आणि राष्ट्राच्या आर्थिक विकासामध्ये उच्च शिक्षणाचे लक्षणीय योगदान आहे जसं जसा भारत एक ज्ञानावर आधारित अर्थव्यवस्था आणि समाज बनायाच्या दिशेने पुढे जाईल तसतसे अधिकाधिक भारतीय तरुण उच्च शिक्षण घेण्याच्या दिशेने आगेकूच करत राहतील.

21व्या शतकाच्या गरजा लक्षात घेता चांगल्या विचारवंत अष्टपैलू आणि कल्पक व्यक्ती विकसित करणे हे दर्जेदार उच्च शिक्षणाचे उद्दिष्ट असले पाहिजे यात एखाद्या व्यक्तीला एक किंवा अनेक विशिष्ट आवडीच्या क्षेत्रांमध्ये सखोल अभ्यास करणे शक्य झाले पाहिजे तसेच चारित्र्य विषयक नैतिक आणि घटनात्मक मूल्ये बौद्धिक कुतुहल वैज्ञानिक स्वभाव धर्म कल्पकता आणि सेवाभाव याशिवाय शास्त्र सामाजिक शास्त्र कला मानव्यशास्त्रे भाषा याबरोबरच व्यावसायिक तांत्रिक आणि व्यवसायाशी संबंधित विषय यासह 21 व्या शतकातील क्षमता विकसित करणे शक्य झाले पाहिजे उच्च शिक्षणामुळे वैयक्तिक यश आणि आत्मज्ञान निर्माण करी सार्वजनिक सहभाग आणि समाजासाठी उत्पादनशील योगदान साध्य करायला करता यावी अधिक अर्थपूर्ण आणि समाधानकारक जीवन व कामाचे स्वरूप यासाठी आपण विद्यार्थ्यांना तयार केले पाहिजे आणि आर्थिक स्वातंत्र्य प्राप्त करण्यासाठी सक्षम केले पाहिजे व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी अध्ययनाच्या शाळा पूर्व स्तरापासून उच्च शिक्षण स्तरापर्यंत प्रत्येक स्तरावर विशिष्ट निर्धारित कौशल्य आणि मूल्यांची ओळख करून देणे 21 व्या शतकाची गरज आहे सामाजिक स्तरावर एक ध्यानी सामाजिक दृष्ट्या जागृत विद्वान आणि कुशल राष्ट्र निर्माण करण्याची क्षमता उच्च शिक्षणामध्ये आहे असे राष्ट्र जे स्वतःच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी सशक्त उपाय शोधून त्याची अंमलबजावणी करू शकेल उच्च शिक्षणाच्या आधारावर ज्ञान निर्माण करून आणि नाविन्यपूर्ण गोष्टींचा शोध लावून वाढत्या राष्ट्रीय अर्थव्यवस्थेला हातभार लावता येतो म्हणून दर्जेदार उच्च शिक्षणाचे उद्दिष्ट फक्त वैयक्तिक रोजगाराच्या अधिक चांगल्या संधी तयार करणे एवढ्या पुढचे मर्यादित राहू नये तर चैतन्यपूर्ण सामाजिक दृष्ट्या सहभागी सहयोगी समुदाय आणि अधिक आनंदी सामंजस्य पूर्ण सुसंस्कृत उत्पादन शील नाविन्यपूर्ण पुरोगामी आणि समृद्ध राष्ट्र तयार करणे ही उच्च शिक्षणाचे कार्य असले पाहिजे.

चांगल्या दर्जाच्या उच्चशिक्षणासाठी प्रवेश मिळाल्यानंतर अनेक शक्यतांचे भंडार खुले होते त्यामुळे व्यक्ती आणि समुदाय आहे दोन्हीही वंचित तेच्या दृष्ट चक्रातून बाहेर पडू शकतात याच कारणासाठी चांगल्या दर्जाच्या उच्च शिक्षणाच्या संधी सर्व व्यक्तींना उपलब्ध करून देणे हे सर्वोच्च प्राधान्यांपैकी एक असले पाहिजे सर्व विद्यार्थ्यांना चांगल्या दर्जाच्या उच्च शिक्षणाला समान प्रवेश मिळावे ही सुनिश्चित केले पाहिजे ज्ञान निर्मिती आणि संशोधन या गोष्टी मोठ्या आणि जिवंत अर्थव्यवस्थेच्या वाढीसाठी आणि ती टिकून ठेवण्यासाठी समाजाच्या उत्थानासाठी आणि अधिक मोठे यश मिळवण्याकरिता देशाला सातत्याने प्रेरित करण्यासाठी महत्त्वाचे आहे खरोखरच सर्वात समृद्ध संस्कृतींपैकी काही उदाहरणार्थ भारत इजिप्त ग्रीस संस्कृती म्हणजे मजबूत ज्ञानाधारी समाज होते त्यांनी विज्ञान तसेच कला भाषा संस्कृती या क्षेत्रात नवीन ज्ञानाचे मूलभूत योगदान करून आपल्या भौतिक आणि बौद्धिक संपत्ती मधील मोठा वाटा मिळवला त्यामुळे केवळ त्यांच्याच नव्हे तर जगभरातील इतरही देशांच्या संस्कृतीमध्ये वर्धन आणि उत्थान झाले आहे सध्या जगात घडणाऱ्या जलद बदलांकडे पाहता संशोधनाची एक मजबूत परिसंस्था कदाचित पूर्वी कधीही नव्हती इतकी ती आता महत्त्वाची झालेली आहे उदाहरणार्थ हवामान बदल लोकसंख्येची गतिशीलता

आणि व्यवस्थापन जैवतंत्रज्ञान आणि विस्तारित जाणारी जागतिक बाजारपेठ कृत्रिम बुद्धिमत्ता इत्यादींचा उदय झालेला आहे तर भारताला या विविध क्षेत्रांमध्ये नेतृत्व करायचे असेल पुढे जायचे असेल पुढील वर्षात काही दशकात आपल्याकडील मोठ्या प्रमाणावरील प्रतिभेचा खरोखर पूर्ण वापर करून पुन्हा एका आघाडीचा आधारित समाज बनवायचा असेल तर आपल्या देशाला आपल्या संशोधन क्षमतांचा लक्षणीय विस्तार करावा लागेल आणि विविध क्षेत्रांमध्ये उत्पादन करावे लागेल आज कोणत्याही देशाच्या आर्थिक बौद्धिक सामाजिक पर्यावरणीय आणि तांत्रिक आरोग्यासाठी आणि प्रगतीसाठी संशोधनाचे महत्त्व पूर्वी कधीही नव्हती इतकी आज वाढलेले आहे.

भारताला आज ज्या सामाजिक आव्हानांचा सामना करायचा आहे उदाहरणार्थ आपल्या सर्व नागरिकांसाठी पिण्याच्या स्वच्छ पाण्याची उपलब्धता आणि स्वच्छता दर्जेदार शिक्षण आणि आरोग्य निगा वाहतूक सुधारणा हवेची गुणवत्ता ऊर्जा आणि पायाभूत सुविधा त्यासाठी केवळ प्रगत विज्ञान आणि तंत्रज्ञानावर आधारित दृष्टिकोनांची आणि उपाययोजनांची गरज नाही तर सामाजिक शास्त्र आणि मानव्य शास्त्री आणि देशातील विविध सामाजिक सांस्कृतिक आणि पर्यावरणीय आयामांच्या सखोल आकलनावर आधारित अशा दृष्टिकोनाची आणि पायांची गरज आहे या आव्हानांचा सामना करणे आणि त्यांच्यावर उपाययोजना करणे यासाठी विविध क्षेत्रांमध्ये उच्च दर्जाचे बहुशाकीय संशोधन भारतात करणे अनिवार्य आहे आपण ते केवळ आयात करू शकत नाही स्वतःसाठी संशोधन करण्याच्या क्षमतेमुळे देशाला असे प्रदेशातील संबंधित संशोधन आहेत करणे व ते आपल्या सोयीप्रमाणे रूपांतरित करून वापरणे सोपे जाते याशिवाय सामाजिक समस्यांच्या रुपयांमधील त्यांच्याबरोबर मूल्याबरोबरच कोणत्याही देशाची ओळख प्रगती बौद्धिक समाधान आणि कल्पकता या गोष्टी सुद्धा देशाचा इतिहास कला पाशा आणि संस्कृती इत्यादी द्वारे मोठ्या प्रमाणात साध्य केल्या जातात विज्ञान आणि समाजशास्त्रातील शोधांबरोबरच कला आणि मानव्य शास्त्रातील संशोधन सुद्धा देशाच्या प्रगतीसाठी आणि आत्मज्ञानासाठी अतिशय महत्त्वाचे असते भारतातील शैक्षणिक संस्थांमधील विशेषता उच्च शिक्षणात कार्यरत असलेल्या संस्थांमधील संशोधन आणि नवीन उपक्रम अतिशय महत्त्वाचे आहेत संपूर्ण इतिहासात जगातील उत्तम उत्तम विद्यापीठातील पुरावे हेच दर्शवतात की संशोधन आणि ज्ञान निर्मितीची मजबूत संस्कृती असलेल्या वातावरणातच अध्यापन आणि अध्यापनाची प्रक्रिया उत्तम प्रकारे घडते आणि त्यातच व्यत्यास म्हणजे जगातील सर्वोत्तम संशोधनातील बरेचसे संशोधन बहुविद्याशाखीय विद्यापीठांमध्ये घडते. भारतामध्ये विज्ञान आणि गणितापासून कला आणि साहित्य पर्यंत ते उच्चार शास्त्र आणि भाषांपासून वैद्यकशास्त्र आणि कृषीपर्यंत अनेक क्षेत्रातील संशोधन आणि ज्ञान निर्मितीची मोठी ऐतिहासिक परंपरा आहे 21 व्या शतकात भारताने संशोधन आणि नावीन्यपूर्णतेचे नेतृत्व करण्यासाठी एक सामर्थ्यशाली आणि प्रबुद्ध समाज तयार करण्यासाठी आणि जगातील सर्वात मोठे तीन अर्थव्यवस्थांपैकी एक बनण्यासाठी हे अधिक बळकट करणे गरजेचे आहे.

तांत्रिक शिक्षणात भारताच्या एकंदर विकासासाठी महत्त्वाचे असलेले अभियांत्रिकी तंत्रज्ञान व्यवस्थापन स्थापत्य कला नगररचना औषध निर्माण हॉटेल व्यवस्थापन केटरिंग तंत्रज्ञान इत्यादी विषयांमधले पदवी आणि पदविका कार्यक्रम समाविष्ट आहेत या क्षेत्रांमध्ये उच्च पात्रता असलेल्या मनुष्यबळाची खूप मागणी असेल एवढेच नव्हे तर या क्षेत्रामधील नाविन्यपूर्ण उपक्रमांनी संशोधनाला चालना देण्यासाठी उद्योगधंदे आणि उच्च शिक्षण देणाऱ्या संस्थांमध्ये अधिक चांगल्या सहकार्याची सुद्धा आवश्यकता आहे त्याशिवाय मानवी प्रयत्नांवर तंत्रज्ञानाच्या परिणामामुळे तंत्रिक शिक्षण आणि इतर क्षेत्रांमधील कप्पेबंदपणा सुद्धा कमी व्हायचे गरज आहे तांत्रिक शिक्षण बहुशाकीय शिक्षण संस्था आणि कार्यक्रमांमध्ये सुद्धा उपलब्ध करण्याचे महत्त्व आहे आणि इतर शाखांमध्ये अधिक सहभागी होण्यासाठी संधींवर नव्याने लक्ष केंद्रित करण्याची आवश्यकता आहे कृत्रिम बुद्धिमत्ता आर्टिफिशियल हे आहे 3d मशीनिंग बिग डेटा विश्लेषण आणि मशीन लर्निंग इत्यादी सारख्या सध्या वेगाने प्रगती करणाऱ्या अत्याधुनिक क्षेत्रांमध्ये व्यावसायिक तयार करण्यात भारताने आघाडी घेण्याची गरज आहे याशिवाय आरोग्य पर्यावरण आणि

शाश्वत जगणे यातील आपलिकेशन सह जीनोमिक स्टडीज नॅनो तंत्रज्ञान निरोसायन्स हे विषय तरुणांची रोजगार क्षमता वाढवण्यासाठी आणि एकूणच भारतीय प्रगतीसाठी आवश्यक आहे.

भारत हा हजारो वर्षाच्या कालावधीत विकसित झालेल्या आणि कला साहित्य रुढी परंपरा भाषिक व्यक्ती अभिव्यक्ती प्राचीन वस्तू वारसा स्थळे आणि इतर अनेक स्वरूपात व्यक्त झालेल्या संस्कृतीचा खजिना आहे जगभरातील कोट्यावधी लोक पर्यटनासाठी भारताला भेट देणे भारतीय पाहुणचाराचा अनुभव घेणे भारतीय हस्तकलेच्या वस्तू व हस्त निर्मिती वस्तू खरेदी करणे अभिजात भारतीय साहित्य वाचणे योग व ध्यान करणे भारतीय तत्त्वज्ञानाने प्रेरित होणे आगळ्यावेगळ्या अशा भारतीय सणांमध्ये सहभागी होणे भारतातील विविध संगीत आणि कलांचा आनंद लुटणे आणि भारतीय चित्रपट पाहणे अशा इतर अनेक प्रकारे या सांस्कृतिक खजिन्याचा दररोज आस्वाद घेत असतात आणि यापासून लाभ करून घेत असतात ही सांस्कृतिक आणि नैसर्गिक संपत्तीच भारताला त्याच्या पर्यटन घोषणेनुसार खरोखर अतुल भारत बनवते भारताच्या सांस्कृतिक संपत्तीचे जतन आणि प्रचार करणे ही देशातील उच्च प्राथमिकता असणे आवश्यक आहे कारण देशाची ओळख तसेच अर्थव्यवस्थेसाठी हे खऱ्या अर्थाने महत्त्वाचे आहे भारतीय कला आणि संस्कृतीचा प्रचार केवळ देशासाठीच नाही तर प्रत्येक व्यक्तीसाठी ही महत्त्वाचा आहे मुलांमध्ये ओळखीची आपलेपणाची आणि तसेच इतर संस्कृती आणि ओळखीचे कौतुक करण्याची भावना निर्माण करण्यासाठी त्यांच्यामध्ये सांस्कृतिक जागरूकता आणि अभिव्यक्ती यासारख्या प्रमुख क्षमता विकसित करणे महत्त्वाचे आहे स्वतःचा संस्कृती किती आस्क लाभाषा आणि परंपरांविषयी दृढभावना आणि ज्ञान त्यांच्या विकासामुळेच मुलांमध्ये सकारात्मक सांस्कृतिक ओळख आणि अध्यात्म सन्मान वाढू शकतो अशा प्रकारे वैयक्तिक तसेच सामाजिक कल्याण या दोघांसाठी सांस्कृतिक जागरूकता आणि अभिव्यक्तीचे योगदान महत्त्वपूर्ण आहे.

कला हे संस्कृतीची शिकवण देण्याचे एक प्रमुख माध्यम आहे सांस्कृतिक अस्मिता जागरूकता बळकट करणे आणि सामाजिक उन्नती साधण्यास व्यतिरिक्त कला व्यक्तींमध्ये आकलनात्मक आणि सर्जनशील क्षमता वाढवण्यासाठी आणि वैयक्तिक आनंद वृद्धिंगत करण्यासाठी ओळखल्या जातात आनंद आकलनात्मक विश्वास आणि व्यक्तीची सांस्कृतिक अस्मिता या महत्त्वाच्या कारणांमुळे सर्व प्रकारच्या भारतीय कला विद्यार्थ्यांना प्रारंभिक बाल्यावस्था संगोपन आणि शिक्षणापासून सुरुवात करून शिक्षणाच्या सर्व स्तरावरून शिकवल्या गेल्या पाहिजेत अशाही अर्थातच कला आणि संस्कृतीशी अतूटपणे जोडली गेलेली आहे वेगवेगळ्या भाषा जगाकडे वेगवेगळ्या पद्धतीने पाहतात आणि म्हणूनच एखाद्या भाषेच्या रचनेवरून ती भाषा बोलणाऱ्यांच्या अनुभवाची समज ठरते विशेषता भाषा दिलेल्या संस्कृतीचे लोक कुटुंबातील सदस्य अधिकाराच्या व्यक्ती सहाध्यायी आणि अनोळखी व्यक्तींसह इतरांची कशाप्रकारे बोलतात यावर आणि संभाषणाचा स्तर यावर परिणाम करतात समान भाषा बोलणाऱ्यांच्या संभाषणांचे स्वाभाविक घटक असलेल्या स्वर अनुभवाची समाज आणि परिचय या गोष्टी म्हणजे त्या संस्कृतीची प्रतिबिंब आणि नोंदी असतात अशा प्रकारे संस्कृती ही आपल्या भाषांमध्ये गुंफलेली असते साहित्य नाटक संगीत चित्रपट इत्यादी स्वरूपातील कलेचा पूर्ण आस्वाद भाषेशिवाय घेतला जाऊ शकत नाही एखादी संस्कृती टिकवण्यासाठी आणि तिच्या प्रचारासाठी प्रसारासाठी त्या संस्कृतीच्या भाषेचे जतन आणि तिचा प्रसार केला गेला पाहिजे दुर्दैवाने भारतीय भाषांकडे आवश्यक तितके लक्ष दिले गेलेले नाही आणि काळजी घेतली गेली नाही आणि गेल्या 50 वर्षात देशाने 220 पेक्षा जास्त भाषा गमावल्या आहेत युनोस्कोने 197 भारतीय भाषा संकटग्रस्त म्हणून घोषित केले आहेत विशेषतः लिपी नसलेल्या विविध भाषा नामशेष होण्याचा धोका आहे जेव्हा अशा भाषा बोलणाऱ्या एखाद्या जमातीच्या किंवा समुदायाच्या ज्येष्ठ सदस्याचा मृत्यू होतो तेव्हा बहुतेकदा या भाषा त्याच्याबरोबर नामशेष होतात बऱ्याचदा या समृद्ध भाषांचे अभिव्यक्तींचे जतन करण्यासाठी किंवा त्या रेकॉर्ड करण्यासाठी कोणतेही संस्कृती किंवा उपाययोजना केल्या जात नाही शिवाय अधिकृतपणे अशा संकटग्रस्त यादीत नसलेल्या भाषा सुद्धा जसे की भारतीय राज्यघटनेच्या आठव्या अनुसूचीतील 22 भाषा बऱ्याच आघाड्यांवर गंभीर अडचणींना तोंड देत आहेत भारतीय भाषांचे अध्ययन आणि

अध्यापन प्रत्येक स्तरावर शाळा आणि उच्च शिक्षणाची एकात्मिक करणे आवश्यक आहे भाषा उपयुक्त आणि चैतन्यमय राहण्यासाठी पाठ्यपुस्तके कार्यपुस्तिका व्हिडिओ नाटकेल कविता कादंबऱ्या मासिके इत्यादीं सह या भाषांमध्ये उच्च गुणवत्तेच्या अध्ययन आणि मुद्रित साहित्याची निर्मिती निर्माण होणे आवश्यक आहे भाषांचे शब्दसंग्रह आणि शब्दकोश नियमितपणे अधिकृतरित्या अध्यायवत करणे व्यावसायिकपणे प्रसारित करणे किंवा आवश्यक आहे जेणेकरून या भाषांमध्ये सर्वात वर्तमान मुद्द्यांवर आणि संकल्पनांवर प्रभावीपणे चर्चा करता येऊ शकेल जगभरातील देशांद्वारे इंग्रजी फ्रेंच जर्मन हेब्रुकोरियन आणि जपानी यासारख्या भाषांमध्ये असे अध्ययन साहित्य मुद्रण साहित्य व जगातील भाषांमधून महत्वपूर्ण साहित्याची अनुवाद निर्माण करण्याचे आणि शब्दसंग्रह सतत अद्यावत करण्याची कार्य केले जाते तथापि आपल्या भाषा चांगल्या प्रकारे जिवंत आणि प्रभावी राहण्यास प्रामाणिकपणे मदत करण्यासाठी असे अध्ययन व मुद्रित साहित्य आणि शब्दकोश तयार करण्यात भारताची वाटचाल बऱ्याच पैकी मंदगतीने झाली आहे.

नामशेष होत चाललेल्या भाषासहित सर्व भारतीय भाषा आणि त्यांच्याशी संबंधित समृद्ध स्थानिक कला आणि संस्कृतीचे जतन करण्याच्या दृष्टीने वेग आधारित प्लॅटफॉर्म या माध्यमातून सर्व भारतीय भाषा आणि त्यांच्याशी संबंधित स्थानिक कला आणि संस्कृतीला लेखी स्वरूप दिले गेले पाहिजे भाषा बोलणे गोष्टी सांगणे, कविता वाचन करणे तसेच नाटक लोकसंगीत आणि नृत्य सादर करणे आणि यासारख्या इतर कार्यात गुंतलेल्या लोकांचे व्हिडिओ ध्वनीमूत्र नाही तसेच शब्दकोश इत्यादी या प्लॅटफॉर्म स्वर उपलब्ध असतील तर या प्लॅटफॉर्मवर प्रसंगोचित साहित्याचा समावेश करून या प्रयत्नांना हातभार लावायची आवाहन देशभरातील सर्व लोकांना केले पाहिजे असे प्लॅटफॉर्म समृद्ध करण्यासाठी विद्यापीठे आणि त्यांचे संशोधन गट एकमेकांबरोबर आणि देशभरातील समुदायांबरोबर काम करतील जतन करण्याचे प्रयत्न आणि त्यांच्याशी संबंधित प्रकल्पांसाठी येणाऱ्या कडून अर्थसहाय्य मिळाले पाहिजे स्थानिक तज्ञांकडे किंवा उच्च शिक्षण व्यवस्थे अंतर्गत भारतीय भाषा कला संस्कृतीचा अभ्यास करण्यासाठी सर्व वयोगटातील लोकांसाठी शिष्यवृत्ती त्यांची स्थापना करणे आवश्यक आहे भारतीय भाषांचा प्रसार तेव्हा शक्य आहे जेव्हा त्यांच्या नियमितपणे वापर केला जाईल आणि अध्यापन अध्यापनासाठी त्याचा उपयोग होईल भारतीय भाषांमध्ये जोमदार काव्य कादंबऱ्या अकल्पिक पुस्तके पाठ्यपुस्तके पत्रकारिता आणि इतर साहित्याच्या निर्मितीची सुनिश्चितता करण्यासाठी प्रोत्साहन देणाऱ्या योजनांची स्थापना करणे आवश्यक आहे भारतीय भाषांमधील विविध प्रकारतील असामान्य काव्य आणि गद्यासाठी पुरस्कार योजना रोजगारांच्या संधी मिळण्याकरता लागणाऱ्या पात्रतेच्या मापदंडांमध्ये भारतीय भाषांवर प्रदूत व या मापदंडाचा समावेश करावा लागेल.

तंत्रज्ञानाच्या वापराचा भर प्रामुख्याने अध्यापन अध्ययन आणि मूल्यांकन प्रक्रिया सुधारणे शिक्षकांच्या तयारीसाठी व्यावसायिकांच्या विकासाचा सहकार्य करणे शिक्षणाची उपलब्धता वाढवणे आणि प्रवेश उपस्थिती मूल्यांकन इत्यादींशी संबंधित प्रक्रिया शैक्षणिक नियोजन व्यवस्थापन व प्रशासन सुलभ करणे यावर भर दिला गेला पाहिजे माहिती व संचारतंत्रज्ञान आणि इतर अत्याधुनिक क्षेत्रांमध्ये भारत जागतिक पातळीवर नेतृत्व करत आहे डिजिटल भारत मोहिमेमुळे संपूर्ण राष्ट्राचे एका डिजिटल दृष्ट्या सक्षम आणि ज्ञानावर आधारित अर्थव्यवस्थेमध्ये रूपांतर व्हायला मदत होत आहे या रूपांतरामध्ये शिक्षण एक महत्त्वपूर्ण भूमिका बजावत आहे शैक्षणिक प्रक्रिया आणि निष्पत्ती यामध्ये सुधारणा करण्यामागे तंत्रज्ञानाचा मोठा हातभार आहे अशा प्रकारे तंत्रज्ञानाने शिक्षणामधील संबंध सर्व स्तरावर दोन्ही बाजूंनी काम करीत आहे तांत्रिक विकासाच्या तीव्र वेगाला तंत्रज्ञानाची जानकार शिक्षक आणि उद्योजकांसहित विद्यार्थी उद्योजकांच्या कल्पकतेची जोड मिळाल्यानंतर तंत्रज्ञानाचा शिक्षणावर अनेक प्रकारे परिणाम होत आहे सध्या यातील फक्त काही परिणामांचा आता अंदाज लावता येईल आर्टिफिशियल इंटेलिजन्स मशीन लर्निंग ब्लॉक चेंज स्मार्ट बोर्ड हस्तचलित कॉम्प्युटर विद्यार्थ्यांच्या विकासासाठी अडपटिव्ह कॉम्प्युटर टेस्टिंग आणि इतर स्वरूपातील सॉफ्टवेअर आणि हार्डवेअर यासारख्या नवीन तंत्रज्ञानामुळे विद्यार्थी वर्गात काय शिकतात

फक्त यामध्ये बदल होणार नाही तर ते कसे शिकतात यात देखील बदल व्हायला पाहिजे आणि म्हणूनच तांत्रिक आणि शैक्षणिक आणि आघाडीवर या आणि इतर क्षेत्रांमध्ये विस्तृत संशोधन होणे गरजेचे आहे.

संदर्भ सूची:

1. डॉ. शिवाजी देसाई, डॉ. वियादेवी पाटील, भारतीय परंपरागत ज्ञान आणि शिक्षण, संशोधन पद्धतीशास्त्र, सक्सेस पब्लिकेशन.
2. डॉ. बी. पाटील, डॉ. एस.कऱ्हाडे, शिक्षणातील गुणवत्ता आणि व्यवस्थापन, निराली प्रकाशन.
3. डॉ. संजीव सोनवणे, डॉ. शोभा कागडे, डॉ. गौरी खैरे, प्रगत शैक्षणिक मानसशास्त्र, निराली प्रकाशन.
4. प्रा. के. ना. देशपांडे, प्रा. आ.ल. माळी, भारतीय शिक्षणाचा इतिहास, नित्यनुतन प्रकाशन.

दिव्यांगासाठी स्टार्ट अप योजना एक अभ्यास

प्रा. डॉ. आर. डी. सिकची

प्राचार्य,

सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला

स्मिता रविंद्र गोंधळे

संशोधक विद्यार्थी

सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला

सारांश

कोणत्याही राष्ट्राच्या शाश्वत विकासामध्ये समाजातील प्रत्येक घटकाचा सहभाग असणे आवश्यक आहे. दिव्यांग व्यक्तींकडे असलेली जिद्द आणि सुप्त गुणांना व्यावसायिक दिशा देण्यासाठी सरकारी आणि निमसरकारी स्तरावर विविध स्टार्टअप योजना राबवल्या जात आहेत. या अभ्यासाचा मुख्य उद्देश दिव्यांगांसाठी उपलब्ध असलेल्या आर्थिक सवलती, सवलतीच्या दरातील कर्ज योजना (उदा. NHFDC, मुद्रा योजना) आणि कौशल्य विकास कार्यक्रमांचे विश्लेषण करणे हा आहे. शारीरिक मर्यादांवर मात करून दिव्यांग व्यक्ती तंत्रज्ञान, ई-कॉमर्स आणि लघुउद्योगांच्या माध्यमातून कशा प्रकारे स्वावलंबी होऊ शकतात, याचा आढावा यात घेण्यात आला आहे. तसेच, या योजनांच्या अंमलबजावणीतील आव्हाने आणि दिव्यांग उद्योजकांमुळे होणारा सामाजिक-आर्थिक बदल यांचाही यात अभ्यास केला आहे.

थोडक्यात, हा अभ्यास असा निष्कर्ष काढतो की, योग्य मार्गदर्शन, आर्थिक पाठबळ आणि आधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळाल्यास 'दिव्यांग' हे केवळ मदतीचे लाभार्थी न राहता देशाच्या अर्थव्यवस्थेला गती देणारे यशस्वी 'उद्योजक' बनू शकतात.

Keywords: दिव्यांग, आर्थिक विकास, स्टार्टअप

प्रस्तावना

समाजात विविध प्रकारच्या समस्या असलेल्या दिसून येतात. यातील प्रमुख समस्या ही लोकसंख्येतील दिव्यांग घटकांची आहे. त्यामुळे समाजाच्या प्रगत अवस्थेत दिव्यांगांच्या सामाजिक प्रश्नाला महत्त्व प्राप्त होते. भारतीय संस्कृतीत समाजातल्या दीनदुबळ्या लोकांकडे सहानुभूतीने पाहण्याची शिकवण प्राचीन काळापासूनच भारतातील थोर ऋषि मुनी यांनी घालून दिली आहे. तसेच भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देखील असे प्रतिपादन केले होते की, 'दिव्यांगांना विकासाची समान संधी उपलब्ध करून दिल्यास ते स्वत:सह समूहाचे भविष्य उज्ज्वल करतील' तसेच राज्यघटनेच्या सुरुवातीलाच देशातील सर्व व्यक्तीला सामाजिक, आर्थिक, राजकीय, न्याय मिळवून देण्याची प्रतिज्ञा करण्यात आली आहे. तसेच घटनेच्या कलम 21 व 226 यात सामाजिक न्यायाची तरतूद केली आहे. पण काही पाश्चात्य देशात मात्र या गोष्टीचा अभाव दिसून येतो. उदा. युनान (Greece) देशात दिव्यांग व्यक्तींना समाजात योग्य वागणूक दिली गेली नाही, तर याउलट दिव्यांगाला सन्मानपूर्वक वागणूक देण्यात

यावी अशी जगाला प्रथम शिकवण 'युरोपने'घालून दिली. बऱ्याच विकसित देशांत समाजातील दिव्यांग व्यक्तीला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी फार प्राचीन काळापासूनच प्रयत्न केले गेले आहेत.

जगात दुसऱ्या महायुद्धानंतर दिव्यांगांच्या प्रश्नाला खूप महत्त्व प्राप्त झाले आहे. सन 1947 मध्ये 'संयुक्त राष्ट्रसंघा' अंतर्गत बैंकॉक येथे अशिया व पॅसिफिक प्रदेशासाठी ESCAP- "Economics Social Commision for Asia & Pacific" या आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. या आयोगाने 1992 मध्ये बीजिंग येथे परिषद आयोजित करून "Proclamation on the full Participation & Equality of People with Disability in the Asian & Pacific Regien" अशी घोषणा केल्यामुळे जागतिक स्तरावर दिव्यांगांच्या विकासाला गती मिळाली. पुढे संयुक्त राष्ट्रसंघाकडून या प्रश्नाला जागतिक स्तरावर लक्ष केंद्रित करण्यासाठी 3 डिसेंबर हा 'जागतिक दिव्यांग दिन'म्हणून जाहीर केला गेला आहे. 1993 मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाने दिव्यांगांच्या धोरणाची नियमावली तयार केली आहे. पुढे 2006 मध्ये मानवी हक्कांतर्गत दिव्यांगांच्या विकासासाठी तयार केलेल्या जाहीरनाम्यावर जगातील 160 देशांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत. त्यामुळे आज जगातील बरेच देश आप-आपल्या देशातील दिव्यांगांचा विकास करण्यासाठी कटिबद्ध आहेत. त्यामुळे जगातील अनेक राष्ट्रांत दिव्यांगांना ताठ मानेने जगता यावे म्हणून शिक्षण, आरोग्य, नोकरी, अर्थसहाय्य इत्यादींचा पुरवठा करताना दिव्यांगांना प्राधान्यक्रम देतात.

दिव्यांग व्यक्तींच्या सर्वांगीण विकासासाठी केवळ सामाजिक आधार पुरेसा नसून त्यांचा **आर्थिक विकास** आणि **स्वावलंबन** अत्यंत महत्त्वाचे आहे. समाजातील दुर्लक्षित आणि दुर्बल घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी भारत सरकार आणि महाराष्ट्र शासनाने विविध स्टार्टअप आणि स्वयंरोजगार योजना सुरू केल्या आहेत. पूर्वी दिव्यांगांकडे केवळ मदतीची गरज असलेला घटक म्हणून पाहिले जात होते, परंतु आता 'उद्योजक' म्हणून त्यांच्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत आहे.

दिव्यांगांसाठी स्टार्टअप आणि उद्योजकता प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारांनी विविध योजना राबवल्या आहेत. या क्षेत्राचा अभ्यास केल्यास, प्रामुख्याने आर्थिक सहाय्य, कौशल्य विकास आणि तांत्रिक मदत या तीन स्तंभांवर या योजना आधारित असल्याचे दिसते.

संशोधन पद्धती (Methodology)

हा शोधनिबंध प्रामुख्याने दुय्यम माहितीवर (Secondary Data) आधारित आहे. यामध्ये शासकीय अहवाल, दिव्यांगासाठीची अधिकृत संकेतस्थळे, आणि मागील शोधनिबंधांचा आधार घेण्यात आला आहे.

शोध निबंधाची उद्दिष्ट्ये

- दिव्यांगांसाठी राबवल्या जाणाऱ्या विविध स्टार्टअप आणि आर्थिक योजनांची माहिती अभ्यासणे.

प्रमुख स्टार्टअप आणि उद्योजकता योजना

दिव्यांगांना स्वतःचा व्यवसाय किंवा स्टार्टअप सुरू करण्यासाठी खालील योजना अत्यंत प्रभावी आहेत:

नॅशनल दिव्यांगजन फायनान्स अँड डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (NHFDC):

ही संस्था दिव्यांगांना अत्यंत कमी व्याजदरात (4% ते 8%) व्यवसाय कर्ज उपलब्ध करून देते. याअंतर्गत किरकोळ व्यवसाय ते मोठ्या स्टार्टअप्ससाठी भांडवल मिळू शकते.

पंतप्रधान रोजगार निर्मिती कार्यक्रम (PMEGP):

या योजनेअंतर्गत नवीन स्टार्टअप किंवा उत्पादन घटकांसाठी अनुदानित कर्ज दिले जाते. दिव्यांग अर्जदारांना विशेष श्रेणीमध्ये अधिक सबसिडी (शहरी 25%, ग्रामीण 35%) मिळते.

कृषी संजीवनी हॉर्टिकल्चर योजना:

महाराष्ट्र सरकारची ही योजना विशेषतः दिव्यांग शेतकऱ्यांसाठी आहे, ज्याद्वारे फलोत्पादन किंवा कृषी व्यवसायासाठी 10 लाख रुपयांपर्यंतचे कर्ज कमी व्याजदरात दिले जाते.

मुद्रा योजना (MUDRA Loan):

छोट्या स्टार्टअप्ससाठी 'शिशू', 'किशोर' आणि 'तरुण' श्रेणीत 10 लाखांपर्यंत विनातारण कर्ज उपलब्ध आहे.

कौशल्य विकास आणि प्रशिक्षण

व्यवसाय यशस्वी करण्यासाठी तांत्रिक कौशल्याची गरज असते, त्यासाठी:

- **नॅशनल स्किल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (NSDC):** दिव्यांगांसाठी विशेष कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम राबवले जातात, जेणेकरून ते स्वतःचा स्टार्टअप सक्षमपणे चालवू शकतील.
- **SIPDA (Implementation of PwD Act):** या योजनेअंतर्गत दिव्यांगांना कौशल्य विकास आणि स्वयंरोजगारासाठी आर्थिक मदत दिली जाते.

दिव्यांग योजनांचा दिव्यांगांचा आर्थिक विकासावर परिणाम

दिव्यांग कल्याणकारी योजनांचा दिव्यांगांच्या आर्थिक विकासावर होणारा परिणाम हा अत्यंत सकारात्मक आणि परिवर्तनकारी आहे. या योजना केवळ आर्थिक मदत करत नाहीत, तर दिव्यांगांना सन्मानाने जगण्यासाठी 'उद्योजक' म्हणून उभे करतात. **दिव्यांगांच्या आर्थिक विकासावर होणारे मुख्य परिणाम खालीलप्रमाणे आहेत:**

१. गरिबी निर्मूलन आणि उत्पन्नात वाढ

- **पॅन्शनचा प्रभाव:** अभ्यासानुसार, 'इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्ती वेतन' सारख्या योजनांमुळे दिव्यांगांमधील गरिबीचे प्रमाण सुमारे 12% ने कमी झाले आहे.
- **थेट उत्पन्न:** अनेक लाभार्थी (उदा. किरणा स्टोअर किंवा छोटे व्यवसाय सुरू करणारे) पेन्शनवर अवलंबून राहण्याऐवजी स्वतःच्या व्यवसायातून दरमहा 3,000 ते 8,000 रुपयांपर्यंत किंवा त्याहून अधिक उत्पन्न मिळवत आहेत.

२. उद्योजकता आणि स्वयंरोजगाराला चालना

- **कमी व्याजदरात कर्ज:** National Divyangjan Finance and Development Corporation (NDFDC) द्वारे 50 लाख रुपयांपर्यंत कर्ज सवलतीच्या दरात दिले जाते. यामुळे आतापर्यंत कोट्यवधी रुपयांचे कर्ज वाटप होऊन हजारो दिव्यांग उद्योजक तयार झाले आहेत.
- **अनुदान (Subsidy):** अनेक सरकारी योजनांमध्ये (उदा. PMEGP किंवा राज्यस्तरीय योजना) २५% ते ५०% पर्यंत भांडवली अनुदान दिले जाते, ज्यामुळे व्यवसायाचा आर्थिक भार कमी होतो.

३. कौशल्य विकास आणि रोजगाराची संधी

- प्रशिक्षण: Deen Dayal Disabled Rehabilitation Scheme (DDRS) आणि इतर कौशल्य विकास कार्यक्रमांमुळे दिव्यांगांना तांत्रिक शिक्षण मिळते, ज्यामुळे खाजगी क्षेत्रात (उदा. IT, ॲडमिनिस्ट्रेशन) नोकरी मिळणे सोपे झाले आहे.

- साधने आणि उपकरणे: ADIP योजने अंतर्गत मिळणारी आधुनिक साधने (उदा. मोटराइज्ड ट्रायसायकल) दिव्यांगांची गतिशीलता वाढवतात, ज्यामुळे त्यांना कामाच्या ठिकाणी जाणे सोपे होते आणि त्यांची उत्पादनक्षमता वाढते.

४. सामाजिक प्रतिष्ठा आणि स्वावलंबन

- आर्थिक मदतीमुळे दिव्यांग व्यक्ती कुटुंबावर ओझे न राहता कुटुंबाला हातभार लावू लागतात. यामुळे समाजात त्यांची प्रतिष्ठा वाढते आणि त्यांच्यातील आत्मविश्वासात मोठी भर पडते.

आव्हाने (Challenges)

दिव्यांग स्टार्टअप आणि आर्थिक योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीमध्ये खालील आव्हाने प्रामुख्याने दिसून येतात:

१. प्रशासकीय आणि तांत्रिक आव्हाने

- **जटिल कागदपत्रे:** कर्ज किंवा अनुदानासाठी आवश्यक असलेली कागदपत्रे गोळा करणे (उदा. उत्पन्नाचा दाखला, प्रकल्प अहवाल, अपंगत्व प्रमाणपत्र) दिव्यांगांसाठी क्लिष्ट असते.
- **बँकांचे असहकार्य:** अनेकदा बँका दिव्यांगांना कर्ज देताना त्यांच्या परतफेडीच्या क्षमतेवर शंका घेतात, ज्यामुळे स्टार्टअपसाठी भांडवल मिळवणे कठीण होते.
- **ऑनलाईन प्रक्रियेतील अडथळे:** बहुतेक योजनांचे अर्ज ऑनलाईन आहेत, परंतु 'डिजिटल साक्षरता' नसल्यामुळे अनेक दिव्यांग यापासून वंचित राहतात.

२. पायाभूत सुविधांची कमतरता

- **प्रवेशयोग्यता (Accessibility):** सरकारी कार्यालये, बँका किंवा कच्चा माल मिळवण्याची ठिकाणे आजही पूर्णपणे 'बॅरियर-फ्री' (अडथळामुक्त) नाहीत.
- **वाहतुकीच्या समस्या:** कच्चा मालाची ने-आण करण्यासाठी किंवा उत्पादित माल बाजारपेठेत नेण्यासाठी दिव्यांगांना अधिक खर्च आणि कष्ट सोसावे लागतात.

३. सामाजिक आणि मानसिक आव्हाने

- **सामाजिक दृष्टिकोन:** समाजाचा दिव्यांगांकडे पाहण्याचा दृष्टिकोन अजूनही 'सहानुभूती'चा आहे, 'समान संधी'चा नाही. यामुळे त्यांच्या उत्पादनांना बाजारपेठ मिळवण्यात अडचणी येतात.
- **आत्मविश्वासाचा अभाव:** सततच्या अपयशामुळे किंवा कौटुंबिक पाठिंबा नसल्यामुळे अनेक दिव्यांग जोखीम घेण्यास घाबरतात.

४. कौशल्य आणि प्रशिक्षणाचा अभाव

- **आधुनिक तंत्रज्ञान:** बदलत्या तंत्रज्ञानानुसार आवश्यक असणारे 'स्किल अपग्रेडेशन' वेळेवर मिळत नाही.
- **मार्केटिंगचे ज्ञान:** उत्पादन चांगले असूनही त्याचे ब्रँडिंग आणि मार्केटिंग कसे करावे, याचे प्रशिक्षण देणाऱ्या संस्थांची कमतरता आहे.

५. बाजारपेठेतील स्पर्धा

- मोठ्या कंपन्यांच्या उत्पादनांशी स्पर्धा करताना दिव्यांग उद्योजकांना किमतीच्या बाबतीत तडजोड करावी लागते, ज्यामुळे नफ्याचे प्रमाण कमी होते.

निष्कर्ष:

दिव्यांगांसाठीच्या शासकीय योजनांनी 'कल्याणकारी' (Welfare) मानसिकतेकडून 'हक्क-आधारित सक्षमीकरण' (Rights-based Empowerment) याकडे मोठा प्रवास केला आहे. या योजनांनी दिव्यांगांना केवळ मदतीचा हात दिला नसून, त्यांना देशाच्या अर्थव्यवस्थेत सक्रिय भागीदार बनवण्याचा पाया रचला आहे. योजनांचे सकारात्मक परिणाम असले तरी, कमी साक्षरता, माहितीचा अभाव आणि काही ठिकाणी कर्ज मिळवण्यातील तांत्रिक अडचणी यामुळे अजूनही अनेक दिव्यांगांपर्यंत या योजना पूर्णपणे पोहोचलेल्या नाहीत.

संदर्भ ग्रंथ

1. शेलकर अभया (2013), दिव्यांग व अपंगा संबंधी शासन निर्णय व परिपत्रके, नाशिक लॉ हाऊस, औरंगाबाद.
2. त्र्यंबक दुनबळे, डायरी अपंग जागराची, परममित्र पब्लिकेशन.
3. https://www.maharashtra.gov.in/
4. https://mshfdc.co.in/
5. https://socialjustice.gov.in/
6. https://swavlambancard.gov.in//

वर्तमान काळात लोकशाहीमध्ये प्रसार माध्यमांची असलेली भूमिका: एक चिकित्सक अध्ययन

निकेश दिगांबरराव काळे

सारांश:-

वर्तमान काळामध्ये प्रसारमाध्यमांनी आपले कर्तव्य बजावतांना प्रसंगावधान राखून घटनेचे महत्त्व ओळखून संबंधित माहिती प्रसारित करणे आवश्यक असते. प्रसारमाध्यमांनी केवळ शासकीय योजनांची माहिती देणेच अपेक्षित नसते तर सर्वांगीण दृष्टिकोन बाळगणे आवश्यक असते. प्रसारमाध्यमे ही लोकशाहीचा आरसा असून तसेच लोकशाहीचा चौथा आधारस्तंभ आहे. लोकशाहीच्या हितासाठी जनमानसात सकारात्मक प्रतिमा निर्माण करण्याचे आव्हानात्मक काम प्रसारमाध्यमे करीत असतात.देशातील सध्याच्या परिस्थितीचा वेध घेत "एक राष्ट्र, एक संकल्प, एक स्वर' हा मंत्र प्रसारमाध्यमांनी राबविला पाहिजे. आता समाज माध्यमांचा धडाका सुरू झाला आहे. तांत्रिक हस्तक्षेपातून त्याला नव्या दिशा आणि वळले मिळाली आहेत. त्यामुळे ही माध्यमे कुठल्याही संपादनाच्या अवाक्य बाहेर जात आहेत. त्यामुळे त्यांना ठराविक मर्यादितेत किंवा बंधने घालणे अशक्य झाले आहे. त्यामुळे सर्वसाधारण प्रसार माध्यमांसमोर आता या नव्या समाज माध्यमांसोबत टिकून राहून दिशा देण्याचे आव्हान उभे राहिले आहे.

प्रसारमाध्यमांनी आपली भूमिका निश्चितपणे वठवलेली आहे, हेही नाकारता येत नाही. आजही स्वतंत्र पत्रकारिता नाही, असे नाही. कदाचित त्यांची संख्या कमी असेल तरी ते आपल्या मुख्य भूमिकेपासून दूर राहिलेले नाही. आजही अनेक वृत्तपत्रे व वृत्तवाहिन्यांनी आपला विश्वास समाजात कायम ठेवला आहे. आज खरी आवश्यकता आहे ती ही की माध्यमांनी समाजाप्रती असलेले बांधिलकी जपण्याची ती जर जपल्या गेली तर कुठल्याही राष्ट्राचे चांगलेच होणार आहे.

प्रस्तावना:-

वर्तमान काळात संदेशवहन जलद गतीने होत असल्याने प्रसारमाध्यमांची कार्य करण्याची भूमिका बदलत आहे. लोकशाही शासन हे वर्तमान काळात प्रतिनिधिक शासन आहे. जनता ही शासन कारभारात आपल्या प्रतिनिधीमार्फत भाग घेत असते व प्रतिनिधी जनतेच्या वतीने कारभार करीत असते. जनतेच्या वतीने प्रतिनिधींनी घेतलेल्या निर्णयाचा योग्य व अयोग्य परिणाम जनसमूहावर काय झाला हे केवळ वर्तमानपत्रे व न्यूज चॅनल यांच्या माध्यमातूनच शासनापर्यंत पोहोचत असते व शासन सतर्क होत असते. राजकीय व्यवस्था ही लोकशाही असो की हुकूमशाही प्रसार माध्यमे आपली भूमिका चांगल्या पद्धतीने पार पाडत असते.

प्रसार माध्यमांनी माहिती प्रसारित करताना सकारात्मक दृष्टिकोन स्विकारून सुवर्णमध्य साधने अत्यंत महत्त्वाचे असते. सध्याच्या काळात माहितीचे संदेशवहनाचे प्रसारण इतके जलद गतीने होत आहे की एका सेकंदापूर्वी काय घडले याची माहिती फेसबुक, ट्विटर, व्हाट्सअप, टेलिग्राम व इंस्टाग्राम यासारख्या सामाजिक साईट्सवरून त्वरित प्रसारित होतात. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी संदेशवहनाचे प्रसारण सध्या जलद गतीने होताना दिसत आहे. भारतातील ब्रिटिश पूर्व काळापासून सुरू असलेल्या संदेशवहनाच्या प्रसारणाची जागा जरी आजच्या फेसबुक, व्हाट्सअप, इंस्टाग्राम, टेलिग्राम, व ट्विटर यांनी घेतली असली तरी देखील आजही पूर्वीच्या प्रसारमाध्यमांनी त्याच

जोशात तक धरला आहे. वर्तमान काळात प्रसारमाध्यमांचा वापर हा दिवसेंदिवस वाढत असून वर्तमानपत्र आणि प्रसार माध्यमांची जागा फेसबुक आणि व्हाट्सअपने घेतली आहे. परंतु यामुळे मूळ पत्रकारिता आणि पत्रकारांच्या प्रतिमेला धोका आहे. कारण आजकाल प्रसारमाध्यमे इतकी नकोशी झाले आहेत की, कोणीही पत्रकार होऊ शकतो. फेसबुक, व्हाट्सअपमुळे बातमीची विश्वसाहर्ता कमी झालेली आहेत. आपण पाहतो की बऱ्याच वेळी वर्तमानपत्रे चुकीची माहिती प्रसारित करून जनजीवन अडथळयात येते, त्यामुळे प्रसारमाध्यमे ही कधी कधी घातक आहेत की काय? असा प्रश्न आपल्याला पडल्याशिवाय राहत नाही. प्रसार माध्यमे आजच्या काळात झालेल्या बाजारीकरणामुळे वर्तमान काळात चुकीच्या बातम्या प्रसारित करून वृत्तपत्रांची विश्वासार्हता कमी होत आहे.

प्रसार माध्यमे आणि लोकशाही यांचा घनिष्ठ संबंध आहे. प्रसार माध्यमांचा प्रभाव राजकारणावर पडताना दिसून येतो. वास्तविक पाहता लोकशाहीमध्ये राजकारणात लोकमतला अनन्य साधारण महत्व आहे. लोकमत तयार होण्याचे प्रमुख स्त्रोत म्हणजे प्रसारमाध्यमे आहेत. त्यामुळेच प्रसार माध्यमांची राजकारणातील भूमिका महत्त्वाची ठरते. लोकशाहीचे चार महत्त्वाचे आधार स्तंभ आहे. त्यामध्ये कार्यकारी मंडळ, कायदेमंडळ, न्याय मंडळ आणि प्रसारमाध्यमे. हे चार स्तंभ होय. यातील प्रत्येक स्तंभ महत्त्वाचा आहे. यातील एक जरी स्तंभ डळमळीत झाला तर लोकशाही शासनाला व्यवस्थित कार्य करणे कठीण जाते. प्रसारमाध्यमे ही जनमताला शिक्षण देण्याचे काम करीत असल्यामुळे त्यांना लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हटल्या जाते.

तसेच प्रसार माध्यमे चांगल्या पद्धतीने त्यांचे कार्य पार पाडावी अशी लोकशाहीत जनतेची मागणी असते, हुकूमशाहीत प्रसारमाध्यमे ही राज्यकर्ते वर्गाची प्रचार साधने असतात. तर लोकशाहीत राजकीय स्वातंत्र्याची आधारशीला असतात. मिल्टनच्या मते, "सत्य शोधणे व शासकीय कारभाराची चिकित्सा करणे ही प्रसारमाध्यमांचे मुख्य कार्य असते," प्रसारमाध्यमे प्रशासनातील कार्यक्षमता वाढविण्याच्या दृष्टीने प्रभाव कार्य करीत असतात. आधुनिक काळात प्रसारमाध्यमांचे दोन प्रकारात विभाजन करता येते एक म्हणजे मुद्रित माध्यमे व दुसरा म्हणजे इलेक्ट्रॉनिक माध्यमे आहे. आधुनिक काळात या मुद्रित प्रसार माध्यमांबरोबर इलेक्ट्रॉन प्रसार माध्यमे म्हणजेच दूरदर्शन तसेच विविध खाजगी वृत्तवाहिन्या इत्यादी अस्तित्वात आहे. वृत्तपत्रे वाचण्यासाठी साक्षर असणे आवश्यक आहे परंतु साक्षर असून चालणार नाही तर वृत्तपत्रातील मजकुराचा योग्य तो अर्थ लागावा यासाठी साक्षर असणे गरजेचे असते. त्याचबरोबर एक महत्त्वाची मर्यादा म्हणजे वाहतूक व्यवस्थेच्या अभावी सर्व लोकांपर्यंत पोहोचविणे ही शक्य होत नाही. आधुनिक काळात व्यक्तीची ही अडचण इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमे भागवित आहे.

वर्तमान काळातील प्रसारमाध्यमांची सध्याची स्थिती :-

आजच्या आधुनिक काळात जग हे अधिक मोकळे व उदारमतवादी झाले आहे. माहितीचा प्रसार तातडीने होत आहे. त्याची व्यापकता आजच्या इतकी कधीच नव्हती. माध्यमांमुळे सर्व जग एकत्र झाले आहे. आज भारतात 700 ते 800 पेक्षा जास्त वृत्तवाहिन्या आहे वृत्तपत्र तर वेगळीच आहे. आता समाजमाध्यमांचा धडाका सुरू झाला आहे. तांत्रिक हस्तक्षेपातून त्याला नव्या दिशा आणि वळणे प्राप्त झाली आहेत, त्यामुळे त्यांना ठराविक बंधने घालने अशक्य आहे. सर्वसाधारण माध्यमांसमोर आता या नव्या समाज माध्यमांसोबत टिकून राहून दिशा देण्याचे आव्हाने उभे ठाकले आहे. आज नव्या व्यवस्थेत भारतीय माध्यमे खासकरून इलेक्ट्रॉनिक माध्यमांची भूमिका महत्त्वाची आहे. गेल्या काही वर्षापासून दूरचित्रवाणीवरील बातम्यांमध्ये नि:पक्षपातीपणा आणि नैसर्गिकता यांचा अभाव आढळून येत असल्याचे दिसून येते. गतिमानता हाच आजच्या माध्यमांचा नवा मंत्र झाला आहे. त्यामुळे घटनांची पडताळणी

आणि फेरपडताळणी करणे हा मार्ग मागे पडला आहे. बातम्या या लाईव्ह घटना कशा दिसतील त्याची स्पर्धात्मकता होळ लागलेली आहे. प्रत्येक क्षणाच्या घटनेत नव्या बातम्या दिल्या जात आहे. त्यातही विसंगती दिसत आहे. ज्या बातम्यांमुळे लोकांचे लक्ष वेधले जाईल अशा बातम्या देण्याची लगबग सुरू झाली आहे. ही लगबग इतकी टोकाला जाऊ लागली आहे की, कधीकधी त्यातून मूळ बातमी किंवा घटना दूर राहते आणि नवीनच काहीतरी एखादा विषय पुढे येत आहे. त्यातही वर्गवारी केली जात आहे. दूरचित्रवाणी मुख्यत्वे करून निधर्मीपणे आधुनिक उदारमतवादी आणि पुरोगामी लोकांची राहिली आहे. साधारणपणे त्यांनी त्यात जातीयवादाला स्थान दिले नाही. त्यांनी मूलतत्त्ववादाला कधी खतपाणी घातले नाही. त्यांनी नेहमीच एकमताचा आदर केला आहे. मतभेदांचेही स्वागत केले आहे. क्षीण आवाज असलेल्यांसाठी लढा दिला आहे आणि हिंसक वागणाऱ्यांचा निषेध नोंदविला आहे.

देशभरात निवडणुकांचे वारे वाहत असताना एकीकडे मतदानाची टक्केवारी वाढावी, लोकशाहीची मुल्ये जोपासल्या जावी, याकरिता शासन प्रयत्नशील आहे. अशा पार्श्वभूमीवर राष्ट्रहिताला प्रथम प्राधान्य देत एक राष्ट्र, एक संकल्प, ही भूमिका नक्कीच देशा देणारी ठरते आणि लोकशाहीच्या मूल्यांची जोपासना व आदर निर्माण करण्याचे काम प्रसारमाध्यमे प्रभावीपणे करू शकतात.

प्रसार माध्यमांनी आपली भूमिका निश्चितपणे वठवलेली आहे हेही नाकारता येत नाही. आजही स्वतंत्र पत्रकारिता नाही असे नाही, कदाचित त्यांची संख्या कमी असेल तरी ते आपल्या मुख्य भूमिकेपासून दूर राहिलेले नाही. आजही अनेक वृत्तपत्रे व वृत्तवाहिन्यांनी आपला विश्वास समाजात कायम ठेवला आहे. आज खरी आवश्यकता आहे ती ही की प्रसारमाध्यमांनी समाजाप्रती असलेली त्यांची बांधिलकी जपण्याची ती जर जपल्या गेली तर कुठल्याही राष्ट्राचे चांगलेच होणार आहे.

सध्या:स्थितीत ज्ञानाचा प्रसार झपाट्याने होत आहे. लोकांच्या मानसिकतेत बदल झाला असून संवाद प्रचंड गतिमानतेने होत आहे.त्यामुळे एकीकडे कायद्याची चौकट आणि दुसरीकडे सोशल मीडिया समाज मनावर सातत्याने आघात करीत आहे.अशा पार्श्वभूमीवर ज्याप्रमाणे शक्तिशाली विचार पुढे येऊन फ्रेंच क्रांती झाली तीच ताकद आपल्या संविधानात आहे संविधानातील उद्देशपत्रिकेत सांगितल्याप्रमाणे राष्ट्राची एकता, अखंडता आणि बंधुता वाढविण्यासाठी प्रत्येकाला दृढसंकल्प स्वीकारून तसे वागावे लागेल व लोकशाहीला अधिक मजबूत करावी लागेल. भारत देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर महात्मा गांधी यांनी आकाशवाणी केंद्राला 12 नोव्हेंबर 1947 ला पहिल्यांदा भेट दिली आणि तेथूनच त्यांनी शांतता राखण्याचे आवाहन केले होते. त्या दिवसापासून 12 नोव्हेंबर हा दिवस सार्वजनिक प्रसारण सेवा दिवस म्हणून साजरा केला जातो.

स्वातंत्र्यापूर्वी जुलमी पद्धतीने शासन करणाऱ्या ब्रिटिश शासनाविरुद्ध आवाज उठवण्यासाठी देशभक्तांनी लेखणीचा वापर केला. त्यावेळी आपल्या लेखणीतून अनेक क्रांतिवीर जन्माला आले आणि ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्तता मिळवण्यासाठी लेखणीतून आणि नेत्यांच्या भाषणातून प्रवृत्त होऊन जनता ब्रिटिश शासनाविरुद्ध लढा देत होती. त्यावेळी लोकांपर्यंत संदेश पोहोचवण्यासाठी वृत्तपत्रे आणि नेत्यांची भाषणे हीच माध्यमे होती. अर्थात, स्वातंत्र्यपूर्वी वृत्तपत्रे आणि भाषणे केवळ ही दोनच सशक्त प्रसारमाध्यमे होती.

आजच्या नव्या व्यवस्थेत भारतीय प्रसार माध्यमे खास करून इलेक्ट्रॉनिक माध्यमांची भूमिका महत्त्वाची आहे. गेल्या काही वर्षापासून दूरचित्रवाणीवरील बातम्यांमध्ये नि:पक्षपातीपणा आणि नैसर्गिकता यांचा अभाव होत असल्याचे दिसू लागल्याचे आदर्श दूरचित्रवाणीच्या पुढाकार करणाऱ्यांना जाणू लागले आहे. आदर्श पद्धतीने

बातमीदारी देणे कंटाळवाणे आणि कमी प्रतीचे मानले जाऊ लागले, असून निरुत्साहीपणाचे समजले जात आहे. तसेच आदर्श पत्रकारिता संपादकीय पानांवरून किंवा मत व्यक्त करणाऱ्या सदरांमधूनही नामशेष होत चाललेली आहे. पत्रकारितेच्या नितीमूल्यांचा बळी टीआरपी ने घेतलेला असून या स्पर्धेमुळे बळी दिला जात असल्याचे जाणू लागले आहे. गतिमानता हाच आजच्या पत्रकारितेचा नवा मंत्र झाला आहे. त्यामुळे घटनांची पडताळणी आणि फेरपडताळणी करणे हा शिरस्ता मागे पडला आहे. बातम्या या लाईव्ह घटना कशा दिसतील याची स्पर्धा लागली आहे. प्रत्येक क्षणाच्या घटनेत नव्या बातम्या दिल्या जात आहेत. त्यातही विसंगती दिसत आहे. ज्या बातम्यांमुळे लोकांचे लक्ष वेधले जाईल अशा बातम्या देण्याची लगबग सुरू झाली आहे. ही लगबग इतकी टोकाला जाऊ लागली आहे की, कधीकधी त्यातून मूळ बातमी किंवा घटना दूर राहते आणि नवीनच काहीतरी पुढे येत असते. त्यातही वर्गवारी केली जात आहे. दूरचित्रवाणी मुख्यत्वे करून निधर्मीपणे आधुनिक उदारमतवादी आणि पुरोगामी लोकांची राहिली आहे. साधारणपणे त्यांनी त्यात जातीयवादाला स्थान दिले नाही त्यांनी मूलतत्त्वादाला कधी खतपाणी घातले नाही. त्यांनी नेहमीच एकमताचा आदर केला आहे, मतभेदांचेही स्वागत केले आहे, क्षीण आवाज असलेल्यांसाठी लढा दिला आहे आणि हिंसक वागणाऱ्यांचा निषेध नोंदविला आहे. ही सहजवृत्ती डाव्या विचारधारेच्या प्रेरणेतून आली आहे. ही वृत्ती आज हळूहळू लोप पावते की काय अशी स्थिती आली आहे. त्यात उजव्या विचारसरणीचा शिरकाव होऊ लागला आहे.

दूरचित्रवाणीचे स्टुडिओ नव्या संकटात सापड चाललेले आहेत. हे एक प्रकारचे संकट आहे. सर्व समावेशतेच्या अभावाचे आहे. मुक्तपणे मत व्यक्त करण्यासाठीचे स्वातंत्र्यावरील हल्ल्याचे हे संकट आहे. संपादक आणि पत्रकार यांना मिळणारे वेतन आणि सवलतीची चिंता राहिली तर पत्रकारितेच्या आदर्शमूल्यांचे काय होणार? त्यावर सत्तेच्या दबावाची टांगती तलवार राहणार असेल तर हे अधिक गंभीर म्हणावे लागेल. सुदैवाने वृत्तपत्रे अजूनही अधिक आक्रमक राहिली आहेत. माध्यमांनी नवी उंची गाठलेली आहे. दूरचित्रवाणीची शक्ती आहे पण दिवसेंदिवस त्यांच्या बद्दलचा आदर नागरिकांच्या दृष्टिकोनातून कमी होत चालला आहे. पत्रकारांसाठी त्यांच्या अस्तित्वासाठी विश्वसहर्ता हेच सर्वात मोठे चलन असते. दूरचित्रवाणी मध्ये ती जागा आता कमी होत असल्याचे दिसून येत आहे. काही नवी पोर्टल बेधडकपणे पत्रकार्तेचा वारसा नव्याने पुढे नेताना दिसत आहेत. त्यांनी नवी क्षितिचे उघडली आहेत.

वर्तमान काळात प्रसार माध्यमांचे भवितव्य हे समालोचकांच्या विश्वासाहर्तावर अवलंबून आहे. हे त्यांनी समजून घेतले पाहिजे आणि त्यांच्या मालकांनीही,कारण बऱ्याच वर्षांपूर्वी अटल बिहारी वाजपेयी यांनी म्हटले होते की, "लोकशाही हा काही 51 आणि 49 असा आकड्यांचा खेळ नाही. लोकशाही म्हणजे मूलता: नैतिक व्यवस्था आहे. संसद म्हणजे काही कायदे आणि नियमांची चर्चा करणाऱ्या सर्वसाधारण न्यायालयाचा कक्ष नाही. जेथे शब्दांचा किस पाडला जाईल, राज्यघटना आणि कायदेही महत्त्वाचे आहेत, परंतु लोकशाही केवळ सांगाडा म्हणून उभा राहणार असेल तर तिच्यातील मूलभूत सत्व आणि आत्माच हरवून जाईल, त्यामुळे येथे समस्या निर्माण होतील. आपली सर्वांची ही जबाबदारी आहे की असे काही घडू देता कामा नये".

जगामध्ये आज दोन्ही प्रकारची प्रसार माध्यमे विकसित दिसत असली तरी आज इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमांना अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. भारतामध्ये 1970 ते 1980 च्या दशकात दूरदर्शनचा प्रवेश झाला व 1990 - 1991 मध्ये भारत जेव्हा खाजगीकरण, उदारीकरण, जागतिकीकरण या प्रक्रियेमध्ये समाविष्ट झाला तेव्हापासून भारतात दूरदर्शन या सरकार चॅनलबरोबर खाजगी कंपन्यांची चॅनल्स अस्तित्वात येऊन बातम्या देणारे चॅनल्स यांचा

फार मोठा उगम झाला तसेच प्रसार माध्यमांची प्रभावी भूमिकेमुळे प्रशासनात ई - गव्हर्नन्स, स्मार्ट गव्हर्नन्स हया संकल्पना विकसित झाल्या. प्रसारमाध्यमे व इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमातून शासकीय कार्यालयातील लालफितशाहीचा वापर कमी होण्यास मदत झाली. महाराष्ट्र शासनाने 'आपले सरकार' नावाचे संकेतस्थळ सुरू झाले. त्यामुळे नागरिक आपली तक्रार या संकेतस्थळावर नोंदवू शकते. या तक्रारीची दखल प्रशासनतर्फे लवकर घेतली जाते. तसेच समस्या सोडविण्याचा त्वरित प्रयत्न केला जातो व नियतकालिकांनी महत्त्वाची भूमिका पार पाडताना दिसून येते. स्वातंत्र्यानंतर नियतकालिकांच्या संकेत मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे दिसून येते. लोकमान्य टिळकांच्या 'केसरी' व 'मराठा' या वृत्तपत्राने स्वातंत्र्याची चळवळ जनतेपर्यंत पोहोचविण्यात फार मोलाची कामगिरी बजावली. हिंदू, अमृत बाजार पत्रिका, टाइम्स ऑफ इंडिया, इंडिया टुडे, हिंदुस्तान टाइम्स, इत्यादी वर्तमानपत्रामुळे स्वातंत्र्य आंदोलनाला चालना मिळाली. या वृत्तपत्रामुळे स्वातंत्र्याची चळवळ ही मोजक्याच लोकांची न राहता ती सर्वसामान्यांची झाली. लोकशाही शासनात प्रसार माध्यमांना फार मोठी जबाबदारी पार पाडावी लागते. ज्या देशात संसदीय व्यवस्था स्थिरावली आहे व द्विपक्ष पद्धती अस्तित्वात आहे, त्या देशात विरोधी पक्ष शासनावर नियंत्रण ठेवण्यास पुरेसा असतो किंवा ज्या देशात संसदीय शासन पद्धती असून बहुपक्ष पद्धत अस्तित्वात आहे. त्या देशात विरोधी पक्ष विखुरलेल्या स्वरूपात आढळतो. त्यामुळे विरोधी पक्ष शासनावर सर्वकश नियंत्रण प्रस्थापित करण्यास पुरेसा सक्षम नसतो. अशा परिस्थितीत शासनावरील नियंत्रणाची जबाबदारी प्रसारमाध्यमावर येऊन पडते.

निष्कर्ष:-

प्रसार माध्यमांना दक्ष राहून शासन जर चुकीच्या मार्गाने जात असेल तर अशा शासनाला योग्य मार्गावर आणावे लागते, ही भूमिका प्रसारमाध्यमांनी विकसित व विकसनशील देशात पार पाडलेली दिसून येते. उदा. भारतात स्वातंत्र्यपूर्व काळात व स्वातंत्र्यानंतर ही प्रसारमाध्यमे राहिलेले दिसून येते. राष्ट्रीय सुरक्षेच्या नावावर नागरिकांच्या मूलभूत हक्कांचा संकोच तत्कालीन पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी केला होता. विरोधकांना कठोरपणे चिरडून टाकले जात होते, प्रसारमाध्यमांच्या स्वातंत्र्यावर गदा आणली जात होती. विरोधी पक्षातील नेत्यांना तुरुंगात टाकण्यात आले होते. आणीबाणीच्या काळात प्रसार माध्यमांचे स्वातंत्र्य हिरावून घेणे हे सर्वात मोठे संकट होते. विरोधी पक्षांच्या गैरहजेरीत माध्यमांनीच त्यांची भूमिका घेतली होती. तरी त्यांची फारशी दखल कोणी घेतली नाही. परंतु आज त्यात थोडे अंतर आहे. आज आणीबाणी नाही, मूलभूत अधिकाऱ्यांचा संकोच करण्यात आला नाही. विरोधी पक्षांच्या नेत्यांना तुरुंगवास झालेला नाही. माध्यमांचे स्वातंत्र्य ही अबाधित आहे. मात्र माध्यमांच्या वर्तनाबाबत काही महत्त्वाचे प्रश्न निर्माण झाले आहेत. प्रसारमाध्यमांमधील काही जण कणाहीन झाले आहेत.

संदर्भग्रंथ :-

1. भोळे भा. ल., "आधुनिक भारतातील राजकीय विचार", पिंपळापुरे पब्लिशर्स, नागपूर.
2. मेहेंदळे लीना, "सुप्रशासनाचे पहिले पाऊल", दीपस्तंभप्रकाशन, जळगांव.
3. गोडबोले माधव, "हरवेलेले सुशासन", अनुवादः- सुजाता गोडबोले, विश्वकर्मा पब्लिकेशन, पुणे.
4. भोळे, भा. लं., 'भारतीय राज्यव्यवस्था', पिंपळापुरे पब्लिशर्स, नागपूर
5. गोडबोले माधव, 'भारताचा संसदीय लोकशाहीची अग्निपरीक्षा', अनुवादः- सुजाता गोडबोले, राजहंस प्रकाशन, पुणे.

प्राचीन भारतातील दूत प्रशासन व्यवस्था : स्वरूप, कार्ये आणि ऐतिहासिक विकास

डॉ. विवेकानंद लक्ष्मण चव्हाण
सहयोगी प्राध्यापक,इतिहास विभाग
एस.पी.डी.एम.कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
शिरपूर जि.धुळे-४२५४०५

प्रस्तावना :-

प्राचीन भारतातील राज्यव्यवस्थेत दूत (राजदूत / संदेशवाहक) ही संस्था अत्यंत महत्त्वपूर्ण मानली जात होती. राज्यांमधील राजनैतिक संबंध, तह, युद्धघोषणा, संधी, व्यापारविस्तार आणि गुप्त माहिती संकलन यासाठी दूतांची नियुक्ती केली जात असे. दूत संस्था ही केवळ संदेश पोहोचविण्यापुरती मर्यादित नसून ती प्रशासन, कूटनीती आणि सामरिक व्यवस्थेचा अविभाज्य भाग होती. राजकीय व्यवहार, परराष्ट्र धोरण, तह-करार, युद्ध-शांती प्रस्ताव,तसेच गुप्त माहिती संकलन या सर्व बाबींमध्ये दूतांची भूमिका केंद्रस्थानी होती. कोणत्याही देशाच्या शासन व्यवस्थेच्या सुव्यवस्थित आणि सुरक्षित कामकाजासाठी आवश्यक असलेल्या मूलभूत,आवश्यक आणि शक्तिशाली उपायांपैकी एक म्हणजे राजदूतांची व्यवस्था. सरकारच्या कार्यात्मक आणि भावनिक पैलूंबद्दल अंतर्गत आणि बाह्य, लहान आणि मोठ्या दोन्ही प्रकारच्या माहितीचा सतत प्रवाह हा शासकाची दक्षता, तयारी आणि प्रभावीपणा राखण्याचा एक अद्वितीय स्रोत आहे, ज्यावर सरकार अवलंबून असते.प्राचीन काळी, भारत त्याच्या विशाल आणि व्यापक उपस्थितीमुळे मोठ्या आणि लहान अशा अनेक राज्यांमध्ये विभागलेला होता. त्यांच्या अंतर्गत सुरक्षिततेसाठी, समृद्धीसाठी आणि बाह्य धोक्यांना पुरेसा प्रतिकार करण्यासाठी या राज्यांमध्ये परस्पर सहकार्य आवश्यक होते. म्हणूनच, राज्यांनी परराष्ट्र धोरण राजनैतिक पद्धतीने अंमलात आणण्यासाठी योग्य कार्यकारी संस्था स्थापन केल्या. प्राचीन काळात या संस्थांचा योग्य वापर अनेक उदाहरणे दर्शवितात. राष्ट्रीय हितांचे रक्षण करणे आणि त्यांना प्रोत्साहन देणे हे एक महत्त्वाचे आणि अत्यंत कठीण काम आहे. म्हणूनच, प्राचीन विद्वानांनी हे कार्य पूर्ण करण्यासाठी उघड आणि गुप्त दोन्ही पद्धतींचा वापर करण्यावर भर दिला. या संदर्भात, त्यांनी अनुक्रमे राजदूत आणि हेरांची व्यवस्था स्थापित केली. प्रत्येक राज्य मैत्री प्रस्थापित करण्यासाठी आणि माहितीची देवाणघेवाण करण्यासाठी इतर राज्यांमध्ये दूत पाठवत असे. प्राचीन काळापासून भारतात वेगवेगळ्या राज्यांमध्ये दूत पाठवण्याची पद्धत प्रचलित आहे.

प्राचीन भारतीय राजकीय विचारवंतांनी म्हटले आहे की, राज्यांमधील परस्पर संबंधांच्या गतिमानतेसाठी आणि स्थिरतेसाठी राजदूत व्यवस्था आवश्यक आहे. दूतांचा उल्लेख वैदिक साहित्यापासून आढळतो. ऋग्वेद मध्ये'दूत' हा शब्द संदेशवाहक अर्थाने वापरलेला दिसतो. पुढे महाभारत आणि रामायण यांसारख्या महाकाव्यांमध्ये दूतांच्या राजनैतिक भूमिकेचे स्पष्ट चित्रण आहे. उदाहरणार्थ, श्रीकृष्ण यांनी कौरवांकडे पांडवांचा शांतिसंदेश घेऊन जाण्याची भूमिका दूत म्हणून पार पाडली. प्राचीन भारतातील दूत प्रशासन व्यवस्था ही अत्यंत विकसित आणि पद्धतशीर होती,जिचा मुख्य आधार कौटिल्याचा 'अर्थशास्त्र' हा ग्रंथ मानला जातो. य व्यवस्थेत दूत (राजदूत) हे परराष्ट्र नीतीचे प्रमुख अंग होते, ज्यांचे काम सलोखा राखणे, हेरगिरी करणे, युद्धाची सूचना देणे आणि संधी करणे हे असे. मौर्य काळात ही व्यवस्था केंद्रीय सत्तेच्या नेतृत्वाखाली अत्यंत प्रभावीपणे कार्यरत होती.

प्राचीन भारतातील संदेशवाहक प्रणाली :- प्राचीन भारतातील संदेशवाहक प्रणाली (Communication and Intelligence System) ही केवळ माहितीची देवाणघेवाण नव्हती, तर ती राज्याच्या अस्तित्वाचा आणि

संरक्षणाचा कणा होती. मौर्य काळ असो वा गुप्त काळ, या प्रणालीचे दोन प्रमुख भाग होते: दूत व्यवस्था (Diplomacy) आणि हेर व्यवस्था (Espionage).राष्ट्रांमध्ये राजदूतांच्या माध्यमातून राजदूतांशी संबंध प्रस्थापित करण्याचे साधन होते. राजदूतांच्या माध्यमातून राजे करारांवर वाटाघाटी करायचे आणि युद्धाला आव्हाने द्यायचे. जेव्हा एक राजा दुसऱ्या राजाला संबोधित करायचा,जर त्याने एखाद्याला कोणत्याही प्रकारचा संदेश पाठवला, किंवा यज्ञाच्या वेळी किंवा युद्धात मदत करण्यासाठी आमंत्रित केले, तर ही सर्व कामे केवळ दूताद्वारेच पूर्ण केली जात असत. प्राचीन काळी दूत हा राजाचा प्रतिनिधी मानला जाई. मनुस्मृतीनुसार, "दूतच शत्रूशी युद्ध घडवून आणतो आणि तोच मैत्री (संधी) प्रस्थापित करतो." राज्याची प्रगती आणि सुरक्षा ही दूताच्या चातुर्यावर अवलंबून असे.

प्राचीन भारतातील दूत संकल्पना :- प्राचीन भारतातील 'दूत' ही संकल्पना केवळ एका निरोपवाहकापुरती मर्यादित नव्हती, तर ती अत्यंत प्रगत आणि गुंतागुंतीची कूटनीतिक (Diplomatic) व्यवस्था होती.कौटिल्याचे अर्थशास्त्र, मनुस्मृती आणि रामायण-महाभारतासारख्या ग्रंथांमध्ये दूत व्यवस्थेचे सविस्तर वर्णन मिळते. 'दूत' म्हणजे संदेशवाहक किंवा राजाचा प्रतिनिधी. कौटिल्यांनी दूताला राजाचा 'मुख' म्हटले आहे. "दूत" (दूत) चा पहिला उल्लेख ऋग्वेदात आढळतो, जिथे "दूत" हा शब्द अनेक ठिकाणी वापरला जातो. तेव्हापासून, देशाच्या राजकारणात त्याचे महत्त्वाचे स्थान आहे.

वैदिक व महाकाव्यकालीन दूत व्यवस्था :- ऋग्वेदात अनेक ठिकाणी, अग्निला दूत मानले जाते आणि त्याला यज्ञात देवतांना बोलावण्यास सांगितले जाते.रामायणात मिथिला आणि कोसल राजांच्या संदेशवाहकांचा उल्लेख आहे, ज्यांना अनुक्रमे दशरथ आणि केकय राज्यांमध्ये पाठवण्यात आले होते. याव्यतिरिक्त, रामाचे संदेशवाहक, अंगद आणि हनुमान यांचा लंकेत संदेशवाहक म्हणून उल्लेख आहे. कृष्ण पांडवांचा दूत म्हणून दुर्योधनाच्या दरबारात गेला आणि पांडव आणि कौरवांमध्ये युद्ध टाळण्याचा प्रयत्न केला.अत्यंत विश्वासू आणि सद्गुणी व्यक्तींचा संदेशवाहक म्हणून वापर केला जात असे. कौटिल्य, मनु, भीष्म, कामंडक, शुक्र आणि सोमदेव यांसारख्या राजकीय विचारवंतांनी संदेशवाहकासाठी आवश्यक असलेल्या गुणांची आणि त्यांच्या कार्यांची सखोल चर्चा केली आहे.रामायणात हनुमान यांचे लंकेत दूत म्हणून कार्य उल्लेखनीय आहे. महाभारतात श्रीकृष्ण यांनी शांतिदूत म्हणून प्रयत्न केले. महाकाव्याच्या काळात कृष्ण स्वतः संदेशवाहक म्हणून काम करत असल्याचा उल्लेख आहे. ज्या व्यक्तीला दुसऱ्या देशात दूत म्हणून पाठवले जात असे तो केवळ एक प्रमुख अधिकारीच नव्हता तर तो देशभक्त, निर्भय आणि कुशल देखील होता, कारण परदेशांशी संबंधित समस्यांचे निराकरण मुख्यत्वे दूतावर अवलंबून होते. राजा आणि राज्याची प्रतिष्ठा आणि यश बहुतेकदा दूताच्या व्यक्तिमत्त्वावर, वक्तृत्वावर आणि कार्यक्षमतेवर अवलंबून असे.

स्मृतिकालीन दूत व्यवस्था :- प्राचीन भारतीय इतिहासातील स्मृतींनुसार (जसे की मनुस्मृती आणि याज्ञवल्क्य स्मृती) 'दूत' हा केवळ एक दूत नव्हता, तर राज्याच्या सुरक्षिततेत आणि राजनैतिकतेमध्ये तो सर्वात महत्त्वाचा दुवा मानला जात असे. मनुस्मृतीनुसार, "दूत युद्ध करतो आणि दूत शांती करतो."मनुस्मृतीनुसार दूत सत्यप्रिय, धैर्यवान, बुद्धिमान आणि गुप्तता राखणारा असावा.स्मृती काळातील नियमांनुसार,"दूत अभेद्य आहे." याचा अर्थ असा की, युद्धादरम्यानही संदेशवाहकाची हत्या करणे हे एक गंभीर पाप आणि शास्त्रांच्या विरुद्ध मानले जात असे.संदेशवाहकाचे शब्द कितीही कठोर असले तरी,राजाला त्याला शिक्षा करण्यास मनाई होती. मनुस्मृतीमध्ये स्पष्टपणे म्हटले आहे की राज्याचे प्रशासन दूतावर अवलंबून असते कारण तोच शत्रू आणि मित्र यांच्यात फरक करतो आणि समेट करतो.

मौर्यकालीन दूत प्रशासन :-अर्थशास्त्रात दूतांचे तीन प्रकार सांगितले आहेत. निषृष्टार्थ, परिमितार्थ आणि शासित दूत. ऐतिहासिक स्त्रोत देखील राजनैतिक व्यवस्थेबद्दल माहिती देतात. अलेक्झांडरच्या आक्रमणादरम्यान, तक्षशिलाचा शासक अंभी याने त्याच्याकडे एक दूत पाठवला आणि कराराचा प्रस्ताव दिला. ग्रीक लेखकांनी मालव आणि शूद्रांच्या दूतांचे वर्णन केले आहे. क्टिनीयसने लिहिले आहे की त्यांचे शंभर मोठे दूत रथांवर स्वार होऊन अलेक्झांडरला

भेटण्यासाठी गेले.सम्राट चंद्रगुप्त मौर्य व अशोक यांच्या काळात परराष्ट्र संबंध प्रगत झाले. मेगस्थनीज हा ग्रीक दूत भारतात होता. टॉलेमी-फिलाडेल्फसचा दूत डायोनिसस मौर्य दरबाराला भेट देऊन गेला. अशोकाच्या दूतांनी युरोप, आशिया आणि आफ्रिकेतील ग्रीक राज्यांना भेटी दिल्या. मौर्योत्तर काळातही राजनैतिक परंपरेची उदाहरणे आढळतात.

गुप्तकालीन व गुप्तोत्तर दूत व्यवस्था :-

समुद्रगुप्ताच्या काळात मैत्रीपूर्ण व सांस्कृतिक संबंध दृढ झाले.श्रीलंकेचा राजा मेघवर्ण याने गुप्त सम्राट समुद्रगुप्ताकडे एक दूत पाठवला आणि त्याच्या देशातील यात्रेकरू भिक्षूंच्या निवासासाठी बोधगया येथे एक मठ बांधण्याची परवानगी मिळवली. कामरूपाचा शासक भास्करवर्मन याने हंसवेग नावाच्या दूतामार्फत सम्राट हर्षाशी मैत्रीपूर्ण संबंध प्रस्थापित करण्याचा प्रस्ताव ठेवला. वाणाचे "हर्षचरित" देखील हर्षाच्या दरबारात इतर राज्यांतील राजदूतांच्या उपस्थितीची साक्ष देते. हर्षाने स्वतः एक ब्राह्मण दूत चीनला आणि त्यानंतर चोन दूत भारतात पाठवला. इ.स. ६४३ मध्ये, ली ची पाओ यांच्या नेतृत्वाखाली एक दूत आणि इ.स. ६४७ मध्ये, बंग ह्वेन त्से यांच्या नेतृत्वाखाली एक दूत भारताला भेटला. इ.स. ६२५-६२६ मध्ये चालुक्य राजा पुलकेशिन दुसरा याने इराणमधील शाह खुसरो दुसरा याच्या दरबारात एक दूत पाठवला. त्या बदल्यात, एक इराणी दूत भारतात आला. पुलकेशिनशी त्याच्या भेटीचे दृश्य अजिंठा लेण्यांमध्ये चित्रित केले आहे. मध्ययुगीन काळातही दूतांची परंपरा प्रचलित होती आणि भारतीय शासक एकमेकांना प्रतिनिधी पाठवत असत "प्रबंधचिंतामणी" वरून असे दिसून येते की, गुजरातचा राजा सिद्धराज जयसिंग याने कन्नौजच्या गहडवळ राजाच्या दरबारात एक दूत नेमला होता. वरील वर्णनावरून स्पष्ट होते की प्राचीन भारतीय शासकांनी परदेशी शासकांचे लक्ष वेधले होते. परिणामी परदेशी राजदूत भारताला भेट देत राहिले. गुप्त काळातील राजनैतिक व्यवस्था अत्यंत प्रगत आणि सुव्यवस्थित होती, जी साम्राज्याच्या परराष्ट्र संबंध आणि गुप्तचर माहिती गोळा करण्यासाठी जबाबदार होती. परराष्ट्र विभागाचे प्रमुख "महासंधिवग्रहिका" होते,जे युद्ध आणि शांतता दूतांचे व्यवस्थापन करत होते. गुप्तांच्या नोंदींवरून शेजारील राज्यांमध्ये (जसे की वाकाटक आणि शक) दूतावास (दूतावास) होते याची साक्ष मिळते. महासंधिवग्रहिका हा सर्वोच्च अधिकारी होता,परराष्ट्र मंत्र्यांच्या समतुल्य होता, जो इतर राज्यांसोबत करारांसाठी (युद्ध आणि शांतता) दूतांची नियुक्ती आणि नियंत्रण करत असे.गुप्त सम्राटांकडे "दूत," "संधिपाल" इत्यादी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या कुशल राजदूतांचा एक वर्ग होता, जो संदेशवाहक आणि हेर दोन्ही म्हणून काम करत असे. चंद्रगुप्त दुसरा यांनी (वाकाटकांसोबत) वैवाहिक संबंधांचा वापर करून आपले स्थान मजबूत केले, जे धोरणात्मक राजनैतिक धोरणाचा भाग होते. राजदूत गुप्त साम्राज्य आणि शेजारील राज्यांमध्ये मैत्रीपूर्ण संबंध राखून हेर म्हणून काम करत होते. फाहियान सारख्या परदेशी प्रवाशांच्या वृत्तांतावरून असे दिसून येते की, गुप्त साम्राज्याच्या प्रतिष्ठेमुळे राजदूतांची देवाणघेवाण झाली.

अर्थशास्त्रानुसार दूतांचे प्रकार :- कौटिल्यच्या अर्थशास्त्रात दूतांचे पहिले आणि स्पष्ट वर्गीकरण आढळते. तेथे कौटिल्य तीन प्रकारच्या दूतांचे वर्णन करतो. निसृष्टार्थ, परिमितार्थ आणि शसनहार. अग्निपुराण आणि कामंडकिया नीतिसारानुसार, तीन प्रकारचे दूत देखील आहेत. निसृष्टार्थ, मितार्ध आणि शसनहारक. विज्ञानेश्वरांच्या मते, निसृष्टार्थ, संदिष्टार्थ आणि शसनहारक हे तीन प्रकारचे दूत आहेत.

१) निसृष्टार्थ दूत-पूर्ण अधिकार प्राप्त प्रतिनिधी
२) परिमितार्थ दूत-मर्यादित अधिकार असलेला प्रतिनिधी
३) शासनहर दूत-संदेशवाहक

या वर्गीकरणातून दूत प्रशासनाची शास्त्रीय मांडणी दिसून येते.

दूतांची पात्रता व प्रशिक्षण :- "मंत्र्याची पात्रता असलेला व्यक्ती राजदूत असतो. ज्या पात्रतेचा उल्लेख केला आहे ती वैयक्तिक गुणांची नाही तर त्याचा अर्थ असा आहे की राजदूताला मंत्र्याचा दर्जा असायचा आणि त्याच्या कृतीत बदल करायचा, त्याला मंत्र्याचा दर्जा देण्यात आला.त्याच्या कृतीत बदल करण्यासाठी त्याला मंत्र्याचा दर्जा देण्यात आला."दूत हा बुद्धिमान, वक्तृत्वकुशल, निष्ठावान आणि गुप्तता राखणारा असावा. त्याला परकीय राज्याची संस्कृती,

भाषा आणि राजकारणाची माहिती असावी. पदाची नियुक्ती करताना योग्य अधिकार देणे आश्चर्यकारक नाही. सर्वाध्यक्ष आणि लेखक यांना "अमात्यगुणोपेत" असण्याबद्दल, ते देखील अवास्तव नाही. प्राचीन काळापासून, दूताची नियुक्ती करताना त्याच्या पात्रतेचा विचार केला जात आहे. जरी ऋग्वेदात दूताच्या पात्रतेचे स्पष्ट वर्णन केलेले नसले तरी, विखुरलेले संदर्भ संकेत देतात. ऋग्वेद अग्नि आणि मालदगण यांना देवांचे दूत आणि सर्मा यांना इंद्राचे दूत म्हणून वर्णन करतो. त्यांच्या चारित्र्य वैशिष्ट्यांचा आढावा घेतल्यावर असे दिसून येते की त्या काळात, केवळ कुलीन कुटुंबात जन्मलेले, बलवान आणि त्यांच्या वर्तनात शिस्तबद्ध, जे अग्नीसारखे, गृहस्थांना आणि नागरिकांना आनंद देत असत, त्यांना तंद्रीमुक्त मानले जात असे, ते अचूकपणे बोलू शकत होते, संदेश देऊ शकत होते आणि विलंब न करता संदेश देऊ शकत होते. उदात्त, सद्गुणी, वक्तृत्ववान, कुशल, आनंददायी, सत्यवादी आणि स्मरणशक्ती असलेला दूत असावा. शास्त्रांचे ज्ञान, वक्तृत्व, मित्रासारखे मदतगार, शुद्ध मनाचे आणि एका उच्चभ्रू कुटुंबात जन्मलेले, हे त्यांचे आवश्यक गुण होते. निष्ठा, दुर्गुणांपासून अलिप्तता, कार्यक्षमता, हृदयाची शुद्धता, पांडित्य, वक्तृत्व, प्रतिभा, सहिष्णुता,रात्रीच्या साराची समज आणि एका कुलीन कुटुंबात जन्म हे दूताचे प्राथमिक गुण आहेत. अशाप्रकारे उच्च कुटुंबातील, स्वच्छ, कुशल, वक्तृत्ववान, गर्विष्ठ, संस्मरणीय, काळ आणि स्थळाचे जाणकार, शस्त्रांमध्ये तज्ज्ञ, चारित्र्यवान, निर्भय, व्यसनी, स्वावलंबी आणि आपल्या स्वामीला समर्पित व्यक्तीच दूतपदावर नियुक्त केली जात असे.

दूतांची कार्ये :- राजाज्ञा पोहोचवणे, तह करणे, माहिती संकलन, युद्धपूर्व संवाद. परदेशात असताना राजदूताने त्याची सर्व रहस्ये जाणून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. "दूत" ची ही व्याख्या शब्दशः विश्वकोश ब्रिटानियाच्या शब्दात आढळते, ज्यामध्ये आंतरराष्ट्रीय संबंधांच्या संरक्षणात राजदूताला एक आदरणीय गुप्तहेर असे वर्णन केले आहे. भारतासारख्या विशाल देशात, लहान राज्ये अस्तित्वात होती, जी कालांतराने मोठ्या राज्यांमध्ये आणि साम्राज्यांमध्ये विकसित झाली. शांतता आणि युद्धादरम्यान त्यांच्यातील परस्परसंवादामुळे आंतर-राज्य संबंध विकसित होऊ लागले. परदेशाशी बोलण्याचा अधिकार फक्त त्यालाच आहे; तो स्वतःहून काहीही बोलू शकत नाही. विज्ञानेश्वरांनी याला "संदिष्टार्थ" म्हटले आहे आणि त्याची व्याख्या "उक्तमात्रं मे पर निवेदयंती ते संदिष्टार्थ" अशी केली आहे, म्हणजे जो फक्त दुसऱ्या राजाला सांगितलेला संदेश (संदेश) देतो. डॉ. आलतेकर देखील त्याच निष्कर्षावर पोहोचले आहेत की परिमिधर्थ राजाच्या सूचनांना डावलू शकत नाही. राजाच्या लिखित संदेशाला, आदेशाला किंवा वचनाला "शासन" म्हणतात. जो व्यक्ती तो परदेशात पोहोचवतो त्याला "शासनहार" असे म्हणतात. प्राचीन काळी, राजकीय शास्त्रज्ञांनी अशा पत्रवाहकांना संदेशवाहकाचा दर्जाही दिला होता.

१) राजनैतिक प्रतिनिधित्व.
२) तह व करार.
३) युद्ध व शांती प्रस्ताव.
४) गुप्त माहिती संकलन.
५) व्यापारिक संबंध प्रस्थापित करणे.

प्राचीन ग्रंथ राजदूताच्या कर्तव्यांवर बराच प्रकाश टाकतात. कौटिल्य आणि कौटिल्य असे मानतात की राजाने त्याच्या मंत्र्यांशी काळजीपूर्वक सल्लामसलत आणि संमती घेतल्यानंतरच त्याचा राजदूत परदेशात पाठवावा.

दूतांचे संरक्षण व आंतरराष्ट्रीय तत्त्वे :- प्राचीन भारतात दूतांना अभय दिले जाई. शत्रुराज्यातही त्यांना इजा करणे अनीतिपूर्ण मानले जाई. ही संकल्पना आधुनिक 'Diplomatic Immunity' शी सुसंगत आहे.आंतरराष्ट्रीय संबंध निश्चित करण्यात राजदूताची महत्त्वाची भूमिका आणि त्याच्या धोकादायक जबाबदाऱ्या लक्षात घेऊन,प्राचीन भारतीय विद्वानांनी राजदूताच्या वैयक्तिक सुरक्षेशी संबंधित काही विशेष अधिकारांची खात्री केली होती, ज्यांचे पालन करणे प्रत्येक राष्ट्राचा "धर्म" मानले जात असे. राजदूताचा पहिला शिष्टाचार म्हणजे परदेशात त्याच्या राजाच्या परवानगीशिवाय प्रवेश करू नये आणि तिथे पोहोचल्यानंतरही पूर्वपरवानगीशिवाय राजदरबारात प्रवेश करू नये.

जरी त्याला यासाठी काही काळ वाट पहावी लागली तरी. शत्रूच्या देशात असताना, त्याने राजाच्या नजरेतून आणि शारीरिक कृतींमधून शत्रूच्या सर्व कमकुवतपणा, त्याचा खजिना, त्याचे मित्र, त्याचे सैन्य आणि त्याच्यावरील प्रेम जाणून घेतले पाहिजे. त्याने शत्रू राजासमोर दोन्ही बाजूंचे वंश, नाव, संपत्ती आणि कर्म याबद्दल चार प्रकारे प्रशंसा केली पाहिजे. परदेशात, त्याने तपस्वीसारखे वागले पाहिजे. प्राचीन भारतात, दूताला अभेद्य मानले जात असे आणि कठोर शिक्षेची तरतूद नव्हती. युद्धकाळातही, राजदूतांना शत्रुत्वाने वागवले जात नव्हते. पराभूत राजाला मारणे नैतिक आणि राजनैतिकदृष्ट्या निषिद्ध मानले जात होते, म्हणून राजदूताची हत्या करणे सक्त मनाई होती. परदेशात राजदूताचे जीवन नेहमीच धोक्यात असे. म्हणूनच, त्याच्या सुरक्षिततेवर बराच भर देऊन, प्राचीन भारतीय विद्वानांनी काही नियम स्थापित केले जेणेकरून दूत निर्भयपणे त्याच्या जबाबदाऱ्या पार पाडू शकेल. दूताला कोणत्याही प्रकारचे शारीरिक नुकसान करणे, त्याला तुरुंगात टाकणे, मृत्युदंड देणे किंवा त्याला इतर कोणत्याही प्रकारची शारीरिक शिक्षा देणे हे अत्यंत घृणास्पद आणि घृणास्पद कृत्य मानले जात असे.

दूताला शिक्षा व बडतर्फी :- लाराजदूताला वैयक्तिक सुरक्षा आणि अभेद्यतेचा अधिकार असला तरी, हे अधिकार आजच्याइतके अमर्याद नव्हते. विश्वासघातकी राजदूताला फाशी देण्याची नोंद असली तरी, त्याला गंभीर गुन्ह्यांसाठी शिक्षा होऊ शकते. विभीषणाच्या मते, दोषी राजदूतासाठी विहित शिक्षेमध्ये विच्छेदन, फटके मारणे, डोके मुंडणे आणि शरीरावर विविध खुणा यांचा समावेश होता.दूत हा उघड प्रतिनिधी असतो, तर गुप्तचर गुप्तपणे कार्य करतो. अर्थशास्त्रात गुप्तचर यंत्रणेचे स्वतंत्र वर्णन आहे.प्राचीन भारतात,आजच्या काळाप्रमाणे, राजदूतांना सर्व करांमधून सूट होती. ते रत्ने, दागिने, सोन्याची नाणी आणि इतर मौल्यवान वस्तू वाहून नेऊ शकत होते आणि त्यांच्यावर कोणताही कर आकारला जात नव्हता. राजदूतांच्या वरील वर्णनावरून स्पष्ट होते की प्राचीन भारतातील राजदूत व्यवस्था आजच्यासारखीच विकसित होती. जवळजवळ सर्व राज्ये त्यांचे हितसंबंध साध्य करण्यासाठी परदेशात राजदूत पाठवत असत. त्यांचे ध्येय पूर्ण झाल्यानंतर, ते त्यांच्या मायदेशी परतले. प्राचीन भारतात आजच्याप्रमाणे राजदूतांची कायमस्वरूपी नियुक्ती नव्हती.

प्राचीन काळातील दूत प्रशासनाचे महत्त्व :- दूत प्रशासनामुळे राज्यांमध्ये शांतता, व्यापार, सांस्कृतिक देवाणघेवाण आणि राजनैतिक स्थैर्य राखले जात असे.प्राचीन भारतात हेरांनी राष्ट्रीय हितांचे रक्षण आणि संवर्धन करण्यात आणि युद्धात विजय मिळविण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. विष्णुधर्मोत्तर पुराणातील अथर्ववेदावरील भाष्यानुसार, हेरांना राजाचे डोळे असे वर्णन केले आहे. अग्निपुराणानुसार,राजाला चार डोळे असले पाहिजेत आणि केवळ राज्याची प्रगतीच नाही तर त्याचे अस्तित्वही हेरांच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असते.महाभारत देखील हेरांचे महत्त्व अधोरेखित करते.भीष्मांच्या मते, हेर हे राज्याचा पाया असतात. ते राज्याचे रक्षण करण्याचे सर्वोत्तम साधन असतात.प्राचीन भारतीय राज्यव्यवस्थेत 'दूत' (राजदूत) हे केवळ एक संदेशवाहक नसून, ते राज्याच्या परराष्ट्र धोरणाचे आणि मुत्सद्देगिरीचे (Diplomacy) अत्यंत महत्त्वाचे स्तंभ होते.दूत हे परराज्यातील घडामोडींवर लक्ष ठेवणारे महत्त्वाचे साधन होते. शत्रू राज्याची लष्करी तयारी, आर्थिक स्थिती आणि तिथल्या प्रजेची मनस्थिती याची गोपनीय माहिती गोळा करण्याचे काम ते करत असत.प्राचीन काळी युद्ध हे अंतिम साधन मानले जाई. कुशल दूत आपल्या संभाषण चातुर्याने आणि मुत्सद्देगिरीने दोन राज्यांमधील वाद मिटवण्याचा प्रयत्न करत.युद्धाची भीषणता टाळून शांततामय मार्गाने राज्याचे हित साधणे हे दूताचे प्रमुख कार्य होते.दोन राज्यांमध्ये होणारे तह (Treaties), व्यापारी करार किंवा मैत्रीचे संबंध टिकवून ठेवण्याची जबाबदारी दूतावर असे. एकदा ठरलेले नियम पाळले जात आहेत की नाही, हे पाहणे आणि राज्यांचे संबंध बिघडणार नाहीत याची खबरदारी घेणे हे दूताचे काम होते.

निष्कर्ष :-

प्राचीन भारतातील दूत प्रशासन ही अत्यंत विकसित व शास्त्रीय संस्था होती. वैदिक काळापासून मौर्यकालापर्यंत तिचा विकास झाला.प्राचीन भारतातील दूत प्रशासन व्यवस्था संघटित व प्रगत होती. आधुनिक राजनैतिक व्यवस्थेची पायाभरणी प्राचीन भारतात आढळते.

आजच्या आधुनिक परराष्ट्र धोरणाची पायाभरणी प्राचीन भारतीय विचारांतूनच झालेली दिसते. कौटिल्य यांचे मत आहे की, राज्यातील कर्मचाऱ्यांची आणि लोकांची शुद्धता जाणून घेण्यासाठी हेरांची नियुक्ती करावी आणि राजाने नेहमीच त्या हेरांना पैसे आणि सन्मानाने समाधानी ठेवावे कारण राष्ट्रीय शक्ती, ज्याच्या आधारावर युद्धात विजय मिळवला जातो, तो केवळ अंतर्गत सुशासनावरच खूप महत्वाचा असतो. म्हणूनच परदेशांप्रमाणेच आपल्या देशातही पाच प्रकारचे हेर नियुक्त करणे राजाचे कर्तव्य आहे.राजाने आपले काम पूर्ण करण्यासाठी गुप्तहेर हे एक साधन आहे. म्हणूनच, राजाने देश आणि किल्ल्यातील आपल्या शत्रू आणि मित्राच्या सैन्याची परिस्थिती, वाढ आणि पतन यांचा मागोवा घेण्यासाठी गुप्तहेरांचा वापर करणे योग्य आहे. त्याने शत्रूची ताकद आणि कमकुवतपणा निश्चित करण्याचा परिश्रमपूर्वक प्रयत्न केला पाहिजे. राजाने कधीही महिला, मूर्ख, मुले, लोभी, नीच पुरुष किंवा वेडेपणाची लक्षणे दाखवणाऱ्यांशी गुप्त सल्लामसलत करू नये आणि अशा व्यक्तीला गुप्तहेर म्हणून नियुक्त करू नये.गुप्त सल्लामसलत फक्त विद्वान पुरुषांसोबतच करावी. जे शक्तिशाली आहेत त्यांच्याकडे काम सोपवले पाहिजे.मूर्खांना सर्व कामांपासून दूर ठेवले पाहिजे. दूत हा शांततेचा दूत म्हणून काम करायचा. युद्ध टाळण्यासाठी वाटाघाटी करणे किंवा अपरिहार्य असल्यास युद्धाची रीतसर घोषणा करणे ही दूताची मुख्य जबाबदारी होती.दूत अधिकृतपणे दुसऱ्या राज्यात जात असला, तरी त्याचे मुख्य काम त्या राज्याची सैन्यशक्ती, तिथली गुप्त माहिती आणि राजाच्या कमकुवत बाजू शोधणे हे असे. दोन राज्यांमध्ये मैत्रीचे संबंध निर्माण करणे आणि व्यापार किंवा संरक्षणासाठी करार करणे यामध्ये दूताची भूमिका महत्त्वाची असायची. दूताची वागणूक, त्याचे बोलणे आणि विद्वत्ता यावरून त्याच्या मूळ राज्याच्या संस्कृतीचा आणि शक्तीचा दर्जा ठरवला जात असे. प्राचीन दूत प्रशासन हे राज्याच्या सार्वभौमत्वाचे रक्षण करणारे आणि शांततामय सहअस्तित्वाला चालना देणारे एक प्रगत साधन होते. आजच्या आधुनिक राजदूतावास (Embassy) व्यवस्थेची मुळे आपल्याला या प्राचीन परंपरेत सापडतात.

संदर्भ ग्रंथ सूची :-

१. श्वेता तिवारी,भारत में राजदूत एवं गुप्तचर व्यवस्था (मौर्यकाल से गुप्तकाल तक) : एक ऐतिहासिक अध्ययन,सामाजिक विज्ञान संकाय के इतिहास विषय में पीएच.डी.उपाधि के लिए प्रस्तुत अप्रकाशित शोधप्रबंध,विनोबा भावे विश्वविद्यालय,हजारीबाग,झारखंड,२०२५

२. आनंद,अनविता, गुप्तकाल में नारियों की स्थिति,राधा प्रकाशन, दिल्ली,१९९२

३. आयुर्वेदालंकार, के.के., प्राचीन भारत का संविधान व न्याय व्यवस्था,राष्ट्रीय संस्कृत संस्थान,नयी दिल्ली,२००५

४. आचार्य दीपंकर,कौटिल्य कालीन भारत. उ. प्र. हिन्दी संस्थान,लखनऊ,१९८९

५. कुमारी, सुजाता,महाभारत में भारतीय संस्कृति,संजय प्रकाशन,दिल्ली,२००२

६. कुमार,कृष्ण,प्राचीन भारत की राजनीतिक संस्थाएँ.,श्री सरस्वती सदन,नई दिल्ली,२०१७

७. कोशाम्बी,डी. डी.,प्राचीन भारत की संस्कृति और सभ्यता, राजकमल प्रकाशन,नयी दिल्ली,२०१४

८. गोयल, एस.आर.,कौटिल्य और मेगस्थनीज,कुसुमजली प्रकाशन,मेरठ,१९८५

९. गौड़,आनन्द प्रकाश,प्राचीन भारत में दूत-पद्धति,लोकभारती प्रकाशन, इलाहाबाद,१९८९

१०. गुप्ता,देवेन्द्र कुमार, प्राचीन भारतीय समाज एवं अर्थव्यवस्था,न्यू भारतीय बुक कॉर्पोरेशन, दिल्ली,२००४

११. चढ्ढा,पी.के.एवं इन्द्रजीत सिंह सोढ़ी,प्रमुख भारतीय राजनीतिक विचारक,यूनिवर्सिटी बुक हाउस,जयपुर,२००७

१२. झा,डी.एन. और के. एम. श्रीमाली,प्राचीन भारत का इतिहास,हिन्दी माध्यम कार्यान्वय निदेशालय,दिल्ली विश्वविद्यालय,दिल्ली,२००५

१३.नाहर,रतिभानु सिंह,प्राचीन भारत का राजनैतिक एवं सांस्कृतिक इतिहास,किताब महल, इलाहाबाद,१९८८

१४.प्रसाद,ओमप्रकाश,कौटिल्य का अर्थशास्त्र,राजकमल प्रकाशन,दिल्ली,२०१४

१५.मुखर्जी, आर. के.,प्राचीन भारत,राजकमल प्रकाशन,नयीं दिल्ली,१९९६

१६.शर्मा, राम शरण,प्राचीन भारत में भौतिक प्रगति और सामाजिक संरचनाएँ. राजकमल प्रकाशन प्रा. लि.,नयी दिल्ली,१९९२

१७.शर्मा, राम शरण, प्रारंभिक भारत का आर्थिक और सामाजिक इतिहास. हिन्दी माध्यम कार्यान्वयन निदेशालय,दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली,१९९६

१८.शर्मा, योगेन्द्र कुमार,भारतीय राजनीतिक विचारक,कनिश्का पब्लिशर्स,नई दिल्ली,२००१

१९.आचार्य, श्रीराम शर्मा ,अथर्ववेद सायण भाष्यावलम्बी (प्रथम खण्ड),संस्कृत संस्थान, ख्वाजा कुतुब,वेदनगर,बरेली,१९६२

२०.https://www.google.com/search/प्राचीन भारतातील दूत व्यवस्था

भारतीय राजकारणातील नैतिक मूल्याच्या ऱ्हासाचे चिकित्सक अध्ययन

प्रा. डॉ. कृष्णा आनंदराव माहुरे
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
डॉ. गोपाळराव खेडकर महाविद्यालय गाडेगाव (तेल्हारा) जि. अकोला

सारांश :

भारतीय राजकारणातील नैतिक मूल्यांचा ऱ्हास होत आहे. भ्रष्टाचार, गुन्हेगारीकरण, सत्तेची हाव आणि विचारधारेपेक्षा स्वार्थाला दिलेले प्राधान्य यामुळे नैतिक मूल्यांचा ऱ्हास होत आहे. सत्ता मिळवण्यासाठी पैशाचा व बाहुबलाचा वापर, राजकीय पक्षांमधील सोयीचे राजकारण आणि समाजहितापेक्षा वैयक्तिक लाभाला प्राधान्य, यांसारख्या घटकांमुळे लोकशाहीची मूल्ये धोक्यात आली आहेत. निवडणुकांमध्ये गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींचा सहभाग आणि काळया पैशाचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. स्थिर विचारधारेऐवजी 'सोयीचे राजकारण' आणि 'सत्ताकेंद्रित' मानसिकता या सुद्धा नैतिक मूल्यांचा ऱ्हासाला कारणीभूत आहे. सरकारी व राजकीय क्षेत्रात भ्रष्टाचाराचे वाढते प्रमाण, ज्यामुळे संस्थात्मक अखंडतेचा ऱ्हास होत आहे. शिक्षण पद्धतीत नैतिक शिक्षणाचा अभाव, ज्यामुळे तरुण पिढीत मूल्ये कमी होत आहेत. संयुक्त कुटुंब पद्धतीचा ऱ्हास आणि भौतिकवादाकडे आज समाजाचा कल वाढला आहे. ज्यामुळे सामूहिक हिताऐवजी वैयक्तिक स्वार्थ महत्त्वाचा झाला आहे. या नैतिक ऱ्हासामुळे लोकशाहीवरचा लोकांचा विश्वास कमी होत आहे. हे रोखण्यासाठी 'सोयीच्या राजकारणा'कडून 'तत्त्वनिष्ठ राजकारणा'कडे जाण्याची गरज आहे. पक्षांत्तर विरोधी कायदे अधिक कडक करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करणे आवश्यक आहे.

प्रस्तावना :

लोकशाही मूल्ये म्हणजे स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, धर्मनिरपेक्षता, नागरिकांचा सहभाग, जबाबदारी, आणि कायद्याचे राज्य यांसारखी तत्त्वे आहेत, जी लोकांना सक्षम करतात, त्यांच्या हक्कांचे रक्षण करतात आणि सामाजिक कल्याणाला प्रोत्साहन देतात. ज्यामुळे एक लवचिक आणि स्थिर समाज निर्माण होतो. लोकशाही समाजात वैयक्तिक जबाबदारीची भूमिका पाहता, सर्व लोकांच्या सामान्य हितासाठी कार्य करणाऱ्या सामूहिक संपूर्णतेचा भाग असल्याची भावना असणे आवश्यक आहे. लोकशाहीतील सरकारने प्रत्येकाच्या गरजा पूर्ण केल्या पाहिजेत. हे एक वचनबद्धता आणि आव्हान दोन्ही आहे. सामूहिक संपूर्णतेमध्ये विविध अनुभव आणि दृष्टिकोन असतात. मूल्ये समाजाला अधिक न्यायपूर्ण आणि सर्वसमावेशक बनवतात. लोकांना त्यांच्या हक्कांसाठी लढण्यास आणि सरकारला प्रश्न विचारण्यास सक्षम करतात. हिंसेऐवजी शांततापूर्ण मार्गाने बदल घडवून आणण्यास मदत करतात. भारतीय राज्यघटनेने या मूल्यांना आधार दिला आहे आणि ती लोकशाहीचा आत्मा आहे. याच लोकशाही मूल्यांचा ऱ्हास ही एक गंभीर समस्या बनली आहे. प्रामुख्याने टोकाचे राजकीय ध्रुवीकरण, लोकशाही संस्थांमधील विश्वासार्हता कमी झाली आहे. सत्तेचे केंद्रीकरण आणि विरोधी पक्षांना दाबून टाकल्यामुळे लोकशाहीच्या गाभ्याला धोका निर्माण होतो

भारतीय राजकीय पक्ष पद्धती ही प्रामुख्याने बहुपक्षीय प्रादेशिक अस्मितांवर आधारित आहे. या पक्ष पद्धतीत वैचारिक अस्पष्टता आहे. भारतात अनेक राष्ट्रीय आणि प्रादेशिक पक्ष आहेत. यामुळे मतदारांना विविध पर्याय उपलब्ध होतात. सध्या भारतात अनेक मान्यता प्राप्त आणि नोंदणीकृत राजकीय पक्ष कार्यरत आहेत. क्षेत्रीय पक्षांचे वाढते वर्चस्व अलीकडच्या राजकारणाचे वैशिष्टे राहिले आहे. युती सरकारच्या राजकारणामुळे १९९० नंतरच्या काळात कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत मिळणे दुर्मिळ झाले आहे. अनेक पक्षांच्या युतीतून सरकार स्थापन करण्यावर भर दिला जातो. पक्ष-बदलू प्रवृत्ती ही भारतीय पक्ष पद्धतीची मोठी समस्या आहे. काही मोजके पक्ष वगळता, बहुतेक पक्षांचे ध्येयधोरण स्पष्ट नाही. पक्ष अनेकदा विचारधारेशी बांधील राहण्यापेक्षा सत्तेत राहण्याचा विचार करतात. भारतीय राजकारणात पक्षाच्या विचारधारेपेक्षा एका विशिष्ट नेत्याच्या व्यक्तिमत्त्वावर मतांचे ध्रुवीकरण होण्याचे प्रमाण जास्त आहे. पक्षात गटबाजी, पक्षफूटी आणि विचारधारेपेक्षा व्यक्तिगत फायद्यासाठी एका पक्षातून दुसऱ्या

पक्षात जाण्याची प्रवृत्ती ही भारतीय पक्ष पद्धतीची मोठी समस्या आहे. भारतातील अनेक पक्ष हे धार्मिक, जातीय किंवा सामाजिक अस्मितेचा आधार घेऊन राजकारण करतात. ज्यामुळे मतदारांच्या मतांचे ध्रुवीकरण होते. भारतीय पक्ष पद्धती ही विविधतापूर्ण असून ती सतत बदलत असते. ज्यात राष्ट्रीय आणि प्रादेशिक अस्मितांचा संघर्ष नेहमीच दिसून येतो.

भारतीय राजकारणाच्या विकासाचे प्रमुख टप्पे :

भारतीय राजकारणाचा विकास १९४७ च्या स्वातंत्र्यानंतर काँग्रेसच्या एकहाती वर्चस्वाहून बहुपक्षीय, युती आणि आता भाजपच्या नेतृत्वाखालील बहुसंख्य राजकारणाकडे झाला आहे. या प्रवासात प्रादेशिक पक्षांचा उदय, विचारधारेपेक्षा जातीय आणि प्रादेशिक समीकरणे, घराणेशाही आणि जागतिक महाशक्ती होण्याकडे वाटचाल असे प्रमुख टप्पे दिसतात. सध्याचे भारतीय राजकारण वैचारिक मतभेदांऐवजी विकास, हिंदुत्व आणि प्रादेशिक अस्मिता या मुद्द्यांभोवती फिरताना दिसते.

स्वातंत्रोत्तर काळ (१९५०-१९६०) :

सुरुवातीच्या काळात संपूर्ण देशात काँग्रेसचे वर्चस्व राहिले आहे. पंडित नेहरूंचे नेतृत्त्व याकाळात सर्वमान्य असे होते. खऱ्या अर्थाने लोकशाहीची पायाभरणी याच काळात झाली. पंडित नेहरू हे भारतातील एक वसाहतविरोधी राष्ट्रवादी, धर्मनिरपेक्ष मानवतावादी, सामाजिक लोकशाहीवादी आणि लेखक होते. नेहरू हे २० व्या शतकाच्या मध्यभागी भारतातील मध्यवर्ती व्यक्ती होते. १९३० ते १९४० च्या दशकात भारतीय राष्ट्रवादी चळवळीचे प्रमुख नेते होते. १९४७ मध्ये भारताच्या स्वातंत्र्यानंतर त्यांनी १६ वर्षे देशाचे पंतप्रधान म्हणून काम केले. नेहरूंनी १९५० च्या दशकात संसदीय लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि विज्ञान आणि तंत्रज्ञानाचा प्रचार केला आणि आधुनिक राष्ट्र म्हणून भारताच्या प्रतिमेवर जोरदार प्रभाव पाडला. १९२९ मध्ये काँग्रेस अध्यक्ष म्हणून नेहरूंनी ब्रिटिश राजवटीपासून संपूर्ण स्वातंत्र्याची घोषणा केली. १९३० च्या दशकात नेहरू आणि काँग्रेसचे भारतीय राजकारणावर वर्चस्व होते. नेहरूंनी १९३७ च्या भारतीय प्रांतीय निवडणुकांमध्ये धर्मनिरपेक्ष राष्ट्राच्या कल्पनेला चालना दिली, ज्यामुळे काँग्रेसला निवडणुकीत विजय मिळवता आला आणि काँग्रेसने अनेक प्रांतांमध्ये सरकारे स्थापन केली. नेहरूंच्या नेतृत्वाखाली, काँग्रेस एक सर्वव्यापी पक्ष म्हणून उदयास आला, ज्याने राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय राजकारणात वर्चस्व गाजवले आणि १९५१, १९५७ आणि १९६२ मध्ये निवडणुका जिंकल्या. १९६२ च्या भारत-चीन युद्धात भारताचा पराभव होऊनही नेहरू हे भारतीय जनतेमध्ये लोकप्रिय राहिले.

भारताचे पहिले पंतप्रधान आणि परराष्ट्र व्यवहार मंत्री या नात्याने, जवाहरलाल नेहरू यांनी आधुनिक भारताचे सरकार आणि योग्य परराष्ट्र धोरणासह राजकीय संस्कृतीला आकार देण्यात फार मोठी भूमिका बजावली. सार्वत्रिक प्राथमिक शिक्षण देणारी प्रणाली निर्माण केल्याबद्दल त्यांची प्रशंसा केली जाते. ही शिक्षण प्रणाली ग्रामीण भारताच्या दूरच्या कोपऱ्यातील मुलांपर्यंत पोहोचते. अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था (AIIMS), भारतीय तंत्रज्ञान संस्था (IIT) आणि भारतीय व्यवस्थापन संस्था (IIM) यांसारख्या जागतिक दर्जाच्या शैक्षणिक संस्थांच्या विकासाचे श्रेय देखील नेहरूंच्या शिक्षण धोरणाला दिले जाते. नेहरूंच्या अखंड राष्ट्रवादी भूमिका घेत त्यांनी प्रादेशिक विविधतेचे कौतुक करत भारतीयांमधील समानतेवर जोर देणारी धोरणे लागू केली. हे विशेषतः महत्वाचे सिद्ध झाले कारण स्वातंत्र्यानंतर मतभेद समोर आले, कारण ब्रिटिशांनी उपखंडातून माघार घेतल्यानंतर प्रादेशिक नेत्यांना सामान्य शत्रूच्या विरोधात मित्र म्हणून एकमेकांशी संबंध ठेवण्यास प्रवृत्त केले. संस्कृतीतील फरक आणि विशेषत: भाषेमुळे नवीन राष्ट्राच्या एकतेला धोका निर्माण झाला असताना, नेहरूंनी नॅशनल बुक ट्रस्ट आणि नॅशनल लिटररी अकादमी यासारख्या कार्यक्रमांची स्थापना केली. यामुळे भाषांमधील प्रादेशिक साहित्याच्या अनुवादाला चालना दिली. डिसेंबर १९५३ मध्ये नेहरूंनी भाषिक आधारावर राज्यांच्या निर्मिती करण्यासाठी राज्य पुनर्रचना आयोग नेमला. न्यायमूर्ती फझल अली यांच्या अध्यक्षतेखालील या आयोगाने राज्यांच्या पुनर्रचनेची शिफारस करणारा अहवाल तयार केला.

बदल आणि आव्हाने (१९७०-१९८०) :

या काळाला इंदिरा गांधींचा काळ म्हणून ओळखला जातो. या काळात राष्ट्रीय आणीबाणी जाहीर झाली. विरोधी पक्षांचे संघटन अधिक बळकट झाले. १९७५-७७ चा इंदिरा गांधींचा काळ भारतातील लोकशाहीसाठी सर्वात कठीण काळ मानला जातो. अंतर्गत अशांततेचे कारण देऊन २५ जून १९७५ रोजी इंदिरा गांधींनी आणीबाणी लादली. या काळात मूलभूत अधिकार निलंबित करून विरोधी पक्षनेत्यांना तुरुंगात टाकले. भारतीय संविधानाच्या कलम ३५२ आणि ३५६ चा वापर करून इंदिरा गांधींनी स्वतःला असाधारण अधिकार दिले. नागरी हक्क आणि राजकीय विरोधावर मोठ्या प्रमाणात कारवाई सुरू केली. सरकारने देशभरातील पोलिस दलांचा वापर करून हजारो निदर्शक आणि संप नेत्यांना प्रतिबंधात्मक नजरकैदेत ठेवले. विजयाराजे सिंधिया, जयप्रकाश नारायण, मुलायम सिंह यादव, राज नारायण, मोरारजी देसाई, चरण सिंह, जीवतराम कृपलानी, जॉर्ज फर्नांडिस, अनंतराम जयस्वाल, अटल बिहारी वाजपेयी, लाल कृष्ण अडवाणी, अरुण जेटली, जय किशन गुप्ता सत्येंद्र नारायण सिन्हा, गायत्री देवी आणि इतर निदर्शक नेत्यांना ताबडतोब अटक करण्यात आली. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि जमात-ए-इस्लामी सारख्या संघटनांसह काही राजकीय पक्षांवर बंदी घालण्यात आली. सीपीआय (एम) नेते व्ही.एस.अच्युतानंदन आणि ज्योतिर्मय बसू यांना त्यांच्या पक्षाशी संबंधित अनेकांसह अटक करण्यात आली. या दडपशाहीविरुद्ध सर्व विरोधी पक्षांनी एकत्र येऊन 'जनता पार्टी' स्थापन केली आणि १९७७ मध्ये इंदिरा गांधींचा पराभव केला. आणीबाणीच्या आधीच जयप्रकाश नारायण यांनी भ्रष्टाचाराविरुद्ध मोठे आंदोलन उभे केले होते. काँग्रेस (ओ), जनसंघ, भारतीय लोकदल आणि सोशालिस्ट पार्टी यांसारखे वेगवेगळे विचारधारा असलेले विरोधी पक्ष, आणीबाणीला विरोध करण्यासाठी एकत्र आले. आणीबाणीच्या काळात भूमिगत राहून संघर्ष करण्यासाठी लोक संघर्ष समितीची स्थापना करण्यात आली. आणीबाणी उठवल्यानंतर झालेल्या निवडणुकांमध्ये जनता पार्टीने ऐतिहासिक विजय मिळवला आणि पहिल्यांदाच केंद्रात गैर-काँग्रेसी सरकार स्थापन झाले. याच काळात विरोधी आवाज दडपण्यासाठी सरकारी यंत्रणेचा गैरवापर केला गेला.

आघाड्यांचे राजकारण (१९९०-२०२४) :

आघाड्यांचे राजकारण म्हणजे सत्तेत वाटा मिळवण्यासाठी किंवा समान प्रतिस्पर्ध्याचा पराभव करण्यासाठी दोन किंवा अधिक राजकीय पक्षांनी केलेली युती होय. भारत आणि महाराष्ट्रात ही संकल्पना महत्त्वाची असून, यामुळे वैचारिक भिन्नता असूनही 'लोकप्रिय आघाडी' स्थापन करून सत्ता मिळवली जाते. उदा. महाराष्ट्रातील महायुती (भाजप-शिवसेना-राष्ट्रवादी) आणि महाविकास आघाडी (काँग्रेस-शिवसेना-राष्ट्रवादी) ही याचे प्रमुख पुरावे आहेत. विचारधारा बाजूला ठेवून, केवळ निवडणुकीत बहुमत मिळवण्यासाठी आणि सरकार स्थापन करण्यासाठी हे पक्ष एकत्र येतात. अनेकदा आघाड्यांमुळे त्रिशंकू परिस्थिती टाळली जाते, परंतु घटक पक्षांमधील मतभेदांमुळे सरकार अस्थिर होण्याची शक्यताही असते. राष्ट्रीय स्तरावर तिसऱ्या आघाडीसारखे प्रकार प्रादेशिक किंवा लहान पक्षांचे महत्त्व वाढवतात. आघाड्यांचे राजकारण हे भारतीय लोकशाहीतील एक अपरिहार्य वास्तव बनले आहे, जिथे 'सामान उद्दिष्ट' पूर्ण करण्यासाठी भिन्न विचारसरणीचे गट एकत्र येतात.

प्रादेशिक पक्षांचा उदय :

विशिष्ट प्रदेशाच्या भाषिक, सांस्कृतिक व विकासात्मक अस्मितेसाठी संघर्ष करणाऱ्या गटांना प्रादेशिक पक्ष म्हणतात. राष्ट्रीय पक्षांच्या दुर्लक्षामुळे, स्थानिक प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी, सत्तेच्या विकेंद्रीकरणासाठी आणि प्रदेशाच्या स्वायत्ततेसाठी यांचा उदय झाला आहे. भारतासारख्या वैविध्यपूर्ण देशात गेल्या काही दशकांत प्रादेशिक पक्षांचे महत्त्व व निवडणूक सहभाग लक्षणीयरीत्या वाढला आहे. १९६०-७० नंतर आणि प्रामुख्याने १९९० नंतर प्रादेशिक पक्षांचा उदय हा राष्ट्रीय राजकारणातील एक महत्त्वाचा बदल आहे. हे पक्ष स्थानिक अस्मिता, भाषिक किंवा जातीय प्रश्नांना मांडतात, परंतु त्यांची वाढ ही युती सरकारांमधील अस्थिरता, संकुचित प्रादेशिकवाद आणि राष्ट्रीय एकात्मतेसमोर आव्हाने निर्माण करणारी एक समस्या म्हणूनही पाहिली जाते.

काँग्रेसच्या वर्चस्वाला ओहोटी :

भारतीय राजकारणात एकेकाळी एकहाती वर्चस्व गाजवणाऱ्या काँग्रेस पक्षाला गेल्या काही दशकांत मोठ्या ओहोटीचा सामना करावा लागला आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर लोकशाहीत अनेक निवडणुका जिंकूनही, अंतर्गत मतभेद, गटबाजी आणि १९६९ मधील इंदिरा गांधींच्या काळातील फाळणी यांमुळे पक्षाच्या मजबूत पायाला तडे गेले. प्रादेशिक पक्षांचा उदय आणि विरोधकांमधील आत्मविश्वासाचा अभाव यांसारख्या विविध कारणांमुळे काँग्रेसचे वर्चस्व कमी होत गेले आहे. पक्षातील अंतर्गत दोन गट (मध्यममार्गी आणि कट्टरपंथी) राहिल्यामुळे फूट पडली. १९६९ मध्ये सिंडिकेट आणि इंदिरा गांधी यांच्यातील संघर्षामुळे पक्षाची दुफळी झाली, ज्याचा फटका पक्षाला बसला. राष्ट्रीय स्तरावर भारतीय जनता पक्षाच्या उदयामुळे काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे.

राष्ट्रीय स्तरावर भाजपचा उदय :

भारतीय जनता पक्षाचा राष्ट्रीय स्तरावर उदय ६ एप्रिल १९८० रोजी अटल बिहारी वाजपेयींच्या नेतृत्वाखाली झाला.१९५१ मधील भारतीय जनसंघाची विचारधारा, आणीबाणीनंतरची राजकीय परिस्थिती आणि हिंदुत्ववादी राष्ट्रवादाच्या मुद्द्यांवर आधारित हा पक्ष उभा राहिला. १९९० च्या दशकात रामजन्मभूमी आंदोलनानंतर पक्ष प्रबळ बनला. २०१४ पासून नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात बहुमतासह भारतीय जनता पक्ष सत्तेत आला. पंतप्रधान म्हणून त्यांना भारतात सातत्याने उच्च मान्यता मिळाली आहे. मोदींना उजव्या विचारसरणीच्या राजकारणाकडे राजकीय पुनर्संरचना करणारे म्हणून वर्णन केले जाते. आज भाजपला स्पष्ट बहुमत, नरेंद्र मोदींचे एक केंद्रीय नेतृत्त्व आणि 'काँग्रेसमुक्त' भारत किंवा भाजपची केंद्रीय भूमिका अशी राहिली आहे.

राजकारणातील नैतिक मूल्याचा ऱ्हास:

भारतीय राजकारणातील नैतिक मूल्यांचा ऱ्हास होण्यामागे सत्तेसाठी कोणत्याही थराला जाण्याची प्रवृत्ती, पक्षांतर, निवडणुकीतील प्रचंड पैशांचा वापर, राजकारणाचे गुन्हेगारीकरण आणि भ्रष्ट आचारण ही प्रमुख कारणे आहेत. त्याग आणि सेवेची जागा स्वार्थाने घेतली असून, जात-धर्माचे राजकारण आणि नैतिक शिक्षणाचा अभाव यामुळे ही परिस्थिती निर्माण झाली आहे. पक्षांतरबंदी कायदा अस्तित्वात येण्याच्या पूर्वी भारतीय राजकारणात पक्षांतर बंदीच्या विरोधात कोणतीही तरतूद नव्हती. खासदार किंवा आमदारने पक्षांतर केले तरी सदस्यत्व रद्द केले जात नव्हते. सर्वप्रथम १९६७ नंतर पक्षांतरबंदी कायद्याची आवश्यकता वाटू लागली. १९६७ साली हरियाणातले एक आमदार गया लाल यांनी एका दिवसातच तीनदा पक्ष बदलला होता, तेव्हापासूनच भारतीय राजकारणात 'आयाराम गयाराम' हे वाक्य प्रचलित झाले आहे. १९६७ व १९७१ च्या निवडणुकांमध्ये निवडुन आलेल्या सुमारे १२५ पेक्षा जास्त खासदार व ४,००० आमदारांपैकी जवळपास ५० टक्के आमदारांनी पक्षांतर केले होते, ज्यामुळे देशात चांगलाच राजकीय गोंधळ उडाला होता. हरियाणाचे मुख्यमंत्री भजनलाल यांनी तर मंत्रिमंडळासह पक्षांतर केले होते. १९७९ साली जनता पक्षाच्या मोरारजी देसाईंचे सरकार ७६ खासदारांच्या बंडामुळेच कोसळले होते. पक्षांतरे वाढू लागल्याने पक्षांतरबंदी कायद्याची आवश्यकता भासू लागली. अशा गैर प्रकारांना आळा घालण्यासाठी तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधींनी एका समितीची स्थापन केली. समितीच्या शिफारशीप्रमाणे सर्व पक्षांच्या एकमताने १९८५ मध्ये ५२ वी घटनादुरुस्ती केली गेली. याद्वारे घटनेत १० व्या परिशिष्टाचा समावेश केला गेला. कलम १०२ आणि १९१ या आमदार-खासदारांना अपात्र ठरविणाऱ्या अनुच्छेदांमध्ये देखील बदल केला गेला. या सर्व तरतुदींना 'अँटी-डिफेक्शन कायदा' किंवा 'पक्षांतरबंदी कायदा' म्हणून ओळखले जाते.

राजकारणाचे गुन्हेगारीकरण म्हणजे गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तींचा राजकारणात आणि निवडणूक प्रक्रियेत वाढता सहभाग होय. यामध्ये अनैतिक, बेकायदेशीर किंवा हिंसक मार्गांचा वापर करून सत्ता मिळवणे, भ्रष्ट व्यवहार करणे आणि लोकशाहीची गुणवत्ता कमी करणे समाविष्ट आहे. हे लोकशाहीला लागलेली एक मोठी कीड मानली जाते. गुन्हेगारी प्रवृत्तीचे लोक सत्तेत आल्यावर पोलीस आणि प्रशासनावर दबाव आणतात. यामुळे गुन्हेगारांना संरक्षण मिळते आणि सामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण होते. यामुळे लोकशाही संस्था

कमकुवत होणे, भ्रष्टाचार, कायद्याचे राज्य नष्ट होणे, हिंसाचार वाढणे आणि सुशासनाचा अभाव निर्माण होणे असे गंभीर परिणाम होतात. लोकशाहीची गुणवत्ता खालावते आणि सामान्य जनतेचा व्यवस्थेवरील विश्वास उडतो.

उपाय योजना :

भारतीय राजकारणातील नैतिक मूल्यांचा ऱ्हास रोखण्यासाठी कठोर निवडणूक सुधारणा, भ्रष्टाचारास 'शून्य सहनशीलता' लोकपाल व लोकायुक्त संस्थांचे सक्षमीकरण, आणि राजकीय पक्षांमध्ये अंतर्गत लोकशाही आणणे आवश्यक आहे. पारदर्शक निधी, गुन्हेगारी पार्श्वभूमीच्या उमेदवारांवर बंदी आणि नागरी शिक्षणातून नैतिक मूल्ये रुजवणे हे दीर्घकालीन उपाय आहेत. भारतीय राजकारणातील नैतिकतेच्या ऱ्हासावर खालील उपाय सुचवता येतील.

१. उमेदवारांच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीवर कडक कारवाई आणि निवडणूक खर्चावर मर्यादा घालणे. निवडणूक आयोग अधिक शक्तिशाली करणे, जेणेकरून भ्रष्ट आचारणांवर त्वरित कारवाई होईल.

२. राजकीय पक्षांना मिळणारा निधी आणि खर्चाची माहिती पारदर्शक करणे. निवडणुकीतील काळ्या पैशाचा वापर रोखण्यासाठी कडक कायदे करणे. राजकीय पक्षांनी गुन्हेगारी पार्श्वभूमी असलेल्या लोकांना उमेदवारी न देणे.

३. केंद्रीय अन्वेषण विभाग सीव्हीसी आणि लोकायुक्त यांसारख्या तपास संस्थांना राजकीय हस्तक्षेपमुक्त करून स्वायत्तता देणे.

४. सत्ता हे सेवा करण्याचे साधन आहे, हे तत्त्व पुन्हा रुजवणे. राजकारणात 'त्याग आणि सेवा' या मूल्यांना प्राधान्य देणे.

५. महात्मा गांधींच्या तत्त्वांचा अवलंब करून, राजकीय नेत्यांनी स्वतःहून नैतिक आचारसंहितेचे पालन करणे आणि भ्रष्टाचारमुक्त वातावरण तयार करणे.

६. मतदारांनी जातीय किंवा वैयक्तिक फायद्याऐवजी उमेदवाराची चारित्र्यसंपन्नता आणि नैतिक क्षमता पाहून मतदान करणे.

७. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार, उमेदवारांना गुन्हेगारी रेकॉर्ड सार्वजनिक करणे अनिवार्य करणे. न्यायालयीन प्रक्रियेचा वेग वाढवून गुन्हेगार नेत्यांवर त्वरित कारवाई करणे.

संदर्भ :

१. Shubhash Kashyap, Political Reforms for Good Governance, Shipra Publishor, 2003

२. Madhu Limaye, Indian National Movement, Radiant Publisher,1989

३. प्रा. डॉ. दिलीप खैरनार, भारतीय राजकारणातील नैतिक मूल्य, डायमंड प्रकाशन.

४. प्रा.जीवन मेहता, भारतीय राजनीतिक चिंतन, एसबीपीडी प्रकाशन.

५. डॉ. प्रकाश पवार, भारतीय राजकारण आणि नेतृत्वाची वाटचाल, डायमंड प्रकाशन.

६. डॉ. जयंत लेले, भारत,समाज आणि राजकारण, रोहन प्रकाशन.

जागतिकीकरणाचे भारतावरील परिणाम

डॉ. रजनी बोबडे

डॉ. गोपाळराव खेडकर महाविद्यालय, गाडेगाव(तेल्हारा)

जागतिकीकरण म्हणजे व्यापार, वित्त, रोजगार, तंत्रज्ञान, दळणवळण, विदेशी स्थलांतर, पर्यावरण, शासन, समाजव्यवस्था, संस्कृती अशा सर्व क्षेत्रांत होत असणारे बदल होय. जागतिकीकरण म्हणजे आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक सीमांची मर्यादा दूर करून आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्था उभी करण्याची प्रक्रिया. जागतिकीकरणामुळे व्यापाराचा विस्तार, कक्षा व प्रमाण प्रचंड प्रमाणात वाढले आहे. १९८६ च्या उरुग्वे बहुपक्षीय व्यापार वाटाघाटीत १९९४ च्या गॅट कराराची निर्मिती झाली. त्यानंतर १९९५ पासून जागतिक व्यापार संघटना उभी राहिली आहे.

भारत सरकारने १९९० च्या आर्थिक अडचणींवर मात करण्यासाठी उदारीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरण अशा त्रिस्तरी आर्थिक सुधारणा सुरू केल्या. उदारीकरणाने लायसन्स आणि परमिट राज नाहिसे केले. खासगीकरणाने गुंतवणुकीतील सरकारी क्षेत्र कमी करण्याचे धोरण अवलंबिले. तर जागतिकीकरणाने खाजगी औद्योगिक क्षेत्रासाठी स्पर्धात्मक वातावरण निर्माण करून उत्पादनासाठी विविध क्षेत्रात गुंतवणुकीचे स्वातंत्र्य प्राप्त करून दिले.

जागतिकीकरणाचे उदयात जागतिकीकरणाची लाट ही नवी नाही असे सांगितले जाते. आंतरराष्ट्रीय व्यापार व विदेशी गुंतवणूक ही जागतिकीकरणाची दोन क्षेत्रे आहेत. तर सुवर्णमान पद्धतीच्या काळात म्हणजे १८७० ते १९१३ या पहिल्या महायुद्धपूर्वीच्या काळात व्यापार धंद्यांच्या वाढीने जागतिकीकरण होत राहिले होते. सूर्य न मावळणारे साम्राज्य आणि त्याच्या वसाहती यांच्यात अन्नधान्य व कच्चा माल यांची देवाणघेवाण चालत होती. अमेरिका, कॅनडा आणि ऑस्ट्रेलिया अशा नव्या प्रदेशात लोक वसाहत करून राहिले होते. त्यांनी औद्योगिकीकरण साध्य केले होते. व्यापाराचे जाळे वाढले होते. १९१३ च्या सुमारास १६ औद्योगिक झालेल्या राष्ट्रे आपल्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या २२ टक्क्यांनी निर्यात करीत होती. १९९१ मध्ये ओ. ई. सी. डी. देशांची निर्यात १७ टक्के होती. या सर्व औद्योगिक राष्ट्रे धरली तर त्यांची निर्यात उत्पादनाच्या २५ टक्के भरते. अर्थात या दोन्ही काळातील जागतिकीकरणात फरक असल्याचे ते दाखवितात. १९९३ पर्यंत व्यापार मोठ्या प्रमाणात कच्चा मालात होत असे. जागतिक निर्मिती वस्तूंच्या निर्याती विकासशील देशांच्या निर्मिती वस्तूंच्या निर्यातीचे प्रमाण ५ टक्क्यांपेक्षा कमी होते. १९९३ मध्ये जागतिक निर्मिती वस्तूंच्या निर्यातीत विकासशील देशांचे प्रमाण २२ टक्के इतके वाढले. तसेच विकासशील देशांच्या एकूण निर्यातीत निर्मिती वस्तूंचा भाग ६० टक्क्यांपेक्षा अधिक झाला. विदेशी गुंतवणुकीचे प्रमाण पहिल्या महायुद्धपूर्वी जगाच्या स्थूल राष्ट्रीय उत्पन्नाच्या २ टक्के होते. १९९१ मध्ये ते ६.४ टक्के झाले. आजच्या काळामध्ये त्या काळातील गुंतवणूक मुख्यत्वे अन्न व कच्चा मालाच्या उत्पादनात होत होती.

विदेशी वित्तीय व्यवहार पहिल्या महायुद्धपूर्वी सुवर्ण परिमाणाच्या स्थिर विदेशी चलन विनिमय दराने जवळजवळ होत. १९७३ पासून विदेशी चलन विनिमय दर नव्या (फ्लोटिंग) व्यवस्थेत राजवटीला सुरुवात झाली. तेव्हापासून रोजच्या ५ अब्ज डॉलर्सवरून १९९५ मध्ये २३०० अब्ज डॉलर्स इतकी प्रचंड वाढ झाली व ती वाढत

आहे. तेव्हा जागतिकीकरणाचा विचार नव्याने येत नसून पूर्वीही होता. त्यास नवे रूप, नवी दिशा, नवी साधने, नवी गती आज मिळत आहे.

जागतिकीकरणामुळे जग एकात्म बनत आहे. तंत्रज्ञानाचा वाढ व विस्तार यामुळे अशा एकात्मतेला गती मिळाली आहे. हे दळणवळणाच्या, माहिती तंत्रज्ञानात होत असलेल्या क्रांतिकारी बदलातून आपण अनुभवत आहोत. जागतिकीकरणामुळे जागतिक उत्पादन आणि निर्यात मोठ्या प्रमाणात वाढली आहे. १९५० च्या मानाने १९९० मध्ये ही वाढ अनुक्रमे ३७३ व २२९ टक्के होती. धन हे धनिकांकडे अधिक आकृष्ट होत असल्याने ही वाढ प्रचंड प्रमाणात श्रीमंत राष्ट्रांची झाली. एकूण उत्पादन वाढीत श्रीमंत राष्ट्रांचा वाटा ८३ टक्के व निर्यातींत ८९ टक्के होता. कमी उत्पन्न गटातील राष्ट्रांचा वाटा अनुक्रमे ३.६३ व २.६२ टक्के राहिला. म्हणजे श्रीमंत, मध्यम व निम्न स्तरातील उत्पन्न गटातील राष्ट्रांतील ही वाढ विषम प्रमाणात झाली. निर्यातीत निर्णायक वस्तूंचा विचार केल्यास विकासशील देशांचा लाभ झाला आहे.

तंत्रज्ञान कमी प्रमाणात लागणाऱ्या वस्तूंच्या उत्पादनात निर्माण उद्योगांत नव्हे तर मोठ्या प्रमाणात तंत्रज्ञानाचा उपयोग करावा लागणाऱ्या यंत्र व वाहन उद्योगांच्या निर्मितीतही विकासशील राष्ट्रांचा वाटा वाढलेला आहे. यामुळे जागतिकीकरणामुळे बेकारीचे प्रमाण कमी झाल्याचे दिसत नाही. किंबहुना जागतिक स्पर्धेत टिकून राहण्यासाठी उत्पादनात आणि कार्यक्षमतेत वाढवण्यासाठी उद्योगांमध्ये संरचनात्मक सुधारणा करणे भाग पडत आहे त्यामुळे बेकारीचे प्रमाण वाढण्याची शक्यता आहे. शिवाय संरचनात्मक उद्योगांतून तंत्रज्ञान कामगारांना मागणी असल्याने व असले तंत्र विकासशील राष्ट्रांतील कुशल व अकुशल कामगारांचे वेतन घटण्याची भीती त्यांना वाटत आहे. दारिद्र्य रेषेखालील लोकांचे प्रमाण वाढण्याची भीती काही देशांतून व्यक्त होते आहे. १९९५ मध्ये भारतात ते प्रमाण ४७ टक्के होते. यामुळे जागतिकीकरणाबद्दल काही ठिकाणी शंका व्यक्त होत आहेत.

जागतिकीकरण म्हणजे व्यापार, वित्त, रोजगार, तंत्रज्ञान, दळणवळण, विदेशी स्थलांतर, पर्यावरण, शासन व्यवस्थापन, संस्कृती अशा सर्व क्षेत्रांतून होत राहणारे रूपांतर होय. या संदर्भात :

१. वित्त व भांडवल यांची मालकी
२. बाजार व स्पर्धा,
३. संशोधन व ज्ञान यांना सलग्न तंत्रज्ञान
४. नव्या वस्तूंच्या उपयोगाचे सशक्तीकरण व राहणीमानाचे आधुनिकीकरण (यातून पाश्चात्त्यीकरण – पण पाश्चात्त्यीकरणाशिवाय आधुनिकीकरण होऊ शकते),पाश्चात्त्य कला व संस्कृतीकरण,
५. एकंदर विश्वातील जाणिवा
६. राजकीय संलग्नता, जागतिक नियम स्थापण्याची क्षमता व व्यवस्थापन करणारी यंत्रणा,

यांचा समावेश करता येतो.

जागतिकीकरण अशा रीतीने आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक क्षेत्र व्यापित आहे. या तीनही क्षेत्रातून विकसित देशांचे आक्रमण होते आहे. असा अर्थ आहे. "जागतिकीकरण म्हणजे वस्तू, सेवा व आंतरराष्ट्रीय भांडवल प्रवाह, अतिजलद व प्रसरण पावणारे तंत्रज्ञान यांचे वाढते प्रमाण तसेच विविधता यांच्या सहाय्याने जगातील देशांचे सतत वाढत जाणारे परस्परावलंबन होय." १९९० च्या दशकापासून जागतिकीकरणाला म्हणजे सशक्तीकरणाला नवे सुरुवात झाली.

बहुराष्ट्रीय कंपन्या आणि अमेरिका यांच्या पुढाकाराने तसेच अमेरिकेच्या प्रभावाखाली आंतरराष्ट्रीय नाणेनिधी व जागतिक बँक यांच्या कर्जसहाय्य देताना लादण्यात येणाऱ्या अटींच्या शिथिलीकरणाची कार्यवाही केली जात आहे. सोवियत रशियाचे विघटन झाल्यापासून पूर्व युरोपातील देशांनी व खुद्द रशियानेही या तत्त्वांचा स्वीकार केला आहे. १९७० पूर्वी प्रभावी ठरलेले समाजवादी, साम्यवाद तत्त्वज्ञान झटपटले गेले. उत्पादन निर्माण उद्योग उभे करणे, चालविणे हे सरकारचे क्षेत्र नसून शिक्षण, आरोग्य व मानवविकास ही त्याची क्षेत्रे आहेत हा विचार बळावला. एकूण

राष्ट्रीय विनियोगातील सरकारी विनियोगाचे प्रमाण कमी झालेले नाही. ते सरासरी २५ ते ४० टक्क्यांच्या दरम्यान आहे. पण सरकारी विनियोगाची क्षेत्रे बदलली आहेत. स्वतः उद्योग न चालविता खाजगी क्षेत्रास संपत्ती व रोजगार वाढविण्यासाठी प्रोत्साहन मिळेल असे वातावरण निर्माण करावे, विज्ञान आणि तंत्रज्ञान यांत विशेष गुंतवणूक करावी, उपभोक्त्यांचे हित साधणारी स्पर्धा निरोगी ठेवण्यासाठी बाजारव्यवस्था योग्य तऱ्हेने कार्य करीत राहावी यासाठी नियम करावे व देखरेख करणारी व्यवस्था निर्माण करावी, ही सरकारी क्षेत्रे होत असे आता मानले गेले आहे. शिथिलीकरण हे खाजगी क्षेत्रास प्रोत्साहन देणारे साधन आहे.

जागतिकीकरण म्हणजे आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक सीमांचे विलयन, मोकळेपणा, आजवर उभ्या केलेल्या अडथळयांचे विसर्जन. 'स्वदेश' या संकल्पनेत अनुरूप असणाऱ्या राजकीय सीमांना यात कोणताही धोका नाही. समाजवादातून सामाजिक उन्नती होऊ शकेल तर रशिया यातील गेलेले ५० ते ६० वर्षांचे अनुभव निष्फळ ठरले आहे. हे दिसत असूनही या तत्त्वज्ञानाची निष्ठा झटपटणाऱ्या वेदना शिथिलीकरणाच्या, जागतिकीकरणाच्या विचाराला स्वीकार करताना होणाऱ्या संघर्षांत व्यक्त होताना दिसत आहेत. जागतिकीकरणाने मानवाचा सर्वांगीण विकास होतो, जगातील दारिद्र्य नाहीसे होते, कुणाचीही उपासमार होत नाही, कष्ट करून पोट भरण्याचा वाव मिळतो हे सिद्ध झाले आहे असे दिसते त्याचा विचाराचा स्वीकार होईल. पण त्यासाठी आणखी काही काळ जावा आवश्यक आहे.

जागतिकीकरणाची आधुनिक संकल्पना ही मुख्यतः देशांदरम्यान व्यापार उदारीकरण, भांडवल स्थलांतरावर, तंत्रज्ञानांतरणावर असलेली बंधने दूर करून मुक्त व्यापाराचा प्रसार करणे या अर्थाने प्रामुख्याने घेतली जाते. यामध्ये व्यापार, गुंतवणूक संबंधित बाबी आर्थिक बाबी या तत्त्वज्ञानाचा राजकीय संकल्पना ही प्रामुख्याने आर्थिक स्वरूपाची ठरते. अर्थात याचा गाभा जरी आर्थिक असला तरी त्याची व्याप्ती सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक अशा सर्वच बाबींशी संबंध आणणारी आहे. यामुळे जागतिकीकरणाचे स्वरूप हे सर्वांगीण आणि व्यापक राहते.

जागतिकीकरणातून सर्व जगाची आर्थिक उन्नती होईल हे नवे युगाचे उद्दिष्ट आहे. आर्थिक अभिवृद्धी, आर्थिक विकास कसा होतो याबाबतच्या आजच्या विचारसरणीतील दृष्टिकोन वेगळा आहे. व्यापक आहे. प्रगत देशांनी, उत्पादन क्षमता सज्ज असताना प्रभावी मागणी तोकडी पडली म्हणून येणारा मंदीचा, पूर्ण रोजगारासाठी अर्थव्यवस्थेत सरकारी हस्तक्षेप व प्रत्यक्ष गुंतवणूक करण्याचे धोरण १९३० च्या दशकात अवलंबिले. पण त्यामुळे नोकरशाहीची पकड वाढली, कामगार संघटना आपल्या स्वार्थासाठी सगळया जनतेचा छळ करू लागल्या. सरकारी उद्योगांच्या वित्तीय गरजा भागविण्यासाठी वाढती कर व्यवस्था लागली, बाजारपेठेतील गतिशीलता घटू लागली. त्यामुळे उत्पादनक्षेत्रातून सरकारने अंग काढून घ्यावे असा विचार सुरू झाला, बळावला व खुल्या बाजारपेठेची काम करणारी धोरणे अवलंबिली गेली. १९७० च्या दशकाला सार्वत्रिक धक्क्याने, दोन तेल संकटांनी ...

कल्याणकारी असते ही शिकवण अभिजात अर्थशास्त्रात आली आहे. या अर्थशास्त्रात आली आहे, या अर्थशास्त्राचे खरेपणापूर्वी व खरेपणानंतर राजकारणसापेक्ष (यात श्रमाची अंतर्गत असते) ही पूर्णपणे स्पष्ट होते हे मूल गृहीतक आहे. तांत्रिकदृष्ट्या उत्पादन करण्यास कुशल कामगार जिथे उपलब्ध होतात तिथे ते होते असते, म्हणजे विशिष्ट उत्पादन विशिष्ट ठिकाणी होत राहते, सर्व वस्तूंचे उत्पादन एकाच देशात न होता जगात सर्वत्र ठिकाणी ते विखुरले जात असते. या विचारात आपण एक तत्त्व अनुसरतो आहोत. साधनसामग्री देशांदरम्यान हलविली जात नाही. म्हणजे जिथे ज्या प्रकारची साधनसामग्री व कामगार मिळत असतील त्याचाच उपयोग केला जाईल. यात जग म्हणजे सर्व देशांचे मिळून संघटन गणले जाईल. तसेच कल्याण, रोजगार, समता याबाबत व्यक्तीगत विचार न करता समाजाच्या दृष्टिकोनातून पाहावे. म्हणजे एका क्षेत्रात व्यक्ती बेरोजगार झाली तर दुसऱ्या क्षेत्रात तिला रोजगार मिळेल. खुल्या व्यापारामुळे ज्यांचे नुकसान होते त्यांना पुरेशी भरपाई मिळेल इतका खुल्या व्यापारातून फायदा होईल. हे गृहीतक

प्रत्यक्षात कुठे आढळत नाही. यात राजकीय व्यवहारामुळे येणाऱ्या मर्यादा विचारात घेतल्या नाहीत आणि तरीही खुल्या व्यापाराचा विश्वास हे पूर्णपणे अवास्तव तत्त्व होय असे पॉल क्रुगमन यांचे मत आहे.

'जागतिकीकरणातून आर्थिक विकास' या तत्वांबाबत वाद मतभेद आहेत. शिवाय खुल्या व्यापाराचे प्रभावी नियमन करणाऱ्या संस्थासंघटना निर्माण झाल्याशिवाय जागतिकीकरण कल्याणकारी ठरणार नाही. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीकडे गेल्याने, त्याच्या सल्ल्याने आणि दबावाने भारताने शिथिलीकरणाचा कार्यक्रम सुरू केला असा प्रवाह आहे. परंतु तो चुकीचा आहे. नाणेनिधीकडे भारत १९८१ साली गेला. पण १९८७ सालापासून भारत जागतिकीकरणाकडे आणि आर्थिक सुधारणांकडे वळला होता. जागतिक विचारप्रवाहांचा आणि अनुभवांचा हा परिणाम होता. १९९१ मध्ये आर्थिक कोंडी झाल्याने या सुधारणांना गती मिळाली. जागतिक संघटनेचा एक सदस्य म्हणून जागतिक विचारांच्या प्रभावातून, व्यापारातील होत राहिलेल्या जागतिक बदलांमुळे भारतास एकविसाव्या शतकातल्या हजार वर्षांपूर्वीप्रमाणे अलिप्त राहता येत नाही, हे आपण मान्य केले पाहिजे.

जागतिकीकरणास बहुराष्ट्रीय व्यापारी कंपन्या प्रमुखाने साधनभूत झाल्या आहेत. त्यांना आपल्या मूळ देशातल्यापेक्षा देशाबाहेरील बाजार विस्तारायचा आहे. ज्या देशात मजुरी मान कमी असेल, साधनसामग्री स्वस्त असेल, करसवलती वगैरे त्यांचा प्रवेश आहे. उत्पादनांत सुधारणा होत राहिल्याने अनेक मोठे मोठे भाग सोपस्कारांनिशी जिथे उत्पादन येईल तिथे निर्मिती करण्याची प्रक्रिया सहज जुळणी आज होऊ शकते. माहिती तंत्रज्ञानातील क्रांतीमुळे कोणत्या देशातल्या कारखान्यात कोणते व किती उत्पादन चालले आहे हे क्षणात कळू शकते, त्यांचे नियमन करता येते. शिवाय उपभोक्त्यांच्या इच्छेनुसार, आवडीनुसार वस्तू पुरविणे साध्य झाले आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या गुंतवणुकीवर, उत्पादनावर स्वदेशातील सरकारला नियंत्रण ठेवणे अवघड बनले आहे. त्यांनी प्रत्यक्ष गुंतवणूक करून कारखाना उभा केला तर त्याचा फायदा ज्या देशात कारखाना उभा राहील त्या देशातल्या रोजगार व उद्योग वाढीसाठी होऊ शकतो. त्यांची प्रत्यक्ष गुंतवणूक स्वदेशातील गुंतवणुकीस मारक ठरत नाही. उलट त्यांच्या माध्यमातून स्वदेशात बेरोजगार झालेले कारागीर व नवे मालाचे उत्पादनाची गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रेरित झालेले आहेत. तथापि या स्पर्धेत आपण टिकू शकणार नाही अशी भीती व्यक्त होत आहे. कारखाना उभारणाऱ्या बहुराष्ट्रीय कंपन्यांचे आगमन नाही, कारण ...

स्वदेशातल्या एकंदर भांडवली साठ्यात या कंपन्यांचा भाग अत्यल्प आहे. बहुराष्ट्रीय प्रत्यक्ष गुंतवणुकीपेक्षा वित्तीय गुंतवणूक कितीतरी पटाने अधिक आहे. ती चंचल आहे. केव्हा, कधी होईल व ती केव्हा काढून घेतली जाईल याचा पत्ता लागत नाही. हे शेअर बाजारातील प्रचंड चढउतारांतून दुष्परिणाम होत आहे. त्यावर प्रभावी नियंत्रण आवश्यक आहे. या व्यवहारावर, उलाढालीवर कर लावण्याची टॉबिन यांची सूचना विनाविलंब अमलात आणणे गरजेचे आहे. वित्तीय गुंतवणुकीला (शेअर बाजारातील खरेदीविक्री) जुगाराचे स्वरूप येता कामा नये. केन्सने म्हटल्याप्रमाणे "साहसावर सट्टे बाजीने मात करू नये" म्हणजे (शेअरबाजारातील) सामान्य उलाढालीवर बराचसा कर लावणे ही उपलब्ध सुधारणा ठरेल. परिस्थितीनुसार आयातीवर नियंत्रण घालण्याचे स्वातंत्र्य राखायला हवे. भांडवलाच्या उलाढालीवर नियंत्रण हवे, वित्तीय उलाढालीवर कर लावता आला पाहिजे. बहुराष्ट्रीय कंपन्यांची व्यवहारसंहिता तयार करायला हवी व ती काटेकोरपणे पाळली जाईल हे पाहायला हवे. जागतिक व्यापाराचे आणि वित्त यांचे व्यवहार प्रभावी नियमन करणाऱ्या संस्था–संघटनांना आवश्यक ते अधिकार मिळून द्यायला हवेत. जागतिक आर्थिक व्यवस्थामागे मोठ्यांचे हितसंबंध साधताना छोट्यांच्या हितसंबंधांना बाधा आणणारे राजकारण खेळले जात असेल तर छोट्यांनी सतत जागरूक राहून एकत्रित त्यास विरोध केला पाहिजे.

संदर्भ

१. देशपांडे श्री. आ., भारतीय अर्थव्यवस्था : संक्रमण आणि विकास, हिमालय पब्लिशिंग हाऊस, दिल्ली, २००४, पृ. १७३.
२. भाटुरी अमर्त्य, जागतिक व्यापाराचे आव्हान, १९९८, पृ. १४९.
३. वर्ल्ड डेव्हलपमेंट रिपोर्ट, १९९९ व २००० वर्ष.

४. डीन बेकर / जेराल्ड एपस्टीन / रॉबर्ट पोलिन, ग्लोबलायझेशन अँड प्रोग्रेसिव्ह इकॉनॉमिक पॉलिसी, केंब्रिज युनिव्हर्सिटी प्रेस, केंब्रिज, १९९८, पृ. ८.

५. ईनामे जी. एन., भारतीय अर्थव्यवस्था विकास व पर्यावरणात्मक अर्थशास्त्र, पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स, नागपूर, २०१०, पृ. २६०.

६. खेरे सी. प., जागतिकीकरण : समस्या, आशय आणि अनुभव, दिलीपराज प्रकाशन, पुणे, २००२, पृ. १२.

७. कराडे जगन, जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे, २००६, पृ. १२.

८. खेरे सी. प., जागतिकीकरण : समस्या, आशय आणि अनुभव, दिलीपराज प्रकाशन, पुणे, २००२, पृ. १४.

९. वर्ल्ड डेव्हलपमेंट रिपोर्ट, १९९५, पृ. ४९.

१०. एडवर्ड एम. ग्राहम, फॉरेन डायरेक्ट इन्व्हेस्टमेंट, १९९५, पृ. ४५४.

११. गिल्बर्ट एम. कोहन, ग्लोबल पॉलिटिकल इकॉनॉमी थिअरी अँड प्रॅक्टिस, लॉंगमन पब्लिकेशन्स, न्यूयॉर्क, २०००, पृ. ३०३.

१२. टिम कॉन्डन, लिमिट्स ऑफ ग्लोबलायझेशन, १९९९, पृ. ६२.

१३. खेरे सी. प., जागतिकीकरण : समस्या, आशय आणि अनुभव, दिलीपराज प्रकाशन, पुणे, २००२, पृ. १४६.

भारतीय ज्ञानपरंपरा आणि मराठी साहित्य

महेंद्र सुभाषराव काकड

एम.ए.एज्युकेशन

सावित्रीबाई फुले महाविद्यालय, अकोट जि.अकोला

सारांश

भारतीय ज्ञानप्रणालीचे विविध अभ्यासक अवलोकन करीत असताना त्यातील आदर्शवादी गोष्टींचा साहजिकच साहित्यात वापर करतात. प्राचीन साहित्यसंपदा व वेगवेगळ्या गोष्टींचा वापर करुन भारतीय ज्ञानप्रणाली विश्वात आपली ओळख ठेवुन आहे. साहित्य माणसाची बौध्दिक भुख भा गवत असतानाच नवसाहित्यीकांना प्राचीन ज्ञानप्रणालीमधुन वस्तुनिष्ठ मुल्ये घेता येतात. मराठी साहित्य हे फक्त मनोरंजन किंवा सामाजिक चित्र नाही .तर भारतीय ज्ञान प्रणालीचे लोक भाषेतील प्रभावी माध्यम आहे. ज्ञानेश्वरापासून ते खांडेकरापर्यंत तसेच तेंडुलकरपर्यंत कविता, कादंबरी, नाटक व निबंधात अद्वैत भक्ती, कर्म, मोक्ष, धर्म, अर्थ व काम यांचे विविध रूप दिसतात.हे साहित्य भारतीय तत्त्वज्ञानाला जनसामान्यापर्यंत नेते. आणि त्यांचे आधुनिक काळाची संवाद साधते. भारतीय ज्ञान प्रणाली केवळ धार्मिक नाही तर जीवन जगत असताना समाजमन, नैतिकता आणि अस्तित्व यांचे समग्र चिंतन भारतीय ज्ञानपणाने मध्ये आपणाला आढळते. मराठी साहित्याने भारतीय ज्ञान प्रणालीला जिवंत ठेवले आहे. मराठी साहित्याला एका नव्या नव्या आयामावर नेऊन ठेवले आहे. भारतीय ज्ञान प्रणालीचा अभ्यास करत असताना त्यातील कविता, कादंबरी, नाटक व निबंध घडणारे भारतीय तत्त्वज्ञानी सामाजिक दृष्ट्या व नैतिकदृष्ट्या फार वेगळेच म्हणावे लागतील.साहित्याचा संवाद हा वाचकांना नवनवीन गोष्टी देत असतो. भारतीय प्राचीन साहित्यातून किंवा मराठी प्राचीन साहित्यातून नवनवीन आयाम यांनी भारतीय ज्ञान परंपरेला एक प्रकारचे मोठे पाठबळ दिलेले आहे.साहित्यिक साहित्यात जीवनातील प्रसंग रेखाटतांना संपूर्ण भावविश्व त्यात रेखाटतात त्यामुळे साहजिकच साहित्य समरस होत असते.

प्रस्तावना

मराठी साहित्यात भारतीय ज्ञान परंपरा (Indian Knowledge Systemsआणि तत्त्वज्ञान (दर्शन)अत्यंत गहन आणि सातत्यपूर्ण आहे. भारतीय ज्ञान परंपरे मध्ये वेद, उपनिषदे, भगवद्गीता, भक्ती, परंपरा, कर्म, मोक्ष, आत्मा परमात्मा, माया, ब्रह्म इत्यादी संकल्पना केंद्रस्थानी आहेत. मराठी साहित्याने या संकल्पनांचे लोक भाषेत रूपांतर करून सामान्य जनतेपर्यंत पोहोचवले आणि त्यांचे सामाजिक, नैतिक व अध्यात्मिक अर्थ नव्याने घडवले. मराठी कवितेची सुरुवात भारतीय दर्शनावर आधारित आहे. संत ज्ञानेश्वर (१३वे शतक) ज्ञानेश्वरी ही भागवत गीतेवर मराठी भाष्य आहे. अद्वैत, वेदांत भक्ती, कर्मयोग व ज्ञानयोग याचा सुंदर समन्वय ज्ञानेश्वरीत दिसतो. "जे का रंजले गांजले त्यासी म्हणे तो आपुले" ही ओवी सामाजिक समता आणि भक्तीचे दर्शन घडवते. संत एकनाथ आणि संत तुकाराम यांनी भागवत धर्म, विठ्ठल भक्ती, वैराग्य, संसार व मोक्ष यांचे चित्रण केले आहे. तुकारामांची अभंग मराठी मध्ये आत्मचरित्र आणि ईश्वर भक्तीने बांधले आहेत. आधुनिक काळात केशवसुत, मर्ढेकर यांनी आधुनिक जीवनाचे व्दंव्द मांडले आहे. या सर्वांशीच्या पार्श्वभूमीत भारतीय तत्त्वज्ञान आपणास दिसते. बा. सी. मर्ढेकर यांच्या कवितेत

आत्म्याचा शोध भारतीय दर्शनाची जोडला आहे. मराठी कादंबरीत पौराणिक दर्शनीक विषयांचे आधुनिक कादंबरी म्हणून विश्लेषण दिसते. वि. स. खांडेकर यांच्या ययाती कादंबरीत महाभारतातील ययाती कथेवर आधारित भोगवाद व त्याग, काम व धर्म भारतीय तत्त्वज्ञानातील काम, मोक्ष मांडला आहे. ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त ही कादंबरी भारतीय ज्ञानप्रणालीचे आधुनिक दर्शन घडवते. ह. ना. आपटे, ना. सी. फडके यांच्या साहित्यात सामाजिक सुधारणा व कर्म सिद्धांत आढळतो.आधुनिक कादंबऱ्यांमध्ये वास्तविक जीवनात भेडसावणाऱ्या संकल्पना नव्या संदर्भात येतात.मराठी नाटकात पौराणिक विषयांचा मोठा वाटा आहे. किर्लोस्कर, देवल व गडकरी यांची रामायण महाभारतावर आधारित नाटके धर्म व कर्तव्य यांचे दर्शन घडवितात. विजय तेंडुलकर व वसंत कानेटकर यांची आधुनिक नाटके सामाजिक वास्तव दाखवितात. पण पार्श्वभूमीत भारतीय नीतिशास्त्र आणि मानवी स्वभावाचे चिंतन असते. अंधयुग सारखी नाटके महाभारतातील युद्ध ,शांतता व नैतिकता याचे तात्विक विश्लेषण करतात.वेगवेगळ्या साहित्यिकांच्या रचनेत आपणास भारतीय तत्त्वज्ञानाचे चिंतन दिसते. साने गुरुजी, पु. ल. देशपांडे यांच्या साहित्यात सामाजिक, नैतिक निबंधात भक्ती, अहिंसा व समता याचे भारतीय दर्शन घडते. रा. गो. जाधव सारखे लोक भारतीय तत्त्वज्ञानावर थेट बोट ठेवतात. भारतीय तत्त्वज्ञानाचा अभ्यास भारतीय ज्ञानप्रणालीचे दर्शन घडविते. आधुनिक निबंधकार जी. एन. देवी यांच्यासारखे विचारवंत भारतीय ज्ञानप्रणाली आणि भाषा संस्कृती यांचा संबंध जोडतात साहित्य फुलत असतानाच त्यातून महतमंगल घटक वाचकांच्या मनात स्थान पक्के करीत असतात.

स्वरुप

भारतीय ज्ञान परंपरेचे स्वरूप पाहत असताना सामान्यता कथा, कादंबरी, नाटक, कविता व निबंध, आत्मचरित्र, वृत्त कथन लघु निबंध, महाकाव्य, खंड काव्य, आख्यान काव्य असे वांङ्मय प्रकार मानले जातात. वाङ्मयाचा प्रकार भेद म्हणून वापरतात अशी भूमिका काही विचारवंत घेतात. काही विचारवंताच्या मते ही नाममात्रवादी भूमिका उपयोगाची नाही. आपण जेव्हा साहित्यकृती वाचतो आस्वादतो तेंव्हा मनातल्या मनात काही एक निकष गृहीत धरतो. भारतीय ज्ञानपरंपरा दिर्घकालीन प्रणाली असून त्यामध्ये विविध गोष्टींबद्दल माहिती सांगण्यात आलेली आहे. त्यामध्ये साहित्यप्रकार किंवा साहित्याचे वर्गीकरण यांचा विचार करताना साहित्याच्या प्रकारानिष्ठ लक्षणांचा विचार अभिप्रेत असतो. भारतीय ज्ञान प्रणाली ही प्रत्येक साहित्य प्रकाराची जणू काही एक संकेत व्यवस्था आहे. काही एक परंपरा ही संकेत व्यवस्थेत गृहीत धरलेली असते. लेखक साहित्यकृती तयार करतो. त्यामागे फार मोठी परंपरा असते. एका निर्मितीच्या वेळी लेखकाला प्रत्येक गोष्टीचा विचार करावा लागतो. कविता म्हटले की भाषेचा वैशिष्ट्यपूर्ण वापर होणे आवश्यक असतो.मिलन मालशे यांनी साहित्याची प्रकार व्यवस्था निष्पन्न करताना साहित्यिक करार ही संकल्पना मांडली आहे. ते म्हणतात कादंबरी लिहिणे वाचणे म्हणजे एका विशिष्ट प्रकारचा करार मध्ये बांधून घेते परंतु कवी हा कविता करत असताना कवितेचे वेगवेगळे पैलू आपल्यासमोर मांडत असतो.

उद्दिष्टे

१) भारतीय ज्ञान परंपरेची ओळख व्हावी

२) वेगवेगळ्या लेखनशालीचा आदर व्हावा

३) विविध साहित्यातून नव साहित्यिकांना प्रेरणा मिळावी.

४) वांङ्मयीन साहित्याचा स्वातंत्र्यपूर्व काळातील व स्वातंत्र्योत्तर काळातील साहित्याचे स्वरूप विशद करता येईल.

५) नवीन पिढीला साहित्याची योग्य माहिती व्हावी.

६) भारतीय प्राचीन ज्ञानप्रणाली व मराठी साहित्यातील कविता' कादंबरी' नाटक व निबंध याची परिपूर्ण माहिती नव अभ्यासाकांना व्हावी.

गृहीतके

१) साहित्याचा अभ्यास करतांना भारतीय ज्ञानपरंपरा एक साधन आहे.

२) वेगवेगळ्या लेखन शैली साहित्याचा मुख्य स्त्रोत आहे .

३) सांस्कृतिक परंपरेचा भारतीय ज्ञान प्रणाली आरसा आहे.

४) कविता' कादंबरी' नाटक व निबंध यातून साहित्यिकांची ओळख होते.

५) लोकसंस्कृती व लोकभाषा विविध साहित्याचे अधिष्ठान आहे.

विषय प्रतिपादन

भारतीय भारतीय ज्ञान परंपरत एकात्मतेचे दर्शन घडवते. नवनवीन संकल्पना भारतीय ज्ञान प्रणाली मधून येताना आपणास दिसतात. मनुष्याच्या मनोव्यापाराचे दर्शन विविध साहित्यातून आपणास होत असते. साहित्य व्यक्तीचे भावविश्व प्रकट करत असते. साहित्यातून जणू समाजमान समोर येताना आपणास दिसते. साहित्याने मानवी ज्ञानाच्या सर्व क्षेत्रात क्रांतीकारक पाऊल उचलल्याचे आपणास कळते. दुस-या महायुद्धातील प्रचंड नरसंहारामुळे मानवाच्या प्रगतीवरील विज्ञानाच्या मानवी सुखासाठी चालवलेल्या प्रयत्नावरील मानवातील सदभावना एका प्रकारे तडास गेली. 1923 मध्ये रवीकरण मंडळ अस्तित्वात आले. अनेक कवींच्या कविता त्या काळात प्राचीन भारतीय ज्ञानप्रणालीची ओळख करून देतात.ग्रामीण परिसराचा व भाषेचा गोडवा असलेल्या या कवितेमधून प्रेमाचे अनुभूती आपणास दिसते. 1940 च्या आसपास मराठी कथेला नवरूप आले. कथा म्हणजे चैतन्य होय. दिवाकर यांच्या कथानी दिलेल्या काव्यात्मक गोष्टी त्या काळात रूजल्या नाही. वामन चोरघडे, कुसुमावती देशपांडे यांच्या कथा जनमाणसास रुजू लागल्या.नव्या कथाकरांच्या पहिल्या पिढीत वा.ल .कुळकर्णी र.वी .जोशी बा.सी. मंढैकर यांच्या लेखणीतून साहित्य जणू फुलत गेले. विविध कथाकारांच्या कथेने मानवी जीवनातील विविध पैलूंचे दर्शन घडत होते. 1935 च्या जवळपास कादंबरीला नवी चालना देणारे विभावरी शिरूरकर, साने गुरुजी यासारखी अपवादक लेखक आढळतात. तत्कालीन मनोरंजन प्रधान अथवा स्वप्नामध्ये चित्रण करणा-या कादंब-या त्या काळातील जीवनानुभव दाखवतात. मराठीत १९४०पासून हळूहळू आणि १९५० नंतर वेगाने प्रादेशिक कादंबरी लिहिल्या गेल्या. १९४६ नंतर नाटकाचे प्रयोग होण्यास सुरुवात झाली. मराठी नाटकांनी चित्रपटाची स्पर्धा करून आपल्या अस्तित्व सुद्धा टिकवले आहे. नाटकामुळे एखाद्या गोष्टीचे अंतरंग खुलू लागले .अशा प्रकारे मराठी साहित्यातील कविता ,कादंबरी, नाटक व निबंध घडणारे भारतीय ज्ञान प्रणालीचे दर्शन आपणास घडत असते.

निष्कर्ष

१) भारतीय ज्ञान प्रणाली जिवंत ठेवणे सर्वांचे कर्तव्य आहे.

२) साहित्य संवर्धन करीत असताना भारतीय संस्कृतीचे जतन करणे आवश्यक आहे.

३) विद्यार्थ्यांना भारतीय ज्ञानप्रणालीचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

४) सामाजिक जीवनात कथा, कादंबरी, नाटक व काव्य यांना महत्त्व आहे. ते जाणणे आवश्यक आहे.

५) भारतीय ज्ञान प्रणाली साहित्याचे वैचारिक अधिष्ठान आहे

समारोप

भारतीय ज्ञान प्रणालीने आपणास साहित्यचा एक बिंदू दिलेला आहे. भारतीय नाटक, काव्य, कादंबरी व निबंध यातून समाजातील वस्तुनिष्ठ माहिती समोर येत असताना मनोरंजन व प्रबोधन या दोन्ही गोष्टी आवश्यक वाटतात.काव्य फुलेल तर जीवन फुलेल कादंबरीच्या पात्रातून हूबेहूब चित्र कादंबरीकार उभे करतात. वेगवेगळ्या नाटकातून आपणास नाट्यछटा व इतर गोष्टी माहिती होतात. निबंध लेखनातून अनेक साहित्यिकांनी वेगवेगळी माहिती दिली आहे.भारतीय प्राचीन संस्कृती व भारतीय ज्ञान प्रणाली साहित्यिकांना एक आशेचा किरण आहे. साहित्यातून मानवी जीवन वृद्धिगत होत असते. साहित्य हा सामाजिक प्रबोधनाचा आरसा आहे. नववाचकांनी व नव साहित्यिकांनी आपल्या लेखनसाहित्यात भारतीय प्राचीन ज्ञान प्रणालीचा उपयोग करावा व समृद्ध सांस्कृतिक वारसा जपावा.

साहित्याचा सहवास
स्फूर्ती देईल जीवनास

संदर्भ

१) भाषेचे स्वरूप आणि उपयोग-डॉ. अंजली सोमन

२) शिक्षण संक्रमण जानेवारी २०१९ म.रा.मा.व.उ.मा.शि.पुणे

३) आधुनिक भाषा विज्ञान -मालशे मिलिंद

४) वस्तुनिष्ठ मराठी-डॉ. महादेव जगताप

५) भाषा आणि संस्कृती- ना.गो.कालेलकर

६) भूमी आणि भूमिका-भास्कर चंदनशीव

इतिहास लेखन आणि विचारधारा

भिमराव परघरमोल
संशोधक विद्यार्थी
डॉ. धीरजकुमार नजान
मार्गदर्शक
डॉ. गोपाळराव खेडकर महाविद्यालय, गाडेगाव, तेल्हारा, जि. अकोला

सारांश

इतिहास लेखन आणि विचारधारा या दोन्ही संकल्पनांचा परस्पर फार मोठा संबंध आहे. इतिहासाचे लेखन करताना त्यावर त्या-त्या वेळी प्रभावी असणाऱ्या विचारधारांचा फार मोठा प्रभाव पडल्याचे दिसून येते. कधी कधी ते एक तात्कालीन विचारधारेचे प्रतिबिंबच असल्याचे लक्षात येते. विचारधारांच्या असल्या प्रतिबिंबामुळेच समाजाचे खूप मोठे नुकसान झाल्याचे जाणवते. समाजातील वंचित, दलित, पीडित, शोषित घटकांवर बराच अन्याय झाल्याचे सिद्ध होते. पर्यायाने त्याचे परिणाम अखिल मानव जातीला भोगून द्यावे लागतात. इतिहासावर परिणाम करणाऱ्या अनेक विचारधारा पुरातन काळापासून तर आज पर्यंत दिसून येतात. त्या विचारधारांनी इतिहास लेखन करताना संकुचित दृष्टिकोन ठेवल्यामुळे इतिहासकारांना वाहवा तर मिळाली. परंतु नंतर मात्र त्यांचा अप्रामाणिकपणा दृष्टीस पडला. त्यांच्या अप्रमाणिकपणाची धग अनेकांना भोगावी लागली. पर्यायाने इतिहासावरील विश्वासार्हता कमी होऊन पुरावे शोधण्यास मानवी प्रवृत्ती धजावली. पुरावे शोधताना इतिहासकारांनी बऱ्यापैकी विषमतावादी व्यवस्थेची 'री' ओढल्याचे लक्षात आले. त्यामुळे एका मोठ्या मानवी समूहाला विषमतेचे व गुलामीचे चटके सहन करावे लागले. परिणामतः इतिहास लेखनावरील विचारधारेमुळे अनेक इतिहासकार विश्वासास व आदरास अपात्र ठरले.

प्रस्तावना

इतिहास लेखन आणि विचारधारा या विषयावर सविस्तर विवेचन करण्याआधी इतिहास आणि विचारधारा या दोन्ही शब्द तथा घटकांची परिभाषा समजून घेणे महत्त्वाचे आहे. सर्वप्रथम इतिहास म्हणजे काय? या संदर्भात असे सांगता येईल, की इतिहास म्हणजे भूतकाळात घडलेल्या घटनांची पद्धतशीर व सुसंगत मांडणी होय. ही मांडणी करताना इतिहासकारांना अनेक गोष्टींची खबरदारी घेणे गरजेचे असते त्यासाठी इतिहासाची काही साधनं असतात जसे लिखित साधने, भौतिक तथा मौखिक साधने. इत्यादी साधनांचा आधार घेऊन परिस्थितीजन्य पुराव्यांवर इतिहास लिहिलेला असतो. त्यामुळे इतिहास म्हणजे केवळ पुरातन घटनांचा आढावा नसतो तर त्यामध्ये सत्याचा शोध घेणे हा उद्देश असतो. जसे की वेगवेगळ्या सभ्यता किंवा संस्कृती कशा विकसित झाल्या? मानवाच्या विकासाचे विविध टप्पे, भूतकाळात झालेली युद्ध. ती कशी झालीत? त्यांची कारणमीमांसा, त्याचा मानव जातीवर झालेला परिणाम. हे सर्व समजून घेऊन इतिहासातील काही चुका टाळणे तर मानव जातीसाठी किंवा सभ्यता संस्कृतीसाठी पोषक गोष्टींची पुनरावृत्ती किंवा स्वीकार करणे. यासाठी इतिहासाला समजून घेणे अगत्याचे असते. परंतु इतिहास समजून घेताना त्याची सत्या-असत्यता पडताळणी सुद्धा महत्त्वाची असते. कारण भारतीय इतिहासावर वेगवेगळ्या टप्प्यांवर विविध विचारधारांचा मोठ्या प्रमाणावर प्रभाव दिसून येतो. विचारधारा म्हणजे काय? तर ती एक विचारांची चौकट किंवा दृष्टिकोन असतो. इतिहास लेखनाच्या अनेक विचारधारा इतिहासामध्ये दिसून येतात.

विषय प्रतिपादन

इतिहासकारांचा धार्मिक, सामाजिक, राजकीय व वैचारिक दृष्टिकोन इतिहासाच्या मांडणीवर प्रभाव टाकतो. भारतीय इतिहास लेखनावर प्रभाव टाकणाऱ्या काही विचारधारा पुढीलप्रमाणे दिसून येतात.

वैदिक विचारधारा
धार्मिक विचारधारा

विषमतावादी विचारधारा
बुद्धाची समतावादी विचारधारा
वसाहतवादी विचारधारा
राष्ट्रवादी विचारधारा
मार्क्सवादी विचारधारा
स्त्रीवादी विचारधारा
आंबेडकरवादी विचारधारा
आधुनिक विचारधारा,

सर्वप्रथम वैदिक विचारधारेच्या संदर्भात विचार करूया. वैदिक विचारधारा म्हणजे काय? तर वेदांमध्ये जो विचार किंवा तत्त्वज्ञान प्रचलित आहे त्या तत्त्वज्ञानाला वैदिक विचारधारा असे म्हणतात. 'वेद हे अतिप्राचीन काळापासून आर्यांचे म्हणजेच आजच्या हिंदूंचे धर्मग्रंथ म्हणून मानण्यात आले आहेत. ते पवित्र तसेच अपौरुषय असल्याचे प्रचलित आहे. अपौरुषय असल्यामुळे त्यातील तत्त्वज्ञान हे चिकित्सेपलीकडील आहे अशी धरणा पसरवलेली दिसून येते.'(१) त्यातील मुख्यतत्त्वज्ञान 'वर्णव्यवस्था आणि आश्रम व्यवस्था हे आहे. वर्णव्यवस्था म्हणजे ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र (समस्त महिलांची गणना ही चौथ्या वर्णात म्हणजेच शूद्र वर्णात केलेली आहे) यामध्ये कामाचे असमान वाटप केलेले असून पहिल्या तीन वर्णांना वेगवेगळ्या प्रकारचे अधिकार देऊन शुद्रांना कोणतेही अधिकार न देता वरील तीन वर्णांची सेवा करावी. तर आश्रम व्यवस्थेमध्ये वयाच्या विविध टप्प्यावर वेगवेगळे कार्य करावे. ब्रह्मचर्या आश्रमामध्ये गुरुआश्रमी राहून शिक्षण घ्यावे त्या काळात ब्रह्मचर्याचे पूर्ण पालन करावे. गृहस्थाआश्रमामध्ये लग्न करून गृहस्थी बसविणे, मुलाबाळांना जन्माला घालणे. वडिलोपार्जित संपत्तीत भर घालणे. वानप्रस्थाश्रमामध्ये सर्व धनसंपत्ती मुलाबाळांच्या स्वाधीन करून नामसंकीर्तन भजनी लागावे. शेवटच्या म्हणजे संन्यासाश्रमामध्ये संसाराचा पूर्ण त्याग करून मोक्षप्राप्तीसाठी वनात किंवा जंगलात निघून जाऊन तपश्चर्या चिंतन मनन करावे.'(२) विशेष म्हणजे हाही अधिकार शूद्र तथा महिलांना नाकारण्यात आलेला होता. वेदांमध्ये जे निहित तत्त्वज्ञान आहे त्याचा प्रचार करण्यापेक्षा जो विचार त्यामध्ये नाही त्याच विचारांचा प्रचार प्रसार करण्यामध्ये अनेक लेखक तथा इतिहासकारांनी जीवाचा आटापिटा केलेला दिसून येतो. 'वेदांमध्ये जगाचे तत्त्वज्ञान भरलेले असून संसारातील प्रत्येक समस्येचे उत्तर आहे त्यामध्ये आयुर्वेद, संगीत, कला, गायन, वादन यांनी ते परिपूर्ण असल्याचे भासवण्यात येते. परंतु प्रत्यक्षात मात्र विपर्यस्थ परिस्थिती आहे. वेद हे विषमतावादी विचारांचे असून जातिवादाने परिपूर्ण आहेत. ते स्त्री द्वेषी असून एक अशास्त्रीय माहितीचे भांडार आहे. वैद्यकशास्त्रासंबंधी काहींच्या मते त्यामध्ये आयुर्वेदाचे तत्त्वज्ञान आहे. परंतु तसे अजिबात नसल्याचे जाणवते. तसेच ते विचाराने परिपूर्ण नसून त्यामध्ये विज्ञानही नाही. त्यामधील भाषा सुद्धा अश्लील आहे.'(३) त्यामुळे त्यांचे प्रमाण इतिहासातील समतावादी विचारधारेच्या महापुरुषांनी तथा विद्वानांनी नाकारल्याची दिसते. तथागत गौतम बुद्ध म्हणतात वेद हे ओसाड वाळवंटा सारखे आहेत.(४) तीन वेदांत पारंगत असणाऱ्या ब्राह्मणाच्या त्रिवद ज्ञानाला ते निर्जल वाळवंट म्हणतात. संत तुकाराम महाराज आपल्या एका अभंगामध्ये म्हणतात,

शब्द ज्ञानी एक आपल्या मते सांगती वेदात भिन्न भावे।
तुका मने एक भाव न धरती पडीली ही माती त्यांची तोंडी।(५)

तर स्वामी विवेकानंद म्हणतात,

'भारतात मी जर वेदांचा विशिष्ट भाग घेतला आणि जर हात चलाखी करून पराकोटीचा अशक्य असा अर्थ त्याला दिला, तर सर्व खुळे लोक माझ्यामागे घोडक्याने येतील.'(६)

इतिहास हा तटस्थ असावा असे अपेक्षित आहे. परंतु तसे होताना दिसत नाही. इतिहासकार हा एक माणूस असल्यामुळे तो तटस्थ राहण्याचा प्रयत्न करतो. परंतु बऱ्याच वेळा तो हेतू पुरस्सर तटस्थता टाळतो किंवा तिथे त्याचे,

त्याच्या पूर्वजांचे, समाजाचे किंवा विचारांचे हितसंबंध गुंतलेले असल्यामुळे ती पाळणे त्याला शक्य होत नाही. कधी कधी तर काही इतिहासकार शब्दछल, शब्दाचे अवडंबर उभे करून, खरे पुरावे नष्ट करतात आणि खोटे पुरावे उभे करतात. बुद्धिभ्रमाच्या सहाय्याने कथा, कादंबऱ्या, चित्रपट, नाटक, सिनेमा इत्यादींच्या माध्यमातून अस्तित्वात नसलेल्या घटनांना मूर्त रूप देण्याचा प्रयत्न इतिहासामध्ये अनेक ठिकाणी केलेला दिसतो. अनेक इतिहासकारांच्या शब्दछलामुळे त्यांची विरोधाभासी विचारधारा दिसून आली. उदाहरण द्यायचे झाले तर मराठ्यांच्या इतिहास लेखनाचे देता येईल. मराठ्यांच्या इतिहासाची मांडणी करताना अनेक ठिकाणी शब्दछल झाल्याचे जाणवते. 'जसे पेशव्यांनी अटकेपार झेंडे लावले तर मराठ्यांचे पाणीपत झाले. पहिली घटनाही १७५८ ची असून दुसरी १७६१ मधली आहे. तात्कालीन परिस्थितीमध्ये पूर्ण सत्ता ही पेशव्यांच्या हाती एकवटलेली असतानाही विजय पेशव्यांच्या नावे, तर पराजय मराठ्यांच्या माथी मारण्यात आला. वास्तविक पाहता जिंकले तरी पेशवे आणि हरले तरी पेशवे. किंवा हरले तरी मराठे आणि जिंकले तरी मराठे! अशी मांडणी अपेक्षित होती. कारण दोन्ही लढायांचे नेतृत्व पेशव्यांकडे होते. तर मराठा सरदार दोन्हीकडे आपला पराक्रम गाजवत होते. परंतु या ठिकाणी इतिहास लेखन करताना ब्राह्मण्यवादी विचारधारा आपल्या जातभाईंना वाचवताना दिसते. त्यामुळे अशा विकृत विचारधारेच्या इतिहासकारांनी अनेक ठिकाणी विरोधाभास तथा शब्दछल केलेला दिसून येतो.

शिवाजी महाराजांच्या इतिहासातील एक अत्यंत महत्त्वपूर्ण उदाहरण देता येईल. शिवाजी महाराजांच्या इतिहासात अनेकप्रकारचे विपर्यास करण्यात आले आहे. त्यापैकी हा एक फार मोठा परिणाम आहे. 'शिवाजीचे गुरु हे संत रामदास होते. शिवाजीने आपले राज्य रामदासांच्या झोळीत टाकले. रामदासाच्या सांगण्यावरून स्वराज्याचे निशाण भगवे केले. रामदासांना प्यायला दूध पाहिजे होते तर शिवाजीने त्यांना वाघिणीची धार काढून दिली. रामदासाच्या पुढे शिवराय वाकून त्यांचे दर्शन घेत आहेत तर रामदास त्यांना आशीर्वाद देत आहेत.'(७) या आणि अशा अनेक प्रकारच्या बनावटी मुळे खरा इतिहास लपविला जात आहे. त्यांच्या भीषण परिणामांची कल्पना सामान्य माणसांना करता येणार नाही.

या संदर्भात श्री. न. र. फाटक यांचे उदाहरण देता येईल. त्यांनी जुलै १९२९ मध्ये विविध ज्ञानविस्तार या मासिकात रामदास आणि शिवाजी हा लेख लिहिला. त्यामध्ये ते म्हणतात, 'शिवाजी महाराजांच्या सभासद बखरीचा करता कृष्णाजी अनंत यांनी शिवाजी महाराजांच्या राज्यकारभारात प्रत्यक्ष भाग घेतलेला होता. अर्थात तो समकालीन होता. परंतु त्याच्या बकरीत रामदासाचा मुळीच उल्लेख नाही. ९१ कलमी बखरीत रामदासांचा निर्देश नाही. स्वानुभव दिनकर या ग्रंथाचे कर्ते दिनकर स्वामी हे रामदासांच्या आरंभीच्या शिष्यांपैकी. त्यांनी आपला ग्रंथ रामदासाच्या पश्चात पण बराच लवकर पूर्ण केला. तथापि ग्रंथाच्या शेवटी त्यांनी गुरुचे जे चरित्र जोडले आहे त्यामध्ये शिवाजी महाराजांचा उल्लेख नाही.'(८) या खेरीजही अनेक पुरावे विचारात घेतल्यास संत रामदास स्वामी हे शिवाजी महाराजांची गुरु आहेत की नाही? याचा कयास बांधता येतो.

मागील काही दिवसांपासून म्हणजेच 'संविधानाच्या अंमलबजावणीनंतर सर्वसामान्य लोकांना संस्कृत भाषा शिकण्याचा अधिकार मिळाला.'(९) त्याआधी जे काही धार्मिक, वैदिक, पौराणिक तत्त्वज्ञान अस्तित्वात होते ते संस्कृत भाषेमध्ये असल्यामुळे सर्वसामान्यांना कळत नव्हते. त्यामुळे बहुसंख्यांक समाज घटकाला नैसर्गिक हक्क-अधिकारापासून वंचित ठेवण्याचे तत्त्वज्ञान त्यामध्ये भरलेले होते. ते अधिकार मिळवण्यासाठी प्रयत्न करणे म्हणजेच धर्माचे उल्लंघन, पापाचे भागीदारी, नरकात प्रवेश असा भ्रम त्यामध्ये पसरवलेला असल्यामुळे कोणीही विषाची परीक्षा पाहण्यास धजावत नव्हतं. लिहिण्या वाचण्यामुळे मती (बुद्धी) विकसित होते, तर चांगल्या खाण्यापिण्यामुळे शरीर. शरीरासोबत मती विकसित झाल्यास आपले लिखित षडयंत्र उघडकीस येईल म्हणून ज्ञानाची संपूर्ण कवाड पूर्णपणे बंद करून दूध, दही, तूप, लोणी हे श्रेष्ठ अन्न असल्यामुळे शूद्रांना ते सेवन करता येणार नाही. असा दंडक घालण्यात आला होता. एवढेच नव्हे तर शिक्षण ज्यांची मक्तेदारी आहे, त्यांना कदाचित मानवतेची दया येऊन

एखाद्याने विद्या शिकवण्याचा प्रयत्न जर केला, तर त्यांनाही भीती घालण्यासाठी अनेक नियम घालून दिलेले दिसतात. 'शूद्र जर आजूबाजूला असेल तर वेदमंत्राचे पठण करू नये जर केले तर अनर्थ घडून महापाप घडेल.'(१०) 'जो कोणी शूद्रांना धर्माचा व व्रतांचे ज्ञान देईल तो नरकात जाईल.'(११)

शूद्रांना म्हणजेच आजच्या बहुजन समाजाला असे अनेक चटके सहन करावे लागत होते. त्यांना चांगलं नाव ठेवण्याचा अधिकार सुद्धा इतिहासाने नाकारलेला होता. 'वर्णव्यवस्थेमधील ब्राह्मणाचे नाव हे मंगलमय किंवा मंगल सुचक, क्षत्रियांची नावे बलसूचक, वैशांचे नाव हे धनसूचक, तर शुद्रांचे नाव घृणासुचक असावे.'(१२) असा स्पष्ट आदेश आढळतो. धार्मिक तथा वैदिक इतिहासने प्रस्थापित केलेली वर्णव्यवस्था ही ईश्वरनिर्मित असल्यामुळे त्यामध्ये जन्मलेला प्रत्येक व्यक्ती हा ईश्वराच्या इच्छेने धरतीवर आलेला असतो. त्यांचा जन्म कुठे झाला हे सर्व त्याच्या पूर्वजन्मीच्या पाप-पुण्याचे फळ असल्यामुळे ते सहन केल्यावाचून पर्याय नाही. परंतु पुढच्या जन्मी त्यावर पर्याय असल्याचे अनेक ठिकाणी सांगण्यात आलेले आहे. त्यासाठी धर्मग्रंथांनी घालून दिलेल्या नियमाप्रमाणे जीवन जगल्यास ते शक्य असल्याचे सांगितलेले आहे. त्यासाठी शूद्रांनी कोणत्याही प्रकारे वर्णव्यवस्थेचे, आश्रमव्यवस्थेचे उल्लंघन करू नये. तसेच त्यांनी 'धनाची आणि ज्ञानाची लालसा ठेवू नये, तसे झाल्यास ते ब्राह्मणांना बाधक ठरते.'(१३) त्यांनी फक्त वरील तीनही वर्णांची सेवा करावी. ब्राह्मणांना दानधर्म करावा, कर्मकांड करून उपासतापास व्रतवैकल्य पाळावीत.

इतिहास लेखनावर विचारधारेचा प्रभाव कसा असतो या संदर्भात महिलांचे उदाहरण सुद्धा तंतोतंत लागू पडते. देशातील संपूर्ण महिला ह्या शूद्रवर्णात येत असल्यामुळे वर्णव्यवस्था व आश्रम व्यवस्थेचे सर्व अधिकार त्यांना नाकारलेले होते. त्यांच्यासाठी शिक्षण आणि व्यक्ती स्वातंत्र्य हे पूर्णपणे नाकारून त्यांच्या संदर्भात अतिशय बीभत्स विचार व्यक्त केलेले आहेत. 'तिने बालपणी वडिलांच्या, तारुण्यात नवऱ्याच्या तर उद्धापकाळात पुत्राच्या देखरेखी खाली जीवन जगावे. कोणत्याही प्रकारच्या स्वातंत्र्याची अपेक्षा ठेवू नये. ती लग्नामध्ये दान दिलेली असल्यामुळे पतीच तिचा मालक असतो. तो कितीही व्यसनी दुराचारी असला तरीही तिने त्याची पूज्यभावे सेवा करावी. व्यभिचार हाच तिचा स्वभाव धर्म असल्यामुळे तिला पुरुषांसंदर्भात आवड निवड नसते. म्हणून तिच्यासोबत भावाने, बापाने किंवा पुत्राने एकांतात बसू नये. ज्या घरात फक्त मुलीच जन्मल्या आहेत, ज्या मुलींना भाऊ नाही त्यांच्याशी लग्न सुद्धा करू नये. पतीने पत्नी सोबत एका ताटात जेवण करू नये, तर तिला जेवण करतेवेळी जांभळी देताना किंवा शिंकतांना पाहू नये.'(१४)

'वरील सर्व दंडक हे सर्वसामान्य तथा सर्व जाती धर्माच्या महिलांसाठी असले तरी विधवा महिलांना मात्र पशुतुल्य जीवन जगावे लागत असे. मुळात विधवा होणे हेच तिचं एक पूर्वजन्मिचं पाप समजल्या जात होतं. त्यामुळे तिला पापमुक्त होऊन स्वर्गारोहण करायचे असेल तर पतीच्या चितेवर स्वतःला जिवंत जाळून घ्यावे. अन्यथा शिक्षा म्हणून पुनर्विवाहाचा अधिकार नाही. संपत्तीमध्ये वाटा नाही. नवीन कपडे परिधान करण्याचा अधिकार नाही. ताजं अन्न, दाग दागिने, अलंकार, संपत्तीतील वाटा, आनंदाच्या क्षणी तथा मंगलप्रसंगी उपस्थिती नाकारून तिचे मुंडन करावे. पांढऱ्या रंगाचे जाडे भरडे कपडे परिधान करावे. एकंदरीत तिला पराधीन जीवन जगावे लागत असे, ज्यामुळे तिचे सर्वांगाने शोषण होत असे.'(१५)

अशा विषमतावादी शोषण करणाऱ्या कुप्रथांना विरोध करण्यासाठी अनेक समाजसुधारक, महामानव पुढे सरसावले. त्यामधून स्त्रीवादी साहित्य अस्तित्वात आले. धर्मग्रंथांनी चिकित्सेच्या घातलेल्या मर्यादा त्यांनी ओलांडल्या. त्यातून त्यांना यश मिळायला लागले. समाजसुधारक तथा काही महापुरुषांनी विषाची परीक्षा पाहिल्यामुळे त्यांच्या लक्षात आले की, हे सर्व कपट तथा कूटनीती आहे. इतिहासाला विषमतावादी तथा वर्णवर्चस्ववादी विचारधारेचा चढवलेला तो मुलामा आहे. यामागे खूप मोठे षडयंत्र असून, ती एका व्यक्तीने दुसऱ्यावर

केलेली शिरजोरी आहे. तो धर्म किंवा धर्माची विचारधारा नसून ते मानवी जीवनाचे विडंबन आहे. हे त्यांच्या लक्षात आल्यावर अनेकांनी मानवतेच्या विकासासाठी सर्वस्व अर्पण केले. त्यामध्ये अग्रणी म्हणजे महात्मा ज्योतिराव फुले. त्यांनी गुलामगिरीसह विविध साहित्याविष्कार केला. कोणत्याही प्रकारची वैज्ञानिक प्रगती किंवा हडप्पा मोहेंजोदाड़ोचे उत्खनन झालेले नसताना, पाश्चात्य विचारवंताचे मानवतावादी विचार व छत्रपती शिवरायांपासून प्रेरणा घेऊन इथल्या विषमतावादी, मनुवादी विचारधारेला आव्हान दिले. महिलांसह शूद्रातीशूद्रांना सर्वांगाने विकसित करण्यासाठी तहयात संघर्ष करून स्त्रीवादी विचारधारा विकसित केली.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी १९२७ मध्ये मनुस्मृति सारख्या विषमतावादी, स्त्रीविरोधी विचारधारा जोपासणाऱ्या धर्मग्रंथाला जाळून टाकले. त्यांनी समाजाचे अवलोकन करून अभ्यास, चळवळ व चिंतनाच्या माध्यमातून स्वतःची विचारधारा विकसित केली. तीच विचारधारा आज आंबेडकरवादी विचारधारा म्हणून जगभरात मान्यता पावलेली आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी बुद्धाच्या समतावादी तथा समता, स्वातंत्र्य, न्याय, बंधुत्व या मानवी मूल्याधारित विचारधारेचा आधार घेऊन विरोधी विचारधारेची सर्व दालनं झोडपून काढली. Annihilation Of Caste (जाती प्रथेचे निर्मूलन) या ग्रंथाच्या माध्यमातून जाती व्यवस्थेच्या निर्मितीचे षडयंत्र उघडे पाडून त्याचे मूळ धर्मग्रंथांमधील धारणांमध्ये आहे. त्यांना मूठ माती दिल्याशिवाय जातीव्यवस्था संपुष्टात आणता येणार नाही. ही इतिहासाला दखल पात्र प्रभावी मांडणी केल्यामुळे अनेक विरोधी विचारधारेच्या इतिहासकारांच्या सर्वांगाला झिणझिण्या आल्या. परंतु कोणीही त्याची तोड करू शकला नाही. Revolution and counter revolution in ancient India (प्राचीन भारतातील क्रांती आणि प्रतिक्रांती)च्या लेखनातून धर्मग्रंथांची प्राचीनता, प्रमाण्यता व लोकप्रियता ओसरली. 'हिंदू कोड बिलामुळे स्त्रीवादी विचारधारेत भर घालून हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून हिंदू विवाह कायदा १९५५, हिंदू वारसा हक्क कायदा १९५६, हिंदू दत्तक विधान व मेंटनन्स कायदा १९५६, अज्ञान मुलाचे पालकत्व कायदा १९५६ यासारखे अनेक कायदे अस्तित्वात येऊन स्त्री व्यक्तिमत्व उन्नत तथा प्रगत झाले.'(१६) संविधानाने परंपरागत अमानवी रुढी, परंपरा व कायदे यांना लगाम घातला. भारतीय संविधानावर गौतम बुद्धाच्या समतावादी विचारधारेचा प्रभाव असल्यामुळे भारतीय समाज व्यवस्था ही समता, स्वातंत्र्य, नाय, बंधुत्व या मूल्यांवर विकसित व्हावी असे संविधानाला अपेक्षित आहे. त्यासाठी २६ जानेवारी १९५० च्या आधीचे सर्व कायदे जे 'मानवी व्यक्तिमत्त्वाला न्युनता आणणारे असतील, ते सर्व शून्य करून नवीन कायद्याच्या निर्मितीला बंधन घातले.'(१७) समाजामधील प्रचलित रूढी परंपरांचा, ज्या स्त्रियांच्या व्यक्तिमत्वाला उनेपणा आणणाऱ्या असतील त्याचा स्वतःहून त्याग करून वैज्ञानिक दृष्टिकोन विकसित करावा व शोधक बुद्धीचा वापर करावा. जेणेकरून सत्याअसत्याची मनाला ग्वाही देता येईल. अनुच्छेद १४ ते १८ नुसार समता आणि समानता निर्माण करण्यासाठी भारतीयांना मूलभूत अधिकार बहाल केले; ज्याचे राज्यांना उल्लंघन करता येत नाही. तर अनुच्छेद ४६ नुसार पूर्वीचे शुद्रातीशूद्र व महिला म्हणजे आजचे अनुसूचित जाती जमाती व दुर्बल घटकांच्या आर्थिक व शैक्षणिक हित संवर्धनासाठी राज्यांना अधिकारीत केले.

संदर्भसूची

१. डॉ. साळुंखे आ.ह.मनुस्मृतीच्या समर्थकांची संस्कृती, लोकायत प्रकाशन सातारा, दहावी आवृत्ती २०१३, पृष्ठ ७४
२. देशमुख मो.म. मनुस्मृतीवर नवा प्रकाश, शिवभारती प्रकाशन, कोतवाल नगर नागपूर, प्रथम आवृत्ती २००८, पृष्ठ ३८,३९
३. डॉ. अज्ञात सुरेंद्र, अनुवाद-शिंदे गौतम, वेदांचे खरे स्वरूप, आम्रपाली प्रकाशन औरंगाबाद,
४. डॉ. आंबेडकर भीमराव रामजी, बुद्ध आणि त्यांचा धम्म, आनंद प्रकाशन औरंगाबाद, प्रथम आवृत्ती १९७०, पुनर्मुद्रण २०१४, पृष्ठ १०३

५. डॉ. सुरेंद्र अज्ञात, उपरोक्त, पृष्ठ ६

६. कित्ता, पृष्ठ ७

७. हनवते प्रेम, शिवरायांची निष्ठावंत मुस्लिम सैनिक, लोकायत प्रकाशन यवतमाळ ,द्वितीय आवृत्ती २०१३, पृष्ठ ७८

८. कित्ता, पृष्ठ ७९

९. भारतीय संविधान, परिशिष्ट-८

१०.श्री हिंदू धर्म एज्युकेशन फाउंडेशन, मनुस्मृति, पृष्ठ १६३

११.देशमुख मो. म. उपरोक्त,पृष्ठ ५५

१२.श्री हिंदू धर्म एज्युकेशन फाउंडेशन, उपरोक्त, अध्याय-२,श्लोक-३१,३२

१३.परघरमोल भिमराव, संविधान समजून घेताना, बीएफसी प्रकाशन लखनऊ २०२४, पृष्ठ ५५

१४.देशमुख मो.म. उपरोक्त, पृष्ठ ६०,६१,८४,८५

१५.पदमजी बाबा, यमुना पर्यटन, प्रथम आवृत्ती १८५७

१६.बानाई शाखा चंद्रपूर, चला! संविधान समजून घेऊया!, डॉ. बाबासाहेब आंबेडकर नॅशनल असोसिएशन ऑफ इंजिनियर्स रामनगर चंद्रपूर, पृष्ठ५५

१७.भारतीय संविधान, अनुच्छेद 13

विमर्शी विचार विकास डिजिटल कार्यक्रमाचा उच्च प्राथमिक विद्यार्थ्यांच्या विचारक्षमतेवर परिणाम: एक प्रयोगात्मक अभ्यास

डॉ. भूषण प्रदीपकुमार देशमुख
संशोधक विद्यार्थी, पदव्युत्तर शिक्षण विभाग, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती
डॉ. शोभना सावजी
प्राचार्य, सावित्रीबाई फुले शिक्षण महाविद्यालय, अकोट जि.अकोला

सारांश :

सदर संशोधनाचा उद्देश उच्च प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या विमर्शी विचारक्षमतेच्या विकासासाठी डिजिटल कार्यक्रमाची प्रभावकारकता तपासणे हा आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासाठी केवळ पारंपरिक अध्यापन पद्धती पुरेशा नसून, नवोन्मेषी आणि सहभागात्मक डिजिटल साधनांची आवश्यकता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर प्रस्तुत अभ्यासात विमर्शी विचार विकासासाठी विशेषतः तयार केलेला डिजिटल कार्यक्रम विद्यार्थ्यांवर लागू करण्यात आला.

या संशोधनासाठी प्रयोगात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात आला असून, नमुन्यातील विद्यार्थ्यांना प्रयोग गट आणि नियंत्रण गट अशा दोन गटांमध्ये विभागण्यात आले. प्रयोग गटाला निश्चित कालावधीपर्यंत डिजिटल कार्यक्रमाद्वारे शिक्षण देण्यात आले, तर नियंत्रण गटाला पारंपरिक पद्धतीने अध्यापन करण्यात आले. पूर्वचाचणी व उत्तरचाचणीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या विचारक्षमतेतील बदल मोजण्यात आला.

संशोधनाच्या निष्कर्षांनुसार, डिजिटल कार्यक्रमाचा विद्यार्थ्यांच्या विमर्शी विचारक्षमतेवर सकारात्मक आणि लक्षणीय परिणाम झाल्याचे दिसून आले. विद्यार्थ्यांच्या विश्लेषण, तर्कशक्ती, समस्या सोडविण्याची क्षमता आणि सृजनशील विचारांमध्ये वाढ झाल्याचे आढळले. त्यामुळे उच्च प्राथमिक स्तरावर विमर्शी विचार विकासासाठी डिजिटल कार्यक्रम उपयुक्त ठरतो, असा निष्कर्ष काढण्यात आला आहे.

कीवर्ड : विमर्शी विचार, डिजिटल कार्यक्रम, उच्च प्राथमिक विद्यार्थी, विचारक्षमता, प्रयोगात्मक अभ्यास, तर्कशक्ती, सृजनशीलता, समस्या सोडविणे

1.1. प्रस्तावना

